UNIVERSAL
LIBRARY

OU_196130

UNIVERSAL
LIBRARY

OUP -831 —5-8-74—15,000

OSMANIA UNIVERSITY LIBRARY

Call No. M 294.1 M161 Accession No. M 1852

Author

Title

This book should be returned on or before the date last marked below

परलोकवासी रा. रा. वामन आबाजी मोडक

यांचीं

धर्मपर आणि नीतिपर व्याख्यानें.

रा. भि. जोशी यांनीं लिहिलेलें अल्प चरित्र,

आणि

डा. रामकृष्ण गोपाळ भांडारकर

यांनीं लिहिलेली प्रस्तावना

यांसहित.

हीं

म्यानेजर ' चित्रशाळा ' पुणें,

यांनीं प्रकाशित केलीं.

पुणें

चित्रशाळा स्टीमप्रेस आणि भारतभूषण प्रेस

येथें छापिलीं.

सन १९०८

किंमत १॥ रुपया.

प्रस्तावना.

—— :०: ——

सुमारें १८६३-६४ मध्यें एक दिवस प्रातःसमयीं मित्र रा. रा. वामनराव भोडक व मी फिरावयास गेलो होतो. येतांना तुळशीबागेतून परत आलों. त्याठिकाणीं स्नान करून सोवळे होऊन कित्येक ब्राह्मण संध्या करीत आहेत असे पाहून, हे पाहा ब्राह्मण पूर्ण भावानें संध्या करीत आहेत, आमचाही भाव एकदां या संध्येवर असाच होता, तो आतां नष्ट झाला आणि धर्मसंबंधी अन्यच कांहीं मतें आमचीं झालीं आहेत, त्या मतांवर तरी या प्रकारचा भाव आणि विश्वास असला पाहिजे, असे विचार आमच्या मनांत आले. त्यावेळेस प्रार्थनासमाज ही संस्था कांहीं निघाली नव्हती. ती निघाल्यावर देवाविषयीं आणि शुद्धाचरणाविषयीं आपलीं मतें स्पष्ट करून त्याविषयीं अवश्यक जो भाव तो स्थिर आणि दृढ करण्याची संधि सांपडली. यासंबंधीचा उपयोग घेऊन धर्मसंबंधी मतें ठरीव करून समाजरूप धर्मसंस्थेचें स्वरूप देण्याकरितां ज्या थोड्या गृहस्थांनीं उद्योग केला त्या गृहस्थांपैकीं रा. रा. वामनराव हे एक होते. नंतर समाजसंस्था पुष्कळ वर्षेपर्यंत चालून त्यांची व माझी एके समयीं मुंबई येथें समुद्रकिनाऱ्यावर गांठ पडली. त्यावेळेस, एकनाथ स्वामी गंगेत स्नान करून घरीं जात असतांना, त्यांच्या अंगावर एक यवन थुंकला तथापि क्रुद्ध न होतां ते शांतपणें परत गंगेवर जाऊन स्नान करिते झाले आणि पुनरपि आपल्या घरीं जाऊं लागले. पुन्हा तो यवन त्यांच्या अंगावर थुंकला. तेव्हांही मुकाट्यानें परत जाऊन त्यांनीं स्नान केलें. असे होतां होतां रात्रीचा समय येऊन ठेपला आणि तो यवन थुंकतां थुंकतां थकला, आणि पुढें थुंकेनासा झाला. ही गोष्ट सांगून आम्हांस अशाप्रकारचें क्षमेचें साधन केलें पाहिजे आणि सध्या तर आम्हांस तें कांहीं साध्य झालेलें नाहीं, असें रा. रा. वामनरावजी म्हणाले.

या दोन गोष्टींवरून समाजाच्या धर्माचें दोन प्रकारें दिग्दर्शन झालें. एक हें कीं परमेश्वर व सदाचरण यांविषयीं अंतःकरणामध्यें दृढभाव असला पाहिजे; आणि दुसरे हे कीं स्वात्मपरीक्षण करून सत्यनिष्ठ, दया, क्षमा, शांति इत्यादि सत्संस्कार संपादिले पाहिजेत. अशा प्रकारचा समाजाचा धर्म. त्याचाच विकास हे जे रा. रा. वामनराव यांनीं लिहिलेले निबंध रा. रा. रामभाऊ जोशी यांणीं परिश्रम करून एकत्र केलेले आहेत त्यामध्यें सांपडेल. रा. रा. वामनराव मुंबई व पुणें येथे समाजाची उपासना वारंवार चालवीत असत. त्यावेळेस त्यांचा उपदेश श्रोत्यांच्या मनावर उत्तम ठसा उत्पन्न करणारा असा असे. परंतु मोठी शोचनीय गोष्ट ही आहे कीं ते होते तेथपर्यंत श्रोत्यांपैकीं एकाद्याने उपदेश लिहून काढावा हा प्रकार प्रवृत्तींत आला नव्हता. त्यामुळे ह्या ग्रंथामध्यें त्यांचे पुष्कळ उपदेश गोविलेले आढळत नाहींत, ह्मणून फार हानि झाली आहे असे म्हटले असतां चालेल. रा. रा. वामनरावजी कीर्तनेंही करीत असत. तीं श्रोत्यांस रम्य अशा प्रकारचीं होत असत. त्यांतील प्रतिपादनाचाही सारांश या ग्रंथांत दिला असता तर बरे झाले असते. परंतु तो सारांश श्रोत्यांपैकीं एकाने किंवा स्वतः कीर्तनकारांनीं लिहून काढिला पाहिजे होता. तो काढिलेला दिसत नाहीं. मात्र कीर्तनाचीं पद्यें छापिलेलीं आहेत. तीं रा. रा. रामभाऊ जोशी एकत्र छापणार आहेत. त्यांचाही पुष्कळ उपयोग होईल.

सारांश, आमच्या समाजसंस्थेच्या इमारतीच्या खांबांपैकीं रा. रा. वामनरावजी हे एक प्रमुख खांब होते. ते इहलोक सोडून गेल्यामुळें त्या इमारतीला दुबळेपणा आला आहे. तो कांहीं अंशीं या ग्रंथाच्या योगे कमी होईल.

पुणे,
ता. १५ सप्टेंबर १९०८. } **रामकृष्ण गोपाळ भांडारकर.**

पुढील व्याख्यानांस अनुरूप असे प्रस्तावनेदाखल चार शब्द, वामनराव यांचें हृद्गत जे पूर्णपणें जाणत असत अशा डाक्तर भांडारकरांनी लिहिले आहेत. यापेक्षां जास्त कांही लिहावयाचें उरलें नाही.

रा० वामनराव यांचीं व्याख्यानें एकत्र करून छापावीं असा त्यांच्या सुशील पत्नीचा फार हेतु होता. यासाठीं त्यांनीं आपल्या चिरंजीवांकरवीं हीं व्याख्यानें एकत्र जमविलीं. हीं जमविण्याचे कामीं रा. वामनराव यांचे समाजमित्र रा० शिवराम नारायण गोखले यांनीं फार मेहनत घेतली. त्याबद्दल त्यांचे आभार मानावे तितके थोडेच आहेत.

या व्याख्यानांच्या योगानें वर डा. भांडारकर यांनीं म्हटल्याप्रमाणें तरुण मंडळीच्या मनांत परमेश्वराविषयीं दृढभाव आणि नीति व सदाचरण यांविषयीं प्रीति ही उत्पन्न होण्यास साह्य झाले असता हीं प्रकाशित करण्याचें सार्थक झालें असें आम्ही समजूं.

प्रकाशक.

अनुक्रमणिका.

विषय		पृष्ठ
मोडक यांचें अल्प चरित्र	... ...	१ ते ३५
१ क्षमा	... ...	१
२ सत्यभाषण	... ...	६
३ धर्माचरण	... ...	१०
४ अध्ययनपरता	... ...	१९
५ आतिथ्य	... ...	२३
६ सौम्यता अथवा शांति	... ...	२९
७ आत्मसंरक्षण	... ...	५८
८ सत्संगति	... ...	७८
९ ईश्वरनिष्ठा	... ...	८२
१० वैराग्य	... ...	८६
११ धर्मबुद्धीची जागरूकता	... ...	९०
१२ ईश्वरविषयक ध्यानाचें महत्त्व	... ...	९५
१३ धर्मविषयक संवाद	... ...	१०३
१४ योग	... ...	१०७
१५ जीवात्मपरमात्मयोग	... ...	११२
१६ धर्मभ्रम–(१)प्रातःसंध्या	... ...	११९
१७ — " (२) गणेश चतुर्थी	... ...	१२२
१८ — " (३) पितृपक्ष	... ...	१३०
१९ — " (४) अधिक महिना	.. ..	१३३
२० समाजाच्या प्रीतिभोजनाविषयीं गैरसमजूत	... ...	१३९
२१ देवेन्द्रनाथांचे प्रेमसमर्पण	... ...	१४२
२२ गीतार्थसार	... ...	१६३
२३ बालविवाह	... ...	२६५
२४ यूरोपाच्या इतिहासापासून काय शिकावे?	... ...	३००
२५ हिंदूलोकांत ऐक्यवृद्धि होण्याचे उपाय	... ...	३४४



प्रिन्सिपाल वामन आबाजी मोडक. बी. ए. सी. आय्. ई.

जन्म ता. १ सपटंबर सन १८३५. मृत्यु सपटंबर १८९७.

C. S. P.

वामन आबाजी मोडक यांचें संक्षिप्त चरित्र.

—o—

१-बाल्यवृत्त—वामनराव मोडक यांचा जन्म कोकणांतील एका गरीब अशा कुलीन घराण्यांत झाला. त्यांचे वडील मोरेश्वर ऊर्फ आबा हे प्रथमारंभी श्रीवर्धन येथे आणि नंतर दापोलीजवळ जालगांव येथे राहात. हे लहानपणापासूनच वैराग्यवृत्तीचे असत. तथापि त्यांना आश्रय देणारे त्यांचे गोरे या नांवाचे आतेबधू होते, त्यांनी त्यांचे लग्न केले. परंतु आबा हे संसारात न राहातां वैरागी होऊन निघून गेले. अशा स्थितीत ते सुमारें दहा वर्षे तीर्थयात्रा करीत फिरत होते. त्याचा कोणास शोधही नव्हता व ते घरी परत येतील अशी त्याच्या आप्तइष्टास आशा नव्हती. परंतु पुढे एकाएकी त्यांस आपल्या तरुण पत्नीची दया येऊन म्हणा किंवा कोणाच्या उपदेशाने म्हणा, वैराग्यवृत्ती धारण केल्याबद्दल उपरती होऊन ते परत संसारात आले. तेव्हां त्याच्या श्रीमंत आप्तानीं त्यास थोडी जमीन आणि व्याजवट्यासाठी थोडे पैसे देऊन घरदार थाटून दिले. नंतर ते पत्नीसह वर्तमान दापोलीजवळ गव्हे येथे राहिले. ते ससारांत शिरले, परंतु त्यांची निरंतर साधुवृत्तीच असे. ते बहुधा स्नानसंध्येत, पोथीपुस्तक वाचण्यात आणि ईश्वरभजनात काळ घालवीत. शेतीभातीचे व देवघेवीचे लहानशा संसारास पुरेसे उत्पन्न येई, परंतु त्यांचा व्यापार बहुधा आंतवट्याचाच असे. तथापि त्यांची पत्नी ससारदक्ष असल्यामुळे बरेच चालले होतें. या ठिकाणी वामनराव यांचा जन्म ता० २१ सप्टबर सन १८३५ साली वामनद्वादशीच्या दिवशी झाला. पुढे वामनराव आठ वर्षांचे होऊन त्यांची मुंज झाल्यावर त्यांचे वडील परलोकवासी झाले.

लहान गोष्टीची एकाद्या मोठ्या गोष्टीशी तुलना करावयाची या दृष्टीने

पाहिले तर वामनराव यांचे हे लहानपणचे चरित्र प्रख्यात आळंदीकर साधू ज्ञानदेव यांच्या चरित्राशी फार जुळते. ज्ञानदेवाच्या वडिलांप्रमाणेच वामनरावांचे वडील प्रथमतः विरागी [सन्यासी] बनले होते, परतु पुढे संसारात आले. वामनराव यांचे वडील त्यांच्या लहानपणीच वारले, यामुळे त्याच्यावर त्यांच्या साधुवृत्तीचा मोठासा परिणाम झाला असेल असे म्हणवत नाही. परतु त्यांचा सत्वशिलपणा, ईश्वरपरायणता आणि दयाशीलता हे गुण त्यांना त्यांच्या पित्यापासून प्राप्त झाले यात शका नाही. अशा प्रकारच्या पतीच्या सहवासांत असलेल्या त्यान्या आईकडूनही त्यान्या स्वभावास उत्तम प्रकारचे वळण मिळालेले असलेच पाहिजे.

२-अभ्यासक्रम—वडील निवर्तल्यावर वामनराव थोडे दिवस दापोली जवळच लाउघर म्हणून गांव आहे तेथे माधुकरी मागून विद्याभ्यासार्थ राहिले होते. दोन तीन श्रीमत आप्त त्यांस आश्रय देण्यासारखे असता असे कां झाले हे कळत नाही. परतु पुढील हकीगतीवरुत कदाचित् त्यांच्या आईच्या निस्पृह स्वभावामुळे असे झाले असावे. नंतर दापोली तालुक्यांतच आडे येथे बेहेरे आडनांवाच्या आपल्या मावशीच्या घरी ते व त्यांची आई अशी जाऊन राहिली. यामुळे त्यांना हे बेहेरे आणि जालगांवचे गोरे यांचा चागला आश्रय होता असे दिसते. आडे व हर्णे येथे मिळून त्यांचा मराठी अभ्यास पुरकळ झाला; आणि सोळाव्या वर्षीच त्यांचा विद्याभ्यास पूर्ण झाला असे ठरुन ते हर्णेच्या कोर्टात उमेदवारी करू लागले.

यावेळी दापोली येथे मिशनरी लोकांची इंग्रजी शाळा असे. एल्हांशीच नोकरीच्या भानगडीत न पडतां तेथे जाऊन आपण इग्रजी शिकावे अशी वामनराव यांस इच्छा झाली. तिला गोरे यांचें पाठबळ मिळून ते जालगांवास गोरे यांकडे राहून दापोलीस इग्रजी शाळेत जाऊ लागले. तेथें सुमारे दीड वर्ष शिकणे झाले. मराठी भाषा, गणित, वगैरे विषय मराठी शाळेतच चांगले झाले होते, व इग्रजी शिकविणारे मिशनरी गुरु चांगले होते यामुळे इतक्या वेळांतच हळूहळूच्या सहावे इयत्तेइतका इग्रजीचा अभ्यास झाला. परंतु पुढे दापोलीस शिकण्याची सोय नव्हती यामुळें शिक्षणक्रम तूर्त इतकाच थांबला.

या वेळीं वामनरावांचें वय सत्रा वर्षांचें होतें. तेव्हां त्याचे आप्त गोरे आणि बेहरे यांनी त्यांच्या लग्नाचा बेत केला. त्यावेळीं वामनराव यांनी आपल्या आप्तांस विनंती केली कीं, " माझ्या लग्नाकडे आपण जो खर्च करणार तो माझ्या विद्याभ्यासाकडे कराल तर त्यात माझें जन्माचें कल्याण होईल. लग्नाचें आजच अडलें आहे असें नाहीं. लग्न पुढें केव्हांही होईल. " वामनरावांनी एवढ्या लहान वयांत हे आपले विचार वडील माणसास मोठ्या धैर्यानें कळविले, ही गोष्ट त्या काळाच्या मानानें मोठी लक्षात घेण्यासारखी आहे. या त्यांच्या मागण्यास नेहमींच्या तऱ्हेचें उत्तर मिळालें कीं " तुझी आई आतां वृद्ध झाली आहे. तिच्या हौसेप्रमाणें लग्न होऊन तिनें चार दिवस तुमचा संसार पाहावा हें बरें. विद्याभ्यास करण्याची तुझी हौस आहे, तर आम्ही त्याची ही व्यवस्था करूं. " अशी वामनराव यांची समजूत काढून त्यांचा विवाह करून देतला. दापोली नजीक पालगड नांवाच्या गांवचे धर्मशील आणि यजनशील अग्निहोत्री नारायण जोशी दीक्षित यांची कन्या मनूबाई वामनराव यांस दिली. मनूबाईचें वय लग्नांत आठ वर्षांचे होतें. वामनराव यांचे श्वशुर हे त्या प्रांतांतले प्रख्यात अग्निहोत्री होते. त्यांना पुण्यास बरीच मोठी दक्षिणा मिळे; आणि पुढें त्यांनी तीन यज्ञ केले. वामनराव यांच्या पत्नीचें सासरचें नांव रखमाबाई ठेविले.

लग्न झाले तरी विद्याभ्यासाची सोय करू असें वचन वामनराव यांस मिळाले होतें. परंतु त्याप्रमाणें दोन तीन वर्षे झाली तरी प्रत्यक्ष कांहींच घडून आलें नाहीं. याचें कारण त्यांच्या आप्त मंडळीस त्यांनी शिकूं नये असें वाटत होतें असें नाहीं. तेथल्या तेथें शिकण्याची तजवीज झाली असती अथवा हल्लीप्रमाणें मुबई-पुण्यास मुलाला पाठविण्याची सुलभ सोय असती तर गोरे व बेहरे यांनीं तेव्हांच तजवीज केली असती. परंतु त्या वेळीं मुलाला दूर पाठविणें हें फार कठीण वाटे. शिवाय आईला मुलानें आपणास सोडून जावें असें वाटेना. यामुळें त्यांची शिकावयास बाहेर गांवीं जाण्याची गोष्ट कोणीच बोलेना व विद्याभ्यास तितकाच

राहतो असेच वाटले. पण वामनरावांस या गोष्टीचा रात्रंदिवस हृद्रोग लागून राहिला होता. दापोलीस कोणी तरी मिशनरी असत. त्यांची शाळा असे आणि त्यांच्या हाताखाली एकादा चांगला एतद्देशीय पंडित असे. त्यांच्या साह्याने वामनराव यांनी आपलें इंग्रजीचे ज्ञान वाढविण्याचा साधला तेवढा प्रयत्न केलाच. परंतु आपणास शिकण्यासाठी मुबईस कसे जातां येईल, ही विवचना त्यांस पडली होती. यासाठी त्यांनी आपल्या प्रांतांतले आपल्या ओळखीपैकीं कोण लोक मुंबईस आहेत याचा शोध करून मुबईस जाण्याचा घाट जमवून आणिला. त्यांत मुख्य गोष्ट ही होती की आपल्या आप्तइष्टांच्याकडून पैशाचे साह्य त्यांना घ्यावयाचें नव्हतें. आपल्या मेहनतीने शिकवणीवर वगैरे पैसे मिळवून आपण शिकू, अशी त्यांना धमक होती. शेवटी कित्येक हितचिंतकाच्या साह्याने ते मुंबईस आले. त्यांच्या आईने मोठ्या कष्टाने त्यांच्या जाण्याला रुकार दिला आणि खर्चासाठी दहा रुपये दिले!

त्यावेळी हर्णेहून मुंबईस जाणे म्हटले तरी सुलभ नव्हते. पायरस्त्यानें ४।५ दिवस प्रवास करावा लागे. शिवाय मुबईचे हवापाणी, तेथची राहणी, तेथचे नवीन प्रकार वगैरे गोष्टी कोकणांतल्या लोकांना आवडत नसत. यामुळे तेथे मुलगा एकटाच जाणे हे लोकांना संकट वाटे. त्यांत वामनरावांची आई बरीच वृद्ध असून तिला ममतेचे असे दुसरे कोणीच नव्हते. यामुळे मुंबईस जाण्याची व्यवस्था घडवून आणण्यांत वामनराव यास किती व कसे प्रयत्न करावे लागले असतील याची कल्पना कोणासही होईल. या प्रयत्नांना कारण वामनराव याची विद्या प्राप्त करून घेण्याची उत्कट इच्छा हेंच होते. सांप्रत पुष्कळ आईबाप आपल्या मुलांना मोठा खर्च करून बाहेर गांवी ठेवीत असतात. अशा मुलांनी वामनराव यांचें हे उदाहरण पुढे ठेवून आपला वेळ उनाडपणामुळे न घालविता आईबापांच्या पैशाचें व आस्थेचे सार्थक करण्याकडे लक्ष ठेवावें.

वामनराव सन १८५५ साली म्हणजे आपल्या वयाच्या एकोणिसाव्या वर्षी मुंबईस आले असावे. पुढें दोन वर्षे त्यांना फार कष्टानें काढावी

लागली. निर्वाह शिकविण्या शिकवून करावा लागे. त्यावेळी हल्लींचें एलफिन्स्टन कालेज आणि हायस्कूल मिळून एकच विद्यालय असून त्याला एलफिन्स्टन इन्स्टिट्यूट असे नांव होतें. तेथे शिकविण्याची व्यवस्था मात्र उत्तम असे युरोपियन आणि नेटीव शिक्षक मोठे विद्वान आणि आस्थेवाईक असत. यामुळे शिक्षण उत्तम रितीनें चालू झाले. सन १८५७ साली त्याना एका पारशी विद्याफडांतून स्कालरशिप मिळू लागली. पुढें १८५८ साली शाळेंचे शिक्षण पुरे झाल्याचा परीक्षा होऊन ते कालेजामध्यें प्रविष्ट झाले. यावेळी त्याना शाळेंत मोठीशी स्कालरशिप मिळू लागून त्यांच्या मागचा शिकविण्याचा त्रास चुकला. याच सुमारास मुबईच्या युनिव्हरसिटीची स्थापना होऊन सन १८५९ साली पहिली मॉट्रिक्युलेशनची परीक्षा झाली. तींत वामनराव पास झाले, आणि कालेजांतला व्यवस्थित अभ्यास सुरू झाला.

यावेळचे वामनराव यांचे सहाध्यायी न्या. मू. रानडे, माळ मंगेश वागळे, जनार्दन सखाराम गाडगीळ, अंबालाल साखरलाल देसाई, कृष्णाजी बापूजी बाळ वगैरे होते. डा० भांडारकर हे या मडळींच्या वरच्या वर्गात होते. कुंटे, रा० विठ्ठलराव पाटक वगैरे मंडळी यांच्याच वेळी पण अन्य कालेजांत शिकत होतीं. त्यावेळचे शिक्षकही मोठे विद्वान असे इंग्रज, हिंदू आणि पारशी गृहस्थ होते.

यावेळची वामनराव यांची अभ्यास करण्याची तऱ्हा कशी होती याचें थोडे वर्णन केले पाहिजे. आरंभीं शिकविण्या शिकवाव्या लागत त्यावेळीं अभ्यासारा वेळ फार कमी सांपडे. पुढे जरा जास्त वेळ मिळू लागला. जेवण्यासाठी खानावळीत गेल्याने खर्च फार होई, वेळ मोडे आणि जेवणही चागले मिळत नसे. यामुळे वामनराव आणि त्यांचे आप्त कृष्णाजी बापूजी व केशव बापूजी बाळ हे पुष्कळ दिवस स्वतां स्वयंपाक करीत असत. एकेकाने पाळी पाळीने चुलीची आराधना करावी व दुसऱ्यांनीं जवळ बसून जे विषय सर्वांना सारखे असतील त्यांचो पुस्तके वाचावी आणि स्वयंपाकाची आवांतर तयारी करून द्यावी असें चाले. शिवाय जिन्नसपान्नस आणणें आणि धोत्रें

धुणें वगैरे ज्याचें त्यासच करावयाचें असे. ही सर्व व्यवस्था हल्लीच्या काळच्या विद्यार्थ्यांनीं लक्षांत ठेवणे योग्य आहे

३-विद्वत्ता आणि व्यासंग—वामनराव यांची सन १८६० साली एफ्. ए. ची आणि सन १८६२ साली बी. ए. ची परीक्षा झाली. ही बी. ए. ची अगदी पहिलीच परीक्षा होय. पुढें त्यांस पुण्याच्या कोलजांत फेलो नेमिलें. त्याच्याबरोबरच डा० भांडारकर यांना सीनियर फेलो नेमिले. यावेळीं पुण्याचे कालेज विश्रामबागेंत होते. पुण्याच्या कालेजांत ते दोन वर्षे फेलो होते. त्यावेळीं त्यांनी एम. ए. चा अभ्यास केला. त्या परीक्षेसाठी त्यांनी इंग्रजी भाषा व संस्कृत भाषा हे विषय घेतले होते. यावेळीं त्यांनी बाळशास्त्री देव आणि गंगाधरशास्त्री दातार या दोन प्रख्यात संस्कृत पंडितांजवळ व्याकरण, साहित्य, वेदान्त आणि न्याय या शास्त्रांचा जुन्या तऱ्हेनें अभ्यास केला. त्यांत विशेषतः शारीरभाष्य व उपनिषदे यांचा अभ्यास विशेष होऊन त्या अध्यात्म विषयांची त्यांना तेव्हां जी गोडी लागली ती शेवटपर्यंत कायम होती. वेदान्त विषयाचा जुन्या व नव्या अशा दोन्ही तऱ्हेनें विचार केलेली जी आमची किर्लेक मंडळी होऊन गेली त्यातले वामनराव हे होते. त्यांना उपनिषद्ग्रंथांची फार आवड असे व त्या ग्रंथाचे त्यांचें वाचन व मनन निरंतर चाले. याचा प्रत्यय पुढील व्याख्यानांवरून दिसून येईलच. याशिवाय त्यांनी महाभारत, रामायण, भागवत आणि बहुतेक मुख्य मुख्य संस्कृत काव्ये आणि नाटके वाचली होती; महाभारतांपैकी वनपर्व आणि शांतिपर्व हीं त्यांना फार प्रिय असत. भगवद्गीतेवर तर त्यांचें फारच प्रेम असे. महाभारताचे हे भाग आणि मुख्य मुख्य उपनिषदें त्यांना तोंडपाठ असत. यापुढें पुनर्विवाहाच्या शास्त्राऽशास्त्रतेचा विचार निघाला असता त्यांनी मुख्य मुख्य स्मृतींचे अवलोकन केले होते. याशिवाय वैदिक ग्रंथांचे अध्ययनही त्यानीं केले होते.

इंग्रजी ग्रंथामध्यें त्यांच्या शिक्षकाच्या धंद्याला अनुरूप असे गद्यपद्य ग्रंथ त्यांनीं वाचले होते. इंग्रजी कवी वर्डस्वर्थ यांचीं काव्ये त्यांना फार आवडत. शेक्सपियर कवीचीं नाटकें त्यांनीं वाचली होतीं. इंग्लंडदेशाच्या व ग्रीक व

रोमन लोकांच्या इतिहासावरचे सर्वमान्य ग्रथ त्यांनी वाचले होते. युरोप खंडांतील धार्मिक व सामाजिक उलाढालींच्या इतिहासाच्या संबधी ग्रंथांचें ते नेहमी परिशीलन करीत. ख्रिस्ती धर्माच्या मुख्य मुख्य ग्रथांची त्यांना आवड असे. तसेंच ख्रिस्ती ग्रंथकारांनी अध्यात्मपर लिहिलेले ग्रथ नेहमी त्यांच्या वाचनातले असत. धर्मविचारासाठी त्यानीं कुराण आणि यहुदी लोकांचे धर्मग्रथ, पारशी लोकांचे धर्मग्रंथ, आणि बौद्धधर्माचे मुख्य मुख्य ग्रंथ हेही अवलोकन केले होते. मात्र हे अध्ययन इग्रजी भाषेच्या द्वारें झालें होतें. देशभाषांपैकीं सिंधी भाषेत त्यांनी परीक्षा दिली होती, परंतु तिची ओळख पुढे राहिली नाही. बगाली व गुजराथी या भाषा त्यांना चांगल्या येत होत्या. गुजराथीमध्ये तर वामनराव उपासना चालवीत व व्याख्याने देत असत. बगाली भाषेतील ब्राह्म-धर्मविषयक ग्रंथ आणि व्याख्याने यांतील विचार त्यांनी आपल्या लेखात आणिले आहेत व व्याख्यानांतही येत असत. शिक्षणाच्या कामात अवश्य असणाऱ्या पुस्तकांखेरीज त्याचे वाचन धर्मपर व अध्यात्मपर ग्रथाचे चालत असे. मराठी कवीमध्ये त्याना ज्ञानेश्वर, एकनाथ, मुक्तेश्वर व तुकाराम हे फार प्रिय असत. मोरोपत, श्रीधर आणि रघुनाथपंडित यांच्या ग्रथांचीही त्याना आवड असे. त्यांतही ज्ञानेश्वरी, एकनाथी भागवत आणि तुकारामाचे अभंग यांचे वाचन त्यांना निरंतर प्रिय असे. तुकारामाचे बरेचसे अभग त्यांस तोंडपाठ होते. त्यानीं इंग्रजी, सस्कृत आणि मराठी ग्रथांचा मोठा संग्रह केला होता.

४-सरकारी नोकरी—पुण्याच्या कालेजामध्ये वामनराव हे सुमारे दोन वर्षे फेलो होते. नतर सन १८६४ सालीं त्यांस पुणें हायस्कूलमध्ये फर्स्ट असिस्टट नेमलें. सन १८६७ सालीं ते सिंध हैदराबादच्या हायस्कूलचे हेडमास्तर झाले. तेव्हांपासून शेवटपर्यंत ते हायस्कूलच्या मुख्य हुद्यावरच होते त्यानीं धारवाड, रत्नागिरी, सुरत, आणि पुणें येथील हायस्कुलांवर हेडमास्तरचें काम केलें. मध्यंतरी सन १८७० सालीं त्यांस मुंबईच्या एलफिन्स्टन हायस्कुलावर व्हाईस प्रिन्सिपाल नेमलें होतें. ही जागा नेटीव गृहस्थास अशी प्रथम यांनाच मिळाली. सन १८८२ सा-

ली त्यास ग्रल०हायस्कूलचे प्रथमतः अक्टिंग प्रिन्सिपाल नेमलें व ते लागलेच तेथें कायम झाले. ते शेवटपर्यंत याच जागेवर होते. ही जागाही यापूर्वी नेटीव गृहस्थास कधींच मिळाली नव्हती व यांना जागा दिली हें पुष्कळांस-विशेषतः बऱ्याच युरोपियन व पारशी लोकास-आवडले नाही. तथापि त्यांना जागा देणारे डायरेक्टर मि. चार्टफिल्ड हे मोडक यांची योग्यता जाणत होते; आणि मोडक यानी ही जागा योग्य नेटीवास देण्यास हरकत नाही असें आपल्या काम चालविण्याने उत्कृष्ट रितीने दाखवून दिले. या जागी मोडक हे दहा वर्षे होते. त्यांनी सन १८९३ च्या जानेवारीत पेनशन घेतले आणि पुण्यास राहण्याचा संकेत केला.

५-त्यांची शिस्त—वामनराव यांस त्यांच्या कामांत उत्तम यश आले व उत्कृष्ट शिक्षक अशी त्यांची ख्याती झाली, याला कारण त्यांची उत्तम शिस्त म्हणजे व्यवस्थेशीरपणा हे होतें. शाळेमध्ये त्यांचें नेहमी अगदी वरच्या वर्गापासून खालपर्यंत लक्ष असे, आणि प्रत्येक शिक्षक आणि नोकर-चाकर यांचे काम त्यांच्या ध्यानांत असे. ते स्वता चांगले काम करून दाखवीत, यामुळे त्यांचा सर्वांस कित्ता असे. प्रत्येक काम वेळच्यावेळी करावयाचें, हे त्यांचे मुख्य धोरण असे. प्रत्येक शिक्षकास ते योग्य काम नेमून देत, आणि शाळेतील सर्व मुले व त्याची योग्यता त्यांच्या लक्षांत असे. आपण स्वतां आणि फर्स्ट असिस्टट यांनी मिळून शाळेतील सर्व वर्ग रोजच्या रोज पाहिलेच पाहिजेत, असा त्यांचा नियम होता; आणि आपण व फर्स्ट असिस्टंट मिळून अगदी तिसऱ्या इयत्तेपर्यंत इंग्रजी भाषांतर किंवा दुसरा एकादा विषय नियमाने घेत असत. शिक्षक आणि विद्यार्थी यांना वामनराव यांची व्यवस्था अगदी प्रथमारंभी कडक वाटे; परंतु त्या व्यवस्थेचें मर्म कळून आलें म्हणजे ती सर्वांस आवडत असे. शिक्षक आणि मुलें यांनीं शाळेत अगदी नियमित वेळी यावे आणि सर्व अभ्यास वेळापत्रकाप्रमाणें चालावे, शिक्षकांनी आणि मुलांनीं वर्गात बसणें, उठणें आणि शाळेत वागणे ह्या गोष्टी यथायोग्य असाव्या, याविषयीं त्यांची करडी नजर असे. मुलांनीं व्यायाम करावा म्हणून ते कसरत आणि खेळ यांना

उत्तेजन देत. रत्नागिरी हायस्कुलास तालमीची सोय प्रथमतः त्यांनीच केली; आणि उत्तेजनार्थ मुलांना दूध वगैरे मिळावें म्हणून लोकांकडून वर्गणी जमविण्याची खटपट केली. रत्नागिरीस शाळेमध्ये आट्यापाट्यांच्या खेळाचा आखाडा काढला होता आणि शाळेजवळ बाग केली होती, त्यांत विद्यार्थी आणि शिक्षक स्वतां खेळत आणि काम करीत. या शिस्तीमुळे वामनराव हे जेथे जेथे हेडमास्तर म्हणून गेले, तेथे लोकप्रिय झाले होते. त्याचा अंमल मुलाच्या पालकांस आणि शिक्षकांस प्रिय असे. शिक्षक व मुले यांमध्ये काही तक्रार उत्पन्न झाल्यास ते बहुधा शिक्षकाचे पक्षापाती असत. परंतु यांत खरोखरी मुलाचा अपराध किती आहे, शिक्षकाने उगाच आपला अमल गाजविला आहे की काय, हे ते पाहात, आणि त्यांच्या अनुभविक नजरेला खरा प्रकार तेव्हांच दिसून येत असे. मग अमुक एक कामांत शिक्षकाला कांही सांगितले पाहिजे असे नजरेस आल्यास ते त्याला खासगी रीतीने सांगत. अशा वर्तनामुळे वामनरावांच्या शाळेत सर्व ठिकाणी शिक्षकांचा उत्तम मान राही, आणि मुले शेफरलेली नसत.

वामनराव यांस कोणत्याही ठिकाणी नेमले तरी ते शिस्तवार काम चालवितील अशी त्यांच्याविषयी मि० चाटफील्ड डायरेक्टर यांची पूर्ण खात्री असे. यामुळे असा कामगार आपल्या खात्यात निरंतर असावा, आणि ज्या जागांवर केवळ शिस्तीसाठी युरोपियनच नेमला पाहिजे अशी समजूत असे त्या जागेवरही वामनराव काम करितील, अशी चाटफील्ड यांची खात्री असे. यामुळे त्यांनी वामनराव यास डेप्युटी कलेक्टरची जागा पत्करू दिली नाही. त्याचप्रमाणें त्यांनी पुणे ट्रेनिंग कालेजाच्या प्रिन्सिपालची आणि एज्युकेशनल इन्स्पेक्टरची जागा मागितली, तीही न देतां मि० चाटफील्ड यांनी त्यांस हेडमास्तरच्या मोठ्या जागांसाठीच निवडून ठेविले होते. " या जागा तुमच्या उपयोगी नाहीत. तुम्ही हेडमास्तरच्या जागेलाच योग्य आहांत, आणि हेडमास्तराचीच बढतीची जागा मी तुम्हांस देणार आहे. " असें मि० चाटफील्ड यांनीं त्यांस स्पष्ट सांगितलें. त्याप्रमाणें प्रथमतः त्यांस एलफिन्स्टन हायस्कूलच्या व्हाईस प्रिन्सिपालची जागा जी नेहमी युरोपियन

गृहस्थासच देत, ती दिली. नंतर सुरत हायस्कूलची जागा दिली. या जागेवरही मोडकांचे अगोदर एतद्देशीय गृहस्थ कायमचा नेमला नव्हता. त्यावेळीं चारशें रुपये किंवा त्याहून जास्त पगाराची हेड मास्तरची जागा बहुधा एतद्देशीयास देत नसत. परंतु या जगांस नेटीव मुलींच अयोग्य नाहींत असे चाटफील्ड यांनी अनुभवाने दाखवून दिलें, आणि तो अनुभव घेण्यास वामनराव हे त्यांस योग्य कामगार मिळाले. वामनराव यांस मुंबईची जागा दिली, तेव्हांच माधवराव कुंटे यांस पुण्याची जागा (ही देखील प्रथमतःच नेटीव गृहस्थास) दिली. कुंट्यांनीही अशा जागांस आपले गृहस्थ सर्वथा योग्य आहेत असे दाखवून दिलें. पुढे एलफिन्स्टन हायस्कूलची जागा रिकामी झाल्यावर त्या जागेवर वामनराव यांस प्रथमतः आक्टिंग व नंतर कायमचे नेमले. ह्या जागेवर एतद्देशीय गृहस्थ उपयोगी नाहीं असे पुष्कळांचे मत होते. यामुळे वामनराव कसें काम करितात, हे पुष्कळजण उत्सुकतेने पाहात होते. कित्येकांनी तर त्यांच्या कामात मुद्दाम अडचणी आणण्याचे प्रयत्नही केले. परंतु अखेरीस वामनराव हे यशस्वी झाले. एलफिन्स्टन हायस्कूल म्हणजे वास्तविक मराठी शाखा आणि गुजराथी शाखा अशा दोन निराळ्या शाळा आहेत. त्यावर बरीच वर्षे पर्यंत दोन प्रिन्सिपालही असत. या शाळेंतील दक्षिणी व गुजराथी मुले यामध्ये पोरस्वभावाप्रमाणें आपसांत बरीच चुरस असते. त्यातही पारशी मुलें स्वाभाविकच द्राड असतात; आणि मुंबईतील गुजराथी मुले आणि बरीच दक्षिणी मुलेंही बहुधा श्रीमंतांची असतात. यामुळे तेथे शाळेतील पोरांचे तंटेबखेडे, चुरशी, आणि शिक्षकांशी दांडगाईचे वर्तन या गोष्टी थोड्या जास्त प्रमाणावर चालतात. वामनराव यांच्या वेळी देशी प्रिन्सिपाल आला म्हणून या गोष्टींना जास्त उत्तेजन आले. परंतु वामनराव यांनी हे तंटेबखेडे मुळींच मोडून टाकून सर्वांना उत्तम शिस्त लाविली. एकदा मधल्या सुटींत बराच मोठा दंगा होणार असा सुमार दिसला. तेव्हा वामनराव जिन्यावर येऊन उभे राहिले आणि आपल्या मोठ्या आवाजाने सर्वांस आपापल्या उद्योगास जाण्याला हुकूम केला. तेव्हां त्यांची ती गंभीर मुद्रा पाहून आणि सक्त आज्ञेचा आवाज ऐकून सर्व मुलें जिकडल्या तिकडे निघून गेलीं. वामनराव यांनी लगेच असा

शिस्तवार बंदोबस्त करून टाकिला की त्यानंतर कधी दंग्याचें किंवा अव्यवस्थेचें नांवही ऐकूं आलें नाही.

वामनराव शाळेंतील व्यवस्था नेहमी शिक्षक मंडळीच्या सल्ल्याने करीत असत. सर्व शिक्षकांची वारवार सभा करून अभ्यास, वेळापत्रक, वार्षिक, सहामाही व इतर परीक्षांची व्यवस्था व निकाल, नवीन वर्गांची व्यवस्था, पुस्तकें नेमणे, वगैरे गोष्टी सर्वानुमते ठरवीत. अशा सभा होत तेव्हां प्रत्येक शिक्षकास आपला अनुभव अथवा तक्रार सांगण्यास अथवा एकाद्या गोष्टीबद्दल सूचना करण्यास पूर्ण सवड असे. शाळेत देखरेख करीत असता एकाद्या शिक्षकाच्या संबधाने कमजास्त कांही दिसून आल्यास त्याला बोलावून त्यास ती गोष्ट शांतपणें, त्याचे मन न दुखवितां सांगत. तसेच एकाद्या शिक्षकाला एकादी गोष्ट सागावयाची किंवा सुचवावयाची असल्यास ती ते शांतपणे ऐकून घेत; आणि तिचा विचार सभेंत करावा असे वाटल्यास सभेपुढे आणीत. वामनराव यांची कामकाजाची व व्यवस्थेची शिस्त हा सर्वांना उत्तम प्रकारचा कित्ताच होता. या संबंधाने कै० विष्णुशास्त्री चिपळूणकर यांचे उद्गार फार महत्वाचे समजले पाहिजेत. कारण त्यानी पुण्याम नोकरी धरल्यापासून तो रत्नागिरीस त्यांची बदली होईपर्यंतचे त्यांचे दिवस पूर्ण अवस्थेत गेलेले होते रत्नागिरीस गेल्यावर त्यांनी आपल्या एका मित्रास पत्र लिहिले आहे. त्यांत ते लिहितात, " येथे येऊन मला फार आनंद झाला. मी पुण्याच्या अव्यवस्थेतून आणि घोटाळ्यांतून निघून येथे उत्कृष्ट व्यवस्थेमध्ये आलो आहे. असे मला स्पष्ट दिसत आहे. येथें काम करण्यास मला फार उत्साह वाटत आहे. " सभ्यपणा, सौजन्य, उत्तम शिस्त आणि प्रत्येक कामाची नीटनेटकी व्यवस्था या गोष्टीच्या सबधानें वामनराव यांचा सर्वत्र मोठा लौकिक झालेला होता.

वामनराव यांच्या शिस्तीचे जे हे वर्णन केले आहे, त्यावरून कोणास असे वाटेल की ते मुलांना वारवार शिक्षा करीत असतील अथवा छडीचा उपयोग फार करीत असतील. परंतु तसा प्रकार बिलकुल नसे. ते स्वतां छडीचा उपयोग करीत नसत. आणि त्यांस मारकटपणा आवडतही नसे. त्यांची नुसती गंभीर मुद्रा आणि करडी नजर आणि स्वतांची शिस्तवार वागणूक यांच्या योगाने सर्वांना शिस्त लागत असे.

शाळेंत शिकवावयाचा विषय वामनराव हे अगोदर घरी पाहात असत. त्या-संबधाची सर्व माहिती अगोदर पाहून मुलांना कोठे काय सांगावयाचे, याचा विचार करीत; यामुळे ते इतके दिवस तेच तेच विषय शिकवीत असतांही वर्गात शिकवितांना त्यांचा विषय नेहमींच नवा वाटे. तसेच त्यांस कोणी कांही विचारलें असतां ते समजून सांगण्यास कधी कंटाळा करीत नसत अथवा त्रासत नसत.

वामनराव ज्या ज्या हायस्कुलांवर गेले, तेथे त्यांनी व्यवस्थेच्या अनेक गोष्टी केल्या. एलफिन्स्टन हायस्कुलची व्हाईस प्रिन्सिपालची जागा सरकाराने कमी केली, आणि व्हा. प्रिन्सिपाल व प्रिन्सिपाल यांस घरभाडे मिळे तेंही कमी केले, तेव्हां हे पैसे त्यांनी त्या शाळेंतच राहावे अशी सूचना करून ती पास करून घेतली, आणि त्या हायस्कुलांतील आस. मास्तरांच्या जागा आणि त्याच पगार वाढविले. मुलांच्या अभ्यासाच्या संबधाने ही वामनराव यांची शिस्त उत्तम असे. परीक्षेचे कागद, एक्झरसाईस, वगैरे तपासणे हीं कामें आपणहीं व्यवस्थित रितीने वेळच्या वेळी करीत यामुळे इतर शिक्षकही निरंतर तोच कित्ता वळवीत. प्रवेशपरीक्षेच्या अगोदरची शाळेंतली परीक्षा झाल्यावर जे मुलगे परीक्षेस पाठविण्यास योग्य ठरत, त्यांचे अभ्यास आपण स्वतां आणि मुख्य असि० मास्तरमिळून वांटून घेऊन अगदी परीक्षेसाठी निघून जाण्याची वेळ होईपर्यंत त्यांचा सक्त मेहनत चाले यामुळे त्यांच्या वर्गाला प्रवेशपरीक्षेत नेहमी उत्तम यश येत असे. वामनराव हे रत्नागिरीस असतां तेथील हायस्कूलाची एकसारखी भरभराट होत गेली. त्याचप्रमाणे सुरत व पुणे येथेही तसाच प्रकार झालेला आहे. एलफिन्स्टन हालस्कुलाची वामनराव याच्या कारकीर्दीची दहा वर्षे ही त्या हायस्कुलाच्या अगदी उत्तम स्थितीची वर्षे होत. या चारी हायस्कुलांवर वामनराव हेडमास्तर असतांना त्या शाळांचा सर्व गोष्टीत उत्कर्ष झालेला आहे. वामनराव याची ही जी शिस्तवारपणें काम करण्याची रीत तीच शाळेत, घरीं, मित्रमंडळीमध्ये वागण्यांत, पोषाखांत, बोलण्या चालण्यांत सर्वत्र दिसून येत असे. या शिस्तीमुळेंच वामनराव यांस बोलण्यामध्यें फाजीलपणा, चवळपणा किंवा असभ्य थट्टामस्करी, शिवीगाळी वगैरे

गोष्टीचा तिटकारा असे. वामनराव मंडळीत असतां असल्या गोष्टी त्यांच्या हाताखालच्या लोकांच्या हातून घडत नसत, परंतु त्यांच्या बरोबरीचे लोकही त्यांना सभ्यासभ्य वर्तनाच्या संबंधाने नेहमी बचकत असत.

६-त्यांचे लोकोपयोगी उद्योग—वामनराव यांनी ग्रंथरचना वगैरे कांहीं केलेली नाहीं. शाळेतले काम आणि लोकहिताकरितां हाती घेतलेले सामाजिक व धार्मिक उद्योग, ह्या गोष्टी ते अगदी मन लावून करीत, यामुळे त्यांना व्यवस्थित ग्रंथरचनेस वगैरे फारसा वेळच कधीं मिळाला नाही. रत्नागिरीस असतांना त्यांनी उपनिषदे, शारीरभाष्य, महाभारत वगैरे ग्रंथांचा अभ्यास फार केला. वामनराव आणि जनार्दन बाळाजी मोडक व नरसिंह शास्त्री घांटे यांनी मिळून उपनिषदे आणि महाभारत हे ग्रंथ निरनिराळ्या प्रतींवरून वाचून त्यांतील विषयाची आणि नांवांदिकांची सूचि करण्याचे काम चालविले होते. परंतु ते काम पुढें पूर्ण झालें नाहीं. उपनिषदें मराठींत सोप्या भाषेत तयार करण्याचा त्यांचा उद्देश होता, आणि कित्येक उपनिषदे तशा रितीने त्यांनी तयारही केली होती; त्यांनी भगवद्गीतेचे श्लोकास ओवी असें भाषांतर केले होते. या उद्योगांच्या संबंधाचे लेख लिहिलेल्या वह्या सांप्रत उपलब्ध होत नाहींत, ही दिलगिरीची गोष्ट आहे. ईश्वरप्रार्थनेला गाण्याचे साह्य मोठें होत असते, यामुळें रत्नागिरीस असतांना त्यांनी मुद्दाम गवई ठेवून गाण्याचा अभ्यास केला; आणि गवयाच्या साह्याने जुन्या चिजावरून मराठींत प्रार्थनापर आणि उपदेशपर अनेक पदें रचलीं, तीं बहुतेक उपलब्ध आहेत. कोणतेंही पद पाहिजे त्यास ठरलेल्या खुणांवरून जसेंच्या तसे ह्मणतां यावे ह्मणून पदे व चिजा लिहून काढण्याचीं त्यांनी पुष्कळ खटपट केली; आणि गाणें लिहिण्याची एक मोडणी ठरवून त्या मोडणीप्रमाणें आपण केलेलीं पदे लिहून काढलीं होतीं. परंतु त्या वह्याही कोठे सांपडत नाहींत. वामनराव यांचीं पदें व इतर कविता प्रार्थनासंगीत या पुस्तकांत पुष्कळ आहेत. त्यांनी सामाजिक आणि धार्मिक विषयांवर अनेक व्याख्याने दिलीं आहेत. मुंबईत व पुण्यांत अनेक सभांमध्यें त्यांची अध्यक्ष ह्मणून भाषणें झालेलीं आहेत. ठिकठिकाणच्या प्रार्थनासमाजांमधून तर त्यांनी

फार वेळा उपासना चालविली आहे. हीं सर्व व्याख्यानें, उपदेश व उपासना यांच्या संबंधाची ध्यानांत ठेवण्याची गोष्ट अशी आहे की प्रत्येक वेळीं ते विषयाची तयारी करून जात. ज्या विषयावर व्याख्यान देणें असेल, त्याच्याविषयीची शक्य तेवढी माहिती मिळवून काय बोलावयाचे त्याचे टिपणही नेहमी तयार करीत. कित्येक व्याख्याने तर त्यांनी सर्वथ लिहून काढलेली आहेत. केवळ समाजांतील आठवड्याची उपासना झाली तरी तत्संबंधाची ते तयारी करीत. जो अभंग, श्लोक किंवा पद आधाराकरिता घ्यावयाचें असेल, ते गाण्यांत बसवून वीणा लावून अगोदर म्हणत, आणि मग त्याचेवर विचार करीत, आणि त्यावर जे बोलावयाचे त्याचे लहानसे टिपण करून तें संगीताच्या पुस्तकात घालून बरोबर घेऊन जात. यामुळे त्यांचे बोलणें किंवा उपदेश वायफळ कांही-तरी आयत्या वेळीं सुचले ते बोलले असा कधींही नसे. मुबईस असतांना ते मित्रोदय, हिंदुरिफार्मर, इंदुप्रकाश सु० पत्रिका वगैरे पत्रांतून सामाजिक व धार्मिक विषयांवर लेख लिहीत. पेनशन घेतल्यावर पुण्यास असतांना डेक्कन कालेजच्या विद्यार्थ्यांसाठी त्यांनी 'मराठी कवितेंतील नीतियुक्त विचार' या विषयावर इंग्रजीत व्याख्यान देऊन त्यांत मराठी कवींच्या नीतिपर व बोधपर विचारांचे उतारे इंग्रजी भाषांतरासह दिले होते. हे व्याख्यान ऐकून प्रि० सेल्बी हे म्हणाले की " मराठी कवितेंत अशा प्रकारचा उत्तम नीतिबोध भरलेला आहे, हें माझ्या स्वप्नांही नव्हतें. मोडक यांचे हे व्याख्यान ऐकून मराठी कवितेचा अभ्यास करावा अशी उत्कट इच्छा माझ्या मनांत उत्पन्न झाली आहे. " ह्या व्याख्यानाचा सारांश त्या वेळच्या वर्तमानपत्रांतून आला आह. परतु मूळचे हस्तलिखित व्याख्यान सांपडत नाही ही दिलगिरीची गोष्ट आहे. त्यांनी प्रार्थनासमाजाच्या मतांच्या संबंधाने कांही लहान पुस्तकें लिहिली आहेत. त्यांतले '**सद्धर्मानुष्ठान**' या नांवाचें प्रार्थनासमाजाच्या मतांचे ज्यांत प्रतिपादन आहे असे उत्तम पुस्तक आहे. त्याच्या प्रती आतां फारशा उपलब्ध होत नाहीत. ते प्रार्थनासमाजाच्या उत्सव-प्रसंगी पुष्कळदां कीर्तने करीत. त्यांना गाण्याचें अंग होते, जुन्या संस्कृत

ग्रथांचा अभ्यास होता, व प्रेमळपणा आणि उत्सुकता आंगी होती, यामुळें त्यांचे कीर्तन अगदी एकाद्या जुन्या उत्तम हरिदासासारखे वठत असे. ही कीर्तने ते स्वतां तयार करीत व त्यांतील पुष्कळ कविता त्यांच्या स्वतांच्या असत. कीर्तनाचे विषय पुष्कळ जुन्या कीर्तनांच्या धर्तीवर रचलेले नव्या तऱ्हेचे असत. अशा कित्येक कीर्तनांची याद खाली टीपेत* दिली आहे. अशा कीर्तनांतील पद्याची पुष्कळदां श्रोत्यांसाठी पुस्तके छापीत. असली सुमारे वीस पुस्तके उपलब्ध आहेत. वामनराव सुरत येथे गेले तेव्हा तेथील प्रार्थना-समाजांत उपासना चालविण्याची वेळ आली. तेव्हां त्यांनी लगेच गुजराथी भाषा अवगत करून घेतली. प्रथमत: झालेत गुजराथीतून इंग्रजीत भाषांतर करणे हा विषय ते स्वतां वर्गात घेऊ लागले, यामुळे महिनापंधरा दिवसांतच भाषा बरीच येऊ लागली. पुढे समाजात करावयाची उपासना लिहून घेऊन जात. पुष्कळदां एकाद्या गुजराथी मित्रास लिहावयास सांगून आपण तोडाने सांगत; व असे लिहिणे चालले असता भाषेची चुकी होईल तो गुजराथी मित्र शुद्ध करून सांगे. अशा रितीने दोन महिन्यांत ते समाजामध्ये गुजराथीत उपासना करूं लागले. रत्नागिरी, मुंबई, पुणे, सुरत येथील प्रार्थनासमाजांत त्यांच्या उपासना, उपदेश व व्याख्याने अनेक झालेली आहेत. त्यांपैकी पुष्कळांचा संग्रह जर झाला असता तर ती एक मराठी-भाषेस जोडच झाली असती. प्रस्तुत पुस्तकांत छापलेली व्याख्याने हीं अगदीच थोडी, जेवढी मुंबईच्या सुबोधपत्रिकेत छापलेली सांपडली तेवढीच आहेत. याशिवाय त्याची सामाजिक व नैतिक विषयांवर अनेक व्याख्यानें झालेली आहेत, पण त्यांचा संग्रह कोणी केलेला नाही.

वामनराव यांची भाषा सोपी, सरळ, शुद्ध आणि भारदस्त अशी असे. त्यांच्या बोलण्यांत व लिहिण्यांत संस्कृत शब्द पुष्कळ येत, आणि भाषेची

---

१ एकनाथ चरित्र; २ गोपिचंद आख्यान; ३ प्रल्हाद चरित्र; ४ ध्रुवाख्यान; ५ दामाजी पंताचेंआख्यान; ६ राकांबकाचें आख्यान; ७ मैत्रेयी-याज्ञवल्क्यसंवाद; ८ द्रौपदी-धर्म-संवाद; ९ सार्क्रेटिसाचें चरित्र; १० येशुख्रिस्ताचें चरित्र; ११ गौतमबुद्धाचें चरित्र; इत्यादि.

धाटणी इंग्लिश तऱ्हेची नसून अगदीं स्वाभाविक मराठी किंवा संस्कृत तऱ्हेची असे. त्यांचा स्वभाव जसा शांत, सौम्य, गंभीर आणि भारदस्त असा असे, तशीच त्यांची भाषासरणीहि असे. त्यांची वाणी मधुर आणि चित्ताकर्षक असून विचार अगदी साधे व स्वाभाविक असे असत; व जे सांगावयाचें तें अगदी अंतःकरणापासून मोठया कळकळीने सागत आहेत, असे श्रोत्यांस वाटे. त्यांचें भाषण ऐकण्यास श्रोते नेहमीं उत्सुक असत. एकाद्या वादग्रस्त विषयामुळें श्रोत्यांची मने क्षुब्ध झालेलीं असतांही वामनराव बोलावयास उभे राहिले की लगेच सभेमध्यें शांतता होत असे. वामनराव बोलणारे असतां गडबड करावी किंवा चटोरपणा करावा असे श्रोत्याच्या कधी मनातही येत नसे. अशी त्यांच्या संबंधाने स्वाभाविकच आदरबुद्धि असे. हे सर्व गुण पुढील व्याख्यानांमध्ये स्पष्ट दिसून येतील. सस्कृतातील वाक्यसरणी व शब्द घेऊन शिवाय इंग्लिश भाषेच्या धाटणीवर भाषणाची व निबंधाची रचना कशी करतां येईल, हे वामनराव याच्या व्याख्यानांवरून शिकावयास सांपडेल. वामनराव याची भाषासरणी हा मराठी भाषा चांगली लिहूं इच्छिणारांस एक नमुनाच आहे असें ह्मणावयास चिंता नाही.

सांप्रतचा निबंधसंग्रह हा अगदी थोडासाच आहे हें मागें सागितलेंच आहे. परंतु त्यावरून वामनराव यांचे वक्तृत्वगुण चांगले दिसून येतील. धर्मपर आणि नीतिपर व्याख्यानें विषयानुरूप गंभीर असून कटाळवाणी नाहींत; त्यामध्ये वादविषयक असे फारसें कांही नाहीं. पुष्कळ विषय व विचार जुने लोक व नवे लोक या सर्वांना बहुधा मान्य होण्यासारखे आहेत. आणि व्याख्याने वाचून सपल्यावर वाचकास त्यांतील विचार मान्य आहेत असें वाटते. गीतेवरील निबंधांत सर्व गीतेचे सार अगदी थोडक्यात पूर्ण असें सुबोधरितीनें सांगितलेलें आहे. गीतेवर मराठींत गद्यमय आणि पद्यमय पुष्कळ विस्तृत टीका झालेल्या आहेत परंतु या एका निबंधाने त्या उत्तम ग्रंथाची साधारण वाचणारासही जशी माहिती होते, तशी दुसऱ्या कोणत्याही ग्रंथावरून होणार नाहीं. तसेंच निबंधाच्या शेवटीं गीता ही कोणत्याही मताच्या मनुष्यास मान्य होण्यासारखी आहे असें जें प्रतिपादन केलें आहे, तें अगदीं नवीन प्रकारचे असून त्यावरून त्या उत्कृष्ट

ग्रंथाची खरी योग्यता कळून येते. प्रस्तुत पुस्तकांत सामाजिक विषयांवरील तीनच व्याख्यानें छापलीं आहेत. परंतु त्यांवरून वादग्रस्त विषयाचें प्रतिपादन कोणाचेंही मन न दुखवितां कसें करितां येईल हें दिसून येतें. या तीन विषयांमध्यें अनेक वादग्रस्त मुद्यांचा अंतर्भाव झाला आहे. तथापि वामनराव यांनीं विषयप्रतिपादन असें युक्तीनें केलें आहे, कीं, तें कसाही विरुद्ध मताचा मनुष्य असला तरी त्यास मान्य होईल, आणि ऐकून घ्यावेंसें किंवा वाचावेसें वाटेल. कारण त्यांतील विचारांनीं सर्वांचीच खात्री जरी झाली नाहीं तरी ते सर्व मतांच्या लोकांस मानवण्याजोगे विचारार्ह असे वाटण्याजोगे आहेत.

वामनराव हे इंग्रजी भाषा ही चांगली बोलत व लिहीत. इंग्रजींत व्याख्यान देण्याचा प्रसंग त्यांस वारंवार येई. त्यांची इंग्रजी भाषासरणी ही प्रौढ, बालबोध आणि अगदीं साधी व स्वाभाविक अशी असे. मराठी भाषेची त्यांना फार आस्था वाटे. तिचा युनिव्हरसिटीच्या विद्याक्रमांत प्रवेश व्हावा यासाठीं जे प्रयत्न झाले, त्यांना सुरुवात प्रथमतः त्यांनींच केली. त्यासाठीं त्यांनीं मुंबईत खासगी रितीनें आणि युनिव्हरसिटींत भाषणे केलीं आणि लेख लिहून प्रसिद्ध केले. देशभाषा युनिव्हरसिटीमध्यें नसल्या तरी त्याचा अभ्यास शाळातून बंद पडला आहे, हें चांगलें नाहीं, शाळेत अभ्यास चालू असला पाहिजे असें त्यांस वाटत होतें. यासाठीं त्यांनीं डायरेक्टर साहेब यांस लिहिलें. त्यांनीं वामनराव यांस असें लिहिलें कीं स्वभाषा हा विषय युनिव्हरसिटीच्या अभ्यासक्रमांत नसल्यामुळें त्याचा शाळेंतील अभ्यासांत समावेश करून घेण्यास सरकारची परवानगी मिळण्याला कठीण पडेल आणि वेळही लागेल. परंतु डायरेक्टर साहेब यांनीं वामनराव यांस एलफिन्स्टन हायस्कुलांत स्वभाषेचा अभ्यास सर्व इयत्तांतून अनुभवासाठीं चालवून पाहाण्यास परवानगी दिली. वामनराव यांनीं तो विषय सर्व इयत्तांमध्यें घातला; आणि त्या शाळेंत स्वभाषांचा अभ्यास तेव्हांपासून चालू असे. आतां तर स्वभाषांचा अभ्यास युनिव्हरसिटीनें प्रवेशपरीक्षेसाठीं नियमित करून टाकलाच आहे.

७-त्यांचीं धर्ममतें—इंग्रजी विद्येची सुरवात आमच्या इकडे झाल्यावर प्रथमारंभीं जातिभेद मोडणें आणि धर्मांत सुधारणा करणें या गोष्टी-

साठीं मुंबईत सोहंसमाज व दुसऱ्या कित्येक मंडळ्या निघाल्या होत्या, त्यांच्या मतांचा पगडा वामनराव यांच्या मनावर झाला होता, व ते जानवीं टाकून देण्यासही एकदां तयार झाले होते, असें ऐकिवांत आहे. परंतु पुढें त्यांचीं मतें तशीं नव्हतीं. आपल्या धर्मांत आणि रितीभातींत योग्य त्याच सुधारणा केल्या पाहिजेत असें ते प्रतिपादन करीत. त्यावरून वरील ऐकीव प्रकार कितपत खरा आहे हें सांगवत नाहीं. कालेजांतून सुटल्यावर त्यांचे राहाणें पुण्यास बरेच दिवस झाले होतें. त्यावेळीं ते ज्या घरांत राहात असत तेथेंच प्रख्यात विष्णू परशराम शास्त्री पंडित हेही राहात असत. यांच्या मताचा परिणाम वामनराव याच्या मनावर पुष्कळ झाला होता असे वामनराव हे स्वताच सागत. विष्णू शास्त्री हे स्त्रीपुनर्विवाह, प्रौढविवाह, इत्यादि सुधारणांचे अभिमानी होते. तसेच सभ्याच्या परिस्थितीप्रमाणे आपल्या सामाजिक गोष्टींत अनेक सुधारणा झाल्या पाहिजेत असें ते प्रतिपादन करीत. परंतु हें सर्व जुन्याला धरून शक्य असेल तसें हळू हळू झाले पाहिजे असें म्हणणारांपैकी शास्त्रीबुवा हे होते. ते स्वतां प्रार्थना समाजाचे सभासद नव्हते. वामनराव हे प्रार्थनासमाजाचे अभिमानी होते. परंतु त्यांचे धार्मिक आणि सामाजिक सुधारणेच्या संबधाचे विचार वरील प्रमाणेंच होते. प्रार्थनासमाजाची मतें काय आहेत हें येथे विस्तारानें सांगण्याची जरूर नाहीं. परमेश्वर एक आहे, मूर्तिपूजा या मतास विघातक आहे, ती मोडली पाहिजे, अशी प्रार्थनासमाजाची मते आहेत. तीं वामनराव यांस मान्य असून त्यांनी ठिकठिकाणीं त्यांचा प्रसार करून प्रार्थनासमाज स्थापन करण्याचे प्रयत्न केले. ते जेथें जात तेथील समाजाच्या कामास त्यांची पूर्ण मदत असे. समाजाच्या मतांचा प्रसार करण्यासाठीं कित्येक गृहस्थांनीं स्वतां खर्च देऊन धर्मप्रचारक नेमले होते. या खर्च देणाऱ्या गृहस्थांमध्यें वामनराव हे होते. मूर्तिपूजेच्या संबंधानें त्यांचें असें मत होतें कीं, तो अज्ञान लोकांचा ईश्वरभक्तीचा मार्ग आहे. अनाद्यनन्त, सर्वव्यापी परमेश्वराचें आकलन सर्वांसच होत नाहीं. तेव्हां कित्येकांना परमेश्वराची एकादी मूर्ती मानून तरी पुढें ठेवावी लागते. आपण आपल्या प्रिय किंवा पूज्य मनुष्याची तजबीर किंवा पुतळा जवळ ठेवून त्यास मान देतों. त्यांतलाच हा प्रकार आहे. मूर्ति-

पूजा हें कांहीं पातक नव्हे. लोकांना सज्ञान करून त्यांस मूर्तिपूजेच्या पलीकडे जाऊन खऱ्या देवास ओळखण्यास शिकवावें. परंतु तें जुलमाने होणार नाहीं. अज्ञानी जनांची समजूत करून दिली पाहिजे. सुज्ञ जनानीं स्वतां मूर्तिपूजा करूं नये, परंतु अज्ञजनांनीं तशी भक्ती केली म्हणून त्यांची थट्टा किंवा द्वेष करूं नये. प्रस्तुत व्याख्यानांत मूर्तिपूजेचा उल्लेख आला आहे. त्यांत त्यांनीं सौम्यपणें निषेध करून मन वळविण्याचा प्रयत्न केला आहे. गळ्यांत जानवीं घालणे हा एक मूर्तिपूजेचाच प्रकार आहे, तेव्हा यज्ञोपवीताचा त्याग करावा असा विचार प्रार्थनासमाजात वारंवार निघे. एकदा तर मुंबईच्या प्रार्थना-समाजांत हा विचार विशेष औत्सुक्यानें निघून तसा ठराव पर्यंत करावा, व प्रार्थनासमाजाच्या सर्व सभासदांनीं जानवीं टाकावीं असे ठरविण्याचा प्रयत्न चालला होता. त्या वेळीं वामनराव हे त्या विचारास अनुकूल नव्हते. यांचें म्हणणें असें होते कीं, यज्ञोपवीत हें मूर्तिपूजेचें दर्शक मुळींच नव्हे. या वेळीं तरी ते राष्ट्रीयत्वाचे चिन्ह झालेलें आहे. प्रार्थनासमाजाचा सभासद झालेल्या मनुष्याचें राष्ट्रीयत्व जात नाही. त्यानें आपण हिंदू किंवा आर्य आहों हें विसरतां कामा नये. यासाठीं ज्या सभासदांना यज्ञोपवीत आहे त्यांनीं ते टाकूं नये, इतकेंच नाहीं, तर ज्यांना ह्मणून आपण हिंदू किंवा आर्य म्हणजे या आपल्या हिंदुस्थान देशाचे घटक आहों असे समजावयाचे असेल, त्या सर्वांनींच जानवीं घालावें. पूर्वी ज्याप्रमाणें ब्राह्मण, क्षत्रिय, वैश्य या तीन आर्यधर्मी किंवा वेदधर्मी द्विजाती धर्माची खूण म्हणून जानवीं घालीत, त्याप्रमाणें सांप्रत सर्व हिंदू किंवा आर्य यांनी जानवीं घालणे व कपाळी गंध लावणें या राष्ट्रीयत्वाच्या सर्वसाधारण खुणा ठरवाव्या असें त्यांचें मत होतें.

वामनराव हे फार धर्मशील व भाविक आणि अत्यंत प्रेमळ असे ईश्वरभक्त होते. ते प्रार्थनासमाजाच्या मतांप्रमाणें अगदीं मनोभावानें वर्तन करीत असत. परमेश्वराचें ध्यान, मनन, भजन वगैरे गोष्टी वामनराव हे एकाद्या साधूप्रमाणें नेहमीं करीत. फुरसत होईल तेव्हां परमेश्वराचे ध्यानमनन करण्यासाठी कोठेंतरी एकांतांत जाऊन बसण्याची त्यांना आवड असे. तसेंच धर्माची आस्था वाटावी आणि

मनाला व शरीराला धार्मिक वळण लागावें म्हणून नियमित वेळी उपवासादि प्रकार पाहिजेत असें त्यांचें मत होतें, व तसे उपास वगैरे ते पाळीत असत. इतर मंडळीला एकादशी, शिवरात्र वगैरे दिवस जर सोईचे असतात तर तेच आपण पाळण्यास हरकत नाहीं असे ते समजत. मग त्या दिवशीं उपवासाचा नियमित आहार करून, आपल्या मताप्रमाणें ते परमेश्वराचें ध्यान-मनन करण्यांत काळ घालवीत. इतर मंडळी जुन्या पद्धतीनें ज्या धर्मसंबंधी गोष्टी करीत त्यांतील वेडगळपणा स्पष्ट करून दाखविण्याचा ते प्रयत्न करीत. परंतु त्या कृत्यांत दांभिकपणा नसल्यास ते तशी कृत्यें करणाऱ्याचा निषेध किंवा त्यास अडथळा करीत नसत. त्याची समजूत झाली म्हणजे तो योग्य मार्गाला लागेल; आणि मग हळूहळू या दिशेच्या धार्मिकपणाला खऱ्या धार्मिकपणाचें स्वरूप येईल अशी त्यांची समजूत असे. जुन्या तऱ्हेच्या पुष्कळ धर्मसंबंधी गोष्टी ते स्वतां करीत नसत. परंतु इतरांनी श्रद्धेने कांहीं केलें असतां त्यांना ते नांवें ठेवीत नसत. आपल्या अधिकारांतली गोष्ट असल्यास त्याला योग्य मार्ग दाखविण्याचा मात्र ते प्रयत्न करीत. असत्य किंवा अयोग्य भाषण, असभ्य वर्तन, शिवीगाळ, बीभत्स शब्द उच्चारणे, विचकट थट्टामस्करी वगैरे गोष्टींचा त्यांस अत्यंत तिटकारा असे हें मागें सांगितलेंच आहे. ते कांहीं वर्षे विडी ओढीत असत, याशिवाय त्यांस कोणत्याही प्रकारचें व्यसन कधीही नव्हतें.

८-त्यांचीं सामाजिक मतें—वामनराव हे एकनिष्ठ व कर्तव्यदक्ष असे सामाजिक सुधारक होते. स्त्रीपुनर्विवाह सुरू झाला पाहिजे, बालविवाह नाहींसा व्हावा, स्त्रीशिक्षणाचा प्रसार व्हावा, जातीभेदाच्या संबंधाचे सर्व अनिष्ट प्रकार कमी व्हावे, वगैरे सुधारणेच्या संबंधाच्या ज्या मुख्य-मुख्य गोष्टी त्यांसंबंधाचे त्यांचे सतत प्रयत्न चालू होते, व चाललेल्या प्रयत्नांस त्यांची मदत असे. पुढील व्याख्यानांमध्यें त्यांचीं मतें स्पष्ट झालेलींच आहेत, तेव्हां येथें जास्त चर्चा करण्याची जरूर नाहीं. त्यांनीं आपल्या मुलांमुलींचीं लग्नें लौकर केलीं नाहींत; आपल्या मुलींना शक्य तितकें शिक्षण दिलें; आणि आपल्या आप्तइष्टांस आणि स्नेही मंडळीसही या गोष्टी

करण्यास उत्तेजन दिलें. सामाजिक सुधारणांमध्यें विधवाविवाहाची चाल रूढ करण्याचे संबंधानें त्यांनीं विशेष प्रयत्न केले. प्रथमतः मुंबईस विधवाविवाहाचा विचार सुरू झाला तेव्हांपासूनच ते त्यास अनुकूळ होते. पहिला विधवाविवाह झाला तेव्हां ते रत्नागिरीस होते. तेथें त्यांनीं आपणास विधवाविवाह मान्य असल्याबद्दल प्रदर्शित केलें व व्याख्यानें दिलीं. एवढ्यावरूनच त्यांस तेथील मंडळीनें बहिष्कार घातला. हा बहिष्कार इतरस्थानीं व धर्मगुरूंनीही मान्य केला. यामुळें त्यांस रत्नागिरीस आणि सर्वत्र कित्येक वर्षे लोकांनीं फार त्रास दिला. परंतु तो त्यांनी शांतपणानें सहन केला. पुढें त्यांनी विधवाविवाहाच्या संबंधानें प्रत्यक्ष प्रयत्न केले व त्या उद्योगाचे ते शेवटपर्यंत आधारस्तंभ होते. वामनराव यांजवर विधवाविवाहाच्या संबंधानें सुमारे दहा वर्षे बहिष्कार होता. परंतु पहिली उसळी निघून गेल्यावर रत्नागिरीकरांचें त्यांच्याजवळ वर्तन चांगलें असे. याचें कारण वामनराव यांचें सौजन्य व सुस्वभाव होय. पुढें अशा सत्पुरुषास त्रास देणें अयोग्य आहे असे वाटून रत्नागिरीकरांनीं आपण होऊनच हा बहिष्कार काढून टाकिला. हा बहिष्कार असतांना आणि त्यानंतरही नेहमींच ते सामाजिक सुधारणा प्रत्यक्ष करून दाखविणारे असल्यामुळें त्यांस समाजाकडून फार त्रास पोचत असे. तसेंच ज्यांवर ते उपकार करीत असे आप्तइष्टही त्याच्याशीं या कामांत उपकार स्मरून वागत नसत. परंतु वामनराव यांनीं आपलें कर्तव्य सोडले नाही त्यासाठीं ज्या अडचणी आल्या त्या सर्व निमुटपणें सोसल्या. लोकांनीं त्यांच्यावरील बहिष्कार काढून टाकिल्यानंतरही त्यांचे सर्व सामाजिक सुधाणांच्या संबंधाचे वर्तन जसें त्यापूर्वी होते तसेंच होतें. कितीही व कसाही त्रास झाला तरी एकदां योग्य वाटलेलें कर्तव्य एकनिष्ठेने करावयाचें असा त्यांचा निश्चय असे. त्यांच्या अशा एकनिष्ठ वर्तनामुळे सामाजिक सुधारणेच्या अनेक गोष्टींची प्रगती होण्यास कारण झालें आहे; आणि अशा प्रसंगीं कसें वागावें हें समजण्यास त्यांचें वर्तन हें त्या उद्योगांत पडणारांस कित्त्यासारखें आहे. वामनराव मोडक यांसारखे बरेच एकनिष्ठ पुरुष जर आपल्यामध्यें होण्याचें आपलें सुदैव असतें तर सामाजिक सुधारणेचीं कामें यापेक्षां जोरानें व विशेष समाधानकारक रितीनें चाललीं असतीं.

९-त्यांची गृहस्थिती, राहणी, वगैरे—वामनराव यांची मूळची फार गरीबी होती. याचें वर्णन मागें आलेंच आहे. विद्याभ्यास पुरा झाल्यानंतर त्यांस सरकारी नोकरी चांगलीच मिळाली, यामुळें त्यांचे व त्यांच्या कुटुंबाचे पुढील दिवस चांगलेच गेले, असें म्हणण्यास चिंता नाही. मात्र एवढ्या त्रासानंतर प्राप्त झालेले आनंदाचे दिवस पाहाण्यास त्यांची आई जगली नाहीं. वामनराव यांची पत्नी सुशील, संसारदक्ष, आणि त्यांच्यासारखीच धर्मशील, दयाशील अशी असे. रखमाबाईना शिक्षण फारसें नव्हतें, तरी वामनराव यांच्या सुधारणेच्या विचारांस व वर्तनास त्यांची पूर्ण मदत असे. केव्हां केव्हां रखमाबाईच्या मनांत साहजिकच जुन्या गोष्टींची प्रीती उत्पन्न होत असे, व जुन्या तऱ्हेचें वर्तनही घडे. परंतु "अमुक एक सुधारणेची गोष्ट करावी असें मनांत होतें, पण काय करावे, घरच्या बायकांच्या हट्टापुढें कांहीं चालेना," असले रडगाण्याचे उद्गार काढण्याचा किंवा अशी सबब सांगण्याचा व बहाणे करण्याचा प्रसंग वामनराव यांस कधीही आला नाही. धार्मिक आणि सामाजिक गोष्टींच्या कामांत वामनराव यांस त्यांच्या पत्नीची पूर्ण मदत होती. वामनराव यांचा त्यांच्या आप्तइष्टांस मोठा आश्रय असे. ते सर्वांस मदत करीत. गरीबगुरीब विद्यार्थ्यांसही त्यांची निरंतर मदत असे. गरीबीतून पुढें आलेल्या गृहस्थांचा पुढील आयुष्यक्रम बहुधा कंजूषपणाचा असतो. परंतु वामनराव यांची तशी स्थिती नव्हती. कुटुंबाचे खाणेंपिणें, राहाणी, कपडेलत्ते यांची व्यवस्था अगदी गर्भश्रीमंताप्रमाणें होती. त्याप्रमाणे घरांत आप्तइष्ट किंवा आश्रित मंडळी असे, त्यांचे संबंधानें पंक्तिप्रपंच मुळींच नसे. अशा राहाणीमुळें त्यांना बहुधा आरंभापासून बराच पगार जरी मिळत होता, तरी त्यांचेजवळ पुष्कळ पैसे नव्हते. तसेच त्यांनीं इतर दुसऱ्या पैसे मिळविण्याच्या धंद्यांकडे लक्ष न देतां नोकरीच्या कामाबाहेर राहिलेला सर्व वेळ आपल्या लोकांची धार्मिक आणि सामाजिक उन्नति करण्याच्या प्रयत्नांत घालविला. यामुळें त्यांच्याजवळ पैशाचा संचय फारसा झाला नाहीं. वामनराव यांची शरीरप्रकृति पहिल्यापासून निकोप असे. त्यांना दुखणेंबाणें फारसें येत नसे. मुलेंबाळें व इतर कुटुंबीय मंडळी यांच्या वर्तनाकडे आणि आरोग्याकडे त्यांचें उत्तम लक्ष असे.

आजारांत, प्रवासांत, हरएक प्रसंगीं आपल्या सर्व माणसांच्या सुखसंतोषाची तजवीज राखण्याची ते नेहमी काळजी घेत. पेनशन घेतल्यावर रिकामा वेळ सामाजिक गोष्टींच्या व देशकार्याच्या उद्योगांत घालवावा असा त्यांचा विचार होता. परंतु आपल्या दुर्दैवेंकरून ते आपल्यास फार दिवस लाभले नाहींत. सन १८९३ सालीं सप्टंबर महिन्यांत पुणें प्रार्थनासमाजांत राजा राममोहन-राय यांच्या वार्षिक पुण्यतिथीनिमित्त व्याख्यान देण्याचें काम त्यांचेकडे आलें होतें. त्यासाठीं त्यांनीं आपल्या नेहमीच्या रितीप्रमाणें पांच सात दिवस निरनिराळे ग्रंथ वाचून तयारी चालविली होती. यावेळी त्यांचे डोकें अगोदर बिघडलेले होतें कीं काय कोण जाणे, परंतु ही त्यांची तयारी फार जास्त चालली होती असे पुढें दिसून आले. जसा काय त्यांना रात्रंदिवस त्या विषयाचा नाद लागून राहिला होता. त्याच वेळीं त्यांची पत्नी त्यांची नेहमींची काळजी घेण्यास जवळ नव्हती; कांहीं कामानिमित्त मुंबईस गेली होती. यामुळें त्यांची जी फाजील तयारी चालली होती ती कोणाचे लक्षांत आली नाहीं. पुढें पुण्यतिथीच्या दिवशीं अर्धें व्याख्यान उत्तम रितीनें झालें. परंतु पुढें वाचा एकदम बंद होऊन वामनराव स्तब्ध झाले. हा त्यांस पक्षघाताचा झटका झाला. यांतून ते थोडया दिवसांनी बरे झाले. परंतु त्यांची प्रकृति कायमची अशक्त झाली. पहिल्या झटक्यांतून बरे झाल्यानंतर दोन वर्षेपर्यंत त्यांची प्रकृति साधारण बरी होती, व नेहमीचे उद्योगही बरेच चालले होते. परंतु त्यानंतर प्रकृति जास्त बिघडत जाऊन सन १८९७ च्या सप्टंबर महिन्यांत मुंबई येथें आपले परममित्र न्या० रानडे यांच्या घरीं ते मृत्यु पावले.

१०-त्यांचा स्वभाव, वर्तन आणि गुणदोष—वामनराव हे इतके व्यवस्थित आणि करारी स्वभावाचे होते, आणि त्यांची मुद्रा गंभीर असे, यामुळें जवळच्या आणि हाताखालच्या मंडळीस त्यांची भीति वाटत असे, तरी त्यांचा स्वभाव सौम्य आणि ममताळू होता. त्यांचे आपल्या कुटुंबांतील मंडळीवर फार प्रेम असे. पुष्कळ मंडळीचे घरांत फारसें लक्ष नसतें, आणि जवळच्या मंडळीशीं तुसडेपणाचें वर्तन असतें. परंतु वामनराव हे खरेखुरे कुटुंबी होते आणि परमेश्वराच्या कृपेनें त्यांनीं कुटुंबसुखाचा चांगला अनुभवही घेतला, असें म्हणावयास चिंता नाहीं. मुलेंबाळें,

आप्तइष्ट मंडळी, या संबंधानें त्यांस अनुकूल स्थिती होती आणि त्यांनी स्वतां त्यांच्या संबंधाने खर्चवेच योग्य रितीनें करून त्यांस सुख देण्यास कांही कमी केले नाही. विद्यार्थी, हाताखालचे शिक्षक आणि त्यांच्याशी ज्यांचा संबंध येई अशा लोकांना त्यांचा स्वभाव प्रथमारंभी कडक असा वाटे. परंतु एकदां त्यांच्या स्वभावाचें धोरण समजून त्यांच्याशी कसे वागले पाहिजे हें लक्षांत आल्यावर सर्वांच्या मनांत त्यांच्याविषयी आदरबुद्धि आणि प्रेमभाव उत्पन्न होत असे. त्यांची धार्मिक आणि सामाजिक मते अगदीं नव्या तऱ्हेची होतीं; आणि त्यांच्या वेळीं हल्लींप्रमाणें धार्मिक आणि सामाजिक विचारांच्या संबंधाने लोकांच्या मनांत शिथिलताही उत्पन्न झाली नव्हती. असे असतांही वामनराव याच्या सुस्वभावामुळें आणि त्यांच्या वर्तनामध्यें यत्किंचित दिखाऊपणा नसून सर्व कांहीं मनापासून असे, यामुळे सर्वांना त्यांविषयी आदर वाटे. त्यांचें कोणाशी कधींही वितुष्ट नव्हते, आणि ते सर्वांना हवेसे वाटत. त्यांच्यामध्ये स्वाभिमान पूर्णपणे वसत असे; आणि ते वरिष्ठांस किंवा कोणासही अकारण नमून नसत. हा त्यांचा स्वभाव त्यांच्याशी ज्यांचा संबंध येई त्यांस तेव्हांच कळून येई, यामुळें त्यांच्याबरोबर सर्वांचें यथायोग्य वर्तन होत असे. या संबंधानें दोनचार लहान लहान आख्यायिका येथे सांगितल्या असतां अप्रासंगिक होणार नाहीं.

रत्नागिरी जिल्ह्यांत प्रख्यात क्राफर्ड साहेब हे पुष्कळ वर्षे असिस्टंट कलेक्टर आणि कलेक्टर या हुद्यांवर होते. यांचें लोकांच्या कल्याणाकडे लक्ष असे आणि ते रत्नागिरीस लोकप्रिय होते. त्यांनी रत्नागिरी शहराची बरीच सुधारणा केली आणि लोकोपयोगी गोष्टी केल्या. त्यांचा आणि वामनराव यांचा चांगला परिचय असे. रत्नागिरी येथे एक लहान, सुंदर असा लायब्ररीचा बंगला होता. ही लायब्ररी प्रथमतः सर्वांची असून पुढे युरोपियन मंडळीची निराळी लायब्ररी झाली होती. रत्नागिरी शहर ज्यांनी पाहिले असेल त्यांच्या लक्षांत येईल की तेथील हायस्कूलच्या पुढें गेलें की उच्च मैदान असून तेथें कचेऱ्या, दवाखाना व बंगले आहेत, आणि अर्थात त्यावेळी त्या प्रदेशांतील बहुतेक वस्ती युरोपियन लोकांची होती. तेथें मध्येंच ही नेटिवांची लायब्ररी असावी व त्या ठिकाणीं नेटीव लोकांनीं येऊन रोज बसावें हें पुष्कळ युरोपियनास इष्ट

वाटत नव्हतें. तेव्हां हा लायब्ररीचा सुंदर बंगला घेऊन त्यांत रहदारी बंगल्याचें स्वरूप द्यावें आणि लायब्ररी दुसरीकडे नेववावी असा क्राफर्ड यांनी बेत केला. लोकांना चार घटका उत्तम हवाशीर ठिकाणीं बसून करमणूक करण्यास हें चांगलें स्थान आहे, ते हातचें जाऊं नये, अशी मंडळीची साहजिक इच्छा होती, यामुळें लायब्ररी द्यावयाची नाहीं, असा लोकांनी नेट धरला. क्राफर्ड-साहेब हें हवें तें करणारे असे होते, हें सर्वांस महशूरच आहे. परंतु या वेळी वामनराव यांनी आपल्या मंडळीचे पुढारीपण घेऊन क्राफर्ड यांचा नेटिवांस तेथून हुसकून लावण्याचा बेत तडीस जाऊं दिला नाहीं. अखेरीस अशी तडजोड झाली कीं सरकारानें तेथे जवळच तितकीच उत्तम अशी जागा पाहून लोकांच्या संमतीनें तेथें लायब्ररीला अगदी तसाच असा नवीन बंगला बांधून दिला, आणि मग जुनी लायब्ररी रहदारी बंगल्यासाठी घेतली.

नोकरींत प्रवेश होण्याचा इंग्रजी व मराठी (हल्ली फक्त मराठी) परीक्षा प्रत्येक जिल्ह्यांत होत असते. या परीक्षेची जी कमेटी असते, तिचें अध्यक्षस्थान हायस्कूलच्या हेडमास्तरांकडे असतें. रत्नागिरीस नेहमी अशीच व्यवस्था असे. परंतु एकदां तेथील डेप्युटी ए. इन्स्पेक्टर यांस वाटलें कीं हेडमास्तर ह्यांचा पगार जरी मोठा असला, तरी हुद्यानें आणि अधिकाराने आपण मोठे आहो, यासाठीं अध्यक्षपणा आपलेकडे असावा. त्यांनी अशा तऱ्हेने एज्युकेशनल इन्स्पेक्टर साहेबांच्या मनांत भरवून देऊन एका वर्षी आपण अध्यक्ष आणि हायस्कूलचे हेडमास्तर (वामनराव) आणि त्यांचे फर्स्ट असिस्टंट हे सभासद अशा नेमणुका करून घेतल्या. वामनराव यांनी लगेच ही गोष्ट नापसंत करून आपण व आपले फर्स्ट असिस्टट यांची काम करण्याची खुशी नाहीं असे एज्युकेशनल इन्स्पेक्टर यांस साफ लिहून धाडले. इन्स्पेक्टर यांनी ताबडतोब ही नवीन व्यवस्था फिरवून नेहमीसारखी व्यवस्था केली. *

---

* यासंबंधानें ध्यानात ठेविलें पाहिजे कीं ह्या परीक्षेसाठीं कमेटी नेमण्याची व्यवस्था वामनराव रत्नागिरीस हेडमास्तर असतां नवीनच झाली होती. त्यापूर्वी मुलकी परीक्षा जिल्ह्याचे डेप्युटी ए० इन्स्पेक्टर आपले अधिकारांत स्वतांच घेत. यामुळें हा आपला अधिकार गेला हें बरें झालें नाहीं असें प्रथमारंभीं ह्या मंडळींपैकीं कित्येकांस साहजिकच वाटलें असेल.

दुसरे एक डे० इन्स्पेक्टर रत्नागिरीस होते, त्यांनाही आपण हुद्यानें हेडमास्तरापेक्षां श्रेष्ठ–निदान बरोबरीचे तरी–असून या परीक्षेच्या कामांत हेडमास्तराच्या हाताखालीं वागावे याचें वैषम्य वाटे. यामुळें हे गृहस्थ परीक्षेच्या वेळीं कामाची टंगळमंगळ करीत. वामनराव यांची शाळेंत सुद्धां हाताखालच्या मास्तरांची सभा करून त्यांचा अभिप्राय घेऊन काम करण्याची रीत असे. परीक्षेच्या कमेटीची सभा भरून मतें घेऊन काम झालें पाहिजे, हें तर उघडच होतें. परंतु हे गृहस्थ सभेला सुद्धां वेळच्या वेळीं येत नसत. तसेच हे गृहस्थ वामनराव पुण्यास फ. असिस्टंट असतांना आसि. मास्तर होते. यामुळे ते शाळेंत जात तेव्हां मुलांच्या व मास्तरांच्या देखत जुन्या पेशवाई मंडळीप्रमाणें फार सलगीनें वागत व बोलत. कामकाज चाललें असतां असे वागणें बरोबर नाहीं, अशा सूचनांसही त्यांनी जुमानलें नाहीं तेव्हां वामनराव यांनीं एकदां यांची अर्शी खरडपट्टी काढली की पुन्हा ह्मणून त्यांनीं असें वर्तन कधीही केलें नाहीं.

वामनराव सुरतेस गेले तेव्हां त्या प्रांतावर मि० जाईल्स हे एज्युकेशनल इन्स्पेक्टर होते. तेथें इन्स्पेक्टर यांच्या हफिसांतील कांहीं पत्रव्यवहार गुजराथी भाषेंत चालत असे. हीं जीं पत्रे येत त्यांमध्यें हेडमास्तर यांस लिहिलेला मायना बरोबर नसे. इन्स्पेक्टर हा जरी वरिष्ठ कामगार आहे, तरी हायस्कूलच्या हेडमास्तरांच्या आणि त्यांच्या पत्रव्यवहारांत बरोबरीचें नातें समजतात. परंतु इन्स्पेक्टरच्या हफिसांतील कारकून हेडमास्तरास नुस्ते ' अजम ' लिहीत. ही गोष्ट वामनराव यांनीं त्यांच्या नजेरस आणून दिली, तथापि त्यांनीं आपण मोठ्या साहेबाच्या हफिसांतील कारकून असें समजून वामनराव यांच्या सूचनेकडे लक्ष दिलें नाहीं. तेव्हां वामनराव यांनीं ही गोष्ट मि० जाईल्स यांस कळविली. मि० जाईल्स यांनीं वामनराव यांचें ह्मणणें योग्य आहे असें कबूल करून हफिसांतील मंडळीस गुजराथी पत्रें नीटपणें लिहिण्याची ताकीद दिली.

वामनरावें यांस शाळाखात्यांतील व इतर युरोपियन कामगार फार मानीत असत. त्यांपैकीं पुष्कळांचा वामनरावाशीं फार निकट संबंध असे. असें

असून वामनराव यांनी या संबंधाचा कधीं आपल्या लोकांविरुद्ध दुरुपयोग केला नाहीं. इतकेंच नव्हे, तर पुष्कळदां वामनराव आणि युरोपियन लोक यांच्या संघट्टणाचा सदुपयोग झाला आहे. युरोपियन लोकांमध्यें त्यांच्या शब्दास मोठा मान असे; आणि देशी लोकांच्या संबंधानें कांहीं व्यवस्था करणे झाल्यास वामनराव यांची सल्ला युरोपियन कामगार मंडळी पुष्कळदां घेत असे. वामनराव हे धार्मिक गोष्टींचा नेहमी विचार करीत, यामुळें पुष्कळ मिशनरी लोकांची व त्यांची गांठ पडून भाषणें होत. वामनराव यांना येशूख्रिस्ताचा थोरपणा मान्य होता, परतु ख्रिस्ती धर्ममतें मुळींच मान्य नसत. यामुळें वारंवार वादविवादाचा प्रसंग येई. परंतु अशा वादविवादांत वामनराव सभ्यपणा आणि शांतपणा कधीही सोडीत नसत, यामुळें ख्रिस्ती मिशनरी मंडळीबरोबर त्यांचा उत्तम स्नेहभाव जुळत असे. ख्रिस्ती धर्मांत घेण्यासारखें पुष्कळ आहे, पण त्यासाठीं धर्मांतर करण्याची जरूर नाहीं, असे त्यांचें मत होते. सुरत येथे त्यांचा एक गुजराथी स्नेही ख्रिस्ती झाला तेव्हा त्याचे तसें न करण्याविषयीं मन कळविण्याचा त्यांनी फार यत्न केला, परंतु त्यांत त्यांना यश आलें नाहीं.

वामनराव यांच्या स्वभावाला थट्टामस्करी, वायफळ बोलणें अथवा उगाच वटवट करणें कधीही आवडत नसे. ते स्वता कधीं कोणास उर्धे उत्तर बोलत नसत, आणि दुसरें कोणी तसें बोललेलेही त्यांना खपत नसे. कितीही रागांत असले तरी ते हाताखालच्या मनुष्यास किंवा चाकरमाणसास वाईट शब्द बोलत नसत. शिवीगाळी तर त्यांस कधींही माहीत नव्हती. चाकरमाणसावर फारच रागावले तर 'मूर्ख' या शब्दाहून उच्च प्रतीचा अपशब्द त्यांच्या तोंडून कधी ओलला नाहीं. आमच्या लोकांमध्यें विशेषतः स्त्रियांच्या संबंधानें बोलतांना पुष्कळांस हलके शब्द वापरण्याची सवय असते. त्यांत वामनराव वगैरे मंडळीने तर गरीब बिचाऱ्या अनाथ विधवांचा कैवार घेतलेला. मग अशा बायांच्या संबंधाने उच्चारलेले शेलके शब्द ऐकण्याचा प्रसंग वारंवार त्यांना येई. तथापि वामनराव कधीं रागावत नसत. एकदां एका फार सलगीच्या अशा गृहस्थानें असले शेलके शब्द वापरून आणि बरीचशी

थट्टा करून वामनराव यांस म्हटलें, 'अहो, साऱ्या सुधारणा आटोपल्या, आणि आतां तुम्ही या × × × चीं लग्नें लावीत सुटला आहांत!' हें ऐकून वामनराव मुळींच रावावले नाहींत. त्यानीं गंभीर मुद्रेनें व संयमपणें म्हटलें, 'महाराज, अशा बायका तुम्ही उच्चारलेल्या नांवाखालीं मोडत असल्या तरी त्या कोणाच्या तरी आया, बहिणी किंवा बायका आहेत. आपण सर्वच या नश्वर जगांत राहतो, तेव्हां आपणापैकीं प्रत्येकाची आई, बहीण किंवा बायको तशा विपन्न स्थितीस जाण्याचा संभव आहे. हें लक्षांत ठेवून प्रत्येकाने बोलावें हें बरें!' बायकांच्या संबंधाची कोणतीही सुधारणा म्हटली असतां तिचें खंडण करणे म्हणजे गलिच्छ शब्द वापरणें अशी पुष्कळांची चाल असते. अशांनी ही गोष्ट लक्षांत घेण्यासारखी आहे. वामनराव यांचा व कोणाचा थोडका वेळ जरी सहवास झाला, तरी तेवढ्यावरून ते थोर मनाचे, भाविक, साधुपुरुष आहेत अशी त्याची तेव्हांच खात्री होत असे.

वामनराव यांचे सर्व आयुष्य सरकारी नोकरीत गेल्यामुळें त्यांची राजकीय विषयावरील मतें विशेषशीं कोठें बाहेर येण्याचा प्रसंग आलेला नाही; तथापि साप्रतच्या पुस्तकांतील शेवटच्या तिन्ही व्याख्यानावरून त्यांच्या मताचे बरेंच दिग्दर्शन होत आहे. या संबंधानें ते न्यायमूर्ति रानडे व तेलंग यांचे अनुयायी होते. आपल्या लोकांच्या अंगी राजकीय उन्नती करून घेण्याची योग्यता आहे, परंतु ती त्यांनीं पाश्चात्य सुधारणाचा नीट अभ्यास करून प्रयत्नांनीं साधली पाहिजे, असें त्यांचें मत होतें. राजकीय सुधारणा होण्याच्या अगोदर कित्येक सामाजिक बाबतींत आणि धार्मिक विचारांत आपली पुष्कळशी प्रगति व्हावयास पाहिजे आहे असे त्यांस वाटत असे. पेनशन घेतल्यावर आपला सर्व वेळ पुण्यांत राहून आपल्या लोकांच्या धार्मिक, सामाजिक व राजकीय उन्नतीच्या कामीं खर्चावयाचा असा त्यांचा उद्देश होता. त्यांना पुण्याच्या सार्वजनिक सभेचे अध्यक्ष करावे असें त्याच्या स्वभावाचे पूर्ण माहितगार न्या० रानडे यांनी पुण्याच्या पुढाऱ्यांस सुचविले होतें. तेव्हां पुण्याच्या सर्व मंडळीनें त्यांचे विचार पाहून ते त्यास पसंत पडल्यावर त्यांना अध्यक्ष करण्याचें ठरविलें होतें, आणि एक दोन राजकीय विचारांच्या सभां-

मध्यें ते अध्यक्ष झाले होते. त्या वेळी त्यांचे काम पाहून त्यांची राजकीय गोष्टींचीं मतें नेमस्त व योग्य आहेत, आणि त्यांचे संबंधानें सरकारी कामगारांचे मनांत आदरबुद्धि आणि विश्वास असल्यामुळें त्यांच्यापासून सार्वजनिक कामांत फार उपयोग होईल असे सर्वांस वाटले. परंतु पुढें ते आजारी पडल्यामुळें त्यांचा आणि लोकांचा हेतु तडीस गेला नाहीं. पेनशन घेतल्यावर कांहीं ग्रंथरचना करावी व अर्धवट राहिलेली ग्रंथरचना पुरी करावी असाही त्यांचा उद्देश होता. याच वेळीं यांनी " उत्तर नैषध " या नांवाचें संस्कृत नाटकांच्या धर्तीवर एक करुणरसप्रधान गद्यपद्यात्मक नाटक लिहिले. तें अद्यापि छापून प्रसिद्ध झालें नाहीं. हे नाटक चांगले साधले आहे.

वामनराव यांस रखमाबाई या त्यांच्या प्रमाणेच सुशील, शांत, दयाळू स्वभावाच्या अशा पत्नी मिळाल्या होत्या. वामनराव यांच्या सर्व उद्योगांस त्यांना त्यांच्या पत्नीचें उत्तम साह्य होतें. रखमाबाई या कांहीं फारशा सुशिक्षित नव्हत्या. तरी त्यांनी वामनराव यांनी मनांत आणलेल्या सुधारणेच्या गोष्टींमध्यें कधींही अडथळा आणिला नाहीं. कारण स्वतां वामनराव यांचें एकनिष्ठेचें वर्तन हाच त्यांना शिक्षणाचा धडा असे. रखमाबाई यांनीं आपला संसारही दक्षतेने केला. वामनराव यांच्या दुखण्यांत त्यांनी त्यांची कशी शुश्रूषा केली या गोष्टीचे न्या० रानडे यांनी केलेलें वर्णन पुढें आलेलेंच आहे. रखमाबाई या वामनराव यांच्या प्रमाणेंच पुनर्विवाहपक्षाच्या पूर्ण अभिमानी होत्या. तो अभिमान त्यांनी वामनराव यांच्या मागेंही तसाच नेटानें कायम राखून, आपल्या एका मुलास आपण पूर्वी ज्यास मदत केली होती अशा एका पुनर्विवाहाच्या संबंधाच्या मुलीशीं विवाह करण्यास उत्तेजन दिलें ही गोष्ट सर्वश्रुतच आहे.

याप्रमाणें वामनराव यांचें थोडक्यांत चरित्र सांगून त्यांच्या लोकोपयोगी व अनुकरणीय गुणांचें सक्षेपतः वर्णन केलें. वामनराव हे मानवी प्राणीच होते यामुळें त्यांच्यामध्यें दोषही असतील आणि त्यामुळें त्यांच्याकडून चुकाही घडल्या असतील. परंतु त्यांच्या आंगच्या दोषामुळे किंवा, त्यांच्या वर्तनाने सार्वजनिक दृष्ट्या कोणाचें नुकसान झालेलें आढळत नाहीं. यास्तव या अल्प-

चरित्रांत दोषांचा विचार करण्याची गरज नाही. शिवाय लौकिक हिताहिताच्या दृष्टीनें पाहिलें असतां त्यांच्यामध्यें गुणच फार होते, आणि त्या गुणांचा आपल्यास उपयोग झाला आहे. त्यांच्यामध्यें लक्षांत घेण्यासारखे दोष कोणाच्या दृष्टीसही पडलेले नाहींत. दुसरी गोष्ट अशी आहे की हा लेख लिहिणारास वामनराव हे वडिलांसारखे होते, यासाठी त्यांच्या गुणांदोषांचें विशेष रितीनें वर्णन करण्याची त्याची इच्छा नाही, आणि तसा अधिकारही तो आपल्याकडे घेऊं इच्छित नाहीं. यासाठी सरतेशेवटीं वामनराव यांचे परम प्रिय सुहृत् आणि त्यांच्या सर्व आयुष्यभर प्रत्येक सामाजिक आणि धार्मिक सुधारणांत त्याचे सहचारी असलेले असे न्यायमूर्ती माधवराव रानडे यांनीं त्यांच्या मृत्यूनंतर मुंबई प्रार्थनासमाजांत जे भाषण केलें होते, ते येथें उतरून घेऊन हे अल्प चरित्र संपवितो.

" तुकारामबावांस मृत्यूचे भय मुळीच वाटत नव्हतें, याविषयीं त्यांच्या कांहीं अभंगांत फार सुरेख वर्णन आहे. आणि त्यांच्या चरित्रावरून आपणांस हें दिसून येईल की, जिवंतपणीं त्याचप्रमाणें मृत्यूनंतरही त्यांची कीर्ति अजरामर झालेली आहे. जीवनाचें जें आदिकारण जगच्चालक परमेश्वर त्यांत ते अगदी लीन झाले होते, असेंच आपणांस दिसून येईल. हेच शब्द आमचे प्रिय मित्र वामनरावजी मोडक यांस यथार्थपणे लागू होतात. वास्तविक म्हटलें तर आज चार वर्षे त्यांचा आत्मा या मृण्मय देहांतून निघून जाण्याच्या मार्गास लागलेला होता; आणि आपण आपल्या दयामय पित्याच्या चरणासन्निध जावें या पवित्र इच्छेनें देहाविषयी अगदी उदासीन होत्साता मृत्यूची मार्गप्रतीक्षा करीत होता. ज्यांच्या आध्यात्मिक कर्तव्यास नुकताच कोठे आरंभ झाला होता आणि जे ईश्वराच्या नांवाचा जयजयकार करण्यासाठीं उमेदीनें झटत होते व सर्व प्रकारची दुष्कृत्यें होऊं नयेत म्हणून सतत प्रयत्न करीत होते, अशा बऱ्याच बंधूंवर गतवर्षी निर्दय मृत्यूचा घाला पडला आहे. या सर्व लहान बंधूंस अशा रीतीनें वागण्याच्या कामी आमचे शूर बंधू वामनरावजी यांच्या आचरणावरून आणि उपदेशानेंच स्फूर्ति मिळाली होती. वामनरावजींस पक्षघाताचा झटका पहिल्यानें चार वर्षांपूर्वी

झाला. परंतु या चार वर्षांत त्यांची सर्व मानसिक शक्ति ईश्वराच्या सेवेंत मग्न झाली होती. महाभारतांतील प्रसिद्ध योद्धयाप्रमाणे ते शरपंजरीं पडले होते व त्यांवर मृत्यू चाल करीत होता; तथापि एकही दुःखाचा उद्गार त्यांच्या तोंडावाटे निघाला नाहीं. त्यांचा आत्मा शांत होत्साता परमात्म्याच्या चिंतनांत रत झाला होता आणि जे त्यांचे समाधान करण्यासाठीं त्यांचेकडे येत, त्याना स्वतांच्या साठ वर्षांच्या मिळविलेल्या अनुभवाचा अप्रतिम उपदेश करण्यांत त्यांचा बहुतेक काल जात असे.

" आपणां सर्वांस फार आशा होती की, वामनरावजी आणखी कांहीं वर्षे तरी आपणामध्यें राहून मार्गदर्शक दीपाप्रमाणें योग्य प्रकाश देतील; परंतु भवितव्यता निराळीच होती. तथापि भगवदिच्छा त्यांना आमच्यामधून नेण्याची होती याबद्दल आम्हीं कुरकुर करतां कामा नये. आपलें कर्तव्य बजावण्यासाठी ते आमच्यामध्यें बरेच दिवस राहिले, एवढ्यावरच आम्हीं आपले समाधान करून घेतलें पाहिजे. त्यांनी शिक्षकाचें काम तीस वर्षे केलें. तेवढ्या मुदतींत शेंकडों हजारों शिष्यांनीं त्यांच्या चरणांपाशी बसून ज्ञानसंपादन केलें. या शिष्यांच्या, आणि गेली चाळीस वर्षे माझ्याप्रमाणें ज्यांना त्यांच्या सहवासाचा लाभ झाला त्यांच्या हृदयांतून वामनरावजींची गंभीर, आनंदी, प्रेमळ, भाविक, धार्मिक मूर्ति कधींही ढळण्यासारखी नाहीं. वामनरावजींच्या उदात्त सहवासानें आपल्या मनावर काय परिणाम होतो याची प्रतीति ज्यांस पहावयाची असे त्यांस फक्त एकवार जाऊन त्यांच्याशीं सहज भाषण करण्याचा प्रसंग आला म्हणजे त्यांची खात्री होत असे. त्यांजकडे जे येत त्यांच्या मनांत वामनरावजींविषयीं आदर व पूज्यबुद्धि उत्पन्न होणें हा पहिला परिणाम होय. पुढें त्यांच्याशीं संभाषण करण्याचा योग आला म्हणजे त्यांच्या साधेपणाचा आणि उदात्त व परिपक्व विचारांचा परिणाम मनुष्याच्या मनावर इतका होई, कीं तो कसाही कठोर मनाचा असला, तरी त्यांच्या गंभीर, मधुर स्वरानें आणि मराठी सुरस वाणीनें

श्रोत्याच्या मनास पाझर सुटून, आपण केवळ स्वर्गसुखाचा अनुभव घेत आहों असा भास होऊन, आपली चिंता, क्षुल्लक हेतु आणि निराशा यांचा विसर पडल्याविना राहात नसे. इंग्रजी भाषेवर त्यांचा पगडा बराच बसला होता, परंतु केवळ इंग्रजीभाषेवरच त्यांची भिस्त नसे. ते आपल्या मधुर स्वभाषेंत बोलूं लागले म्हणजे त्यांची बरोबरी करणारा एकही नसे. त्यांचा आवाज इतका गोड व गंभीर होता, कीं तो श्रोत्याच्या अंतःकरणांत आपला प्रवेश करून त्यांतील क्षोभ अगदी नाहींसा करून, शांत वृत्ति उत्पन्न करीत असे. शब्दावरून विचारांची कल्पना होते. जेथे स्वभाव इंद्रियदमनाच्या संवयीने स्थिरावलेला नाहीं तेथें विचारांस महत्त्व नसावयाचें. ज्यांना त्यांची प्रत्यक्ष माहिती असे ते जाणत असत कीं, वामनरावजींच्या अंगीं सहिष्णुता, प्रेम व भूतदया आणि धर्मापासून उत्पन्न होणारी पूज्यबुद्धि, आदर व सत्यनिष्ठा, हे गुण उपजत असून इंद्रियदमनाच्या संवयीनें ते इतके बद्धिंगत झाले होते कीं, त्या सर्वांच्या समेलनाने त्यांना एक प्रकारचें पूर्णत्व आलें होतें. हल्लींच्या पिढींत स्वताविषयीं अभिमान म्हणून कांहीं नाहीं असें म्हणणारे कित्येक लोक आहेत. मला तर असें वाटतें कीं, आमच्यांत खरा स्वाभिमानी पुरुष जर अलीकडे कोणी झाला असेल, तर वामनरावजी हेच ते होत. परंतु त्यांचा स्वाभिमान दुसऱ्यास त्रास देणारा नव्हता. केव्हां केव्हां त्यांच्याठायीं असंतोषवृत्ति उत्पन्न होत असे. परंतु ती स्वतांपुरतीच असे. दुसऱ्यांच्या संबंधानें जणूं काय ते प्रेमाची व माधुर्याची मूर्तिच असत.

"तीस वर्षांपूर्वी विधवाविवाहासंबंधी चळवळ उडाली होती त्या वेळीं त्या सत्कार्यार्थ वामनराव एकटे अगदीं जुन्या मतांच्या ब्राह्मणसमुदायांत भांडत होते. त्यामुळें सर्व बाजूंनीं जरी त्यांचा छळ होत होता, तरी ते मुळींसुद्धां न डगमगतां सर्व छळ सोसून दंड ठोकून शूरासारखे या सत्कार्यार्थ झटले. इतकें असूनही क्रोधाचा चकारशब्द त्यांच्या मुखावाटे निघाला नाहीं. आणि जे त्यांस सतत त्रास देत असत त्यांच्याविषयीं

सुद्धां त्यांच्या मनांत प्रेमाशिवाय दुसरी भावना कधींही उत्पन्न झाली नाहीं. हाच स्वाभिमान या भरतभूमींतील साधुसंतांच्या आचरणांत दिसून आला आहे आणि त्याचेंच अनुकरण सध्याच्या कालास अनुसरून आमच्या मित्रानें केलें होतें.

" वामनरावजीसंबंधाने एक अत्यंत अनुकरणीय गोष्ट ही कीं, सामाजिक आणि धार्मिक सुधारणांच्या झगड्यांत त्यांनीं आपली सत्यनिष्ठा यत्किंचितही ढळूं दिली नाहीं. इतकेंच नव्हे, तर त्यांच्या कृत्यांत किंवा भाषणांत दोषाचा भाग म्हणून कधीं कोणास सांपडलाच नाहीं. आणि जेव्हां हे युद्ध संपलें तेव्हां निदान एका गोष्टीविषयीं सर्वांची एकवाक्यता झाली, ती ही कीं, वामनरावजी हे भांडणारांपैकी सुधारक असून सोसणारांपैकीही होते.

" त्यांच्या मृत्यूमुळें आपल्या प्रांतांतील सुधारणेसंबंधाच्या निरनिराळ्या चळवळींची फार हानी तर झालीच आहे. परंतु धर्मसंबंधी बाबतींत त्यांनीं आपलें बहुतेक आयुष्य खर्च केलें असल्यामुळें आणि सरकारी नोकरीचे पेनशन घेतल्यानंतर त्यांचे सर्व विचार आध्यात्मिक विषयांत गढून गेलेले असल्यामुळें व राहिलेलें आयुष्य धर्मप्रचारार्थ घालवावयाचें ह्या त्यांच्या निश्चयास त्यांनीं आचरणाचें स्वरूप द्यावयास सुरुवात केलीही होती म्हणून, झालेल्या हानीनें आम्हांस फारच तळमळ वाटत आहे. धर्माच्या बाह्य स्वरूपाकडे त्यांचें फारसें लक्ष नसे. परंतु त्यांचें मन धर्माच्या अंतर्गत स्वरूपांत व भक्तींत अगदीं लीन असे. खरा धर्म म्हटला म्हणजे हाच आहे. त्यांची स्थिति अशी होती, म्हणून धार्मिक बाबतींत मार्गदर्शक होण्यास ते पात्र झाले होते. स्वभावतः भक्तिमान् असल्यामुळें त्यांची उत्तम श्रद्धायुक्त व भाविक अशीं पदें आपल्या संगीतांत आहेत. त्यांचे संबंधानें ईश्वराचें सान्निध्य ही केवळ मानीव गोष्टींपैकी एक गोष्ट नव्हती; तर ती गोष्ट एक प्रत्यक्ष अनुभवाची असून, तोच एक त्यांचा मोठा ठेवा असे. त्यांनीं बराच प्रवास करून आध्यात्मिक ज्ञान संपादन केलें होतें. केशव चंद्रसेन यांनीं ब्राह्मसमाजास प्रगतीची जी दिशा दाखविली तिजविषयीं त्यांच्या मनांत

पूर्ण सहानुभूति असे. तथापि त्यांच्या संबंधाने शेवटी शेवटी ज्या गैरसमजुतीच्या कल्पना तेथील लोकांत वाढल्या होत्या त्यांविषयी त्यांना फार वाईट वाटे. यामुळें जरी त्यांच्या या शेवटच्या स्थितीविषयीं त्यांना सहानुभूति नसे, तरी त्या महाथोर ब्राह्मप्रचारकाविषयी त्यांच्या मनांत पूर्ण प्रेम व आदर भरलेला असे. ईश्वरेच्छेने वामनरावजी आणखी कांहीं वर्षे जर राहिले असते, तर आज बंगाल्यांत महर्षि देवेंद्रनाथ ठाकूर यांस जो मान मिळत आहे तो यांना या बाजूस मिळाला असता. इतकेंच नव्हे, तर जिकडे जिकडे त्यांची लोकांस माहिती आहे तिकडेही मिळाला असता यांत संदेह नाहीं. स्वभाव आणि इंद्रियनिग्रहाची संवय या बाबतींत बंगाल्यांतील इतर धर्मप्रचारकांपेक्षां महर्षि देवेंद्रनाथ यांच्याशीं त्यांचें फार साम्य असे.

" संस्कृत भाषेत ते स्वतां प्रवीण असून त्यांनी कांहीं उपनिषदांचे भाषांतरही केलें आहे. तथापि स्वभावेच्या सवेत त्यांच्याकडून कधीही दुर्लक्ष झालेलें नाहीं. ते नेमस्तपणा राखण्यास शिकवीत; पण, तो धाकदपटशाने न शिकवितां गोडीनें व प्रेमाने शिकवीत. हा गुण वरिष्ठ अधिकाऱ्यांनीं ओळखला होता म्हणून मुंबईतील एका मुख्य विद्यापीठावर त्यांची योजना करण्यांत आली होती. अशा मुख्य हुद्यावर हेच पहिले देशी कामदार झाले. त्यांच्या दहा वर्षांच्या कारकीर्दीत त्यांनी ती शाळा इतक्या उत्तम स्थितींत आणिली, कीं तो सर्व लोकांच्या स्तुतीस पात्र झाली. सर्व इलाख्यांतील हजारों विद्यार्थी त्यांना आपण होऊन मान देत आहेत, एवढ्यावरूनच सरकाराने त्यांना एवढा मोठा हुद्दा दिला तो योग्य होता याची साक्ष पटत आहे.

" देशाच्या राजकीय प्रगतीकारितां जे प्रयत्न चालले आहेत त्यांविषयीं गुरुवर्य मोडक यांस कळकळ नव्हती असें कोणींसें म्हटलेलें मला आठवतें. आतां या बाबतींत जर कोणाला बोलण्याचा कांहीं अधिकार असेल, तर तो खचित मला आहे. ते सामाजिक आणि धर्मसंबंधी सुधारणेंत सर्वथैव गुंतले होते ही गोष्ट खरी. पण राजकीय सुधारणेविषयीं बेपर्वा होते असें

म्हणणारे त्यांच्यासंबंधानें अन्याय करीत आहेत, असें म्हटल्यावांचून राहावत नाही. ते आम्हांपैकी पुष्कळांपेक्षा जास्त व कळकळीनें राजकीय बाबतींचा विचार करीत असत. परंतु राजकीय चळवळींसंबंधी ज्या विचारांस कांहीं लोक गैरसमजुतीनें स्वदेशाभिमान समजतात, तसले वरपांगी आवेशी विचार त्यांस माहीत नव्हते. राजकीय बाबतीतही योग्य संयम लावून घेऊन आणि नियमाने आपणांस योग्यतेस आणलें पाहिजे अशा मताचे ते होते. उगीच कसा तरी वृक्ष तर वाढूं द्या, मग त्याचें कांहीही होवो असें म्हणणारांपैकीं ते नव्हते.

" साधारणपणे अशा प्रकारचा आमच्या परलोकवासी मित्रांचा जीवनक्रम असे. त्यांच्या मृत्यूमुळें झालेली हानी अंशतःही भरून येण्यासारखी नाही. त्यांची प्रिय पत्नी, जी सतत त्यांच्यावरोबर फिरत असे, तिच्या मधुर स्वभावाच्या योगानें त्यांना आपल्या आयुष्यांत आलेल्या अनेक अडचणी सोसून घेण्यास बरेंच साह्य मिळालें. आपल्या लोकांच्या घरांत प्रेमभाव आणि पतिनिष्ठा नाही असे म्हणणारे जे कोणी परकीय लोक असतील त्यांनी या मोडकबाईनी सतत चार वर्षे चालू असलेल्या दुखण्यांत कशी एक निष्ठेनें पतिसेवा केली इकडे जरा लक्ष दिलें म्हणजे पुरे आहे. अशा बाईविषयीं आपल्या स्त्रियांस अभिमान वाटणे स्वाभाविकच आहे. आपल्यावर दुःखाचा डोंगर कोसळणार हें या बाईस समजून चुकलें होतें. परंतु आपलें दुःख बाहेर उमगूं न देतां दुखणाइताची सर्वप्रकारे बरदास्त राखण्यांत व त्यांस आनंदित ठेवण्यास त्या झटत असत. त्यांच्या मुलांचीही वृत्ति त्याचप्रमाणे असे. अशा स्थितींत कुटुंबांतील सर्व माणसे जवळ असतांना त्यांचें प्राणोत्क्रमण या शहरांत त्यांच्या सर्वांत जुन्या मित्राच्या घरीं झालें. त्यांच्या आत्म्यास शांति आणि धन्याची सेवा करण्यास अधिक अवकाश मिळेल असें स्थळ त्यांस प्राप्त होवो, अशी परमेश्वरापाशीं आपली प्रार्थना असावी. "

वामन आबाजी मोडक

यांचीं

धर्मपर. आणि नीतिपर व्याख्यानें.

क्षमा.

सुशिक्षित मनुष्याच्या आंगीं जे गुण अवश्य असले पाहिजेत त्यांमध्यें क्षमा हा एक गुण अत्यंत महत्त्वाचा आहे. मनुष्यांस परस्परांचे हातून, जाणून बुजून म्हणा किंवा गैरसमजुतीनें अपकार होणें हें मानवी स्वभावाकडे पाहिलें म्हणजे अगदीं साहजिक दिसतें. क्रोध, ईर्ष्या, लोभ, मद, मत्सर इत्यादि विकार विवेकाचें बंधन तोडून यत्किंचित् जरी बळावेल, तरी मनुष्यांमध्यें नानाप्रकारच्या अपकारांस कारण होतात; मग ते अपकार कोणत्याही प्रकारचे असोत. या विकारांच्या अमलांत मनुष्यें एकमेकांस कधीं शारिरिक, कधीं मानसिक पीडा कमजास्त मानानें दिल्यावांचून राहात नाहींत. जर या सर्व अपकारांबद्दल मनुष्यांनीं एकमेकांवर सूड घेतला, आणि आपणास पीडा करणाऱ्यास लागलीच उलट पीडा केली, तर मानवीजातीचें दुःख आहे त्यापेक्षां फार वाढून अत्यंत दुःसह होईल. म्हणून ईश्वरी योजनेनें मनुष्याच्या ज्ञानाची जसजशी वृद्धि होते, त्याचा अनुभव

जसजसा अधिक होतो, तसतसे त्याचे मनोविकार विवेकाच्या अंकित होतात. हा परिणाम नेहमीं एकसारखाच होतो असें नाहीं. कधीं कधीं विद्या व अनुभव हीं वाढलीं तरी पूर्वसंस्कारानें म्हणा किंवा संगतीच्या योगानें म्हणा, त्या विद्येपासून अथवा त्या अनुभवापासून क्रोधादि विकारांचें नियमन फारसें होत नाहीं. अशीं मनुष्यें अत्यंत अविद्वान व रानटी मनुष्याप्रमाणें क्रोधादिकांच्या आधीन होऊन अनेक प्रकारें परपीडा करितात; व दुसऱ्यानें केलेल्या अपकाराचें सहन न करितां तत्काळ त्याचा सूड घेण्यास मागें पुढें पाहात नाहींत. त्यांचे ठिकाणीं विद्या असते, अनुभव असतो, परंतु विवेक नसतो. क्वचित् असला तरी जितका असावा तितका जागृत किंवा दृढ नसतो. यामुळें वेळोवेळीं ज्या ज्या विकारांचा आविर्भाव त्यांच्या अंतःकरणांत होतो त्याच्या आधीन होऊन ते वर्ततात. परंतु प्रायः विद्या, अनुभव, हीं असून त्यांतही सुशिक्षण असलें, तर विवेक जागृत राहून वेळोवेळीं उद्भवणाऱ्या मनोविकारांचें त्यांस बऱ्याच प्रकारें शमन करितां येतें. दुसऱ्यानें आपला अपकार केला असतां म्हणजे आपल्या शरीरास इजा, आपल्या द्रव्याचा किंवा मालमिळकतीचा अपहार किंवा अपव्यय, अथवा कठोर शब्दांनीं किंवा कृतींनीं आपलें मन दुखविणें ह्या गोष्टी केल्या असतां, आपल्यास वाईट वाटणें किंवा क्षणएक क्रोध येणें हें अगदीं स्वाभाविक आहे. परंतु ही

क्रोधवृत्ति बळावूं देतां कामास नये, विवेकानें तिचें नियमन केलें पाहिजे; आणि दुसऱ्यानें केलेल्या आपल्या अपकाराचा शांतपणें विचार केला पाहिजे. न समजून झालेले अपकार तर विचारी मनुष्यानें एकंदर मानवी स्वभावाच्या दुर्बलतेकडे लक्ष्य देऊन अपकार कर्त्यास विशेष दोष न देतां सहन केले पाहिजेत. परंतु समजून उमजून केलेले अपकार सुद्धां अपकारकर्ता आपल्या कृत्यांविषयीं खिन्न झाला आहे असें दिसल्यास, किंवा सामोपचारानें तो आपला दुर्गुण टाकील असें दिसल्यास, सामोपचारानेंच त्याच्या अन्यायाविषयीं त्याची मति जागृत करून झालेला अपकार आपण विवेकानें सहन केला पाहिजे. कित्येकांस स्थूल दृष्टीनें क्षमा करणें हें दुर्बलत्वाचें लक्षण वाटतें, परंतु तसें नव्हे. अपकार करणारास वृत्तीवर आणण्याचा उपाय तर अवश्य योजिला पाहिजे. पण प्रत्येक अपकारास उलट अपकार करणें हें मोठ्या अनर्थाचें कारण होईल. यास्तव मनुष्यमात्रानें विचारानें, सुजनसंगतीनें, थोर पुरुषांच्या उदाहरणानें, आपल्या स्वतांच्या कल्याणाकडे तसेंच इतरांच्या सुखाकडे दूरवर लक्ष पोंचवून आपल्या आंगीं क्षमा—म्हणजे अपकार सहन करण्याची शक्ति—संपादिली पाहिजे. जे दुर्बल आहेत त्यांच्या आंगीं हा गुण असणें फारच आवश्यक आहे. कारण त्यांनीं जर अपकारास प्रत्यपकार करण्याचें मनांत आणिलें तर बलवंतांपासून त्यांस वारंवार पीडा सोसावी लागेल. परंतु जर

त्यांणीं विचारानें प्रथम अपकार सहन केला, तर पुष्कळ प्रसंगीं त्यांस जास्ती होणारी पीडा टाळतां येईल. म्हणून दुर्बलांचे आंगीं क्षमा हा गुणच मानिला पाहिजे. जे स्वतां अपकाराचा प्रतिकार करण्यास समर्थ आहेत त्यांचे आंगीं क्षमा हा नुसता उपकारक गुण नव्हे, तर त्यांस हें एक भूषणच होय असें समजावें. म्हटलें आहे,—'क्षमा गुणो ह्यशक्तानां शक्तानां भूषणं क्षमा।'

सत्पुरुषांनीं समयोचित क्षमा करून अत्यंत दुष्ट, दुर्वृत्त मनुष्यांसही आपल्या दैवी गुणानें आश्चर्यचकित व मोहित करून सन्मार्गास लाविलें आहे. थोर व उदार बुद्धीच्या पुरुषांनीं समयोचित क्षमा करून आपल्या द्वेष्ट्यांसही आपले अंकित करून टाकिलें आहे. अशीं उदाहरणें इतिहासांत सत्कथांत, व महच्चरित्रांत थोडीं आढळतात असें नाहीं. यास्तव—" क्षमा हिपरमं धनं। "

" क्षमा वशीकृतिर्लोके क्षमया किं न साध्यते। "
क्षमा खड्गःकरे यस्य किं करिष्यति दुर्जनः ॥

म्हणजे " क्षमा हें मोठें धन होय. ह्या जगामध्यें क्षमेनें सर्व लोक वश होतात. क्षमेनें काय साध्य होत नाहीं? ज्याच्या हातांत क्षमेचें खड्ग आहे त्याचें दुर्जन काय करणार आहे?" असें जें म्हटलें आहे तें अगदीं यथार्थ आहे. हा सामान्य लौकिकदृष्टीनें विचार झाला. आतां ज्यांच्या अंतःकरणांत धर्मबुद्धि जागृत होऊन ईश्वरनिष्ठा सिद्ध झाली आहे, ते तर आ-

पण ईश्वराचे अनंत अपराध करीत असतांही ईश्वर आपल्या ऐहिक सुखाची तरतूद कशी ठेवितो, व आपल्या पारत्रिक कल्याणाविषयीं काय काय उपाय योजितो, हें जाणून आपल्या आंगीं क्षमा संपादून, आपल्याकडून होईल तितका परसुखवृद्धीविषयीं व परदुःखपरिहाराविषयीं अवश्य यत्न करितीलच. ज्याच्या आंगीं क्षमा नाहीं त्यास धर्मनिष्ठ अथवा ईश्वरनिष्ठ कसें म्हणावें ? एकनाथपंतानीं आपल्या अंगावर एकवीस वेळ तांबूल-रस फेंकणाऱ्या यवन पाहरेकऱ्यास आपल्या सहनशीलतेनें व शान्तीनें कसें सन्मार्गास लाविलें बरें ? तुकारामबुवानीं आपला छळ करून आपल्यास काठ्यांनीं मारणाऱ्या ब्राह्मणास आपल्या क्षमाशास्त्राने जिंकून आपल्या अनुयायांमध्यें कसें ओढून घेतलें ? येशूनें आपल्यास निष्कारण वधस्तंभीं चढविणारांस, त्यांच्या घोर कृत्याबद्दल क्षमा करून त्यांचा अपराध पोटीं घालण्याविषयीं ईश्वराची किती काकुळतीनें प्रार्थना केली ? या सत्पुरुषांचें नाम ऐकिलें म्हणजे आस्तिक्ययुक्त मनुष्यांच्या मनांत जी अत्यंत पूज्यबुद्धि उत्पन्न होते ती या क्षमेच्या व शान्तीच्या योगानें. युधिष्ठिरास अजातशत्रु हें पद कशानें मिळालें ? केवळ या क्षमागुणानें. अशा प्रकारची शान्ति व सहनशीलता ज्यांचे अंगीं सिद्ध होईल ते खरोखर धन्य होत. परंतु सामान्य मनुष्यांससुद्धां वारंवार अभ्यासानें यथाशक्ति प्रयत्नानें हा क्षमागुण कांहीं अंशीं तरी साध्य करितां येईल यांत संशय नाहीं.

सत्यभाषण.

" सत्यंवद । "

अध्ययन समाप्त झाल्यानंतर आचार्यकुल सोडून आपल्या घरीं जावयास विद्यार्थी निघाला म्हणजे त्याची विद्यार्थिदशा जाऊन पुढें घरीं जी स्वतंत्र स्थिति प्राप्त होणार, त्या स्थिती-मध्यें त्याणें कसें वर्तावें, लोकव्यवहार कोणत्या रितीनें करावा, व गृहस्थाश्रम घेऊन संसारकृत्यें कोणच्या प्रकारें करावी, या संबंधें विद्यार्थ्याच्या कल्याणांविषयीं चिंता वाहणाऱ्या गुरूनें त्यास ज्या आज्ञा करावयाच्या त्यांत पहिली आज्ञा " सत्यं-वद " म्हणजे " सत्य भाषण कर " ही आहे. आतां या आज्ञेस जें आद्यस्थान दिलें आहे, तें अगदीं यथायोग्य आहे. कारण लोकांमधील सर्व अन्योन्य व्यवहार जे प्रायः निःशंक चालले आहेत ते परस्परांच्या भाषणांवर परस्परांचा विश्वास आहे म्हणूनच चालले आहेत. प्रायः मनुष्यें एकमेकांशीं भाषण करितांना स्वभावतः सत्यास अनुसरूनच बोलतात; म्हणूनच लोकांचा एकमेकांच्या बोलण्यावर विश्वास राहातो. कचित् लोभादि मनोविकार बळावून, मनुष्यमात्रामध्यें जी स्वार्थपरता आहे, व जी मनुष्याला जीवितसंरक्षणास सामान्यतः आवश्य-कही आहे, ती मर्यादेच्या बाहेर गेली म्हणजे लोभबुद्धीनें केलेलें आपलें दुष्कृत्य गुप्त ठेवण्यासाठीं, किंवा परवंचनेनें आपलें अनुचित कार्य सिद्धीस नेण्यासाठीं, मनुष्य असत्य भाषण करण्यास प्रवृत्त होतो. कदाचित् कांहीं काळपर्यंत

या असत्यमूलक व्यवहारानें मनुष्याचें कांहीं व्यवहारीक कार्यही साधतें; परंतु हा असद्व्यवहार निर्भयपणें पुष्कळ काळपर्यंत चालतो असें नाहीं. प्रायः लवकर म्हणा किंवा कालगतीनें म्हणा, असत्य बाहेर पडतेंच पडतें. असें झालें असतां असत्य भाषण करणाराचा लोकांमध्यें अत्यंत उपहास व तिरस्कार झाल्यावांचून राहात नाहीं. क्वचित् स्थूलदर्शी लोकांनीं त्याचा कांहीं मान राखिला, तर ते केवळ बाह्योपचारानेंच राखितात. मनापासून राखीत नाहींत. हें असत्य भाषण करणाराच्या ध्यानांत आल्यावांचून फार वेळ राहात नाहीं. याप्रमाणें लोकांमध्यें असत्य भाषण करणारा मनुष्य अपमानास पात्र होतो. मग असत्य भाषणानें संपादिलेल्या द्रव्यादि विषयांपासून त्यांस सुखप्राप्ति कशी होऊं शकेल? मनुष्यजातीच्या प्राण्यांस संसारांत लौकेषणा म्हणजे लोकप्रीति सर्वप्रकारें अवश्यक आहे. आपण सर्व मनुष्यें प्रायः अनेक प्रकारें एकमेकांच्या साहाय्यावर अवलंबून असल्यामुळें लोकांची आपल्याविषयीं प्रतिकूलता आपल्यास पदोपदीं पीडाकारक किंवा निदान खेदकारक तरी होते; म्हणूनच प्रायः लोकांमध्यें मान्यता संपादन करण्याविषयीं मनुष्यमात्र उद्युक्त असतो. परंतु असत्याचा कलंक ज्यास लागला आहे त्याची अपकीर्ति लोकांमध्यें झाल्यावांचून रहात नाहीं. आणि—

" संभावितस्य चाकीर्तिर्मरणादतिरिच्यते "

(म्हणजे) संभावितास अकीर्ति मरणापेक्षांही अत्यंत दुःसह होते.

कधीं कधीं एका असत्य भाषणाची संपादणी करण्याकरितां पदोपदीं असत्य भाषण करावें लागतें. असें झालें म्हणजे तो सर्व असत्याचा व्यवहार कोणत्यातरी द्वारानें सर्वांस कळतो. मग त्या असत्यमालिकेवर अवलंबून राहाणाऱ्या मनुष्याची जी दुर्दशा होते तीस पारावार नाहीं. एकदां मनुष्यास असत्य भाषणाची संवय लागली, व त्यापासून होणाऱ्या क्षणिक लाभाची लालूच लागली, म्हणजे त्यापासून होणाऱ्या भयंकर अनर्थपरंपरेचें मुळींच भान नाहींसें होतें. त्यायोगें तो एखाद्या वेळीं न्यायाच्या स्थानींही सत्यभाषणाची प्रतिज्ञा करून असत्य बोलतो, व कालवशात् प्रतिज्ञाभंगाच्या पेंचात सांपडून दंडास किंवा कारागृहवासास पात्र होतो. हा सर्व परिणाम एका असत्य भाषणाचा. कदाचित् एकादा असत्य व्यवहार लोकांच्या दृष्टोत्पत्तीस न आला तरी असत्य भाषण करणाराची मनोदेवताच उग्र रूपानें त्याच्या मनापुढें नीरंतर उभी असते; व त्यास भय, चिंता, पश्चात्ताप इत्यादि मानसिक क्लेश, जे बाह्य क्लेशांहूनही अत्यंत दुःसह, व ज्यांच्या पीडेनें मनुष्य कधीं कधीं अत्यंत प्रिय जो आपला प्राण त्याचाही त्याग करावयास सिद्ध होतो, ते अखंड भोगावे लागतात. मनुष्यास प्रथम वाटतें की आपलें असत्य दुसऱ्या कोणास कळलें नाहीं म्हणजे झालें. परंतु सर्वजगद्व्यापक, सर्व-साक्षी परमात्मा आपल्या अंतःकरणांतील पुण्यपापें कितीही सूक्ष्म असलीं तरी पाहतो, व तो आपल्या असत्य व्यव-

हाराचें कठोर शासन कधीं तरी करीलच करील, हें त्याच्या ध्यानांत येत नाहीं. परंतु त्याची मनोदेवता भयंकर रूपानें त्यासमोर उभी राहिली, म्हणजे मग त्याचे डोळे उघडतात. यास्तव

' नहि तीव्रतरं किंचिदनृतादिह विद्यते '

' असत्याहून तीव्र असें घातुक शस्त्र दुसरें कोणतेंच नाहीं ' असें जें म्हटलें आहे, तें अगदीं यथार्थ आहे. तसेंच

" नास्ति सत्यसमो धर्मो न सत्याद्विद्यते परम् "

' सत्यासारखा दुसरा धर्म नाहीं, सत्याहून कांहीं श्रेष्ठ नाहीं, ' हेंही सर्वथा निर्विवाद आहे. सत्य भाषण करणाराचें मन किती शांत, किती निश्चित, किती निर्भय असतें व त्याची बुद्धि किती प्रांजळ, त्याची मुद्रा किती सोज्ज्वल, आणि त्याचें वर्तन किती सरळ असतें ! सत्य हें परमेश्वराचें नाम. सत्य हें ज्ञानाचें सार. सत्य हें बुद्धीचें स्वरूप, मनाचें शुद्धिसाधन, वाणीचें तप होय. असा ज्या सत्याचा महिमा त्याचा अपलाप करणारा चोरांमध्यें गणण्यास योग्य होय. म्हटलें आहे,—

" योन्यथा सन्तमात्मानमन्यथा प्रतिपद्यते ।
किं तेन न कृतं पापं चौरेणात्मापहारिणा ॥ "

" जो मनांत एक असून बाहेर दुसरें सांगतो तो आत्मापहारी जाणावा. त्यानें कोणतें पाप केलें नाहीं !" यास्तव कायावाचामनेंकरून सत्य भाषण करणें हें शिरोव्रत मानून त्याचें निष्ठेनें परिपालन करावें.

" समूलोवा एष परिशुष्यति यइह अनृतमभिवदति ॥"

" जो ऐहिक व्यवहारामध्यें असत्य भाषण करितो तो कीड लागलेल्या एकाद्या वृक्षाप्रमाणें समूळ नाश पावतो. कारण

" सत्यमेव जयते । नानृतम् ।
सत्येन पंथाविततो देवयानः ॥"

कधीं ना कधींतरी सत्याचाच जय होतो; असत्याचा अ-खेरीस कधींही जय होत नाहीं. सत्याचेच योगानें देवलोकाला जाण्याचा मार्ग मोकळा होतो. म्हणून ज्यास आपलें ऐहिक व पारत्रिक कल्याण व्हावें अशी इच्छा आहे, त्याणें आपल्या सर्व व्यवहारांत नित्य सत्याचेंच अवलंबन करावें.



धर्माचरण.

" धर्मं चर । "

' सत्यं वद ' याच्याच पुढें ' धर्मं चर ' म्हणजे धर्माचें आचरण कर, ही आज्ञा शास्त्रांत गुरूनें शिष्यास सांगितली आहे. प्रपंचामध्यें मनुष्याच्या मनोवृत्तीस मोह पाडून नानाप्रकारच्या अपायकारक मार्गाकडे आकर्षून नेणाऱ्या वासना वेळोवेळीं उपस्थित होतात. जर मनुष्यें सर्वथा त्यांच्या आधीन होऊन वर्ततील तर पदोपदीं त्यांचें अकल्याणच होईल. तें न व्हावें एतदर्थ परम कृपाळू जगत्पिता जो परमेश्वर त्यानें प्रत्येक मनुष्याच्या अंतःकरणांत सदसद्विवेकाचें बीज ठेविलें आहे. ज्ञानानें व अनुभवानें त्या बीजाचें पोषण होऊन, त्यास अंकूर फुटून, विवेकरूपी वृक्ष होतो; व तो सत्संगतीनें विस्तृत होऊन सदाचरणरूपी उत्तम फलपुष्पांनीं सुशोभित होतो. जसें जसें ज्ञान वाढत जातें, तसतसा त्या ज्ञानाच्या विषयांपैकीं चांगलें कोणते, वाईट कोणते, कल्याणकारक कोणते व अकल्याणकारक कोणते, याविषयीं विवेक उत्पन्न होतो; व जसजसा या विषयांपासून घडून येणाऱ्या कल्याणकारक किंवा अकल्याकारक परिणामांचा अनुभव येत जातो, तसतसा हा विवेक विशेष विकास पावतो. मग निश्चय करून जें कल्याणकारक तेंच करावयाचें, व जें अकल्याणकारक तें वर्जावयाचें, अशा प्रकारें मनुष्यांकडून वर्तन होऊं लागलें म्हणजे तो विवेक सदृढ होतो. जसे व्यायामानें शरीराचे अवयव

सुदृढ होतात, व तदभावीं ते निर्बळ होतात, त्याप्रमाणेंच मानसिक शक्तींची गोष्ट आहे. म्हणून प्रत्येक कार्यामध्यें विवेकाचा उपयोग करून मनुष्यानें वर्तन केलें, म्हणजे तो विवेक गुण वाढत जातो. जर त्याकडे दुर्लक्ष केलें तर तो दुर्बल होत जातो. परंतु तदनुसारें बहुप्रयत्नानें वर्तन केलें असतां तो आपला अत्यंत साह्यकारी व सुखदाता असा मित्रच होतो. जसा खरा मित्र आपल्यास अंतःकरणपूर्वक साह्य करितो, व सुख देतो, त्याप्रमाणेंच विवेकरूपी मित्र आपल्यास कल्याणाच्या मार्गानें वर्तण्याचे कामांत साह्य करितो. इतकेंच नाहीं, तर त्याचें साह्य घेऊन तदनुसारें चालणें हें सुखकारकही वाटतें. याप्रमाणें ज्यांच्या अंतःकरणांत विवेक सुदृढ असून नित्य जागृत राहातो, त्या मनुष्यांचें जें वर्तन तेंच धर्माचें मूळस्वरूप होय. म्हटलें आहे:—

"सतांहि संदेहपदेषु वस्तुषु
प्रमाणमंतःकरणप्रवृत्तयः"

"जे सुजन आहेत त्यांस आपल्या जागृतविवेकयुक्त अंतःकरणाची प्रवृत्ति हीच एकाद्या कृत्याच्या धर्मत्वाविषयीं किंवा अधर्मत्वाविषयीं निर्णायक होते." असे जे पुरुष ते शिष्ट;त्यांचा जो आचार तो शिष्टाचार; आणि धर्मशास्त्रकर्त्यांनीं शिष्टाचार हा धर्मत्वेंकरून जो ग्रहण केला आहे तो याच दृष्टीनें. अतएव सामान्यतः आपल्यास जेव्हां एखाद्या कार्याच्या धर्माधर्मत्वाविषयीं शंका उत्पन्न होईल, त्यावेळीं जे कोणी आपल्या

आसपास विचारवान् व धर्मपरायण, सौम्यवृत्ति, अस्वार्थबुद्धि असे मनुष्य असतील, त्यांपाशीं जाऊन निर्णय विचारावा; म्हणजे ते आपल्या विवेकशक्तीच्या बळानें आपल्यास धर्म म्हणजे कल्याणकारक मार्ग कोणता हें सांगतील. असे जे पुरुष तेच महात्मे होत; धर्माविषयीं जो निर्णय करावयाचा तो अशांचेंच वर्तन पाहून केला पाहिजे. प्रत्येक मनुष्य केवळ आपल्या अशिक्षित तर्कानें हा निर्णय करूं शकत नाहीं. ईश्वरप्रणीत म्हणून ज्या श्रुति म्हणजे जे धर्मग्रंथ मानिले आहेत. त्यांमध्येंहि कित्येक गोष्टींच्या संबंधानें परस्परविरोध दिसतो. ऋषिप्रणीत धर्मशास्त्रामध्येंही याचप्रमाणें मतभेद आढळतो. तेव्हां धर्माविषयीं निर्णय कसा करावा ? अर्थात् जे धर्मपरायण महात्मे पुरुष, त्यांच्या अंतःकरणाची प्रवृत्ति व वर्तन यांच्या अनुरोधानेंच निर्णय केला पाहिजे. यक्षानें धर्मराजास जे प्रश्न केले आहेत, त्यांमध्यें 'कः पंथाः' म्हणजे योग्य मार्ग कोणता, अथवा धर्म कोणता, हा प्रश्न केला आहे त्यावर धर्मानें हें पुढील उत्तर दिलें आहे;—

"तर्कोऽप्रतिष्ठः श्रुतयो विभिन्ना
नैको ऋषिर्यस्य मतं प्रमाणम्।
धर्मस्य तत्त्वं निहितं गुहायां
महाजनो येन गतः स पंथाः"

"तर्क हा निराधार आहे; श्रुतीही भिन्न भिन्न आहेत; व धर्म सांगणाऱ्या ऋषींमध्येंही असा कोणी नाहीं कीं ज्याचें

मत सर्वांहून विशेष प्रमाणभूत मानावें. तस्मात् मनुष्याच्या बुद्धीचे ठायीं ईश्वरानें जें धर्मनिर्णायक विवेकरूपी तत्त्व बीजरूपानें ठेविलें आहे, तें ज्यांच्या बुद्धीमध्यें परिपूर्ण दशेस आलें आहे असे जे महात्मे पुरुष, ते ज्या मार्गानें वर्ततात तोच धर्माचा मार्ग होय,''असा शेवटीं निर्णय करावा लागतो. आतां महात्मे कोणास म्हणावें, याविषयीं वर विवरण केलेंच आहे. अशा प्रकारचे महात्मे पुरुष कोणत्याही एकाच काळीं किंवा एकाच राष्ट्रांत निष्पन्न होतात असें नाहीं; व त्यांच्या उक्ति व चारित्रें कोणत्याही एकाच भाषेंत आहेत असेंही नाहीं. सर्व भाषांमध्यें अशा सत्पुरुषांचीं बोधपर वचनें आहेत. त्या सर्वांच्या अनुभवास आलेलीं जीं धर्मतत्त्वें तींच मुख्य धर्मतत्त्वें होत. मनुष्यमात्राचें वर्तन प्रथम जें धर्माविषयीं थोडें बहुत प्रवृत्त होतें तें आपल्या स्वतांच्याच विवेकांकुरानें होतें. त्याच्या दृढीकरणार्थ भिन्न भिन्न देशांतील ज्ञानी व विवेकी पुरुषांनीं आचार व विवेक या दोहींकडे लक्ष्य देऊन जें धर्माचें स्वरूप सांगितलें आहे, तें धर्मशास्त्र. मनुष्याच्या धर्माचरणाविषयीं दुसरें प्रमाण तेंच होय. त्यांमध्येंही परस्पर विरोध आढळून मनुष्याच्यानें निर्णय न होई, तर तत्कालीन जे सुजन, महात्मे, व धर्मपरायण म्हणून प्रसिद्ध असतील, ते विचार करून जें धर्माचें स्वरूप सांगतील तें तिसरें प्रमाण होय. अशा प्रकारें तिन्ही प्रमाणाच्या कसोटीस उतरून जें श्रेयस्कर ठरेल तोच धर्म.

श्रीमद्भगवद्गीतेंत धर्म म्हणजे अवश्य कर्तव्य कर्म, याचें स्वरूप तीन प्रकारचें सांगितलें आहे. ते प्रकार यज्ञ, दान, व तप हे होत. इतर काम्य कर्में, म्हणजे कांहीं एक हेतु-पुरःसर करावयाचीं कर्में, पाहिजेत तर करावीं किंवा न करावीं. त्यांच्या आचरणांविषयीं मनुष्य स्वतंत्र आहे. परंतु पूर्वोक्त तीन प्रकारचा धर्म मनुष्यमात्रानें अवश्य आचरिला पाहिजे. यज्ञ म्हणजे देवाचें आराधन, दान म्हणजे परोपकार व तप म्हणजे आपलें शरीर व वाणी व मन हीं तिन्हीही निर्मळ व नम्र व शांत अशीं ठेवणें, हे धर्माचे तीन प्रकार होत. आपल्या ज्ञानानुरूप आपल्यास जें दैवत उपास्य असें वाटेल, त्याचें स्मरण, मनन, ध्यान, शरणागति, आत्मनिवेदन, भजन इत्यादि आध्यात्मिक उपचारांनीं आराधन करणें हाच यज्ञ होय. आपल्या देशांत प्रथम सूर्य, अग्नि, वायु इत्यादि जीं बाह्य इंद्रियगोचर तत्त्वें तींच दैवतें असें वाटून त्यांचें आराधन करण्याची जी क्रिया तिला यज्ञ हे नांव प्राप्त झालें. परंतु पुढें जसजसा आपल्या लोकांच्या बुद्धीचा विकास विशेष झाला, आणि ज्ञान पूर्ण दशेस येऊं लागलें, तसतसा हीं सूर्यादिक बाह्यतत्त्वें केवळ जडतत्त्वें होत, या सर्वांचा अंतर्यामी असा एकच देव होय, असा बोध मनुष्यांस होऊं लागला; व या देवास परब्रह्म म्हणजे सर्वव्यापक महत्तत्त्व, परमात्मा म्हणजे सर्वव्यापक चित्तत्त्व, किंवा परमेश्वर म्हणजे सर्वांचे नियमन करणारें तत्त्व, अशीं नांवें त्यांणीं दिलीं. असा जो देव तो अमूर्त

असल्यामुळें त्याचा यज्ञ म्हणजे पूर्वोक्त जें स्मरणादि रूपानें आराधन सांगितलें तेंच होय. तेव्हां यज्ञ म्हणजे ईश्वराराधन असेंच विचारांतीं म्हटलें पाहिजे. भगवद्गीतेमध्यें ज्ञानयज्ञाची व जपयज्ञाची जी प्रशंसा केली आहे ती याच दृष्टीनें केली आहे. असो; हा जो ईश्वराराधनरूप यज्ञ तो आपल्यास नित्य अवश्य केला पाहिजे. हें धर्मसंबंधी आपलें प्रथम कर्तव्य होय. दुसरें धर्मसंबंधीं आपलें कर्तव्य मनुष्यमात्रांवर यथाशक्ति परोपकार करणें हें होय. यासच खरें दान म्हणावें. हा दानरूपी धर्मही आपल्यास नित्य केला पाहिजे. तिसरें धर्मसंबंधीं कर्तव्य यत्नेंकरून आपलें शरीर निर्मळ, आपली मुद्रा अंतःकरणांतील भावानुरूप सरळ, व आपले मस्तक जे आपल्यास पूज्य, मान्य, व ज्यांचा सत्कार आपल्यास केला पाहिजे अशा सर्वांपुढें नम्र ठेवणें, हें शरीरसंबंधीं कर्तव्य होय. तसेंच आपली वाणी सत्यनिष्ठ, हितकारी, मधुर, व धर्मग्रंथांच्या विवादाविषयीं तत्पर ठेवणें. हें वाणीसंबंधीं आपलें अवश्य कर्तव्य होय. तसेच मन सर्व मलिनवासनाविरहित, शांत, सौम्य, व विवेकयुक्त ठेवणें, हें मनाच्या संबंधानें आपलें अवश्य कर्तव्य होय. या त्रिविध कर्तव्याचेंच तप हें नांव होय. याप्रमाणें यज्ञदानतपोरूपी जो धर्म, तो आपल्यास नित्य अवश्य आचरिला पाहिजे. " धर्मान्न प्रमादितव्यम् " म्हणजे धर्माचरणाविषयीं आळस किंवा दुर्लक्ष्य करितां कामास नये. कारण " धर्मात्परं नास्ति " धर्माहून दुसरें कांहीं श्रेष्ठ नाहीं. " धर्मः सर्वेषां

भूतानां मधु " धर्म सर्व प्राणिमात्रांस कल्याणकारक आहे, व जे निष्ठेनें त्याचें आचरण करितात त्यांस सुखावहही होतो. आपला खरा आप्त एक धर्मच होय. म्हटले, आहे " एक एव सुहृद्धर्मो निधनेऽप्यनुयाति यः । शरीरेण समं नाशं सर्वमन्यद्धि गच्छति ॥ " धर्महाच एक खरा सुहृद् होय, कारण मरणानंतरही तो आपल्याबरोबर येतो; इतर सर्व कांहीं शरीराबरोबर आपल्यास नाहींसें होतें. तसेंचः—

" धर्मएव हतो हन्ति धर्मो रक्षति रक्षितः ।
तस्माद्धर्मो न हंतव्यो मा नो धर्मो हतोऽवधीत् ॥

जर धर्माचा तिरस्कार आपण केला तर तो आपला नाश करितो; जर त्याचें आपण रक्षण केलें तर तोही आपलें रक्षण करितो; म्हणून धर्मानें आपला नाश करूं नये यासाठीं आपणही त्याचा नाश करूं नये. धर्मास अनुसरून आचरण नित्य ठेविलें पाहिजे. आपण पूर्ववय केवळ सुखोपभोगांत घालवून उत्तरवय धर्माचरणांत घालवूं, असें म्हणणें हा मूर्खपणा होय. कारण

" न धर्मकालः पुरुषस्य निश्चितो
न चापि मृत्युः पुरुषं प्रतीक्षते ।
सदैव धर्मस्य क्रिया तु शोभना"
यदा नरो मृत्युमुखेहि तिष्ठति ॥

मनुष्यानें धर्माचरण अमुक वयांत करावें, अथवा अमुक वेळेस करावें, किंवा तो तसें करूं शकेल, असा मुळींच नेम नाहीं.कारण मनुष्य नेहमीं काळाच्या मुखांत असल्याप्रमाणेंच आहे. आणि मृत्यु प्राप्त झाला असतां तो कधींही क्षणमात्र थांबावयाचा नाहीं. यास्तव मनुष्यानें नेहमींच धर्माचरण निष्ठ असलें पाहिजे.



अध्ययनपरता.

" स्वाध्यायान्मा प्रमदः "

" सत्यं वद," " धर्मं चर," या आज्ञांच्या पुढेंच " स्वाध्यायान्मा प्रमदः " म्हणजे अध्ययनाविषयीं आळस करूं नको ही आज्ञा आहे. अध्ययन समाप्त करून विद्यार्थी आपल्या घरीं जावयास निघाला असतां गुरूनें त्यास ही आज्ञा केली आहे. यावरून एकवार अध्ययन समाप्त झालें तरी पुढें त्याविषयीं दुर्लक्ष होतां कामास नये, असा गुरूचा स्पष्ट अभिप्राय दिसतो. मनुष्य प्रपंचांत निमग्न झाला म्हणजे नानाविध कर्त्यव्यव्यग्रतेमुळें बहुयत्नेंकरून सद्गुरूपासून संपादिलेली विद्या, जिच्या योगानें ज्ञान निर्दोष होतें, विवेक जागृत राहातो, धर्माचरणाविषयीं प्रवृत्ति होते, दुराचारापासून निवृत्ति होते, शाश्वत सुख व अशाश्वत सुख यांचें तारतम्य चित्तांत बागतें, दैवी संपत्तीची प्राप्ति होते, व पारमार्थिक कल्याणाच्या श्रेष्ठत्वाविषयीं बुद्धि निश्चयात्मक होते, ती विद्या मलिन होण्याचा फार संभव असतो; व ती मलिन झाली असतां तिजपासून होणारीं पूर्वोक्त अमूल्य फलें हळूहळू नष्ट होण्याची मोठी भीति असते. तसें न व्हावें म्हणून गुरूनें शिष्यास घरीं गेल्यावरही अध्ययनाविषयीं तत्पर राहावें अशी आज्ञा केली आहे. तिचें तात्पर्य हें कीं, आप्त केलेल्या विद्यांचें यथावकाश पुनः पुन्हा पठन व मनन करीत असावें; व त्या दुसऱ्यासही

शिकविण्याचा प्रसंग आला असतां अवकाशानुसार दुसऱ्यांसही यथाशक्ति शिकवाव्या.

'स्वाध्यायप्रवचनाभ्यां न प्रमदितव्यम्'

अधिक विद्यांचें पठनपाठनांकडे दुर्लक्ष करूं नये.

'तद्धि तपः'

तेंच तप होय, म्हणजे जे विद्यासंपन्न झाले त्यांणीं चित्तशुद्धयर्थ मुख्यत्वेंकरून स्वाध्यायप्रवचनरूप आपलें कर्तव्य निष्ठापूर्वक करावें. प्राचीनकाळीं वसिष्ठवामदेवादि ऋषि, व्यासादि मुनि, व नारदादि महात्मे पुरुषही नेहमीं स्वाध्यायनिष्ठ असत, असें त्यांविषयीं वर्णन केलेलें आहे. याप्रमाणेंच त्या काळच्या सर्व विद्वानांची प्रवृत्ति असे. अर्वाचीन काळींही या व इतर देशांमध्यें जे खरोखरी मोठे विद्वान झाले आहेत,त्यांची सतत विद्याव्यासंगाविषयीं तशीच प्रासिद्धि आहे; आणि सतत व्यासंगावांचून विद्या फलावह व कार्यक्षम होत नाहीं. म्हणून खरे विद्वान असतात ते विद्येच्या संबंधानें आपल्यास कृतकृत्य असें कधींच मानीत नाहींत. जरी एखाद्या विद्येंत ते स्वतां पारंगत असले तरी तींतील विषयांच्या संबंधानें इतर विद्वानांचें काय मत आहे, ते त्याविषयीं काय लिहितात, हें पाहण्याविषयीं ते सदैव उत्सुक असतात. व कोणी कांहीं नवीन कल्पना काढिली, किंवा विचार सुचविला, तर त्याविषयीं ऊहापोह करून सत्यनिर्णय करण्याविषयीं ते नेहमीं तत्पर

असतात. त्यांतही जे सात्विकबुद्धिविशिष्ट असतात ते दुसऱ्यानें काढिलेली कल्पना किंवा सुचविलेली गोष्ट खरोखरीच नवी असली, तर तिचा नवीनपणा प्रांजळपणानें एकदम कबूल करितात; व त्या शोधाचे योगानें आपलें त्या विद्येविषयीं ज्ञान वाढलें याविषयीं आपली कृतज्ञताबुद्धीही दाखवितात. अशा पुरुषांच्या सतत व्यासंगानें निरनिराळ्या विद्याही दिवसानुदिवस अधिकाधिक पूर्णतेस येतात. या सर्व गोष्टींचा विचार केला म्हणजे मनुष्यमात्रानें आपण विद्यार्थी दशेंतून सर्वथा निघालों आहों असें कधींही मानितां कामा नये. जसें वापरलेलें हत्यार नेहमीं स्वच्छ व आपलें कार्य करावयास समर्थ असतें, तशीच विद्या सतत अभ्यासानें सतेज व करतलामलकवत असते; व एका विद्येमध्यें याप्रमाणें बुद्धि सतेज असली म्हणजे एखादी नवीन विद्या संपादन करणें झाल्यास ती अल्पायासानें साध्य करितां येते. याच रितीनें शंकराचार्यांसारखे, सायणाचार्यांसारखे भाष्यकार, व माधवासारखे, भट्टोजीदिक्षितासारखे व नागोजी भट्टासारखे सकल शास्त्रपारंगत निबंधकर्ते प्राचीच व आर्वाचीन काळीं होऊन गेले आहेत. या महान विद्वानांच्या अध्ययनव्यासंगाकडे लक्ष देऊन आलीकडील पाठशालांतून तयार होणाऱ्या विद्वानांनीं सतत आपला विद्याव्यासंग ठेविला पाहिजे. हें त्यांचें अवश्य कर्तव्य होय. हें त्यांणीं केलें तरच यापुढें पूर्वीप्रमाणें महापंडित या देशांत उत्पन्न होण्याची कांहीं आशा आहे.

वर जी वेदाचार्यांची आज्ञा सांगितली आहे ती आजकालच्या विद्यार्थ्यांसही पूर्णपणें लागू आहे. त्यांणींही पाठशाळा सोडल्यानंतर अध्ययनाविषयीं तत्पर राहिलें पाहिजे. त्याविषयीं आळस किंवा दुर्लक्ष करितां कामास नये. त्यांतही ज्यांस पारमार्थिक ज्ञान पूर्ण व्हावें अशी इच्छा असेल, त्यांणीं परमार्थबोधक जे उपनिषदें, भगवद्गीता इत्यादि ग्रंथ, त्यांचें नित्य परिशीलन केलें पाहिजे. तसें केलें तरच पारमार्थिक विषयांचें यथार्थ ज्ञान त्यांच्या अंतःकरणांत जागृत राहून परमार्थसाधनाविषयीं त्यांची प्रवृत्ति होईल. परमार्थबोधक ग्रंथ त्यांस येत असलेल्या भाषांमध्यें जे जे सांपडतील त्या सर्वांचें त्यांणीं यथाशक्ति अवलोकन केलें पाहिजे. तेणेंकरून त्यांची बुद्धि व्यापक व विचारक्षम होऊं शकेल. म्हणून त्यांणीं व इतर जे विद्याभिलाषी असतील त्या सर्वांनीं " स्वाध्यायान्मा प्रमदः " या गुर्वाज्ञेस अनुसरून आपल्यास इष्ट ज्या ज्या विद्या असतील त्यांचा नित्य व्यासंग ठेविला पाहिजे तरच त्यांचा विद्याप्राप्तीविषयींचा मनोरथ सिद्धीस जाईल.



आतिथ्य.

" अतिथिदेवो भव। "

" जो परस्थ पांथस्थ तुझ्या गृहीं येईल त्यास देवाप्रमाणें मानून त्याचा सत्कार कर " ही आज्ञा गुरुभक्तीविषयींची जी आज्ञा तिच्याच पुढें आहे. प्रसंगीं परस्परांचें साह्य करावें हा मनुष्यमात्राचा धर्म होय. पशुपक्षी देखील कोणी अन्य प्राणी प्रसंगवशात् आपल्या घरटयांत, किंवा बिळांत किंवा गुहेंत आला असतां त्याच्या उपयोगीं पडतात, याविषयींच्या गोष्टी क्वचित् ऐकण्यांत येतात, मग ज्ञानसंपन्न व विवेकसंपन्न मानवी प्राणी परस्परांच्या उपयोगीं पडले तर त्यांत आश्चर्य कोणतें ! प्रंचडवायू सुटला, अथवा पर्जन्याच्या धारा सुरू जाहल्या असतां किंवा निबिड अंधकार रात्रिकाळीं पडला असतां, पक्षी झाडाच्या ढोलींत किंवा दाट झाडींत कोठेंतरी आश्रयास जाऊन राहूं शकतात. कदाचित् आश्रय नच मिळाला तर त्यांची शरीररचना अशी असते कीं त्यांस थंडी, वारा इत्यादिकांपासून तादृश इजा होत नाहीं. परंतु मानवी प्राण्यांस कोठेंतरी घराचाच आश्रय पाहिजे. पशुपक्षी क्षुधेनें व्याकुळ जाहले असतां तृणादिकांचें भक्षण करून आपला निर्वाह करूं शकतात; परंतु मानवी प्राण्यांच्या क्षुधेची शांति सहसा अन्नावांचून होत नाहीं. म्हणून एकादा अनोळखी, परस्थ, पांथस्थ मार्गक्रमण करीत असतां, घरचा संपन्न असला तरी, जवळची शिधासामुग्री संपली तर त्यास एकाद्या वेळीं आप-

ल्यासारख्याच कोणा गृहस्थाकडे आश्रयासाठीं जावें लागतें क्षुधेची वेळ झाली असतां व तिचा परिहार करण्याकरितां किंवा मार्गांत रात्र जाहली असतां कोणाच्या घरीं तरी मुक्काम करावा लागतो. मग जो विपद्ग्रस्त असून ज्यास शिधा सामुग्री जवळ बाळगण्याचें विशेष साधन नसतें, आणि कार्यवशात् प्रवास तर करावा लागतो, अशा मनुष्यास परठिकाणीं आश्रयास जाण्याचा वारंवार प्रसंग येतो. त्यांतही जे कोणी कांहीं रोगानें पीडिलेले असून त्यांस प्रवास करणें भाग पडल्यासुळें मार्गांत अशा संकटांत पडतात, त्यांस तर मोठी मजल करण्याचें अवसान नसल्यामुळें वारंवार ठिकठिकाणीं कोणा तरी गृहस्थाच्या घरीं क्षुधातृष्णाशांत्यर्थ व श्रांत जहालेल्या शरीरास विश्रांति देण्याकरितां जावें लागतें. अशा अनेक प्रकारच्या कारणांनीं प्रसंगवशात् जो कोणी पांथस्थ आपल्या घरीं येईल त्यास सत्कारपूर्वक आनंदानें आश्रयास जागा देऊन, यथाशक्ति भोजनादि उपचारांनीं त्याची क्षुधा, तृषा व श्रम यांचा परिहार करणें, हा केवढा धर्म आहे बरें! म्हटलें आहेः—

" अरावप्युचितं कार्यमातिथ्यं गृहमागते;
छेत्तः पार्श्वगतां छायां नोपसंहरति द्रुमः "

म्हणजे आपल्या घरीं आपला शत्रु देखील प्रसंगवशात् आश्रयास आला तर त्याचें यथायोग्य रीतीनें आतिथ्य करून, सत्कार करावा. वृक्ष आपल्यावर कुऱ्हाड घालणाऱ्यावरही छाया करितो. ती

त्याजवरून काढून घेत नाहीं. हा सत्कार जो अतिथि ज्या अवस्थेंत असेल व त्यास ज्या गोष्टीची आवश्यकता असेल, तिकडे लक्ष्य देऊन यथायोग्य रीतीनें करावा.

" देयमार्तस्य शयनं परिश्रांतस्य चासनम्।
तृषितस्य च पानीयं क्षुधितस्यच भोजनं. "

जो शारीरिक व्याधीनें पीडित असेल तो आपल्या घरीं आला असतां प्रथम त्यास आंथरूण द्यावें; जो नुसता श्रमून आला असेल त्याला आधीं बसावयास आसन द्यावें; ज्याला तृषा लागली असेल त्याला प्रथम उदक द्यावें; ज्यास क्षुधा लागली असेल त्याला प्रथम अन्न द्यावें. याप्रमाणें शारिरिक पीडेच्या निवारणार्थ ज्या ज्या अतिथीला ज्या ज्या काळीं जें जें अत्यंत आवश्यक असेल तें तें पुरवून त्याचें समाधान करावें. मग तो स्वजातीय असो अथवा अन्यजातीय असो, स्वधर्मी असो अथवा विधर्मी असो. यथाशक्ति त्यास पूर्वोक्त रितीनें साह्य करणें हें आपलें मनुष्यमात्राचें अत्यंत श्रेयस्कर कर्तव्य होय.

आपला जीव जसा आपल्यास अत्यंत प्रिय, त्याचप्रमाणें इतरांसही त्यांचा जीव प्रिय असतो. सुखदुःखाचा अनुभव जसा आपल्यास तसा इतरांसही असतो. हें जाणून विचारी मनुष्यानें अतिथि प्राप्त झाला असतां त्याचा सत्कार करावा. पांथस्थ मार्गक्रमण करीत असतां श्रमून मध्याह्नकाळीं एकाद्या गांवाच्या समीप आला म्हणजे त्यास किती आनंद होतो, व आपण

एकाद्याच्या घरीं जाऊन विश्रांति घेऊन क्षुधेतृषेचा परिहार करूं अशी केवढी आशा धरून तो आपल्या घरीं येतो बरें ? अशा स्थितीमध्यें जो आपल्या घरीं येतो त्याचा यत्नेंकरून आपण सत्कार केला पाहिजे. तो अतिथि, एवढ्याच कारणानें आपल्या सत्कारास पात्र होय; मग तो कोणत्याही वर्णाचा किंवा जातीचा असो.

" चक्षुर्दद्यान्मनोदद्याद्वाचं दद्याच्च सूनृतां;
अनुव्रजेदुपासीत स यज्ञः पंचदक्षिणः "

आतिथीची क्षुधा, तृषा व श्रम यांचा परिहार करावा हें तर आपलें पहिलं कर्तव्यकर्म होय. परंतु त्याचा पूर्ण सत्कार करणें म्हणजे त्याजकडे आनंदित मुद्रेनें पाहावें, मनापासून त्याचा आदर करावा, मधुर वाणीनें त्यापाशीं भाषण करावें, आपला समागम त्यास सुखप्रद करावा, व तो आपला निरोप घेऊन जाऊं लागला असतां त्याच्या मागून चार पावलें जाऊन त्याची बोळवण करावी. हा अतिथियज्ञ होय; व पूर्वोक्त पांच प्रकारची त्याची सेवा ही त्या यज्ञाची पांच प्रकारची दक्षिणा होय. याप्रकारें अतिथीचा सत्कार करणें हें गृहस्थास अत्यंत श्रेयस्कर होय.

आतां अतिथि कोणास म्हणावें या गोष्टीविषयीं विचार केला पाहिजे. गांवांतल्या गांवांत आळसानें आपला काळ क्रमण करणारा, व चांगला सशक्त व सुदृढ असून आपल्या उदरनिर्वाहार्थ कांहींच यत्न न करितां दुपारच्या वेळीं कोणाच्या तरी

घरीं भोजनाच्या इच्छेनें जाणारा, तो खरा अतिथि नव्हे. किंवा परस्थ असूनही चांगला सशक्त व सुदृढ असतां आपल्या निर्वाहार्थ कांहीं उद्योगधंदा न करितां गांवोगांव फिरून आयली उपजीविका करणारा, तोही खरा अतिथि नव्हे. किंवा एकाद्या गृहस्थाच्या घरीं आल्यागेल्याचा सत्कार चांगला होतो म्हणून बुद्धिपुरःसर कधीं कधीं त्याच्या घरीं केवळ अन्नार्थी जाणारा, तोही खरा अतिथि नव्हे. खरा अतिथि तोच होय, कीं जो प्रसंगवशात् परस्थ व पांथस्थ असून केवळ नाइलाजामुळें प्रवासांत अकस्मात् एकाद्याच्या घरीं आश्रयास जातो.

वर जीं अतिथिसत्काराविषयींचीं वचनें सांगितलीं आहेत तीं अशा प्रकारच्याच अतिथीविषयीं होत. असा अतिथि मार्गामध्यें श्रांत होऊन अनोळखी ठिकाणीं आला असतां त्यास संतोषानें जो भोजनादिक समर्मण करितो, त्यासच खरी पुण्यप्राप्ति होते. ही अतिथिभक्ति थोडी बहुत सर्व देशांमध्यें प्राचीनकाळापासून चालू आहे; परंतु या देशामध्यें आपल्या आतिथ्याविषयीं लोकांच्या मनामध्यें जितकी निष्ठा आहे तितकी अन्यत्र कोठें असल्याचें ऐकिवांत नाहीं. ज्यांनीं ज्यांनीं प्रवासाचा अनुभव थोडासा घेतला आहे, त्यांस आपल्या देशांत जेथें आदरानें आतिथ्य सत्कार होतो अशीं थोडकीं स्थळें आढळलीं असतील असें नाहीं. अशा स्थळीं घरांत कशीही अडचण असली, व एकाच वेळीं अतिथी कितीही आले, तरी त्यांचा कंटाळा न करितां यजमान यांचा यथाशक्ति सत्कार केल्यावाचून त्यांस जाऊं देत नाहीं.

आजकाल अदृश्य होत चाललेल्या पिढीच्या अंगीं हा मोठा स्तुत्य गुण आपल्या पहाण्यांत आलेला आहे. अलीकडे मात्र मनुष्यमात्रानें आपापल्या निर्वाहाची तजवीज करावी, व दुसऱ्यावर अवलंबून राहूं नये, ही जी अगदीं आवश्यक समजूत होत चालली आहे, त्या समजुतीच्या ओघांत हा अतिथिभक्तिरूप पूर्वोक्त गुण प्रायः एकप्रकारें नष्ठ होत चालला आहे, ही मोठी खेदकारक गोष्ट होय. अतएव ज्यांस आपल्या देशांतील प्राचीन प्रशस्त रूढी व आपल्या लोकांमधील प्राचीन काळापासून परंपरागत चालत आलेले सद्गुण यांचें संरक्षण व्हावें असें वाटत असेल, त्यांनीं प्रयत्नेंकरून "अतिथिदेवो भव" ह्या शास्त्राज्ञेचें यथाशक्ति पारिपालन करून, आपल्या देशांत विशेष प्रचारांत असलेला आतिथ्यरूप जो धर्म त्याचा सहसा लोप होऊं देऊं नये.

"न कंच न वसतौ प्रत्याचक्षीत तद्व्रतम्" आपल्या घरीं आश्रयास कोणी आला असतां त्यास परत लावूं नये, हें गृहस्थाचें व्रत होय.



सौम्यता अथवा शांति.

" ईश्वरी शहाणपण सौम्य असतें. "

आपल्या दृष्टीनें शहाणें असणें, लोकांच्या मताप्रमाणें शहाणें असणें, आणि ईश्वराच्या दृष्टीनें शहाणें असणें या तीन गोष्टी इतक्या परस्पर भिन्न आहेत कीं त्या क्वचितूच एकत्र असतात. पुष्कळ वेळां जो आपल्या दृष्टीनें शहाणा असतो, तो लोकांच्या अभिप्रायाप्रमाणें शहाणा ठरण्याचा फारच थोडा संभव असतो; आणि लोकांमध्यें एखादा मनुष्य शहाणा अशी ख्याति असली, तरी तो ईश्वराच्या दृष्टीनें शहाणा ठरेल असें खात्रीपूर्वक म्हणवत नाहीं. जसें लोकांत जें सुख म्हणून समजतात, तें ईश्वराच्या दृष्टीनें केवळ सुखच्छायेनें आच्छादिलेलें दुःखच होय; जसें लोकांमध्यें जी मानप्रतिष्ठा म्हणून समजतात, ती ईश्वराच्या अभिप्रायाप्रमाणें भूषण नसून केवळ दूषणच होय; तद्वत् लोकांमध्यें जें शहाणपण म्हणून समजतात तें ईश्वराच्या दृष्टीनें मूर्खपणच होय. धर्मग्रंथांत शिरोलेख ज्या ठिकाणीं आहे त्या ठिकाणीं पूर्वोक्त ऐहिक शहाणपणाचीं लक्षणें सांगितलीं आहेत, आणि त्याच्या व ईश्वरी शहाणपणाच्या लक्षणाचा परस्पर विरोध दाखविला आहे. त्यांपैकीं पहिलें कपटी मनुष्याचें शहाणपण, व दुसरें प्रामाणिक मनुष्याचें शहाणपण. एकाचा परिणाम स्वार्थ, व दुसऱ्याचा परोपकार. एक कलहप्रियता व तीव्र मत्सर यांनीं भरलेलें असतें; आणि दुसरें कृपा व सत्कार्यपरता यांनीं परि-

पूर्ण असतें. ईश्वरी शहाणपणाच्या लक्षणांमध्यें एक मुख्य लक्षण सौम्यता म्हणून सांगितलें आहे, त्याविषयीं मी आतां विवरण करणार आहें. याविषयीं विवरण करण्याचें विशेष कारण हें आहे कीं सौम्यतेविषयीं धर्मदृष्टीनें क्वचित्च विवेचन होतें; बहुतेक मनुष्यांची साहजिक समजूत अशी आहे कीं सौम्यता हा केवळ मूळ स्वभावांतर्गत चांगुलपणा होय; किंवा शिक्षणानें बुद्धिपुरस्सर संपादिलेल्या सभ्य रीतीच्या बाह्यांगांपैकींच एक अंग होय. तो म्हणजे धार्मिक मनुष्याच्या ठायीं अवश्य असणाऱ्या सद्गुणांपैकींच एक सद्गुण होय, व तो संपादन करणें हें आपलें कर्तव्य होय, असें फारच थोड्या लोकांस वाटतें. यास्तव मी प्रथम या सद्गुणाचें लक्षण सांगतों. नंतर तो आपण कां संपादन करावा याविषयीं कांहीं कारणें सांगून व्यवहारांत तदनुरूप आपलें वर्तन ठेवण्यांत उपयोगी अशा कांहीं सूचना करीन.

ज्यापासून कोणास उपद्रव झाला नाहीं तरी उपयोगही कांहीं होत नाहीं असा केवळ गरीब स्वभाव, तसेंच कांहीं एक मर्यादा न करितां दुसऱ्यांची आपल्यार्शी चालवर्तणूक कोणत्याही प्रकारची असली तरी तीस सादर असणें हा स्वभाव, या दोहोंत व खऱ्या सौम्यतेंत काय भेद आहे हें प्रथम मी सांगतों. उद्दाम व बळेंच आपल्याकडे अधिकार घेणारे आपला जो जो अपकार किंवा जें जें अनहित करतील, तें सर्व निमूटपणें त्यांस करूं देणें, असा जो केवळ गरीब स्वभाव, त्याचा धार्मिक

मनुष्यांमध्यें जे सद्गुण अवश्य असले पाहिजेत त्यांत मुळींच अंतर्भाव होत नाहीं. उलट अशा स्वभावापासून एकंदर लोकांचें साधारण सुख व त्यांतील व्यवस्था यांस मात्र अपाय होतो. दुसऱ्यांचीं मतें व त्यांची चालवर्तणूक यांस सर्व प्रसंगीं कांहीं एक मर्यादा न करितां अनुकूल होणें, अशा प्रकारचा मनमिळाऊ स्वभाव केवळ सद्गुण नव्हे इतकेंच नाहीं, तर तो एक प्रकारच्या दुर्गुणच होय;व त्यापासून दुसरेही पुष्कळ दुर्गुण उत्पन्न होतात. त्याच्या योगानें आपला सद्वर्तनाविषयीं दृढनिश्चय शिथिल होतो, लोकवृत्तीस अनुसरल्यानें आपल्याकडून पाप घडत असलें तरी आपण तसें करितों, आणि आपला सर्व स्वभाव कलुषित होतो. मनुष्यांच्या प्रस्तुत काळच्या सदोष चालीरीति सर्व प्रसंगीं मान्य करून त्यांस अनुसरावें असें जर कोणीं म्हटलें, तर तें त्याचें म्हणणें कबूल करणें यासारखें दुसरें कांहींच अकल्याणकारक होणार नाहीं. एकटें राहण्याचा प्रसंग आला तरी राहून निरनिराळ्या प्रसंगीं लोकमताविरुद्ध वर्तन केल्यावांचून धार्मिक मनुष्याच्या नीतीची निर्मलता व योग्यता रक्षण करणें हें अगदीं असंभवनीय आहे. यास्तव सौम्यतारूप सद्गुण जो आहे तो, आणि भेकड लोकांची नीच वृत्ति व आर्जवी लोकांचा हाजी हाजी करण्याचा स्वभाव, यांमधील भेद लक्ष्यपूर्वक जाणला पाहिजे. सौम्य मनुष्य केवळ भीतीनें आपला हक्क कधींही सोडीत नाहीं. दुसऱ्याचें आर्जव संपादन करण्यासाठीं तो महत्वाचें सत्य कधींही सोडीत

नाहीं. सौम्यतेचा मनाच्या दृढतेशीं कांहीं विरोध नाहीं. इतकेंच नाहीं, तर धैर्य आणि सद्वर्तनाविषयीं निष्ठा हे दोन्ही गुण सौम्य मनुष्याचे ठायीं असल्यावांचून त्याची ती सौम्यता कांहीं कामाची नाहीं. अशा प्रकारच्या दृढस्वभावावर सौम्यतेचा तजेला चढविला तरच त्याचा कांहीं उपयोग होईल.

सद्गुण व सत्य यांविषयीं जी निष्ठा तिच्या आड सौम्यता येत नाहीं. तिचा विरोध कठोरता व निष्ठुरता, अभिमान व पौरुष्य, आणि उद्दाम व जुलमी स्वभाव यांच्याशीं आहे. वास्तविक म्हटलें तर सौम्यतेचा अंतर्भाव भूतदया म्हणून जो मोठा सद्गुण त्यांत होतो. कारण तिच्या योगानें आपल्यास आपल्या मनुष्यजातीपैकीं कोणासही दुःख देणें आवडत नाहीं. त्यांचें दुःख पाहून जो कळवळा येतो, तो त्यांच्या अडचणी दूर करण्याविषयीं आपल्यास प्रवृत्त करितो. अक्रोध, त्यांणीं आपला अपकार केला असतां त्यांचा प्रत्यपकार करूं देत नाहीं. मार्दव आपल्या क्रोधादि क्रूर वृत्तींचें आकलन करितो. न्यायपक्षपातिता त्यांच्याविषयीं आपलीं मतें निष्ठुर होऊं देत नाहीं, आणि सौम्यता त्यांच्याशीं जी आपली वागवर्तणूक तिजमध्यें त्यांना वाईट वाटण्यासारखें, किंवा राग येण्यासारखें कांहीं होऊं देत नाहीं, व सर्व कृत्यांमध्यें त्यांजविषयीं सदयदृष्टि ठेवून मनुष्यजातीच्या सर्वसामान्य दुःखांचा भार कमी करण्याचा यत्न करिते. म्हणून तिची प्रवृत्ति मोठी व्यापक आहे. दुसऱ्या कित्येक सद्गुणाप्रमाणें ती कांहीं विशेष प्रसंगीं मात्र अद्भुत

होते असें नाहीं, तर इतर मनुष्यांशीं आपल्या सर्व प्रकारच्या व्यवहारांत तिचा व्यापार सतत चालू असतो. तिच्या योगानें लोकांशीं आपलें बाह्य वर्तन व भाषण यथायोग्य झालें पाहिजे आणि आपल्या सर्व प्रवृत्तींत तिचा संस्कार असला पाहिजे.

तथापि मनुष्यांच्या परस्पर व्यवहारांत जो कृत्रिम आदर दाखविण्यांत येतो, व रितीभातींत बुद्धिपुरस्सर जें मार्दव दाखविण्यांत येतें, ज्याविषयीं लोकव्यवहारांत मनुष्यास सहज शिक्षण मिळतें, त्यांत आणि ईश्वरी शहाणपणानें युक्त अशी जी सौम्यता तींत जो भेद आहे तो विसरतां कामा नये. याविषयीं तुह्मांस सावध करणें मला अवश्य वाटतें. हे कृत्रिम गुण अगदीं हलकट व ज्ञानशून्य अशाही मनुष्यांमध्यें असूं शकतात. पुष्कळ वेळा कपटी लोक दुसऱ्यांस फसविण्याच्या कामीं त्यांचा उपयोग करितात; तसेंच कठोर व निर्दय असे लोक आपल्या ठिकाणीं हे गुण आहेत असें दाखवून त्यांच्या योगानें आपल्या मनाची नीचता झांकितात. येथें प्रसंगानुसार हें सांगणें अवश्य आहे कीं, या वरील लोकांच्या उदाहरणावरूनही जनांस सद्गुणाला मान कसा द्यावा लागतो हें दिसून येतें. मनुष्यांना परस्परांचा सहवास सुखावह होण्यासाठीं साक्षात् सद्गुण अंगीं नसला तरी तो आपल्या अंगीं आहे असें वरपांगीं दाखवावें लागतें. सद्गुणाला सर्व लुब्ध होतात. ज्या ठिकाणीं त्याचा वास्तविक अभाव आहे, त्याठिकाणीं नुसती त्याची छाया असली तरी ती प्रिय होते. अथवा

ज्याच्यामध्यें वास्तविक सद्गुण नाहीं, त्याचा नुसता देखावा देखील आवडतो. सद्गुणाच्या बाह्य स्वरूपाचें अनुकरण करणें ही एक कलाच झाली आहे; आणि लोकांच्या परस्पर व्यवहारामध्यें ज्यांस इतरांपासून आपल्यास मान मिळावा किंवा त्यांचीं अंतःकरणें आपल्यास अनुकूल व्हावीं अशी इच्छा असते, त्यांना न्यायपक्षपाती, सौम्य, व सदय, अशा मनुष्यांची बोलण्याची पद्धत व रीतभात प्रथम शिकावी लागते. परंतु सुमनुष्याच्या अंगीं जी सौम्यता असते तिचें स्थान दुसऱ्या प्रत्येक सद्गुणाप्रमाणें अंतःकरणांत असतें. या संबंधानें मला इतकें सांगितलें पाहिजे कीं बाह्य रीतभात सुद्धां अंतःकरणापासून असली तरच ती लोकांस खरोखर प्रिय होते; कारण बाह्य आचरणांत कसेंही सोंग दाखविलें तरी त्याच्यायोगानें खरा स्वभाव सर्वकाळ लपवितां येत नाहीं. एकाद्या राजदरबारांत वागणाऱ्या मनुष्यानें चालीरितीच्या शिक्षणांत अत्यंत प्रवीणता संपादिली, तरी त्याच्या आचरणांत जी सभ्यता दिसून येते तिजमध्यें आणि सौम्य मनुष्याच्या आचरणांत असलेल्या स्वाभाविक सभ्यतेमध्यें लोकप्रियतेच्या दृष्टीनें जमीन अस्मानाचें अंतर असतें.

ज्याणें आपल्यास निर्माण केलें त्याविषयीं आपलें कर्तव्य आणि मनुष्यजातीचा सामान्य स्वभाव या दोन गोष्टींविषयीं विचार केला म्हणजे आपल्या अंतःकरणांत खरी सौम्यता उद्भूत होते. आपल्या अंगीं कोणतीं व्यंगें आहेत व आपल्यास को-

णत्या अडचणी आहेत यांविषयीं मनन केलें असतां आणि आपली स्थिति व आपलें कर्तव्य यांचा विचार केला असतां आपल्या अंतःकरणांत सौम्यता उदित होते. सौम्यता ही स्वाभाविक वृत्ति असून कर्तव्याविषयीं दृढनिश्चयानें वर्तलें असतां ती वाढून विशेष पूर्णतेस येते. ज्या मनुष्याच्या अंतःकरणांत सौम्यता असते त्याला दया सहज उत्पन्न होते, सर्व प्रसंगीं मनुष्यजातीविषयीं त्यास कळवळा येतो, आणि दुसऱ्यास जेणेंकरून यत्किंचित् दुःख होईल अशा कामीं तो माघार घेतो. त्याचें भाषण प्रेमयुक्त व वर्तन मार्दवयुक्त असतें, तो नेहमीं दुसऱ्यांच्या उपयोगीं पडण्यास व उलट त्यांच्या मनांत त्याच्या उपयोगीं पडावें असें असलें तर त्यांचें साह्य घेण्यास तयार असतो. तो नेहमीं मित्रांशीं ममतेनें, परकीयांशीं सौजन्यानें आणि शत्रूंशीं सहनशीलतेनें वर्ततो. सौम्य मनुष्याकडे अधिकार आला असतां तो बजावण्यांत त्याजकडून कठोरता होत नाहीं. त्याला कोणास ठपका देणें जरूर पडलें तर सदय अंतःकरणानें देतो, आणि दुसऱ्यावर उपकार करावयाचा तो सरळ व सविनय वृत्तीनें करितो. त्यास आपलें मत सांगण्याचा प्रसंग आला असतां तो आपल्याकडे मोठेपणा घेतल्यावांचून सांगतो, आणि कोणच्याही गोष्टींत त्याचा उत्साह मर्यादेबाहेर जात नाहीं. क्षुल्लक गोष्टींविषयीं भांडण्याची त्याला उत्कंठा नसते. दुसऱ्याचें म्हणणें खोडण्यास तो एकाएकीं प्रवृत्त होत नाहीं. आणि कोणासही दूषण देणें झालें तर तें तो फा-

रच विचार करून देतो. परंतु कलह मिटवून ऐक्य करण्याच्या कामीं तो तयार असतो. तो विनाकारण दुसऱ्याच्या कामांत हात घालीत नाहीं, अथवा त्यांच्या गुप्त गोष्टी माहित करून घेण्याकरितां बारकाईनें चौकशी करीत बसत नाहीं. सगळ्यापेक्षां दुसऱ्यांच्या दुःखाचा भार कमी करण्यांत त्यास आनंद वाटतो आणि दुःखाचा परिहार सर्वथा त्याच्यानें करवला नाहीं तरी निदान तो त्यांच्या अंतःकरणाचें समाधान करण्याचा तरी यत्न करितो. कदाचित् त्याच्यानें दुसऱ्याच्या उपयोगीं पडवलें नाहीं तरी तो निदान दुसऱ्यास भारभूत कधीं होत नाहीं. आपलें तेज लोकांत पडून त्यांचे डोळे दिपून जावे असें करण्यापेक्षां त्यांचा संतोष करण्याविषयीं तो यत्न करितो, व बुद्धिप्रभाव किंवा उच्च पद यांच्यायोगें मनुष्यास जो मोठेपणा येतो व जो कमी प्रतीच्या मनुष्यांत दुःसह होतो, तो सौम्य मनुष्याच्या अंगीं असला तर तो दुसऱ्याच्या दृष्टोत्पत्तीस येऊं नये याविषयीं सावधगिरी ठेवितो. येशू ख्रिस्ताच्या चरित्रामध्यें मनुष्यानें आपली वृत्ति व चालीरिती हीं कशीं ठेवावीं हें सांगतांना असें म्हटलें आहे कीं आपण एकमेकांचें ओझें उचलावें; जे आनंद करीत असतील त्यांसमागमें आनंद करावा; आणि जे शोक करित असतील त्यांच्याबरोबर शोक करावा. प्रत्येकानें आपल्या बांधवांचें कल्याण करून त्यांचा संतोष करावा; त्यांजवर ममता करावी आणि सदय हृदयानें त्यांशीं वर्तावें. त्यांचें दुःख पाहून कळवळावें व त्यांशीं

सभ्यतेनें वागावें, दुर्बळांस साह्य करावें आणि सर्व मनुष्यांशीं सहनशीलतेनें वागावें. इतरांविषयीं अशी वृत्ति आणि चालवर्तणूक असणें याचेंच नांव सौम्यता.

येथवर या सौजन्यांतर्गत सद्गुणाच्या स्वरूपाचें विवरण पूर्णपणें मीं केलें, आतां तो सद्गुण आपण कां संपादावा याविषयीं जें मला सांगावयाचें आहे तें सांगतों, आणि तदर्थ तुम्हांस अशी विनंति करितों कीं तुम्हीं आपलें ईश्वराविषयीं कर्तव्य, आपला मानवी प्राण्याचा परस्परांशीं संबंध व आपलें स्वतांःचें हित, यांविषयीं विचार करावा.

प्रथम तुम्ही ईश्वराविषयक जें आपलें कर्तव्य त्याविषयीं विचार करा. ईश्वराच्या कृत्यांकडे अवलोकन केलें असतां त्याचा महिमा व त्याचें वैभव हीं मुख्यत्वेंकरून मनांत येतात, परंतु तत्प्रणीत शास्त्र पाहिलें तर त्यांत विशेष गोष्ट ही दिसते कीं आपला महिमा पाहून मनुष्यांनीं भयचकित होऊं नये अशी देवानें लक्ष्यपूर्वक योजना केली आहे. देव दुःखितांचें समाधान करणारा आहे, एवढेंच त्यांत वर्णन नाहीं, परंतु एकादा थोर अंतःकरणाचा मनुष्य आपला मोठेपणा एकीकडे ठेवून आपल्यापेक्षां कनिष्ठांशीं जसा सौम्यवृत्तीनें वागतो, त्याप्रमाणें देव आपलें वैभव एकीकडे ठेवून भाग्यहीन मनुष्यांच्या उपयोगीं पडण्याची विशेषेंकरून तजवीज करितो. ख्रिस्तीशास्त्र म्हणतें की " जे दीन व पश्चात्तापयुक्त त्यांच्या समागमें तो राहातो; दुःखित मनुष्यें त्याला हाका मारितात तेव्हां तो दडून राहात नाहीं. भग्न झालेलीं अंतः-

करणें तो बरीं करितो. आणि त्यांच्या जखमांना उपचार करितो." जेव्हां जगाच्या तारणासाठीं त्याचा पुत्र आला, तेव्हां त्याच्या-मध्येंही त्याप्रमाणेंच नम्रता. सौम्यता व चांगुलपणा हे गुण विशेष दिसून आले. त्याच्या जन्मापूर्वी पुष्कळ दिवस आधीं त्याविषयीं असें भविष्य केलें होतें. कीं, " तो कोणाची बरोबरी करूं इच्छिणार नाहीं, कोणावर ओरडणार नाहीं, किंवा रस्त्यांत जाऊन मोठ्यानें बोलणार नाहीं; चेपलेला बोरू तो मोडणार नाहीं व धुमसत वात विझाविणार नाहीं. " आणि त्याच्या मरणानंतर त्याचा हा विशेष गुण सर्व लोकांस इतका आठवत असे कीं प्रेषित पाल यानें कोरिंथिअन लोकांस एका प्रसंगीं कांहीं विनंती केली आहे, तिजमध्यें ख्रिस्ताच्या नम्रतेनें व सौम्यतेनें मी तुम्हांस विनंति करितों, हे लक्ष्यांत ठेवण्यासारखें शब्द आहेत. मनुष्यांशीं त्याचें जें वर्तन असे त्यामध्यें कठोरपणा, अभिमान किंवा दर्प कधींही दिसून येत नसत. त्यापाशीं जाण्यास कोणासही प्रतिबंध नसे, त्याची चालवर्तणूक साधी असे; त्याचीं उत्तरें मृदु, आणि त्याचें सर्व वर्तन विनीत व परोपकारी असें असे. तो म्हणत असें कीं, माझें पाहून शिका, कारण मी सौम्य व अंतःकरणांत नम्र आहें. ज्याप्रमाणें ईश्वराचा पुत्र हा सौम्यतेचा नमुना आहे त्याप्रमाणें पवित्र आत्मा हृदयांत ती सौम्यता आविर्भूत करणारा आहे. त्यास समाधान करणारा आणि दया व शांति देणारा आत्मा असें म्हटलें आहे. मनुष्याच्या अंतःकरणास त्याच्यायोगानें जे

संस्कार होतात ते प्रेम, नम्रता, सौम्यता आणि सहनशीलता हे होत. त्याप्रमाणें ईश्वराच्या कोणत्याही स्वरूपाकडे दृष्टि देऊन पाहिलें तरी सौम्यता सर्वप्रकारें मान्य आहे. सौम्यता हा एक विशेष दैवी गुण म्हणून आम्हीं तो संपादन करावा असें सांगितलें आहे. आणि हें जें सौम्यतेचें स्वरूप त्याकडे मनुष्याचें लक्ष्य पोंचावें आणि तो गुण त्यांनीं संपादन करावा हें सांगणें शुभवर्तमानाचा मुख्य विषय आहे. तें सिद्ध करण्यासाठीं एखाद्या विशेष बोधवचनाचा उल्लेख एथें केला पाहिजे असें नाहीं. नवें शास्त्र उघडून पाहा, तुम्हांस असें दिसून येईल कीं त्यांत या सद्गुणाविषयीं बोध सतत केला आहे. भूतदया अथवा प्रीति याच गुणाकडे मुख्यत्वेंकरून आपलें लक्ष्य पोंचविलें आहे, आणि सौम्यता, अक्रोध व क्षमा याच शब्दांचे ध्वनि वारंवार त्या शास्त्रामध्यें आपल्या कानीं पडतात.

ख्रिस्ती धर्मामध्यें खरोखर या सद्गुणाचें इतकें माहात्म्य आहे कीं त्या धर्मापासून उत्पन्न होणारा जो सौम्यतेचा संस्कार तो मनुष्यांच्या दुर्गुणांनीं व दुराचरणांनीं देखील सर्वथा नष्ट झाला नाहीं. त्या धर्माचा लोकस्थितीवर जो परिणाम व्हावयाचा तो जरी अद्याप पूर्णपणें झाला नाहीं, तरी मनुष्यांच्या चालीरितींत जी सदयता आली आहे ती त्याचाच परिणाम होय हें उघड दिसत आहे. मनुष्यास अधोगतीस नेणारा जुलूम व निर्दयपणा या दोन दुर्गुणांचा अंमल ख्रिस्ती धर्माच्या प्रसारानें लोकव्यवहारांत किती कमी झाला आहे, याचा विचार केला

असतां आश्चर्य वाटल्यावांचून राहत नाहीं. जेथें जेथें ख्रिस्ती धर्म चालत आहे, तेथें तेथें गुलामागिरीस उत्तेजन न मिळतां कांहीं अंशीं तरी ती नष्ट झाली आहे. तसेंच मानवी जातीपैकीं निम्मे मनुष्यांवर राहिलेल्या निम्मे मनुष्यांची प्राचीनें काळींजी निंद्य व दुःसह सत्ता चालत असे, तिजपासून ख्रिस्ती धर्माच्या योगानें मानवी स्वभावाची मुक्तता झाली आहे. त्याच्या योगानें स्त्रीपुरुषांमध्यें सत्तेच्या संबंधानें विशेष समता आली आहे आणि विवाहसंबंध विशेष सुयुक्तिक व सुखावह झाला आहे. युद्धप्रसंगांत जी क्रूरता होत असे ती कमी झाली आहे. राजसत्तेचा कडकपणा व शिक्षेची निर्दयता हींही कमी झालीं आहेत. सारांश ख्रिस्ती धर्माच्या योगानें मानवी जातीचा प्राचीन काळचा रानटीपणा जाऊन तिला विशेष सदयतेची व सौम्यतेची स्थिति प्राप्त झाली आहे. आपण या धर्माविषयीं मान व आस्था दाखवितों काय ? जर दाखवीत असलों तर त्या धर्माच्या तत्त्वांस सर्वथा विरुद्ध असा जो कडकपणा व निर्दयपणा तो आपल्या अंगीं आपण राहूं दिला तर आपलें करणें योग्य होणार नाहीं. आपलें आचरण जर असें राहिलें तर त्यावरून आपल्या अंतःकरणावर त्या धर्माचा संस्कार मुळींच झाला नाहीं असें स्पष्ट दिसून येईल. लोक आपल्यास कदाचित् ख्रिस्ती म्हणवितील, परंतु त्यांच्या ठायीं ख्रिस्ती धर्माचा संस्कार मुळींच राहिला नाहीं असें स्पष्ट झाल्यावांचून राहणार नाहीं.

तसेंच तुमचा जो परस्परांशीं संबंध त्याचा विचार करा. एकटा एकांतांत राहाणारा मनुष्य फारच दुर्दैवी होय. जोंपर्यंत मनुष्य आपल्या मनुष्यजातीपासून दूर राहतो तोंपर्यंत त्यास सुख किंवा सामर्थ्य यांपैकीं एकही प्राप्त होणार नाहीं. आमचा स्वभावच असा बनविला आहे की आह्मीं एकमेकांशीं मिळून राहावें; आमच्या स्वभावांत एकमेकांविषयीं सदयवृत्ति आहेत, तिच्या योगानें आपलें मन परस्परांविषयीं आपोआप ओढतें. आपणा सर्वांस ज्या गोष्टींची गरज आहे त्यांसाठीं आपले परस्परांशीं सहस्रावधि संबंध जुळले आहेत. म्हणून सौम्यवृत्ति, जिला भूतदया हेंही नांव चागलें शोभतें, ती प्रत्येक स्थितींतल्या मनुष्यांच्याठायीं इतर मनुष्यांविषयीं अवश्य असली पाहिजे. आपल्याकडे दुसऱ्यांस येण्यास प्रतिबंध असणें किंवा त्यांविषयीं आपलें अंतःकरण कठोर असून त्यांपाशीं आपलें वर्तन तिरस्कारयुक्त असणें हें आपल्या स्वभावाविरुद्ध वर्तन करणें यासारखें आहे. अशा वर्तनास शास्त्रांमध्यें आपल्यासारख्या हाडामांसाच्या माणसांपासून दूर राहणें असें म्हटलें आहे. म्हणून सर्वांस असें वाटतें कीं आपल्याशीं इतरांनीं सौम्यतेनें व दयेनें वागावें. तसेंच ह्या वृत्ति दुसऱ्यांच्या ठिकाणीं नसल्या तर सर्वांस उघडपणें वाईट वाटतें. ही गोष्ट आपल्या मनास जितकी लागते तितकी दुसरी कोणतीही लागत नाहीं. आपलें ज्यांच्याशीं दळणवळण असतें, त्यांच्या कठोर व उद्धत वर्तनाचें जितकें आपल्यास वाईट वाटतें व त्याविषयीं दुसऱ्यापाशीं

जितकी आपण कुरकूर करितों तितकी दुसऱ्या कशाविषयींही करीत नाहीं. परंतु याचा दोष आपल्याकडे कोठवर येतो, किंवा आपण ज्या प्रहारांविषयीं एवढी मोठी कुरकूर करितों ते प्रहार आपल्यासारखाच सुखदुःखाचा अनुभव ज्यांस आहे अशा मनुष्यांवर करून कोठवर आपण स्वतां दोषी होतों याचा विचार आपण फारसा करीत नाहीं.

परंतु कदाचित् कोणी असें म्हणतील कीं ही जी सौम्यता जिचें मनुष्यांस अगत्य आहे असें तुह्मी म्हणतां तिचा केवळ आपल्या व्यवहारांतील बारिक सारिक कृत्यांशींच संबंध आहे व तीं कृत्यें धर्म व सद्गुण यांस आमच्या दृष्टीनें आवश्यक आहेत असें नाहीं. ते कबूल करितात कीं बारिक सारिक प्रसंगीं आपला स्वभाव व वर्तन यांचें नियमन करण्याच्या कामीं आमचें दुर्लक्ष होतें हें खरें, परंतु परोपकाराचीं जीं मोठीं कृत्यें तीं करण्याकडे आमचें लक्ष असतें, आणि प्रसंग आला असतां आपल्या मानवी बांधवांची महत्त्वाच्या गोष्टींत सेवा करण्यास आह्मी सिद्ध असतों, असा आव ते घालितात. परंतु अशा लोकांनीं असा विचार करावा कीं, मोठमोठीं सत्कृत्यें करण्याचे प्रसंग फारच क्वचित् येतात, कदाचित् त्यांचीं स्थिति व त्यांचा इतरांशीं संबंध याचे योगानें प्रायः त्यांस अशा प्रकारचे प्रसंग येणारच नाहींत. मोठ्या प्रसंगीं मोठ्या सद्गुणांस अवसर मिळतो हें खरें. परंतु मनुष्यांच्या व्यवहारांत, मुख्यत्वेंकरून बारिक सारिक गोष्टींचाच भरणा असतो. याच बारिक

सारिक गोष्टींवर बहुतेक मनुष्यांचें सुख दुःख अवलंबून असतें व आपलें कर्तव्य करण्याचे प्रसंग अशाच गोष्टींत त्यांस येतात, आणि आपल्या सद्गुणाची कसोटीही त्यांतच होते. सद्गुणाचें पालन व रक्षण आपल्या नेहमींच्या व वारंवार घडणाऱ्या उद्योगानें केलें पाहिजे; तें आपल्याकडून क्वचित् प्रसंगीं घडणाऱ्या कृत्यांनीं होऊं शकत नाहीं. सद्गुण सुदृढ व वेळेवर उपयोगीं पडण्यासारखा होण्यास त्याचा व्यापार सतत घडत असला पाहिजे. तो धूमकेतूच्या प्रकाशाप्रमाणें क्वचित् प्रसंगीं प्रकट होऊन क्षणेक त्याचा प्रभाव दृष्टीस पडला तर तेवढ्यानें कार्य होत नाही. परंतु सूर्याचा प्रकाश जसा नियमितवेळीं नित्य होतो तसा त्याचा आविर्भाव नेहमीं योग्य प्रसंगीं झालाच पाहिजे. अथवा सुगंध वायु ज्याप्रमाणें कधीं कधीं आपल्या इंद्रियांस सुख देतो त्याप्रमाणें केवळ कधीं कधीं त्याची प्रवृत्ति होऊन उपयोग नाहीं. तर साधारण सर्वकाळ वाहणारा जो वारा, ज्याच्या योगानें हवा निर्मळ व आरोग्यकारक होते, त्यासारखी त्याची सततप्रवृत्ति व्यवहारांत असली पाहिजे

मोठीं परोपकाराचीं किंवा पुष्कळ लोकांस उपयोगीं पडणारीं कृत्यें करण्याची संधि आपल्यास मिळे तोंपर्यंत कदाचित् वर्षांचीं वर्षें निघून जातील. परंतु आपल्या सामान्य कृत्यांत व विशेषेंकरून आपल्या कुटुंबांतील मनुष्यांशीं जो आपला व्यवहार त्यांत दुसऱ्यांचें सुख वाढविण्याच्या आणि आपल्या ठायीं सद्वर्तनाची संवय दृढ करण्याच्या कामीं सौम्यतेचा उप-

योग करितां येत नाहीं असा एकही दिवस जात नाहीं. इतकेंच नाहीं, तर कधीं कधीं असें होतें कीं योग्य प्रसंगीं सदय वृत्तीनें वागून सुखवृद्धीला आपण जितके कारणीभूत होतों तितके केवळ दिखाऊ महत्त्वाचीं कृत्यें करून होत नाहीं. संसारांत असे पुष्कळ प्रसंग येतात कीं ज्यांमध्यें दुसऱ्यास आश्वासन वाटेल अशा रितीनें त्यांचें स्वागत करून किंवा आपला मोठेपणा बाजूस ठेवून आपल्यापेक्षां जे कनिष्ठ त्यांच्याशीं सलगीनें वागून अथवा नुसतें इतरांविषयीं आपलें समदुःखसुखित्व दाखवून त्यांच्या अंतःकरणाचें जितकें समाधान आपल्यास करितां येतें, तितकें एकादी मोठी देणगी देऊनही करितां येत नाहीं. उलटें दुसऱ्यावर उपकार करितांना आपण जर सौम्य वृत्तीनें वागलों नाहीं, तर तो उपकार करण्यांत आपला जे कल्याणकारक हेतु तो निष्फळ होतो. ज्यांवर उपकार करावा असें आपण इच्छितों, ते आपल्यावर रुष्ट होतात, आणि आपल्या बढाईमुळें व कठोरपणामुळें आपण जे उपकार म्हणून करितों ते उलटे अपकार होतात. असें आहे तर, ज्या वृत्तीवर जगाचें सुख इतकें अवलंबून आहे, तीस सद्गुणाच्या वर्गांत कनिष्ठ प्रतीची आहे असें आपल्यास मानतां येईल काय ?

खरोखर परस्परांस परस्परांपासून सुख होण्याचा मोठा मार्ग म्हटला म्हणजे सौम्यता होय. परस्परांमध्यें आपापल्या हिताच्या संबंधानें कलह उत्पन्न झाला असतां सौम्यतेच्या योगानें कलहाचा आवेश कमी होतो आणि ऐक्याचें बीज कायम

राहातें. द्वेषभाव कमी होतो. प्रेमभावाचें पुनरुज्जीवन होतें आणि सौम्य मुद्रा परस्परांच्या समाधानास कारण होते. पृथ्वीवर सौम्यता नाहींशी होऊं द्या, कठोर व कलहप्रिय मनुष्यांनीं जग व्यापलें जाऊं द्या, आणि मग लोकस्थिति कशी होते ती पाहा. अरण्यांतील एकांतवास देखील त्या स्थितीहून बरा वाटेल. सर्व भौतिकतत्त्वें अनिमित रितीनें परस्परांमध्यें मिसळून त्यांचे व्यापार परस्पर विरुद्ध चालावे अथवा एकाद्या गुहेमध्यें भूगर्भातून परस्परविरुद्ध असे वायूचे प्रवाह निघून एकमेकांवर आपटून त्यांचा प्रचंड ध्वनी निघावा, किंवा एकाद्या मोठ्या खळग्यांत असणाऱ्या सर्पांनीं एकमेकांवर फूत्कार करावे आणि अरण्यांतील श्वापदांनीं गुरगुरून एकमेकांवर धांवावें. असें झालें असतां जी भयंकर स्थिति होईल त्या स्थितीचें स्वरूप जगांतून सौम्यता नष्ट झाली असतां लोकस्थितीस येईल. अशी स्थिति पाहून सात्त्विक मनुष्यास जो उद्वेग होतो तो पुढें लिहिल्याप्रमाणें ख्रिस्ती शास्त्रांत वर्णिला आहे. "अरेरे, जर मला पारव्याप्रमाणें पंख असतील तर मी उडून जाऊन विश्रांति घेईन. पाहा ! अशा स्थितींतून फार दूर जाऊन मी अरण्यांत वास करीन. या अशा भयंकर वादळापासून लौकर सुटून जाईन. कारण शहरामध्यें राहाणाऱ्या मनुष्यांचा परस्परांशीं होणारे कलह व अत्याचार पाहणें माझ्या नशिबीं आलें आहे. त्यांच्यामध्यें परस्परांचे अपकार आणि दुःख या गोष्टी नांदत आहेत. वंचना व कपट हीं शहरांतून नाहींशींच होत नाहींत." काय

हा चमत्कार! मनुष्याचें सर्वसाधारण हित एक असून ते वारंवार अविचारानें त्या हिताचा नाश एकमतानें करितात. जणूं काय स्वभावताच मानवी स्थितीमध्यें पाहिजे तितका अपरिहार्य दुःखाचा संचयच नाहीं. जसें काय बाहेरील वादळाच्या आघातांपासून जी आह्मांस पीडा होते ती पुरेशी होत नाहीं, म्हणून त्या आघातांस चुकविण्यासाठीं ज्या लोकसमूहांत आपण एकमेकांस भेटतों, त्यांतही आपण एकसलग्यानें परस्परांस पीडा देतों. परंतु कर्तव्यबुद्धि आणि सर्वसाधारण हित संपादन करण्याची इच्छा या दोहोंच्या योगानें आपण ज्या सद्गुणांविषयीं विचार करीत आहों त्याची आवश्यकता पुरतेपणीं वाटत नसेल तर तुम्हांस मी विनंती करितों कीं तुम्ही आपल्या स्वतांच्या हिताचा तरी विचार करा.

सुमनुष्याचे हेतु कोणतेही असोत, ते सिद्धीस नेण्यास सौम्यता उपयोगीं पडते, असें कळून आल्यावांचून राहाणार नाहीं. सौम्यतेच्या योगानें आपल्याविषयीं प्रत्येक मनुष्याच्या अंतःकरणांत सद्भाव उत्पन्न होऊन तो आपल्यास अनुकूळ होतो. ज्या ठिकाणीं समजूत घालण्याच्या इतर युक्ती निष्फळ होतात त्या ठिकाणीं सौम्य वर्तनानें दुसऱ्याची समजूत पडते. सौम्यतेच्या योगानें जे क्रूरवृत्ति असतात त्यांचें क्रौर्य क्षीण होतें आणि कठोर अंतःकरणास देखील द्रव येतो. या उलट कठोर वर्तनानें जो विरोध आपल्या मनांतून दूर करावयाचा असतो तो उलटा दृढ होतो आणि उदासीन मनुष्य देखील वैरी होतो.

परस्परांचा स्वहितासाठीं कलह होत असतां एकाकडून दुसऱ्याचा अपकार घडला तरी तो कदाचित् तिकडे दुर्लक्ष्य करील; परंतु तिरस्कारयुक्त वर्तनानें त्याचा अपमान केला असतां पुष्कळ दिवसपर्यंत त्याचें अंतःकरण क्रोधाविष्ट राहून त्याविषयीं सूड घेण्याची इच्छा त्याच्या मनांतून जाणार नाहीं. परंतु ज्याच्या आंगीं सौम्यता आहे, त्याच्या ठायीं दुसरे सर्व सद्गुण आहेत अशीच प्रायः जगाची समजूत होते. सौम्यतेपेक्षां विशेष महत्त्वाचा असा बुद्धिप्रभाव एकाद्याच्या ठायीं आढळला तर आपल्या मनांत दुरून त्याजविषयीं आदर उत्पन्न होतो. परंतु या बुद्धिप्रभावाबरोबर वर्तनामध्यें एकाद्या प्रकारची अयोग्यता असली तर आपल्यास त्याविषयीं आदर वाटला तरी प्रेमभाव उत्पन्न होत नाहीं. तो बुद्धिप्रभाव आकाशांत दूर असणाऱ्या एकाद्या ताऱ्याप्रमाणें होय; आणि जसा तो तारा चमकत असूनही त्याचा प्रकाश आपल्या उपयोगीं पडत नाहीं, तद्वत् त्या प्रभावापासून आपल्यास कांहीं उपयोग होत नाहीं. परंतु सौम्यतेचा उपयोग कांहीं अंशीं तरी सर्वांस होतो, म्हणून ती सर्वांस आवडते. ज्यांच्या ठायीं सौम्यता आहे त्यांच्या बढतीस जगामध्यें कोणी आड येत नाहीं, आणि त्यांचा उत्कर्ष झाला असतां त्यांचा कोणी मत्सर करीत नाहीं. त्यांजवर संकटें किंवा विपत्ति आली असतां सर्वांस त्याबद्दल वाईट वाटतें, आणि त्यांच्यामध्यें कांहीं व्यंगें असलीं तर लोक त्यांकडे विशेष लक्ष देत नाहींत.

परंतु आपल्या बाह्यस्थितीवर ह्या सद्गुणांचा जो परिणाम होतो तो कसाही असला तरी आपल्या आध्यात्मिक सुखावर होणारा त्याचा परिणाम निश्चित आणि प्रबळ आहे. सौम्यतेच्या योगानें अंतःकरणास जी शांति येते ती प्रत्येक सुखवृत्तीस अत्यंत आवश्यक आहे. सौम्यतेच्या योगानें चित्त शांत, निर्मल, निश्चल व प्रफुल्लित असतें. अंतःकरणांत सात्विकभाव व सौम्यता यांची सत्ता असली म्हणजे बाह्यकारणांनीं तें क्षुब्ध होण्याची भीति फारच थोडी असते. कोणीही मनुष्य दृष्टीस पडो, कोणतीही गोष्ट दृष्टीस पडो, सौम्य मनुष्यास त्या मनुष्याचें किंवा त्या गोष्टीचें स्वरूप जितकें चांगलें दिसण्यासारखें असेल तितकें दिसतें. परंतु चित्तावर तिरस्काराचें किंवा क्रोधाचें पटल आलें असतां त्याची स्थिति बदलते. सृष्टीचें स्वरूप आपल्यास अगदींच निराळें दिसतें, आणि सर्व वस्तू अयोग्य दिसतात. सौम्य अंतःकरण हें एकाद्या शांत प्रवाहाप्रमाणें आहे; आणि त्या शांत प्रवाहांत प्रत्येक वस्तू आपला आकार, रंग व परिणाम इत्यादि गोष्टींच्या संबंधानें जशी दिसावी तशीच दिसते. असौम्यवृत्ति एकाद्या चंचल प्रवाहाप्रमाणें होय. त्या प्रवाहांत ज्या पदार्थांचें प्रतिबिंब पडतें ते विस्काळित व मोडलेले असे दिसतात, आणि स्वतांच्या चंचलतेच्या योगानें त्या प्रतिबिंबित पदार्थांसही तो प्रवाह चंचळता आणितो.

मनुष्यांमध्यें परस्परांकडून परस्परांचे अपकार होणारच. समुद्राच्या लाटा हालणें हें बंद होणें जसें दुरापास्त आहे, तद्वतच

मनुष्यांच्या दुर्बुद्धीच्या व दुर्वर्तनाच्या योगानें त्यांजकडून एकमेकांचे अपकार होण्याचें बंद पडणें हेंही दुरापास्त होय. जर कोणी त्याचा मोठा अपकार केला तर इतर मनुष्यांप्रमाणेंच मृदु व सौम्य मनुष्याचें मन देखील विकृत झाल्यावांचून राहावयाचें नाहीं, आणि तसें झालें असतां तो करवेल तेथपर्यंत त्या अपकाराचा प्रतिकार करून आपलें संरक्षण करील. परंतु आनंद मानण्यासारखी गोष्ट ही आहे कीं, ज्या क्षुल्लक गोष्टींनीं व अपकारांनीं इतरांचीं मनें वारंवार क्षुब्ध होतात, त्यांपासून सौम्य मनुष्याचें चित्त क्षोभ पावत नाहीं. यामुळें इतरांपेक्षां त्याचे दिवस फार शांतीनें व सुखानें जातात. कारण क्षुद्र मनुष्याचें मन ज्या असंख्य गोष्टींनीं क्षोभ पावतें त्यांपासून त्याचें चित्त क्षोभ पावत नाहीं. त्याच्या अंतःकरणांत उन्नतवृत्ति वास करीत असतात. मनुष्याचे साधारण दोष, अविचारी मनुष्यांच्या मूर्खपणाच्या कृती, चंचल बुद्धीच्या मनुष्यांचें पोरकट वर्तन व इतरांसंबंधीं आपल्या कर्तव्याकडे दुर्लक्ष करणारे त्या संबंधानें ज्या चुका करितात त्या सर्व चुका, या सर्व गोष्टींकडे सदय दृष्टीनें पाहण्याची त्यांस संवय असल्यामुळें जसा एकादा ईश्वरपरायण मनुष्य देवाच्या शांत मंदिरांत जाऊन बसतो, त्याप्रमाणें सौम्य मनुष्य आपल्या हृदयमंदिरांत शांतपणें राहातो आणि साधारण लोकव्यवहार चालत असेल तसा स्वस्थपणें चालूं देतो.

आपल्या इहलोकींच्या वर्तनाचा शाश्वत स्थितीशीं जो संबंध

आहे त्या संबंधाच्या दृष्टीनें सौम्यता हा सद्गुण पूर्वी सांगितल्यापेक्षांही विशेष अपल्या हिताचा आहे. स्वर्गामध्यें सौम्यता व मित्रभाव वास करितात, आणि नरकामध्यें क्रूरता व द्वेष वास करितात, तर मग आपण येथें ज्याप्रमाणें पेरूं त्याप्रमाणें पुढें आपल्यास फल प्राप्त होईल, हें शास्त्रांतील बोधवचन खरें मानिलें असतां असें कबूल केलें पाहिजे कीं, स्वर्गीय सुखाचा अनुभव घेण्याची योग्यता येण्यास आपल्या स्वभावांत सौम्यता आणणें आवश्यक आहे, आणि आपला स्वभाव कठोर राहूं देणें म्हणजे आपली भावी स्थिति दुःखाची करण्याची तजवीज करणें असें होय. मला अशी भीति वाटते कीं पुष्कळ प्रसंगीं मनुष्यें पारलौकिक स्थितींविषयीं जीं त्यांचीं मतें त्यांचा आणि ऐहिक व्यवहाराचा कांहीं संबंध नाहीं असें मानितात. त्यांना असें वाटतें कीं, गंभीर व शांत विचाराचे जे प्रसंग त्यांशीं मात्र त्या मतांचा संबंध आहे. जणूं काय ते तीं मतें मोठ्या पूज्य बुद्धीनें एका उंच स्थानीं ठेवून त्यांच्याकडे मोठमोठ्या प्रसंगीं मात्र सल्ला विचारण्यासाठीं जातात, आणि सामान्य ऐहिक व्यवहारामध्यें त्यांस असें वाटतें कीं आपण खुशाल आपल्या स्वभावाच्या भिन्न भिन्न तरंगांस व उग्र मनोविकारांस अनुसरून चालावें. परंतु वास्तविक गोष्ट अशी आहे कीं त्यांचें जें नेहमीं लोकांशीं वर्तन, त्या वर्तनानेंच मुख्यत्वेंकरून परलोकगामी जो त्यांचा आत्मा त्याची बरी वाईट स्थिति होते. म्हणजे ज्या स्वभावाचा व संवयींचा आत्म्याच्या

शाश्वत स्थितीशीं संबंध आहे, तो स्वभाव व त्या संवयी त्यांच्या नेहमींच्या वर्तनानें हळू हळू त्यांच्याठायीं उत्पन्न होऊन दृढ होतात. कदाचित् असें असेल कीं त्यांचा दुष्ट स्वभाव मुख्यत्वेंकरून क्षुद्र गोष्टींतच प्रवृत्त होत असेल. परंतु त्यांनीं असें पक्कें समजावें कीं या क्षुद्र गोष्टींमध्यें जें त्याचें वर्तन, त्याच्या योगानें त्यांचा असंतोषीपणा व उग्र मनोविकारहीं वाढून मोठमोठ्या भयंकर अनर्थांस कारणीभूत होतात; आणि आपण भावी स्थितीमध्यें नरकवासी जनाचे सांगाती होण्यास योग्य होत आहों हें त्यांच्या ध्यानीं मनीं सुद्धां येत नाहीं.

माझा असा आशय नाहीं कीं मोक्षाची तयारी म्हणजे फक्त मार्दव व सौम्यता हीं होत, किंवा या एका सद्गुणानें आपलीं सर्व पापें झांकलीं जातील. कित्येकांच्या अंगीं साहजिक सुस्वभावानें हा सद्गुण कांहीं अंशीं असूनही त्यांचीं अंतःकरणें इतर गोष्टींत कलुषित आणि त्यांचीं चरित्रें अव्यवस्थित असूं शकतील. परंतु मला जें सांगावयाचें आहे तें हें कीं, आपल्या स्वभावाचें नियमन करण्याकडे ज्यांचें लक्ष्य नाहीं, त्यांच्या अंगीं मोक्षप्राप्तीची योग्यता आली नाहीं, आणि त्यांस धर्माच्या ठिकाणीं जी पुनरुज्जीवनशक्ति आहे तिचा अद्याप अनुभव नाहीं. ज्यांच्या अंतःकरणामध्यें परमात्म्याची वस्ती आहे, त्यांच्या आत्म्यावर जे संस्कार होतात त्यांपैकींच दैवी सौम्यता हा एक संस्कार होय. जे आपल्यास ख्रिस्ताचे म्हणवितात ते आपल्या शारीरिक इच्छा व कुवासना यांचा स-

मूळ नाश करितात. परंतु हें ध्यानांत ठेविलें पाहिजे कीं, शारिरिक गोष्टींमध्यें मलीनता, प्राणघात, मद्यपान व मौजमजा यांचा जसा अंतर्भाव केला आहे, तसाच दीर्घद्वेष, विरोध, स्पर्धा, क्रोध, कलह आणि मत्सर यांचाही कंठरवानें अंतर्भाव केला आहे. या पूर्वोक्त दोषांपैकीं कोणतेही दोष जोंपर्यंत मनुष्यांत आहेत, तोंपर्यंत ते ईश्वरी राज्यांत प्रवेश करण्यास योग्य होत नाहींत.

येथवर मीं सद्गुणाच्या दृष्टीनें किंवा धार्मिक मनुष्यांचीं जीं लक्षणें त्यांच्या दृष्टीनें सौम्यतेचें केवढें महत्त्व आहे हें दाखविलें. आतां सौम्यता प्रचारांत आणण्यास विशेष उपयोगीं पडतील अशा प्रकारचे कांहीं विचार सुचवून हा विषय समाप्त करितों. एतदर्थ माझें तुम्हांस असें सांगणें आहे कीं तुम्ही आपल्या स्वभावाचें निःपक्षपातदृष्टीनें परीक्षण करा; आणि आपलीं स्वतःचीं व्यंगें पाहून त्यांविषयीं दुसऱ्यांनीं दुर्लक्ष्य करावें असें तुम्हांस वाटतें, त्याप्रमाणेंच त्यांच्या व्यंगांकडे तुम्ही दुर्लक्ष्य करीत जा. जगामध्यें जी इतकी कठोरता व निष्ठुरता भरली आहे, ती अभिमानामुळें भरली आहे. आपल्याविषयीं आपला पूर्ण आदर असल्यामुळें आपला स्वभाव कोणत्या प्रकारचा आहे हें आपण विसरतों. ज्या आदरास आपण योग्य नाहीं तो दुसऱ्यांनीं आपला करावा म्हणून इच्छितों. जणूं काय आपण कधींच दुसऱ्यांचा अपकार केला नाहीं, अशा प्रकारें त्यांच्या अपकाराकडे आपण

क्रूर दृष्टीनें पाहतों. व जणूं काय आपण कधींच दुःख सहन केलें नाहीं अशा प्रकारच्या निष्ठुर दृष्टीनें दुसऱ्याच्या दुःखाकडे आपण पाहतों. अभिमान व मूर्खपणा यांच्या योगानें आपल्यास आपण अतिशय योग्य असे समजतों. तर आपलें हें कल्पित योग्यतेचें उच्चस्थान सोडून आपल्या वास्तविक नीच स्थितीचें आपण अवलंबन करूं या. मनुष्यामनुष्यांमध्यें ईश्वरानें जें स्वाभाविक साम्य ठेविलें आहे, तिकडे दृष्टि देऊन आपले जे सर्वसाधारण दोष त्यांविषयीं विचार करूं या. आपलें स्वाभाविक साम्य व परस्परांच्या संबंधानें अपकारक आचरण यांचा विचार करूनही आपल्या ठायीं भूतदया उत्पन्न झाली नाहीं, तर आपण ईश्वराच्या दृष्टीनें किती योग्यतेचे आहों एवढें तरी ध्यानांत ठेऊं या. ईश्वरानें आपल्या अपराधांची क्षमा करावी म्हणून जशी ईश्वराची आपण प्रार्थना करितों, त्याप्रमाणें आपण परस्परांच्या अपराधाची क्षमा परस्परांस यत्किंचित्ही करूं नये काय? जर आपण आपल्या बांधवांशीं सदयतेनें व सौम्यतेनें वर्तन करण्यास इतकें मागें पुढें पाहूं, तर आपला नियंता आपल्या अपराधांकडे सदय व सौम्य दृष्टीनें पाहील अशी आशा बाळगण्यास आपल्यास जागा आहे काय?

त्याचप्रमाणें आपलें मन क्षुब्ध किंवा क्रोधाविष्ट होण्यास खरीं कारणें काय होत असतात, याचा विचार शांततेच्या वेळीं मागाहून करण्याची नेहमीं संवय ठेवावी. मळकट आरशामध्यें पदार्थाचें जें प्रतिबिंब पडतें त्यावरून आपणास त्या

पदार्थाचें स्वरूप यथास्थित दिसत नाहीं. त्याप्रमाणेंच आपलें मन क्षुब्ध किंवा क्रोधाविष्ट असतें, अशावेळीं कोणत्याही गोष्टीचें खरें स्वरूप आपल्या ध्यानांत येत नाहीं. आपल्या फायद्याची, रक्षणाची, किंवा मानप्रतिष्ठेची एकादी क्षुल्लक गोष्ट असते, पण तीच आपल्यास मोठी महत्त्वाची वाटते. आणि अत्यंत क्षुद्र असा आपला अपकार कोणीं केला तरी तो मोठा घात असा वाटतो. नंतर आपला क्रोध किंवा अभिमान शांत झाला म्हणजे आपल्यास ज्या इतक्या मोठ्या अनर्थाचें भय वाटत होतें ते कोठें आहेत म्हणून आपण पाहूं लागतों. परंतु तसा कांहींच प्रकार दृष्टीस पडत नाहीं. आपल्या विकृत अंतःकरणानें जी इमारत रचलेली असते ती सर्व एकाएकीं नाहींशी होते. याप्रमाणें विरोधाचें कारण जरी नाहींसें झालें तरी त्यापासून झालेला परिणाम कायम राहतो. आपण एकाद्या मित्राचें वैमनस्य जोडतों किंवा एकाद्या शत्रूचा द्वेष वाढवितो; किंवा भावी संशयाचें, दुष्ट संकल्पाचें, किंवा तिरस्काराचें बीज पेरितों. म्हणून मी तुमची विनंति करितों कीं जेव्हां चित्तास विकृत करणारीं कारणें उत्पन्न होतात, तेव्हां क्षणभर आपल्या ठिकाणीं उत्पन्न झालेली जी अत्याचारविषयक वृत्ति, तिचा क्षणएक निग्रह करावा. आपोआप चित्त शांत होण्याची जी वेळ ती ध्यानांत आणा. उग्र विरोधानें एकादा अत्यंत अल्प सुखाचा नाश निश्चयेंकरून केवढा होईल या गोष्टीचा लक्ष्यपूर्वक विचार करा. एकाद्या झऱ्याचा उगम जसा एकाद्या खडकांतील

लहानशा भेगींतून होतो, त्याप्रमाणें विरोधाच्या कटु प्रवाहाचा उगम होतो. परंतु तो प्रवाह कोणीकडे जाईल हें आपल्यास सांगतां येत नाहीं. आणि जो त्या प्रवाहाचा उगम प्रथम होऊं देतो, त्याला त्याचा दुष्ट परिणाम भोगावा लागत नाहीं असें क्वचितच घडतें.

परंतु ज्या गोष्टींचें दर्शन आपणास आपल्या पवित्र धर्मानें होतें त्या गोष्टींचा वारंवार विचार केला तर आपल्यामध्यें सौम्यतेची वृद्धि होईल. आपल्या मनामध्यें आपण अमर आहों ही कल्पना वागूं द्या. परिणामीं आपणास जेथें जावयाचें आहे तेथें पोहोंचण्याचा हें जग मार्ग आहे अशी बुद्धि ठेवावी. उच्चप्रतीचें हित साधण्याच्या कामांत आपण गुंतलों आहों असें समजावें, आणि परमेश्वराच्या साक्षीनें अधिक महत्त्वाच्या ठिकाणीं जाण्याच्या तयारीस लागलों आहों ही गोष्ट मनांत ठेवावी. अशा कल्पनांनीं उन्नत झालेलें आपलें अंतःकरण शांत आणि गंभीर होईल. उच्चस्थानापासून जगांतील क्षुल्लक विपत्ति आपल्या समजण्यांत येतील. मनोविकारांच्या दौर्बल्याला जे अत्यंत पात्र होतात ते आपमतलबी, विषयी आणि गर्विष्ठ होत असें समजावें. जगाशीं त्यांचा इतका निकट संबंध असतो कीं त्यांच्या सभोंवारच्या प्रत्येक पुरुषाशीं आणि प्रत्येक वस्तूशीं त्यांचा संबंध झाला म्हणजे त्यांना निरंतर उपद्रव होतो किंवा ते दुसऱ्याला उपद्रव देणारे होतात. परंतु स्वच्या धर्माच्या तत्त्वांचा अंगीकार केला असतां जगत्संबंधीं कल-

हाच्या अपकारक गोष्टींपासून आपण दूर राहूं. या तत्त्वानें जगाशीं आपला इतका संबंध राहातो कीं त्या योगानें आपण जगांत योग्य वर्तन करितों आणि त्यापासून इतके तुटक राहतों कीं त्याच्या योगानें आपल्या शांततेची हानि करण्याच्या शक्तीचा ऱ्हास होतो. त्याच्या योगानें मनाला प्रागल्भ्य आलें म्हणजे आपोआप सौम्यता उत्पन्न होते. मनुष्यांचा मूर्खपणा पाहून त्यांच्याविषयीं द्वेषभाव उत्पन्न न होतां अंतःकरण दयार्द्र होतें, आणि आपण क्षुद्र जनांच्या अंतःकरणांत उत्पन्न होणाऱ्या मनोविकारांस उन्नत स्वभावाच्या सौम्यतेनें पाहातों.

येथें वर सांगितलेल्या विचारांच्या योगानें आपलें कर्तव्य आणि आपलें सुख यांना सर्व गोष्टींमध्यें महत्त्व आणणारें असें शहाणपण आपण आपल्या ठायीं उत्पन्न करावें. असें करणें हें प्रत्येक स्थितीला आलंकृत करणारें आहे असें समजावें. त्याच्या योगानें तरुणपणाचा तिरसट स्वभाव कमी करावा आणि वृद्धपणाच्या द्राष्ट स्वभावास मृदुत्व आणावें. जे आपल्यावर अधिकार चालवितात त्यांचा अधिकार सौम्य करावा आणि जे आज्ञाधारक असतात त्यांच्यामध्यें पूज्यबुद्धि वाढवावी. शेवटीं मी अशी खबरदारी घेण्यास सांगतों कीं वरकांती निर्मळ दिसणाऱ्या वर्तनास तो खरा सभ्यपणा आहे असें समजूं नका. कारण ज्यांचें असें वर्तन असतें त्यांच्यामध्यें कठोरपणा गुप्तरूपानें वसत असतो. आपल्या अंतःकरणाची सौम्यता ही स्वाभाविक असूं द्यावी, म्हणजे ती परमेश्वराच्या आणि मानवजातीच्या प्रीती-

पासून उत्पन्न झालेली असावी. जें जें कांहीं योग्य, न्याय्य आणि खरें आहे, तें तें करण्याकडे सात्विक वृत्ति योग्य उत्साहानें लावावी. आपल्या वर्तनामध्यें भक्ति आणि भूतदया यांचें ऐक्य असूं द्यावें. निश्चितपूर्णभाव आपल्या शांत व सौम्य हृदयांत वसूं द्यावा. सद्गुणांशिवाय वरकांती झळकणाऱ्या गुणांनीं जो सन्मान, मिळतो त्यापेक्षां खरा अधिक सन्मान अशा प्रकारचें वर्तन वाढविल्यानें मिळेल.

*** हें व्याख्यान 'ब्लेअरर्स सरमन्स्' या सर्वप्रसिद्ध ख्रिस्ती व्याख्यानांच्या आधारें रचिलें आहे; यामुळें यामध्यें ठिकठिकाणीं ख्रिस्ती धर्ममतांचा संबंध आला आहे. प्रकाशक.



आत्मसंरक्षण.

स्थूलदृष्ट्या आत्मसंरक्षणाविषयीं साधारण समजुतीच्या मनुष्यांस विशेष बोध करावयास पाहिजे असें नाहीं. कारण आपलें संरक्षण करण्याविषयीं मनुष्याची प्रवृत्ति स्वाभाविकच असते. कोणीं आपल्या आंगावर काठी उगारिली असतां ती आपणास न लागण्याविषयीं पशुपक्ष्यादिक सुद्धां प्रयत्न करितात. मग सज्ञान मानवी प्राणी आपलें संरक्षण करण्याचा आपोआप यत्न करील, हें सांगावयासच नको. जसजशी ज्ञानशक्ति वाढते, व मनुष्यास दूरदृष्टि देऊन वर्तण्याची शक्ति येते, तसतसा मनुष्य केवल तात्कालिक अपायांपासून आपलें संरक्षण करून स्वस्थ बसतो असें नाहीं, तर पुढेंही आपलें संरक्षण होईल अशा तजविजीनें वागतो. आणि आरोग्यरक्षणार्थ अन्न-पानादिकांच्या संबंधानें जितका सावधपणा ठेवावयास पाहिजे असतो तितका जरी मनुष्यमात्रांस ठेवितां येत नाहीं, तरी सामान्यतः मनुष्य आपल्या संरक्षणाविषयीं तत्पर असतो असें म्हटल्यास चिंता नाहीं. आतां अशा प्रकारचें आत्मसंरक्षणही पुष्कळ अंशीं इतरांच्याही संरक्षणाविषयीं आस्था बाळगल्यानें विशेष चांगल्याप्रकारें होतें, हें ज्ञान फार थोडचा मनुष्यांस असतें; व त्यांतही तें फारच थोडचांच्या बुद्धींत जागृत राहातें. यास्तव पुष्कळांची प्रवृत्ति इतकी दूरवर दृष्टि देऊन आत्मसंरक्षण करण्याविषयीं होत नाहीं, म्हणून प्रायः—

" आत्मानं सततं रक्षेद्दारैरपि धनैरपि;
पुनर्दारा पुनर्वित्तं न शरीरं पुनः पुनः। "

" आपलें सतत संरक्षण करावें, त्यासाठीं सर्व धन खर्चावें लागलें किंवा प्रत्यक्ष आपल्या स्त्रीचाही त्याग किंवा नाश करावा लागला तरी करावा. स्त्री व धन हीं पुन्हां मिळतील. परंतु शरीर पुनः पुन्हा मिळणार नाहीं. या वचनास अनुसरून केवळ स्वशरीरसंरक्षणाकडेच मनुष्यांची प्रवृत्ति असते. असो; ही आत्मसंरक्षणाची प्रवृत्ति आपण म्हणजे आपले शरीर, या देहात्मभावास अनुसरून असते. परंतु आपण म्हणजे केवळ आपला देह नव्हे; आपल्यामध्यें देहाहून भिन्न असून देहास वागविणारें असें चिन्मय आत्मतत्व आहे; शरीर हें केवळ त्याचें राहण्याचें स्थान असून ज्ञानप्राप्तीचें व मुखोपभोगाचें साधन होय; तें आत्मतत्व अथवा आत्मा शरीराबरोबर नाश पावणारा नव्हे; तो शरीराहून भिन्न असून चिरस्थाई आहे; शरीराच्या सुखदुःखानें व स्वस्थाऽस्वस्थतेनें जरी त्यास तात्कालिक सुखदुःखाचा अनुभव येतो, तरी त्याचें विशेष सुखदुःख, त्याच्या विशेष स्वास्थ्याविषयीं उपाय, व त्याच्या अस्वास्थ्यास कारण होणारे अपाय ह्या गोष्टी देहाच्या स्थितीवर अवलंबून नाहींत; अतएव केवळ देहसंरक्षणानें आत्मसंरक्षण होत नाहीं; किंबहुना देहसंरक्षणांतच जर आपलें मन अगदीं व्यग्र होऊन गेलें, तर देहसंरक्षण होत असूनही आत्मनाश होण्याचा संभव आहे, व देहसंरक्षणाविषयीं जितक्यास तितकें लक्ष्य अ-

सलें तरी योग्य उपायांनीं आत्मसंरक्षण चांगल्या प्रकारांनीं होऊं शकतें; इत्यादि आत्मतत्त्वाच्या गोष्टींकडे लक्ष ठेवून आत्मसंरक्षणाचा विचार केला पाहिजे;

आत्मसंरक्षण म्हणजे आत्मा सुदृढ, बलिष्ठ व तेजस्वी करून त्यास शिथिलता, दुर्बलता, मलिनता व ग्लानी आणणारे अपाय टाळणें हें होय. आतां आत्मा सुदृढ करणें म्हटलें म्हणजे आत्म्याचे ठायीं ज्या शक्ति बीजरूपानें आहेत त्या व्यायामानें व अभ्यासानें वाढवून दृढ करणें. आत्म्याचे ठायीं विचार, विवेक. स्मृति, भाव, भक्ति, दया, क्षमा, शांति, धैर्य, परोपकारपरता, इत्यादि गुण व शक्ति सहज बीजरूपानें आहेत. त्या आध्यात्मिक व्यायामानें व वारंवार अभ्यासानें वाढतात व दृढ होतात; तशाच आळसानें व दुर्लक्ष्यानें आधीं उद्भूतच होत नाहींत, आणि त्यांपैकीं कांहीं सहज रीत्या थोडया बहुत उद्भूत झाल्याच तर वाढून सुदृढ होत नाहींत. म्हणून आळस व दुर्लक्ष्य यांच्या योगानें जसें शरीरास शैथिल्य येतें, तसेंच आध्यात्मिक स्थितीच्या संबंधानें आळस व दुर्लक्ष्य यांचे योगानें पूर्वोक्त आत्मिक शक्तींसही शैथिल्य येतें.

दुसरें असें आहे कीं, या आध्यामिक शक्तींचा उपयेाग केवळ शारीरिक गोष्टींच्या संबंधानेंच केला तर त्यांच्या ठायीं क्षुद्रता येते, व आत्मभाव दृढ करण्यास त्या उपयोगीं पडत नाहींत. यामुळें आत्मा सुदृढ होत नाहीं. शरीर कदाचित् बलिष्ठ व तेजस्वी झालें तरी आत्मा बलिष्ठ व तेजस्वी होत

नाहीं. शारीरिक आरोग्यरक्षण झालें तरी आत्मिक आरोग्य होत नाहीं. शरीराचे अपाय टळले तरी आत्म्यास होणारे अपाय टळूं शकत नाहींत. शरीरास अपघातानें किंवा अनास्थेनें येणारें अकालिक मरण जरी टळलें तरी आत्मा मरणधर्महीन असूनही त्यास मरण येतें. सारांश शरीरस्वास्थ्य जरी इष्ट आहे, तरी आत्मिक स्वास्थ्यावांचून तें सुखकारक किंवा कल्याणकारक होत नाहीं. कारण कीं, शारिरिक व आत्मिक जीवन हीं अगदीं भिन्न आहेत. शारीरिक जीवन म्हणजे काय हें सांगावयास पाहिजे आहे असें नाहीं. तें सामान्यतः मनुष्यमात्रास किंबहुना प्राणिमात्रास कळतें, व तें बाह्य व स्थूल असल्यामुळें त्याजकडे लक्ष्यही सहज असतें; आणि कदाचित् दुर्लक्ष्य झालेंच तर त्याचा परिणाम प्रायः तत्कालींच अनुभवास आल्यामुळें पुनः लागलेंच तिकडे लक्ष्य वळतें. परंतु आत्मिक जीवनाची गोष्ट तशी नाहीं. तें आधीं स्थूल दृष्टीनें दिसत नाहीं; आणि कदाचित् अंशतः दिसलें, तथापि त्याचें महत्त्व ध्यानांत न आल्यामुळें त्याजकडे प्रायः सर्वदा सर्वांचें दुर्लक्ष्यच असतें. अतएव आत्मिक जीवनाचें स्वरूप काय हें सारा सारविवेकानें जाणलें पाहिजे.

आतां आत्मिक जीवनाच्या संबंधानें पहिली गोष्ट ध्यानांत धरिली पाहिजे ती ही कीं, आत्मा शाश्वत जीवी आहे. तो पंचभौतिक देहरूप संघाताबरोबर विलयास जाणारा नव्हे. यास्तव त्याच्यावर होणाऱ्या संस्काराचा परिणाम बरा वाईट होणार

तो चिरकालीन होतो. आत्मिक जीवनाचा मुख्य आधार श्रद्धा होय. कारण आध्यात्मिक विषय ज्ञानगम्य असल्यामुळें इंद्रिय-गोचर विषयांप्रमाणें त्यांच्या अस्तित्वाविषयीं प्रतीति सतत राहात नाहीं; ती प्रतीति श्रद्धा ज्या मानानें जागृत व दृढ असते, त्या मानानें उद्भूत होते. आणि ही प्रतीति वारंवार उद्भूत होऊन स्थिरावल्यावांचून अध्यात्मिक जीवनाची स्मृति व तद्विषयक जागृति पाहिजे तशी होत नाहीं. सर्वांतर्यामी परमात्मा परमेश्वर अत्यंत वात्सल्ययुक्त पितृरूपानें, अत्यंत प्रेमयुक्त जननीरूपानें, अत्यंत स्नेहयुक्त मित्ररूपानें, अत्यंत सामर्थ्ययुक्त शास्तृरूपानें, किंवा अत्यंत प्रसादयुक्त स्वामिरूपानें, व अतिप्रेमळ व हितार्थी सद्गुरुरूपानें विशुद्ध आत्म्यास अतिसन्निध आहे. ही गोष्ट ज्ञानानें निर्विवाद व निश्चित ठरून सत्य आहे अशी बुद्धि झाली, तरी त्या ज्ञानाचें वारंवार मनन, निदिध्यासन, यांचे योगानें ती बुद्धि स्थिरावून तिला जर श्रद्धेचें म्हणजे अचलप्रतीतीचें रूप आलें नाहीं, तर ती बुद्धि आध्यात्मिक जीवनास उपयोगी नाहीं. ज्याप्रमाणें क्षणैक उत्पन्न होणारें विद्युत्तेज सतत प्रकाश देण्याच्या उपयोगाचें नाहीं, त्याप्रमाणें ती बुद्धि आपल्या चित्तास आध्यात्मिक जीवन विचाराच्या वेळीं मात्र दाखविण्यास उपयोगीं पडली, तरी तिजकडून आध्यात्मिक जीवन सतत प्रकाशित होऊं शकणार नाहीं; आणि तसें होईपर्यंत त्या जीवनासंबंधीं जी स्फूर्ति व आस्था उत्पन्न झाली पाहिजे, व तदनुरूप जी

आपल्या सर्व आत्म्याची प्रवृत्ति झाली पाहिजे, जिच्यायोगें आत्मिक जीवन सफल होणार, ती होऊं शकत नाहीं. ज्याप्रमाणें पुरुषास पत्नीवांचून संसार नाहीं, त्याप्रमाणें आत्म्यास श्रद्धेवांचून आत्मिक जीवनच नाहीं.

ज्याप्रमाणें यज्ञकर्ता यजमान पत्नीवांचून यज्ञ करण्यास योग्य होत नाहीं, त्याप्रमाणें हा आध्यात्मिक जीवनरूपी यज्ञ करण्यास आत्म्यास श्रद्धारूप पत्नी असल्यावांचून योग्यताच येत नाहीं. अतएव—

" तस्यैवं विदुषो यज्ञस्यात्मा यजमानः श्रद्धा पत्नी " असें जें म्हटलें आहे तें अगदीं यथार्थ आहे. तसेंच धर्मास श्रद्धा हें आयतन म्हणजे राहाण्याचें स्थान असें अन्यत्र म्हटलें आहे, तेंही अगदीं यथार्थ आहे. कारण ज्ञानानें जो धर्म म्हणून वाटला, तो श्रद्धेनें प्रत्यक्षता पावल्यावांचून तद्विषयक प्रवृत्ति होत नाहीं. म्हणून पारमार्थिक जीवनाचा सर्व आधार श्रद्धा होय. वर श्रद्धेविषयीं जो प्रसंगोपात्त उद्गार आला आहे, त्यावरून हें ध्यानांत आलेंच असेल कीं श्रद्धेविषयीं सामान्य जी समजूत आहे त्याहून कांहीं अंशीं निराळी येथें गृहीत केली आहे. श्रद्धेविषयीं सामान्य समजूत आहे ती ही कीं, दुसऱ्यानें सांगितलेल्या गोष्टींवर विश्वास ठेवणें. माझ्या समजुतीनें हा श्रद्धेचा केवळ एकदेश किंवा तिचें हें अपूर्ण स्वरूप होय. श्रद्धेचें वास्तविक स्वरूप म्हटलें म्हणजे आपल्यास ज्या विषयांच्या अस्तित्वाविषयीं निर्बाध ज्ञान झालें, ते विषय तसेच खरोखर

आहेत असा विश्वास दृढ होणें. असें श्रद्धेचें स्वरूप मानिलें म्हणजे स्वतः आपल्यास विचारांतीं झालेल्या ज्ञानावर श्रद्धा म्हणजे पूर्वोक्त प्रकारचा विश्वास उत्पन्न झाला पाहिजे. तात्पर्य अतींद्रिय विषयांचें ज्ञान आप्तवाक्यानें होवो, एकंदर बाह्य सृष्टीच्या अवलोकनानें होवो, किंवा आपल्या आध्यात्मिक स्थितीच्या चिंतनानें होवो, कोणत्याही द्वारानें होवो, त्याचें यथार्थत्व बुद्धीनें निश्चित केलें म्हणजे वारंवार मनन व निदिध्यासन करून तें श्रद्धेनें मनास प्रत्यक्षवत् झालें पाहिजे. म्हणजे बाह्यजीवनविषयक प्रवृत्तीप्रमाणें आध्यात्मिक जीवनाविषयीं आपली सहज प्रवृत्ति होईल. धर्मपरायण मनुष्यें आणि इतर मनुष्यें यांमध्यें पहिला भेद हा असतो कीं, पहिल्यांच्या ठिकाणीं अशी श्रद्धा असते कीं जिच्या योगानें त्यांच्या ज्ञानदृष्टीपुढें आध्यात्मिक विषय बाह्यविषयाप्रमाणें प्रत्यक्षवत् उभे असतात; तसे इतरांच्या ठिकाणीं ती श्रद्धा नसल्यामुळें त्यांच्या ज्ञानदृष्टीपुढें असत नाहींत. म्हणून पहिल्यांचे ठायीं पारमार्थिक विषयांविषयीं सम्यक् स्मृति किंवा वास्तविक जागृति असते. परंतु इतरांस त्या विषयांचें विस्मरण होऊन त्यांचा पुष्कळ काळ भान असल्यावांचून जातो.

" या निशा सर्वभूतानां तस्यां जागर्ति संयमी "—तसेंच पारमार्थिक विषयांकडे ज्यांची दृष्टि विशेष लागली आहे त्यांची बाह्यदृष्टि अशा मनुष्यांप्रमाणें चित्तवृत्ति बाह्यविषयांत निमग्न नसल्यामुळें त्यांचा पुष्कळ काळ बाह्यसृष्टिविषयक अभानांतच

जातो. " यस्यां जाग्रति भूतानि सा निशा पश्यतो मुनेः ॥ " पारमार्थिक ज्ञान जसजसें यथार्थ व निर्दोष होईल, तसतसें श्रद्धेसही विशुद्ध रूप येईल; परंतु पारमार्थिक विषयांस प्रत्यक्षता येण्यास श्रद्धारूप चक्षु अवश्य प्राप्त झाले पाहिजेत.

पारमार्थिक विषयांमध्यें परमात्मदर्शन हा मुख्य विषय होय. ज्याप्रमाणें या देहरूपी पिंडाचा प्रवर्तक आपला जीवात्मा नियतशक्ति आहे, त्याप्रमाणें या सर्व स्थिरचरात्मक विश्वाचा प्रवर्तक अनंतशक्ति असा आत्मा अवश्य आहे; आणि तो सर्वप्रकारें जीवात्म्याहून परमश्रेष्ठ असल्यामुळें त्यास परमात्मा हें नाम आहे. तो सर्व ब्रह्माण्डाचा व आपल्याही आत्म्यांचा आत्मा व नियंता आहे, म्हणून त्यास अंतरात्मा व अंतर्यामी अशींही नामें आहेत. त्याची सर्व विश्वावर सत्ता असून त्यांतील सर्व राज्यसूत्रें तो आपल्या हातीं ठेवितो, म्हणून त्यास ईश्वर किंवा परमेश्वर असेंही म्हणतात. त्या या परमेश्वराचें अस्तित्व, अमूर्तत्व, सांनिध्य, साक्षित्व, नियंतृत्व, निर्दोष मंगलस्वरूपत्व इत्यादि गुणमय स्वरूप अंतर्बाह्य विश्वाचें पर्यालोचन केलें असतां निःशंक समजतें. तसेंच—

" एको देवः सर्वभूतेषु गूढः । सर्वव्यापी सर्वभूतान्तरात्मा ॥
कर्माध्यक्षः सर्वभूताधिवासः । चेतः साक्षी केवलो निर्गुणश्च "

इत्यादि उपनिषद्वचनांनीं व —

" उत्तमः पुरुषस्त्वन्यः परमात्मेत्युदाहृतः ।
यो लोकत्रयमाविश्य बिभर्त्यव्यय ईश्वरः ॥ "

इत्यादि पारमार्थिक शास्त्रवचनांनीं ही त्याच प्रकारचें परमेश्वराचें स्वरूप वर्णिलें आहे. तें चक्षुरादीन्द्रियगोचर नसल्यामुळें, व गुणानंत्यास्तव नियतशक्ति मनासही तें पूर्णपणें गम्य नसल्यामुळें, त्याचें दर्शन, ध्यान, उपासना, हीं कशीं होऊं शकतील ? असा स्थूल दृष्टीचा वारंवार प्रश्न होत असतो. त्यास उत्तर इतकेंच आहे कीं, ज्या गोष्टींच्या प्रत्यक्षज्ञानास जें इंद्रियादि साधन अवश्य आहे, त्याच साधनानें त्याची प्रतीति व्हावयाची, इतरानें होऊं शकत नाहीं. रूप हें चक्षुर्विषय आहे. तें श्रवणविषय होऊन ऐकावयास आलें पाहिजे, तरच आम्ही तें आहे म्हणून मानूं, असें जर कोणीं म्हटलें तर तें म्हणणें अगदीं असंबद्ध होईल. तसेंच रूपादिवाह्यगुणरहित केवळ मनोगम्य व अंन्तःप्रत्यक्ष असे जे दया, क्षमा, शांति, वात्सल्य इत्यादि भाव, ते जर इंद्रियगोचर झाले तरच आम्ही खरे मानूं असें कोणी म्हणेल, तर तेंही म्हणणें केवळ प्रलापरूप होईल. तद्वत् आपल्याठायीं अहंभावनेनें प्रतीत, केवळ विज्ञानैकगम्य, रूपादिगुणरहित, जो आपला शरीरधारी जीवरूपी आत्मा, जो इच्छा, ज्ञान, इत्यादि वृत्तींचें अधिष्ठान, तो ब्रह्मेन्द्रियगोचर नसल्यामुळें आहे असें आम्ही मानूं शकत नाहीं, असें जर कोणीं म्हटलें, तर तेंही त्याचें म्हणणें अविचारानेंच समजलें जाईल. कारण आपणामध्यें एकमेकांविषयींचें प्रेम किंवा द्वेष, पूज्यभाव किंवा तिरस्कार, सदयता किंवा निर्दयता, इत्यादि ज्या भावना उद्भूत होतात, त्या आप-

ल्या या बाह्यशरीराविषयीं नसून तदंतर्वर्ती जें आत्मरूपी भिन्न चालक तत्व त्याविषयीं होत असा सर्वांचा अनुभव आहे. देह फार सुंदर असून त्याचें चालक तत्त्व कधीं कधीं आपल्यास अत्यंत अप्रिय होतें; व देह अत्यंत कुरूप असूनही सद्गुण-मंडित आंतरतत्व आपल्या अत्यंत प्रेमास पात्र होतें. आतां हाच जीवात्मविषयक विचार व्यापक दृष्टीनें मनांत आणिला, म्हणजे जीवांतर्यामी व जडान्तर्यामी असा जो परमात्मा, त्याच्या परिपूर्ण मंगलगुणमय स्वरूपाविषयीं आपल्यास भावना होऊन तद्विषयक प्रेम, आदर, इत्यादि सद्भाव आपल्या अंतःकरणांत उत्पन्न होऊं शकत नाहींत, असें म्हणणें अत्यंत असंगत होय. यास्तव परमेश्वराचें स्वरूप ज्ञानलक्ष्य असून, त्या ज्ञानास ध्यान, मनन, निदिध्यासन, यांच्या योगानें दृढता येऊन, विमलश्रद्धारूपी दृष्टीस त्याचें अत्यंत साक्षात् व समीप दर्शन होणें अशक्य नाहीं; व या प्रकारें त्यास जे पाहूं इच्छितात त्यांच्या अंतर्दृष्टीस त्याचे साक्षात् दर्शन होतें, असा अनुभवही आहे. इतकें मात्र ध्यानांत ठेविलें पाहिजे कीं प्रत्यक्षाचे मुख्य दोन भेद आहेत; बाह्यप्रत्यक्ष व आंतरप्रत्यक्ष,—इंद्रियप्रत्यक्ष व ज्ञानप्रत्यक्ष. त्यांत बाह्यप्रत्यक्षामध्यें जसें चाक्षुषप्रत्यक्ष श्रवणप्रत्यक्ष होऊं शकत नाहीं; जसें मानसप्रत्यक्ष इंद्रियप्रत्यक्ष होऊं शकत नाहीं; तद्वत् विज्ञानप्रत्यक्ष व विमलभावप्रत्यक्ष, अतीन्द्रिय, मंगलगुणविशिष्ट, जें ईश्वरस्वरूप, तें सर्वथा बाह्येन्द्रियप्रत्यक्ष होऊं शकत नाहीं; आणि

जसें बधिरास शब्दाविषयक ज्ञान होत नाहीं, किंवा अंधास रूपविषयक ज्ञान होत नाहीं, तसेंच तत्त्वज्ञानदृष्टिविहीनास व भावविहीनास परमेश्वरदर्शन होऊं शकत नाहीं. अतएव ज्यांच्या ठायीं परमार्थदृष्टि नेहमीं जागृत असते, त्याणीं ज्ञान-ध्यान-मननादि ईश्वरदर्शनाचीं व ईश्वरसान्निध्याचीं आपल्या अनुभवानें जीं साधनें सांगितलीं आहेत, त्या साधनांनींच ती अमोलिक गोष्ट साध्य केली पाहिजे.

" एष सर्वेषु भूतेषु गूढात्मा न प्रकाशते;
दृश्यते त्वग्र्यया बुद्ध्या सूक्ष्मया सूक्ष्मदर्शिभिः "

अर्थ—हा सर्व भूतांचे ठायीं आत्मा गूढ रूपानें असल्यामुळें, स्थूल दृष्टीस गोचर होत नाहीं; परंतु सूक्ष्मदृष्टी जे ज्ञानी यांच्या सूक्ष्मदृष्टीसच तो गोचर होतो.

" नसन्दृशे तिष्ठति रूपमस्य न चक्षुषा पश्यति कश्चनैनम्।
हृदा मनीषा मनसाभिक्लृप्तो य एनमेवंविदुरमृतास्ते भवन्ति. "

अर्थ—त्याचें स्वरूप दृष्टिगोचर नाहीं म्हणून त्यास डोळ्यांनीं कोणी पाहूं शकत नाहीं. तो अंतःकरणाचे ठायीं ध्यानाचे योगानें व मननानें जाणतां येतो. याप्रमाणें त्याचें स्वरूप जे जाणतात, ते अमृततत्त्वाचे अधिकारी होतात.

" दिव्यो ह्यमूर्तः पुरुषः सबाह्याभ्यन्तरो ह्यजः।
अप्राणो ह्यमना यं पश्यंति यतयः क्षीणदोषाः "

अर्थ—तो महापुरुष परमात्मा निराकार असून सर्व बाह्यान्तर सृष्टि व्यापितो. तो जन्मरहित असून प्राणन, जनन,

इत्यादिक क्रिया त्याला नाहींत. जे वैराग्यशील व निर्दोष तेच त्याला पाहूं शकतात..

" न चक्षुषा गृह्यते नापि वाचा नान्यैर्देवैस्तपसा कर्मणा वा ॥ ज्ञानप्रसादेन विशुद्धसत्वः ततस्तुतं पश्यते निष्कलं ध्यायमानः ॥ "

अर्थ—तो डोळ्यानें पाहतां येत नाहीं, वाणीनें वर्णितां येत नाहीं, इतर इंद्रियांनीं जाणतां येत नाहीं; तपश्चरण किंवा कर्माचरण करून त्याचें दर्शन होत नाहीं; परंतु ज्यास शुद्ध-ज्ञान होऊन ज्याचें अंतःकरण निर्मल झालें, तोच त्याचें तें निर्विकार स्वरूप ध्यानानें पाहातो.

या पूर्वोक्त प्रकारानें परमात्मस्वरूपाचें दर्शन झालें म्हणजे मनन निदिध्यासनाच्या योगानें तें अंतःकरणांत ठसून उज्ज्वलभाव दृष्टीस साक्षात् लभ्य होतें. तसें झालें असतां त्या आनंदमय, शांतिनिकेतन, मंगलधामाच्या ठायीं आपल्या आत्म्यास अभ्यासानें अचल निष्ठा प्राप्त होते; व निरंतर अधिकाधिक प्रेमानें आत्मा परमात्म्याचे ठायीं जडला म्हणजे भक्तियोगानें तो त्याचें नित्यसान्निध्य अनुभवितो. हा जो त्याच्या नित्यसान्निध्याचा व समागमाचा अनुभव, त्याच्या योगानें आत्म्यास शांति, शुद्धि, व आनंद यांचा सदां लाभ होतो. हेंच आत्म्याचें खरें जीवन, हेंच आत्म्याचें मोक्षसाधन, याच्याच योगानें आत्मा उन्नत व तेजस्वी होतो. याचे योगानेंच पापाविषयीं तिरस्कार,

सत्कर्मांविषयीं आदर, सर्व भूतांचे ठायीं दयादृष्टि, शमदमादि आध्यात्मिक संपत्ति इत्यादि सर्व प्राप्त होतें. आत्मा परमात्म्यावर सर्व प्रकारें निर्भर होतो, व परमात्म्याच्या इच्छेस अनुकूल अशीच आपली इच्छा ठेवितो. कामक्रोधादि आध्यात्मिक रोग त्यास बाधा करूं शकत नाहींत. तो गेल्याचा शोक करीत नाहीं, संकटाची चिंता करीत नाहीं, व जरामरणाचें भय बाळगीत नाहीं. तो देहसंस्था चालवितो; देहसंबंधी सर्व कर्तव्यकर्में विवेकपूर्वक करितो; व प्राणीमात्रांविषयीं सदयबुद्धि ठेवून आपलीं सर्व ऐहिक कर्तव्यकर्में निष्ठापूर्वक करितो. तद्विषयक श्रम किंवा क्लेश झाले तरी त्यांची क्षति न करितां आपले सर्व ऐहिक संबंध योग्यप्रकारें रक्षितो; परंतु त्यांत आसक्त न होतां देहवियोगास पाहिजे तेव्हां सिद्ध असतो.

" छायां मार्गद्रुमोत्थां पथिक इव मनाक् संश्रयेद्देहसंस्थां ।
स्वात्मारामं प्रवेष्टुं सखलु सुखमयं प्रव्रजेद्देहतोऽपि ॥ "

अर्थ—ज्याप्रमाणें एकादा प्रवासी मार्गावरील वृक्षाचे छायेखालीं विश्रांतीस्तव कांहीं वेळ बसतो, परंतु पुढें मार्ग क्रमून आपल्या घरीं पोंचण्यास उत्सुक असतो, त्याप्रमाणें ज्याचा आत्मा आपण कांहीं काळपर्यंत या शारीरिक जीवनांत राहिलों आहों, परंतु आपलें घर परमात्मा आहे, तिकडे आपल्यास जावयाचें आहे, असें जाणून तिकडे जाण्यास उत्सुक असतो, तो संतोषानें हा देह सोडून परमात्म्याकडे जाऊं शकतो.

आतां वर वर्णिलेलें ईश्वरदर्शन, व त्याच्या नित्य अनुभ-

वानें प्राप्त होणारी ईश्वरनिष्ठा, हीं दोन आत्मजीवनरक्षणाचीं व आत्मपोषणाचीं, म्हणजे आत्मा पारमार्थिक बलानें अधिकाधिक बलिष्ठ व तेजस्वी करण्याचीं मुख्य साधनें होत. शरीररक्षणास व पोषणास जसें अन्नोदक, तसेंच आत्मजीवनास व आत्मरक्षणास ईश्वरसमागमजन्य प्रेम, चित्तशुद्धि व शांति हीं होत. परंतु क्षुधातृषा प्रदीप्त राहिल्यावांचून अन्नोदकाचें सेवन होत नाहीं, आणि व्यायामावांचून क्षुधा तृषा लागत नाहीं; तद्वत् आत्म्यानें निरालस्यानें व सावधपणानें आपलीं सर्व कर्तव्यकर्में करीत असणें, हा जो आत्म्याचा व्यायाम, तो यथास्थित होत असला म्हणजे त्यास पुनः पुन्हा ईश्वरसमागमरूप अन्नोदक व ईश्वरनिष्ठारूप विश्रांति, यांचें ग्रहण अवश्य वाटतें. त्याचे योगानें कर्तव्याचरणानें होणारा आध्यात्मिक श्रम दूर होतो, व आत्मा फिरून कर्तव्याचरणास समर्थ होतो.

परंतु शारीरव्यापार यथास्थित चालण्यास ज्याप्रमाणें शरीराची अंतर्बाह्य सर्व प्रकारची मलिनता लक्षपूर्वक व यत्नपूर्वक नित्य दूर केली पाहिजे, त्याप्रमाणें आत्म्याचे सर्व व्यापार यथास्थित होण्यास त्याच्या ठिकाणीं ही गैरसावधपणानें होणारी असद्वासनारूप, असद्भावरूप, व असद्विचाररूप, अभ्यन्तर मलिनता, व असत्प्रवृत्तिरूप बाह्य मलिनता, यांचेंही लक्ष्यपूर्वक व प्रयत्नपूर्वक वारंवार परिशोधन करीत असलें पाहिजे. तरच ज्ञान, ध्यान, मनन, निदिध्यासन, उपासना इत्यादि

आत्मिक व्यवसाय यथास्थित होतील. ही आत्मिक मलीनता दूर करण्यास शुद्धिसाधनें आत्मपरीक्षण व अनुताप हीं होत.

पूर्वी जें आध्यात्मिक जीवन म्हणून शारीरिक जीवनाहून निराळें सांगितलें, तें यथार्थज्ञानानें चांगलें समजलें, निर्मळ श्रद्धेनें सत्यता पावलें, आणि अचल श्रद्धेनें पाहिजे तेव्हां बाह्य जीवनाप्रमाणें ज्ञानदृष्टीस प्रत्यक्ष होऊं लागलें, तरी स्वभावतः आपलें मन प्रायः शारीरिक जीवनांत निमग्न होत असल्यामुळें आपण बुद्धिपुरःसर त्यांतून त्यास काढून आत्मिक जीवनाकडे वळविलें पाहिजे. हें जितकें वारंवार घडेल तितकें चांगलें. परंतु दिवसांतून निदान एक दोन वेळ तरी एकांतीं अव्यग्रमनानें या आत्मिक जीवनाचा अनुभव घेतला पाहिजे;—

" एकाकी चिंतयेन्नित्यं विविक्ते हितमात्मनः;
एकाकी चिंतयन्योहि परं श्रेयोऽधिगच्छति. "

अर्थ—नित्य एकांतीं एकटें बसून आत्मकल्याणाविषयीं चिन्तन करावें. याप्रमाणें एकांतचिंतन केलें असतां आत्म्याचें परम कल्याण होतें.

या एकांत चिंतनामध्यें हळू हळू मन बाह्य विषयांतून काढून आत्मस्वरूपाकडे लावावें. आत्मस्वरूप प्रतीत झालें म्हणजे आदरपूर्वक स्मरणानें परमात्मदर्शन करून, त्याच्या अत्यंत पवित्र व आनंदकारक गुणांचें ध्यान करून, आपला आत्मा तद्विषयक लीनता, पूज्यबुद्धि, दृढानुराग, इहींकरून युक्त झाला, म्हणजे परमेश्वरचरणीं शरणापन्न होऊन सर्व

आत्मस्थिति त्यास निवेदन करावी. आत्मगत दोष प्रांजल बुद्धीनें व शुद्धपश्चात्तापयुक्त अंतःकरणानें त्यापुढें ठेवून, अत्यंत विनम्रपणें व अनन्यगतिकत्वानें त्यापाशीं आपली दुर्बलता कबूल करून, घडलेल्या दोषांविषयीं क्षमा मागावी. पुढें ते दोष टाळण्याविषयीं अंतःकरणपूर्वक केलेला निश्चय त्यास अतिविनयानें सांगून, दीनपणें तो सिद्धीस नेण्याविषयीं त्याच्या कृपेचें साह्य मागावें. याप्रमाणें ईश्वरसमागम करून, त्यापासून आत्म्यावर झालेले शुद्धि, आनंद, समाधान, लीनता इत्यादि संस्कार कांहीं वेळपर्यंत तसेच आत्म्याचे ठायीं आत्मगत होऊं द्यावे. अनिर्वाहपक्षास्तव पुनः शारीरिक प्रवृत्तीचा स्वीकार लौकरच केला पाहिजे हें खरें. परंतु तो पूर्वोक्त संस्कारांचा अनुभव घेत घेत हळू हळू करावा. असें नियमानें करित असलें म्हणजे आपली बाह्यप्रवृत्तिसुद्धां निर्मल व विवेकयुक्त होते; आणि शरीररक्षण, स्त्रीपुत्रादिक आप्तांशीं सहवास, त्यांचें सर्व प्रकारें संगोपन, इतरांशीं सहवास, त्यांविषयीं आपलें अवश्य कर्तव्य, इत्यादि सर्व बाह्य प्रपंच आपण ईश्वराज्ञेनेंच करीत आहों, अतएव तो आस्थापूर्वक निःस्वार्थ बुद्धीनें अवश्य कर्तव्य म्हणूनच करावा असें आपल्यास वाटतें. त्यांत आपणाकडून आळस किंवा अनास्था होत नाहीं. पारमार्थिक बुद्धि नित्य एकांतीं आत्मिक जीवनाचा अनुभव घेऊन जागृत ठेविली, म्हणजे प्रपंचांत आपलें मन कधींही अमर्याद आसक्त होत नाहीं.

" वसन्विषयमध्येऽपि न वसत्येव बुद्धिमान्
संवसत्येव दुर्बुद्धिरसत्सु विषयेष्वपि. "

सारांश प्रपंचामध्यें ईश्वरनिष्ठापूर्वक वर्तावें, नेहमीं यथार्थज्ञानाच्या प्राप्तीविषयीं व जागृतीविषयीं तत्पर असावें, आणि जें जें प्रापंचिक कृत्य करावयाचें तें सर्व ईश्वरस्मरणपूर्वक त्यास निवेदन करावें.

" ब्रह्मनिष्ठो गृहस्थः स्यात् तत्त्वज्ञानपरायणः
यद्यत् कर्म प्रकुर्वीत तद्ब्रह्मणि समर्पयेत्. "

वर जें एकान्तीं परमात्मसमागमरूप आत्मिक जीवनाचें मुख्य अंग सांगितलें, तें होईल तितकें करून शारीरिक जीवनांत निमग्न होण्यापूर्वीं प्रत्यहीं करावें. नंतर शारीरिक जीवनांत निमग्न असतां होईल तितकें करून पारमार्थिक बुद्धीच्या जागृतीस साह्यकारक असाच समागम करीत जावा. तद्विपरीत समागम प्रयत्नेंकरून वर्जित जावा. पूर्वोक्त बुद्धि स्थिर होण्यास जो जो स्थलविशेष किंवा प्रसंगविशेष साह्यकारक वाटेल त्याचा उपयोग केल्यावांचून राहूं नये.

शेवटीं प्रपंचकृत्यें आटपल्यावर प्रत्यहीं पुनः एकान्तीं आत्मकल्याणचिन्तन करावें. तें विशेषेंकरून आत्मपरीक्षणरूपानें करावें. आपली पारमार्थिक बुद्धि कितपत जागृत राहिली, आपला विवेक कितपत विजयी झाला, आपले सुनिश्चय कितपत सिद्धीस गेले, आपल्यांतील लीनता इत्यादि सद्वृत्ति कितपत स्थिर राहिल्या, आपल्या ठिकाणीं कांहीं अहंते-

चा अंश उत्पन्न झाला कीं काय, झाला असेल तर तो कशानें झाला,व त्याचें निरसन कोणत्या विचारांनें होईल,आपली सदाचरणाची इच्छा व पापाचरणाचा तिरस्कार हीं कितपत जागृत राहिलीं,आपणाकडून आत्मविषयक, परविषयक व ईश्वरविषयक कर्तव्यांत काय अंतर पडलें, सारांश, ईश्वरास आपण विशेष प्रिय, किंवा विशेष अप्रिय झालों, कल्याणाचे मार्गांत आहों. किंवा अकल्याणाचे मार्गाकडे वळलों, आपला आत्मा उन्नतभाव धारण करीत आहे, किंवा अधोमुख होत आहे, या सर्व आत्मिक जविनसंबंधीं गोष्टींच्या संबंधानें आपल्या आत्म्याचें कसोशीनें परीक्षण करून, जें योग्य घडलें असेल त्याविषयीं कृतज्ञतापूर्वक समाधान मानून, जें अयोग्य घडलें असेल त्याविषयीं अंतःकरणपूर्वक व अत्यंत खेदपूर्वक अनुताप करून चित्त निर्मल झालें म्हणजे तें ईश्वराकडे योजून, त्यापाशीं आपल्या सर्व अपराधांची अत्यंत दीनवृत्तीनें क्षमा मागावी,आणि पुढें विशेष आस्थेनें व जागृतीनें आपले शुभ संकल्प सिद्धीस नेण्याचा निश्चय करून, तदर्थ सविनय आपला वत्सल पिता व गुरु जो परमेश्वर त्याचें साह्य मागावें. आणि पुनः अनन्यगतिकत्वानें बालक मातेवर निर्भर होऊन राहातें, त्याप्रमाणें आपला आत्मा परमप्रेमास्पद ईश्वरस्वरूपीं निर्भर करून निश्चित व्हावें.

येथवर जें सांगितलें आहे तें आत्मिक जीवनाच्या दिनचर्येविषयीं प्रायः सांगितलें आहे. याप्रमाणें दिनचर्या प्रत्यहीं

ठेविली तर आत्मिक जीवन यथास्थित होऊन आत्मसंरक्षण सुखकर होईल. परंतु आत्मिक जीवनावर आपल्या दुर्बलतेमुळें अकस्मात् येणारे आघात चुकविण्यासाठीं, व आत्मिक बळ सर्वप्रसंगीं अपराजित राहण्यासाठीं, व पूर्वोक्त दिनचर्या ही आस्थापूर्वक घडून येण्यासाठीं, वेळोवेळीं, संधि सांपडेल तेव्हां, जेथें सृष्टिस्वरूप अत्यंत रमणीय व ईश्वरी गुण मनांत ठसण्यास अत्यंत उपकारक आहे, अशा एकांत स्थळीं कांहीं काळपर्यंत घालवून एकाग्र चित्तानें आत्मिक जीवनाविषयीं विचार केला पाहिजे. तेणेंकरून आत्मिक शक्ति विशेष सुदृढ होऊन आत्म्याचें औदासीन्य जाऊन निश्चयाचें बळ वाढतें, आणि उत्साहही वाढतो. तसेंच परमार्थिक प्रवृत्तीस अत्यंत उपयोगी अशा ग्रंथांचें वाचन, परमार्थपरायण मनुष्यांच्या चरित्रांचें परिशीलन, आणि साधेल तितका ज्या ज्या मनुष्यांचा जो जो आत्मिक गुण विशेष आढळेल त्या त्या गुणाच्या प्राप्तीसाठीं त्या त्या मनुष्याचा समागम, याही गोष्टी आत्मिक जीवनाच्या सिध्दयर्थ व आत्मसंरक्षणार्थ करीत असलें पाहिजे. येथें जें कांहीं सांगितलें आहे त्याचा आशय शारीरिक जीवनाविषयीं दुर्लक्ष्य करावें असा मुळींच नाहीं, व तसें दुर्लक्ष्य होण्याचाही प्रायः संभव नाहीं. परंतु आत्मिक जीवनाविषयीं प्रायः जें भान देखील नाहींसें होतें, व ज्याच्या योगानें शारीरिक जीवनही यथायोग्य होऊं शकत नाहीं, तें न व्हावें आणि आत्मिक जीवनाचें महत्त्व व त्याचा आणि शारीरिक

जीवनाचा खरा संबंध ध्यानांत येऊन प्रवृत्तिपूर्वक निवृत्तिमार्ग, व निवृत्तिपूर्वक प्रवृत्तिमार्ग, असे दोन्ही मार्ग सिद्ध होऊन मानवी जीवनाचें सार्थक व्हावें, हाच या विवरणाचा आशय आहे. मनुष्यास आपल्या ऐहिक कुटुंबाचें रक्षण करणें जसें अवश्य आहे, तसेंच पारमार्थिक कुटुंबाचेंही रक्षण करणें अत्यंत आवश्यक आहे. आत्म्याचा सात्विक श्रद्धारूप पत्नीशीं योग असला म्हणजे तिजपासून बोध, विवेक, उपशम, विनय, उत्साह इत्यादि सद्भाव उत्पन्न होतात;तशाच जागृति, विरक्ति भक्ति, शुचिता, निष्ठा इत्यादि सद्वृत्ति उत्पन्न होतात. या सर्व पारमार्थिक कुटुंबाचें संगोपन केल्यावांचून ऐहिक कुटुंबाचें पालन यथास्थित होत नाहीं. व या दोहींचें संगोपन योग्य प्रकारें झाल्यावांचून मानवी जीवन कृतार्थ होत नाहीं. सारांश, आत्मसंरक्षणार्थ या दोहोंचेंही परिपालन आवश्यक आहे.



सत्संगति.

पारमार्थिक मार्गाचीं अनुभवी पुरुषांनीं जीं साधनें सांगितलीं आहेत त्यांमध्यें सत्संगति हें मुख्य साधन होय. कारण भक्ति, ज्ञान, वैराग्य, शम, दम, तितिक्षा, मुमुक्षुत्व इत्यादि साधनें जरी मोठ्या महत्त्वाचीं आहेत तरी त्यां सर्वांची सिद्धि पुष्कळ अंशीं सत्संगतीवर अवलंबून आहे. समर्थ रामदास स्वामींनीं श्लोकरूपानें मनास जो बोध केला आहे, त्यांत एके ठिकाणीं असें म्हटलें आहे:—

" सदां सर्वदां सज्जनाचेनियोगें ।
क्रिया पालटे भक्ति भावार्थ लागे । "

म्हणजे जर सतत सत्पुरुषांचा समागम असला तर आपल्या हृदयांत भाव ठसतो, ईश्वराचे ठायीं भक्ति दृढ होते आणि क्षमा, दया, शांति इत्यादि गुणानुरूप आपलेकडून क्रिया घडून येते. नुसतें पारमार्थिक गोष्टींचें शाब्दिक ज्ञान आपल्यास झालें किंवा कचित् सद्वृत्तीही अंतःकरणांत उदित होऊं लागल्या, तरी त्यांपासून परमार्थाचा लाभ तादृश होतो असें नाहीं. जें ज्ञान झालें तें अनुभवास आलें पाहिजे, ज्या सद्वृत्ति कचित् अंतःकरणांत उत्पन्न होतात त्या स्थिरावल्या पाहिजेत; आणि तदनुरूप आपल्या कायिक, वाचिक व मानसिक सर्व क्रिया सदैव घडूं लागल्या पाहिजेत, तेव्हांच पारमार्थिक साधनांची सिद्धि झाली असें म्हणतां येईल. व पारमार्थिक मार्गाचें अवलंबन केल्यानें आत्म्याची जशी सात्त्विक, प्रेमळ व शांत

स्थिति व्हावी तशी होईल. परंतु हा क्रियेचा पालट ज्यांच्या ठायीं साक्षात् घडून आलेला आहे, अशांचा समागम केल्याशिवाय कसा होणार आहे ? ब्रह्मनिष्ठांचें परमश्रेष्ठ लक्षण असें सांगितलें आहे:—

" आत्मक्रीड आत्मरतिः क्रियावान् एष ब्रह्मविदां वरिष्ठः "

म्हणजे ज्यांचें चित्त परमात्मचिंतनांत व परमात्मभक्तींत रममाण असतें व ज्याच्या सर्व क्रिया सद्भावास अनुसरून असतात तोच खरा ब्रह्मवेत्ता, म्हणजे ईश्वरनिष्ठ पुरुष होय. सारांश, अंतरीं सद्वृत्ति, व व्यवहारांत तीस अनुसरून आचरण हीं परमार्थपरतेचीं मुख्य लक्षणें होत. परंतु हीं सत्पुरुषांच्या समागमावांचून कशीं प्राप्त होतील ? ग्रंथावलोकनानें यथार्थ ज्ञान होऊं शकेल, परंतु वृत्तीचा व क्रियेचा पालट सत्संगतीवांचून घडणें कठीण. म्हणून साधेल तितकी परमार्थसाधकांनीं सत्संगति अवश्य केली पाहिजे. परंतु ती घडते कशी ? प्रस्तुतकाळीं प्रल्हादनारदासारखे, किंवा अंबरीष-शुकासारखे, किंवा ज्ञानेश्वरतुकारामासारखे भगवद्भक्त व सत्पुरुष कोठें आहेत कीं ज्यांची आपण साधकांनीं संगति करावी. होय, ते किंवा तसे पुरुष हल्लीं नाहींत हें खरें, तरी ज्या वेळेस ते होते त्या वेळेस तरी लोकांनीं त्यांचा कोठवर व कोणत्या रीतीनें उपयोग करून घेतला बरें ? सर्वांस त्यांचा समागम इष्ट वाटत होता काय ? सर्वांस त्यांचा बोध रुचत होता काय ? नाहीं. म्हणून ज्यांस त्यांच्या समागमाची आवड लागून तो घडला असे

पुरुष फारच विरळा. पण ज्यांस तशा प्रकारचा समागम घडला त्यांस तरी विशेष लाभ त्यांच्या प्रेमळ, सात्त्विक व आदर-युक्त बोधानेंच घडला यांत संशय नाहीं. तशाच प्रकारचा बोध त्या परोपकारी व कृपाळू सत्पुरुषांनीं आपल्या शुद्ध व प्रेमळ वचनांच्या रूपानें आपल्या मागें ठेविला आहे. जर श्रद्धापूर्वक आपण त्या बोधवचनांचें वारंवार परिशीलन केलें तर भाग्यवशात् आपल्याही चित्तांत तो बोध कां ठसणार नाहीं? अवश्य ठसेल. प्रस्तुतकाळीं जरी पूर्वोक्त भक्तांच्या बरोबरीचे सत्पुरुष आपल्यास आढळले नाहींत तरी कांहीं अंशीं तरी त्यांचे गुण कित्येक व्यक्तींमध्यें आपल्यास अवश्य आढळतील. कोणाचे ठायीं आपल्यापेक्षां भाविकपणा विशेष आढळेल. कोणामध्यें विनय जास्ती आहे असें दृष्टीस पडेल. कोठें भजनाची आवड, नामस्मरणाचा छंद; कोठें वैराग्य व कोठें शांति, कोठें क्षमा; व कोठें दया विशेष आहे असें शोधाअंतीं आपल्यास कंळून येईल. परंतु सात्त्विक बुद्धीनें या गोष्टीचा शोध केला पाहिजे. जर कुत्सित बुद्धीनें आपण पाहूं लागलों तर दुर्योधनाप्रमाणें आपली स्थिति होईल. आपल्यास चांगला मनुष्य मुळींच आढळणार नाहीं. परंतु जर भाविकपणानें पाहूं लागलों, तर धर्माप्रमाणें आपल्यास प्रायः मनुष्यमात्रांमध्यें कांहींतरी चांगुलपण आहे असें प्रत्ययास येईल. मग सर्व पारमार्थिक गुण एकच मनुष्यामध्यें जरी सांपडले नाहींत तरी जो जो सद्भाव ज्या ज्या पुरुषामध्यें विशेष आ-

ढळून येईल तो तो त्या त्या पुरुषाशीं समागम करून आपण संपादूं म्हटलें तर कां होणार नाहीं? अवश्य होईल. परंतु आपल्या भाग्यहीनतेमुळें आपण जर केवळ दोषैकदृष्टि झालों तर साक्षात् नारदादिकांचा समागम जरी आपल्यास झाला तरी त्यापासून काय फल होणार आहे? यास्तव भाविकपणानें पूर्वोक्त प्रकारांनीं सत्समागम संपादून, हळू हळू परमार्थमार्गाचें क्रमण आपण करीत असावें.



ईश्वरनिष्ठा.

परमार्थसिद्धीस ज्या अडचणी येतात त्यांत मुख्य अडचण प्रपंचासक्ति ही होय. ज्याप्रमाणें एकादा मनुष्य प्रतिबंधांत सांपडला असतां त्यांतून सुटून जाण्यास नाना उपाय योजितो, परंतु पराधीनतेमुळें त्याचे ते सर्व उपाय निष्फल होतात, त्याप्रमाणें या प्रपंचासक्तिरूप कारागृहांतून सुटण्याकरितां साधक जप, तप, नेम इत्यादि नानाप्रकारचीं साधनें करितात, परंतु त्यांची मुक्तता होत नाहीं. म्हणून या प्रपंचासक्तीस कोठें कोठें पारमार्थिक ग्रंथांत बंध असें म्हटलें आहे. तसेंच एकादा पक्षी जेव्हां फांसेपारध्याच्या पाशामध्यें सांपडतो, तेव्हां त्यांतून सुटून जाण्याविषयीं यत्न करून पाहातो. परंतु मार्ग सांपडेनासा झाला म्हणजे तडफडतो. त्याप्रमाणें मुमुक्षु जीव या प्रपंचासक्तींतून सुटण्याविषयीं शमदमादि उपाय करून पाहातो, परंतु त्यांतून सुटका होत नाहीं, तेणेंकरून वारंवार परम क्लेश पावतो. म्हणून प्रपंचासक्तीस पाश असेंही म्हटलें आहे. त्याचप्रमाणें एकादा पांथस्थ पर्जन्यकाळीं प्रवास करीत असतां मार्गांत महापुरानें भरून चाललेली अशी एकादी विशाळ नदी पाहून आपल्यास आतां परतीरास कसें जावयेल म्हणून अत्यंत चिंताक्रांत होऊन बसतो. तसाच मुमुक्षूस प्रपंचासक्तींतून पार पडण्याचा उपाय कांहीं सुचेनासा झाला म्हणजे ती दुर्लंघ्य वाटून तिला तो महानदीची उपमा देतो. क्वचित् या प्रपंचासक्तीचें स्वरूप त्याहीपेक्षां भयंकर व दुस्तर वाटून तिला

पारमार्थिक ग्रंथांत सागराचीही उपमा दिली आहे. सागरामध्यें जसा अपरंपार उदकाचा संचय असतो, त्याप्रमाणें या प्रपंचासक्तींत अपरंपार दुःख, भय व क्लेश यांचा संचय असतो. समुद्रांत जसे मगरादि भयंकर प्राणी संचार करीत असून त्यांच्या सपाट्यांत एकादा मनुष्य सांपडला असतां त्यास ते खाऊं पाहतात, त्याप्रमाणें या संसारसमुद्रांत कामक्रोधादि भयंकर विकार साधकास क्षणोक्षणीं भयभीत करून टाकतात. ज्याप्रमाणें वादळामध्यें वारा चोहोंकडून मोठ्या सपाट्यानें वाहूं लागतो आणि पर्वतासारख्या भयंकर लाटा उसळूं लागतात आणि त्यामध्यें सांपडलेल्या मनुष्यास आतां गरक करून टाकतील, क्षणांत गरक करून टाकतील, असें वाटतें; त्याप्रमाणें नानाप्रकारच्या विषयवासनारूप प्रचंड लाटा या संसारसमुद्रांत उसळत आहेत, त्यांचें भयंकर स्वरूप पाहून साधकजन अत्यंत व्याकूळ होऊन जातात. समुद्रांत जसे परस्पर विरुद्ध ओघ एकत्र मिळून मोठे भोंवरे होतात, ज्यांमध्यें मनुष्य किंवा नौका सांपडली असतां गरगर फेरे घेऊन तळास जाते, त्याप्रमाणें या संसारसागरांत मायाममतादिकांचे भोंवरे साधकास वारंवार आपल्या भयंकर फेऱ्यामध्यें घालितात. अशा भयंकर प्रसंगीं मनुष्यें समुद्रांत सांपडलीं असतां भोंवऱ्यामध्यें सांपडून फेरे घेतात किंवा लाटांमध्यें सांपडून इकडून तिकडे हेलकावे घेतात, त्याप्रमाणें मनुष्य नानावासनावश होऊन विषयप्राप्तीसाठीं अनेक प्रकारच्या उद्योगाच्या हेलकाव्यांत सांपडतो,

आणि कसें तरून जावें हें त्यास कळत नाहीं. ही जी भयंकर समुद्ररूप प्रपंचासक्ति ती तरून जाण्यास परमार्थदृष्टि पुरुषांनीं नानाप्रकारचे उपाय सांगितले आहेत. समुद्र तरून जाण्यास जसें नौकेशिवाय दुसरें साधन नाहीं त्याप्रमाणें हा संसार तरून जाण्यास ही पारमार्थिक नौका पाहिजे. ती नामनौका होय, असें या पुढील अभंगांत साधु तुकारामांनीं संसारावर समुद्राचें रूपक करून सांगितलें आहे:—

"ऐसा दुस्तर भवसागर । नेणों कैसा उतरूं पार ॥ १ ॥
कामक्रोधादि सावजें थोर । दिसताती भयंकर ॥ २ ॥
मायाममतेचे भोंवरे । घेती भयानक फेरे ॥ ३ ॥
वासनेच्या लहरी येती । उद्योग हेलकावे बसती ॥ ४ ॥
तरावया एक युक्ति असे । तुका नामनावेमधीं बैसे" ॥ ५ ॥

म्हणजे अत्यंत दुस्तर व भयंकर असा जो भवसागर तो तरून जाण्यास भगवंताचें नामस्मरण हा एक उपाय आहे. श्रीमच्छंकराचार्यांनीं याचप्रकारचें संसारसमुद्राचें रूपक करून शमदमादि सामग्रीनें परिपूर्ण अशी ज्ञाननौका हेंच साधन होय असें सांगितलें आहे. त्या नौकेंत बसून, म्हणजे परमात्मस्वरूपाचें यथार्थ ज्ञान संपादून, सत्संगति आणि वैराग्य या उभयविध मार्गाचें अवलंबन करून हा संसारसमुद्र तरून जावें असें सांगितलें आहे. कोठें पारमार्थिक ग्रंथांतही ज्ञाननौका ही दुर्बल वाटून ईश्वरनिष्ठेशिवाय दुसरी नौका किंवा तरणो-

पाय नाहीं म्हणून तिचाच आश्रय करून पारमार्थिक ज्ञानसंपन्न साधकांनीं उत्तीर्ण व्हावें, म्हणून सांगितलें आहे.

"ब्रह्मोडुपेन प्रतरेत विद्वान् । स्रोतांसि सर्वाणि भयावहानि॥"

म्हणजे परमेश्वराचाच आश्रय करून या संसारसमुद्रामध्यें महासागरांतील नाना भयंकर प्रवाह वाहत आहेत त्या सर्वांतून तरून जावें. तात्पर्य, हें सर्व जग ईश्वराधीन आहे. त्याच्या सत्तेनेंच हें चाललें आहे. आपण सर्वप्रकारें दुर्बळ आहों. त्याच्या कृपेवांचून आपल्यास सुखलेशही प्राप्त होत नाहीं. त्याची कृपा झाल्यावांचून आपल्यास सद्गति प्राप्त व्हावयाची नाही. तोच आपला त्राता, असा दृढनिश्चय करून त्याची इच्छा प्रमाण मानून त्याचे ठायीं चित्त निर्भर व स्थिर करून सदैव त्यांचें चिंतन करावें. तेणेंकरून त्याचे ठायीं प्रेम जडून इतर विषयांची आवड कमी झाली म्हणजे सहजच या प्रपंचासक्तिरूप महासागरांतून आपण पार पडून कृतार्थ होऊं. "ब्रह्मसंस्थोऽमृतत्वमेति;" म्हणजे जो ईश्वरनिष्ठ तोच अमृतत्व अथवा मोक्ष पावतो.



वैराग्य.

पारमार्थिक मार्गांत साधकाची मति दृढ राहण्याकरितां जे उपाय सांगितले आहेत, त्यांत वैराग्य हा मोठ्या महत्त्वाचा उपाय म्हणून सांगितलें आहे. कित्येकांनीं तर इतर सर्व उपायांपेक्षां यास अधिक महत्त्व दिलें आहे. वैराग्य म्हणजे विरक्ति, इंद्रियगोचर किंवा मनःकल्पित नाशवंत विषयांविषयीं अनासक्ति. परमेश्वरानें हें मानवी शरीर आणि त्याचा धारक आत्मा या दोहोंचा संयोग करून शरीर आत्म्याचें अंकित करून ठेविलें आहे, म्हणजे आत्म्याच्या चेतनेशिवाय तें आपल्या भिन्न भिन्न क्रिया करूं शकत नाहीं. तरी आत्म्यास शरीराचे म्हणजे इंद्रियांचे द्वारें बाह्य विषयांचा परिचय होऊन त्यांची गोडी लागली म्हणजे तो त्यांच्यावर लुब्ध होऊन शरीराचा अधिष्ठाता असतांही अगदीं शरीरवशंगत होऊन केवळ इंद्रियांच्याच स्वाधीन राहतो. असें झालें म्हणजे त्याचा सारासारविचार नष्ट होऊन तो विषयवासनाजालांत सांपडतो आणि त्यांतून सुटका झाली नाहीं, तर हळू हळू दुष्कर्मांस प्रवृत्त होऊन अज्ञान व पाप यांहीं व्याप्त होत्साता अधोगतीस जातो. परंतु भाग्यवशात् सत्समागम होऊन सुबोध अंतःकरणांत ठसून बाह्य विषयांचें नश्वरत्व न समजतां व त्यांचे ठायीं मनं आसक्त झालें असतां त्यांपासून उत्पन्न होणारें जडत्व व अविवेक आणि परिणामीं प्राप्त होणारी दुर्गति या सर्वांचें भयंकर स्वरूप दृढतर मनांत बाणलें जाऊन कित्ये-

क सावध होतात. आणि बाह्यजीवनापेक्षां आध्यात्मिक जीवन विशेष महत्त्वाचें आहे असें त्यास वाटूं लागतें. बाह्य ऐश्वर्य कितीही वाढलें, द्रव्यसंचय कितीही केला, अधिकार केवढाही प्राप्त झाला, लोकांमध्यें प्रतिष्ठा कितीही मिळविली, तथापि पारमार्थिक जीवनास यांचा तादृश उपयोग न होतां उलटचा ह्या गोष्टी आत्म्यास मोहांत पाडून पारमार्थिक संपत्तीचे लोभाविषयीं पराङ्मुख करितात. हें ज्ञान दृढ झालें म्हणजे बाह्यविषयांपासून शाश्वत सुखाची प्राप्ति व्हावयाची नाहीं असा बुद्धीचा निश्चय होऊन विषयांवरील आसक्ति आपोआप कमी होत जाते.

" पराचः कामाननुयंति बालास्ते मृत्योर्यांति विततस्य पाशम् । अथ धीरा अमृतत्वम् विदित्वा ध्रुवमध्रुवेष्विह न प्रार्थयन्ते ". अज्ञजन बाह्यविषयांत आसक्त होऊन राहातात व तेणेंकरून मोहपाशांत सांपडून पारमार्थिक जीवनाचें अत्यंत विस्मरण हा जो आत्मिक मृत्यु त्याचा पंथ धरितात. परंतु जे विवेकसंपन्न असतात ते नाशवंत ऐहिकविषयांमध्यें शाश्वत सुखाची आशाच करीत नाहींत, म्हणून बाह्यविषयांविषयीं उदासीन वृत्तीनें राहतात. ही जी बाह्यविषयांविषयीं उदासीनवृत्ति, तिलाच विरक्ति किंवा वैराग्य हें नांव दिलें आहे. परंतु हें वैराग्य नुसतें बाह्यविषयांतून मन काढून घेण्याचा यत्न केल्यानें दृढ होत नाहीं, मनास सुखाचा दृढ अभ्यास झाल्यामुळें सुखावह जे बाह्यविषय त्यांचा त्याग अत्यंत दुष्कर होतो. केवळ निग्रहानें बाह्य-

विषयांचें ग्रहण कांहीं काळ न केलें तरी त्यांची आवड नाहींशी होत नाहीं. आत्म्यास परमेश्वराच्या आनंदमय स्वरूपाचें दर्शन होऊन मन त्याचेठायीं रममाण झालें तरच ही आवड क्षीण होते. " रसो वै सः रसंह्येवायं लब्ध्वाऽनंदीभवति " परमात्मा आनंदस्वरूप आहे. त्याच्याच प्राप्तीनें आत्मा शाश्वत आनंद पावतो. परमात्माच एक परमप्रेमास्पद होय. त्याचेठायीं ज्यांचें चित्त स्थिरावलें तेच पूर्ण प्रेमाचा अनुभव घेऊं शकतात. कित्येक मनुष्यें विपत्तीनें किंवा शारीरिक व्यथेनें किंवा कांहीं संसारोद्वेगामुळें प्रपंचाचा त्याग करून घरदार सोडून जातात. परंतु अशा त्यागानें खरें व दृढ वैराग्य होत नाहीं. अशा मनुष्यांची विषयासक्ति नाहींशी होत नाहीं. ते पुनःपुन्हा विषयमोहाच्या फेऱ्यांत पडतात. मग ते घरांत असोत किंवा वैराग्याच्या वेशानें बाहेर फिरोत. पारमार्थिक जीवनास अत्यंत आवश्यक असें जें वैराग्य म्हणजे शारीरिक जीवनाविषयीं दृढ अनासक्ति, तें परमात्मस्वरूपीं आत्मा एकनिष्ठ झाल्यावांचून सिद्ध व्हावयाचें नाहीं.

" छायां मार्गद्रुमोत्थां पथिक इव मनाक् संश्रयेद्देहसंस्थां ।
स्वात्मारामं प्रवेष्टुं सखलु सुखमयं प्रव्रजेद्देहतोऽपि ॥ "

जसा एकादा मार्गस्थ मनुष्य मार्गांत उन्हाचे वेळीं विश्रांति घेण्यासाठीं एकाद्या वृक्षाच्या छायेखालीं घटकाभर बसतो, परंतु आपली मजल पुढें राहिली आहे ती आटपल्याशिवाय आपलें घर आपल्या हातीं येणार नाहीं असें वाटून तो जसा त्या

छायेच्या सुखांत लुब्ध होऊन न राहतां लवकरच आपल्या घराचा मार्ग धरितो, त्याप्रमाणेंच आपल्यास पारमार्थिक जीवनाच्या मार्गांत पुढें जावयाचें आहे व परमात्मपदीं दृढ निष्ठा संपादन करावयाची आहे या गोष्टीकडे पूर्ण लक्ष्य ठेवून जे शारीरिक जीवनाचा अनासक्तबुद्धीनें उपभोग करितात, तेच त्याचा त्याग करून खरें वैराग्य संपादूं शकतात. अशा वैराग्यांत आणि बाह्यकर्तव्यकर्मांत विरोध येण्याचें मुळींच करण नाहीं. अवश्य कर्तव्य म्हणून जीं बाह्य कर्में करावयाचीं तीं आसक्त बुद्धीनें करतां कामा नयेत. केवळ ईश्वराज्ञा म्हणून व ईश्वरेच्छानुसारें तीं करावयाचीं. असें झालें असतां वैराग्य आणि लोकोपयोगी परोपकार किंवा सत्कर्माचरण या दोहोंसही पारमार्थिक जीवनांत जागा मिळते. आणि जसें जसें पारमार्थिक जीवन सुखावह होत जातें तसतशी आपली भूतदया व परोपकारबुद्धि आपल्या लौकिक आचरणांत अधिकाधिक दृष्टिगोचर होते.



धर्मबुद्धीची जागरूकता.

धर्मबुद्धि अथवा परमार्थबुद्धि ज्याच्या ठायीं जागरूक असते अशीं मनुष्यें पृथ्वीच्या पाठीवर फार असतात असें नाहीं. पारमार्थिक भाग्य थोडयांसच प्राप्त होतें. भगवद्गीतेंत म्हटलें आहे " या निशा सर्वभूतानां तस्यां जागर्ति संयमी । यस्यां जाग्रति भूतानि सा निशा पश्यतो मुनेः । " म्हणजे जी मनुष्यमात्रांची रात्र तो धार्मिक पुरुषाचा जाग्रतीचा काल होय; आणि मनुष्यमात्रांस जो जागृतिकाल तो ज्ञानसंपन्न धर्मपरायण अशा पुरुषाचा रात्रिकाल होय, हें अगदीं यथार्थ आहे.

प्रायः सर्व मनुष्यें क्षणभंगुर शारीरिक जीवनांत म्हणजे बाह्य प्रपंचाच्या अनेक प्रकारच्या व्यवधानांत निरंतर निमग्न असतात. आपल्या आत्म्यास सद्गति कशी प्राप्त होईल, ती प्राप्त होण्यास काय उपाय केले पाहिजेत, कोणचे गुण संपादिले पाहिजेत, कोणच्या प्रकारच्या सहवासांत राहिलें पाहिजे, इत्यादिक गोष्टींविषयीं विचार त्यांच्या मनांत प्रायः येत नाहींत. आले तरी फार वेळ राहात नाहींत आणि पाण्यावरील बुडबुडयांप्रमाणें किंवा स्वप्नांतील कल्पनातरंगांप्रमाणें उत्पन्न होऊन लागलेच नष्ट होतात. यास्तव पारमार्थिक बुद्धीच्या संबंधानें ते अज्ञाननिद्रेनें अगदीं व्याप्त असतात. परंतु परमार्थपरायण मनुष्यें विशेषेंकरून आपल्या आध्यात्मिककल्याणाविषयींच विचार करीत असतात. शारीरिक जीवनाविषयीं व बाह्य प्रापंचिक व्यवहाराविषयीं त्यांचें चित्त बहुतकरून उदासीन अ-

सतें. त्यांची बुद्धि पारमार्थिक कल्याणाविषयीं जशी जागरूक असते तशी बाह्यस्वार्थाविषयीं नसते. जसा लोभी मनुष्य आपला धनसंचय वारंवार पाहात असतो व सर्वप्रकारें त्याची वृद्धि कशी होईल याविषयीं काळजी वाहत असतो, त्याप्रमाणें परमार्थपरायण मनुष्य आपल्या पारमार्थिक संपत्तीस सावधानबुद्धीनें जपत असतो. आपला ईश्वरावरील भाव वाढत चालला आहे किंवा नाहीं. आपल्या ठिकाणीं त्याजविषयींचें प्रेम दिवसानुदिवस अधिकाधिक होत आहे कीं नाहीं; त्याचें ध्यान, भजन, नामस्मरण यांची गोडी वाढते आहे कीं नाहीं, आपल्या ठायीं भूतदया अधिकाधिक दृढ होते कीं नाहीं, परोपकाराविषयीं आपली प्रवृत्ति साहजिक होत चालली आहे कीं नाहीं, आपला अपकार करणारांविषयीं आपलें मन दिवसानुदिवस विशेष क्षमाशील होत आहे कीं नाहीं, बाह्यसुखाविषयीं विरक्ति आपल्या ठिकाणीं बाणत चालली आहे कीं नाहीं, व चित्तास मोह पाडणाऱ्या अशा दुःखाच्या व संकटाच्या प्रसंगीं आपल्यास योग्य शांतीचें अवलंबन करून ईश्वरनिष्ठेनें राहाववतें कीं नाहीं, इत्यादिक गोष्टींचा विचार धार्मिक मनुष्यांच्या मनांत वारंवार घोळत असतो. म्हणून अशा मनुष्यांचें मन त्यांविषयीं जागृत व तद्भिन्न मनुष्यांचें मन त्यांविषयीं निद्रिस्त असतें यांत संशय नाहीं.

वनवासांत द्रौपदीसह पांडव असतां धर्मराजास त्याच्या सात्त्विक वृत्तीविषयीं भीम, अर्जुन, द्रौपदी इत्यादिकांनीं पुष्कळ

प्रकारें दूषण दिलें. तें सर्व शांतपणें ऐकून घेऊन धर्मानें शेवटीं आपलें प्रतिज्ञेचें वचन त्यांस सांगितलें.

श्लोक—" मम प्रतिज्ञांच निबोध सत्याम् ।
वृणेच धर्ममृताज्जीविताच्च ॥"

म्हणजे माझी प्रतिज्ञा अशी आहे कीं, मला जिवापेक्षां, किंबहुना पारलौकिक सुखापेक्षां देखील, धर्म अत्यंत श्रेयस्कर वाटतो; अतएव मी धर्मास कोणच्याही कारणासाठीं सोडणार नाहीं.

याप्रमाणें धर्मपरायण पुरुष आपल्या पारमार्थिक जीवनाविषयीं सतत जागृत राहातो. या जागृतीचीं चिन्हें निरनिराळ्या मनुष्यांच्या ठायीं त्यांच्या त्यांच्या अधिकारानुरूप निरनिराळ्या प्रमाणानें असतात.

कित्येक लोक सर्व प्रापंचिक उद्योग सोडून आपला सर्व काळ प्रायः ईश्वराचें ध्यान,भजन,पूजन,नामसंकीर्तन, यांमध्येंच घालवितात. त्यांस प्रायः एकांतांत राहाण्याची आवड असते. ईश्वराकडे आपलें चित्त आपण लाविलें असतां आपल्यास कांहीं व्यत्यय ज्या ठिकाणीं येणार नाहीं अशा स्थळीं प्रायः ते आपला काळ बराच घालवितात आणि कधीं कधीं लोकसमूहांत ते गेलेच तर सावधानवृत्तीनें ईश्वराचे गुणानुवाद वर्णन करून, व त्याचें मधुर नाम गाऊन, लोकांस उपरति व्हावी एतद्विषयीं ते उपाय योजीत असतात.

आपल्या स्वतांला ईश्वरी समागमाचा जो अपूर्व लाभ प्राप्त झाला आहे तो इतरांसही प्राप्त करून द्यावा अशी त्यांची मनःपूर्वक

इच्छा असते व ते तसें करण्याचा यत्न करीत असतात. कित्येक आपलें चित्त परमेश्वराकडे लावून आपल्या शरीराचा विनियोग परोपकाराकडे करितात. यथाशक्ति भुकेल्यास अन्न, तान्हेल्यास पाणी, दुःखितास समाधानाच्या गोष्टी, इत्यादि उपायांनीं ते आपल्या शारीरिक जीवनाचें सार्थक करून घेतात. तुकाराम बोवांनीं म्हटलें आहेः—" जे का रंजले गांजले । त्यांसी म्हणवी जो आपुले ॥ तोचि साधु ओळखावा । देव तेथेंचि जाणावा;" याप्रमाणें ईश्वरनिष्ठधर्मपरायण पुरुष आपला आत्मा व शरीर या दोहोंचेंही सार्थक करितात. मनुष्यमात्रांविषयीं त्यांचें चित्त निरंतर सदय असतें व काया वाचा मनेंकरून ते त्यांच्या कल्याणाविषयीं झटत असतात. दुसऱ्याचें अकल्याण व्हावें हें त्यांच्या मनांत कधींही येत नाहीं. दुसऱ्यास चांगल्या कामीं साह्य करण्यासाठीं आपल्या शरीरास कितीही क्लेश झाले तरी त्याचा शीण ते मानीत नाहींत; आणि त्यांच्या हिताचें व सौम्य व शांत असें भाषण ते प्रायः इतरांशीं करितात. ज्ञानेश्वरांनीं म्हटलें आहेः—" पुढां स्नेह पाझरे । माघां चालती अक्षरें । शब्द पाठीं अवतरे । कृपा आधीं ॥ १ ॥ साच आणि मवाळ । मित आणि रसाळ । शब्द जैसे कल्लोळ । अमृताचे ॥ २ ॥ "

याप्रमाणें ज्या मनुष्यांच्या ठायीं धर्मबुद्धि जागरूक आहे त्यांचा आत्मा ईश्वरनिष्ठ असतो. त्यांचें मन पारमार्थिक संपत्ति रक्षण करण्याकडे असतें, आणि त्यांचा देह सर्वप्रकारें

परोपकाराविषयीं तत्पर असतो. परंतु अशा प्रकारची पारमार्थिक स्मृति किंवा धर्मबुद्धीची जागृति फारच थोड्यांच्या ठायीं असते, हें खरें आहे. तथापि ज्यांच्या ठायीं आस्तिक्यबुद्धि कांहीं अंशीं तरी उत्पन्न झाली आहे व ज्यांस पारमार्थिक जीवन म्हणून शारीरिक जीवनाहून कांहीं निराळें आहे अशी श्रद्धा उत्पन्न झाली आहे, त्यांच्या ठायीं हीं पूर्वोक्त चिन्हें यत्किंचित् तरी दिसूं लागलीं तरच त्यांचे ठिकाणीं आस्तिक्यबुद्धीचा अंकूर उत्पन्न झाला आहे असें म्हणतां येईल. जर या अंकुरास ईश्वरभजन, यथाशक्ति परोपकार, व साधेल तितकें हितकारी व मधुर भाषण, आणि सदां शुद्ध नीतीस अनुसरून वर्तन, इत्यादिक उपाय करून वाढविलें तरच त्यांचें पारमार्थिक जीवन सबळ होईल. आपल्या आत्म्याच्या रक्षणाविषयीं कळकळ साहजिक उत्पन्न झाली पाहिजे. दुसऱ्यांनीं सांगून ती कशी होणार आहे? ज्यांचें त्यांणेंच आत्मकल्याण साधलें पाहिजे.

श्लोक—" उद्धरेदात्मनात्मानं नात्मानमवसादयेत् ।
आत्मैव ह्यात्मनो बंधुरात्मैव रिपुरात्मनः । "

आपला आपण उद्धार करावा, आपल्या आत्म्यास अधोगतीस जाऊं देऊं नये, आपणच आपला मित्र, आपणच आपला शत्रू, असें भगवद्गीतेंत म्हटलें आहे तें सर्व यथार्थ आहे. म्हणून ज्यांस परमार्थाविषयीं कळकळ उत्पन्न होऊन ज्यांची धर्मबुद्धि दिवसानुदिवस अधिकाधिक जागृत होत चालली आहे ते धन्य व तेच भाग्यवंत होत.

ईश्वरविषयक ज्ञानाचें महत्त्व.

" इहैव सन्तोऽथ विद्मस्तद्वयं न चेदवेदिर्महती विनष्टिः ।
य एतद्विदुरमृतास्ते भवन्ति अथेतरे दुःखमेवापि यांन्ति "

या स्थलीं राहूनच आम्हीं त्या परमेश्वरास जाणतों. जर आम्हीं त्यास जाणिलें नसतें, तर आम्हांस महत्संकट प्राप्त होऊन आमचा सर्वप्रकारें नाश झाला असता. तसें झाल्यानें आमची काय दशा झाली असती ? आपला संसार अज्ञानांधकारानें किती बरें व्याप्त झाला असता ! आम्ही या ठिकाणीं दुःखानें व संकटानें व्याप्त झाल्यामुळें कोठेंही आम्हांस विश्रांतीचें स्थान प्राप्त झालें नसतें. येथील आमच्या अंतर्गत व बाह्य शत्रूंच्या बाणांनीं आमचीं अंतःकरणें घायाळ होऊन, आम्हांस कशापासूनही शांति प्राप्त झाली नसती. तसें झाल्यामुळें आमचा आत्मा संसारतापानें निरंतर संतप्त झाला असता, व त्याचा प्रतिकार करण्याचा कोणताही उपाय राहिला नसता. असा प्रकार झाला असतां आमचें जीवन आम्हांस किती दुःसह झालें असतें ? परंतु ईश्वराचा आम्हांवर केवढा अनुग्रह आहे बरें ! तो आमच्या अंतःकरणास शांति प्राप्त व्हावी एतदर्थ आपण स्वतां प्रकट होऊन आमच्या शोकभारानें विदीर्ण झालेल्या अंतःकरणास विश्रांति देतो. याक्षणीं तो प्रत्यक्ष प्रकट झाला आहे. याक्षणीं आम्ही त्याच्या छायेखालीं राहून आमच्या अंतःकरणांतील सर्व शोक, ताप विसरून गेलों आहों. याप्रकारें जेव्हां त्याच्या अमृतस्वरूपाचा सहवास आपणास

घडतो तेव्हां त्या सहवासाचें फल तत्काळ प्राप्त होतें. हें प्रत्यक्ष फल; याची वाट पाहावी लागत नाहीं. याक्षणीं चोहोंकडून आम्हांस आनंद प्राप्त होत आहे. त्याच्या उपासनेचें फल उपासना करितांनाच प्राप्त होतें. तें फल पुढें होईल अशी वाट पाहावी लागत नाहीं. तो जसा प्रत्यक्ष प्रकट होतो, तसेंच तो प्रत्यक्ष फलही देतो. अनंतकालपर्यंत त्याची उपासना करण्याची जी आपली आशा असते ती तो प्रतिक्षणीं पूर्ण करितो. प्रतिक्षणीं ही आशा विशेष उज्ज्वल होते. आम्ही या मर्त्यलोकीं राहून, असे मलीन असून, तत्सहवासजनित आनंदाचा लाभ जर प्राप्त करून घेऊं शकतों, तर जसजसे आपण क्रमानें पवित्र होऊन उच्च लोकांहून उच्चतर लोकांत गमन करूं, तसतसे निश्चयपूर्वक तत्सहवासजनित आनंदाचा आधिकाधिक उपभोग घेऊं शकूं यांत संशय काय ? यापासून असा विश्वास दृढ होतो कीं उत्तरोत्तर त्याचा सोज्ज्वल प्रकाश आम्हांस पाहातां येईल. आम्ही निरंतर त्याच्या सहवासांत राहूं, आणि कधींही त्याचा सहवास आपल्यास सुटणार नाहीं.

या स्थानीं राहून जर आम्हीं त्यास जाणलें नसतें, तर आपला मोठा नाश झाला असता. येथील या सर्व विषयजन्य सुखांत बद्ध होऊन राहिल्यानें आम्ही जरेनें जीर्ण होऊन गेलों असतों. मृत्यूच्या वेळेस कोणतीही आशा किंवा भरंवसा राहिला नसता. या ठिकाणीं आम्हांस बंदीवानांप्रमाणें अंधारांत दिवस घालवावे लागले असते. थोडी देखील आशा

किंवा भरवसा राहिला नसता. या ठिकाणी आह्मांस बंदिवाना-प्रमाणें अंधारांत दिवस घालवावे लागले असते.थोडी देखील आ-शा आमच्या अंतःकरणांत राहिली नसती.अरेरे ! आह्मीं जर त्याला जाणलें नसतें तर आमचा मोठा नाश झाला असता. परंतु पहा ईश्वराची केवढी करुणा ! या ठिकाणीं तो आम्हांस आपल्या समागमाचा लाभ देतो, आणि आमच्या अंतःकर-णांत आशा उत्पन्न करितो कीं आम्हांस अनंतकालपर्यंत त्याच्या आनंदाचा उपभोग घेतां येईल. चंद्र, नक्षत्रें, पशु, पक्षी त्यास याप्रकारें केव्हांही जाणत नाहींत. चंद्र व तारा-गण यांचा तो अंतरात्मा असून चंद्र व तारागण त्यास जाणत नाहीं. सर्व निकृष्ट पशूंचें जीवन त्याच्या योगें चालत आहे; त्यापासूनच त्याचें रक्षण होत आहे;ते त्याचे ठायींच वास क-रित आहेत. परंतु सिंह, व्याघ्र,व भालुका इत्यादि महापशु आपा-पल्या चरितार्थाच्या वस्तु संपादन करण्यांतच निमग्न आहेत; ते आपल्या आश्रयदात्यास जाणत नाहींत. मनुष्याच्या अंतः करणांत मात्र तो प्रकट होऊन त्यास आपलें दर्शन देतो. म-हान् पुण्यात्म्याच्या पवित्र अंतःकरणांतच तो प्रकाशमान् हो-ऊन राहतो असें नाहीं; परंतु जे सांसारिक सुखानें उन्मत्त,जे विषयवासनेनें भ्रममाण होऊन एकवेळ देखील त्याचें मनानें चिन्तन करित नाहींत, त्यांच्या मोहरूप मेघानें आच्छादिले-ल्या आत्म्यासही आपल्या विद्यत्रूप तेजानें तो एकवेळतरी

प्रकाशित करितो. साधुजनांच्या सरल व कोमल अंतःकरणांत तर तो प्रवेश करून राहतोच; परंतु सर्व घोर विषयीजनांच्या अंतःकरणांमध्येंही अज्ञानरूपी लोहमय कपाटाचा भेद करून त्यांत प्रवेश करितो. यावरून मनुष्यावर त्याची केवढी अतुल कृपा आहे हें कळतें ! पुण्यात्मा त्याच्या भक्तींत आनंदानें तल्लीन होऊन राहतों. घोर पापीजनही नानाक्लेश व संकटें भोंगून शेवटीं त्याच्या अंकीं निमग्न राहतात. जे त्यास चिंतीत नाहींत त्यांचेंही तो ग्रहण करतो. पवित्र वेळीं कोणासही ईश्वराचें स्मरण झालें असतां त्याच्या नीरस नेत्रांतून अश्रु गळतात; व ईश्वराच्या विद्युत्तेजानें त्याचें चिरजीवन शुद्ध होतें. त्यावेळीं ईश्वराचा भाव त्याच्या अंतःकरणांत चिरस्थायी होतो; ईश्वर या प्रकारें पापी जनांसही आपल्या घरीं घेऊन जातो. तो केवळ अशा समयाचीच इच्छा करितो. तो वाट पाहतो. तो पाहतो कीं कोणत्या वेळेस मी त्यांच्या अंतःकरणांत प्रकट झालों असतां ते आपले अंतःकरण मला सादर करतील. कोणत्या वेळेस आपल्या अंकीं बसून ते शांति पावतील. जरी आम्ही त्याचें मनानें चिंतन करित नाहीं, प्रार्थना करीत नाहीं, तथापि त्याला विश्रांति नाहीं. तो सर्वदा वाट पहात असतो कीं कोणत्या वेळेस मला हे जन ग्रहण करितील. तो सर्वांसाठीं बाहू पसरून उभा राहिला आहे.

हे सर्व कृतघ्न मनुष्यांनों ! तुम्हीं काय त्याचें थोडें देखील मनानें चिंतन करूं नये ? त्याची याप्रमाणें अतिशय कृपा व प्रीति अवलोकन करून त्याचा एकवार देखील मनानें धन्यवाद करूं नये ? आम्ही किती मूढ झालों आहों ? तो आम्हांस नेहमीं आपल्या अंकीं बसण्यास बोलावित आहे, पण आम्ही त्यांचें मातृस्नेहयुक्त बोलावणें श्रवण करीत नाहीं. आम्हांस आपल्या मातृजलानें अभिषिक्त करावें हीच त्याची इच्छा आहे, पण इकडे आम्ही लक्ष्य देत नाहीं. तो आह्मांवर नित्य प्रीति करितो. आमच्या ठायीं त्याविषयीं इच्छा नाहीं, त्याविषयीं प्रीति नाहीं, यामुळें त्याचें प्रेम आम्ही संपादन करूं शकत नाहीं. आम्ही जेव्हां त्याला आपला आत्मा समर्पण करितों, तेव्हांच तो त्याला पूर्ण करितो. तो मनुष्याचें सौंदर्य परिपूर्ण करितो, तो स्वतः आमच्या स्वाधीन होऊन आमच्या आत्म्यास परिपूर्ण करितो. तो अखंड वाहणारा प्रेमाचा प्रवाह कधींही शुष्क होत नाहीं. त्यास ग्रहण करण्यास शक्ति जीतकी आमच्या ठिकाणीं असेल तितकाच तो आमच्या ठिकाणीं प्रकट होईल.

जरी या ठिकाणीं सर्व त्याचें चिंतन करित नाहींत तरी तो सर्वांचें चिंतन करितो. तो कोणाचीही उपेक्षा करित नाहीं. त्याच्या परिवारामध्यें कोणीही बालक निरंतर पतित होऊन राहत नाहीं. कोणी पापी असला, पुण्यात्मा असला, तरी त्या

सर्वांस तो आपल्या गृहीं घेऊन जातो; तो सर्वांस आपल्या आलिंगनपाशानें बद्ध करितो. त्याच्या मंगल स्वरूपाच्या ठायीं आमचा या प्रकारचा विश्वास आहे. या पृथ्वींत राहून. ही क्रमानें सर्वांनीं धर्मानें व प्रीतिनें युक्त व्हावें. ईश्वर सर्वांच्या अंतःकरणार अधिकार चालवितों. येथील दुर्गतीची अवस्था क्रमानें नाहींशी होऊन जावी; त्याच्या राज्यांत हा ब्राह्मधर्म व्यापून राहावा; सर्व बंधुभावानें एकत्र होऊन त्यांनीं आपल्या परमपित्याची चरणसेवा करावी; असें झालें असतां सर्व आपलें कल्याण कशानें झालें हें ध्यानांत आणून मन मोकळें करून बोलतील की, जर आम्हीं त्यास जाणलें नसतें तर आमचा नाश झाला असता. अशा वेळेस ज्या प्रकारची आमची स्थिति झाली असती तिचें निरूपण बुद्धीनें कधीही करितां येत नाहीं. कोणत्या प्रकारें हें सुखाचें राज्य उदय पावेल ? जेव्हां ईश्वराचें मंगलस्वरूप अंतःकरणांत उदय पावेल, जेव्हां सत्याचें तेज मनाचे ठायीं प्रकाशित होईल; तेव्हां अशा प्रकारचा विश्वास उत्पन्न होईल कीं, पृथ्वींतील सकल लोक ब्राह्म म्हणजे ब्रह्मपरायण होऊन एकांतःकरणानें ईश्वराची आराधना करितील.सर्व जण धर्मानें व भक्तीनें वृद्धि पावून त्या एकमात्र पित्याच्या आधीन होऊन त्यास शरणापन्न होऊन राहतील. ईश्वर सर्वही मनुष्यांस कृतार्थ करील. जे त्याच्यासाठीं व्याकुल होतात, त्यांची व्याकुलता तो शांत करील.

काय आश्चर्य! आम्ही या ठिकाणीं राहूनही त्याला जाणतों. हें नियमित क्षुद्र जीवन धारण करीत होत्साते त्या अनंत असीम प्रभूला जाणण्यास अधिकारी होतों. त्याला जाणिलें असतां बाकी दुसरें जाणण्याचें काय राहतें? "कस्मिन्भगवन्वा विज्ञाते सर्वमिदं विज्ञातं भवतीति" हे भगवन् कोणास जाणलें असतां हें सर्व जाणलें जाईल? या प्रश्नाचें उत्तर हेंच कीं, त्यास जाणलें असतां सामान्यरूपानें सर्व जाणलें जातें. ज्ञानाचें अन्न सत्य; जो परमेश्वर ती परम वस्तु; ती सत्य वस्तु; तोच एक मात्र ज्ञानाच्या तृप्तीचें स्थल आहे. आसक्तिहीन, प्रशांतचित्त, व जितात्म असे ऋषी त्यास प्राप्त करून घेऊन ज्ञानाच्या योगानें तृप्त झाले. ज्ञान या सकल परिमित विषयांपासून ईश्वराकडे जाऊन त्याच्या ठायीं विश्वास पावलें नाहीं. तोंपर्यंत त्यापासून शांति प्राप्त होत नाहीं. तें ज्ञान चंचलतेनें व्याकुल होऊन विषयांमध्येंच रहून जाऊन परिभ्रमण करितें. सत्याचें अन्वेषण तो करीत जातो, परंतु कोणत्या स्थानींही त्यास खरें सत्य प्राप्त होत नाहीं. सर्व सत्य त्या सत्याची छाया. त्या सत्य स्वरूपास आम्हीं प्राप्त करून घेतलें असतां आम्ही ज्ञानतृप्त होतों. आमच्या सर्व वासनांची परिसमाप्ति होते. पूर्वकाळीं सर्व ऋषी त्यास त्याचें परमनिधान परमेश्वर यास प्राप्त करून घेऊन असें बोलले आहेत "सत्यं ज्ञानमनंतं ब्रह्म" "सत्यमेवायतनम्" "सत्यस्य सत्यं" हीं सर्व महावाक्यें या स्थळीं आपणा सर्वांस प्रतीत होत आहेत; त्याप्र-

माणें सर्वदा त्यांचें उच्चारण झालें म्हणजे पुढेंही सर्वांस ती प्रतीत होतील. सत्याचा प्रभाव, ब्राह्म धर्माचा प्रभाव ज्याप्रमाणें पूर्वकाळीं, ज्याप्रमाणें या क्षणीं, त्याचप्रमाणें निरंतरही दिसून येईल. या सर्व भ्रमामध्यें व सर्व अंधकारामध्यें मनुष्याच्या आत्म्यास ठेविलें आहे. सत्याचें बल थोडें जरी असलें तरी तें क्रमाक्रमानें या सर्व पृथ्वीला तेजस्वी करितें. ईश्वर करो की निरंतर सर्व ठिकाणींही सत्य प्रसृत होऊन सर्व पृथ्वीला शांति व मंगलभाव यांत निमग्न करो.



धर्मविषयक संवाद.

प्रश्न---ब्राह्मसमाज म्हणजे काय ?

उत्तर---ब्राह्मसमाज म्हणजे ब्राह्मांची मंडळी ही होय.

प्रश्न---ब्राह्म कोणास म्हणावें ?

उत्तर---ब्रह्माचे ठायीं अचल निष्ठा ठेवून तेंच एक आराध्य दैवत असें मानून जे त्याचें ध्यान, भजन, आराधना व प्रार्थना वगैरे करितात, त्यांस ब्राह्म असें म्हणतात.

प्रश्न---ब्रह्म कशास म्हणावें ?

उत्तर---सर्वव्यापी, सर्वान्तर्यामी, सर्वसाक्षी, सर्वज्ञ, सर्वशक्तिमान्, सर्वनियन्ता, अनाद्यनन्त, सच्चिदानन्दस्वरूप, निराकार, निर्विकार, महापुरुष, परममंगलमय, अनन्तकल्याण, गुणनिधान, प्रेमस्वरूप, वत्सलस्वरूप, मायबाप, शाश्वतसखा, परमात्मा जो तो ब्रह्म या नामानें निर्दिष्ट आहे.

प्रश्न---निर्गुण ब्रह्माची उपासना कशी घडूं शकते ?

उत्तर---सर्वव्यापित्व, सर्वान्तर्यामित्त्व, सर्वसाक्षित्व, सर्वनियन्तृत्व, सर्वज्ञत्व, सर्वशक्तिमत्व, सर्वकर्तृत्व, अनाद्यनन्तत्व, दया, क्षमा, शान्ति, पवित्रता, आनंद, मंगलत्व इत्यादि गुण ज्ञानैकगम्य आहेत व अन्तश्चक्षूंस गोचर असून, त्यांहींकरून ब्रह्म विशिष्ट आहे; अतएव या आध्यात्मिक गुणांच्या दृष्टीनें ब्रह्म सगुणच मानिलें पाहिजे. ब्रह्मास जडत्व, विकारित्व, साकारत्व व मूर्तत्व इत्यादि बाह्येन्द्रियास गोचर असे गुण नाहींत,

म्हणून त्यास इन्द्रियगोचर गुणांच्यासंबंधानें तरी पूर्वोक्त आध्यात्मिक गुणयुक्त जें स्वरूप त्याची उपासना होऊं शकते.

प्रश्न—ब्राह्मसमाजाची स्थापना कोणीं, कधीं, कोठें व कशाकरितां केली ?

उत्तर—ब्राह्मसमाजाची स्थापना राजाराम मोहनराय यांणीं इ. स. १८३० या वर्षीं कलकत्ता येथें केली. उन्नत स्थितीस आलेल्या सर्व धर्मसंस्थांत धर्माचीं शुद्ध व मुख्य तत्त्वें मान्य आहेत, असें निष्पक्षपातदृष्टीनें सर्व धर्मांतील अत्यंत श्रेष्ठ मानलेल्या ग्रंथांचें अवलोकन केलें असतां समजतें. या तत्त्वांस अनुसरून सर्व धर्मांविषयीं समदर्शी अशी एक संस्था असावी, जिच्यामध्यें सर्व धर्मांतील समदर्शी लोकांस ऐक्यभावानें धर्मानुष्ठान करितां यावें, आणि भिन्न भिन्न धर्मांत बुद्धिसंकोचास्तव असणारें जें अनेकविध जाडय व तन्मूलक जे असद्विचार, असद्भाव, व असदाचार धर्म्यत्वेंकरून गृहित आहेत, त्यांचें धर्मविषयक तत्त्वज्ञानाच्या प्रसारानें निरसन व्हावें, आणि नीति–अनीतीविषयीं विचार शुद्ध व सर्व धर्मानुयायी सज्जनांस मान्य असे व्हावे, आणि ज्यांच्याठायीं धर्मज्ञानाविषयीं व नीतीविषयीं विचार व्यापक व सर्वमान्य आहेत अशा प्रकारची एक मंडळी व्हावी, एतदर्थ समाजाची स्थापना झाली.

प्रश्न—प्रार्थनासमाज म्हणजे काय ?

उत्तर—प्रार्थना करणारी मंडळी होय.

प्रश्न—प्रार्थना कोणाची करितात ?

उत्तर—जो एक, अद्वितीय, सत्यस्वरूप, ज्ञानस्वरूप, अनाद्यनन्तस्वरूप, आनन्दस्वरूप, प्रेमस्वरूप, अमृतस्वरूप, परमात्मा परमेश्वर, त्याची प्रार्थना करितात.

प्रश्न—प्रार्थनासमाजाची स्थापना कोणीं केली ?

उत्तर—मुंबईतील कित्येक विवेकसंपन्न गृहस्थ. ज्यांची जुन्या धर्मावरून श्रद्धा कमी झाली असतांही आपण केवळ धर्मपराङ्मुख व्हावें हें त्यांस इष्ट वाटलें नाहीं, व धर्माच्या शुद्ध तत्त्वांचें ज्ञान रक्षण होऊन तदनुरूप धर्मप्रवृत्ति व्हावी असें ज्यांस वाटलें, त्यांणीं धर्मोन्नत्यर्थ व धर्मबलानें सामाजिक सुधारणा घडून याव्या एतदर्थ प्रार्थनासमाजाची स्थापना केली.

प्रश्न—कलकत्त्यास ब्राह्मसमाज आहे त्याच्याशीं ह्या प्रांतीं स्थापन झालेल्या प्रार्थनासमाजाचा कांही संबंध आहे, किंवा प्रार्थनासमाज अगदीं स्वतंत्र आहे ?

उत्तर—कलकत्त्यास ब्राह्मसमाज आहे त्याचे मुख्य हेतु व ह्या प्रांतीं स्थापन झालेला प्रार्थनासमाज याचे हेतु एकच आहेत. या अर्थानें ब्राह्मसमाज व प्रार्थनासमाज एक आहेत. समाजासंबंधानें व्यवस्थेचे नियम इकडल्या रीतीभातींस व स्थितीस अनुसरून प्रार्थनासमाजाचे आहेत व तिकडल्या रीतीभातीस व स्थितीस अनुसरून ब्राह्मसमाजाचे आहेत. या अर्थानें प्रार्थनासमाज ब्राह्मसमाजाहून स्वतंत्र आहे.

प्रश्न—प्रार्थनासमाजाच्या स्थापकांनीं, कलकत्त्यास जो ब्राह्म-

समाज आहे त्याचे व आपले मुख्य हेतु एक असतां आपल्यास प्रार्थनासमाज हें नांव कां घेतलें ?

उत्तर—आपण आपल्यास ब्राह्म म्हणजे ब्रह्मनिष्ठ म्हणवावें अशी आपली योग्यता नाहीं, तसेंच आपल्यास ब्राह्मसमाजाचे सर्व नियम त्यांत कांहींएक फेरबदल न करितां मान्य होतील असें नाहीं. केवळ आपल्यासारख्या विचारांच्या मनुष्यांसह एकत्र मिळून निराकार, निर्विकार, अत्यंत शुद्ध, मंगल, परमकृपाळु परमेश्वराची उपासना करून लीनभावानें आध्यात्मिक बलाविषयीं त्याची प्रार्थना करावी. इतकाच आपला तूर्त अधिकार आहे. या तीन गोष्टींकडे दृष्टि देऊन पूर्वोक्त प्रार्थनासमाजाच्या स्थापकांनीं आपल्यास शोभेल असें नांव आपल्या मंडळीस ठेविलें.

प्रश्न—प्रार्थनासमाजांतील कित्येक लोक आपल्यास ब्राह्म म्हणवितात याचें कारण काय ?

उत्तर—प्रार्थनासमाजांतील कित्येक लोक ज्यांस ब्राह्मधर्माप्रमाणें सर्व बाह्य आचार व्यवहार, विवाहादिक सर्व संस्कार, वैगरे एकंदर संस्था नवीन पद्धतीनें आपण एकदम सुरू करावी, लोकमतांत फेरफार होण्याची वाट पाहात न बसतां आपण त्यांपासून निराळें व्हावें, अन्नव्यवहारादि नित्य जातिभेदाचे चालू निर्बंध बाळगल्यावांचून करावीं, व जातिभेदसूचक जी यज्ञोपवीतादि बाह्य चिन्हें त्यांचा त्याग करावा, असें वाटतें आणि हें सर्व **ब्राह्म** या नांवानें व्यक्त होतें असें जे समजतात ते आपल्यास ब्राह्म म्हणवितात.

*

योग.

चित्ताच्या एकाग्रतेनें परमात्म्याचे ठायीं जीवास अचल निष्ठा प्राप्त होणें यास पारमार्थिक ग्रंथांमध्यें योग असें म्हटलें आहे. सर्वव्यापकत्वेंकरून व सर्वान्तर्यामित्वेंकरून परमात्मा जरी जीवास अत्यंत सन्निध आहे, तथापि इंद्रियांची बाह्यविषयांकडे प्रवृत्ति असल्यामुळें व मन त्यांनीं आपल्याकडे आकर्षून घेतल्यामुळें जीवाच्या सर्व मनोवृत्ति बाह्यविषयांतच निमग्न होतात, व जीव त्यांतच लंपट होतो. असें झालें असतां विश्वनियंता व आपला अंतर्यामी जो परमात्मा त्याच्या सांनिध्याचें त्यास भानही नाहींसें होतें, व तेणेंकरून जीवास परमात्म्याचें सर्वथा विस्मरण होतें. किंबहुना आपल्याही आत्मतत्त्वाचें त्यास भान नाहींसें होऊन, तो देहाचे ठायींच आत्मबुद्धि करून सर्वथा अशाश्वत असें जें बाह्य जीवन तेंच आपलें स्वतःचें जीवन असें मानितो. आपलें चिदात्मक आत्मतत्व देहाप्रमाणें अल्पकाळांत विनाश पावणारें नव्हे हें ज्ञान त्यास होत नाहीं. म्हणूनच तो केवळ शारीरिक सुखानें सुखी व शारीरिक दुःखानें दुःखी होऊन देहविनाशानें आपलाही विनाश होणार असें मानून मरणाच्या भयानें अत्यंत तळमळ पावतो, व मरणपर्यंत चिंता, क्लेश, भय, दुःख यांणीं अत्यंत जर्जर होतो, शारीरिक जीवनच सर्वांशेंकरून आपल्या आत्म्याचेंही जीवन होय असें मानून त्याच्या निर्वाहा-

करितां नानाविध पापाचरणही करितो; आणि त्यायोगें परोपरीनें पीडा पावतो. या प्रकारें सर्व दुःखाचें, सर्व दुरितांचें, व सर्व अनर्थांचें मूळ जें आत्मतत्वाचें व परमात्मतत्त्वांचें विस्मरण, तें ज्ञानानें दूर होऊन जीवास या दोन्ही तत्त्वांच्या अस्तित्वाविषयीं श्रद्धा उत्पन्न झाली, म्हणजे त्यांस परमात्मनिष्ठा, अथवा सदैव परमात्म्याच्या सान्निध्याचें भान व तदनुरोधानें सर्वकाळ सर्व व्यवहारांमध्यें कायावाचामनोभावें वर्तन करण्याची शक्ति प्राप्त होते. तीच योगाची स्थिति होय. परमात्म्याचा व जीवात्म्याचा जो अज्ञानाच्या योगानें वियोग होतो, तो जाऊन त्यांचा पुन्हा संयोग होणें, आणि जीवात्मा सर्वथा परमात्म्याचा अंकित होऊन राहाणें, यांचें नांव योग. हा योग सिद्ध होण्यास प्रथम जीवात्म्यास आपल्या स्वतःच्या वास्तवस्वरूपाचें ज्ञान होऊन सर्वांतर्यामी, सर्वशक्ति, आनंदमय, मंगलनिधान जो परमात्मा, तो सबाह्य अभ्यंतरीं नित्य आहे, आपण त्याच्या सम्मुख आहों, त्याची कृपादृष्टि आपल्यावर आहे, त्यावर आपण सर्वप्रकारें अवलंबून आहों, तोच आपल्या सर्व आनंदाचा दाता, सदैव त्याचें स्मरण आपण ठेविलें तरच आपल्यास खरी शुद्धि, खरी शांति, व खरा आनंद प्राप्त होईल, विवेकद्वारा या सृष्टीमध्यें व आपल्या अंतरसृष्टीमध्यें जे त्याचे मंगल हेतु दिसून येतात त्यांस अनुसरून वर्तणें. म्हणजे त्याची आज्ञा परिपालन करणें, हेंच

आपल्या बाह्य जीवनाचें साफल्य होय, व होईल तितका काळ परमात्म्याच्या परिपूर्ण मंगलस्वरूपाच्या स्मरणांत घालविणें व त्यापासून होणाऱ्या आनंदाचा अनुभव घेणें हेंच आपल्या आत्मिक जीवनाचें साफल्य होय, अशा प्रकारचें ज्ञान झालें पाहिजे. तें झालें म्हणजे जीवात्म्याचा परमात्म्याशी झालेला वियोग नाहींसा होऊन पुन्हा संयोग होतो. म्हणून यास ज्ञानयोग असें म्हटलें आहे. आतां पूर्वोक्त प्रकारें परमात्म्याच्या स्वरूपाचें जीवात्म्यास ज्ञान झालें, म्हणजे सहजच जीवात्म्याच्या ठायीं परमात्म्याविषयीं प्रीति उत्पन्न होते. हीच, परमात्म्याच्या मंगलगुणांविषयीं वारंवार स्मरण होऊं लागलें म्हणजे अधिकाधिक वाढत जाते; व त्याच्या स्मरणापासून आनंद व विस्मरणापासून तळमळ जीवात्मा पावतो. असें झालें म्हणजे त्या प्रीतीस भक्तीचें, म्हणजे अत्यंत प्रेमाचें रूप येतें. अशा प्रकारची भक्ति जीवात्म्याची परमात्म्याचे ठायीं झाली म्हणजे तो जसा बाह्य प्रपंचामध्यें आपल्या आवडीचे विषय टाकूं इच्छीत नाहीं, किंवा आपल्या प्रीतींतलीं मनुष्यें सोडूं इच्छीत नाहीं, त्याप्रमाणेंच आपल्या पारमार्थिक दृष्टीनें आपल्यास अत्यंत प्रेमास्पद जो परमात्मा त्यासही तो सोडूं इच्छीत नाहीं. असें झालें असतां परमात्म्यापासून विस्मरणानें व अज्ञानानें व विषयलालसेनें वियोग पावलेला जो जीवात्मा त्याचा पुन्हा त्याशीं अतिनिकट संयोग होतो. मग अमर

जसा कमलकोशांत आसक्त होऊन राहातो, किंवा मधुमक्षिका मधाच्या आशेनें जशी फुलामध्यें आसक्त होऊन राहाते, किंवा व्यसनी पुरुष आपल्या व्यसनामध्यें जसा आसक्त होऊन राहातो, त्याप्रमाणें आपल्या भक्तीनें परमेश्वराच्या ठायीं जीवात्मा आसक्त होऊन राहातो. त्याचा समागम तो कधींही सोडीत नाहीं. याप्रमाणें भक्तीचे योगानें परमात्म्याचे ठायी जीवास निष्ठा प्राप्त होणें यासच भक्तियोग असें म्हटलें आहे. अशा प्रकारें परमात्मस्वरूपाचे ठायीं ज्ञानयोगानें व भक्तियोगानें जीवात्मा निष्ठा पावला म्हणजे त्याचीं सर्व कर्मे परमात्म्यास स्मरून घडतात; व परमात्म्याचा व आपला जो पवित्र संबंध तो मनांत बागवून त्या संबंधांत उचित अशीं जीं कर्मे तींच जीवात्मा करितो. आपल्यास जें अवश्य कर्तव्यकर्म म्हणून वाटेल ती परमात्म्याची आज्ञा होय, असें जाणून ती आज्ञा म्हणूनच तो तिचें परिपालन करितो; फलाकडे दृष्टि देत नाहीं; परमात्म्याची म्हणजे परमेश्वराची आज्ञा परिपालन करून त्याच्या आज्ञेनुरूप जें कर्तव्यकर्म आपल्याकडून घडून येईल त्याविषयीं स्वकर्तृत्वाचा तिळमात्र अभिमान वाटूं देत नाहीं; व त्या कर्माचें फळ ईश्वरेच्छेनें होईल तेव्हां होवो असें मानून स्वस्थ राहातो. याप्रमाणें केवळ ईश्वराज्ञेनें जीवात्मा कर्तव्यकर्म करूं लागला, म्हणजे त्याचें कर्माचरणही ज्ञानानें व भक्तीनें ईश्वराशीं त्यास प्राप्त झालेला जो संयोग तोच दृढ करण्यास कारणीभूत होतें. या रीतीनें कर्माचरणामध्येंही जीवात्मा

परमात्म्याचे ठायीं निष्ठा पावला म्हणजे त्याचा परमात्म्याशीं संयोग दृढ होतो. म्हणून परमात्मनिष्ठापूर्वक जें कर्माचरण त्यासच कर्मयोग असें म्हटलें आहे. अशीं हीं योगांची तीन मुख्य अंगें होत. ज्ञानयोग, भक्तियोग, व कर्मयोग, हा त्रिविध योग ज्या जीवात्म्यास प्राप्त झाला, व ज्याच्या ठायीं तो दृढ झाला, तोच खरा योगी म्हणजे परमात्मनिष्ठ जीव होय.



जीवात्मपरमात्मयोग.

द्वा त्सुपर्णा सयुजा सखाया समानं वृक्षं परिषस्वजाते ।
तयोरन्यः पिप्पलं स्वाद्वत्यनश्नन्योऽभिचाकशीति ॥ १ ॥

जीवात्मा व परमात्मा हे दोन सुंदर पक्ष्यांप्रमाणें असून परमात्म्याच्या तेजानें जीवात्मा तेजस्वी झाला आहे. जीवात्म-परमात्मरूप पक्षी शरीररूपी वृक्षाचा आश्रय करून राहिले आहेत. ते सर्वदा एकत्र राहतात. परमात्मा व जीवात्मा आश्रय व आश्रित या संबंधानें एकत्र आहेत. ते उभयतां परस्परांचे मित्र होत. परमात्मा जीवात्म्याचें प्रेमेंकरून पालन करितो. व जीवात्मा संसारांत राहून त्याचें प्रियकार्य साधन करितो. म्हणून ते दोघे परस्परांचे सखे होत. त्यांपैकीं एकजण सुखानें फल भक्षण करून राहतो; म्हणजे ईश्वरानें औदार्यानें घातलेल्या सदावर्तांत जीवात्मा जीवनविषयक सकल सुखाचा उपभोग घेतो. दुसरा कांहींएक सेवन केल्यावांचून केवळ जीवाचें वृत्त पाहात असतो; म्हणजे साक्षिस्वरूप परमात्मा आपल्या आश्रित बालकांना तीं सुखानें नांदत आहेत असें पाहून मातापित्यांप्रमाणें संतुष्ट होतो. जीवात्मा व परमात्मा यांचा अशा प्रकारचा निकट संबंध आहे कीं एकजण फलदाता, व एकजण फलभोक्ता. परमात्म्याच्या करुणामेघापासून जी विपुल सुखवृष्टि होते, तिचा जीवात्मा कृतज्ञ होत्साता नम्रभावानें उपभोग घेतो. त्या आश्रयदात्याच्या आश्रयानें जीवात्मा संसारांत निर्भयपणानें वर्ततो. आत्म्याची स्वातंत्र्यप्रियता

अशी आहे कीं, तो कोणत्याही प्रकारें कोणाच्याही आधीन होऊं इच्छीत नाहीं. परंतु परमात्म्याचे अधीन असतांही स्वाधीनतेनें जीवास जें सुख होतें, तें सर्व तो अनुभवितो. या जगांत ज्या नानाप्रकारच्या गोष्टी घडून येतात, व ज्या नानाप्रकारच्या अवस्था प्राप्त होतात, त्यांत सांपडल्यामुळें जीवास जरी त्यांच्या आधीन होऊन राहावें लागतें, तरी जीवात्म्याच्या अंतर्गत स्वातंत्र्याचा नाश होत नाहीं. स्वातंत्र्यरूपी सुख त्याचें उत्तम सुख होय. तसेंच परतंत्रतारूप दुःख हें त्याचें अत्यंत दुःसह दुःख होय. परंतु पाहा, ईश्वराच्या आधीन राहिल्यानें आत्म्याला किती आनंद होतो ! तो आणखी कोणाच्या आधीन होऊन राहण्यास इच्छीत नाहीं; परंतु ईश्वराधीनतेच्या बाहेर राहूं शकत नाहीं. तो त्याचा सहवासी अनुचर होऊन, त्याचा दास व सेवक होऊन राहिल्यानें त्याला आनंद होतो. तो आपली इच्छा ईश्वरेच्छेच्या आधीन करूं शकतो, हेंच महत्त्व. आमची जी मुक्तीची अवस्था, जिच्या योगानें आम्ही संसारपाशांपासून व विषयबंधनांपासून मुक्त होतो, ती आपण कशाकरितां इच्छितों ? केवळ ह्यासाठीं कीं, संसाराच्या आधीन न राहतां पूर्णपणें ईश्वराच्या आधीन आपणास राहातां यावें; त्याच्या चरणांपाशीं सर्वदां विश्रांति घेतां यावी; त्याचा सेवक होऊन त्याची आराधना करितां यावी; आणि ज्याच्या योगानें त्याचा प्रिय अभिप्राय सिद्धीस जाईल अशा प्रकारचे यत्न आपल्यास आनंदानें करितां यावे. जर

केवळ दुःख, क्लेश, व संसारबंधन, यांपासून मुक्त होणें यांचेंच नाम मुक्ति असेल; जर त्या अवस्थेंत त्याची सेवा, त्याची उपासना, त्याचें प्रियकार्य साधन करण्याविषयीं आम्हांस अधिकार नसेल, तर या उदासीन अवस्थेपासून आम्हांस काय उपयोग ? ईश्वराच्या आधीन झाल्यानेंच आत्म्यास आनंद होतो; त्याचा सेवक होणें हेंच त्याचें महत्त्व; सर्वांहून त्याचा उच्च अधिकार हाच कीं, तो त्याची सेवा करण्याविषयीं, त्याची पूजा करण्याविषयीं, त्याचें प्रियकार्य साधन करण्याविषयीं अधिकारी झाला आहे.

जो आमचा प्रभू, आमचा ईश्वर, आमचा जीवनदाता, ज्याच्या आधीन होऊन न राहिलें तर, ज्याचें प्रसन्नमुख न पाहिलें तर जीवन व्यर्थ होतें, तो आमचा सखा. तो आम्हांवर प्रीति करितो, आणि आम्हीं त्याजवर प्रीति करावी असें तो इच्छितो. तो आम्हांवर कृपा करून आमचें चित्त आपल्याकडे आकर्षून घेतो. तो आम्हांकडे सप्रेम दृष्टीनें अवलोकन करितो, आणि आमच्या आत्म्याची जेणेंकरून उन्नति होईल अशा प्रकारची योजना करितो. तो आमच्या आत्म्याची वृत्ति आपल्याकडे वळवून घेतो, आणि आनंदलहरींत त्यास निमग्न करितो. आम्ही त्याची भक्ति करून कृतार्थ होतों. म्हणून जीवात्मा व परमात्मा हे दोघे परस्परांचे सखे होत. आम्ही आपल्या क्षुद्र इंद्रियांच्या योगानें जें सकल सुख प्राप्त करून घेतों, त्याचीही सीमा करितां येत नाहीं. तेव्हां

ज्ञानाचा धर्म जो प्रीति त्या प्रीतीच्या ओघापासून किती विमल आनंद होतो, याचें परिमाण आपल्याच्यानें करवेल काय ? हें प्रेम, हें ज्ञान, हा आनंद यांची क्रमानें उन्नति होणार, हें मनांत आणिलें असतां आपल्या ठिकाणीं केवढी कृतज्ञता उत्पन्न होईल बरें ? जर आपली स्वतांची कृतज्ञता असीम अशी वाटते तर सर्व कृतज्ञतापूर्वक ईश्वराचा धन्यवाद करूं लागले असतां त्या कृतज्ञतेचें वर्णन शब्दांनीं कसें करितां येईल ? आपल्यावर ईश्वराचें जें प्रेम, व जी कल्याणदृष्टि आहे, व त्यांचा जो अनुभव आपण घेत आहों, त्याचें वर्णन करूं लागलें असतां वाणी निःशब्द होते; व मनांत विचार करूं लागलें असतां मन कुंठित होतें. तेव्हां अनंत जगांमध्यें अनंत लोकांतील असंख्य जीवांवर त्याच्या प्रेमाचा व करुणेचा जो वर्षाव होतो, त्याचें आकलन मनास कोणत्या प्रकारें करितां येईल ? या क्षणीं आम्हीं सर्व बंधुस्नेहानें एकत्र होऊन ईश्वराचा उदार प्रसाद अनुभवित आहों. आम्हा सर्वांविषयीं त्याचा धन्यवाद शब्दानें, किंवा मनानें, किंवा दुसऱ्या कोणत्या प्रकारानें करितां येईल काय ?

आम्ही इतके क्षुद्र आहों, व दोषांनीं व दैन्यानें इतके व्याप्त आहों, तथापि ईश्वर आमचा सखा आहे. हा आमचा केवढा बरें उच्च अधिकार ! जो देवाधिदेव, राजाधिराज, त्याची दृष्टि आमच्यावर आहे. केवळ त्याची दृष्टि आमच्यावर आहे इतकेंच नाहीं, तर तो आमचा सखा होय. मनुष्यामध्यें ए-

काद्या उंच पदवीच्या मनुष्यास आपला मित्र असें आपल्याच्यानें म्हणवत नाहीं; परंतु परमेश्वरास आपला मित्र म्हणून हाक मारण्यास आपल्यास मुळींच आशंका वाटत नाहीं. तो देवाधिदेव आमचा सखा. त्याच्या प्रीतीशीं आमची प्रीति सम्मिलित होते. त्याच्या आधीन राहाण्यांत आम्हांस आनंद वाटतो, व आमचा पुढारी होणें त्याला आवडतें. आम्ही त्याला प्रभू म्हणून त्याची सेवा करितों, आणि तो आमचें सेवकाप्रमाणें पोषण करितो. जेव्हां त्यास " तूं आमचा प्रभू, आमचा आश्रय, आमची पूज्य देवता, आमचा रक्षक " असें म्हणतों, जेव्हां " महान्प्रभुर्वै पुरुषः " हे शब्द त्याच्या संबंधानें आपण उच्चारितों, तेव्हां आपला सर्व आत्मभाव तत्परायण होतो. अंतरीं ईश्वराविषयीं भाव नसला तर आपल्या वाणीचें आणि आत्मभावाचें अशा प्रकारें ऐक्य होऊं शकणार नाहीं. जे रात्रंदिवस संसारिक सुखांमध्येंच लीन असतात, त्यांच्या कानीं जर " सर्वस्य शरणं सुहृत् " हें महावाक्य पडलें, तर हें वाक्य ऐकिल्याबरोबर त्यांची अंतःकरणवृत्ति तत्क्षणींच प्रकटित होते. पाहा, आत्म्याचा परमात्म्याशीं कोणत्या प्रकारचा संबंध आहे ? जरी आत्मा महामोहांत निमग्न झाला असला तथापि परमात्म्याचें नाम ऐकिल्याबरोबर या घोर मोहनिद्रेतून तो जागृत होऊन परमात्म्याकडे वळतो. आत्म्याशीं परमात्म्याचा संबंध किती निकट आहे हें वाणीनें व्यक्त करितां येत नाहीं. परमात्म्याच्या सहवासांतच ज्याचें जीवन त्याचा आ-

नंद केवढा ! घोर विषयासक्त जनांचें पाषाणतुल्य मन भक्ति-रसशून्य असतांही ईश्वराच्या नामानें जर द्रवतें, तर त्या अमृतसागरामध्यें जे सर्वकाळ पोहत असतात त्यांच्या आत्म्याचा किती श्रेष्ठ दिव्यभाव ! जे ईश्वराच्या प्रकाशांत नेहमीं राहिले आहेत, त्याच्या मंगल छायेंत सतत वास करिताहेत, त्याच्या विमल वायूचा सुगंध सर्वदा ग्रहण करिताहेत, त्यांची वृत्ति कोणत्या प्रकारची असेल बरें ? त्यांस हा मर्त्यलोकच ब्रह्मलोक होतो. " अत्र ब्रह्म समश्नुते " या वचनाप्रमाणें ते या ठिकाणींच ब्रह्मसमागमाचा अनुभव घेतात. जे विषयांमध्यें निमग्न, त्यांनीं या सकल महात्म्यांचें उदाहरण पाहून आपल्या आत्म्याचें शोधन करावें. त्यांनीं नाना क्लेश. नाना विघ्नें सोसून आपल्या आत्म्यास झालेल्या रोगास औषध कोणतें याचा विचार करावा. ईश्वर आपल्यास विपत्तींत ठेवितो, आपल्यास दुःखद्वारें शासन करितो, तें यासाठीं कीं आपण असन्मार्गाचा परित्याग करून त्याच्या सत्पथास लागावें. ईश्वर आपल्यास सांगतो कीं मला विसरूं नका. मीं दिलेल्या शाश्वत देणगीचा उपभोग करा, परंतु मला शरण येऊन राहा. या सर्व जगांतील सर्व संपत्तीच्या अंगीं एवढी शक्ति नाहीं कीं ती ईश्वरास विन्मुख झाल्यानें जें आपल्यास भय होणार त्यापासून आपलें रक्षण करूं शकेल. सर्व त्रिभुवनांत या प्रकारचा आनंद नाहीं, कीं, जो आपण ईश्वरविमुख झाल्यानें जें आपल्यास दुःख होतें त्यापासून आपल्यास सोडवूं शकेल. तो विषयांत तृप्ति

देत नाहीं, यासाठीं कीं, विषयांत तृप्त राहिलों असतां आपण त्याच्या पवित्र आनंदाकडे दृष्टि देणार नाहीं. म्हणून तो या लोकीं सुखाबरोबर दुःख, संपत्तीबरोबर विपत्ति मिश्र करून ठेवितो कीं, ज्या स्थानीं गेलें असतां पुढें दुःखाची प्राप्ति मुळींच नाहीं असें स्थान संपादन करण्याचा आम्हीं यत्न करावा. संसारांतील नाना आघातांनीं घायाळ झालों असतां आपण त्यापाशीं सुखाचें स्थान मागावें आणि संसाराच्या तापानें आपलें शरीर संतप्त झालें असतां त्याचें शीतल जल प्राप्त व्हावें म्हणून त्याजकडे धावावें. आत्मोन्नति होत जाऊन विषयवासना जसजशी क्षीण होत जाईल, तसतसा ब्रह्मानंद आपल्या विशेष अनुभवास येत जाईल. असें झालें म्हणजे ईश्वरकार्यसाधनार्थच संसार, व आपल्या उपभोगाकरितां ईश्वर असें होईल. आपण या क्षणीं त्या सख्याच्या समागमांत एकत्र मिळालों आहोंत. त्यास प्रेमाश्रु समर्पण करून अंतःकरणपूर्वक आपली कृतज्ञतारूप भक्ति त्यास निवेदन करूं; आणि त्याला सर्वस्वदान करून आपल्या जीवताचें सार्थक करूं.

धर्मभ्रम.

(१) प्रातःसंध्या

प्रत्यहीं प्रातःकाळीं प्रत्येक मनुष्यानें परमेश्वराची उपासना करावी. ती शरीरानें शुचिर्भूत होऊन चित्त एकाग्र करून करावी. ती साधेल तर संध्यासमयीं म्हणजे रात्र व दिवस यांचा जो सांधिकाल त्या कालीं सूर्यबिंब नुकतेंच उदयास येत आहे अशा समयीं व सरोवराच्या, नदीच्या किंवा समुद्राच्या तीरीं एकांतस्थानीं करावी. देदीप्यमान आदित्यमंडलाकडे पाहून तें तेजोमंडल परमेश्वराचें राहाण्याचें ठिकाण आहे. तेथें परमेश्वर राहून आपल्या अतर्क्य सामर्थ्यानें सर्वत्र दृश्य पदार्थ त्या मंडलाच्या तेजानें प्रकाशित करून त्यांस नानाप्रकारच्या चित्रविचित्र रंगांनीं सुशोभित व रमणीय करीत आहे. प्राण्यांच्या नेत्रांवर तेज प्रेरण करून त्यांस आपल्या भोंवतालचे पदार्थ पाहण्याची शक्ति देत आहे, व त्यायोगें त्यांस आनंद देत आहे. वायुमंडलामध्यें त्याच तेजाच्या योगानें उष्णता उत्पन्न करून त्यास गति देत आहे. उदकावर तें तेज पसरून त्याला निर्मळ करीत आहे. पृथ्वीवर तें तेज पसरून तिलाही निर्मळ करीत आहे. तेंच वृक्ष, वनस्पती व प्राणी यांस उष्णता देऊन वाढवीत आहे.आणि पल्लव टवटवीत करीत आहे, पुष्पें प्रफुल्लित करीत आहे, धान्यें व फळें परिपक्व करीत आहे. प्राण्यांचा जठराग्नि तेजापासून उत्पन्न झालेल्या उष्णतेनें प्रदीप्त करीत आहे. असा जो आदित्यमंडलस्थ परमेश्वर तो तेथें

आहे ही भावना कांहीं वेळ निश्चल दृष्टीनें उदयास येणाऱ्या आदित्यमंडलाकडे अवलोकन करून दृढ करावी. असें मनांत आणावें कीं प्राणिमात्रांवर हे सर्व पूर्वोक्त उपकार तो आदित्यमंडलस्थ परमेश्वर निरंतर करीत आहे, अतएव तो **मित्र** म्हणजे आपणा सर्वांचा परम सखा होय.

तसेंच तो आपला पोषणकर्ता आहे (**पूषा**) व तोच आपला सर्व बाह्यजगाचा **सविता** म्हणजे उत्पन्नकर्ता होय. या प्रकारें आदित्यमंडलाकडे दृष्टि ठेवून परमेश्वराचें ध्यान करावें. नंतर आदित्यमंडलाच्या तेजानें विशेष गतीनें त्यासमयीं वाहत असणाऱ्या मंद,शीतल,सुखस्पर्श अशा वायुमंडलाकडे लक्ष द्यावें. त्या वायुमंडलामध्यें परमेश्वर राहून सर्व सजीव सृष्टीस प्राणरूप होत्साता श्वासोश्वासादि क्रियांच्या योगानें सर्व प्राण्यांचें प्राणरक्षण करितो. जर त्यानें या वायुमंडलाच्या बाहेर आपल्यास सोडिलें किंवा आपल्या या शरीरांत प्राणरूपानें जो या वायुमंडलाचा अंश त्यानें ठेविला आहे, तो जर आकर्षून घेतला, तर क्षणएक सुद्धां आपलें जीवन राहाणार नाहीं. अतएव तो वायुमंडलस्थ परमेश्वर जगत्प्राण, प्राणाधार अथवा प्राणाचा प्राण होय, अशी भावना दृढ करून जगत्प्राणत्वें करून वायुमंडलावर चित्त स्थिर करून प्राणदात्या परमेश्वराचें ध्यान करावें. नंतर समुद्र, नदी, किंवा सरोवर इत्यादि जलाशयांतील जलसंचयावर दृष्टि एकाग्र करून जलांतर्वर्ती परमेश्वर जीवनरूपी जलाच्या योगें प्राणिमात्राचें जीवनरक्षण करितो;

या जीवनावांचून आपल्या शारीरिक जीवनाचें पोषण होणें अशक्य आहे. अशा या जीवनांत राहून त्यास जीवनशक्ति देऊन आपलें रक्षण करणारा जो परमेश्वर तो आपला जीवनाधार अथवा जीवाचा जीव होय, असें शांत चित्तानें जीवनांतर्वर्ती परमेश्वराचें ध्यान करावें. नंतर ज्यामध्यें सर्व इंद्रियगोचरसृष्टि सामावली आहे असें जें हें सर्वव्यापक आकाशमंडल त्या आकाशमंडलांत राहून **वरुण** म्हणजे सर्व विश्वास आच्छादित करणारा असा जो सर्वव्यापक–अनंत–अपार–अगाधरूपी परमात्मा त्याचें आकाशमंडलाकडे दृष्टि लावून सर्वव्यापकरूपानें शांत चित्तानें ध्यान करावें. नंतर आपणासुद्धां सर्व प्राणिमात्रांस व सर्व सजीव, निर्जीव पदार्थांस धारण करणारी व धन, धान्य, वृक्ष, वनस्पती इत्यादि साधनांच्या योगेंकरून संपन्न करणारी जी ही धरित्री, विस्तीर्ण जी पृथ्वी, आपल्या शरीराच्या उद्भवास म्हणजे अन्नद्वारा जन्मास कारणभूत जी ही भूमी, त्या भूमीमंडलावर दृष्टि स्थिर करून भूमीमंडलस्थ **धाता** म्हणजे आपणास धारण करणारा,सर्वांवर असणारा जो परमेश्वर त्याचें सर्वाधाररूपानें शांत चित्तानें ध्यान करावें. याप्रमाणें सर्व बाह्य विश्वव्यापक जें परमेश्वराचें स्वरूप त्याचें शांतपणें एकाग्रचित्तानें ध्यान करून शेवटीं आपला देहधारी चैतन्यरूप जो आत्मा त्याचा जो अंतर्यामी म्हणजे त्याचे ठायीं गूढरूपानें राहून मन, बुद्धि, वाणी, इत्यादि शक्ति देणारा, सदसद्विवेकाच्या द्वारें आपली पवित्र इच्छा, आपला कल्याणकारक

बोध व आपली मंगलविधायी आज्ञा कळविणारा असा परमेश्वर, जो आपल्या आत्म्याचा आत्मा अतएव अंतरात्मा, जो आपणा सर्वांच्या आत्म्यापेक्षां परम श्रेष्ठ, अतएव जो आपला परमात्मा, तोच, ज्याचें आपण पूर्वी बाह्यविश्वाचे ठायीं ध्यान केलें तो विश्वात्मा होय, ही भावना अंतःकरणांत दृढ करून एकभावानें, पूज्यबुद्धीनें, परमप्रेमानें, अत्यंत लीनतेनें, सर्वकर्ता, सर्वव्यापक, सर्वान्तर्यामी, सर्वनियन्ता, सर्वप्राणाधार, सर्वसाक्षी, सर्वमंगलविधाता, सर्वाराध्य, सर्वेश्वर जो परमेश्वर त्याचें अनन्यमतीनें, शांत चित्तानें आपल्या अंतःकरणांत ध्यान करून, त्याचा दर्शनसाक्षात्कार अनुभवून, त्यास सर्व आत्मभाव निवेदन करून, त्याजवर निर्भर होऊन त्याचें प्रेमपात्र बालक, त्याचा आज्ञांकित सेवक होऊन, त्याच्या समागमापासून होणाऱ्या शुद्धीचा, शांतीचा, आनंदाचा लाभ करून घ्यावा. ही खरी प्रातःसंध्या म्हणजे ज्यासमयीं उत्तम प्रकारें परमेश्वराच्या स्वरूपाचें ध्यान करितां येतें अशा समयींची उपासना होय.

---

(२) गणेशचतुर्थी.

आलीकडे प्रायः सर्व स्मार्त व गृह्य कृत्यांत आपल्या लोकांत गणपति ही मुख्य देवता मानिली जात आहे. कोणतेंही मंगलकार्य करणें असलें तरी आरंभीं गणपतिपूजन करण्याचा

प्रघात आहे. त्यावांचून कार्य साङ्ग होत नाहीं, अशी आपल्या लोकांची समजूत आहे. तांदुळांची पुंजी करून त्यावर सुपारी ठेवून तेथें गणपतीचें आवाहन करून सर्व उपचारपूर्वक कार्यारंभीं गणपतिपूजन होत असतें. शिवाय माघ वद्य चतुर्थीस व भाद्रपद शुद्ध चतुर्थीस गणपतीच्या प्रीत्यर्थ ठिकठिकाणीं जेथें गणपतीचीं देवालयें आहेत तेथें उत्सव होत असतो. भाद्रपद शुद्ध चतुर्थीस म्हणजे गणेशचतुर्थीस तर या महाराष्ट्र देशांत प्रायः घरोघर गणपतीची मातीची मूर्ति स्वतां तयार करून किंवा बाजारांतून विकत आणून, स्थापन करून नाना प्रकारच्या पत्रपुष्पांनीं व इतर उपचारांनीं पूजा करून एकवीस मोदकांचा नैवेद्य दाखविण्याचा प्रघात प्रायः घरोघर असतो. हा गणपतीचा उत्सव कोठें दोन दिवस, कोठें पांच दिवस आणि कोठें कोठें दहा दिवसपर्यंतही चालतो. प्रतिदिवशीं रात्रौ गणपतीपुढें आरतीचा मोठा गजर, आणि पुष्पांजलिसमर्पणाच्या वेळीं वेदमंत्रांचा आक्रोशही सर्वत्र ऐकण्यांत येतो. ही गणपतीची मूर्ति आणण्याच्या वेळीं, व विशेषतः तलावांत किंवा समुद्रांत नेऊन विसर्जन करण्याच्या वेळीं, मोठा थाटमाट करण्यांत येतो; व उत्सव चालू असतां गणपतीच्या मूर्तीपुढें क्वचित् कीर्तन, क्वचित् गायन, व क्वचित् कलावंतिनींचें संगीत नृत्य, इत्यादि समारंभ होत असतात. एतदर्थ मोठमोठ्या शहरांत, मुख्यत्वेंकरून या आपल्या मुंबई शहरांत, धनवान् लोक या डामडौलांत पुष्कळ पैसा खर्च करतात; व गरीब-

गुरीब मोलमजुरी करून निर्वाह करणारे लोकही या अशा डामडौलांत मोठें भूषण मानून क्वचित् आपल्या शक्तीबाहेरही खर्च करतात. आतां या उत्सावाच्या संबंधानें मुख्य विचार असा आहे कीं, देवाचा उत्सव भक्तीची वृद्धि व्हावी एतदर्थ असून ती भक्ति वर सांगितलेला टाळघोळ, व मंत्राक्रोश, अथवा बाजे इत्यादिकांचा डामडौल, या प्रकारांच्या योगानें फारशी सिद्धीस जात असेल असें वाटत नाहीं. त्यांतूनही भक्ति शुद्ध झाली पाहिजे; व ती शुद्ध होण्याला चित्ताची एकाग्रता होऊन देवाच्या स्वरूपाचें निर्मळ ज्ञान अवश्य असलें पाहिजे. त्याचा अंतर्भाव या गणपत्युत्सवांत फारसा होत असेल असें वाटत नाहीं. डामडौल आणि खटाटोप हीं चित्तवृत्तीच्या एकाग्रतेस कारणभूत होतील ही गोष्ट दुरापास्त आहे. तसेंच जें देवाचें स्वरूप दृष्टीपुढें ठेवून पूजनादि प्रकार होतात, तें निर्मळज्ञानमूलक आहे असें दिसत नाहीं; व त्यावर लक्ष दिलें असतां चित्तामध्यें सात्विकभावाची वृद्धि होते असें वाटत नाहीं. प्रथम या देवाच्या स्वरूपाविषयीं विचार केला असतां असें म्हणणें भाग पडतें कीं देवतास्वरूप विरूप करण्याविषयीं आपल्या लोकांची बेहद्द आहे. मुंबईत व पुण्यांत ज्या गणपतीच्या मूर्ति प्रतिवर्षीं होतात, त्यांतील स्वरूपभेदांची गणना करूं म्हटलें तर फार कठीण गोष्ट आहे. कांहीं गणपति दोंदील, कांहीं पातळपोटे, कांहीं आंखूडसोंडे, कांहीं लांबसोंडे, कांहीं ह्रस्वदंत, कांहीं दीर्घदंत, कांहीं मुकुट-

धारी, कांहीं उप्णीषधारी, कांहीं टोपीधारी (या शब्दाविषयीं वाचणारे क्षमा करतील अशी आशा आहे,'' कांहीं मोकळ्या पायांचे, कांहीं जोडे घातलेले, कांहीं इंग्रजी बूट व स्टाकिंग घातलेले, कांहीं यज्ञोपवीतधारी, कांहीं यज्ञोपवीतविरहित, कांहीं नुसता आंगरखा घातलेले, कांहीं सदरा वासकूट (ज्याच्या खिशांतून घडचाळाची सांखळी लटकत आहे असे) व त्यारून आंगरखा घातलेले, कांहीं साधे धोतर नेसलेले, कांहीं लोडाला, कांहीं तक्याला वगैरे टेंकून बसलेले, कांहींच्या पुढें इंग्रेजी तऱ्हेचें मेज असून त्याच्यावरून सुंदर अस्तरण घातलें आहे व इंग्रजी तऱ्हेचें पादपीठ पायांखालीं दिलें आहे असे,कांहीं हातांपायांत साखळ्या तोडे इत्यादि भूषणें घातलेले, कांहीं उंच, कांहीं ठेंगणे,कांहीं सरळशुंड, कांहीं वक्रशुंड, असे किती म्हणून प्रकार सांगावे? आतां अशा प्रकारें गणपतीस्वरूपास विरूपता देणारांस दोष द्यावा तर ते पुष्कळ अंशीं दोषास पात्र नाहींत असें नाहीं; परंतु या गणेशदेवाची कल्पनाच जेथें त्यास विरूप करणारी आहे, तेथें तें पूर्वीचें विरूपकरण जडदृष्टि लोकांच्या कल्पनातरंगांनीं नानाविध करून त्याचा अतिशय केला यांत मोठेंसें आश्चर्य वाटण्याचें कारण नाहीं. मूळचा या गणेशदेवतेचा अवतारप्रकार कसा आहे तो पाहा. सिंदुरासुर नामक दैत्य महादेवाचें आराधन करून, त्यास प्रसन्न करून, त्यापाशीं अतुलबलाचें मागणें मागून, भोलाशंकरापासून तें प्राप्त करून घेऊन, मनुष्यादि सर्व जीवसृष्टीचा संहार करण्यास प्रवृत्त

झाला; व सर्व पृथ्वींतील राजे वगैरे जिंकून, सर्व प्राण्यांस पीडा देऊन, अखेरीस तो इंद्रादिक देवांनाही अनावर झाला. शेवटी तर तो ब्रह्मदेवादि आद्यदेवतांनाही दुर्जय होऊन शंकरासही भारी झाला. त्याचा नाश करण्यासाठीं पार्वतीच्या उदरीं विष्णूनें जन्म घेतला. गर्भामध्यें असतां सिंदुरासुरास ही बातमी समजून त्यानें आपल्या सिद्धिबलानें सूक्ष्मरूप धारण करून पार्वतीच्या गर्भाशयांत प्रवेश करून त्या गर्भगत अवतारी बालकाचा शिरच्छेद केला. पुढें मग तें बालक जन्मास आलें तें नुस्तें धडरूपानें आलें. तेव्हां त्याला सर्व देवांनीं मसलत करून एक गजाचें शिर तोडलेलें सांपडलें तें आणून चिकटविलें. याप्रमाणें मुलाचा आकार सिद्ध झाल्यावर पुढें त्याला वाहनाची आवश्यकता लागली. तेव्हां त्यास उंदिराचें वाहन दिलें. मग गणेशदेव दौंदील असून उंदरावर बसून लुटु लुटु संचार करतांना चंद्रानें तो स्वारीचा थाट पाहून विनोदानें हास्य केलें. त्यावरून गणपतीला राग येऊन आपल्या जन्मदिवशीं कोणीं चंद्राचें अवलोकन करूं नये असा चंद्रास शाप दिला; व जो कोणी या शासनाचा अतिक्रम करून चंद्राचें अवलोकन करील त्याजवर चोरीचा आळ येईल अशा प्रकारची शिक्षा लावून दिली. जडमति लोक हा सर्व प्रकार अक्षरशः यथार्थ मानून आपल्याकडून गणेशचतुर्थीच्या दिवशीं चंद्रावलोकन झालें तर त्याच्यायोगानें येणारा चोरीचा आळ टाळण्यासाठीं शेजारीपाजारी कोणाचा भाजीपाला चोरून आपल्या-

वर हा अल्प आळ घेऊन फक्त गालीप्रदानानेंच सुटून जाण्याची तजवीज करतात. आतां ही सर्व कथा देवाच्या नित्य, शुद्ध, बुद्ध, निराकार, निर्विकार, विमल स्वरूपाच्या संबंधानें कितपत जुळते याचा विचार आमच्या वांचकांनींच आपआपल्या मनांत करावा; व रामदास्वामींनीं दासबोधामध्यें जें एके ठिकाणीं म्हटलें आहे कीं:—

" देवासि देहधारी कल्पिती । तेथें नानाविकल्प उठती,
भोगणें त्यागणें विपत्ती । देहयोगें " ॥ १ ॥

हें वचन कसें यथार्थ होतें तें पाहावें. मूळ अवतारकथेनेंच जर गणपतीला वक्रतुंड, महाकाय, मूषकवाहन, इत्यादि प्रकारांनीं विरूप करून टाकिलें आहे, तर मग लोकांनीं त्यांत चावटळपणानें फाजीलपणा केला तर नवल काय! असो, ही स्वरूपाची गोष्ट झाली. आतां देवाधिदेव, महादेव, दुर्मति दैत्यास भोळेपणानें अतुळबलाचा वर देऊन आपल्यासही भारी करून घेतो, ही तरी गोष्ट किती समर्पक आहे याचा वाचकांनींच विचार करावा, बरें याला कोठें वेदादि आद्य ग्रंथांत प्रमाण पाहावें तर तें ही दृष्टीस पडत नाहीं. कित्येक " गणानां त्वा गणपतिं हवामहे " इत्यादि मंत्राचा आधार दाखवितात. परंतु हा मंत्र ब्रह्मणस्पति किंवा प्रजापति नामक जी वैदिक देवता आहे तिचा स्तावक होय. आतां अठराधान्यांचें कडबोळें जो अथर्व वेद, व रामतापिनी, गोपालतापिनी इत्यादि अर्वाचीन देवकथांस अनुसरून जे उपनिषद्भाग आहेत त्यांमध्यें

गणपत्यथर्वशीर्ष नामक जो एक लहानसा भाग आहे तो या गणपत्युपासनेला मुख्य आधारभूत आहे. परंतु पूर्वोक्त गणपतीच्या अवतारकथेला पौराणिक कथांशिवाय दुसरा आधार आहे असें दिसत नाहीं; आणि या पुराणांनीं व त्यांतील कथांवर रचलेल्या नानाफलश्रुतियुक्त भिन्न भिन्न माहात्मांनीं देवांची व त्यांच्या उपासनांची इतकी रेलचेल करून सोडिली आहे की रामदास स्वामींनीं एके ठिकाणीं विनोदानें जें म्हटलें आहे कीं:—

" शास्त्रांचा बाजार भरला , देवांचा गलबला झाला.
लोक कामनेच्या वृत्ताला , झोंबोनि पडती "

तें अगदीं यथार्थ आहे असें म्हटल्यावांचून राहावत नाहीं; आणि या आपल्या भरतखंडांतील एकंदर मनुष्यसंख्येच्या दुप्पट तिप्पट म्हणजे सुमारें तेतीस कोटी देव आहेत असं मानण्याचा आपल्या लोकांमध्यें प्रचार पडला आहे, याचाही फारसा चमत्कार वाटत नाहीं. इंद्रादि वैदिक देवतांचें आतां क्वचित् स्थलीं व क्वचित् प्रसंगींच लोकांस स्मरण होतें. नंतर उत्पन्न होऊन मुख्यत्व पावलेल्या ब्रह्माविष्णुशंकरादि त्रिमूर्तींचें लोकांस अगदीं विस्मरण जरी पडलें नाहीं, तथापि त्या त्रिमूर्तींवर अवलंबून राहाणाऱ्या अवतारी देवतांचा प्रसार पुष्कळ होऊन त्यांतच भगवद्गीतेमध्यें निर्दिष्ट केलेल्या गणपति इत्यादि यक्षरक्षोरूपि देवता मध्येंच घुसल्या आहेत; आणि त्यांच्या उपासना विशेष प्रचारांत आल्या आहेत. मग ही जी देवांची धुमश्चक्री माजली आहे. तिचा समर्थ रामदासस्वामींनीं " दे-

वांचा गलबला झाला " या वचनानें, व तुकारामबोवांनी " गणोबा विकाळ । लाडू मोदकांचा काळ ॥ " या वचनानें थोडासा विनोद केला म्हणून कोणास नवल वाटण्याचें कारण नाहीं. परंतु यांत विशेष खेदकारक गोष्ट ही कीं जो देव आज ग्रहण करून पूजितात तोच उद्यां किंवा चार दिवसांनीं टाकून देतात ! याविषयींही रामदासस्वामींनीं जें म्हटलें आहे कीं—

" देव पूजावा आणि टाकावा,
हें प्रशस्त न वाटे जीवा,
याचा विचार पाहावा,
अंतर्यामीं. "

तें या गणेशचतुर्थीच्या दिवशी पुजा केलेल्या गणपतीविषयीं असून किती यथार्थ आहे याचा सुज्ञ लोकांनी अवश्य विचार करावा.

" म्हणोनि विचार असावा,
विचारें देव शोधावा,
बहुत देवांच्या गोवा,
पडोंच नये. "
युगानुयुगें तिन्ही लोक,
एकला चालवी अनेक,
हा निश्चयाचा विवेक,
वेदशास्त्रीं पाहावा .

देव करिजे ऐसा नाहीं,
देव टाकिजे ऐसा नाहीं,
म्हणोनि याचा कांहीं,
विचार पाहावा.

दासबोध.

(३) पितृपक्ष.

भाद्रपद वद्यपक्षांत सर्व पितृवर्गाच्या स्मरणार्थ ज्यांचे वडील निवर्तले आहेत अशा लोकांनीं आपल्या बापाच्या मरणाच्या तिथीस महालय श्राद्ध या नांवाचा विधि करण्याचा प्रघात आपल्या देशांत प्रायः सर्वत्र आहे. आई व बाप यांच्या निरनिराळ्या मरणाच्या तिथीस प्रतिवर्षी त्यांच्या संबंधानें हा श्राद्धविधि होत असतो. परंतु भाद्रपद वद्य पक्षांत आपल्या जवळच्या सर्व पितृगणाच्या स्मरणार्थ समस्त पितृश्राद्ध किंवा महालय (मोठचा घरचें) श्राद्ध करण्याचा परिपाठ आहे. या महालय-श्राद्धाच्या दिवशीं कुटुंबाची सर्व मनुष्यें व जवळची आप्त-मंडळी भोजनार्थ एकत्र जमत असते व कोठें कोठें खेडेगांवीं यथाशक्ति इतर ग्रामस्थ मंडळीसही या प्रसंगीं भोजनास बो-लविण्याचा प्रचार आहे. श्राद्ध म्हणजे पितरांच्या उद्देशानें श्रद्धापूर्वक जें कांहीं कर्म करावयाचें तें; व या कर्मांत ब्राह्मण-भोजन व दक्षिणाप्रदान हे दोन प्रकार मुख्य असल्यामुळें पि-तरांच्या उद्देशानें श्रद्धापूर्वक जें ब्राह्मणभोजनादि कर्म करा-

वयाचें त्यास श्राद्ध अशी संज्ञा आहे. आतां देहाहून आत्मा निराळा नाहीं व देहविनाशाबरोबर आत्मशक्तीचाही नाश होतो असा नास्तिक पक्ष स्वीकारणारे जे लोक, त्यांची तर मरणोत्तर पितर म्हणून कोणी परलोकीं नाहींतच अशी समजूत असल्यामुळें त्यांनीं इतर लोकांच्या रूढीप्रमाणें पितृतिथीच्या दिवशीं ब्राह्मणभोजनादि कर्म करणें यांस श्राद्ध असें म्हणतां येत नाहीं. कारण पितरांच्या अस्तित्वाविषयींच त्यांची श्रद्धा नसते. तसेंच ईश्वरानें जीवात्म्यास निर्माण करून त्याच्या उपजीवनाचीं साधनें मनुष्यमात्राच्या स्वाधीन ठेविलीं आहेत. एकलोकनिवासी मनुष्यें परस्परांस साहाय्य करूं शकतात, परंतु इहलोकीं राहाणाऱ्या मनुष्यांनीं परलोकस्थ पितरांस येथें उदक सोडून किंवा ब्राह्मणांस भोजन घालून व दक्षिणा वगैरे देऊन त्यांच्या निर्वाहाच्या कामीं साहाय्य करण्याची आवश्यकता ईश्वरीयोजनेकडे लक्ष दिलें असतां आहे असें नाहीं. जशी ऐहिक स्थितीमध्यें राहाणाऱ्या मनुष्यांची उपजीविका इहलोकींच्या तजविजींनें होते, तद्वत् परलोकस्थ पितरांच्या जीवनाची तजविजही याच न्यायानें तेथल्या तेथील तजविजींनेंच व्हावी हें सयुक्तिक दिसतें. यास्तव आपण येथें ब्राह्मणादिकांस समर्पण केलेलें अन्न परलोकीं पितरांस पावतें व तेणेंकरून त्यांची तृप्ति होते असें मानण्यास अवकाशच राहात नाही. तेव्हां श्राद्धविधीचें वास्तविक तत्त्व पाहिलें तर परंपरेनें ज्याचा आपल्यावर मोठा उपकार झाला आहे, असा जो आपला पितृगण

त्यांचें त्या उपकाराच्या संबंधानें आपण कृतज्ञतापूर्वक स्मरण करावें हेंच मुख्यत्वेंकरून आपलें कर्तव्य होय; व त्यांचें स्मरण करणें तें अंतःकरण सात्विक भावानें व कृतज्ञतेनें युक्त होऊन चित्त गंभीर व शांत असें झालें असतां यथास्थित होतें. परंतु पितृपक्षाच्यासंबंधानें हल्लीं जो प्रकार पाहाण्यांत येतो तो केवळ दुसरा एकादा ऐहिक सण असावा व त्या दिवशीं खेळीमेळीनें चौघांनीं एकत्र जमून यथास्थित मिष्टान्न भोजन करावें, तसा आहे. यामुळें पितरांचें श्रद्धापूर्वक स्मरण व त्यांनीं आपणांवर केलेल्या उपकारांचें स्मरण व त्यांच्या वियोगस्मरणानें आपल्या चित्ताच्या ठायीं उत्पन्न होणारी गंभीरता व शांतता, तसेंच आपणासही त्यांच्याप्रमाणें मरणधर्म लागला आहे व ऐहिक जीवित अशाश्वत आहे अशा प्रकारचा सर्व उच्छृंखळपणा निरस्त करणारा गंभीर विचार, इत्यादि जे भाव आपल्या ठायीं उत्पन्न झाले पाहिजेत ते झाले नाहीत, तर या विधानास श्राद्ध असें मुळींच म्हणतां येणार नाहीं. आतां मनाची स्थिति अशा प्रकारची झाली म्हणजे बुभुक्षितास अन्नदान व इतर दीनांस यथाशक्ति द्रव्यदान आणि आपल्या शांत व गंभीर मनोभावास योग्य असें सद्ग्रंथांचें वाचन व मनन करणें, हेंच कर्म श्राद्धास उचित दिसतें. असें केलें असतां जर परलोकीं आपला पितृगण विद्यमान आहे तर तो व तसाच जगत्पिता परमेश्वर आपली श्रद्धाभक्ति पाहून संतुष्ट होईल यांत संशय नाहीं; व पितृस्मरणानें आपल्या चित्तावर जो उपकारक संस्कार

झाला पाहिजे तोही होईल. म्हणून ज्यांना श्राद्धकर्म यथासांग व्हावें अशी इच्छा आहे, त्यांनीं पितृपक्षांत किंवा इतर श्राद्ध-तिथीस सणासारखा मोठा समारंभ न करितां शुचिर्भूत होऊन एकाग्रचित्तानें पितृकृत उपकारांचें स्मरण करून, व सर्व पितृ-पिता जो परमेश्वर त्याचेंही निश्चलचित्तानें स्मरण करून यथा-शक्ति दीनजनांस अन्न किंवा द्रव्य ह्याचें दान करावें आणि या तिथीस आपला काळ आपल्या पितरांचे उपकार, त्यांचा आपला वियोग व आपणासही निश्चित येणारी परलोकस्थिति या महत्त्वाच्या गोष्टींविषयीं शांत व गंभीर भावानें मनन कर-ण्यांत व त्या मननास उपयोगी अशा ग्रंथांचें वाचन व अव-लोकन करण्यांत घालवावा. हेंच खरोखरी श्राद्ध होय. पितृ-स्थानी ब्राम्हण बसवून पितरांस उचित् अशी जी अंतःकर-णाची पूज्यबुद्धि तिच्याऐवजीं बाह्योपचारानें ब्राह्मणांची पूजा करणें व परलोकीं पितरांस अन्नोदक प्राप्त व्हावें म्हणून येथें पिंडसमर्पण करणें इत्यादि श्राद्धरूपी प्रकार वास्तविक धर्ममू-लक नसून केवळ बाह्य व लौकिक आचारच होत, अतएव तो धर्मभ्रमाचाच परिणाम होय.

(४) अधिक महिना.

अधिक मास किंवा अधिक महिना हा सुमारें अडीच पा-वणेतीन वर्षांनीं येतो हें सर्वांस माहित आहे. परंतु ही कांहीं ईश्वरीयोजना आहे असें नाहीं. आपल्या लोकांची कालगण-

णेची पद्धति चांद्रमासावर अवलंबून आहे. त्या गणनेप्रमाणें ज वर्ष होतें त्यामध्यें आणि सौरमानानें म्हणजे सूर्याच्या सभोंवतीं पृथ्वीचें भ्रमण होण्यास जो काळ लागतो त्याप्रमाणें जें वर्ष होतें त्या दोहोंमधील फरक काढून टाकण्यासाठीं सुमारें पावणेतीन वर्षांनीं एक महिना अधिक धरण्याची तजवीज कालगणना करणाऱ्या ज्योतिष्यांनीं केली आहे. या दृष्टीनें पाहिलें असतां अधिक मास ही केवळ मनुष्यकृत कालगणनेसंबंधीं व्यवस्था आहे. या व्यवस्थेचा धर्माशीं कांहींएक संबंध अर्थाअर्थीं नाहीं. असें असतां मतलबी लोकांनीं या महिन्याच्या संबंधानें एक 'अधिकमाहात्म्य' म्हणून ग्रंथ करून, त्यामध्यें प्रत्येक तिथीस स्नानदानादि क्रिया सांगून, त्यापासून मोठी पुण्यप्राप्ति होते असें अतिशयोक्तीनें प्रचुर असें वर्णन केलें आहे. त्या योगानें आपले धर्मभोळे लोक तें माहात्म्य ऐकून तत्प्रयुक्त कर्मे करण्याविषयीं प्रवृत्त होतात. ही चाल हिंदुस्थानांत प्रायः सर्वत्र आहे. या चालीस अनुसरून इतर ठिकाणांप्रमाणें गेल्या अधिक भाद्रपदमासीं भोळ्या लोकांच्या स्नानदानादि धर्माची या मुंबई शहरांत एकच गर्दी उडून गेली होती. सकाळच्या प्रहरीं समुद्रतीरीं व प्रसिद्ध देवालयांच्या समीप असलेलीं तळीं व लहान तळ्या यांचे कांठीं आबालवृद्धांच्या झुंडींच्या झुंडी स्नानार्थ आलेल्या पाहाण्यांत येत. महाराष्ट्र लोकांपेक्षां गुजराथी लोकांत धर्मभोळेपणा कांहीं अंशीं जास्ती असल्यामुळें त्यांचा समुदाय विशेष असे. आतां समु-

द्रस्नान सकाळच्या प्रहरीं मनुष्यानें वर्षांतून कांहीं दिवस केलें असतां त्यापासून कांहीं अपाय नाहीं, उलटें तें गुणावहच होईल. परंतु तें थोडथोडक्या मनुष्यांनीं निरनिराळ्या जाग्यांत निर्मळ पाण्यांत केलें असतां तसें गुणावह होईल. एकाच लहानशा जाग्यांत शेंकडों लोकांचे थवे स्नान करूं लागले तर तें विशेष अमंगल व अपायकारक स्नान होईल यांत संशय नाहीं. परंतु समुद्राच्या पाण्यास स्वाभाविक चलन तरी आहे. एकाद्या लहानशा देवळापाशीं एकादी लहानशी तळी असते, तिजमध्यें समीप राहाणारे लोक तोंड धुणें, चिरगुटें धुणें, इत्यादि सर्व प्रकार करीत असून तें पाणी नासलेलें असतें. परंतु त्यास पुष्करिणी (मग तेथें पुष्करें असोत किंवा नसोत,) असें प्रगल्भ नांव ठेवून, त्या तळीस तीर्थ मानून, तेथें लोकांचे –विशेषेंकरून गुजराथी लोकांचे–थवेच्या थवे स्नान करतात. त्यापासून कांहीएक हित न होतां उलटें अनहित मात्र होण्याची धास्ती असते. **तीर्थ** म्हणजे **पवित्र** हा मूळचा अर्थ. पवित्र म्हणजे निर्मळ अशा उदकानें वाहणारी नदी, किंवा समुद्राचा प्रवाह, किंवा अशा पाण्यानें भरलेलें समुद्रासारखें मोठें सरोवर यांमध्यें स्नान केलें असतां शरीर निर्मळ होऊन चित्त प्रसन्न होतें. हें एकप्रकारचें अवश्य धर्मसाधन होय. कारण शरीर शुचिर्भूत वाटून चित्त प्रसन्न झालें असतां स्मरण, मनन, ध्यान इत्यादि धर्मबुद्धीचें दृढीकरण करणाऱ्या क्रिया विशेषप्रकारें सिद्धि पावतात. परंतु या आपल्या शहरांतील जीं

स्नानाचीं स्थानें, ज्यांस तीर्थें म्हणून म्हणतात, त्यांमध्यें केलेलीं स्नानें अशा प्रकारें मुळींच हितावह होत नाहींत; झालीं तर अहितकारकच होतील. तसेंच स्त्रीपुरुषांचा बहुत संमर्द जमल्यानें उघड्या, थोड्या, व संकुचित जागेंत त्या सर्वांचीं स्नानें एकत्र होत असल्यानें, त्यांमध्यें स्त्रीजातीस आवश्यक जी मर्यादा तिचा सर्वथा लोप होतो. हें कांहीं लहान सात अनहित आहे असें नव्हे. असो, ही स्नानाची गोष्ट झाली. आतां दानाच्या गोष्टीकडे वळूं. दानामध्यें अधिक माहात्म्यांत पक्कान्नदानाची विशेष प्रशंसा केली आहे; यामुळें ज्यांना वर्षानुवर्ष घारगे किंवा अनरसे किंवा जिलबी मिळावयाची नाहीं अशा भोळ्या बायका देखील आपल्या थोड्याशा द्रव्यांतून तीसतीन (तेतीस म्हणतां कामा नये) ब्राह्मण जेवूं घालतात. ज्यांच्या जवळ अगदींच द्रव्य नाहीं त्यांस निदान तीसतीन अनरसे किंवा घारगे यांचीं वायनें म्हणजे दानें (वाणें) तरी द्यावींशीं वाटतात. यामुळें गेल्या महिन्यांत भोजनभाऊ भटाची तर खूप चंगळ झाली होती. तसेंच या शहरांत ठिकठिकाणीं भागवतसप्ताह चालले होते; म्हणजे सात दिवसांत समग्र श्रीमत्भागवताचें पठण होत होतें. प्रत्येकास समग्र भागवताचें पठण दुरापास्त असल्यामुळें एका पुराणिकबांवानीं भागवताचा सारांश गद्यरूपानें चूर्णिका या नामेंकरून ठेविला आहे, त्याचेंही पठण होत होतें. ठिकठिकाणचे पुराणिकबुवा हा सप्ताह करण्यासाठीं येथें आले होते. मग त्यांत कितीएक व्युत्पत्तीचें

कांहीं ज्ञान नसतां नुसतें वाचतां आलें तरी तेवढ्यावरच पुराणिक मंडळीमध्यें घुसून स्वतांची दक्षिणा पटकावीत होते. या प्रीत्यर्थ सालमजकुरीं गुजराथी मंडळींनीं लक्षावधि रुपये खर्च केले असें ऐकिवांत आलें आहे. परंतु यांतही धर्म करतां कर्म पाठीस लागतें असें म्हणतात तसें कांहीं झालें. जात्यभिमान व राष्ट्राभिमान, जे आपल्या देशांत स्वभावतः प्रबळ आहेतच, त्यांचा प्रवेश या दानक्रियेमध्येंही होऊन, गुजराथी लोकांनीं कोणी महाराष्ट्र पुराणिकांस सप्ताहास ध्यावयाचें नाहीं असा प्रकार केल्यामुळें कितीएक महाराष्ट्राभिमानी मंडळीसही आवेश चढून त्यांनीं महाराष्ट्र पुराणिकांचा समाज जमवून ही सप्ताहाची गर्दी उडविली आणि पुष्कळ दानधर्म केला. अधिक महिन्याच्या माहात्म्याचें पुराणही जिकडे तिकडे चाललेंच होतें. याप्रमाणें गेल्या अधिकमासांत स्नान, दान, पठण हीं कर्मे या शहरांत पुष्कळ झालीं. मात्र स्नानापासून लोकांचीं शरीरें स्वच्छ झालीं, किंवा चित्तें सात्विकभावानें युक्त किंवा प्रसन्न होऊन विशेष परमार्थपरायण झालीं किंवा कसें याचा मोठा संशय आहे. तसेंच दानही पुष्कळ झालें. परंतु तें ज्ञानपूर्वक, सात्विक श्रद्धेनें व सत्पात्रीं कितपत झालें याविषयींही संशयच आहे. आतां राहिलें पठण; तें समग्र तरी झालें किंवा नाहीं हें पाठकांच्या चित्तासच माहित ! त्यापासून त्यांच्या तरी मनावर कांहीं शुभ संस्कार झाला असेल किंवा नाहीं याविषयीं संशयच आहे ! श्रवण करणारांस अर्थबोध

नसल्यामुळें, व सतत श्रवण करण्यास अवधान पाहिजे तेंही असणें कठीण असल्यामुळें, माहात्म्यांत असलेल्या अप्रत्यक्ष पुण्यफलाशिवाय कांहीं प्राप्ति झाली असेल किंवा नाहीं याविषयीही संशयच आहे. तसेंच केवळ पारमार्थिक दृष्टीनें पाहिलें तर हीं सर्व कर्मे विशेष उद्देशानें, भिन्न भिन्न फलांच्या इच्छेनें केलीं असल्यामुळें त्यांपासून ईश्वरार्पणबुद्धीनें केलेल्या सत्कर्माचें फल जी चित्तशुद्धि व ईश्वरनिष्ठेची वृद्धि, तशा प्रकारचें कांहीं फल झालें असेल असें कांहींच वाटत नाहीं.

एवंच स्नानापासून शरीरशुद्धि नाहीं व चित्ताची प्रसन्नता नाहीं; द्रव्यदानापासून सत्पात्रदानानें होणारें फल नाहीं; व पुराणपठणानें होणारा बोधही नाहीं; उलटें काम्यकर्मे आचरल्यानें भोळ्या लोकांच्या मनांत मुक्तीची इच्छा असूनही त्यांजकडून जन्मांतरप्राप्तीचीच तयारी होते. आतां हा परिणाम मुख्यत्वेंकरून धर्माचें खरें स्वरूप न समजल्यामुळें केवळ नुस्तें अमुकएक कर्म करणें हा धर्म आहे अशा धर्मभ्रमाचा होय, हें कोणाही मनुष्यास कळून येईलच.

समाजाच्या प्रीतिभोजनाविषयीं गैरसमजूत.

या देशांत ठिकठिकाणीं वेळोवेळीं कांहीं प्रसंगांस उद्देशून देवाचा उत्सव करण्याचा प्रघात परंपरागत चालत आला आहे. त्या उत्सवांत कित्येक दिवसपर्यंत नित्यशः कीर्तन, पुराण, भजन, मंत्रजागरण, पूजा, अर्चा, इत्यादि धर्मबुद्धिप्रेरित देवाप्रीत्यर्थ निरनिराळे प्रकार करण्याचा परिपाठ आहे. उत्सवाच्या अंतीं सर्व भक्तमंडळी मिळून समाराधना म्हणजे उत्सवापासून उत्पन्न झालेलें जें प्रेम व जी भक्ति त्यांच्या प्रेरणेनें एकत्र भोजन होत असतें. त्यावेळी तें भोजन देवाचा प्रसाद म्हणून घेतलें जातें. त्यांत सामान्य भोजनाचा शरीरपोषणरूप जो हेतु तो नसून केवळ देवप्रसादजनित आनंदाचा लाभ व्हावा हींच सर्वांची इच्छा असते. या प्रवृतीस अनुसरून येथील प्रार्थनासमाजाची मंडळी आपल्या समाजस्थापनेच्या संबंधानें प्रतिवर्षी फाल्गुन मासीं वद्यपक्षीं समाजस्थापनेचा दिवस पापमोचनी एकादशी हा धरून आधीं मागें मिळून सुमारें सात आठ दिवसपर्यंत देवाचा उत्सव करीत असतात. त्यांत उपासना, व्याख्यानें, कीर्तन, पुराण, भजन, नगरसंकीर्तन, इत्यादि निरनिराळे प्रकार होतात व समाजाच्या मंडळीची समाराधना एकादिवस होते. तिला **प्रीतिभोजन** हें नांव प्रथम कोणीं दिलें असून त्याच नांवानें त्या प्रसंगाची लोकांत प्रसि-

द्धि आहे. हा प्रसंग भगवत्प्रेमजनित परस्पर प्रेमाचा विशेष आविर्भाव होऊन त्याच्या योगानें प्रायः होत असल्यामुळें कदाचित् हें नांव पडलें असेल. या प्रसंगीं समाजाची बहुतेक मंडळी एकत्र जमून ईश्वरप्रसादग्रहणबुद्धीनें हा प्रसंग साजरा करितात. भोजनाचा बेत केवळ प्रसाददृष्टीस योग्य असा अगदीं साधा निर्दोष व नेमस्त असून तें भोजन ईश्वरनिवेदनपूर्वक धर्म-ज्ञानाकडे लक्ष ठेवून व गंभीरपणें होतें. भोजनसमयीं डेकन कालेजाच्या संबंधानें जो वार्षिक भोजनसमारंभ होतो त्या समारंभाप्रमाणेंच पंक्तींची व्यवस्था करण्याकडे लक्ष नसून केवळ प्रसादग्रहणाकडे लक्ष असतें.यावरून हें प्रीतिभोजन सामाजिक मंडळी बुद्धिपुरःसर जातिभेद मोडण्याच्या हेतूनें करिते अशा प्रकारची समजूत लोकांमध्यें होऊन त्याविषयीं चर्चा होते, ही आमच्या मतें निवळ गैरसमजूत होय. हें भोजन जातिभेद मोडण्यासाठीं नसून केवळ भगवत्प्रसादग्रहणासाठीं आहे. पंढरपुरीं गोपाळकाल्याच्या वेळीं जातिभेदाकडे दृष्टि दिल्यावांचून जसा काल्याचा प्रसाद लोक भक्षण करितात किंवा पुरीस जगन्नाथाच्या उत्सवसमयीं जो देवाचा अन्नरूपी प्रसाद गाड्यांवरून रस्तोरस्तीं वांटला जातो, तो जसा सर्व भाविक भक्तमंडळी व सर्व यात्रेकरू जातिभेदाकडे किंवा जातिभंगाकडे लक्ष न देतां ग्रहण करितात, त्याप्रमाणेंच हें प्रार्थनासमाजाच्या संबंधानें होणारें प्रीतिभोजन केवळ प्रसादग्रहणरूप होय. त्यांत जातिभेदाची किंवा जातिभंगाची दृष्टी मुळींच नसते.

म्हणूनच पंढरपूर येथें किंवा पुरीस प्रसादग्रहणानें लोक ज्याप्रमाणें जातिभ्रष्ट होत नाहीत त्याप्रमाणेंच या प्रीतिभोजनाच्या संबंधानें प्रसादग्रहण केल्यानेंही कोणी जातीभ्रष्ट होतो असा अर्थ नाहीं. जातिभद ईश्वरनिर्मित नसून ज्ञानाच्या व स्वभावाच्या तारतम्यानें व व्यवहारभेदानें होत होत आलेला आहे. तो राष्ट्रीय ऐक्याच्या वृद्धीस विघ्नकारक होत आहे. एतएव तो अकल्याणकारक आहे. पारमार्थिक दृष्टीनें प्रत्येक मनुष्याचा आत्मा परमेश्वराचें अधिष्ठान असल्यामुळें मनुष्यांमध्यें जन्मतःच उच्चनीच व पवित्र अपवित्र असा स्वाभाविक भेद आहे असें मानणें योग्य नाहीं. तो ज्ञानप्रसादानें,तात्त्विक धर्मविचाराच्या वृद्धीनें व सर्वांनीं आपलें आचरण शुचिर्भूतपणानें करण्याची प्रवृत्ति वाढत गेल्यानें अवश्य मोडला जाणार आहे. तदर्थ अज्ञाननिरसनाचा व दृढ झालेली भेदबुद्धि व परस्पर मत्सरबुद्धि यांचा निरास करण्याचा उद्योग अवश्य झाला पाहिजे. अशी समाजाच्या मंडळीची समजूत आहे व त्या संबंधानें मंडळीचा यथाशक्ति उद्योगही चालला आहे. परंतु समाजाचें वार्षिक प्रीतिभोजन याचा उद्देश प्रसादग्रहणापुरताच असून तसा त्याचा पूर्वोक्त उद्योगाशीं साक्षात् संबंध मुळींच नाहीं.

श्रीमन्महर्षि देवेंद्रनाथ ठाकूर यांचें सकल ब्राह्मजनांस प्रेमसमर्पण.

हे प्रिय ब्राह्मजनहो,

संगच्छध्वं संवदध्वं संवो मनांसि जानता ।
देवा भागं यथा पूर्वे संजानाना उपासते ॥

तुह्मी सर्व ऐक्यभावानें युक्त व्हा, ऐक्यभावानें परस्परांशीं भाषण करा, आणि एकविचारानें एकचित्त व्हा. प्राचीन कालच्या देवता ज्याप्रमाणें एकचित्त होऊन हविर्भाग ग्रहण करीत, त्याप्रमाणें तुह्मीही एकचित्त व्हा.

समानीव आकूतिः समाना हृदयानि वः ।
समानस्तु वो मनो यथा वः सुसहासति ॥

तुमचा विचार व निश्चय एकरूप होवो, तुमचीं हृदयें एकरूप होवोत, तुमच्या मनोवृत्ति एकरूप होवोत; तेणेंकरून तुह्मांमध्यें फार आनंदकारक ऐक्य होईल.

तुह्मी सर्व परस्परांशीं एक भावानें वर्ता व एक विचारानें राहा. हा जो मी तुम्हास स्नेहपूर्वक व तुमचें हित व्हावें एतदर्थ आशीर्वाद दिला आहे त्याजकडे विशेष लक्ष्य देणें हें या विरोधाच्या व कलहाच्या प्रसंगीं तुमचें कर्तव्य होय. यास्तव जो हा मार्ग मी तुम्हास सांगतों त्याचें तुम्हीं अवलंबन केलें असतां तुमचा हेतु सिद्धीस जाईल. तो मार्ग हाः—आह्मी आ-

दिब्राह्म, साधारण ब्राह्म अथवा मंत्रग्राही ब्राह्म किंवा दुसऱ्या कोणत्या संप्रदायाचे ब्राह्म आहों हा अत्यंत क्षुद्र भाव विसरून आम्ही ब्राह्म, एका ईश्वराचे उपासक, एका पित्याचीं आपत्यें, सर्व मनुष्यें आमचीं भावंडें, असा उदार भाव धारण करण्याकडे तुमच्या चित्ताचा सर्व कल असूं द्या. हाच ऐक्यसिद्धीचा मार्ग. हा मार्ग तुम्हीं अवलंबन केला असतां तुमच्यामधील सर्व विरोध दूर होईल, शांतीचा अभ्युदय होईल, तसेंच, ब्राह्मधर्माचा जय होईल.

ब्राह्मधर्म हा आध्यात्मिक धर्म होय. त्याचें बीज हेंच कीं, आत्म्याचे द्वारा परमात्म्यातें जाणावें. आत्म्याचे ठायीं ईश्वराचें दर्शन झालें असतां सर्वत्र त्याचें दर्शन होतें. जो या सकल वैचित्र्याचें मूल, जो सकल संसाराचा स्वामी, त्याचें राहण्याचें आवडतें ठिकाण मनुष्याचा आत्मा हें होय. जर मनुष्यास आपल्या आत्म्याचें ज्ञान नाहीं तर त्यास सर्व शून्यवत् होय. आत्माच परमात्मज्ञानाचें मूल होय.

ह्या आपल्या शरीरामध्यें जो शरीरधारी आत्मा, त्याचे अभ्यन्तरीं विशुद्ध ज्ञानाच्या प्रकाशानें शुद्ध, बुद्ध, अशरीर जो परमात्मा त्यातें पाहावें. शांत, दांत, उपरत, तितिक्षु, समाहित होऊन आपल्या आत्म्याचे ठायीं परमात्म्यातें पाहावें, यासच अध्यात्मयोग म्हणतात. भक्तिपूर्वक या अध्यात्मयोगानें युक्त झाल्यानें सकलपापनिवृत्ति होते; मोक्षमार्गाचा लाभ होतो.मृत्यु प्राप्त झाला असतां शरीर पतन होईल, परंतु आपण

पूर्वोक्तप्रकारें योगयुक्त झालों असतां आत्मा परमात्म्याच्या समागमें अनंतकाल राहील.

ज्याप्रमाणें शरीरस्वार्थ प्रत्यहीं नियमित आहार केला पाहिजे, त्याप्रमाणेंच आत्मस्वास्थ्यार्थ प्रत्यही ईश्वरोपासना केली पाहिजे. ईश्वरोपासना हेंच आत्म्याचें अन्न होय.

"तस्मिन् प्रीतिस्तस्य प्रियकार्यसाधनंच तदुपासनमेव"

परमेश्वरास देशकालातीत परंतु देशकालव्यापी, सर्वसाक्षी. सत्यज्ञानानंतरूप जाणून तोच आपला पिता, माता व सुहृत्, तोच आपला अंतर्यामी हृदयस्वामी होय हें जाणून, प्रेमभरें नित्य त्याची आराधना करावी आणि संसारांत आपल्या हितसाधनांत त्यास प्रिय अशीं सकल धर्मकृत्यें अहोरात्र साध्य करीत असावें. हीं जीं दोन त्याच्या उपासनेचीं अत्यंत आवश्यक व स्वभावतः संयुक्त अंगें त्यांचा परस्पर वियोग कदापि करूं नये.

यत्नपूर्वक सत्समागम करावा. संसारांत नानाप्रकारची स्थिति आपल्यास प्राप्त होते, आणि अंतःकरण नानाविध वृत्तींनीं व्याप्त होऊन विक्षिप्त होतें. धर्मभाव म्लान होतो, पवित्रतेविषयीं उत्साह नाहींसा होतो, सदाशा भग्न होऊन तिच्या जागीं निराशा उत्पन्न होते, आणि मोह उत्पन्न होऊन जीवन मलीन करितो. अशा अवस्थेमध्यें सत्सहवास आत्म्यास स्वाभाविक स्थितीवर आणूं शकतो. साधुसंगाच्या सामर्थ्यानें आत्म्यास नष्टप्राय झालेलें धर्मजीवन पुनः प्राप्त होतें; तद्विषयीं

निराश झालेल्या मनुष्यांस पुनः त्याची आशा उत्पन्न होतें; आणि निरुत्साह झालेलें चित्त पुनः उत्साहयुक्त होतें. होतें. जसा सूर्याचा प्रकाश पदार्थांचें अंधकारानें आच्छादिलेलें रूप व्यक्त करितो, त्याच प्रमाणें सज्जनांचें साधुत्व असाधु जीवनास पवित्र आणि पुण्यशील करितें. साधुसमागमाचा हाच सगळ्यांत मोठा गुण होय कीं, त्याच्यायोगें असद्वृत्तीचें दमन होतें, व सद्वृत्ति दृढ होतात. अतएव ज्यांस धार्मिकतेची इच्छा असेल त्यांनी सत्समागम करण्याच्या कामीं दुर्लक्ष करितां कामा नये.

असत्समागमाचा परित्याग करावा. ज्यांच्या समागमापासून नीच वासनांचा व नीच वृत्तींचा उदय होतो, त्यांपासून आपलें रक्षण करावें. असत्सहवासापासून सर्व प्रकारचा मोह उत्पन्न होतो. असत्सहवासानें पापाविषयीं तिरस्कार व धर्माविषयीं श्रद्धा हीं मंद होतात. अतएव तुम्ही असत्संगाचा परिहार करून सत्संग जोडा.

कोणाबरोबरही विवाद करूं नका. क्रोध आवरा, आणि क्षमान्वित व प्रीतियुक्त होत्साते सर्वांबरोबर सद्व्यवहार करा. या योगानें इतरांशीं तुमचें वर्तन मित्रभावानें होईल.

उपकारकर्त्याविषयीं कृतज्ञ असावें. आपल्यावर कोणींही थोडादेखील उपकार केला, तरी तो विसरूं नये; म्हणजे कृतघ्नता मनामध्यें कधींही येणार नाहीं. जो कृतघ्न असतो त्यास कोठेंही यश प्राप्त होत नाहीं. त्याला कोणी आश्रय देत नाहीं

व सुख प्राप्तिही होत नाहीं. कृतघ्न मनुष्य विश्वासास पात्र होत नाहीं. आणि कृतघ्नतारूपी दोष कशानेंही जात नाहीं.

थोडेंबहुत तरी श्रद्धापूर्वक सत्पात्रीं दान करावें. दानाचें न्यूनाधिक्य दात्याच्या श्रद्धेवर आणि पात्राच्या योग्यतेवर अवलंबून असतें. ज्याला दान दिल्यानें असत्कार्याविषयीं उत्साह होईल, अशा असत्पात्रीं दान करणें धर्मास संमत नाहीं. ज्या मनुष्यास एकाद्या अत्यंत आवश्यक शरीररक्षणसाधनाची उणीव असून तिच्या योगें पीडा होत आहे, आणि ज्यास दात्याच्या कृपेशिवाय दुसरा कोणताही आधार नाहीं, असें मनुष्य दानाचें योग्य पात्र होय. अशा सत्पात्रीं श्रद्धापूर्वक यथाशक्ति दान केलें असतां तुम्हांस पुण्य प्राप्त होईल, आणि तेणेंकरून तुमच्या आत्म्यास सुखही होईल.

दान करण्यासाठीं अन्यायानें द्रव्योपार्जन करूं नये. तशा दानांत पुण्य नाहीं. उलटें त्यापासून महत्पाप घडतें. अतएव जर द्रव्यदानाविषयीं सामर्थ्य नसेल तर अन्य उपायांनीं दुःखित प्राण्यांचें दुःख निवारण करावें. कदापि अन्यायानें दुसऱ्याचें धन हरण करूं नये.

आपल्या निर्वाहासाठीं, किंवा अवश्य पोषणीय जो आपला परिवार त्याच्या प्रतिपालनासाठीं अन्यायानें धनोपार्जन करूं नये. या क्षणभंगुर जीविताच्या रक्षणापेक्षां ईश्वरानें जें धर्मज्ञान दिलें आहे त्याची आज्ञा पारिपालन करणें हें विशेष श्रेयस्कर होय. जर अन्यायाच्या मार्गानें जीवनरक्षण करावें लागलें-

तर तें जीवन वास्तविक मरणच होय तसेंच न्याय रक्षून खरोखर मृत्यु प्राप्त झाला, तरी तो आपलें जीवनच होय.

प्रत्यहीं आपण आपल्या मनास शिक्षण देत असावें. त्याचें शासन करावें, आणि त्यास धर्मपरायण करावें. जे आपलीं इंद्रियें व अंतःकरण वश करण्यास समर्थ होतात, त्यांस क्लेश भोगण्याचें मुळींच कारण नाहीं. जे आत्मादमन करूं शकत नाहींत. ते सर्वप्रकारें दुःख पावतात.

परस्त्रीचा अभिलाष करूं नये. परस्त्रीविषयक अभिलाषासारिखा दुसरा कोणताही भाव निंद्य नाहीं. जे दुसऱ्याच्या कल्याणाचा नाश करूं पाहातात त्यांस सुख किंवा शांति कधींही प्राप्त होत नाहीं.

या संसारांत जे उन्नत होऊन शुभ फलभोग करीत असतात,ते अज्ञान व ईर्ष्या यांच्या स्वाधीन झाले तर आपल्या कल्याणास अपाय करितात. अतएव सर्वांच्या कल्याणांत आपल्या कल्याणाचा अंतर्भाव होतो असें जाणून तुम्ही आपल्या हृदयांत क्षुद्र बुद्धीस आश्रय देऊं नका.

संपत्ति येवो, किंवा विपत्ति येवो, धैर्य कदापि सोडूं नये. जो मनापासून क्षमा मागतो, त्याणें सहस्र अपराध केले असले तरी त्याला क्षमा करावी. अंतःकरण लोभक विषयांनीं वेष्टित असतांही विकार पावणार नाहीं, या प्रकारें त्यास वश करावें. कोणाचेंही द्रव्य त्याच्या नकळत, किंवा त्यास फसवून, किंवा बलात्कारानें, हरण करूं नये. कायिक, वाचिक, व मानसिक,

सकल दोषांचें क्षालन करून सर्वप्रकारें सुखी होऊन राहावें. इंद्रियें जिंकावीं, बुद्धि निर्मळ करावी, ज्ञानाचा अभ्यास करावा, सत्य भाषण करावें, आणि क्रोध आवरावा; हेंच धर्माचें लक्षण होय.

दुसऱ्याच्या मुखानें एकादें अश्लील वचन आलें असतां ज्यास लज्जा वाटते, तोच ह्रीमान् जाणावा. जो मनुष्य ह्रीमान् आहे तो पापाचा अत्यंत तिरस्कार करितो; त्याच्या संपर्कापासून दूर राहण्याविषयीं त्यास स्वाभाविकच इच्छा होते; व तेणेंकरून त्याचें वैभव वृद्धि पावतें. जो लज्जाहीन झाला त्याची निंद्य पापमार्गीं सहज प्रवृत्ति होते. कल्याणकारक धर्ममार्गामध्यें त्यास विघ्न येऊन, तो अधर्ममार्गात पडून ऐश्वर्यहीन व अपवित्र होतो. अतएव तुह्मी आपल्या भाषणामध्यें, अंतःकरणांतील वृत्तीमध्यें, व बाह्य वेषांमध्यें यत्नपूर्वक ह्रीयुक्त असावें.

" यथैवात्मा परस्तद्वत् द्रष्टव्यः शुभमिच्छता "

जो सर्वांचें कल्याण व्हावें अशी इच्छा करितो, त्याची दृष्टि जशी आपल्याविषयीं असते तशीच दुसऱ्याविषयीही असावी. जसें आपल्यावर लोक प्रीति करितात हें पाहून आपल्यास सुख होतें, त्याप्रमाणेंच आपणही लोकांवर प्रीति करून त्यांस सुखी करावें. जसें दुसरा आपला द्वेष करितो हें पाहून आपल्यास वाईट वाटतें, त्याप्रमाणेंच आपण दुसऱ्याचा द्वेष केला असतां त्यास वाईट वाटेल; म्हणून तसें करून

त्यास आपण कष्ट देऊं नये. याप्रमाणें सर्व गोष्टींत इतरांची आपल्याशीं तुलना करून तदनुसार त्यांच्याशीं वर्तन करावें. कांकीं सुखदुःखाचा अनुभव जसा आपल्यास होतो तसाच इतरांसही होतो; म्हणून पूर्वोक्तप्रकारें आचरण करणें हाच कल्याणप्राप्तीचा उपाय होय.

पुत्रानें आपल्या गुणांनीं व सदाचरणानें आपल्या कुलास शुभ यश संपादन करावें. सर्वदा सर्वप्रयत्नेंकरून मातापितरांची सेवा करावी; त्यांपाशीं कठोर वृत्तीनें किंवा कर्कश भाषणानें कदापि वर्तन करूं नये. आपली स्वतांःची सुखोपभोगाची इच्छा पूर्ण करीत असतांही त्यांस सुखी व संतुष्ट ठेवण्याविषयीं प्रयत्न करावा.

ईश्वरभक्तिपूर्वक भ्राता, भगिनी, भार्या, कन्या, पुत्र, वगैरे कुटुंबांतील सर्व मनुष्यांचें निष्ठेनें प्रतिपालन करावें; तसेंच त्यांचें शरीरिक, मानसिक, व आध्यात्मिक कल्याण साधन करावें.

जिच्यामध्यें कांहीं व्यंग नाहीं, व जी सुस्वभावाची, अशी स्त्री पाहून तिजशीं विवाह करावा. रोगी, किंवा जिच्या अवयवांत कांहीं व्यंग आहे अशी, अथवा जिचें आचरण शुद्ध नाहीं, अशा स्त्रीचें पाणिग्रहण करूं नये. स्त्री किंवा पुरुष यांतून कोणतेंही सदाचारहित असलें असतां त्यापासून सर्वप्रकारें बाईट परिणाम होतो; एतएव परस्परांनीं परस्परांच्या सुशीलतेचा अनुभव घेऊन विवाहबंधनानें बद्ध व्हावें. पत्नीनें आप-

ल्या पतीची सहधर्मिणी व सहकर्मिणी व्हावें, आणि त्या समागमें सुखानुभव घ्यावा. द्रव्यद्वारा पत्नीक्रय करूं नये, तसेंच केवळ स्वार्थलोलुप होऊन पत्नीग्रहण करूं नये; तसें करणें धर्मविरुद्ध होय.

आपल्या पतीचें प्रिय करणारी, हितकारिणी, सदाचारसंपन्न, जितेंद्रिय व ब्रह्मपरायण, अशा स्त्रीवर जशीं मनुष्यें संतुष्ट असतात, त्याचप्रमाणें तिजवर ईश्वर संतुष्ट असतो. अशी पत्नी ऐहिक व आमुष्मिक कल्याण संपादन करून कृतार्थ होते, आणि तिची कीर्ति पृथ्वीतील सर्व स्त्रियांच्या ठायीं सत्कार्याविषयीं उत्साह उत्पन्न करिते.

ब्राह्मांनीं स्त्रीच्या शारीरिक, मानसिक, व आध्यात्मिक, कल्याणसाधनाविषयीं यत्नशील असावें. तिला सदुपदेश करून आपल्या सदाचरणानें उदाहरण दाखवावें; आणि आदरानें तिचें प्रतिपालन करावें. साध्वी स्त्रीचा पुरुषानें कदापि परित्याग करूं नये.

उद्धत मनुष्यांचें अवलोकन, व अपवित्र वाणीचें श्रवण, यांच्या योगें मन अपवित्र होण्याचा संभव आहे; यास्तव त्यांपासून मनाचें रक्षण करावें. ज्या स्थाली खुशालीच्या विषयांच्या योगें धर्मबुद्धि मलिन होते, व ज्या स्थळीं पापासक्ति मनास चंचळ करिते, ते विषय व तीं स्थळें यांच्या कुसंगापासून दूर राहावें. विशेषतः स्त्रियांचें अशा दुष्ट स्थळापासून व कुसंगापासून फार यत्नपूर्वक रक्षण करावें. पापसंसर्गानें पापाविषयीं आसक्ति उत्पन्न होते.

पराधीनता दुःखाचें कारण होय, व आत्मवशता सकल सुखांचें कारण होय; अतएव ब्राह्मांनीं स्वाधीनचित्त राहाण्याचा यत्न करावा. आत्मानुचिंतन व आत्मनिर्भरता यांचा अभ्यास करावा. साधेल तितकें करून दुसऱ्यावर भार घालूं नये. मितव्ययाचा अभ्यास करून अतिलोभाचा परित्याग करावा. मितव्ययाच्या योगें आपलें व आपल्या परिवाराचें व सकळ लोकांचें कुशल साधावें. कृपणतादोषानें कधींही लिप्त होऊं नये.

ज्यास आत्मा स्वाधीन झाला आहे, त्यासच आत्मा बंधूवत् होतो. आत्माच निश्चयेंकरून आपला बंधू, व आत्माच निश्चयेंकरून आपला रिपु होय.

उत्तम मानवजन्म प्राप्त होऊन, इंद्रियसौष्टव प्राप्त झालें असून, जो मनुष्य आत्महित जाणत नाहीं, तो आत्मघाती होय.

जितकें जितकें विषयसेवन करावें, तितकी तितकी विषयतृष्णा वृद्धि पावते; अतएव संतोषाचें अवलंबन करून, पूर्णतृप्तीचें स्थान संसारापलीकडे आहे असें जाणून, संसाराच्या आसक्तीचा परित्याग करावा.

सुख होऊं किंवा दुःख होऊ, इष्ट प्रसंग येऊ, किंवा अनिष्ट प्रसंग येऊ, सर्वदा या गोष्टीकडे लक्ष्य दिलें पाहिजे कीं, त्यायोगें आपलें हृदय विकार पावूं नये. ईश्वराच्या मंगल स्वरूपीं भावयुक्त अंतःकरणानें अत्यंत लीन होऊन, सुखदुःख आणि संपत्तिविपत्ति, यांच्या योगें चित्ताची समता नष्ट होऊं देऊं नये. इष्टप्राप्तीच्या आनंदानें उन्मत्त होऊं नये किंवा अ-

निष्ट प्राप्तीच्या खेदानें म्लान होऊं नये. मनामध्यें अतिसंताप उत्पन्न होऊं देऊं नये. संतापाचें कारण उपस्थित झालें असतां धैर्यपूर्वक आणि विवेकपूर्वक आपल्या आत्म्याचें रक्षण करावें.

आत्मप्रशंसा व परनिंदा हीं सर्वथा वर्जावीं. सर्वदा सत्यव्रत असावें. आपली मनोवृत्ति सत्यानुरूप ठेवावी, आपली वाणी सत्यास अनुसरून असावी, तसेंच आपलें आचरण सत्यानुसारें असावें. ज्या वाणीच्या योगें सत्याचा अपलाप होणार नाहीं, व लोकांस समाधान होईल, आणि सर्वांचें कल्याण होईल, अशीच वाणी बोलावी. जें सत्य खरें, परंतु जें वाणीनें प्रकट केलें असता त्याच्या योगें कोणाच्या चित्तास दुःख होईल, तें आपल्या मनांतच ठेवावें. तें व्यक्त करणें धर्मदृष्टीनें आवश्यक नसलें तर तें प्रकट करूं नये. प्रिय परंतु मिथ्या अशा वचनांचा कधींही उच्चार करूं नये. वाणीनें सत्यवादी, व व्यवहाराविषयीं सत्यपरायण व्हावें. सत्यासारखा दुसरा धर्म नाहीं; सत्यासारखी दुसरी श्रेष्ठ वस्तू कोणतीच नाहीं; इहलोकीं असत्यासारखी दुसरी कोणतीच गोष्ट भयंकर नाहीं.

ज्याच्या योगें कल्याण होईल तेंच करावें. पाप्याशीं पापवृत्तीनें वर्तू नये. कोणीं आपला अन्याय केला असतां त्याच्या प्रतिकारार्थ उलट त्याचा अन्याय करूं नये. सर्वदा सद्वृत्त असावें. सदुपाय योजून असद्वृतीचा प्रतिकार करावा. न्यायी आचरणानें वर्तून अन्यायाचरणप्रवृत्तीचा निरोध करावा. अ-

साधुत्वाचा साधुत्वानें पराजय करावा. कोणीं आपल्याशीं असद्व्यवहार केला असतां त्याच्याशीं आपण सद्व्यवहारच करावा.

जो ईश्वराची भक्ति करितो आणि मनुष्यावर प्रीति करितो तोच साधु. त्यास कोणाही मनुष्याची निंदा करणें आवडत नाहीं. कोणीही मनुष्य असो, त्याजवर तो अवश्य प्रीति करितो. कोणाचाही दोष पाहिला तरी तो दुःखी होऊन प्रीतिपूर्वक तो दूर करण्याविषयीं प्रयत्न करितो. केवळ कोणी मनुष्य आहे, एवढ्याच गोष्टीवर नजर देऊन तो त्याजवर प्रीति करितो. यास्तव तो कोणाचाही सद्गुण पाहून आनंदित होतो, तसेंच कोणाचाही दोष पाहून दुःखित होतो. हें त्याचें सुख व दुःख दोन्ही त्याच्या प्रीतिपासूनच उत्पन्न होतात. तेव्हां अर्थातच कोणाच्याही दोषांचें पुनः पुनः उच्चारण करण्यांत त्यास आनंद वाटत नाहीं. पिता माता ज्याप्रमाणें पुत्रावर तो केवळ पुत्र म्हणूनच प्रीति करितात, त्याचे गुण पाहून संतुष्ट होतात, तसेंच त्याचे दोष पाहून दुःखित होतात, त्याप्रमाणेंच मनुष्यमात्रांवर केवळ तें मनुष्य आहे एवढ्यावरच दृष्टि ठेवून त्याजवर प्रीति करण्याचें वळण आपण आपल्यास लावून घ्यावें. तसें झालें असतां दुसऱ्याच्या निंदेनें आपल्यास कधींही आनंद वाटणार नाहीं. ज्यास दुसऱ्याचे दोष पाहून व दुसऱ्याच्या दोषांचें पुनः पुनः उच्चारण करून आनंद होतो, त्याचें हृदय अत्यंत क्षुद्र होय. अशा प्रकारची क्षुद्रता आपल्या चित्तांतून काढून टाकण्याविषयीं सदैव यत्नशील असावें.

ज्याच्या ठायीं विनय आहे, तोच मनुष्य धर्मशील होऊं शकतो. तसेंच विनयापासूनच संसारांत भाग्योदय होऊं शकतो. विनयहीन मनुष्याचा सर्व द्वेष करितात. जर संपत्ती असली तर मनुष्यास विनय विशेष शोभतो. जरी विपत्ति प्राप्त झाली तरी विनय अंगीं असल्यानें मनुष्य तिजपासून मुक्त होऊं शकतो. अतएव ईश्वरानें जे आपल्यास सद्गुण दिले असतील त्यांविषयीं किंवा जें बाह्य ऐश्वर्य दिलें असेल त्याविष-

एक दिवस देखील अहंकारयुक्त होऊं नये.

"मद्यमदेयमपेयमग्राह्यम्"

मद्यपानानें मन, बुद्धि व विवेकशक्ति दुर्बल होऊन जातात. हृदयांतील सर्व पवित्र भाव शून्यवत् होऊन जातो. आत्म्याची धर्मस्फूर्ति सर्वथा नष्ट होऊन जाते. ज्या कुटुंबामध्यें हें महापाप प्रवेश करितें, त्या कुटुंबाच्या दुर्गतीला सीमा नाहीं. या वंग देशामध्यें किती निरोगी व सबल मनुष्यें या महापापानें आपलें आरोग्य नष्ट करीत आहेत, आणि अकालीं वार्धक्य पावून अल्पवयांतच मृत्युमुखांत पडत आहेत! किती बुद्धिमान् आणि विद्वान् मनुष्यें या महापापाच्या योगेंकरून आपली बुद्धि व विद्या निष्फळ करून लोकांमध्यें निंदा व अपमान यांस पात्र होत आहेत. किती स्वभावतः समंजस मनुष्यें विवेकशक्तिहीन होऊन षड्रिपूंच्य स्वाधीन होतात पशुवत् आचरण करीत आहेत! किती मनुष्यें आत्म्याची अवनति करून ईश्वरविषयक ज्ञानाविषयीं अनधिकारी होऊन आ-

पल्या सद्गतीच्या मार्गांत कंटकरोपण करितात. अतएव सावध राहा कीं तुमच्यांतून एकही मनुष्य हें पाप आपल्यामध्यें शिरूं देणार नाहीं. तुह्मी दुसऱ्याला मद्य देऊं नका, स्वतां मद्यमान करूं नका, एकवारही त्यास स्पर्श करूं नका, हाच सनातन धर्म होय.

अंतरात्म्याचा संतोष व आपल्या आत्म्याचें निर्मलत्व संपादन करणें हेंच धर्मानुष्ठानाचें सार्थक्य होय. आत्मा निर्मळ झाला तरच ईश्वरकृपेचा अनुभव होतो. आत्मा प्रसन्न झाला असतां सर्व दुःखें नष्ट होतात. धर्मानुष्ठानावांचून आत्मा संतुष्ट होत नाहीं. विषयसुखानें मन सुखी होऊं शकेल, परंतु आत्मग्लानि झाली असतां कितीही विषयसुख प्राप्त झालें तथापि त्यापासून आपणास संतोष होत नाहीं. अतएव धर्मानुष्ठानद्वारा आत्म्यास संतुष्ट राखून ज्यांपासून आत्म्याची प्रसन्नता नष्ट होईल त्या सर्वांचा परित्याग करावा.

धर्मकार्य करण्याचे कामीं यथाशक्ति यत्न करावा. आपण आपली सर्वशक्ति खर्चून कृतकार्य झालों नाहीं तरी आपल्यास पुण्यप्राप्ति होईल. ईश्वराचें जें सर्व कार्य त्यापैकीं कोणीं कोठपर्यंत केलें याची गणना ईश्वर करीत नाहीं. त्यानें ज्यास जितकी शक्ति दिली आहे तितकी सर्व निष्कपट अंतःकरणानें त्याच्या कार्यीं त्याणें लावावी इतकाच त्याचा हेतु आहे. तितकेंच मनुष्यानें केलें तरी ईश्वरदृष्टीनें तो कृतकृत्य होईल.

सारथी ज्याप्रमाणें रथाच्या सर्व अश्वांचें आकलन क-

रितो, त्याप्रमाणें विषयांमध्यें निमग्न झालेल्या सकल इंद्रियांचा निग्रह करावा. जे विषय इंद्रियगोचर झाले असतां अंतःकरणांत असद्भावाचा उदय होतो, त्या अपवित्र विषयांकडे मन जाऊं देऊं नये. पवित्र विषयांच्या सेवनानें इंद्रियांस परितृप्त करून, नित्य आपल्या जीवनाचा उद्देश सिद्धीस नेण्याच्या कामीं प्रवृत्त असावें. जिकडे जिकडे इंद्रियांची प्रवृत्ति होईल, तिकडे तिकडे त्यांस संचार करूं देऊं नये; परंतु आध्यात्मिक धर्मोपदेशानें मनास सुशिक्षित व वश करून इंद्रियांचें दमन करावें. मन जर स्वेच्छाचारी होऊन इंद्रियांच्या मागून जाईल, तर अतिप्रबळ वायु जसा नौकेला पाण्यामध्यें बुडवितो, त्याप्रमाणें मनही मनुष्याची बुद्धि मोहामध्यें निमग्न करून तीस नष्टप्राय करून टाकील. ज्या अर्थी मोहपाशांनीं व्याप्त अशा या संसारामध्यें राहून आपल्यास धर्मसाधन करावयाचें आहे, त्या अर्थी मनाचें जर आपण दमन केलें नाहीं तर पदोपदीं आपल्यास विपत्ति भोगावी लागेल. स्वपन इंद्रियांस अनुकूल झालें असतां मनुष्याची बुद्धि नष्ट होऊन तें पापसक्तीनें मोहित होऊन जातें. अतएव शरीर क्षीण झालें नाहीं तोंच उपायेंकरून मन आणि सकल इंद्रियें वश करून जें कांहीं साधन आपल्यास करावयाचें आहे तें करावें.

पापविचार, पापविषयक भाषण, अथवा पापाचरण करूं नये. जे काया, वाचा, मन, बुद्धि, यांच्या द्वारा पापाचरण करीत नाहींत तेच माहात्मे खरी तपश्चर्या करितात. जे उप-

वासादिकांनीं केवळ आपलें शरीर कष्टवितात ते खरें तप करीत नाहींत. अतएव तुह्मी पापापासून विरत होऊन सत्कर्माचे ठायीं रत असा. धर्ममार्गीं राहून आपली उपजीविका करा. धर्ममार्गामध्यें राहून अत्यंत विपत्तीनें ग्रस्त झालेत, तरी अधर्माचे ठायीं मनोनिवेश करूं नका. तुह्मीं प्राणाप्रमाणें धर्माचें रक्षण करा, म्हणजे धर्महीं तुमचें रक्षण करील.

परलोकीं आपल्यास साह्य करण्यास माता, पिता, स्त्री, पुत्र, ज्ञाति,बधुं यांपैकी कोणी एकही येणार नाहीं. केवळ धर्मच आपला साह्यकारी होऊन बरोबर येईल. मनुष्य एकाकी जन्मग्रहण करितो, एकाकी मृत होतो, एकाकी आपल्या पुण्यफलाचा उपभोग करितो, तसाच एकाकी होत्साता आपल्या दुष्कर्माचें फल भोगितो. आपले ज्ञातिबांधव भूमितलावर मृतशरीराचा काष्ठलोष्टवत् परित्याग करून माघोर जातात. केवळ धर्मच त्याच्याबरोबर जातो. अतएव आपल्या साह्यार्थ होईल तितका धर्मसंचय करावा. धर्म इहलोकीं आपला बंधु, व धर्मच परलोकीं आपला मागर्दशक होय.

" धर्मस्सर्वेषां भूतानां मधु. "

धर्म सर्व प्राणिमात्रांस कल्याणकारी होय.

" न धनेन न प्रजया न कर्मणा
त्यागेनैकेनामृतत्वमानशुः "

धनलाभानें किंवा पुत्रप्राप्तीनें किंवा कर्माचरणानें मोक्ष प्राप्त होत नाहीं, केवळ एका त्यागानें मोक्षाची प्राप्ति होते. केवळ

अरण्यवासी किंवा संन्यासी होऊन संसारत्याग करण्यांत लाभ नाहीं. तर गृहांत राहून गृहस्थाश्रम चालवीत असतां आपल्या अंतःकरणांतील सर्व वासनांचा परित्याग करीत असावें.

" यदा सर्वे प्रमुच्यते कामा येऽस्य हृदि स्थिताः । अथ मर्त्योऽमृतो भवत्यत्र ब्रह्म समश्नुते ॥ " जेव्हां हृदयांतील सर्व कामना निरस्त होतात, तेव्हांच मनुष्य अमर होतो, आणि या लोकींच ब्रह्मप्राप्तीचा अनुभव घेतो.

स्त्री, पुत्र, आणि इतर आप्तजन, यांचें सर्व प्रयत्नेंकरून पोषण करावें व आपण निष्काम होऊन फलभोगाची आसक्ति सोडावी. तरच मुक्तिसोपानावर आपल्यावर आरोहण करितां येईल. यास पूर्ण दृष्टांत ईश्वराचाच होय. पाहा,तो केवढा संसारी! एखाद्या कीटपतंगास सुद्धां आहार देण्याचें तो विसरत नाहीं. अत्यंत दुर्गम पर्वताच्या शिखरावर देखील जीवजंतूस तो अन्न पुरवीतो. तो आपल्यास कांहींएक न ठेवतां केवळ सर्व प्राण्यांस अन्न पुरवित असतो. या दृष्टांतानुसारें तुम्हींही आपल्या स्वतांःस विसरून संसारांतील मंगल कार्यें करण्याचें व्रत धारण करावें. तिकडे लक्ष देऊन संसार धर्मानुष्ठानरूप करावा. जी ईश्वराची आज्ञा म्हणून वाटेल ती प्रांजलपणें परिपालन करावी. जें त्याच्या इच्छेविरुद्ध वाटेल त्याचा विषवत् परित्याग करावा. जर तुम्ही आपणा स्वतांस विसरून याप्रमाणें त्याच्या कार्यांत निमग्न राहण्याचा निश्चयपूर्वक यत्न

कराल तर तो तुम्हांस विसरणार नाही. तुम्हांस ज्या सर्व गोष्टींची उणीव असेल त्या सर्व तो तुम्हांस पुरवील. तो जें तुम्हांस देईल तें पुष्कळ आहे असें म्हणून कृतज्ञताबुद्धीनें ग्रहण करावें; तो तुह्मास ज्या अवस्थेंत ठेवील त्या अवस्थेंत तुह्मीं संतुष्ट होऊन राहावें. संपत्कालीं त्याच्याच आज्ञेनें चालावें; विपत्कालीं त्यालाच शरण जावें; पण कधींही त्यास सोडूं नये. कर्म करण्याच्या वेळीं त्याजवर निष्ठा ठेवूनच कर्म करावें. विश्रांतीच्या वेळीं त्यावरच चित्त ठेवून विश्रांती घ्यावी. हें शरीर नष्ट होईल, परंतु तुमचा आत्मा परमात्म्याचे ठायीं युक्त होऊन राहील. मृत्युकालींही आत्मा परमात्म्यापासून वियुक्त होणार नाहीं.

पश्वादिकांचे ठायीं स्वातंत्र्य नाहीं. ईश्वरानें आपल्या आत्म्यास स्वातंत्र्यरूप भूषण दिलें आहे. या स्वातंत्र्याच्या योगानें तुह्मास धर्मकार्याविषयीं अधिकार प्राप्त झाला आहे. तुह्मांस केवळ कर्म करण्याचा अधिकार आहे, परंतु कर्मफलाविषयीं अधिकार नाहीं. फल देणें हें दात्याच्या हातांत आहे.

" कर्मण्येवाधिकारस्ते मा फलेषु कदा च न. "

प्रयत्नपूर्वक कर्म करावें, परंतु त्याच्या फललाभाविषयीं आतुर होऊं नये. तुमचा असा दृढ विश्वास असावा कीं ज्यापेक्षां जगाच्या कल्याणांत तुमच्या कल्याणाचा अंतर्भाव आहे, त्यापेक्षां परमेश्वर निश्चयेंकरून तुमचें कल्याण करील. तुह्मीं विनम्रभावानें त्याचें ग्रहण करावें.

तुमच्या शरीराची किंवा मनाची अवस्था देवापेक्षां विशेष कोण जाणतो ? तुह्मांवर त्यापेक्षां विशेष स्नेह आणि दया कोणाची आहे ? तो तुमचें रक्षण करील त्याप्रमाणें दुसरा कोण करील ? अतएव त्याच्या मंगलभावावर दृढविश्वास ठेवून ज्यांत तुमचें कल्याण आहे असें वाटेल तेंच कर्म तुह्मी प्रांजलपणें आचरण करा. त्याचें फल त्याला योग्य वाटेल त्याप्रमाणें तो तुह्मांस देईल. या भयंकर संसारांत भय प्राप्त झालें असतां तुम्हांस त्याच्या अंकीं आश्रय करितां येतो. पापतापानें पीडित होऊन तुमचें चित्त संतप्त झालें असतां त्यास शांत करण्याकरितां त्याचें कृपावारि तुह्मांस मागतां येतें. परंतु हें भय व दुःख यांपासून सुटून पापतापापासून मुक्त होऊन जेव्हां तुह्मी आपली इच्छा त्याच्या इच्छेच्या स्वाधीन करूं शकाल, जेव्हां तुमच्या हृदयांतून इतर सर्व इच्छा परिपूर्ण होत्साल्या नाहींशा होऊन ही एकच प्रार्थना त्याच्या सिंहासनासमोर तुह्मी कराल कीं, " हे ईश्वरा तुझी इच्छा घडो, जगाचें कल्याण होवो, " तेव्हांच अमृतत्व तुमच्या हस्तगत होईल, आणि जीवन्मुक्ति तुम्हांस प्राप्त होईल. जेव्हां तुह्मी आपापल्या मनांतील क्षुद्र भाव दूर कराल, आणि हृदयांतील सर्व कठिण वृत्तींचा उच्छेद करूं शकाल, तेव्हांच त्या सकळ श्रेष्ठतत्त्वांहूनही श्रेष्ठ, सकललोकसुंदर परमात्म्याचे ठायीं तुमचें प्रेम जडेल. व तें प्रेमामृत इहलोकीं, परलोकीं, अनंत काल तुमचें उपजीवन होईल; आणि त्याच्या बलानें बलवान् होऊन तुह्मी या प्रेमदात्याचे सहचर आणि अनुचर होऊन राहाल.

" विज्ञानं सारथिर्यस्तु मनः प्रग्रहवान्नरः ।
सोऽध्वनः पारमाप्नोति तद्विष्णोः परमं पदं "

बुद्धि ज्यास सारथी, मन ज्यास वश, तो संसारमार्ग क्रमण करून सर्व विश्वव्यापक परमात्म्याचे पदीं प्राप्त होतो. 'तद्विष्णोः परमं पदं सदा पश्यंति सूरयः । दिवीव चक्षुराततं.''

तें विश्वव्यापक परमात्म्याचें परम पद ज्ञानीजन सर्वदा पाहताच, जशी आकाशांतील एकादी विस्तृत वस्तु नेत्र पाहतो. तोच आत्मा कृत्यकृत्य, तोच आत्मा भाग्यवान्, जो राहुमुक्त चंद्राप्रमाणें निष्पाप व पवित्र होऊन देहाभिमान सोडून परमात्म्याचे ठायीं वास करितो, तो रोगानें कातर होत नाहीं, तो मृत्यूपासून भय पावत नाहीं, तो येथेंच राहून ब्रह्मलोकाचा अनुभव घेतो. त्याला अनंत उन्नतीचें द्वार उघडें होतें. त्याच्या दृष्टीपुढें कोटि कोटि स्वर्गलोक प्रकाशमान होतात. या तीरीं तरंगमय संसार, आणि पर तीरी अत्यंत शांत ब्रह्मलोक; मध्यें स्वतः ईश्वर सेतुरूप होत्साता उभय लोकांच्या मर्यादा रक्षण करितो. या सेतूवरून जाऊन ब्रह्मलोकीं पोंचण्यास दिनरात्री किंवा जरामृत्यु, शोक किंवा सुकृतदुष्कृत हीं समर्थ होत नाहींत. सकल प्रकारचें पाप त्या लोकापासून प्रतिनिवृत्त होतें. निष्पाप ब्रह्मलोकावर पापाची सत्ता चालत नाहीं. मुक्त आत्मा संसारांतील पापताप संसारांत ठेवून संसारापलीकडेस जो ब्रह्मलोक तिकडे उत्तीर्ण होऊन जातो. त्या स्थानीं जो अंध तो अनंध होतो, जो पापविद्ध तो अपाप

विद्ध होतो. जो उपतापी तो अनुपतापी होतो. त्या स्थानीं रात्रि दिन होऊन जाते; म्हणून ब्रह्मलोक नित्य प्रकाशमय असतो. त्या प्रकाशास अंत नाहीं.—म्हटलें आहे:-

" ससेतुर्विधृतिरेषां लोकानामसंभेदाय । नैनं सेतुमहोरात्रे तरतः न जरा न मृत्युर्न शोको न सुकृतं न दुष्कृतं । सर्वे पाप्मानस्ततो निवर्तंते । अपहत पाप्मा ह्येष ब्रह्मलोकः । तस्माद्वा एतं सेतुं तीर्त्वा । अंन्धः सन्नंधो भवति विद्धः सन्न विद्धो भवति । उपतापी सन्ननुपतापी भवति । तस्माद्वा एतं सेतुं तीर्त्वाऽपि नक्तमहरेवाभिनिष्पद्यते । सकृद्विभातोह्येवैष ब्रह्मलोकः "

ब्राह्मधर्माचे आजपर्यंत झालेल्या सर्व उपदेशांस अनुसरून तुम्हांस मला सांगावयाचें राहिलें होतें तें हें प्रेमपूर्वक समर्पण केलें आहे. तुम्ही याचा आपल्या जीवनाचे ठायीं संस्कार पावून अक्षय मुक्तिलाभ प्राप्त करून घ्यावा हीच माझी प्रार्थना आहे.

॥ ओम् शांतिः शांतिः शांतिः । हरिः ओम् ॥



गीतार्थसार.

ओम परमात्मने नमः

स्मरोनि चित्तीं जगदेकनाथा,
प्रार्थी तुम्हां सद्गुणशीलवंतां;
गीतार्थसारीं अवधान द्यावें,
ज्ञानमृता सेवुनि मुक्त व्हावें.

" सकल आर्यधर्माचें प्रतिपादक जें आगमनिगमात्मक शास्त्र, त्याचें रहस्य कोणच्या एका ग्रंथांत सांगितलें आहे ?" असा कोणीं प्रश्न केला असतां त्यास उत्तर असें आहे कीं, अशा प्रकारचा एक ग्रंथ भगवद्गीता या नांवानें सर्व लोकांत प्रसिद्ध आहे. परंतु हा ग्रंथ स्वतंत्र नाहीं. महाभारतांतील भीष्मपर्व-नामक विभागांत भगवद्गीतेचा अंतर्भाव होतो. याप्रमाणें महाभारताच्या संबंधानें जरी हा अल्प ग्रंथ अंगभूत आहे, तरी यास सकल शास्त्रांचें केवल रहस्य असें मानिलें आहे. याविषयीं भारतावरील अगदीं अर्वाचीन टीकाकार नीलकंठ चतुर्धर हे असें म्हणतात--

भारते सर्ववेदार्थो भारतार्थश्च कृत्स्नशः ।
गीतायामस्ति तेनेयं सर्वशास्त्रमयी मता ॥

तात्पर्य,—भारतामध्यें सर्व वेदांचा सारांश; आणि भार-

ताचा सर्व सारांश गीतेमध्यें आहे. म्हणून इला सर्वशास्त्रसंग्रह असें मानितात.

या ग्रंथाचे अठरा अध्याय आहेत, व हे सर्व अध्याय मिळून श्लोकसंख्या सातशेंवर नाही; असें असून या लहानशा ग्रंथाचें तात्पर्य प्रकाशित करण्याच्या कामीं प्राचीन व अर्वाचीन पंडितांनीं जितके परिश्रम केले आहेत, तितके श्रम वेदार्थ प्रकाशित करण्याच्या कामीं देखील कोणी केले नाहीत. सर्व भारतावर टीका होण्याचे पूर्वीच. या तदंतर्गत अल्प ग्रंथावर मोठीं विस्तृत अशी भाष्यें किती एकांनीं लिहिली. या ग्रंथावरील टीकाग्रंथांपैकी हल्ली जे उपलब्ध आहेत, त्यांमध्यें श्रीमच्छंकराचार्यकृत भाष्य हें अगदीं प्राचीन होय. परंतु या भाष्यांत भाष्यकारांनीं पूर्वी असलेल्या टीकांविषयीं उल्लेख केला आहे. त्या कोणच्या. व कोणी केल्या. हें कांहींच समजत नाहीं. तथापि त्या प्रायः द्वैतमतप्रवर्तक असाव्या असें भाष्यकारांच्या लिहिण्याच्या कटाक्षावरून दिसतें. शांकरभाष्याच्या पुढें कांहीं काळानें श्रीमत् रामानुजाचार्य यांणीं विशिष्टाद्वैतमतपरत्वें गीतेवर भाष्य लिहून प्रसिद्ध केलें. त्यांच्यामागून कांहीं काळानंतर द्वैतमतप्रवर्तक श्रीमन् मध्वाचार्य यांणीं गीतेवर भाष्य केलें. हीं तिन्ही भाष्यें उपलब्ध आहेत; व याचप्रमाणें श्रीवल्लभाचार्य यांच्या संप्रदायानुसारें केवलाद्वैत नामक मतपरत्वें करूनही एक भाष्य झालेलें उपलब्ध आहे, असें माझ्या ऐकिवांत आहे. याशिवाय शंकराचार्यांच्या भाष्याचे मागून ज्या टीका

झाल्या आहेत, त्यांत अद्वैतमतानुयायी शंकरानंद, व मधुसूदनसरस्वती, आणि श्रीधरस्वामी. यांच्या टीका सर्वत्र प्रसिद्ध आहेत. श्रीधरस्वामींच्या मागून, वर सांगितलेले भारताचे टीकाकार नीलकंठ चतुर्धर यांची टीकाही सर्वमान्य आहे. हें गीतेवरील संस्कृत टीकाग्रंथांविषयीं झालें.

आतां अशा सर्वशास्त्रसारभूत ग्रंथावर आपल्या महाराष्ट्र भाषेंतही कवीजनांनीं परिश्रम करावे हें साहजिकच होय. त्याप्रमाणें, महाराष्ट्र भाषेंत ग्रंथ लिहिण्याची प्रवृत्ति पडतांच, अर्वाचीन साधुवृंदाचे शिरोमणी आणि महाराष्ट्र भाषेंतील आद्य कवि जे ज्ञानेश्वर त्यांणी गीतेवर टीका केली. ती इतकी उत्तम झाली आहे कीं, तिच्या पुढें कितीएक प्राचीन संस्कृत टीकांची सुद्धां मातबरी राहिली नाही. भगवतद्गीता हा ग्रंथ फार व्यापक असल्यामुळें त्यांत पुष्कळ गोष्टी फार संक्षेपानें, आणि कित्येक प्रसंगी केवळ सूत्ररूपानें, सांगितल्या आहेत. परंतु ज्ञानेश्वरांनी त्यांतील प्रत्येक गोष्टीचा भावार्थ अनेक दृष्टांतांच्या योगानें अगदीं आरशासारखा करून ठेविला आहे. ज्ञानेश्वरीच्या मागून वामन पंडितांनीं आपली **यथार्थदीपिका** नामें गीतेवरील टीका पूर्वोक्त प्रकारेंच रचिली. तीही फार विस्तृत असून प्रसिद्ध आहे. तशीच वामन पांडितांची गीतेवर समश्लोकी टीकाही आहे. याशिवाय गीतेवरील तुकारामाचे अभंग, मुक्तेश्वराच्या ओव्या, तुलसीदासाचे दोहरे व मोरोपंताच्या प्रासरहित आर्या, हीं सर्व प्रसिद्ध आहेत. **गीतार्थबोधिनी**मध्यें

ज्या प्रासयुक्त आर्या छापिल्या आहेत, त्या कोणाच्या याविषयीं संशय आहे. त्यांत कोठें कर्त्याचें नांव नसून, एकंदर त्यांच्या कवितापद्धतीचा विचार केला असतां, त्या आर्या मोरोपंताच्या असाव्या असें वाटत नाहीं. आलीकडील काळांत मराठीत गीतेवर ज्या कित्येक टीका झाल्या आहेत. त्यांत कैलासवासी वे. सं. रा. रा. रघुनाथ शास्त्री पर्वते यांची गद्यटीका फार विस्तृत असून अद्वैतसांप्रदायिक आहे. येथवर सांगितलेल्या संस्कृत व प्राकृत, प्राचीन व अर्वाचीन टीकांपैकी बहुतेक छापल्या गेल्या आहेत.

याप्रमाणें ज्या गीतेवर अनेक विख्यात विद्वज्जनांनीं फार परिश्रम केले आहेत, व जी सर्वशास्त्रसारभूत मानिली आहे; तिची प्रस्तुतकाळीं आपल्या लोकांत जितकी व जशी प्रवृत्ति असावी तितकी व तशी नाही. ही गोष्ट फार खेदास्पद आहे. गीतापठन करण्याची चाल अंशतः अजूनही आहे; नित्य एक दोन अध्याय केवळ मुखपाठ म्हणणारे किंवा वाचणारे वृद्ध लोकांत कांहीं कांहीं अद्याप आढळतात; व एकादा नित्य सर्व गीतापाठ करणाराही क्वचित् आढळतो. परंतु गीतेच्या अभ्यासानें आचार व विचार यांवर जो संस्कार व्हावा, तो झालेला फारसा पाहाण्यांत येत नाहीं. याचें मुख्य कारण, आपल्या लोकांत धर्मशिक्षणाचा प्रायः अगदीं लोप झाला आहे, हें होय. आतां अनेक कारणांमुळें आर्यविद्येचा साकल्यंकरून अभ्यास करणें जरी अशक्य झालें आहे, तरी अल्प कालांत व

अल्प श्रमानें आर्यधर्माचीं मुख्य तत्त्वें व आचार शिकवून त्यांची प्रवृत्ति पाडण्याची तजवीज करणें हें आपलें सर्वांचें काम आहे. यास्तव जर एखादा आर्यधर्मसारभूत ग्रंथ उपलब्ध असेल, तर त्याचा अभ्यास सर्वांनीं करून, व आपल्या मुलांबाळांकडून करवून, तो अगदीं प्रचारांत येईल असें करावें. असा ग्रंथ माझ्या मतें सर्व शास्त्रीयग्रंथसमुदायांत **भगवद्गीता** हा आहे. जर हा ग्रंथ शास्त्रत्वेंकरून गृहीत होऊन यांचें परिपूर्ण शिक्षण करण्याची प्रवृत्ति पडेल, तर धर्माविषयीं, नीतीविषयीं, सदाचरणाविषयीं, आणि तत्त्वज्ञानाविषयीं आस्था आपल्या लोकांत विशेष उत्पन्न होऊन ते स्वकल्याणकारक मार्गाचें अनुसरण करतील, असें मला वाटतें. यास्तव, भगवद्गीता आर्यधर्मसारभूत कशी आहे, याचा विचार करण्याकरितां हा निबंध लिहिला आहे.

भगवद्गीता हा ग्रंथ भारतांतीलच एक अंश असल्यामुळें याचा कर्ता व्यासमुनि, हें सर्वांस माहितच आहे. या ग्रंथाच्या रचनेचा काल अमुक आहे, असें निश्चितपणें सांगतां येत नाहीं. तथापि हा ग्रंथ बहुत प्राचीन आहे असें कित्येक बाह्य व अंतर्गत कारणांवरून लक्षांत येतें. कित्येक युरोपियन संस्कृतज्ञांचें असें म्हणणें आहे कीं, भगवद्गीता ही महाभारताचा मूळचा भाग नसून ती प्रक्षिप्त म्हणजे मागून कोणीं लिहून त्यांत घातली आहे. या अनुमानास ते कितीएक प्रमाणें दाखवितात. परंतु त्यांतील एकही प्रमाण मला समर्पक दिसत नाहीं. एकं-

दर महाभारताच्या आणि भगवद्गीतेच्या भाषेंत किंवा रचनेंत फारसा फरक दिसत नाहीं; व तींतील मुख्य मुख्य विषयही भीष्मपर्वातच इतर स्थळीं, तसेंच शांतिपर्वादिक दुसऱ्या कित्येक पर्वांतही निरनिराळ्या ठिकाणीं प्रसंगोपात्त आलेले आहेत. निष्कामकर्म, अहेतुक भक्ति, आणि तत्त्वज्ञान, या तिहींचा समुच्चय हाच मुख्य धर्म, व हाच मोक्षप्राप्तीचा मार्ग, हें अनेक वैदिक ग्रंथांत, मन्वादिकांच्या स्मृतींत, आणि महाभारतांत अनेक स्थळीं सांगितलें आहे. आणि हाच भगवद्गीतेचा मुख्य प्रतिपाद्य विषय आहे. तसेंच भगवद्गीता हा भाग महाभारतांत अप्रासंगिक आहे. असेंही म्हणतां येत नाहीं. माझ्या ह्या दृष्टीनें तर भगवद्गीता ही भारतांत प्रसंगानुसारें व यथायोग्य स्थळींच आली आहे. दोहोंकडील सैन्यांत अनेक अत्यंत आप्त, इष्टमित्र जिवावर उदार होऊन युद्धास उभे राहिले आहेत, हे मरण पावले असतां सर्व कुरुकुळाचा व इतरही बहुतेक राजकुळांचा क्षय होणार आहे, असें पाहून अर्जुन दुःखानें अत्यंत विव्हळ झाला, हें साहजिकच आहे. कारण अत्यंत आप्तजनांत असें उग्र वैमनस्य पडून असा कुलक्षयकारक घोर संग्राम भारतीयुद्धापूर्वी कधींही झाल्याचें लिहिलेलें नाहीं. तेव्हां असा प्रसंग एकाएकीं पाहून अर्जुन शोकविव्हळ झाला, यांत कांहीं आश्चर्य नाहीं; व कृष्णानेंही त्याशीं समयोचित भाषण करून, यथार्थज्ञान व कर्तव्यकर्म यांचा बोध करून त्याचा तो शोक दूर केला, यांतही कांहीं आश्चर्य नाहीं. आतां कोणी असें

म्हणेल कीं, युद्धाची तयारी होऊन दोहों बाजूंस दोन्ही सैन्यें शस्त्रें धारण करून युद्धास सिद्ध झाल्यानंतर तत्त्वज्ञानविषयीं एवढा मोठा लांबलचक संवाद होण्यास अवसर कसा मिळाला असावा? तर यावर माझें असें म्हणणें आहे कीं, प्राचीन काळीं आपल्या पूर्वजांचे युद्धांविषयीं कांहीं धर्मनियम असत; व त्यांस अनुसरून प्रायः युद्ध होत असे. त्यावरूनच प्राचीनकाळच्या युद्धसंग्रामास धर्मयुद्ध असें नांव पडलें आहे. त्या नियमांत, शत्रु युद्धास सावधपणें सिद्ध झाल्यावांचून त्याजवर शस्त्र टाकावयाचें नाहीं, असा एक नियम होता. त्या नियमास अनुसरून, अर्जुन शोकाकुल होऊन धनुष्यबाण खालीं ठेवून स्वस्थ बसला आहे, असें पाहून दोहोंकडील सैन्यें तटस्थ राहिलीं; आणि कृष्णानें त्याचें समाधान करून तो पुनः पूर्ववृत्तीवर येई तोंपर्यंत युद्धास आरंभ झाला नाहीं, हें धर्मयुद्धाच्या रीतीस अनुसरूनच आहे. दुसरें असें कीं, एकाद्या विषयावर तोंडीं संवाद होतो, तो थोडक्यांत होतोसा वाटतो; परंतु तो लिहिण्यांत लांबलचक दिसतो. या सर्व कारणांचा विचार केला असतां भगवद्गीता महाभारतांत अगदीं प्रासंगिक येत्ये, हें कबूल केलें पाहिजे. आतां कवीनें ती मागून व्यवस्थितपणें जुळवून थोडी लांबवून लिहिली असेल, इतकेंच. याप्रमाणें भगवद्गीतेची प्रसंगसंगति मुख्य ग्रंथाशीं कशी आहे ती सांगून आतां तींतील संभाषणाचा यथानुक्रम अनुवाद करितों.

भारती युद्ध चाललें असतां प्रज्ञाचक्षु धृतराष्ट्र यास युद्धाची

सर्व हकीकत घरांतल्या घरांत प्रत्यक्ष पाहिल्याप्रमाणें कळावी म्हणून व्यासांनीं आपला शिष्य संजय यास त्याजपाशी ठेवलें होतें. त्यास धृतराष्ट्रानें प्रथम हा प्रश्न केला.—

धर्मक्षेत्रे कुरुक्षेत्रे समवेता युयुत्सवः ।
मामकाः पांडवाश्चैव किमकुर्वत संजय ॥

अर्थ—हे संजया, परमपवित्र जें कुरुक्षेत्र तेथें युद्धेच्छु माझे आणि पांडूचे पुत्र एकत्र मिळून काय करिते झाले ?

या प्रश्नाचें उत्तर संजयानें धृतराष्ट्रास दिलें. त्यांत हा पुढें वर्णिलेला भगवद्गीता नामक कृष्णार्जुनसंवाद आला आहे. ह्या संवादाचे एकंदर अठरा अध्याय आहेत, हें पूर्वी सांगितलेंच आहे. वेदाचे जसे कर्मकांड, उपासनाकांड, आणि ज्ञानकांड असे तीन विभाग झाले आहेत, तसे गीता ही सर्वशास्त्ररहस्यप्रतिपादक असल्यामुळें, तिचेही कर्मकांड, उपासनाकांड, आणि ज्ञानकांड, असे साहा साहा अध्यायांचा एकेक भाग याप्रमाणें तीन विभाग मानिले आहेत. पाहिल्या साहा अध्यायांत कर्ममार्गाचें प्रतिपादन आहे; दुसऱ्या साहा अध्यायांत उपासना किंवा भक्तिमार्ग याचें प्रतिपादन आहे; आणि शेवटल्या साहा अध्यायांत ज्ञानमार्गाचें प्रतिपादन आहे. हे विषय या साहा साहा अध्यायांत प्राधान्येकरून वर्णिले आहेत. परंतु पूर्वी सांगितल्याप्रमाणें, या तिन्ही मार्गांचा समुच्चय व्हावा हें ग्रंथांकर्त्यास इष्ट असल्यामुळें, प्रत्येक षट्कांत, म्हणजे साहा अध्यायांत, त्या षट्काच्या प्रधान विषयाखेरीज

राहिलेल्या दोन विषयांचाही उल्लेख अवश्य येतो.

अध्याय १—पहिल्या अध्यायांत अर्जुनास विषाद कसा झाला ह्याचें वर्णन केलें आहे. राजा दुर्योधन द्रोणाचार्यांकडे जाऊन, त्यांस आपल्या व पांडवांच्या सैन्यांचें तारतम्य सुचवून, आपण सर्व आपापलीं स्थानें संभाळून सेनापति भीष्म याचें रक्षण करावें असें सांगून भीष्माजवळ आला. तेव्हां भीष्मांनीं त्याला धीर देण्याकरितां मोठ्यानें सिंहासारखी आरोळी देऊन आपला शंख वाजविला. त्याबरोबर उभयसैन्यांत सर्व सैनिकांनीं आपापले पृथक् पृथक् शंख वाजविले. अशीं अनेक रणवाद्यें एकदम वाजून असा भयानक व प्रचंड शब्द झाला कीं, तेणेंकरून सर्व पृथ्वी व आकाश दणाणलें. मग सर्व कौरवसैन्य शस्त्रें घेऊन युद्धास सिद्ध झालें असें पाहून, अर्जुन श्रीकृष्णास म्हणतोः—" हे कृष्णा, माझा रथ दोन्ही सैनांच्या मध्यें ने. युद्धार्थ कोणचे कोणचे योद्धे जमले आहेत, आणि मला कोणाशीं युद्ध करावयाचें आहे, तें मला पाहूं दे. दुर्बुद्धि जो दुर्योधन त्याच्या इच्छेस अनुकूल होऊन युद्ध करण्यास येथें कोण कोण जमले आहेत, तें मला पाहूं दे. " हें ऐकून श्रीकृष्णानें दोहों सैन्यांच्यामध्यें रथ नेऊन उभा केला; आणि भीष्मद्रोणादि मुख्य मुख्य वीर अर्जुनास दाखवून म्हणाला—" हे पार्था, हे कौरववीर जमले आहेत पाहा. " तेव्हां त्या समुदायामध्यें भूरिश्रवा आदिकरून बापासमान वीर, भीष्मादि आजासमान वीर, द्रोणाचार्यादि गुरु, शल्यादिक मातुल,

दुर्योधनादिक बंधु, सांब-अभिमन्यादिपुत्र, तसेंच त्यांचेही पुत्र, अश्वत्थामा आदि करून मित्र, द्रुपदादिक श्वशुर, तसेच अनेक सुहृत् व आप्तजन एकत्र जमलेले पाहून अर्जुन कृपेनें व्याकुळ होऊन श्रीकृष्णास म्हणाला—"हे कृष्णा, हे आप्तजन युद्धास सिद्ध झालेले पाहून माझे सर्व अवयव विकल झाले आहेत; तोंड सुकून गेलें आहे; सर्व शरीरास कंप सुटून रोमांच उभे राहिले आहेत; गांडीव धनुष्य हातांतून गळून पडत आहे, आणि माझ्या सर्व शरीराचा दाह होत आहे, माझ्यानें बसवत नाहीं; माझें मनही भ्रम पावलें आहे, असें मला वाटत आहे. तसेंच अपशकूनही मला भासत आहेत. आणि आप्तजनांस मारून मला कांहीं कल्याण दिसत नाहीं. कृष्णा, मला जय नको, राज्य नको, किंवा सुखेंही नकोत. आह्मांस राज्य घेऊन, किंवा विषयसुखें संपादून, किंवा प्राण धारण करून तरी काय करावयाचें आहे? ज्यांच्याकरितां राज्य, संपत्ति आणि सुखें यांची आह्मीं इच्छा करावी, ते हे गुरु, बाप, आजे, मामे, सासरे, बंधु, शालक, पुत्र, पौत्र, तसेच इतर सुहृत्संबंधी, आपली सर्व संपत्ति सोडून, जिवावर उदार होऊन, येथें युद्धास सिद्ध झाले आहेत. त्यांस मारून त्रैलोक्याचें राज्य मला मिळत असलें तरी मी तें करूं इच्छीत नाहीं. मग या पृथ्वीची काय कथा? त्यांस मी मारण्यापेक्षां मलाच त्यांनीं मारलें तरी कांहीं चिंता नाहीं. धृतराष्ट्रपुत्रांस मारून आह्मांस काय सुख होणार आहे? अशा घातक्यांस मारून आह्मांस पाप मात्र लागेल.

आणखी धृतराष्ट्रपुत्र आमचे बांधव, त्यांस आम्हीं मारावें, हें योग्य नाहीं. कृष्णा, आप्तजन मारून आम्हीं कसे सुखी होऊं? लोभाविष्ट झाल्यामुळें कुलक्षय करणें आणि सुहृदांशीं वैर करणें यांत जरी त्यांस दोष वाटत नाहीं, तथापि कुलक्षय करणें हा दोष आहे असें आम्हांस दिसत असून आम्हीं त्या पापापासून निवृत्त कसें न व्हावें? कुलाचा क्षय झाला असतां परंपरागत आलेले कुलधर्म नष्ट होतात; आणि धर्म नष्ट झाले असतां कुलामध्यें अधर्माची प्रवृत्ति होते; अधर्मप्रवृत्ति झाल्यानें कुलांतील स्त्रिया दुष्ट होतात; आणि स्त्रिया दुष्ट झाल्या असतां वर्णसंकर होतो; संकर झाला असतां त्या कुलास आणि त्याचा नाश करणारांस नरकाचीच प्राप्ति होते; आणि इतरांची उत्तरक्रिया करण्यास कोणी नसल्यामुळें ते नरकांत पतन पावतात. अशा या कुलाचा नाश करणाऱ्यांच्या वर्णसंकरकारक दोषांनीं प्राचीन जातिधर्म आणि कुलधर्म नष्ट होतात; आणि कुलधर्म नष्ट झाले असतां मनुष्यांस निश्चयेंकरून नरकवास भोगावा लागतो, असें आम्हीं ऐकलें आहे. तेव्हां केवढें हो आम्हीं हें महत्पाप करावयास उद्युक्त झालों, कीं राज्यसुखलोभानें आप्तजनांस मारावयास सिद्ध झालों आहों? मी हें शस्त्र टाकून देतों. धृतराष्ट्रपुत्रांनीं मला शस्त्रानें मारिलें तरी तें मला श्रेयस्कर होईल असें वाटतें. " याप्रमाणें अत्यंत शोककुल होत्साता, धनुष्यबाण टाकून अर्जुन रथांत स्तब्ध बसला. याप्रमाणें विषय पहिल्या अध्यायांत आहे.

अध्याय २—दुसऱ्या अध्यायांत प्रथमारंभीं, अर्जुन याप्रकारें

कृपेनें व्याकुळ झाला आहे, त्याचे डोळे पाण्यानें भरले आहेत, आणि त्याचें अवसान अगदीं खचून गेलें आहे, असें पाहून, श्रीकृष्ण त्याचा उपहास करून तो वृत्तीवर आला तर पाहावें या हेतूनें त्यास म्हणालाः " हे अर्जुना, आज या आणीवाणीच्या प्रसंगीं तुला हा मोह कसा झाला ? थोर जनांस असा मोह होत नाहीं. हा मोह स्वर्गप्राप्ति आणि कीर्ति यांचा नाश करणारा आहे. तूं असें नपुंसकत्व धारण करूं नको; अर्जुना, तुला हें शोभत नाहीं. अस्तव हे वीरश्रेष्ठा, तूं हें दुर्बलत्व सोड आणि उभा राहा. " हें ऐकून अर्जुन म्हणाला— " कृष्णा, युद्धांत भीष्मद्रोणांवर मी बाण कसे सोडूं? ते मला पूज्य आहेत. महागुणवान वडील व गुरू यांस न मारितां इहलोकीं भिक्षा मागावी लागली तरी ती श्रेयस्कर आहे. गुरूंस मारून त्यांच्या रक्तपातानें संपत्ति मिळवून जें सुख प्राप्त होणार, त्याचा उपभोग करणें हें इहलोकींच नरक भोगाप्रमाणें नव्हे काय? आणखी, आह्मां दोघांतून श्रेष्ठ कोण, आमचा जय होईल किंवा त्यांचा होईल, हेंही समजत नाहीं. तसेंच ज्यांना मारून प्राणधारण करण्याची आमची इच्छा नाहीं, तेच हे धृतराष्ट्रपुत्र पुढें उभे राहिले आहेत. याप्रमाणें माझें चित्त मोहविष्ट झालें आहे. या वेळीं काय करणें योग्य हें मला सुचत नाहीं. यास्तव मी तुला विचारतों. तर जें निश्चयेंकरून मला कल्याणकारक असेल तें सांग. मी तुझा शिष्य आहें, आणि तुला शरण आलों आहे; तर या वेळीं माझें काय कर्तव्य हें

मला शिकीव. सर्व पृथ्वीचें निष्कंटक राज्य मला प्राप्त झालें, किंवा देवांचेंही राज्य मला मिळालें, तरी सर्व इंद्रियांस ग्लानि आणणारा हा जो माझा शोक तो दूर होण्याचा उपाय मला कांहीं दिसत नाहीं." इतकें बोलून,आणि मी युद्ध करणार नाहीं असें पुनः सांगून, अर्जुन स्तब्ध राहिला. तेव्हां उपहासानें हा वृत्तीवर येत नाहीं, यास बोधच केला पाहिजे, असें जाणून, किंचित् हास्य करून कृष्ण त्यास बोध करूं लागला. कृष्ण म्हणाला;–"तूं ज्यांचा शोक करूं नये त्यांचा शोक करितोस, आणि गोष्टी तर शहाणपणाच्या सांगतोस. ज्ञानी मेल्याजित्यांचा शोक करीत नाहींत. मी किंवा तूं किंवा हे राजे असे पूर्वी कधीं नव्हतों असें नाहीं, व पुढेंही कधीं नाहीसे होऊं असें नाहीं. प्राण्यास या देहींच क्रमानें बाल्य, तारुण्य, व वार्धक्य या अवस्था प्राप्त होतात; त्याच प्रमाणें एक देह नाहींसा झाला असतां दुसरा देह प्राप्त होतो. असें जाणून ज्ञानी मोह पावत नाहींत. शरीरास विषयसंसर्गानें शीत, उष्ण, सुख, दुःख इत्यादि क्षणिक विकार होतात. त्यांची व्यथा ज्याला होत नाहीं, जो सुख होवो किंवा दुःख होवो तिकडे कांहींच लक्ष देत नाही, तोच मोक्षास योग्य होतो. जें मुळींच नाहीं तें कोठून उत्पन्न होईल? आणि जें आहे, त्याचा नाश कसा होईल?––या दोहोंचें तारतम्य ज्ञानीजनांस समजतें. सर्व शरीरास धारण करणारा आत्मा अविनाशी व अक्षय आहे, त्याचा नाश कोणीही करूं शकत नाहीं. देह मात्र विनाशी आहे.

आत्मा इंद्रियांस अगोचर आहे, त्यास जन्ममरण नाहीं. तो अनादि, अनंत आहे. शस्त्रें त्यास मारीत नाहींत; अग्नि त्यास जाळीत नाहीं; पाणी त्यास भिजवीत नाहीं; किंवा वायु सुकवीत नाहीं. तो सर्वव्यापी, निश्चळ, निर्विकार, व अचिंत्य आहे. जशीं जीर्ण झालेलीं वस्त्रें टाकून आपण नवीं धारण करितों, तद्वत् आत्मा जीर्ण शरीरें टाकून दुसरीं घेतो. परंतु तो स्वतः कधींही नाश पावत नाहीं. म्हणून तो कोणास मारीत नाहीं, व मरतही नाहीं; यास्तव तूं त्याविषयीं शोक करूं नको. बरें, जरी हा आत्मा खचित जन्मतो आणि मरतो असें तुला वाटत असलें, तरीही कोणाविषयीं शोक करणें तुला योग्य नाहीं. कारण जो जन्मला तो निश्चियेंकरून मरणार, आणि जो मेला तो पुनः जन्मास येणार. तस्मात् जी गोष्ट अपरिहार्य आहे तिजविषयीं शोक करणें तुला योग्य नाहीं. आणखी असें पाहा कीं, प्राणी जन्मण्यापूर्वी कोठें असतो हें आपल्याला माहीत नाहीं; आणि मरण पावल्यानंतर कोठें जातो हेंही माहीत नाहीं; मध्यंतरीं मात्र तो आपणास दिसतो; तर त्याच्या मरणाचा शोक किमर्थ करावा? परंतु मीं तुला पूर्वीं सांगितलेंच आहे कीं, कोणत्याही प्राण्याच्या आत्म्याचा वध करितां येत नाहीं, कारण तो अविनाशी आहे. म्हणून तूं कोणाविषयींही शोक करूं नको, आणि युद्ध कर.

" दुसरें—तूं आपल्या धर्माकडेही लक्ष देऊन युद्धास विमुख होऊं नको. कारण युद्ध करणें हा क्षत्रियाचा धर्म आहे.

त्याहून श्रेयस्कर त्याला कांहीं नाहीं. अशा प्रकारचें युद्ध करावयास सांपडलें असतां स्वर्गाचें द्वार आपल्यास सहजच उघडलें असें समजावें. ज्यांना अशा प्रकारचें युद्ध करावयास मिळतें ते क्षत्रिय धन्य होत; आतां हें युद्ध करणें तुझा धर्म असून तें तूं न करिशील तर स्वधर्म आणि कीर्ति या दोहोंस मुकशील, आणि तुला पाप लागेल. तसेंच तुझी अपकीर्ति लोकांत चिरकाळ राहील; आणि संभावितास अपकीर्ति म्हटली म्हणजे मरणापेक्षांही कठीण. जे महायोद्धे आज तुला बहुमान देत आहेत ते तूं भयानें रणांतून पळून गेलास असें म्हणतील; आणि त्यांमध्यें तुला लहानपण येईल. तुझे शत्रूही बोलूं नये तें तें नानाप्रकारें तुजविषयीं बोलतील; आणि तुझ्या बळाची निंदा करितील. याहून विशेष दुःख कोणचें? जर युद्धांत पडलास तर स्वर्ग पावशील; आणि जय पावलास तर पृथ्वीचें राज्य मिळविशील. तस्मात् युद्ध करण्याचा निश्चय करून उभा राहा. सुख दुःख, लाभ हानि, जय अपजय दोन्ही समान मानून त्वां युद्ध केलें असतां तुला पाप लागणार नाहीं.

"एथवर तुला ज्ञानाचा विचार सांगितला. आतां योगमार्गाचा विचार सांगतों. योगाचरण केलें असतां कांहीं क्रमोल्लंघन होत नाहीं, किंवा तसें करण्यांत कांहीं प्रत्यवायही नाहीं. वेदांमध्यें कर्मांचीं अनेक फलें सांगितलीं आहेत. तीं केली म्हणजे नानाप्रकारचे भोग, ऐश्वर्य, आणि स्वर्ग यांची प्राप्ति होत्ये, या बुद्धीनें केवळ कर्मठ लोक नानाप्रकारचीं वैदिक कर्में करितात, आणि कर्म-

फळाहून दुसरें कांहीं श्रेष्ठ नाहीं असें म्हणतात. त्यांच्या बोलण्याकडे किंवा वेदांतील फलश्रुतीकडे तूं लक्ष देऊं नको. ज्याजवळ चोहोंकडून पाण्यानें भरलेलें सरोवर किंवा मोठा प्रवाह आहे, त्याला विहिरीचें प्रयोजन नाहीं; तद्वत् ज्याला परमात्मज्ञान झालें, त्याला सर्व वेदांचें प्रयोजन नाहीं. यास्तव फलाची आसक्ति सोडून, लाभ, हानि समान मानून कर्माचरण कर. निष्कामबुद्धीनें व शांतवृत्तीनें कर्माचरण करणें यालाच योग म्हणतात. ”

हें ऐकून अर्जुन कृष्णास विचारितो,—“ योग्याचीं लक्षणें कोणतीं, तो असतो कसा, चालतो कसा, बोलतो काय, हें मला सांग. ” हा प्रश्न ऐकून कृष्णानें योग्याचीं लक्षणें याप्रमाणें वर्णन केलीं आहेत. —“ जो मनुष्य मनांतील सर्व वासना सोडतो आणि आत्मस्वरूपींच संतुष्ट राहतो, त्याला योगी म्हणावें. जो दुःख झालें असतां उद्विग्न होत नाहीं, आणि विषयसुखांची इच्छा करीत नाहीं, जो कामक्रोधभयरहित, तो योगी. ज्याची कोठेंच आसक्ति नाहीं, जो सुखाच्या स्थितीची इच्छा करीत नाहीं, व दुःखाच्या स्थितीचा तिरस्कार करीत नाहीं, तो योगी. कासव जसें आपले अवयव आंत आकर्षून घेतें, त्याप्रमाणें जो इंद्रियें विषयांवरून काढून त्यांचा निग्रह करितो, तो योगी. याप्रमाणें इंद्रियनिग्रह केला असतां मनुष्य विषयांचें सेवन मात्र करीत नाहीं. त्याविषयींची गोडी जिवास राहत्येच. पण तीही परमात्मज्ञानानें नाहींशी होत्ये. यास्तव इंद्रियनिग्रह

केल्यावांचून कोणीही योगी होत नाहीं. इंद्रियजय फार कठिण आहे. योगाभ्यास करणाऱ्या ज्ञानी पुरुषाचींही इंद्रियें प्रबळ झालीं असतां बळेंच मन आपापल्या विषयांकडे ओढून नेतात. मन विषयांत रमलें म्हणजे त्यांचा सहवास होतो. सहवास झाला म्हणजे त्यांची इच्छा होत्ये. ती इच्छा तृप्त न झाली म्हणजे क्रोध येतो. क्रोधापासून अविवेक होतो. अविवेकानें मनुष्यास कर्तव्याकर्तव्याचें भान राहात नाहीं. भान नाहींसें झालें म्हणजे विवेक नष्ट होतो. विवेक नष्ट झाला असतां आत्म्याचा सर्वप्रकारें नाश होतो. यास्तव ज्यांनीं इंद्रियांचा निग्रह केला त्यांचें चित्त प्रसन्न होतें. ज्याचें चित्त प्रसन्न तो योगी. सर्व जगाचें निधान जें परब्रह्म त्याचेयोगानेंच सर्व जग चाललें आहे, असें पाहून त्याविषयींच जो सावधबुद्धि राहातो तो योगी. योगावांचून चित्ताची एकाग्रता होत नाहीं. एकाग्रतेवांचून शांति होत नाहीं. ज्याला शांति नाहीं त्याला सुख कोठून? भरलेल्या समुद्रास नद्या जाऊन मिळतात, तथापि त्याची मर्यादा सुटत नाहीं. तद्वत् विषयवासनांनीं ज्याचा निश्चय ढळत नाहीं, तोच शांति पावतो. विषयलोभी शांति पावत नाहीं. जो सर्व वासनांचा त्याग करून निरिच्छमनानें जगांत राहातो, ज्याला आप्त परकी हा भाव नाहीं, ज्याला अभिमान नाहीं, तो शांति पावतो. अर्जुना, ब्रह्मनिष्ठ जो योगी त्याची ही स्थिति. ही ज्याला प्राप्त झाली, तो मोह पावत नाहीं. अशी ज्याची स्थिति अंतकाळीं राहात्ये तो अत्यंत शांत जें ब्रह्मपद त्याप्रत पावतो.

याप्रमाणें दुसऱ्या अध्यायांत कृष्णानें अर्जुनास बोध केला आहे. त्याचें थोडक्यांत तात्पर्य हें कीं—' आत्मा अविनाशी, त्याचा कोणाच्यानेंही वध होत नाहीं. म्हणून भीष्मादिकांस मी मारूं कसें हा तुझा प्रश्न अज्ञानमूलक आहे. बरें, तूं त्यांना मारूं शकशील असें कबूल केलें, तरी युद्धांत शत्रूंस मारणें हा क्षत्रियांचा धर्मच आहे. तोच धर्म तूं निष्कामबुद्धीनें, म्हणजे योगानें, कर; म्हणजे तुला कांहीं दोष नाहीं. उलटी परमात्मनिष्ठेनें, निष्कामकर्मरूपयोगाभ्यासानें तुला मोक्षप्राप्ति होईल. '

या अध्यायांत ज्ञानाचा बोध विशेष असल्यामुळें यास **सांख्ययोग** म्हणजे **ज्ञानयोग** असें नांव दिलें आहे.

अध्याय ३—तिसऱ्या अध्यायाच्या आरंभीं अर्जुनानें असा प्रश्न केला कीं, " हे कृष्णा, जर कर्माहून ज्ञान तुला विशेष वाटतें, तर घोर कर्माविषयीं मला प्रेरणा कां करितोस? संदिग्ध वाक्य बोलून माझ्या बुद्धीस मोह करितोस असें वाटतें. तर जेणेंकरून माझें कल्याण होईल असा कोणचा तो एक मार्ग निश्चयपूर्वक मला सांग. " त्यावर कृष्णानें उत्तर दिलें—" मीं तुला दोन प्रकारचे मार्ग सांगितले; ज्ञान्यांस ज्ञानमार्ग, योग्यांस निष्कामकर्ममार्ग. कर्म न आरंभलें म्हणजे तेवढ्यानेंच मनुष्य निष्कर्मी होत नाहीं; किंवा केवळ कर्मत्यागानें कल्याण होतें असें नाहीं. प्रत्येक मनुष्य कर्म केल्यावांचून एक क्षणभरही राहात नाहीं. सर्व मनुष्यें आपापल्या स्वभावानुसार

कर्म करितात. जो केवळ बाह्य व्यापार सोडून मनांत विषयांचें स्मरण करित बसतो तो मूर्ख, त्याला दांभिक असें म्हणतात. त्याहून जो मनानें इंद्रियांचा निग्रह करून फलासक्ति सोडून कर्मेंद्रियांनीं कर्माचरण करितो तो चांगला. यास्तव तूं अवश्य कर्माचरण कर. अगदीं सर्व कर्मटाकणें यापेक्षां अवश्य कर्माचरण श्रेष्ठ होय. तसेंच कर्म न केलें असतां शरीररक्षणही होणार नाहीं. आणखी यज्ञकर्मापासून तर कांहींच प्रत्यवाय घडत नाहीं, यास्तव यज्ञार्थ फलेच्छा सोडून कर्माचरण कर. सृष्टिकर्त्यानें मनुष्यें जन्मास घातलीं त्याच वेळेस त्यांस यज्ञादि कर्तव्यकर्मे त्यांच्या कल्याणार्थ लावून दिलीं. तीं निरासक्त बुद्धीनें आत्मनिष्ठ होत्साता जो आचरण करितो तो मोक्षपदाप्रत पावतो. याप्रमाणेंच कर्माचरण करून जनकादिक मोक्षपद पावले. तसेंच लोकांत कर्तव्यकर्माचरण राहावें याकारितांही तुला तें केलें पाहिजे. कारण श्रेष्ठजन जसें करितात तसें कनिष्ठ करितात. ते जें योग्य मानितात तेंच इतरही योग्य मानितात. याच कारणास्तव मला या त्रैलोक्यांत कांहींएक मिळवायाचें नसून मीही कर्तव्यकर्माचरण करितों. तसें जर मी निराळशीपणें न करीन तर सर्व मनुष्यें मजप्रमाणें वागतील, सर्व जगांतील मर्यादा नाहींतशा होऊन सर्व गोंधळ होऊन जाईल, आणि सर्वांचा नाश होईल. जीं कर्मे लोक फलाच्या आशेनें करितात, तीं सर्व ज्ञान्यानें फलाशा सोडून लोकस्थितीकरितां करावीं. अडाणी कर्मासक्त लोकांच्या बुद्धीला भ्रम पाडूं नये.

मनुष्याचा आत्मा वास्तविक कोणचेंच कर्म करीत नाहीं. मनुष्याच्या प्रकृतीचे जे सत्व, रज तम असे गुण, त्यांचेयोगानें कर्में घडतात. तीं आपण करितों असें मूढ म्हणतात. यास्तव सर्व कर्में मला शांताचित्तें अर्पण करून, निरिच्छ व अनासक्त होऊन, शोक व भय सोडून, युद्ध कर. ज्ञानीही आपाल्या प्रकृत्यनुसारें कर्माचरण करितात. निग्रहानें काय होईल? इंद्रियांच्या स्वाधीन होऊन फलाची इच्छा धरूं नये म्हणजे कांहीं भय नाहीं. आपल्या स्वतांच्या कर्तव्यकर्मांत कांहीं कमीपणा असला तथापि दुसऱ्याच्या कर्तव्यापेक्षां आपल्यास आपलेंच कर्तव्य श्रेयस्कर आपलें कर्तव्य आपण आचरीत असतां मरण आलें तरी तें श्रेयस्कर आहे. परंतु आपलें कर्तव्य सोडून दुसऱ्याचें ग्रहण करणें अनर्थकारक आहे. ”

हें ऐकून अर्जुनानें प्रश्न केला—“बरें कृष्णा, मनुष्य आपल्या इच्छेविरुद्ध, जसें कोणी त्याजवर बलात्कारच करतो आहे काय असा, पाप करितो. त्याविषयीं त्यास कोण प्रेरणा करितो? कृष्णानें उत्तर केलें “ हा जो काम त्यापासून क्रोधाची उत्पत्ति होते, जो रजोगुणापासून उत्पन्न होतो, तो मोठा खादाड, दुरात्मा, तोंच वैरी मनुष्याकडून पापाचरण करवितो. धूर जसा अग्नीस झांकतो, किंवा मळ आरशास झांकतो, किंवा गर्भाचें वेष्टन गर्भास झांकतें, तसा हा काम ज्ञानावर झांकण घालितो. हा अग्नीप्रमाणें अधाशी आहे, आणि हा ज्ञान्यांशीं नेहमीं वैर करितो. इंद्रियें, मन आणि बुद्धि हीं याचीं राहण्याचीं ठिकाणें

आहेत. यांचे योगानें ज्ञान झांकून हा मनुष्यास मोह पाडितो. तस्मात् तूं आधीं इंद्रियनिग्रह करून ज्ञान आणि अनुभव या दोहोंचाही नाश करणारा जो हा दुरात्मा काम त्याला जिंक. विषयांहून इंद्रियें श्रेष्ठ; इंद्रियांहून मन, मनाहून बुद्धि; आणि बुद्धिहून आत्मा. असें हें आत्म्याचें स्वरूप जाणून या महादुष्ट कामरूपी शत्रूस तूं जिंक.

याप्रमाणें या अध्यायांत कर्तव्यकर्माविषयीं बोध असल्यामुळें यास कर्मयोग असें नांव दिलें आहे.

अध्याय ४—चवथ्या अध्यायाच्या आरंभीं कृष्णानें अर्जुनास सांगितलें कीं,“ जो योग मीं तुला सांगितला तो पूर्वी मीं सूर्यास सांगितला होता. त्यानें मनूस सांगितला. मनूनें इक्ष्वाकु राजास, आणि त्याचेपासून इतर राजांस त्या योगाचें ज्ञान झालें. परंतु तें कालेंकरून नष्ट झालें. तेंच उत्तम योगरहस्य तूं माझा भक्त आणि मित्र म्हणून मीं तुला पुनः सांगितलें.

हें ऐकून अर्जुन म्हणाला, “ कृष्णा सूर्य एकाकाळीं जन्मला आणि तूं अन्य वेळीं जन्मलास; तेव्हां, तूं हा योग त्यास पूर्वी सांगितलास हें मीं कशावरून समजावें ? ”त्यावर कृष्णानें उत्तर केलें—“माझे आणि तुझे पुष्कळ जन्म होऊन गेले. ते तुला ठाऊक नाहींत, पण ते मी जाणतों. मी जरी जन्ममरणहीन आहें, जरी मी सर्व जगाचा शास्ता आहें, तरी जेव्हां धर्म लोपून अधर्माचा प्रादुर्भाव होतो तेव्हां धर्मस्थापना करण्याकरितां, व साधूंचें रक्षण व दुष्टांचा संहार करण्यासाठीं

मी आपल्या मायेच्या योगानें प्रत्येक युगांत उत्पन्न होतों. याप्रमाणें माझें अवतारकारण जाणून, कामक्रोधांचा त्याग करून, सर्व प्रकारें मजवर भरंवसा ठेवून, बहुत जन ज्ञान आणि तप करून मत्पदाप्रत येतात. जे जशी माझी भक्ति करितात तसा मी त्यांस पावतों. ज्यांस कर्मफलाची इच्छा आहे ते नाना दैवतांची आराधना करितात. परंतु गुणकर्मविभागेंकरून चतुर्वर्णात्मक सृष्टि करणारा मी ईश्वर, असें जाणून मला जे भजतात, त्यांस कर्म बाधत नाहीं; असें जाणून पूर्वींच्या मुमुक्षुजनांनीं कर्म केलें म्हणून तूंही तेंच कर.

"परंतु कर्म, निष्कर्म, आणि कुकर्म यांतील भेद समजणें फार कठिण आहे. म्हणून तुला सांगतों कीं, कर्मफलाची इच्छा धरून जें करणें तेंच कर्म, निषिद्ध कर्म म्हणजे कुकर्म आणि फळाची इच्छा सोडून, सर्व वासनापरित्याग करून, निराश, निर्मत्सर, निरिच्छ होऊन, सहज प्राप्त होईल त्यांत संतोष मानून, लाभहानि समान मानून, ज्ञानावर दृष्टि देऊन यज्ञादि अवश्य कर्तव्यकर्म आचरण करणें, याचेंच नांव निष्कर्म. यज्ञ अनेक प्रकारचे आहेत, ते तुला सांगतों. नाना देवतांची आराधना हा देवयज्ञ; परब्रह्मास सर्व अर्पण करणें, हा ब्रह्मयज्ञ; इंद्रियांचा निग्रह करणें हा संयमयज्ञ; अनासक्त होऊन इंद्रियांनीं विषयसेवन करणें, हा इंद्रिययज्ञ; सर्व इंद्रियांचीं कर्में आणि प्राणांचीं कर्में यांविषयींची आसक्तता ज्ञानानें दूर करणें, हा आत्मसंयमनयज्ञ; यथान्यायें द्रव्य सं-

पादून तद्द्वारा यज्ञ करणें, तो द्रव्ययज्ञ; तपश्चरण करणें, हा तपोयज्ञ; योगाभ्यास करणें, हा योगयज्ञ; शास्त्राध्ययन करून ज्ञान संपादणें, हा एक यज्ञ; प्राणवृत्तींचा निग्रह करणें, हा प्राणायामयज्ञ; नियमित आहार करून प्राण धारण करणें, हा प्राणयज्ञ. असे अनेक प्रकारचे यज्ञ शास्त्रांत सांगितले आहेत. ते आचरण केल्यावांचून, इहलोकींही सुख होत नाहीं, मग परलोकीं कोठून होणार? हे सर्वही यज्ञ कर्मसाध्य आहेत. परंतु त्यांचें तारतम्य असें आहे कीं, द्रव्यद्वारा घडणाऱ्या यज्ञापेक्षां ज्ञानद्वारा घडणारा यज्ञ श्रेष्ठ. कारण ज्ञानामध्यें सर्व कर्मांचें पर्यवसान होतें. तें ज्ञान तत्त्वज्ञान्यांस शरण जाऊन, त्यांची सेवा करून, त्यांस विचार, म्हणजे ते तुला सांगतील. तें ज्ञान तुला प्राप्त झालें असतां पुनः असा मोह होणार नाहीं. त्या ज्ञानाच्या योगानें आत्म्याच्या व माझ्या आश्रयानें सर्व प्राणी आहेत असें तुला समजेल. सर्व प्राण्यांत तूं महापापी असलास तरी ज्ञाननौकेनें सर्व पापांपासून तूं तरशील. जसा प्रदीप्त झालेला अग्नि काष्ठांचें भस्म करून टाकितो, तद्वत् हा ज्ञानरूप अग्नि सर्व कर्मांची बाधा दूर करितो. ज्ञानासारखा दुसरा पवित्र तारणोपाय नाहीं. हें ज्ञान योग्यांस कालेंकरून आपोआप होतें. भाविकास ज्ञान होतें, त्याचेहीपेक्षां जितेंद्रियास विशेष होतें. ज्ञानप्राप्तीनें लवकरच अत्यंत शांति प्राप्त होत्ये. जो ज्ञानहीन, जो भावहीन, जो संशयी, तो नाश पावतो. संशयी मनुष्यास ना इहलोक, ना परलोक. त्याला कधींच सुख

होत नाहीं. यास्तव योगाभ्यासानें कर्मवासना टाकून, ज्ञानानें सर्व संशय दूर करून, जो आपला आत्मा स्वाधीन ठेवितो, त्यास कर्माची बाधा होत नाहीं. तस्मात् हे अर्जुना, अज्ञानमूलक जो हा संशय तुझ्या हृदयांत उत्पन्न झाला आहे त्याला ज्ञानखड्गानें छेदून, योगयुक्त होऊन, युद्धास उभा राहा".

या चवथ्या अध्यायांत विशेषेंकरून ज्ञानाचें माहात्म्य वर्णिलें आहे, म्हणून यास ज्ञानयोग हें नांव आहे.

अध्याय ५—पांचव्या अध्यायाच्या आरंभीं अर्जुन म्हणतो— "कृष्णा, एकदां कर्मत्याग करावा म्हणून सांगतोस, एकदां कर्मयोग करावा म्हणून सांगतोस. या दोहींतून निश्चित कल्याणकारण मार्ग कोणचा तें सांग." त्यावर कृष्ण म्हणतो. "योगमार्ग, आणि कर्मत्याग किंवा संन्यासमार्ग, हे दोन नाहींत. दोहोंचें फल एकच. योगाभ्यासावांचून संन्यास घडत नाहीं. आणि योगी सर्व बाह्यक्रिया करीत असतां आपण कांहीं करित नाहीं, इंद्रियें आपापले विषय ग्रहण करितात असें जाणून, कर्मफलाची आसक्ति सोडून, चित्त परमात्म्याचे ठिकाणीं ठेवून, शरीर मन आणि बुद्धि यांच्या द्वारा होणारीं सर्व कर्में आचरण करीत असले तरी कर्मत्याग होतोच. कां कीं, त्याला कर्मापासून कांहीं बाधा होत नाहीं. ईश्वर कोणास कर्तृत्व देत नाहीं, किंवा कर्माची फळें भोगवीत नाहीं; कोणाकडून पाप करवीत नाहीं, किंवा पुण्य करवीत नाहीं. मनुष्य स्वभावतःच कर्माविषयीं प्रवृत्त होतो. अज्ञानानें लोक मोह पावतात. ज्ञा-

नामें तें अज्ञान ज्यांचें नष्ट झालें त्यांत परमात्म्याचें ज्ञान स्पष्ट होतें. मग परमात्मपरायण होऊन सर्वपापरहित होत्साते ते शाश्वत सुख पावतात. जे सर्व मनुष्यांशीं समभावानें वागतात तेच जीवन्मुक्त, तेच ब्रह्मनिष्ठ. कारण ब्रह्म सर्वांभूतीं समान आहे. म्हणून जे समदृष्टि तेच ब्रह्मनिष्ठ. जे विषयसुखाची अशा सोडून क्षणिक बाह्य दुःखांपासून पीडा पावत नाहींत, ज्यांस आत्म्याचेच ठिकाणीं सुख होतें, ते ज्ञानी, ते ब्रह्मनिष्ठ; त्यांसच अक्षय सुख प्राप्त होतें. जे संसारांत असूनही काम क्रोधांचा वेग सहन करूं शकतात, तेच योगी, तेच सुखी. ज्यांस आत्म्याचें ज्ञान झालें, ज्यांस आत्म्याचेच ठाईं विश्रांति व सुख होतें, ज्यांचे सर्व संशय दूर झालें, ज्यांचीं सर्व पापें क्षीण झालीं, जे प्राणिमात्राच्या हिताविषयीं तत्पर असतात, जे कामक्रोधरहित, ज्याणीं आपल्या मनाचा निग्रह केला, जे बाह्य विषयांवरून इंद्रियें काढून प्राणवृत्तींचा निरोध करून मोक्षाची इच्छा धरून तत्पर राहातात, त्यांस अत्यंत शांत ब्रह्मपद फार लौकर प्राप्त होतें. ज्यांची इच्छा, भय, आणि कोध हीं नाहींशीं झालीं ते सदा मुक्तच होत. मी सर्व यज्ञ आणि तपश्चर्या यांचा भोक्ता, सर्व जगाचा शास्ता, सर्व प्राण्यांचा आप्त, असें मला जो जाणतो, तो शांति पावतो."

याप्रमाणें या पांचव्या अध्यायांत मुख्यत्वेंकरून सन्यास म्हणजे कर्मत्याग याचें लक्षण सांगितलें आहे, म्हणून यास कर्मसंन्यासयोग असें नांव आहे.

अध्याय ६—सहाव्या अध्यायाच्या प्रारंभीं कृष्ण अर्जुनास

म्हणतो,—" जो कर्मफलाची आसक्ती सोडून कर्तव्यकर्म आचरितो, तोच संन्यासी, तोच योगी. जो केवळ अग्निहोत्रादि कर्मे टाकतो तो संन्यासी नव्हे. जो केवळ सर्व बाह्यक्रिया सोडतो तो योगीही नव्हे. ज्याला संन्यास म्हणतात त्यालाच तूं योग असें जाण. कारण वासनांचा त्याग केल्यावांचून कोणी योगी होत नाहीं. कर्माचरण करितांना मनोनिग्रह होऊन सर्व विषयवासना क्षीण झाल्या, म्हणजे योगी झाला असें म्हणतात. या योगमार्गानें आपलें आपण कल्याण करावें, आपला आपण नाश करूं नये. आपणच आपला आप्त, आपणच आपला वैरी. ज्याला आपला आत्मा वश तो आपणच आपला आप्त. आत्मा ज्याच्या स्वाधीन नाहीं, तो आपणच आपला शत्रु. यास्तव मनुष्यानें सर्व बाह्यविषय तुच्छ मानून, वैषयिक सुखदुःखें, मानापमान, यांविषयीं अनासक्त होऊन, सर्व मनुष्यांचे ठायीं समभाव ठेवून, इंद्रियें जिंकून, आत्मा वश करून,चित्त शांत करून नित्य एकांतीं योगाभ्यास करावा. पवित्र ठिकाणीं आसन स्थिर करून त्याजवर दर्भ, वस्त्र, कृष्णाजिन घालून, त्यावर बसावें. तेथें एकाग्र मन करून, शरीर ताठ ठेवून, दृष्टि नासिकाग्रीं लावून ब्रह्मचर्य आचरून, शांतचित्त होऊन, बुद्धि ईश्वरपरायण करून, योगाभ्यास करावा. म्हणजे अत्यंत शांत जें माझें स्थान तें प्राप्त होतें. योगाभ्यासानें खाणें, जेवणें, निजणें इत्यादि मध्यम मानानें केलें पाहिजे. निवांतस्थळीं दीप जसा निश्चल असतो, तद्वत् सर्व बाह्यविषयांवरून निघून मन

परमात्मरूपीं अत्यंत लीन झाले पाहिजे. अशी स्थिति प्राप्त झाली असतां तेथें जें सुख होतें तें एक योगीच जाणतो. त्या सुखापेक्षां दुसरा कोणाचाही लाभ त्याला विशेष वाटत नाहीं. जी सुखाची स्थिती प्राप्त झाली तथापि ती स्थिति सोडित नाहीं अशी जी सर्व दुःखातीत सुखाची स्थिती तिलाच योग असें म्हणावें. हा योग निश्चयानें, अक्लिष्ट मनानें साध्य करावा. सर्व वासना जिंकाव्या. मनानें इंद्रियांचा निग्रह करावा. विवेकानें आणि धैर्यानें मन आत्म्याकडे लावून सर्व विषयांवरून काढावें. असें केलें असतां सहज ब्रह्मप्राप्तीचें सुख प्राप्त होईल. ईश्वर सर्वांभूती आहे असें जाणून सर्वांभूतीं ज्याची सारखी दृष्टि बरोबर असते, जो अशा बुद्धीनें अनन्यभावें माझी भक्ति करितो, तो योगीं कोणत्याही स्थितींत असला तरी त्याचा माझा वियोग कधींही होत नाहीं. आपल्यास जसें सुख किंवा दुःख होतें तसेंच सर्व प्राण्यांसही होतें असें जो जाणतो, तो ज्ञानी. तोच सर्वांहून श्रेष्ठ योगी. ''

इतकें ऐकून अर्जुन म्हणतो,—'' कृष्णा, सर्वत्र समदृष्टि करून योग करावा म्हणून जें तूं सांगितलेंस तें कसें घडेल? स्थिरयोग कसा होईल? मन फार चंचळ आहे, फार बलवत्तर आहे. त्याचा निग्रह करणें म्हणजे वाऱ्याची मोट बांधणें याप्रमाणें अत्यंत दुष्कर आहे. '' कृष्ण म्हणतो,—'' अर्जुना, मन निःसंशय चंचळ व वश करण्यास कठिण आहे. परंतु विषयवासना जिंकून निग्रहाविषयीं सतत अभ्यास केला अस-

तां मनोनिग्रह होईल. पण मनोनिग्रह करणें झाल्यावांचून योग होणें कठीण असें मला वाटतें. मनोनिग्रह झाला असतां यत्नें-करून योग साध्य होईल". त्यावर अर्जुन म्हणतो—"कृष्णा, कोणी श्रद्धापूर्वक योगाभ्यास करीत असतां मनोनिग्रह न झाल्या-नें त्याचा योगाभ्यास मध्येंच खुंटला,तर त्याची काय गति होत्ये? त्याला योगसुखही नाहीं, आणि काम्य कर्म आचरण केलें असतां जे स्वर्गादिक लोक प्राप्त होतात तेही नाहींत. तेव्हां तो मध्येंच लटकत राहून अभ्राप्रमाणें नाहींसा होतो कीं काय? माझा संशय तुजवांचून दूर करणारा दुसरा कोणी नाहीं." तेव्हां कृष्ण म्हणतो, "पार्था, त्याचा इहलोकीं किंवा परलो-कींही नाश होत नाहीं. कोणीही सत्कर्म आचरति असतां दुर्गति पावत नाहीं. त्यास स्वर्गलोकाची प्राप्ति होऊन, तेथें तो बहुत वर्षेपर्यंत राहून, पुनः एकाद्या पवित्र, भाग्यवान् अशा कुलीं जन्म पावतो; किंवा ज्ञान्याचे किंवा योग्याचेच कुळांत जन्म घेतो. इहलोकीं अशा प्रकारचें जन्म होणें हें फार दुर्ल-भच होय. तें त्याला प्राप्त झाल्यानंतर तो पूर्वजन्मींच्या अभ्यासानें आपोआप योगाभ्यासास लागतो. असें होतां होतां अनेक जन्मान्तीं त्याचा योग सिद्ध होऊन त्यास मोक्षपदाची प्राप्ति होत्ये. तपस्व्यांपेक्षां योगी श्रेष्ठ, ज्ञान्यांपेक्षांही तो श्रेष्ठ, कर्मठापेक्षांही तो श्रेष्ठ. म्हणून हे अर्जुना, तूं योगी हो. सर्व योग्यांमध्येंही जो श्रद्धापूर्वक अनन्यचित्तानें माझी भक्ति क-रितो तो सर्वश्रेष्ठ होय.

याप्रमाणें या साहाव्या अध्यायांत योगाभ्यासाचा प्रकार सांगितला आहे, म्हणून यास अभ्यासयोग असें नांव दिलें आहे.

याप्रमाणें या पहिल्या षट्कांत निष्कामकर्मरूप योगमार्गाचा बोध कृष्णानें अर्जुनास केला आहे. त्यांत मीं पूर्वी सुचविल्याप्रमाणें उपासनामार्ग आणि ज्ञानमार्ग यांचाही उल्लेख केला आहे. या साहीं अध्यायांचें तात्पर्य पाहिलें तर हेंच आहे कीं, आत्मा अविनाश आणि विषय नाशवंत. परमात्मा, परमेश्वर, सर्वकर्ता, सर्वशास्ता, सर्वनिधान; त्याणें जीवात्म्यास सृष्टिकाळीं जीं कर्तव्यकर्में लावून दिलीं आहेत तीं ज्ञानाचे योगानें फलाची वासना सोडून, भक्तीनें ईश्वराचे ठाईं चित्त ठेवून करावी. म्हणजे त्यास शाश्वतसुखाची प्राप्ति होत्ये.

दुसऱ्या षट्कांत मुख्यत्वेंकरून भक्तिमार्गाचा प्रकार सांगितला आहे. त्यांत—

अध्याय ७—याचे आरंभीं कृष्ण अर्जुनास म्हणतो, " अर्जुना, योगाभ्यासानें माझी भक्ति करून माझ्या स्वरूपाचें निश्चित ज्ञान कसें होईल तें मी तुला सांगतों.

मनुष्यांमध्यें सहस्रांत एकादा योगप्राप्त्यर्थ यत्न करितो; आणि योगाभ्यासी जनांमध्येंही क्वचित् एकादाच माझें यथार्थ स्वरूप जाणतो. यास्तव त्याविषयींचें ज्ञान व विवेक मी तुला निःशेष सांगतों. हें ज्ञान प्राप्त झालें असतां या जगांत दुसरें कांहीं जाणावयाचें राहात नाहीं. पृथ्वी, आप, तेज, वायु, आकाश, चित्त बुद्धि, आणि अहंकार हे माझ्या प्रकृतीचे आठ

प्रकार आहेत. यांखेरीज एक नववा प्रकार आहे, तो जीव, ज्याचे योगानें हें जग जीवन पावतें. या नऊ तत्त्वांपासून सर्व सृष्टीची उत्पत्ति होते. सर्व जगाचा आदि-अंत मी; माझ्याहून कांहीं श्रेष्ठ नाहीं. माळेचे मण्यांप्रमाणें हें सर्व जग माझ्या आश्रयानें आहे. उदकांमध्यें रस मी; चंद्रसूर्यांमध्यें तेज मी; सर्व वेदांमध्यें ओंकार मी; आकाशाचा गुण शब्द मी; मनुष्यांमध्यें उद्योग मी; पृथ्वीमध्यें सुगंध मी; अग्नीमध्यें तेज मी; सर्व भुतांचें जीवन मी; सर्व तपस्व्यांचें तप मी; प्राणिमात्रांचें अनादि बीज मी; बुद्धिमंताची बुद्धि मी; तेजस्व्यांचें तेज मी; बलवंतांचें आसक्तिरहित बल मी; मनुष्यांचे ठाईं धर्मयुक्त काम मी; सर्व त्रिगुणात्मक जग मजपासूनच निर्माण होतें. तथापि मी गुणातीत आहें. हें त्रिगुणात्मक जग माझी माया होय. जे मला शरण येतात, तेच या मायेस तरून जातात. माझी भक्ति करणारे चार प्रकारचे लोक असतात;—१ कोणी पीडा झाली असतां माझी भक्ति करितात; २ कोणी ज्ञान व्हावें म्हणून करतात; ३ कोणी द्रव्यप्राप्तीसाठीं करितात; आणि ४ कोणी माझें स्वरूप जाणून भक्ति करितात. हे सर्वही चांगलेच. परंतु ज्ञानी भक्त सर्वांत श्रेष्ठ. तो मला अत्यंत प्रिय. मी त्याला अत्यंत प्रिय. तो मला जीवाप्रमाणें वाटतो, कारण तो मजपेक्षां आणखी कांहींएक अधिक मानीत नाहीं. मी सर्वव्यापक परमात्मा आहें, असें बहुत जन्मांतीं जाणून जो माझी भक्ति करितो, तो महात्मा अत्यंत दुर्लभ होय. मूढजन माझें वास्तविक स्वरूप न

जाणून, भिन्न भिन्न भावनांनीं मला भजतात. त्यांचें फल मी त्यांना देतों. परंतु तें फार अल्प. असे भिन्न भावानें नाना देवतांस भजणारे त्या त्या देवतांच्या लोकांप्रत जातात. परंतु जे माझी भक्ति करितात तेच मत्पदाप्रत पावतात."

याप्रमाणें या अध्यायांत विवेकसहित ज्ञान सांगितलें आहे, म्हणून यास **ज्ञानविज्ञानयोग** असें नांव दिलें आहे.

अध्याय ८—आठवे अध्यायाचे आरंभीं अर्जुन विचारितो, ब्रह्म म्हणजे काय? अध्यात्म म्हणजे काय? कर्म कोणतें? अधिभूत तें कोणतें? व अधिदैवत कशास म्हणावें? या देहांत अधियज्ञ कोण आणि मरणकाळीं योग्यास तुझें ज्ञान कसें होतें?" त्यावर कृष्ण उत्तर करितो;—"जो अविनाश परमात्मा तें परब्रह्म. आत्म्याच्या स्वभावास अध्यात्म म्हणतात; पृथिव्यादि सृष्टीची उत्पत्ति, याचें नांव कर्म; सर्व नाशिवंत जग, हें अधिभूत; जीवात्मा हें अधिदैवत; आणि प्राण्यांच्या देहांत अधियज्ञ, म्हणजे पूज्य, मी परमात्मा. अंतकाळीं माझें स्मरण करून जो देह टाकतो, तोच निश्चयें मत्पदाप्रत येतो; नाहींतर अंतकाळीं जें जें मनांत येतें त्या त्या स्थितीप्रत मनुष्य जातो. तस्मात् सदैव माझें स्मरण कर आणि युद्ध कर. मजकडे तुझें चित्त आणि बुद्धि लागली, म्हणजे निःसंशय तूं मजपाशीं येशील. जो परमात्मा सर्वज्ञ, जो अनादिशास्ता, जो परमसूक्ष्मस्वरूप, जो जगदाधार, जो अचिंत्यरूप, जो अत्यंत प्रकाशमय, वेद ज्याची स्तुति करितात, संन्यासी, योगी ज्याचे ठिकाणीं

मन लीन करितात, ज्याच्या प्राप्त्यर्थ ब्रह्मचारी ब्रह्मचर्य करितात, त्या परमेश्वरास अंतकाळीं, प्राणायाम करून इंद्रियें व मन यांचा निग्रह करून, ओंकारउच्चारणपूर्वक सतत अभ्यासानें स्मरण करित होत्साते जे देह टाकितात, ते अविनाश सुखाचें पद पावतात. तें पद प्राप्त झालें, म्हणजे मग त्यांस पुनः जन्ममरणाच्या भीतीची बाधा होत नाहीं. सहस्र युगपर्यंत ब्रह्मदेवाचा दिवस, आणि तितकीच त्याची रात्र. त्याचा दिवस उगवला म्हणजे सर्व जग उद्भवतें; रात्र झाली म्हणजे मावळतें. असें जेव्हां जग मावळतें, तेव्हांही जो अविनाश पुरुष जागृत राहातो तोच परमात्मा. त्याची प्राप्ति होणें ही उत्तम गति होय. तेथून पुढें पुनर्जन्म नाहीं. तो परमात्मा अनन्य भक्तीनेंच पावतो. दिवसास, शुक्लपक्षी, उत्तरायणीं ज्यांचें प्राणोत्क्रमण होतें, ते ब्रह्मवेत्ते, ब्रह्मपदाप्रत जातात. रात्रीस, कृष्णपक्षीं, दक्षिणायनीं ज्यांस मरण येतें, ते चंद्रलोकाप्रत जाऊन पुनः जन्मतात. हे मार्ग ज्या योग्यास ठाऊक आहेत तो मोह पावत नाहीं. यास्तव सदैव तूं योगाभ्यास कर. योग्यास परमपदाची प्राप्ति होणें हें फल ब्रह्मचर्य, यज्ञ, तप, दान, इत्यादि पुण्यकर्माचें जें फल सांगितलें आहे त्या सर्वांपेक्षां परम श्रेष्ठ होय.

याप्रमाणें या आठव्या अध्यायांत, अक्षर, म्हणजे अविनाश ब्रह्माचा विचार केला आहे, म्हणून यास **अक्षरब्रह्मयोग** हें नांव आहे.

अध्याय ९—नवव्या अध्यायाच्या आरंभीं कृष्ण सांगतो, "अर्जुना, आतां मी तुला जें ज्ञान सांगतों आहें, तें अगदीं रहस्य होय; तेणेंकरून तूं सर्व पापांपासून मुक्त होशील. मी या सर्व जगास आधारभूत व सर्वव्यापक असून, यापासून अलिप्त आहें. मी जगाची स्थिति, लय, अनासक्त होत्साता करतों, यामुळें हें कर्म मला बाधत नाहीं. मूढ, दुर्बुद्धिजन मला मनुष्य मानून माझी अवज्ञा करितात; परंतु जे सद्बुद्धि, महात्मे आहेत, ते सर्व जगत्कारण मी असें जाणून. मला अनन्य चित्तानें भजतात; सतत माझी कथा गातात; आणि भक्तिपूर्वक निष्कामबुद्धीनें मला नमस्कार करितात. कितीएक मला एक मानून माझी आराधाना करितात; कितीएक मला भिन्न मानून, नानाविध स्वरूपांनीं माझी आराधना करितात.—म्हणजे मला अनेक देवता मानून माझी आराधना करितात. त्यांची ती आराधना अविधिपूर्वक होय. अतएव ते देवलोकाप्रत जाऊन पुनः जन्ममरणाचे फेऱ्यांत पडतात. मी सर्व जगदात्मा, जगत्पिता, जगत्साक्षी, जगदीश्वर, अनाद्यनंत, सर्व यज्ञांचा भोक्ता, अत्यंत मंगलमय, जगाचें निधान, असें मला जाणून अनन्य चित्तानें जे माझी उपासना करितात, त्यांचें संरक्षण मी करितों. मला सर्व मनुष्यें सारखींच; माझा कोणी मित्र नाहीं, किंवा कोणी शत्रु नाहीं; पण जे भक्तीनें माझी आराधना करितात, त्यांच्या सन्निधच मी असतों. जीं मनुष्यें माझी अनन्यभावेंकरून भक्ति करितात तीं सद्गुद्धि होत.

त्यांचा व्यवहारधंदा कितीही नीच असला, तथापि त्यांस साधु असेंच समजावें. स्त्रिया असोत, वैश्य असोत, किंवा शूद्र असोत, माझ्या भक्तीनें तीं सर्व लौकर धार्मिक होऊन, अखंड शांत पद पावतात. मग जे सदाचारी, निर्मलकर्म करणारे, ब्राह्मणादि, ते माझ्या भक्तीनें मजपाशीं येतील यांत नवल काय ! इहलोकीं सर्व वस्तू अशाश्वत, ऐहिक स्थिति परम दुःखकारक असें जाणून माझी भक्ति कर. पत्र, पुष्प, फळ, उदक, जें कांहीं कोणी मला भक्तीनें देतो, तें त्याचें मी ग्रहण करितों. यास्तव तूं जें जें करशील, किंवा खाशील किंवा हवन,किंवा दान, किंवा तप करिशील, तें सर्व मला अर्पण कर; म्हणजे तुला कर्मफलाची बाधा न होतां तूं मजपाशीं येशील. माझे ठिकाणीं चित्त ठेव; माझा भक्त हो; यज्ञानें माझी आराधना कर; आणि मला नमस्कार कर. याप्रमाणें मन अनासक्त करून तूं मत्परायण झालास, म्हणजे मजपाशीं येशील. ''

याप्रमाणें नवव्या अध्यायांत. परमश्रेष्ठ, परमगुह्य ज्ञान सांगितलें आहे, म्हणून यास **राजविद्या-राजगुह्ययोग** असें नांव दिलें आहे.

अध्याय १०—दहाव्या अध्यायाचे आरंभीं कृष्ण अर्जुनास म्हणतो;—'' अर्जुना, मी तुला आणखीही बोध करितों, ऐक. कारण मी जें तुझ्या हिताकरितां सांगेन तें ऐकून तुला आनंदच होईल. मी सर्व जगाचें आदिकारण. मी केव्हां झा-

लों हें देवांस किंवा ऋषींसही कळत नाहीं. कारण त्या सर्वांस मीं निर्माण केलें. आधीं सप्त ऋषि आणि चार मनु माझ्या मनापासून निर्माण झाले, आणि त्यांच्यापासून पुढें ही सर्व सृष्टि झाली. मी सृष्टिस्थितिलयकर्ता आहें. हें माझें स्वरूप जाणून, ज्ञानी भावेंकरून माझी भक्ति करितात आणि आपलें चित्त, प्राण मला अर्पण करितात; आणि परस्परांत मजविषयीं बोध करून, माझ्या कथा सांगून, संतोष व आनंद पावतात. असे प्रीतिपूर्वक जे माझी भक्ति करितात, त्यांचे अंतरीं मी प्रगट होऊन, ज्ञानदीपानें त्यांचें अज्ञान निरसन करून, कृपेनें त्यांस माझ्या प्राप्तीचा मार्ग दाखवितों. असें ऐकून अर्जुन म्हणतो;—" कृष्णा, तूं परब्रह्म, तूं परंज्योति, तूं परम मंगलरूप अनादि विश्वात्मा, असें सर्व ऋषि, तसेंच नारद, असित, देवल, व्यास हे मुनिही सांगतात; आणि तूंही तसेंच सांगतोस. हें सर्व मी सत्य मानितों. तुला देव, दैत्य, कोणी जाणत नाहींत. तुझा तूंच आपलें स्वरूप जाणतोस. जगत्पालका, जगदीश्वरा, देवाधिदेवा, तुझ्या श्रेष्ठ विभूति कोणत्या, तें कृपा करून मला सांग." तें ऐकून कृष्णानें त्यास " आदित्यांमध्यें मी विष्णु, रुद्रांमध्यें मी शंकर, वसूंमध्य अग्नि मी, इत्यादि. देव, दैत्य, गंधर्व, यक्ष, राक्षस, वसु, रुद्र, ऋषि, मुनि, भिन्न भिन्न पशु, पक्षी, मत्स्य, यांच्या जाती, सर्व वेद, शास्त्रें, छंद, बाह्यपदार्थ, मनोवृत्ति इत्यादि सर्वांत जीं जीं श्रेष्ठतत्त्वें, तीं मी "—असें सांगून, शेवटीं असें

सांगितलें कीं, " ह्या मीं आपल्या मुख्य मुख्य विभूति तुला सांगितल्या. वस्तुतः माझ्या विभूति अनंत आहेत. जें जें कांहीं ऐश्वर्ययुक्त तत्त्व आहे, तें तें सर्व माझ्याच अंशापासून झालेलें आहे. अथवा फार कशास सांगूं. मी हें सर्व जग एका अंशानें व्यापून राहिलों आहे. "

याप्रमाणें दहाव्या अध्यायांत ईश्वराच्या विभूतीचें वर्णन आहे. म्हणून यास **विभूतियोग** हें नांव आहे.

अध्याय ११——अकरावे अध्यायाचे आरंभी अर्जुन म्हणतो—" कृष्णा, तूं कृपा करून जें आपल्या स्वरूपाचें वर्णन केलेंस, तें ऐकून माझा मोह दूर झाला. आतां जर तुझें विश्वरूप पाहण्याची माझी योग्यता आहे असें तुला वाटेल, तर तें पाहावें अशी माझी इच्छा आहे. " त्यावर कृष्ण म्हणतो, " मी विश्वरूप तुला दाखवितों, परंतु या डोळ्यांनीं तें तुला दिसणार नाही. म्हणून तुला दिव्य दृष्टि देतों. तिच्या योगानें तूं तें पाहा. " असें म्हणून त्यास आपलें दिव्य विश्वरूप दाखविलें. तेव्हां अर्जुनास असें दिसलें कीं, त्या रूपास अनेक मुखें व नेत्र आहेत; त्या रूपाचे ठायीं अनेक अद्भुत चमत्कार दिसताहेत; अनेक दिव्य अलंकार घातले आहेत; अनेक आयुधें हातांत घेतलीं आहेत; दिव्य माळा घातल्या आहेत, दिव्य वस्त्रें परिधान केलीं आहेत, दिव्य सुगंधी द्रव्यें आंगास चर्चिलीं आहेत. याप्रकारें अत्यंत आश्चर्यकारक असें देवाचें स्वरूप दिसत आहे. आकाशांत सहस्र सूर्य एक-

दम उदयास आले, तर त्यांचें तेज जसें पडेल, तसें त्या रूपाचें तेज चोहोंकडे पडलें आहे. तेथें एकेठिकाणीं सर्व जग दिसत आहे. असें पाहून अर्जुन अत्यंत विस्मित झाला. त्याच्या आंगावर रोमांच उभे राहिले. तेव्हां तो देवास साष्टांगनमस्कार घालून हात जोडून म्हणाला;—" देवा, तुझ्या रूपाचे ठाईं ब्रह्मादि देव, सर्व ऋषि, सर्व भूतें, इत्यादि सर्व जगत् दिसत आहे. तुझा आदि, अंत, मध्य, कोठें कांहीं दिसत नाहीं. तुला अनेक बाहु, उदरें, मुखें, नेत्र, अलंकार, आयुधें दिसत आहेत. तुझें तेज सर्व दिशांकडे भरलें आहे. तेणेंकरून तुजकडे पाहावतही नाहीं. तूं अविनाश परम पुरुष, तूं या विश्वाचें परम निधान, तूं पुराणपुरुष, धर्मरक्षक, अनाद्यनंत प्रभु, चंद्र-सूर्य तुझे नेत्र, अग्नि तुझें मुख, असें दिसत आहे. सर्व विश्व तूं व्यापिलें आहेस. हे महापुरुषा, तुझें अद्भुत, उग्र रूप पाहून त्रैलोक्य भयाभीत झालें आहे. हे सर्व देव तुजपाशीं येत आहेत; कितीएक भिऊन हात जोडून तुझा स्तव करिताहेत; महर्षि आणि मुनिगण अनेक प्रकारें स्वस्तिपूर्वक तुझी स्तुति करीत आहेत; आणि वसु, रुद्र, आदित्य, साध्य, मरुत, विश्वेदेव, अश्विनीकुमार, गंधर्व, यक्ष, राक्षस, हे सर्व विस्मित होत्साते तुला पाहात आहेत. तुझें हें अनेकावयवयुक्त अद्भुत रूप पाहून सर्व लोक, व मीही भयभीत झालों आहें. मी अगदीं घाबरून गेलों आहें. प्रलय काळच्या प्रज्वलित अग्नीप्रमाणें

तुझीं हीं विकराळ मुखें पाहून मला दिशा दिसत नाहींशा झाल्या आहेत; आणि जीव कासाविस झाला आहे. हे देवाधिदेवा, हे जगन्निवासा, मजवर प्रसन्न हो. हे सर्व भीष्मादिक कौरव आणि इतर राजे तुझ्या भयंकर मुखांमध्यें भराभर शिरताहेत. कांहींचीं मस्तकें चुरून तुझे दांतांत अडकून राहिलीं आहेत. नद्यांचे प्रवाह जसे समुद्रास जाऊन मिळतात, किंवा पतंग प्रदीप्त अग्नीवर वेगानें जाऊन पडतात, त्याप्रमाणें ही सर्व प्रजा तुझ्या मुखांवाटें भराभर शिरत आहे. तूं सर्व विश्वाचा ग्रास करूं पाहातो आहेस, असें दिसतें. हे देवाधिदेवा, तूं उग्ररूपी कोण दैवत, हें कृपा करून मला सांग. मला तुझ्या रूपाचा बोध होत नाहीं. " हें ऐकून कृष्ण म्हणतो,— " मी सर्वांतक काळ, सर्व जगाचा नाश करण्यास येथें आलों आहें. येथें या दोन्ही सैन्यांत जीं मनुष्यें आहेत, तीं सर्व तुझ्यासुद्धां नाहींशीं होतील. भीष्मद्रोणादिक सर्व वीर मीं पूर्वीच मारून टाकिले आहेत; अतएव तूं निमित्तमात्र होऊन निर्भय चित्तानें युद्धास उभा राहा; आणि शत्रूंस जिंकून यश आणि राज्यसंपत्ति संपादन कर. निश्चयेंकरून तुझा जय होईल." असें कृष्णाचें वचन ऐकून अर्जुन हात जोडून, कांपत कांपत, भीत भीत नमस्कार करून, अडखळत अडखळत, कृष्णास याप्रमाणें बोलला;— "हे भगवन्, सर्व जग तुझी कीर्ति गातें, आणि तेणेंकरून आनंद पावतें; राक्षस तुला भिऊन चोहोंकडे पळतात; आणि सर्व ऋषिगण तुला नमस्कार

करितात; हें योग्यच आहे. हे अनाद्यनंत देवा, जगन्निवासा, यांणीं तुझ्या पायां काय म्हणून न पडावें ? तूं आद्यदैवत, पुराणपुरुष, तूं सर्व विश्वाचें परम निधान, तूं सर्वविश्वात्मा. हे अनंतशक्ते, तुला चोहोंकडून मी पुनः पुनः नमस्कार करितों. तुला मित्र मानून, तुझा हा महिमा न जाणून, मी तुला, 'हे कृष्णा, हे यादवा, हे सख्या!' असें उद्धत भाषण चुकीनें किंवा स्नेहानें बोललों असेन; तें सर्व मला क्षमा कर. एकांतीं किंवा तुझ्या समक्ष, जेवतांना खातांना, किंवा कोणच्याही इतर वेळीं, जें कांहीं थट्टेनें बोललों असेन, तें सर्व कृपाळू होऊन क्षमा कर. तूं सर्व जगत्पिता; तूं सर्व जगद्गुरु; तुजप्रमाणें या जगांत कोणीही नाहीं; तुझ्या सामर्थ्यास उपमा नाही; या स्तव तुला साष्टांगनमस्कार घालून मी तुझी क्षमा मागतों. पिता पुत्रास, किंवा मित्र मित्रास क्षमा करितो, त्याप्रमाणें कृपाळू होऊन मला क्षमा कर. तुझें अत्यंत अद्भुत रूप पाहून मी भयानें अगदीं व्याकुळ झालों आहें. अतएव पुनः आपलें पूर्वीचें शंख-चक्र-गदायुक्त चतुर्भुज रूप मला दाखीव." तें ऐकून कृष्ण म्हणतो;— "अर्जुना, मी तुला कृपा करून हें विश्वरूप दाखविलें हें मनुष्यलोकीं पूर्वी कधींही कोणीं पाहिलें नाहीं, आणि हें कोणच्याही साधनांहीं पाहावयास मिळावयाचें नाहीं, अतएव हें घोर रूप पाहून तूं भिऊं नको. आतां निर-भय व आनंदयुक्त होत्साता पुनः माझें पूर्वीचें रूप पाहा." असें म्हणून, कृष्णानें पुनः आपलें पूर्वरूप अर्जुनास दाखवून,

त्याचें समाधान करून त्यास सांगितलें कीं, " अर्जुना, अनन्य भक्तीवांचून अन्य साधनांनी हें माझें रूप कोणालाही दिसावयाचें नाहीं, व प्राप्त व्हावयाचें नाहीं. "

याप्रमाणें या अकराव्या अध्यायांत, कृष्णानें आपलें विश्वरूप अर्जुनास दाखविलें त्याचें वर्णन आहे, म्हणून यास **विश्वरूपदर्शन** हें नांव दिलें आहे.

अध्याय १२—बारावे अध्यायाचे आरंभी अर्जुन कृष्णास प्रश्न करितो कीं—" कृष्णा, जे योगी भक्त सतत तुझी भक्ति करितात, आणि जे निर्गुण ब्रह्माची उपासना करितात, त्या दोहोंत उत्तम योगी कोण ? " कृष्ण म्हणतो—" अर्जुना, जे योगी दृढभावें मत्परायण होऊन माझी सतत भक्ति करितात, ते मला उत्तम योगी वाटतात. निर्गुण ब्रह्मोपासना करणारेही मजप्रतच येतात. परंतु ही निर्गुण उपासना मनुष्यांस अत्यंत क्लेशसाध्य आहे. यास्तव जे सर्व कर्मे मला अर्पण करून अनन्यभावेंकरून माझें ध्यान व आराधना करितात, त्यांस मी लौकर जन्ममरणदुःखापासून सोडवितों. यास्तव तूं आपलें चित्त व बुद्धि माझे ठाईंच ठेव; म्हणजे मरणानंतरही मजपाशींच राहशील. जर चित्त स्थिर न होईल, तर तें स्थिर करण्याचा अभ्यास कर; अभ्यासही न होईल, तर सर्व कर्मे मला अर्पण कर, म्हणजे तुझें कल्याण होईल. हेंही न होईल, तर दृढनिश्चयानें कर्मफलाची वासना सोड. अभ्यासाहून ज्ञान श्रेयस्कर; ज्ञानाहून ध्यान विशेष; ध्यानाहून कर्मफलाचा त्याग,

आणि त्यागाहून शांति विशेष. आतां मला प्रिय असा भक्त कोण, हें तुला सांगतों. जो कोणाचाही द्वेष करीत नाहीं, जो प्राणिमात्राशी मित्रत्वानें वागतो, जो करुणायुक्त, जो आसक्ति-हीन, जो निरभिमान, जो सुखदुःख समान मानितो, जो नित्य संतुष्ट असतो. जो योगी मनोनिग्रही, दृढनिश्चयी, जो चित्त आणि बुद्धि माझेठायीं ठेवितो, तो भक्त मला प्रिय. ज्यापासून लोक पीडा पावत नाहींत व लोकांपासून ज्यास पीडा होत नाहीं. जो हर्ष, विषाद, भय, दुःख यांविरहित, तो मला प्रिय. जो निरपेक्ष, व पवित्रमति, जो दक्ष, उदासीन, व भयरहित, जो सर्व ऐहिक खटाटोप टाकतो, तो भक्त मला प्रिय. जो बाह्य सुखांत आनंद मानीत नाही, व दुःखांची खंती मानीत नाही. जो निरिच्छ असून कशीही स्थिति आली तरी उदासीन राहातो, तो भक्त मला प्रिय. जो निःसंग होत्साता, शत्रु-मित्र. मानापमान, शीतोष्ण. सुखदुःख समान मानितो; ज्यास निंदा आणि स्तुति सारखी वाटत्ये; जो मननशील व मितभाषी; जो जें कांही मिळेल त्यांत संतुष्ट राहातो; ज्याची गृहादिकांचे ठायी आसक्ति नाही; आणि जो स्थिरबुद्धि;—तोच भक्त मला प्रिय. जे भक्त माझ्या या धर्मपर व मोक्षसाधक बोधावर भाव ठेऊन तदनुरूप उपासना करितात, ते भक्त मला अत्यंत प्रिय होतात. ''

याप्रमाणें या बाराव्या अध्यायांत मुख्यत्वेंकरून भक्तीचें लक्षण वर्णन केलें आहे; यास्तव यास **भक्तियोग** असें नांव दिलें आहे.

या दुसऱ्या सहा अध्यायांत अनन्यभावेंकरून परमेश्वराची भक्ति हा मोक्षप्राप्तीचा मुख्य उपाय सांगितला आहे. तथापि ही भक्ति ज्ञानानें परमेश्वराचें स्वरूप जाणून करावी, आणि अवश्य कर्तव्यकर्म निष्कामबुद्धीनें करीत राहावें, असें सांगितलें आहे.

अध्याय १३—शेवटच्या सहा अध्ययांत मुख्यत्वेंकरून तत्त्वज्ञानाचा उपदेश केला आहे. त्यामध्यें तेरावे अध्यायांत क्षेत्र, क्षेत्रज्ञ, ज्ञान, प्रकृति, पुरुष, या तत्त्वांचा विचार सांगितला आहे. क्षेत्र म्हणजे देहादि सर्व विषय. ते असेः—पंच महाभूतें, अहंकार, बुद्धि, मूलप्रकृति, पांच ज्ञानेन्द्रियें, पांच कर्मेन्द्रियें, मन, पांच ज्ञानेन्द्रियांचे पांच विषय, इच्छा, द्वेष, सुख, दुःख या सर्वांचा संयोग, चेतना, धैर्य, हें सर्व मिळून क्षेत्र समजावें. असें सांगून कृष्ण म्हणतो—"सर्व भूतांमध्यें क्षेत्रज्ञ मी. आतां ज्ञानाचें स्वरूप सांगतों. मानरहितता, अदांभिकत्व, विषयांविषयीं अनासक्ति, विनय, संसार, जन्ममरण, वार्धक्य, व्याधी, यांपासून होणाऱ्या नानाविधी दुःखांनीं व्याप्त आहें असें जाणणें, स्त्रीपुत्र, गृह इत्यादिकांविषयीं अनासक्ति, सुख, दुःखाची कशीही स्थिति प्राप्त झाली तरी स्वस्थचित्त असणें, माझी अनन्यभावेंकरून भक्ति, एकांत वास, जनसमूहाचा कंटाळा, नित्य आत्मज्ञानपारायणता, आणि तत्वज्ञान, या सर्वांस ज्ञान अशी संज्ञा आहे. जें याच्या विपरीत तें सर्व अज्ञान. आतां ज्ञेय म्हणजे जाणायाचें काय तें सांगतो. जें जाणल्यानें मोक्षाची प्राप्ति होते. अनाद्यनंत, सर्वांतर्यामी, सर्व-

साक्षी, अतीन्द्रिय, अद्वितीय, चित्स्वरूप, असें जें परब्रह्म तेंच ज्ञेय म्हणजे जाणावयाचें. माझे भक्त हें सर्व जाणून मत्-पदाप्रत पावतात.

वर जी क्षेत्र आणि क्षेत्रज्ञ म्हणून सांनितलीं, त्यांसच प्रकृति आणि पुरुष असेंही म्हणतात. या दोहोंच्या संयोगानें सर्व जग निर्माण होतें. जो सर्व नाशिवंत भूतांचे ठाईं व्यापक परमात्मा अलिप्त असा आहे, आणि सर्व भूतें नाश पावलीं तरी जो अविनाश गहतो. तो सर्वांदेहीं आहे; तथापि आकाशाप्रमाणें अलिप्त आहे. सूर्य जसा सर्व बाह्य जग दाखवितो, तद्वत् हा परमात्मा सर्व बाह्य व अभ्यंतर विश्वाचें ज्ञान आपल्यास देतो. याप्रमाणें क्षेत्र, क्षेत्रज्ञ, आणि प्रकृतिपुरुष, यांचें ज्यांस यथार्थ ज्ञान होतें, ते परमपद पावतात.

या तेरावे आध्ययांत मुख्यत्वें क्षेत्र आणि क्षेत्रज्ञ यांचें लक्षण सांगितलें आहे म्हणून यास **क्षेत्रक्षेत्रज्ञयोग** असें नांव आहे.

अध्याय १४.—चवदावे अध्यायाचे आरंभीं कृष्ण अर्जुनास म्हणतो;—" याहीपेक्षां आणखी मी तुला उत्तम ज्ञान सांगतों; ज्याचे योगानें जन्ममरण नाहींसें होतें, व ज्याचे योगानें सर्व मुनि आजपर्यंत तरले गेले.—माझ्या योगानें प्रकृतीपासून ही सर्व सृष्टि उत्पन्न होते. प्रकृतीचे गुण सत्व, रज, तम असे तीन आहेत. त्यांचे योगानें आत्म्यास देहाची प्राप्ति होते. त्यांमध्यें सत्वगुण निर्मल आणि ज्ञानमय असल्यामुळें,

त्यापासून सुख आणि ज्ञान यांची प्राप्ति होते. रजोगुण वासनामय असल्यामुळें, त्याचे योगानें नानावासनापूर्वक कर्म घडतें. तमोगुण हा अज्ञानमय असल्यामुळें, त्यापासून मोह, आळस, निद्रा हीं होतात. जेव्हां सर्व बाह्य व अध्यात्मिक पदार्थांचें यथार्थ ज्ञान होतें, तेव्हां सत्वगुणाचें प्राबल्य झालें असें समजावें. लोभ. प्रपंचासक्ति, नानाप्रकारचे केवळ लौकिक उद्योग, असहिष्णुता. इच्छा, यांणीं मन व्यापिलें म्हणजे रजोगुण प्रबल झाला असें समजावें. अज्ञान. आलस, दुर्लक्ष, मोह, यांणीं आपल्यास व्यापिलें म्हणजे तमोगुणाचें प्राबल्य झालें असें समजावें. सत्ववृद्धि झाली असतां प्राणी उत्तमलोकाप्रत जातो; रजोगुणाची वृद्धि झाली असतां कर्मासक्त मनुष्यांत जन्म घेतो; आणि तमोवृद्धि झाली असतां अज्ञानयोनीमध्यें जन्म घेतो. सत्वगुणाचें फल निर्मल सुख, रजोगुणाचें फल दुःख आणि तमोगुणाचें फल अज्ञान. सत्वगुणापासून ज्ञान होतें; रजोगुणापासून लोभ होतो; आणि तमोगुणापासून प्रमाद, मोह होतो. हे गुणच सर्व कर्मास कारण. जो गुणातीत झाला, तोच जन्ममरणापासून मुक्त होतो. " त्यावर अर्जुन विचारितो,—" जो त्रिगुणातीत झाला त्याचीं लक्षणें कोणतीं ? " त्यावर त्यास कृष्ण म्हणतो,—" जो इच्छाद्वेषरहित; जो उदासीन, सुखदुःखीं ज्याची समान मति; जो स्वस्थचित; सुवर्ण, मृत्तिका, आणि पाषाण ज्यास समान; निंदा स्तुति, मान अपमान, शत्रु मित्र, ज्यास समान; सर्व

ऐहिक व्यवहारांविषयीं जो अनासक्त; जो अनन्यभावें माझी भक्ति करितो, तो त्रिगुणातीत समजावा. तोच ब्रह्मपदास योग्य होतो. शाश्वत ब्रह्मपद, मोक्ष, सनातन धर्म, आणि निर्विकल्प सुख, ही माझेच ठायीं वास करितात. "

याप्रमाणें या चवदाव्या अध्यायांत त्रिगुणांचें वर्णन केलें आहे, म्हणून यास **गुणत्रयविभाग योग** असें नांव आहे.

अध्याय १५—पंधरावे अध्यायांत प्रपंचास अश्वत्थ वृक्षाची उपमा देऊन, त्याचा अनासक्तेनें त्याग करून, शाश्वत पद शोधावें, आणि परमात्मपदाप्रत पावावें, असें सांगितलें आहे. "जे मान, मोह, आणि आसक्ति यांविरहित, जे इच्छा, द्वेष, सुख, दुःख, काम, क्रोध यांविरहित, तेच त्या पदास योग्य होतात. जें पद सूर्य, चंद्र किंवा अग्नि यांच्या प्रकाशानें दृष्टीस पडत नाहीं, जें केवळ ज्ञानगम्य; जें प्राप्त झालें असतां पुनः जन्ममरण घडत नाहीं; तें माझें परम श्रेष्ठ स्थान. देह वर्तविणारा जीव माझाच अंश आहे. मी सर्वव्यापक, सर्वांतर्यामी; असें वेदांत माझ्या स्वरूपाचें वर्णन केलें आहे. या जगांत दोन तत्त्वें आहेत—क्षर आणि अक्षर. क्षर म्हणजे सर्व भूतें; अक्षर म्हणजे तत्त्व, चैतन्य. या दोहोंतूनही जें उत्तम तत्त्व त्याला परमात्मा असें म्हणतात. जो जगद्व्यापक, जगत्पालक, अविनाशी परमेश्वर, तो सर्वांहून श्रेष्ठ. मी परमात्मा क्षर अक्षर या दोन्ही तत्त्वांहून श्रेष्ठ आहें; त्यामुळें वेदांमध्यें आणि लोकांमध्यें मला पुरुषोत्तम असें नांव आहे. हें अत्यंत गूढ ज्ञान

मीं तुला सांगितलें. हें ज्याला प्राप्त होतें तो अनन्यभावें माझी भक्ति करून कृतकृत्य होतो. "

याप्रमाणें या पंधराव्या अध्ययांत उत्तम पुरुषाचें वर्णन केलें आहे म्हणून यास **पुरुषोत्तमयोग** असें नांव आहे.

अध्याय १६——सोळावे अध्यायाचे आरंभीं दैवी संपत्ति, म्हणजे सात्विक संपत्ति, इचें वर्णन केलें आहे. " निर्भयचित्तत्त्व, सत्वशुद्धि, ज्ञान. निष्काम मति. दान. इंद्रियनिग्रह, यज्ञक्रिया, शास्त्राध्ययन, सरलता. अहिंसा, सत्य, अक्रोध, अनासक्ति, शांति. परदोषांविषयीं औदासीन्य. भूतदया, निर्लोभता, सौम्यता. मर्यादशीलता. स्थिरता, उद्योगपरता. क्षमा, धैर्य, पवित्रता, निर्वैरता. अमानित्व. ही दैवी किंवा सात्विक संपत्ति. आतां आसुर किंवा तामस संपत्ति सांगतों. सृष्टीविषयीं अज्ञान, मलिनता, अपवित्रता, अनाचार, असत्य, नास्तिकबुद्धि, हठ, दुराग्रह. काम. क्रोध, लोभ. मोह, मद, मत्सर, परपीडा, चिंता. आशा, अन्यायानें द्रव्यसंचय; द्रव्याविषयीं, बलाविषयीं, ऐश्वर्याविषयीं. ऐषआरामाविषयीं, कुलाविषयीं, आपण केलेल्या कर्माविषयीं अत्यंत अभिमान, चंचलमति, ही असुरसंपत्ति. ही ज्यांच्या ठायीं वास करिते,ते जन्मोजन्मीं माझा द्वेष करून अधिकाधिक नीच योनीप्रत जातात, आणि शेवटीं अत्यंत अधोगतीप्रत पावतात. आपलें अकल्याण करणारीं नरकाचीं द्वारें तीन आहेत;–काम, क्रोध, आणि लोभ. जो शास्त्रोपदेशाचा अव्हेर करून यांच्या स्वाधीन होऊन वर्तन

तो, त्याला सुख किंवा मोक्ष कधींही प्राप्त होत नाहीं. जो शास्त्रबोध प्रमाण मानून, कर्तव्याकर्तव्य यांचा विचार करून, कामक्रोधलोभरहित होत्साता वर्ततो, तो उत्तम गति पावतो. हें जाणून तूं तसें आचरण कर. ''

याप्रमाणें या सोळाव्या अध्यायांत दैवी आणि आसुरी अशा दोन प्रकारच्या संपत्ति सांगितल्या आहेत, म्हणून यास **दैव्यासुरसंपद्विभागयोग** हें नांव आहे.

अध्याय १७——सतरावे अध्यायांत सत्व, रज, तम या गुणांच्या प्रमाणानें श्रद्धा तीन प्रकारची सांगितली आहे;— सात्विक, रजोगुणी, आणि तमोगुणी. सात्विक श्रद्धायुक्त पुरुष देवांची आराधना करितात; रजोगुणी श्रद्धायुक्त पुरुष यक्ष-राक्षसांची आराधना करितात. आणि तमोगुणी श्रद्धायुक्त पुरुष भूत, पिशाच, वेताळ, यांची आरधना करितात. या तीन प्रकारच्या श्रद्धांनीं युक्त अशा जनांचे आहारही निरनिराळे असतात. सुरस, मृदु, पौष्टिक, आणि मधुर, असे आहार सात्विकजनांस आवडतात; कडू, आंबट, खारट, तिखट, कढत, रुक्ष, दाहकारक, असे पदार्थ रजोगुणी मनुष्यास आवडतात,—त्यांच्या योगानें रोग, दुःख, शोक, हीं त्यांस भोगावीं लागतातं; शिळें, निरस झालेलें, आंबलेलें, उष्टें, अपवित्र, असें अन्न तमोगुणी जनांस प्रिय असतें. या तीन प्रकारच्या जनांचीं यज्ञ, तप, दान हींही कर्में निरनिराळ्या प्रकारचीं असतात. जो अवश्य कर्तव्य म्हणून शांत चित्तानें

फलाची इच्छा न धरितां यज्ञ केला जातो तो सात्विक, जो फलप्राप्तीकरितां किंवा दांभिक बुद्धीनें यज्ञ करितात, तो रजोगुणी, जो अनुचित, ज्यांत अन्नदान, दक्षिणाप्रदान, मंत्रोच्चारण, नाहीं, जो करणारांची त्याजवर श्रद्धा नाहीं, तो तामस यज्ञ. आतां तप तीन प्रकारचें आहे; शरीरसंबंधी, वाणीसंबंधी आणि मनःसंबंधी. देव, द्विज, गुरु, ज्ञानी यांचें पूजन, निर्मळपणा, साधेपणा, एकपत्नीत्व किंवा ब्रह्मचर्य, आणि अहिंसा, हें शारीर तप. दुसऱ्यास दुःख न होईल असें, मधुर परंतु सत्य, व कल्याणकारक असें भाषण, आणि शास्त्राध्यायन, हें वाङ्मय म्हणजे वाणीचें तप होय. प्रसन्नचित्त, सौम्यता, मनन, आत्मसंयमन, आणि चित्तशुद्धि, हें मानस तप. दृढभावानें, निष्कामचित्तानें जें तप करावें तें सात्विक तप. लोकांत आपल्यास मान सत्कार मिळावा म्हणून जें तप करितात, तें रजोगुणी; तें स्थिर राहात नाहीं. जें अज्ञानानें, दुराग्रहानें आपल्या जीवास अत्यंत कष्ट देऊन, किंवा दुसऱ्याचा नाश करण्याकरितां तप करितात, तें तामस तप. तसेंच जें दान कांहीं हेतू न धरितां देश, काल, पात्र, पाहून, आपल्या उपयोगीं न पडणारास द्यावें, तें सात्विक दान. जें फलाचा हेतु धरून, किंवा दान घेणारानें आपल्यास उपयोगीं पडावें म्हणून असंतोषानें द्यावें, तें रजोगुणी दान. जें देश, काल, पात्र, यांचा विचार न करितां, याचकाचा तिरस्कार आणि अपमान करून द्यावें, तें तामस दान. 'ओम-तत्-सत्' हीं परमेश्वराचीं

तीन नामें होत. यांचा उच्चार करून श्रद्धापूर्वक यज्ञादि सर्व क्रिया करून ब्रह्मार्पण कराव्या. श्रद्धेवांचून यज्ञ, किंवा दान, किंवा तप, किंवा कोणचेंहीं कर्म करावें, तें न केल्यासारखेंच. त्यापासून इहलोकीं फल नाहीं, आणि परलोकींही नाहीं.

याप्रमाणें या सतराव्या अध्यायांत श्रद्धेचे तीन प्रकार सांगितले आहेत, म्हणून त्यास **श्रद्धात्रयविभागयोग** असें नांव आहे.

अध्याय १८—अठरावे अध्यायाचे आरंभीं अर्जुन कृष्णास म्हणतो, " कृष्णा, संन्यास आणि त्याग, या दोहोंचें पृथक्स्वरूप मला सांग. " कृष्ण म्हणतो,—" अर्जुना, कामनिक कर्माचा त्याग, याला संन्यास म्हणतात; आणि सर्व कर्मांच्या फलाची वासना सोडणें याला त्याग म्हणतात. कितीएक म्हणतात कीं, सदोष कर्में मात्र टाकावीं; दुसरे म्हणतात कीं, यज्ञ, दान, तप, हीं कर्में टाकूं नयेत. त्यांविषयीं माझें निश्चित मत मी तुला सांगतों. यज्ञ, दान, तप, हीं कर्में टाकूं नयेत; अवश्य करावीं. कारण हीं कर्में ज्ञानीजनांसही पवित्र करणारीं होतात. हीं कर्में अनासक्त होऊन अवश्य करावीं. कर्मत्यागाचे तीन प्रकार आहेत. जें कर्म अवश्य कर्तव्य जाणून, फलाची आशा सोडून केलें त्याला सात्विक त्याग म्हणतात. शरीरास क्लेश होतील म्हणून कर्तव्यकर्म टाकणें, हा राजस त्याग; या त्यागापासून फल नाहीं. अज्ञानानें कर्तव्यकर्माचा त्याग करणें, याला तामस त्याग म्हणतात. जो अनासक्त होत्साता कर्तव्य-

कर्म आचरितो, तोच खरा त्यागी. कोणचेंही कर्म होण्यास पांच कारणें लागतात; (१) स्थान, (२) कर्ता, (३) नाना साधनें, (४) विविध उद्योग आणि (५) दैव. हीं पांच कारणें असतां जो आपल्यासच केवळ कर्ता मानितो, तो मूढ होय. ज्ञान तीन प्रकारचें आहे,—सात्विक, राजस, तामस. सर्व भूतांचा व्यापक एक परमात्मा आहे, असें जें ज्ञान तें सात्विक; नानाभूतें आपापल्या शक्तीनें चालताहेत, हें राजस ज्ञान; हें सर्व जग आहे तसें आहे, याला कोणी कर्ता नाहीं, अशी जी खोटी. क्षुद्र कल्पना, तिला तामस ज्ञान म्हणतात. याप्रमाणेंच कर्महीं तीन प्रकारचें आहे. जें कामक्रोधरहित होऊन फलाशा सोडून, अवश्य कर्तव्य म्हणून कर्म करावें, तें सात्विक कर्म. जें कांहीं हेतु धरून, किंवा अहंमतीनें बहुत आयास करून कर्म करावयाचें, तें राजस कर्म. आपण जें कर्म करितों त्याचा परिणाम चांगला किंवा वाईट होईल, त्यास द्रव्य किती खर्च होईल, त्यापासून दुसऱ्यास पीडा होईल कीं काय, तें करण्याचें सामर्थ्य आपल्या आंगीं आहे कीं नाहीं, याचा विचार न करितां जें अज्ञानानें कर्म आरंभिलें जातें, तें तामसकर्म. तसेंच, कर्ताही तीन प्रकारचा असतो. अनासक्त, गर्वहीन, धैर्ययुक्त, उत्साहयुक्त, लाभहानीविषयीं उदासीन, असा जो कर्ता तो सात्विक. जो लोभी, कर्मफलाची इच्छा करणारा, परपीडा करणारा, अशुद्धमति, क्षुद्रकर्माचा हर्षविषाद मानणारा, असा जो कर्ता तो रजोगुणी कर्ता; जो आसक्तबुद्धि,

अविवेकी, उद्धत, शठ, दुसऱ्याचा अवमान करणारा, आळशी, वृथा काळजी बाळगणारा, दीर्घसूत्री, असा जो कर्ता तो तमोगुणी. तद्वत्, बुद्धिही तीन प्रकारची आहे. ज्या बुद्धीनें उत्पत्ति व नाश, कर्तव्याकर्तव्य, भयाभय, बंधमोक्ष, यांचें यथार्थ ज्ञान होतें, ती सात्विक बुद्धि; जिणें धर्म, अधर्म, कर्तव्याकर्तव्य, यांचें यथार्थ ज्ञान होत नाहीं, ती रजोगुणी बुद्धि; आणि ज्या बुद्धीस अज्ञानाचे योगानें अधर्म धर्म असा वाटतो आणि सर्व गोष्टी विपरीत भासतात, ती बुद्धि तमोगुणी. तद्वत्च धृति (अवसान) ही तीन प्रकारची आहे. जिच्या योगानें मन, प्राण, इंद्रियें, यांचीं कर्में व्यवस्थित रीतीनें आणि अनासक्ततेनें होतात, ती सात्विक धृति; जिच्या योगानें धर्म, काम, द्रव्यसंपादन, हीं प्रसंगोपात्त फलाची इच्छा होऊन घडतात, ती रजोगुणी धृति; जिच्या योगानें निद्रा, भय, शोक, विषाद हीं नाहींशीं होत नाहींत, ती तमोगुणी धृति. आतां सुखही तीन प्रकारचें आहे तें सांगतों, ऐक. जें अभ्यासानें प्रिय वाटूं लागतें, ज्याच्यायोगानें पुनः दुःख होत नाही, जें आरंभीं विषासारखें कडू, पण परिणामीं अमृतासारखें गोड, तें सात्विक सुख. तें आत्मज्ञानानें चित्त प्रसन्न झालें असतां प्राप्त होतें. विषयांपासून होणारें सुख, जें प्रथम अमृतासारखें गोड, पण परिणामीं विषासारखें कडू, तें राजस सुख. जें आरंभीं, तसेंच परिणामीं, आत्म्यास मोह पाडणारें, जें निद्रा, आळस, प्रमाद यांपासून होणारें, तें तामस सुख. याप्रमाणें या तिन्ही

गुणांचें स्वरूप तुला सांगितलें. यांवांचून एकही प्राणी नाही. आतां ब्राह्मणादि वर्णांचे स्वभावसिद्ध धर्म सांगतों;—

" मनोनिग्रह, इंद्रियनिग्रह, तप, निर्मळपणा, चित्तशुद्धि, क्षमा, सरळ बुद्धि, ज्ञान, अनुभव, परलोकाविषयीं आस्तिक्यबुद्धि, हे ब्राह्मणाचे स्वाभाविक धर्म होत. शौर्य, बळ, धैर्य, चातुर्य, वीर्य, दातृत्व, ऐश्वर्य, हे क्षत्रियांचे स्वाभाविक धर्म होत. कृषिकर्म, गोरक्षण, व्यापार, धंदा, हे वैश्यांचे स्वाभाविक धर्म. पूर्वोक्त तीन वर्णांची सेवा करणें हा शूद्रांचा स्वाभाविक धर्म. ज्याचें कर्म त्यास इतरांपेक्षां विशेष श्रेयस्कर. तें त्याणें केलें असतां त्यास कांहीं दोष लागत नाहीं. तें आचरून जो सर्व जगत्कर्ता आणि जगन्नियंता प्रभू याची उपासना करितो, तो मोक्षपद पावतो. याप्रमाणें अनासक्त होऊन, मनुष्य आपलें कर्तव्यकर्म करून, ब्रह्मनिष्ठ कसा होतो तेंही मी तुला सांगतों. शुद्धबुद्धियुक्त होत्साता धैर्यानें आत्मसंयमन करून, विषयाकांक्षा सोडून, कामक्रोधविरहित होऊन, एकांतवास करून, मिताहार करून शरीर, वाणी, मन, यांचा निग्रह करून, वैराग्ययुक्त व ध्यानपारायण होत्साता, काम, क्रोध, लोभ, मोह, मद, मत्सर टाकून, शांत होत्साता प्राणी ब्रह्मपदास योग्य होतो. ब्रह्मपदाची प्राप्ति झाली म्हणजे प्रसन्नचित्त होत्साता तो कशाचीही इच्छा किंवा शोक करीत नाहीं; सर्वीभूतीं समदृष्टि ठेवून माझी दृढ भक्ति करितो; आणि भक्तीनें माझ्या स्वरूपाचें यथार्थ ज्ञान संपादून, माझे ठायीं लीन हो-

त्साता, परमानंद अनुभवतो. यास्तव तूं सर्व कर्मे निष्काम बुद्धीनें आचरून मला अर्पण कर; आणि माझे ठायीं भाव ठेवून सतत माझी भक्ति कर; तेणेंकरून मी प्रसन्न होत्साता, तुला सर्व संकटांपासून तारीन. जर तूं अहंकारानें माझें न ऐकशिल तर नाश पावशील. तूं अहंकारानें मी युद्ध करणार नाहीं. असें जें म्हणतोस, हा तुझा निश्चय व्यर्थ आहे; तुझा स्वभाव तुला तिकडे वळवील. जें मोहामुळें तूं आतां करूं इच्छीत नाहींस, तें स्वभाववश होऊन तूं करशील. यास्तव सर्व भूतांचा चालक, सर्व भूतांचा अंतरात्मा, जो जगदीश्वर, त्यासच अनन्यभावेंकरून शरण जा. त्याच्या कृपेनें अत्यंत शांति आणि शाश्वतपद हीं तुला प्राप्त होतील. हें तुला अत्यंत गूढ ज्ञान मीं सांगितलें. या सर्वांचा विचार करून जसें तुझ्या इच्छेस येईल तसें तूं कर. परंतु तूं माझा अत्यंत मित्र आहेस, म्हणून तुझ्या हिताकरितां पुनः हें परमरहस्य मी तुला सांगतों.—माझे ठायीं मन ठेव; माझी भक्ति कर; कर्तव्यकर्म करून मला निवेदन कर; आणि मला शरण ये. म्हणजे तूं माझेपाशीं निश्चयेंकरून येशील. हें मी तुला खरोखर प्रतिज्ञा करून सांगतों; कारण तूं माझा प्रिय मित्र आहेस. सर्व धर्म एकीकडे ठेवून, केवळ मलाच शरण ये; मी तुला सर्व पापांपासून मुक्त करीन; भिऊं नको. हें ज्ञान तपोहीनास, भक्तिहीनास, अनादरकर्त्यास, किंवा नास्तिकास सांगू नको. जो हें परम गुह्य ज्ञान माझ्या भक्तांस सांगेल, तो माझी परम भक्ति करून निःसंशय मजप्रत येईल.

त्याचप्रमाणें मला संतोषविणारा या पृथ्वीवर दुसरा कोणीही नाहीं, व पुढेंही होणार नाहीं. तसेंच जो या आमच्या पवित्र संवादाचें अध्ययन करील, तो ज्ञानयज्ञानें माझी आराधना करील; तसेंच जो श्रद्धेनें आणि आस्तिक्यबुद्धीनें हा संवाद ऐकेल, तोही पुण्यलोकाप्रत जाईल. अर्जुना, हें सर्व तूं एकाग्र चित्तानें ऐकिलेंस काय? अज्ञानामुळें झालेला मोह नष्ट झाला काय? " अर्जुन उत्तर करितो—" कृष्णा, माझा मोह दूर झाला; तुझ्या कृपेनें माझें मन पुनः वृत्तीवर आलें. माझा संदेह गेला. आतां मी तुझ्या म्हणण्याप्रमाणें करितों. "

याप्रमाणें कृष्णार्जुनांचें भाषण धृतराष्ट्रराजास सांगून संजय म्हणतो;—" याप्रमाणें कृष्णार्जुनांचा हा परम अद्भुत व आश्चर्यकारक संवाद मीं ऐकिला. व्यासाच्या कृपेनें साक्षात् योगीश्वर कृष्ण याचे मुखांतून हें परम गुह्य ज्ञान, हा श्रेष्ठ योग, मीं ऐकिला. हे राजा, हा कृष्णार्जुनांचा अद्भुत व पवित्र संवाद आठवून आठवून, पुनः पुनः माझ्या चित्तास आनंद होतो. तसेंच श्रीहरीचें तें अत्यंत अद्भुत रूप आठवून आठवून मला परमविस्मय होतो; व पुनः पुनः शरीर रोमांचयुक्त होतें. निश्चयेंकरून जिकडे योगीश्वर कृष्ण, जिकडे पार्थ वीर, तिकडे लक्ष्मी, तिकडे जय, तिकडे भाग्य, तिकडे न्याय, असें माझ्या बुद्धीस वाटतें. "

याप्रमाणें या अठराव्या अध्यायांत संन्यासरूप जो मोक्षमार्ग त्याचा मुख्यत्वेंकरून उपदेश आहे, यामुळें यास **संन्यासयोग** असें नांव दिलें आहे.

या शेवटल्या सहा अध्यायांत मुख्यत्वें मोक्षसाधनभूत जें ज्ञान त्याचा उपदेश केला आहे. तथापि पुनः पूर्वीच्या दोन षट्कांत सांगितल्याप्रमाणें निष्काम कर्म आणि भक्ति यांचाही उल्लेख आणिलाच आहे.

एथवर अध्यायांच्या व विषयांच्या अनुक्रमानें मीं या कृष्णार्जुनसंवादाचा प्रायः अनुवादच केला आहे. मूळचा अभिप्राय कोठें संक्षेपानें, कोठें सविस्तर, जसा अवश्य वाटला तसा सांगितला आहे. एवढ्यावरून या संवादाचें सामान्य स्वरूप बहुतकरून श्रोत्यांच्या लक्षांत आलेंच असेल. परंतु हा संवाद प्रायः अध्यात्मविषयक असल्यामुळें, व मुख्य विषयांवर प्रश्नोत्तर रूपानें पुनः पुनः विवेचन झाल्यामुळें, व मीं पूर्वी सुचविल्याप्रमाणें ग्रंथकर्त्यास प्रत्येक प्रसंगीं, कर्म, उपासना, व ज्ञान, या तीनही मोक्षमार्गांचा समुच्चय करणें इष्ट असल्यामुळें, थोडक्यांत सुबोध रीतीनें या समग्र शास्त्राचें तात्पर्य सप्रमाण सांगणें अवश्य दिसतें; म्हणून हा पुढील भाग लिहिला आहे.

वरील सर्व विषय ज्यांनीं लक्षपूर्वक ऐकिला असेल, त्यांस गीताग्रंथ आर्यधर्मसारभूत आहे, असें वाटल्यावांचून राहिलें नसेल. तथापि तो शास्त्रत्वेंकरून प्रमाणभूत मानण्यास काय आधार आहे, याचा विचार करणें अगत्याचें आहे. कारण बोध उत्तम असला, तरी त्यास प्राचीन संप्रदायानुसार सप्रमाणत्व नसलें, तर सर्वांस तो अवश्य ग्राह्य होणार नाहीं. यास्तव हा ग्रथ शास्त्रत्वेंकरून प्रमाणभूत कसा आहे, याचा आपण विचार करूं.

ज्यांस कृष्ण हा भगवंताचा अवतार आहे ही गोष्ट प्रमाणभूत वाटत आहे, त्यांस इतकेंच सांगणें पुरे आहे कीं, या ग्रंथांत साक्षात् श्रीकृष्णानें आपला अत्यंत प्रिय भक्त जो अर्जुन, त्यास हा परमार्थबोध परम अनुग्रहपूर्वक व आदरपूर्वक केला आहे. तेव्हां सर्व शास्त्रांस आदिभूत जे वेद, त्यांस जें प्रमाण आहे, तेंच या गीताशास्त्रास आहे. तें साक्षात् भगवद्-उक्ति हें होय.

दुसरें प्रमाण हें कीं, भगवद्गीता ही निबंधाच्या उपक्रमीं सांगितल्याप्रमाणें श्रुतिसारभूत आहे. अतएव ज्या प्रमाणांनीं श्रुति प्रमाणभूत व मान्य आहे, तींच प्रमाणें भगवद्गीतेचें सप्रमाणत्व प्रतिपादन करितात. हें सिद्ध करण्याकरितां उपनिषद्भाग जे सर्वश्रुतिशिरोभूत म्हणजे मुख्य स्थानीं मानिले आहेत, त्यांतील गीतेंत सांगितलेल्या मुख्य प्रतिपाद्य विषयांविषयीं कांहीं वचनें सांगतों. कर्माविषयीं भगवद्गीतेचें एकंदर तात्पर्य हेंच होय, कीं कांहीं कर्में अवश्य कर्तव्य आहेत; तीं तीन,—यज्ञ, दान, आणि तप. कर्माचें फळ नाशिवंत म्हणून तीं योगसाधनानें म्हणजे निष्कामबुद्धीनें इंद्रियजयपूर्वक व मनोजयपूर्वक करावीं. त्यांपैकीं कर्तव्यकर्मे अवश्य केलीं पाहिजेत. परंतु तीं निष्काममतीनें व ईश्वरार्पणबुद्धीनें करावीं. याविषयीं हें पुढील वचन प्रमाणभूत आहे.

ईशावास्यमिदं सर्वं यत्किंच जगत्यां जगत् ।
तेन त्यक्तेन भुंजीथा मा गृधः कस्यचिद्धनम् ॥ १ ॥

कुर्वन्नेवेह कर्माणि जिजीविषेच्छतं समाः ।
एवं त्वयि नान्यथेतोस्ति न कर्म लिप्यते नरे ॥ २ ॥
[ईशोपनिषद्. १ व २.]

तीं आवश्य कर्तव्यकर्मे तीन-यज्ञ, दान, तप, यांविषयीं हें पुढील वचन प्रमाणभूत आहे.

त्रयो धर्मस्कंधा यज्ञोऽध्ययनं दानमिति ।
(छांदोग्य, २.२३.)

म्ह०—धर्म हा वृक्ष कल्पिला, तर त्याच्या मुख्य खांद्या तीन होत;—यज्ञ, अध्ययन, व दान. यांत अध्ययन शब्दाचा अर्थ तप असें पुढें त्याच ब्राह्मणांत सांगितलें आहे.

कर्मफलाचें अनियतत्व मुंडकोपनिषदांत पुढील वचनांत सांगितलें आहे.—

प्लवा ह्येते अदृढा यज्ञरूपा
अष्टादशोक्तमवरं येषु कर्म।
एतच्छ्रेयो येऽभिनंदंति मूढा
जरा मृत्युं ते पुनरेवापि यंति ॥ १ ॥
अविद्यायामंतरे वर्तमानाः
स्वयं धीराः पंडितंमन्यमानाः ।
जघन्यमानाः परियंति मूढा
अंधेनैव नीयमाना यथांधाः ॥ २ ॥
अविद्यायां बहुधा वर्तमाना
वयं कृतार्था इत्यभिमन्यंति बालाः ।

यत्कर्मिणो न प्रवेदयंति रागात् ।
तेनातुरा क्षीणलोकाश्चवंते ॥ ३ ॥
इष्टापूर्तं मन्यमाना वरिष्ठं
नान्यच्छ्रेयो वेदयंते प्रमूढाः ।
नाकस्य पृष्ठे ते सुकृतेऽनुभूत्वे–
मं लोकं हीनतरं वा विशंति ॥ ४ ॥
(मुं० १, खं० २, मंत्र ७–१०)

तात्पर्य, जे लोक कर्मासक्त होऊन यज्ञयागादिकांचीं फलेंच श्रेयस्कर कारितात, व त्यांविषयींच आंधळ्याप्रमाणें एकमेकांस प्रेरणा करून त्यांतच गढून राहतात, ते तत्वज्ञान न झाल्यामुळें आपल्या कर्माचें नाशिवंत फल भोगून पुनः जन्ममरणाच्या फेऱ्यांत पडतात. कारण हीं वैदिक कर्मे भवसागर तरून जाण्यास बळकट नौका नव्हत.

आतां निष्काम कर्माचरणाविषयीं म्हणजे योग साधनाविषयीं हीं पुढील वचनें प्रमाणभूत आहेत.

त्रिरुन्नतं स्थाप्य समं शरीरं
हृदींद्रियाणि मनसा संनिवेश्य ।
ब्रह्मोडुपेन प्रतरेत विद्वान्
स्रोतांसि सर्वाणि भयावहानि ॥
प्राणान् प्रपीडयेह स युक्तचेष्टः
क्षीणे प्राणे नासिकयोच्छ्वसीत ।
दुष्टाश्वयुक्तमिव वाहमेनं

विद्वान् मनो धारयेताप्रमत्तः ॥
समे शुचौ शर्करावन्हिवालुका
विवर्जिते शब्दजलाश्रयादिभिः ।
मनोऽनुकूले न तु चक्षुपीडने
गुहानिवाताश्रयणे प्रयोजयेत् ॥
नीहारधूमार्कानिलानलानां
खद्योतविद्युत्स्फटिक शशिनां ।
एतानि रूपाणि पुरःसराणि
ब्रह्मण्यभिव्यक्तिकराणि योगे ॥
पृथ्व्याप्यतेजोऽनिलखे समुत्थिते
पंचात्मके योगगुणप्रवृत्ते ।
न तस्य रोगो न जरा न मृत्युः
प्राप्तस्य योगाग्निमयं शरीरं ॥
लघुत्वमारोग्यमलोलुपत्वं
वर्णप्रसादः स्वरसौष्ठवं च।
गंधः शुभो मूत्रपुरीषमल्पं
योगप्रवृत्तिं प्रथमां वदंति ॥
यथैव बिंबं मृदयोपलिप्तं
तेजोमयं भ्राजते तत्सुधांतं ।
तद्वात्ममतत्वं प्रसमीक्ष्यतेहि
एकः कृतार्थो भवते वीतशोकः ॥
यदात्मतत्त्वेन तु ब्रह्मतत्त्वं
दीपोपमेनेह युक्तः प्रपश्येत् ।

अजं ध्रुवं सर्वतत्त्वैर्विशुद्धं
ज्ञात्वा देवं मुच्यते सर्वपाशैः ॥
श्वेताश्वतर, अध्या० २, मं. ८–१५

तात्पर्य, योगसाधनानें निर्मल एकांत स्थळीं बसून, इंद्रियें व मन यांचा निग्रह करून, प्राणवृत्तींचा विरोध करून, पर-ब्रह्माचे ठायीं एकाग्रचित्त करून, त्याच्या ध्यानानें, व निदिध्यास नानें, व यथार्थज्ञानानें,निष्काम कर्में करणारा योगी मुक्त होतो.

दुसरें उपासनेविषयीं भगवद्गीतेचें तात्पर्य हें कीं, नाना अल्प दैवतांची उपासना ही ब्रह्मोपासना होत नाहीं. जी साक्षात् परमात्म्याची उपासना निष्काम मतीनें. तत्त्वज्ञानानें, भावयुक्त होऊन करावी, तीच शाश्वतफलदायिनी होते. नाना बाह्य देवतांच्या उपासनेविषयीं निषेध या पुढील वचनांत आहे.--

यद्वाचानभ्युदितं येन वागभ्युद्यते ।
तदेव ब्रह्म त्वं विद्धि नेदं यदिदमुपासते ॥
यन्मनसा न मनुते येनाहुर्मनो मतं ।
तदेव ब्रह्म त्वं विद्धि नेदं यदिदमुपासते ॥
यत्प्राणेन न प्राणिति येन प्राणः प्रणायते ।
तदेव ब्रह्म त्वं विद्धि नेदं यदिदमुपासते ॥
[सामवेदीय तलवकार उपनिषद्.
१खंड. मंत्र. ४.५,८,]

तात्पर्य, इंद्रियें आणि मन यांस अगोचर जें परमात्मतत्व, तेंच परब्रह्म, मुख्य उपास्य दैवत. जीं हीं बाह्य दैवतें लोकां-मध्यें आराधितात तीं ब्रह्मरूपी नव्हत.

तसेंच परमात्मोपासनेविषयीं प्रमाणभूत हीं पुढील वचनें आहेत.

धनुर्गृहीत्वौपनिषदं महास्त्रं
शरं ह्युपासानिशितं संधीयत ।
आयम्य तद्भावगतेन चेतसा
लक्ष्यं तदेवाक्षरं सौम्य विद्धि ॥
प्रणवो धनुः शरो ह्यात्मा ब्रह्म तल्लक्ष्यमुच्यते ।
अप्रमत्तेन वेद्धव्यं शरवत्तन्मयो भवेत् ॥
(२ रें मुं० २ रें खंड, मंत्र ३ व ४.)
स (विज्ञानात्मा) परे आत्मनि संप्रतिष्ठते ।
स वेदैतत्परमं ब्रह्मधाम
यत्र विश्वं निहितं भाति शुभ्रम् ।
उपासते पुरुषं येह्यकामा-
स्ते शुक्रमेतदतिवर्तंति धीराः ॥
(३ रें मुंडक, २रें खंड, मंत्र १.)

तात्पर्य—इंद्रियजयपूर्वक व मनोजयपूर्वक उपनिषदोक्त ओंकार नामाचे योगानें सर्व विश्वाधार परब्रह्माचें स्मरण करून, आत्मा उपासनेनें त्याविषयीं अत्यंत आदरयुक्त करून, भावयुक्त चित्तानें त्यास शरण जाऊन, त्याचे स्वरूपीं लीन व्हावें, म्हणजे मोक्षपदाची प्राप्ती होते.

आतां गीतेंतील तिसरा प्रतिपाद्य विषय ज्ञानमार्ग. तें ज्ञान जीवात्म्याविषयीं, जगाविषयीं, आणि परमात्म्याविषयी.

त्यापैकीं जीवात्म्याचें यथार्थ स्वरूप या पुढील वचनांत सांगितलें आहे.

न जायते म्रियते वा विपश्चित्
नायं कुतश्चिन्न बभूव कश्चित् ।
अजो नित्यः शाश्वतोऽयं पुराणो
न हन्यते हन्यमाने शरीरे ।।
हंता चेन्मन्यते हंतुर्हतश्चेन्मन्यते हतं ।
उभौ तौ न विजानीतो नायं हंति न हन्यते ॥
(कठ उप०, वल्ली २, मंत्र १८–१९.)

तात्पर्य—आत्मा जन्ममरणहीन अविताशी असून शरीर-नाशानें नाश पावत नाहीं. हेच दोन श्लोक एखाद दुसऱ्या-शब्दाच्या फरकानें भगवद्गीतेच्या२ ऱ्या अध्यायांत जीवात्म-स्वरूपवर्णनप्रसंगीं सांगितले आहेत.

आतां शरीरादि सर्व जगाचें क्षणिकत्व या पुढील वचनांत सांगितलें आहे.

श्वोभावामर्त्यस्य यदंतकैत–
त्सर्वेंद्रियाणां जरयंति तेजः
अपि सर्वं जीवितमल्पमेव ....

(कठ, वल्ली १, मंत्र २६,)

म्हणजे, सर्व बाह्य विषय अत्यंत नाशिवंत होत. आज आहेत, परंतु उद्यां राहतील कीं नाहींत याचा भरंवसा नाहीं.

तिसरें ज्ञान परमात्मविषयक पुढील वचनांत सांगितलें आहे;—

कामस्याप्तिं जगतः प्रतिष्ठां
क्रतोरानंत्यमभयस्य पारं ।
स्तोमं महदुरुगायं प्रतिष्ठां दृष्ट्वा
धृत्या धीरो नचिकेतोऽत्यस्राक्षीः ११
तं दुर्दर्शं गूढमनुप्रविष्टं
गुहाहितं गह्वरेष्ठं पुराणं ।
अध्यात्मयोगाधिगमेन देवं
मत्वा धीरो हर्षशोकौ जहाति १२
एतच्छ्रुत्वा संपरिगृह्य मर्त्यः
प्रवृह्य धर्म्यमणुमेतमाप्य ।
स मोदते मोदनीयं हि लब्ध्वा
विवृतं सद्म नचिकेतसं मन्ये १३
सर्वे वेदा यत्पदमामनंति
तपांसि सर्वाणि च यद्वदंति ।
यदिच्छंतो ब्रह्मचर्यं चरंति
तत्ते पदं संग्रहेण ब्रवीमि १५

कठ. अ० १, २ री वल्ली.

अपाणिपादो जवनो गृहीता ।
पश्यत्यचक्षुः स शृणोत्यकर्णः ॥
स वेत्ति वेद्यं नच तस्यास्ति वेत्ता ।
तमाहुरग्र्यं पुरुषं महान्तम् ॥ १ ॥

म्ह०—परमात्मप्राप्ति हीच जीवाची उत्तम स्थिति, तेंच कर्माचें अविनाश फल, तेंच निर्भय स्थान, भवसागराचें पैल तीर, तें ज्ञानेंकरून ज्ञानी जाणतो. परमात्मा बाह्येंद्रियांस अगोचर, अत्यंत सूक्ष्मरूप, अनादि, अनंत होय. ज्याचे पदाची प्राप्ति ही सर्व वेदांमध्यें उत्तम गति म्हणून सांगितली आहे, ज्याच्या प्राप्त्यर्थ तपस्वी तप करितात आणि ब्रह्मचारी ब्रह्मचर्य आचरितात, तोच परमात्मा; त्याचीच प्राप्ति म्हणजे मोक्ष होय.

आतां ज्ञानप्राप्तीचीं साधनें या पुढील वचनांत सांगितलीं आहेत. इंद्रियनिग्रह व मनोनिग्रह;—

आत्मानं रथिनं विद्धि शरीरं रथमेव तु ।
बुद्धिं तु सारथिं विद्धि मनः प्रग्रहमेव च ॥ ३ ॥
इंद्रियाणि हयानाहुर्विषयांस्तेषु गोचरान् ।
आत्मेंद्रियमनोयुक्तं भोक्तेत्याहुर्मनीषिणः ॥ ४ ॥
यस्तु विज्ञानवान् भवति युक्तेन मनसा सदा ।
तस्येंद्रियाणि वश्यानि सदश्वा इव सारथेः ॥ ६ ॥
यस्तु विज्ञानवान् भवति समनस्कः सदा शुचिः
स तु तत्पदमाप्नोति यस्माद्भूयो न जायते ॥ ८ ॥
विज्ञानसारथिर्यस्तु मनःप्रग्रहवान् नरः ।
सोऽध्वनः पारमाप्नोति तद्विष्णोः परमं पदं ॥ ९ ॥

(कठ० अ० १ वल्ली ३)

ज्ञानिसेवा व तत्त्वोपदेश;—

परीक्ष्य लोकान् कर्मचितान् ब्राह्मणो
निर्वेदमायन् नास्त्यकृतः कृतेन ।
तद्विज्ञानार्थं स गुरुमेवाभिगच्छेत्
समित्पाणिः श्रोत्रियं ब्रह्मनिष्ठं ॥
(मुं० १, खं २. १२वें गद्य.)
तस्मै स विद्वान् उपसन्नाय सम्यक्
प्रशान्तचित्ताय क्षमान्विताय ॥
येनाक्षरं पुरुषं वेद सत्यं
प्रोवाच तां तत्त्वतो ब्रह्मविद्यां ॥

तत्वशुद्धि;—

न चक्षुषा गृह्यते नापि वाचा
नान्यैर्देवैस्तपसा कर्मणा वा ।
ज्ञानप्रसादेन विशुद्धसत्व-
स्ततस्तु तं पश्यते निष्फलं ध्यायमानः ॥

आतां जीवात्मा, परमात्मा, व जग यांचें यथार्थ स्वरूप जाणून ईश्वरभक्ति केली असतां सर्व पापांची आणि दुःखांची निवृत्ति होते. हें श्वेताश्वतरोपनिषदांत पहिल्या अध्यायांत पुढील मंत्रांत सांगितलें आहेः—

ज्ञाज्ञौ द्वावजावीशानीशा-
वजा ह्येका भोक्तृभोग्यार्थयुक्ता ।
अनंतश्चात्मा विश्वरूपो ह्यकर्ता

त्रयं यदा विन्दते ब्रह्ममेतत् ॥ ९ ॥
क्षरं प्रधानममृताक्षरं हरः
क्षरात्मानावीशते देव एकः ।
तस्याभिध्यानाद्योजनात्तत्त्वभावात् ।
भूयश्चान्ते विश्वमायानिवृत्तिः ॥ १० ॥
ज्ञात्वा देवं सर्वपाशापहानिः
क्षीणैः क्लेशैर्जन्ममृत्युप्रहाणिः ॥ ११

याप्रमाणें हें गीताशास्त्र पूर्णत्वेंकरून उपनिषन्मूलक आहे हें त्याच्या सप्रमाणत्वाविषयी दुसरें प्रमाण जाणावें.

तिसरें प्रमाण हें कीं, सर्व कल्याणसाधक जो धर्म तो या ग्रंथांत परम श्रेष्ठ मानिला आहे. कारण त्याची संस्थापना करण्याकरितां व धार्मिक जनांचें रक्षण करण्याकरितां आपण वेळोवेळीं अवतार धारण करितों असें श्रीकृष्णानें पुढील वचनांत सांगितलें आहेः---

परित्राणाय साधूनां विनाशाय च दुष्कृताम् ।
धर्मसंस्थापनार्थाय संभवामि युगे युगे ॥
अ० ४, श्लोक० ८

परंतु ज्यांस अवतारकथा पूर्णत्वेंकरून किंवा साधारण जनांचे अभिप्रायानुसारें अभिमत नाहींत, त्यांसही हा बोध अत्यंत प्रमाणभूत मानण्यास कांहीं अडचण नाहीं. कारण ऐहिक आमुष्मिक कल्याणाचीं जीं साधनें यांत सांगितलीं आहेत, तीं सर्वांस अत्यंत ग्राह्य होण्यास योग्य आहेत. या दो-

न्ही प्रकारच्या जनांचें समाधान होण्याकरितां पूर्वोक्त संवादाचें तात्पर्य सप्रमाण सांगतों.

सर्व धर्मशोधक देशांतील लोकांप्रमाणें आमच्या देशांतील लोकांत कर्म, उपासना व ज्ञान हे तीन भिन्नत्वेंकरून किंवा समुच्चयें करून कल्याणाचे मार्ग असें मानितात. गीताशास्त्राच्या कर्त्यास या तिहींचा समुच्चयच श्रेयस्कर हें अभिमत आहे. तें स्थापन करण्याकरितां प्रथम कर्ममार्गाचें निरूपण करितों. कर्माचा सर्वथा त्याग अशक्य, अनावश्यक, व अकल्याणकारक आहे, असें तिसऱ्या अध्यायांत सांगितलें आहे. यास पुढील वचनें प्रमाणभूत आहेत;-

नियतं कुरु कर्म त्वं कर्म ज्यायो ह्यकर्मणः ।
शरीरयात्रापि च ते न प्रसिद्धेदकर्मणः ॥ १९
कर्मणैव हि संसिद्धिमास्थिता जनकादयः ।
लोकसंग्रहमेवापि संपश्यन् कर्तुमर्हसि ॥ २०
यद्यदाचरति श्रेष्ठस्तत्तदेवेतरो जनः ।
स यत्प्रमाणं कुरुते लोकस्तदनुवर्तते ॥ २१ ॥
न मे पार्थास्ति कर्तव्यं त्रिषु लोकेषु किंचन ।
नानवाप्तमवाप्तव्यं वर्त एव च कर्मणि ॥ २२ ॥
उत्सीदेयुरिमे लोका न कुर्यां कर्म चेदहं ।

कृष्ण अर्जुनास म्हणतो—" कर्मावांचून प्राणधारणही होणार नाहीं, आणि कर्म करूनच जनकादिक योगी मुक्त झाले. लोकस्थिति रक्षण करण्याकरितांही कर्तव्यकर्माचरण केलें पा-

हिजे. मी निष्काम असतांही कर्म करितों. तें न करीन तर सर्व जनांचा नाश होईल."

याप्रमाणें कर्म करण्याची आवश्यकता सांगून, वैदिककर्म-फलें नाशिवंत आहेत, अतएव मुमुक्षूनें त्यांची इच्छा न धरितां लाभ हानि समान मानून योगसाधनानें कर्तव्यकर्म आचरण करावें, असें दुसऱ्या अध्यायांत या पुढील दोन श्लोकांत सांगितलें आहे;—

कर्मण्येवाधिकारस्ते मा फलेषु कदा च न ।
मा कर्मफलहेतुर्भूर्मा ते संगोस्त्वकर्मणि ॥ ४७ ॥
योगस्थः कुरु कर्माणि संगं त्यक्त्वा धनंजय ।
सिद्ध्यसिद्ध्योः समो भूत्वा समत्वं योग उच्यते ॥४८

आतां जें कर्म अवश्य आचरण केलें पाहिजे तें ईश्वारार्पण-बुद्धीनें म्हणजे ईश्वरभक्तिपूर्वक करावें असें या पुढील चार श्लोकांत सांगितलें आहे.

युक्त आसीत मत्परः अ० २, श्लो० ६१.
मयि सर्वाणि कर्माणि संन्यस्याध्यात्मचेतसा ।
निराशीर्निर्ममो भूत्वा युध्यस्व विगतज्वरः ॥
अ० ३, श्लो० ३०.
मनः संयम्य मच्चितो युक्त आसीत मत्परः ।
अ० ६, श्लो० १४.
सर्वभूतस्थितं यो मां भजत्येकत्वमास्थितः ।
सर्वथा वर्तमानोपि स योगी मयि वर्तते ॥
अ० ६, श्लो० ३१.

तसेंच कर्तव्यकर्म ज्ञानपूर्वक करावें असें चवथे अध्यायांत पुढील श्लोकांत सांगितलें आहे;—

श्रेयान् द्रव्यमयाद्यज्ञाज्ज्ञानयज्ञः परंतप ।
सर्वं कर्माखिलं पार्थ ज्ञाने परिसमाप्यते ॥ ३३ ॥

तसेंच जें कर्म करणें तें सात्विक भावानें श्रेयस्कर करणें आहे. असें या पुढील श्लोकांत सांगितलें आहे;—

अफलाकांक्षिभिर्यज्ञो विधिदृष्टो य इज्यते ।
यष्टव्यमेवेति मनः समाधाय स सात्विकः ॥ ११ ॥
अ० १७.

नियतं संगरहितं अरागद्वेषतः कृतं ।
अफलप्रेप्सुना कर्म यत्तत्सात्विकमुच्यते ॥ २३ ॥
अ० १८.

तसेंच जें कर्म करावयाचें तें श्रद्धापूर्वक म्हणजे आस्तिक्यबुद्धीनें करावें, तसें न केलें असतां तें निरर्थक होय, असें या पुढील श्लोकांत सांगितलें आहे;—

अश्रद्धया हुतं दत्तं तपस्तप्तं कृतं च यत् ।
असदित्युच्यते पार्थ न च तत्प्रेत्य नो इह ॥ २८ ॥
अ० १७.

एथवर कर्म अवश्य करावें, व तें कसें करावें, याविषयीं विचार झाला. परंतु कर्मे अनेक सांगितलीं आहेत. तीं सर्व करूं लागलें असतां भक्ति, ज्ञान इत्यादि जीं इतर परमार्थसाधनें तीं तशींच राहतील. अतएव अवश्य कर्तव्यकर्मे तीन,—

यज्ञ, दान, तप, असें १८ वे अध्यायांत पुढील श्लोकांत सांगितलें आहे;—

यज्ञदानतपः कर्म न त्याज्यं कार्यमेव तत् ।
यज्ञो दानं तपश्चैव पावनानि मनीषिणाम् ॥ ५ ॥

पण यज्ञही चवथ्या अध्यायांत अनेकविध सांगितले आहेत. [श्लो० २४—३२] त्यांपैकीं अवश्य कर्तव्य यज्ञ कोणता हा प्रश्न सहजच येतो. त्यास उत्तर तेथेंच पुढील श्लोकांत सांगितलें आहे;—

श्रेयान् द्रव्यमयाद्यज्ञाज्ज्ञानयज्ञः परंतप ।
सर्वं कर्माखिलं पार्थ ज्ञाने परिसमाप्यते ॥ ३३ ॥

म्हणजे—पशु, दही, दूध, तूप, समिधा, धान्य इत्यादि द्रव्यसाध्य यज्ञांपेक्षां ज्ञानयज्ञ विशेष श्रेयस्कर होय. कारण त्या यज्ञानें सर्व इतर यज्ञांचें श्रेय येतें.

याच ज्ञानयज्ञास १० वे अध्यायांत विभूतिवर्णनसमयीं जपयज्ञ हें नांव दिलें आहे;—

यज्ञानां जपयज्ञोऽस्मि ॥ २५ ॥

परंतु ज्ञानयज्ञ म्हणजे काय व जप कोणाचा करावा हें सांगणें अवश्य आहे, तें पांचवे अध्यायांत पुढील श्लोकांत सांगितलें आहे;—

भोक्तारं यज्ञतपसां सर्वलोकमहेश्वरं ।
सुहृदं सर्वभूतानां ज्ञात्वा मां शांतिमृच्छति ॥ २९ ॥

आतां पूर्वोक्त तीन अवश्य कर्तव्यकर्मांत दुसरें कर्म दान,

तें कसें करावें असें सांगून त्याचें लक्षण पुढील श्लोकांत सांगितलें आहे;—

दातव्यमिति यद्दानं दीयतेऽनुपकारिणे ।
देशे काले च पात्रे च तद्दानं सात्विकं स्मृतं ॥
अ० १७, श्लो० २०.

म्हणजे, जें दान अवश्य कर्तव्य म्हणून काळ, देश, आणि पात्र, यांचा विचार करून आपल्या उपयोगीं कधीं पडलेला नाहीं अशाला द्यावं, तें खरें सात्विक दान असें मानिलें आहे.

तिसरें कर्म तप, तें सात्विक व श्रद्धायुक्त असून तीन प्रकारचें असावें, म्हणून १७ वे अध्यायांत पुढील श्लोकांत सांगितलें आहे;—

देवद्विजगुरुप्राज्ञपूजनं शौचमार्जवं ।
ब्रह्मचर्यमहिंसा च शारीरं तप उच्यते ॥ १४ ॥
अनुद्वेगकरं वाक्यं सत्यं प्रियहितं च यत् ।
स्वाध्यायाभ्यसनं चैव वाङ्मयं तप उच्यते ॥ १५ ॥
मनःप्रसादः सौम्यत्वं मौनमात्मविनिग्रहः ।
भावसंशुद्धिरित्येतत्तपो मानसमुच्यते ॥ १६ ॥
श्रद्धया परया तप्तं तपस्तत् त्रिविधं नरैः ।
अफलाकांक्षिभिर्युक्तैः सात्विकं परिचक्षते ॥ १७ ॥

या पूर्वोक्त तीन प्रकारच्या कर्मांविषयीं एकंदरीनें विचार केला असतां, यांत आपल्या सर्व कर्तव्यकर्मांचा अंतर्भाव होतो, असें स्पष्ट ध्यानांत येईल. आपलीं कर्तव्यकर्मे तीन प्रका-

रचीं होत. आत्मविषयक, परविषयक, आणि ईश्वरविषयक. या तिन्ही प्रकारच्या कर्तव्यकर्मांचा समावेश यज्ञ, दान, तप, यांत होतो. यज्ञ म्हणजे श्रद्धाभक्तिज्ञानपूर्वक ईश्वराचें आराधन, असाच या शास्त्राचा एकंदरीनें अभिप्राय आहे. आणि हेंच ईश्वराविषयीं आपलें मुख्य कर्तव्य. आतां इतरांविषयीं आपलें कर्तव्य म्हटलें म्हणजे—आपलेकडून होईल तितका त्यांजवर उपकार करणें, त्यांशीं प्रामाणिकपणानें. आदरानें, आणि प्रेमानें वर्तणें. आणि कायावाचामनेंकरून त्यांस यत्किंचित्ही पीडा न होई अशा रीतीनें वागणें, हें होय. कारण, अशा रीतीनें आपण वर्तलों असतां इतरांस आपल्यापासून खरें सुख प्राप्त होईल आणि दुःख होणार नाहीं. आतां या परविषयक कर्तव्यकर्माचा दान आणि तप यांत संग्रह केला आहे. दान म्हणजे परोपकार; आणि तपांत या पुढील कर्तव्यकर्मांचा अंतर्भाव होतोः—द्विज, गुरु आणि प्राज्ञ यांचा सत्कार व त्यांजविषयीं पूज्य बुद्धि; आर्जव म्हणजे मनाच्या अभिप्रायाप्रमाणें आपली चर्या ठेवून लोकांपासून आपलें खरें स्वरूप न लपविणें, परस्त्रीपासून निवृत्त असणें, किंवा ब्रह्मचर्यानें राहणें; इतर प्राण्याला कोणच्याही प्रकारें पीडा न देणें; प्रिय, हितकारक, व सत्य असेंच त्यांजपाशीं भाषण करणें; हींच दुसऱ्यास उद्देशून आपली कर्तव्यकर्मे होत. आतां आपल्यास उद्देशून आपलीं कर्तव्यकर्मेंही या वरील तीन कर्मांत येतात. तीं अशीं. शरीर व वस्त्रप्रावर्ण इत्यादिक निर्मळ ठेवणें; नैष्ठिक ब्रह्मचर्यानें किं-

वा गृहस्थाश्रम केला असतां स्वस्त्रीचे ठायींच नेमस्तपणानें रत असणें; हें आपल्या शरीराविषयीं आपलें कर्तव्य. कारण असें वर्तलें असतां आपलें शरीर शुचिर्भूत, बलिष्ठ, तेजस्वी, निरोगी. अतएव सुखकारक असें राहतें. आणि सदैव सत्य, प्रिय, व कल्याणकारक भाषण करून शास्त्राध्यायन करणें, हेंच आपल्या वाणीविषयीं आपलें कर्तव्य होय. अशा प्रकारें वाणीचा उपयोग केला असतां तिजपासून आपल्यास सुखच होईल; दुःख कधीं होणार नाहीं. आणि सदैव सुप्रसन्न, शांत, विचारशील असें मन ठेवणें, मनाच्या सर्व विकारांचा निग्रह करून, सर्व भावना शुद्ध ठेवणें, हें आपल्या मनाविषयीं आपलें कर्तव्य होय. कारण याच रीतीनें आपलें मन समाधानयुक्त व सुखकारक राहील. याप्रमाणें शरीर,वाणी व मन सुखावह झालीं, म्हणजे आत्म्यास सुखच होणार; आणि आपलेकडून पूर्वी सांगितल्याप्रमाणें ईश्वरविषयक आणि परविषयक कर्तव्यकर्मेही घडत असलीं म्हणजे आपल्यास इहलोकीं व परलोकींही सुखाचीच प्राप्ति होणार.

हीं यज्ञ, दान, तप, तीन कर्मे अत्यंत आवश्यक, हें वरील विवरणावरून स्पष्ट ध्यानांत आलेंच असेल. तींच फलाशा सोडून ईश्वरार्पणबुद्धीनें, व सर्वत्रांचे ठायीं समान मति ठेवून, लाभ हानि इत्यादिकांविषयीं अनासक्त राहून, करणें यालाच कर्मयोग किंवा योग असें म्हटलें आहे. योग्याचें स्वरूप दुसरे अध्यायांत या पुढील श्लोकांत वर्णिलें आहे;—

प्रजहाति यदा कामान् सर्वान् पार्थ मनोगतान् ।
आत्मन्येवात्मना तुष्टः स्थितप्रज्ञस्तदोच्यते ॥ ५५ ॥
दुःखेष्वनुद्विग्नमनाः सुखेषु विगतस्पृहः ।
वीतरागभयक्रोधः स्थितधीर्मुनिरुच्यते ॥ ५६ ॥
यः सर्वत्रानभिस्नेहस्तत्तत्प्राप्य शुभाशुभं ।
नाभिनंदति न द्वेष्टि तस्य प्रज्ञा प्रतिष्ठिता ॥ ५७ ॥
यदा संहरते चायं कूर्मोऽगानीव सर्वशः ।
इंद्रियाणींद्रियार्थेभ्यस्तस्य प्रज्ञा प्रतिष्ठिता ॥ ५८ ॥
या निशा सर्व भूतानां तस्यां जागर्ति संयमी ।
यस्यां जाग्रति भूतानि सा निशा पश्यतो मुनेः ॥ १ ॥

अशा प्रकारचा योग होण्यास इंद्रियनिग्रह व मनोनिग्रह हींच दोन मुख्य साधनें आहेत. त्यांत इंद्रियनिग्रहाचें स्वरूप दुसरे अध्यायांत पुढील श्लोकांत वर्णिलें आहे;—

यदा संहरते चायं .... ॥ ५८ ॥
विषया विनिवर्तंते निराहारस्य देहिनः ।
रसवर्जं रसोऽप्यस्य परं दृष्ट्वा निवर्तते ॥ ५९ ॥
यततोह्यपि कौंतेय पुरुषस्य विपश्चितः ।
इंद्रियाणि प्रमाथीनि हरंति प्रसभं मनः ॥ ६० ॥
तानि सर्वाणि संयम्य युक्त आसीत मत्परः ।

तसेंच तिसरे अध्यायांत या पुढील श्लोकांत हेंच सांगितलें आहे;—

इंद्रियाणि पराण्याहुरिंद्रियेभ्यः परं मनः ।

मनसस्तु परा बुद्धिर्यो बुद्धेः परतस्तु सः ॥ ४२ ॥
एवं बुद्धेः परं बुध्वा संस्तभ्यात्मानमात्मना ।
जहि शत्रुं महाबाहो कामरूपं दुरासदं ॥ ४३ ॥

तसेंच मनास विषयासक्ति कशी होते हें पुढील श्लोकांत वर्णून पुढें तिचें निवारण कसें करावें हेंही सांगितलें आहे;

ध्यायतो विषयान् पुंसः संगस्तेषूपजायते ।
संगात्संजायते कामः कामात्क्रोधोऽभिजायते ॥ ६२
क्रोधाद्भवति संमोहः संमोहात्स्मृतिविभ्रमः ।
स्मृतिभ्रंशाद्बुद्धिनाशो बुद्धिनाशात्प्रणश्यति ॥ ६३ ॥
विहाय कामान् यः सर्वान् पुमांश्चरति निस्पृहः ।
निर्ममो निरहंकारः सशांतिमधिगच्छति ॥ ७१ ॥

अध्याय २

संकल्पप्रभवान् कामांस्त्यक्त्वा सर्वानशेषतः ।
मनसैवेंद्रियग्रामं विनियम्य समंततः ॥ २४ ॥
शनैःशनैरुपरमेद्बुद्ध्या धृतिगृहीतया ।
आत्मसंस्थं मनः कृत्वा न किंचिदपि चिंतयेत् ॥२५॥
यतो यतो निश्चरति मनश्चंचलमस्थिरं ।
ततस्ततो नियम्यैतदात्मन्येव वशं नयेत् ॥ २६ ॥

अध्याय ६.

अशा रीतीनें योगसाधनपूर्वक पूर्वोक्त त्रिविधकर्मांचें आचरण केलें असतां जी उत्तम सुखाची स्थिति प्राप्त होते तिचें वर्णन ६ वे अध्यायांत पुढील श्लोकांत केलें आहेः—

यत्रापरमते चित्तं निरुद्धं योगसेवया ।
यत्र चैवात्मनात्मानं पश्यन्नात्मनि तुष्यति ॥ २० ॥
सुखमात्यंतिकं यत्तद्बुद्धिग्राह्यमतींद्रियं ।
वेत्ति यत्र नचैवायं स्थितश्चलति तत्त्वतः॥ २१॥
यं लब्ध्वा चापरं लाभं मन्यते नाधिकं ततः ।
यस्मिन्स्थितो न दुःखेन गुरुणापि विचाल्यते ॥ २२ ॥
तं विद्यादुःखसंयोगवियोगं योगसंस्थितं ।
स निश्चयेन योक्तव्यो योगोऽनिर्विण्णचेतसा ॥ २३ ॥

अशा स्थितीच्या प्राप्तीकरितां इहजन्मीं योगसाधन पूर्ण झालें नाहीं तरी केलेलें सत्कर्माचरण व्यर्थ होत नाहीं. पुढें परंपरेनें तें परिपूर्ण होऊन पूर्वोक्त उत्तमसुखाची स्थिति प्राप्त होते, असें ६ वे अध्यायांत सांगितलें आहे.

पार्थ नैवेह नामुत्र विनाशस्तस्य विद्यते ।
नहि कल्याणकृत्कश्चिद्दुर्गतिं तात गच्छति ॥ ४० ॥
प्राप्य पुण्यकृतांल्लोकानुषित्वा शाश्वतीः समाः ।
शुचीनां श्रीमतां गेहे योगभ्रष्टोऽभिजायते ॥ ४१ ॥
अथवा योगिनामेव कुले भवति धीमतां ।
एतद्धि दुर्लभतरं लोके जन्म यदीदृशं ॥ ४२ ॥
तत्र तं बुद्धिसंयोगं लभते पौर्वदेहिकं ।
यतते च ततो भूयः संसिद्धौ कुरुनंदन ॥ ४३ ॥
प्रयत्नाद्यतमानस्तु योगी संशुद्धकिल्बिषः ।
अनेकजन्मसंसिद्धस्ततो याति परां गतिं ॥ ४४ ॥

एथवर ऐहिक व पारलोकिक कल्याणाचे जे तीन मार्ग त्यांपैकीं पहिल्या म्हणजे कर्ममार्गाचा विचार झाला. आतां दुसऱ्या म्हणजे उपासनामार्गाचा विचार करूं.

लोकांत उपासना, म्हणजे ईश्वराची भक्ति, चार प्रकारची आहे. कोणी दुःख प्राप्त झालें असतां ईश्वराचे भक्तीस लागतात. कोणी ज्ञानप्राप्तीसाठीं भक्ति करितात. कोणी इहलोकीं नानाप्रकारचीं सुखें मिळावीं व पुढेंही नानाप्रकारचीं स्वर्गसुखें प्राप्त व्हावीं म्हणून ईश्वरभक्ति करितात. आणि कोणी ईश्वराचें पूर्ण स्वरूप ओळखून त्याची प्राप्ति हीच उत्तम गति असें मानून त्याची भक्ति करितात. हें, व चार प्रकारच्या भक्तींत शेवटील म्हणजे ज्ञानयुक्त भक्ति श्रेष्ठ, हें ७ वे अध्यायांत पुढील श्लोकांत सांगितलें आहे;—

चतुर्विधा भजंते मां जनाः सुकृतिनोऽर्जुन ।
आर्तो जिज्ञासुरर्थार्थी ज्ञानी च भरतर्षभ ॥ १६ ॥
तेषां ज्ञानी नित्ययुक्त एकभक्तिर्विशिष्यते ।
प्रियो हि ज्ञानिनोत्यर्थमहं सच मम प्रियः १७ ॥
उदाराः सर्व एवैते ज्ञानी त्वात्मैव मे मतं ।
आस्थितः सहि युक्तात्मा मामेवानुत्तमां गतिं ॥ १८ ॥

तसेंच नाना देवतांची उपासना करणें हें मूढाचें काम आहे. कारण त्यांपासून क्षुद्र व नाशिवंत फलें प्राप्त होतात, परंतु सद्गति प्राप्त होत नाहीं, हें पुढील श्लोकांत सांगितलें आहे;—

कामैस्तैस्तैर्हृतज्ञानाः प्रपद्यंतेऽन्यदेवताः ।

तं तं नियममास्थाय प्रकृत्या नियताः स्वया ॥ २० ॥
अंतवत्तु फलं तेषां तद्भवत्यल्पमेधसां ।
देवान् देवयजो यांति मद्भक्ता यांति मामपि ॥२३॥
अध्याय ७.

येऽप्यन्यदेवता भक्ता यजंते श्रद्धयान्विताः ।
तेऽपि मामेव कौंतेय यजंत्यविधिपूर्वकं ॥ २३ ॥
अहं हि सर्वयज्ञानां भोक्ता च प्रभुरेव च ।
न तु मामभिजानंति तत्त्वेनातश्च्यवंति ते ॥ २४ ॥
यांति देवव्रता देवान् पितॄन् यांति पितृव्रताः ।
भूतानि यांति भूतेज्या यांति मद्याजिनोऽपि मां॥२५॥
अध्याय ९.

केवळ साक्षात् परमेश्वराची भक्तीच श्रेयस्कर होय. असें पुढील श्लोकांत सांगितलें आहेः-

येषां त्वंतगतं पापं जनानां पुण्यकर्मणां ।
ते द्वंद्वमोहनिर्मुक्ता भजंते मां दृढव्रताः ॥ २८ ॥
अध्याय ७.

अनन्यचेताः सततं यो मां स्मरति नित्यशः ।
तस्याहं सुलभः पार्थ नित्ययुक्तस्य योगिनः ॥ १४ ॥
मामुपेत्य पुनर्जन्म दुःखालयमशाश्वतं ।
नाप्नुवंति महात्मानः संसिद्धिं परमां गताः ॥ १५ ॥
आब्रह्मभुवनाल्लोकाः पुनरावर्तिनोऽर्जुन ।
मामुपेत्य तु कौंतेय पुनर्जन्म न विद्यते ॥ १६ ॥
अध्याय ८.

परमेश्वरी भक्ति दृढ होण्याकरितां जगांतील सर्व वस्तू परमेश्वरानेंच निर्माण केल्या आहेत हें जाणून त्यांतील मुख्य मुख्य वस्तूंकडे लक्ष्य लावून त्यांचे योगानें त्यांचा कर्ता, नियंता, व प्रभु जो परमेश्वर त्याची आराधना करावी, हें १० वे अध्यायांत सांगून. ईश्वर या सर्व जगाचा आत्मा व हें सर्व जग त्याचें शरीर, हें विश्वरूपदर्शनप्रसंगानें ११ वे अध्यायांत सांगितलें आहे. ईश्वराची भक्ति कशी करावी याचा प्रकार पुढील श्लोकांत सांगितला आहेः—

महात्मानस्तु मां पार्थ दैवीं प्रकृतिमाश्रिताः ।
भजंत्यनन्यमनसो ज्ञात्वा भूतादिमव्ययं ॥ १३ ॥
सततं कीर्तयंतो मां यतंतश्च दृढव्रताः ।
नमस्यंतश्च मां भक्त्या नित्ययुक्ता उपासते ॥ १४ ॥
अनन्याश्चिंतयंतो मां ये जनाः पर्युपासते ।
तेषां नित्याभियुक्तानां योगक्षेमं वहाम्यहं ॥ २२ ॥
पत्रं पुष्पं फलं तोयं यो मे भक्त्या प्रयच्छति ।
तदहं भक्त्युपहृतमश्नामि प्रयतात्मनः ॥ २६ ॥
यत्करोषि यदश्नासि यज्जुहोषि ददासि यत् ।
यत्तपस्यसि कौंतेय तत्कुरुष्व मदर्पणं ॥ २७ ॥
मन्मना भव मद्भक्तो मद्याजी मां नमस्कुरु ।
मामेवैष्यसि युक्त्वैवमात्मानं मत्परायणः ॥ ३४ ॥

अ० ९

अहं सर्वस्य प्रभवो मत्तः सर्वं प्रवर्तते ।

इति मत्वा भजंते मां बुधा भावसमन्विताः ॥ ८ ॥
मच्चिता मद्गतप्राणा बोधयंतः परस्परं ।
कथयंतश्च मां नित्यं तुष्यंति च रमंति च ॥ ९ ॥

अ० १०.

ईश्वर सर्वजगत्कारण व सर्वजगन्नियंता असें पूर्णत्वेंकरून जाणून, शुद्ध अंतःकरण करून एकाग्रचित्तानें कायावाचामनोभावेंकरून त्यास शरण जावें. आपला प्राण, आपला आत्मा, सर्वस्वेंकरून त्यास अर्पण करावा. सतत त्यास आठवून त्याचें नामसंकीर्तन करावें, त्याचीं अनंत कृत्यें गावीं, त्याचे ठिकाणीं दृढभाव व दृढप्रेम ठेवावें, जें जें आपल्यास मिळेल तें तें त्यास निवेदन करून ग्रहण करावें, आणि आपण जें जें सत्कर्म आचरावें, तें तें त्यासच निवेदन करून त्याच्या कृपेनें तें कल्याणकारक व्हावें असें मागावें.

याप्रमाणें भक्तीचें स्वरूपनिरूपण करून ११ वे अध्यायांत विश्वरूपदर्शनप्रसंगानें अर्जुनानें परमेश्वराचें अपरिमेय स्वरूप पाहून अत्यंत पूज्य बुद्धीनें भावयुक्त आणि भक्तियुक्त होऊन नमस्कार, स्तव, इत्यादि प्रकारांनीं परमेश्वराची भक्ति कशी केली तें सांगून, वरील भक्तीचें एक ढळढळीत उदाहरणही दिलें आहे. [अ. ११ श्लो. १३–२०], आणि [श्लो. ३६–४४].

आतां कित्येक तत्त्ववेत्त्यांचा असा अभिप्राय आहे कीं, अत्यंत अपरिछिन्न, अत्यंत निर्गुण, अत्यंत अव्यक्त, असें जें जीवात्मा व परमात्मा या उभयतांचें केवल चित्स्वरूप त्याचीच

उपासना करावी. परंतु याविषयीं १२ वे अध्यायांत पुढील श्लोकांत असें सांगितलें आहे कीं, अत्यंत निर्गुण आत्मतत्त्वाची भक्ति मनुष्यांस दुष्कर आहे;—

क्लेशोऽधिकतरस्तेषामव्यक्तासक्तचेतसां ।
अव्यक्ता हि गतिर्दुःखं देहवद्भिरवाप्यते ॥ ५ ॥

अतएव सकलकल्याणगुणनिधान भगवान् परमात्मा याचीच भक्ति श्रेयस्कर होय. त्याच्याच भक्तीनें भवसागर तरून जातां येईल व त्याची प्राप्ति होईल हें पुढील श्लोकांत सांगितलें आहे;—

ये तु सर्वाणि कर्माणि मयि संन्यस्य मत्पराः ।
अनन्येनैव योगेन मां ध्यायंत उपासते ॥ ६ ॥
तेषामहं समुद्धर्ता मृत्युसंसारसागरात् ।
भवामि न चिरात्पार्थ मय्यावेशितचेतसां ॥ ७ ॥
मय्येव मन आधत्स्व मयि बुद्धिं निवेशय ।
निवसिष्यसि मय्येव अत ऊर्ध्वं न संशयः ॥ ८ ॥

अ. १२.

आतां ईश्वरभक्तीविषयीं अधिकार कोणास हा प्रश्न सहजच येतो. त्याविषयीं असें सांगितलें आहे कीं, भक्तीविषयीं मनुष्यमात्रास अधिकार आहे. परम उंच वर्ण जो ब्राह्मण, त्यापासून तों अति नीचयोनी जे चांडाल, त्यांपर्यंत सर्व मनुष्यें ईश्वरास समान असून सर्वांस आपापलीं व्यावहारिक कर्में करून ईश्वरभक्ति करण्यास अधिकार आहे; व सर्वही मनुष्यें, त्यांची

कोणतीही जात असो. ती पुरुष किंवा स्त्रिया असोत, ईश्वर-भक्तीनें पवित्र होऊन, ईश्वराप्रत जातात, हें पुढील श्लोकांत सांगितलें आहे;—

समोऽहं सर्वभूतेषु न मे द्वेष्योऽस्ति न प्रियः ।
ये भजंति तु मां भक्त्या मयि ते तेषुचाप्यहं ॥ २९ ॥
अपिचेत्सुदुराचारो भजते मामनन्यभाक् ।
साधुरेव स मंतव्यः सम्यग्व्यवसितो हि सः ॥ ३० ॥
क्षिप्रं भवति धर्मात्मा शाश्वच्छांतिं निगच्छति ।
कौंतेय प्रतिजानीहि न मे भक्तः प्रणश्यति ॥ ३१ ॥
मां हि पार्थ व्यपाश्रित्य येऽपि स्युः पापयोनयः ।
स्त्रियो वैश्यास्तथा शूद्रास्तेपि यांति परां गतिं ॥ २२ ॥

अ. ९.

यतः प्रवृत्तिर्भूतानां येन सर्वमिदं ततं ।
स्वकर्मणा तमभ्यर्च्य सिद्धिं विंदति मानवः ॥ ४६ ॥

अ. १८.

आतां ईश्वरभक्ति घडण्याचीं साधनें १२ वे अध्यायांत पुढील श्लोकांत सांगितलीं आहेत;—

अथ चित्तं समाधातुं न शक्नोषि मयि स्थिरं ।
अभ्यासयोगेन ततो मामिच्छाप्तुं धनंजय ॥ ९ ॥
अभ्यासेऽप्यसमर्थोऽसि मत्कर्मपरमो भव ।
मदर्थमपि कर्माणि कुर्वन् सिद्धिमवाप्स्यसि ॥ १० ॥
अथैतदप्यशक्तोऽसि कर्तुं मद्योगमाश्रितः ।

सर्वकर्मफलत्यागं ततः कुरु यतात्मवान् ॥ ११ ॥

तसेंच परमेश्वरास प्रियभक्त कोण हें १२ वे अध्यायांत श्लोक १३–१९. यांत सांगितलें आहे;––आणि भक्तीचें फल मृत्युसंसारतरण, पापनाश, व ईश्वरप्राप्ति हें पुढील स्थळीं सांगितलें आहे;—

तेषां सततयुक्तानां भजतां प्रीतिपूर्वकं ।
ददामि बुद्धियोगं तं येन मामुपयांति ते ॥ १० ॥
तेषामेवानुकंपार्थमहमज्ञानजं तमः ।
नाशयाम्यात्मभावस्थो ज्ञानदीपेन भास्वता ॥ ११ ॥

अ. १०.

येतु सर्वाणि कर्माणि मयि संन्यस्य मत्पराः ।
अनन्येनैव योगेन मां ध्यायंत उपासते ॥ ६ ॥
तेषामहं समुद्धर्ता मृत्युसंसारसागरात् ।
भवामि न चिरात्पार्थ मय्यावेशितचेतसां ॥ ७ ॥
मय्येव मन आधत्स्व मयि बुद्धिं निवेशय ।
निवसिष्यसि मय्येव अत ऊर्ध्वं न संशयः ॥ ८ ॥

अ. १२.

ईश्वरः सर्वभूतानां हृद्देशेऽर्जुन तिष्ठति।
भ्रामयन्सर्वभूतानि यंत्रारूढानि मायया॥६१॥
तमेव शरणं गच्छ सर्वभावेन भारत ।
तत्प्रसादात्परां शांतिं स्थानं प्राप्स्यसि शाश्वतं ॥६२॥
मन्मना भव मद्भक्तो मद्याजी मां नमस्कुरु ।

मामेवैष्यसि सत्यं ते प्रतिजाने प्रियोसि मे ॥ ६५ ॥
सर्वधर्मान् परित्यज्य मामेकं शरणं व्रज ।
अहं त्वा सर्वपापेभ्यो मोक्षयिष्यामि मा शुचः ॥६६ ॥
अ. १८.

एथवर मोक्षप्राप्तीचें दुसरें साधन जो भक्तिमार्ग त्याचें निरूपण झालें. आतां पूर्वोक्त तीन साधनांपैकीं राहिलेलें साधन ज्ञान त्याविषयीं विचार करूं. ज्ञानाचें लक्षण १३ वे अध्यायांत पुढील श्लोकांत सांगितलें आहेः—

अमानित्वमदंभित्वमहिंसा क्षांतिरार्जवं ।
आचार्योपासनं शौचं स्थैर्यमात्मविनिग्रहः ॥ ७ ॥
इंद्रियार्थेषु वैराग्यमनहंकार एव च ।
जन्ममृत्युजराव्याधिदुःखदोषानुदर्शनं ॥ ८ ॥
असक्तिरनभिष्वंगः पुत्रदारगृहादिषु ।
नित्यं च समचित्तत्वमिष्टानिष्टोपपत्तिषु ॥९ ॥
मयि चानन्ययोगेन भक्तिरव्यभिचारिणि ।
विविक्तदेशसेवित्वमरतिर्जनसंसदि ॥ १० ॥
अध्यात्मज्ञाननित्यत्वं तत्वज्ञानार्थदर्शनं ।
एतज्ज्ञानमिति प्रोक्तमज्ञानं यदतोऽन्यथा ॥ ११ ॥

म्हणजे दंभ, मान. अभिमान व हिंसा सोडणें; क्षमा, सरळता. चित्ताची स्थिरता, आत्मनिग्रह, विषयांविषयीं वैराग्य. सर्व संसार दुःखप्रद आहे अशी बुद्धि; स्त्री, पुत्र. संपत्ति इत्यादिकांविषयीं अनासक्ति;आणि बरी वाईट कशीही स्थिति

प्राप्त झाली तरी चित्तशांति राखणें, गुरुसेवा, आणि अनन्य-भावेंकरून ईश्वराची भक्ति करणें, जनसंसर्ग सोडून एकांतवास करणें. अध्यात्म विषयांचे व सत्याचे ज्ञानाविषयीं तत्पर असणें, हेंच खरें ज्ञान होय. सात्विकज्ञान कोणतें हें पुढील श्लोकांत सांगितलें आहेः—

सर्वभूतेषु येनैकं भावमव्ययमीक्षते ॥
अविभक्तं विभक्तेषु तज्ज्ञानं विद्धि सात्विकं ॥
अ. १८, श्लो. २०

म्हणजे, या नानाविध जगामध्यें व्यापक अविनाश तत्व परमात्मा एकच आहे असें जाणणें. यालाच सात्विक ज्ञान म्हणावें.

ज्ञानाचे विषय चार—(१) आपला आत्मा, (२) इतरांचे आत्मे, (३) सर्व जड सृष्टि. आणि (४) परमात्मा. त्यांत आत्म्याचें स्वरूप पुढील श्लोकांत सांगितलें आहेः—

अंतवंत इमे देहा नित्यस्योक्ताः शरीरिणः ।
अनाशिनोऽप्रमेयस्य तस्माद्युध्यस्व भारत ॥ १८ ॥
न जायते म्रियते वा कदाचि-
न्नायं भूत्वा भविता वा न भूयः ॥
अजो नित्यः शाश्वतोऽयं पुराणो
न हन्यते हन्यमाने शरीरे ।
नैनं छिंदंति शस्त्राणि नैनं दहति पावकः ।
न चैनं क्लेदयंत्यापो न शोषयति मारुतः ॥ २३ ॥

देहिनोऽस्मिन् यथा देहे कौमारं यौवनं जरा ।
तथा देहांतरप्राप्तिर्धीरस्तत्र न मुह्यति ॥ १३ ॥
अ. २.

म्हणजे आत्मा देह धारण करणारा, अविनाश व अमर असून शस्त्र, अग्नि, इत्यादिकांनीं त्याचा तिलमात्र नाश होत नाही. शरीरनाश झाला तरी त्याचा नाश नाहीं. इहजन्मींच बाल्य, तारुण्य, वार्धक्य, या भिन्नभिन्न अवस्था एकामागून एक आत्म्यास प्राप्त होतात, तथापि तो कायम राहतो; तद्वत् हा देहही मरणानें नष्ट झाला तरी आत्मा नाश न पावतां पुढील स्थितीप्रत जातो. असें सांगून, मरणाचें भय बाळगणें किंवा दुसरें कोणी मरण पावलें असतां त्याचा शोक करणें हें अज्ञान आहे, असें सुचविलें आहे.

आतां जसा आपला आत्मा तसेच इतरांचेही आत्मे. व जसें आपल्यास सुखःदुख तसेंच इतरांसही होतें, असें नित्य लक्षांत ठेवणें, हें इतरांच्या आत्म्यांविषयीं ज्ञान ६ वे अध्यायांत पुढील श्लोकांत सांगितलें आहेः—

आत्मौपम्येन सर्वत्र समं पश्यति योऽर्जुन ।
सुखं वा यदि वा दुःखं स योगी परमो मतः ॥३२॥

इतरांचे आत्म्यांविषयीं मुख्य ज्ञान हें. असें सांगण्याचा आशय हा कीं, जेणेंकरून दुसऱ्यास सुख होईल आणि दुःख होणार नाहीं, अशा रीतीनें आपण वर्तावें. हें परविषयक नीतीचें अगदीं रहस्यज्ञान, व सारभूत वचन आहे, असें कोणाच्याही ध्यानांत आल्यावांचून राहणार नाहीं.

आतां ज्ञानाचा तिसरा विषय शरीर व बाह्य जग, म्हणजे सर्व जडसृष्टि, यास क्षेत्र असें नांव १३ वे अध्यायांत श्लोक ५–६ यांत दिलें आहे.

ही सर्व जडसृष्टि नाशिवंत आहे. एतएव तिजपासून होणाऱ्या सुखाविषयीं अत्यंत आसक्ति असूं नये; व तिजपासून होणाऱ्या दुःखांची विशेष खंती वाटूं नये; हें पुढील श्लोकांत सांगितलें आहेः--

मात्रास्पर्शास्तु कौंतेय शीतोष्णसुखदुःखदाः ।
आगमापायिनोऽनित्यास्तांस्तितिक्षस्व भारत ॥ १४ ॥
अध्याय २.

द्वाविमौ पुरुषौ लोके क्षरश्चाक्षरएवच ।
क्षरः सर्वाणि भूतानि कूटस्थोऽक्षर उच्यते ॥ १६ ॥
अ. १५.

आतां ज्ञानाचा ४ थ। विषय परमात्मा, त्याचें स्वरूप या सर्व ग्रंथांत अनेक ठिकाणीं वर्णिलें आहे. त्यांतील कांहीं कांहीं स्थळें सांगतोः--

पिताऽहमस्य जगतो माता धाता पितामहः ॥ १७ ॥
गतिर्भर्ता प्रभुः साक्षी निवासः शरणं सुहृत् ।
प्रभवः प्रलयः स्थानं निधानं बीजमव्ययम् ॥ १८ ॥
अ. ९.

अहमात्मा गुडाकेश सर्वभूताशयस्थितः ।
अहमादिश्च मध्यंच भूतानामंत एवच ॥ २० ॥

यच्चापि सर्व भूतानां बीजं तदहमर्जुन ।
न तदस्ति विना यत्स्यान्मया भूतं चराचरं ॥ ३९ ॥
अथवा बहुनैतेन किं ज्ञानेन तवार्जुन ।
विष्टभ्याहमिदं कृत्स्नमेकांशेन स्थितो जगत् ॥ ४२ ॥
अ. १०.

याचप्रमाणें अ. १३, श्लो. १२ ते १७ आणि. अ. १५. श्लो. १५ ते १७ यांतही परमात्मस्वरूप वर्णिलें आहे.

ज्ञानप्राप्तीची साधनें मुख्यत्वेंकरून पांच सांगितलीं आहेत. तीं अशीं;–[१] ज्ञानी सेवा. [२] तत्त्वोपदेश. [३] श्रद्धा. [४] इंद्रियजय. [५] सत्ववृद्धि.

तद्विद्धि प्रणिपातेन परिप्रश्नेन सेवया ।
उपदेक्ष्यंति ते ज्ञानं ज्ञानिनस्तत्त्वदर्शिनः ॥ ३४ ॥
श्रद्धावाँल्लभते ज्ञानं तत्परः संयतेंद्रियः ॥ ३९ ॥
अ.४
सर्वद्वारेषु देहेऽस्मिन् प्रकाश उपजायते ॥
ज्ञानं यदा तदा विद्याद्विवृद्धं सत्वमित्युत ॥ ११ ॥
अ. १४.
सत्वात्संजायते ज्ञानं ... ... अ. १४. श्लो.१७

ज्ञानाचें फल सर्व पाप आणि दुःख यांची निवृत्ति व ईश्वर-प्राप्ति हें या पुढील श्लोकांत सांगितलें आहे;–

अपि चेदसि पापेभ्यः सर्वेभ्यः पापकृत्तमः ।
सर्वं ज्ञानप्लवेनैव वृजिनं संतरिष्यासि ॥ ३६ ॥

यथैधांसि समिद्धोऽ ग्निर्भस्मसात्कुरुतेऽर्जुन ।
ज्ञानाग्निः सर्व कर्माणि भस्मसात्कुरुते तथा ॥ ३७ ॥
नहि ज्ञानेन सदृशं पवित्रमिह विद्यते ॥ ३८ ॥

अ. ४.

भक्त्या मामभिजानाति यावान् यश्चास्मितत्त्वतः ।
ततो मां तत्त्वतो ज्ञात्वा विशते तदनंतरं ॥ ५५ ॥

अ. १८.

एथवर या गीताशास्त्रांतील मुख्य प्रतिपाद्य विषयांचें स-प्रमाण निरूपण झालें.

परंतु याजवर कोणी असा आक्षेप घेईल कीं. ज्यांस श्री-कृष्ण हा ईश्वरत्वेंकरून मान्य नाहीं. त्यांस ईश्वरभक्तिरूप धर्म यांत उपदिष्ट आहे, असें कसें म्हणतां येईल ? कारण.—

(१) अहं हि सर्वयज्ञानां भोक्ता च प्रभुरेव च ।
(२) अनन्याश्चिन्तयन्तो मां ये जनाः पर्युपासते ।
तेषां नित्याभियुक्तानां योगक्षेमं वहाम्यहम् ॥
(३) अहं सर्वस्य प्रभव. मत्तः सर्व प्रवर्तते ।
(४) युक्त आसीत मत्परः ।
(५) मन्मना भव मद्भक्तो मद्याजी मां नमस्कुरु ।
मामेवैष्यसि सत्यं ते प्रतिजाने प्रियोसि मे ॥

इत्यादि अनेक वचनांत कृष्ण आपण स्वतः सर्वकारण व सर्वयज्ञभोक्ता, व आपली भक्ति करावी, असें सांगतो. तेव्हां ही कृष्णाची भक्ति झाली, ईश्वराची भक्ति होत नाहीं. त्यास

असें उत्तर आहे कीं, या सर्व ठिकाणीं 'अहं' शब्द सर्वजगत्-कर्ता, जगन्नियंता, सर्वभक्तिभाजन जो सर्वान्तर्यामी परमेश्वर त्याचाच वाचक आहे. जो तदंश वसुदेवात्मज देवकीनंदन यादवकुलोत्पन्न कृष्ण, त्याचाच केवळ वाचक नव्हे. कारण त्याची म्हणजे त्या वसुदेवनंदन वासुदेवाची गणना दहाव्या अध्यायांत

यद्यद्विभूतिमत्सत्वं श्रीमदूर्जितमेव वा ।
तत्तदेवावगच्छ त्वं ममतेजोंशसंभवम् ॥

यो संग्राहक वचनापूर्वी ऐश्वर्यांशानें युक्त अशा धनंजय, व्यास, शुक, प्रल्हाद, नारद, कपिल, इत्यादि अनेक व्यक्ति आपल्या विभूति म्हणजे आपले अंश म्हणून सांगितलें आहे. त्यामध्यें 'वृष्णीनां वासुदेवोऽस्मि' या वचनानें केली आहे. तेव्हां मी वसुदेवात्मज ज्या सर्वान्तर्यामी सर्वभक्तिभाजन परमेश्वराचा अंश आहें, त्याची भक्ति करावी, असाच वरील सर्व वचनांतील 'अहं', 'मम' इत्याहि शब्दांचा तात्पर्यार्थ म्हटला पाहिजे. याचें दुसरें ज्ञापक असें आहे कीं, कित्येक स्थळीं सर्वान्तर्यामी जगदात्मा परमेश्वर याचा 'अहं' शब्दानें म्हणजे प्रथम पुरुषीं निर्देश न करितां 'तत्' शब्दानें म्हणजे तृतीय पुरुषीं केला आहे. जसें;—

अभ्यासयोगयुक्तेन चेतसा नान्यगामिना ।
परमं पुरुषं दिव्यं याति पार्थानुचिन्तयन् ॥ ८ ॥

अ- ८.

कविं पुराणमनुशासितारमणोरणीयांसमनुस्मरेद्यः ।

सर्वस्य धातारमचिंत्यरूपमादित्यवर्णं तमसः परस्तात् ॥
अ. ८. श्लो. ९.

प्रयाणकाले मनसाचलेन भक्त्यतयुक्तो योगबलेन चैव ।
भ्रुवोर्मध्ये प्राणमावेश्य सम्यक स तं परं पुरुषमुपैति
दिव्यम् ॥ १० ॥ अ. ८.

अनादिमत्परं ब्रह्म न सत्तन्नासदुच्यते ॥ १२ ॥
सर्वतः पाणिपादं तत्सर्वतोक्षिशिरोमुखं ।
सर्वतः श्रुतिमल्लोके सर्वमावृत्य तिष्ठति ॥ १३ ॥
उपद्रष्टानुमन्ता च भर्ता भोक्ता महेश्वरः ।
परमात्मेति चाप्युक्तो देहेस्मिन्पुरुषः परः ॥ २२ ॥
समं सर्वेषु भूतेषु तिष्ठंतं परमेश्वरं ।
विनश्यत्स्वाविनश्यन्तं यः पश्यति स पश्यति ॥२७॥
अ. १३.

उत्तमः पुरुषस्त्वन्यः परमात्मेत्युदाहृतः ।
यो लोकत्रयमाविश्य बिभर्त्यव्यय ईश्वरः ॥ १७ ॥
अ. १५.

यतः प्रवृत्तिर्भूतानां येन सर्वमिदं ततम् ।
स्वकर्मणा तमभ्यर्च्य सिद्धिं विंदति मानवः ॥ ४६ ॥
ईश्वरः सर्वभूतानां हृद्देशेऽर्जुन तिष्ठति ।
भ्रामयन् सर्वभूतानि यंत्रारूढानि मायया ॥ ६१ ॥
तमेव शरणं गच्छ सर्वभावेन भारत ।
तत्प्रसादात्परां शान्तिं स्थानं प्राप्स्यसि शाश्वतम्॥६२॥
अ. १८

एकंदरींनें पाहतां जो सर्वांतर्यामी जगदीश्वर त्याचीच भक्ति करावी असें भगवद्गीतेचें तात्पर्य दिसतें.

कित्येकांचें आणखी असें म्हणणें आहे कीं, गीता अद्वैतपर असल्यामुळें तिचा द्वैतदृष्टीस अनुसरून प्रवृत्त होणार जो ईश्वर-भक्तिरूप धर्म तत्पर अर्थ कसा करितां येईल ? त्यास हें उत्तर आहे कीं, गीता अद्वैतपर आहे. यास प्रमाण काय ? कित्येक टीकाकारांनीं तिचा अद्वैतपर अर्थ केला म्हणून तोच सर्वांस यथार्थत्वेंकरून ग्रहण झाला पाहिजे असें काय म्हणून म्हणावें ? ज्याप्रमाणें कित्येक टीकाकारांनीं अद्वैतदृष्टीनें गीतेचा अर्थ केला आहे, त्याप्रमाणेंच दुसऱ्या कित्येकांनीं, किंबहुना बहुतांनीं. द्वैत दृष्टीनेंच तिचा अर्थ केला आहे. त्यापेक्षां खऱ्या अर्थाचा अपलाप करण्याचा दोष कोणावर न आणितां आपल्यास जें एकंदर ग्रंथाचें तात्पर्य दिसतें तेंच ग्रहण केलें पाहिजे. ज्या ग्रंथाचें तात्पर्य ईश्वरभक्तिपूर्वक व सात्विकज्ञानपूर्वक कर्तव्यकर्मानुष्ठान करावें. कधींही त्याचा त्याग करूं नये असें स्पष्ट दिसत आहे तो ग्रंथ सर्वभेदशून्य, अत्यन्त निर्विशेष कर्तृकरणक्रियाहीन. सेव्यसेवकभावहीन, अनिर्देश्य अशा एकतत्त्वाचाच बोधक आहे असें म्हणणें कसें जुळेल? याशिवाय जीव, ईश्वर आणि जड सृष्टि या तिघांचाही परस्पर भेद प्रतिपादन करणारीं वचनें अनेक आहेत. त्यांतून कांहीं पुढें सांगतों;—

भूमिरापोनलो वायुः खं मनोबुद्धिरेवच ।
अहंकार इतीयं मे भिन्ना प्रकृतिरष्टधा ॥ ४ ॥

अपरेयमितस्त्वन्यां प्रकृतिं विद्धि मे परां ।
जीवभूतां महाबाहो ययेदं धार्यते जगत् ॥ ५ ॥
एतद्योनीनि भूतानि सर्वाणीत्युपधारय ।
अहं कृत्स्नस्य जगतः प्रभवः प्रलयस्तथा ॥ ६ ॥
मत्तः परतरं नान्यत् किंचिदस्ति धनंजय ।
मयि सर्वमिदं प्रोतं सूत्रे मणिगणा इव ॥ ७ ॥

या वरील चार श्लोकांत पृथिव्यादि जडतत्वें ही एक ईश्वराची प्रकृति, म्हणजे तन्निष्ठ शक्ति अथवा तच्छक्त्यंशभूत, व जीवरूप चैतन्य ही याहून दुसरी प्रकृति, म्हणजे शक्ति अथवा शक्त्यंशभूत आहे, व या दोहोंच्या संयोगानें हें चराचर विश्व झालें आहे असें सांगून. त्या सर्वांचा आधार, कर्ता आपण परमेश्वर असें सांगितलें आहे. याप्रमाणें जड सृष्टि, जीव आणि ईश्वर, या तीन तत्वांचा पार्थक्येंकरून स्पष्ट निर्देश केला आहे. तसेंच पंधराव्या अध्यायांत,—

द्वाविमौ पुरुषौ लोके क्षरश्चाक्षर एवच ।
क्षरः सर्वाणि भूतानि कूटस्थोऽक्षर उच्यते ॥ १६ ॥
उत्तमः पुरुषस्त्वन्यः परमात्मेत्युदाहृतः ॥
यो लोकत्रयमाविश्य बिभर्त्यव्यय ईश्वरः ॥ १७ ॥
यस्मात्क्षरमतीतोहमक्षरादपिचोत्तमः ॥
अतोस्मि लोके वेदेच प्रथितः पुरुषोत्तमः ॥ १८ ॥

या वरील तीन श्लोकांत देहाकृति पुरुष, तदंतर्गत कूटस्थ जीवरूपी पुरुष. व तदंतर्यामी परमपुरुष परमात्मा, अशा तीन

तत्वांचा पार्थक्येंकरून स्पष्ट निर्देश केला आहे. यावरून गीताशास्त्राच्या उपदेष्टयास द्वैतदृष्टीच अभिमत आहे, असें स्पष्ट दिसतें; व त्याच दृष्टीनें सर्वग्रंथाचें तात्पर्य तत्वज्ञानोदित ईश्वरनिष्ठापूर्वक कर्तव्यकर्माचरण करावें असें ग्रंथाचे अंतिमाध्यायांत सांगून, त्याच आध्यायाचे शेवटीं—

ईश्वरः सर्वभूतानां हृद्देशेऽर्जुन तिष्ठति ।
तमेव शरणं गच्छ सर्वभावेन भारत ।
तत्प्रसादात्परां शांति स्थानं प्राप्स्यसि शाश्वतम् ॥६२॥

इत्यादि वचनांनीं ईश्वरभक्ति हाच पापनाशाचा व मोक्षप्राप्तीचा मार्ग आहे, असें सांगून शास्त्रसमाप्ति केली आहे. तें हें शास्त्र, केवळ आत्मयाथात्म्यज्ञानानेंच मुक्ति होत्ये, हा जो अद्वैत मताचा सिद्धांत, त्याचे प्रतिपादक आहे असें कसें म्हणतां येईल? जीवसृष्टि व जडसृष्टि परमेश्वरानें आपल्या अनंतशक्तीचे योगानें संकल्पापासून केली आहे, एतएव त्यापासूनच तिचा उद्भव; तेव्हां कार्यकारणांचा अभेद या दृष्टीनें जर जडसृष्टि. जीवसृष्टि, आणि ईश्वर यांचें ऐक्य मानिलें. तर या मतांत अद्वैत आणि द्वैत या दोन्ही मतांचा समावेश होऊन मुळींच कलह तुटतो. यास्तव हेंच अद्वैतदृष्टीचें तात्पर्य घेऊन सर्व प्रमाणप्रमेयव्यवहारास अत्यंत अपरिहार्य व प्रवृत्तिनिवृत्तिरूप उभय धर्ममार्गास आधारभूत असा जो हा भिन्नतत्त्वात्मक प्रपंच, त्यास न नाना जीवात्म्यांस सत्यत्व येऊन अनाद्यनंत. सर्वाधार, सर्वव्यापक, नित्य, शुद्ध, चित्स्वरूप तत्त्वाच्या ऐक्यासही बाध येत नाहीं.

आतां मुख्य प्रतिपाद्य विषय नसतांही फार महत्त्वाचे असे कांहीं स्फुट विषय प्रसंगोपात्त कृष्णार्जुनसंवादांत आले आहेत, त्यांचें थोडक्यांत वर्णन करितों. त्यांतींल पहिला विषय वर्णव्यवस्था. भगवद्गीतेंत ब्राह्मण, क्षत्रिय, वैश्य, शूद्र या चारच वर्णांचा उल्लेख केला आहे; अलीकडे ज्या असंख्य ज्ञाति व त्यांचे पोटभेद दृष्टीस पडतात ते हा ग्रंथ झाला त्या वेळीं होते असें वाटत नाहीं. तसेंच हा वर्णविभाग गुणकर्मभेदानें केला आहे म्हणून सांगितलें आहे. ते गुण व तीं कर्में प्रस्तुतकाळीं त्या त्या ज्ञातीच्या स्थानापन्न ज्या प्रजा आहेत त्यांमध्यें फारच थोडया अंशीं दिसून येत आहेत. हें या पुढील वचनांचा हल्लींच्या स्थितीशीं मेळ पाहिला तर तत्काळ ध्यानांत आल्यावांचून राहणार नाहीं;—

चातुर्वर्ण्यं मया सृष्टं गुणकर्मविभागशः ॥ १३ ॥
अ. ४.

ब्राह्मणक्षत्रियविशां शूद्राणां च परंतप ।
कर्माणि प्रविभक्तानि स्वभावप्रभवैर्गुणैः ॥ ४१ ॥
शमोदमस्तपः शौचं क्षांतिरार्जवमेवच ।
ज्ञानं विज्ञानमास्तिक्यं ब्रह्मकर्म स्वभावजं ॥ ४२ ॥
शौर्यं तेजो धृतिर्दाक्ष्यं युद्धे चाप्यपलायनं ।
दानमीश्वरभावश्च क्षात्रे कर्म स्वभावजम् ॥ ४३ ॥
कृषिगोरक्ष्यवाणिज्यं वैश्यकर्म स्वभावजं ।
परिचर्यात्मकं कर्म शूद्रस्यापि स्वभावजं ॥ ४४ ॥
अ. १८.

वरील श्लोकांत ब्राह्मणाचे जे गुण किंवा कर्मे म्हणून सांगितलीं आहेत तीं आज ब्राह्मण ज्ञातींत पाहूं गेलें असतां सहस्रांमध्यें एखाद्याचे अंगीं सांपडलीं तर कोण जाणे. बाकी इतर तीन वर्णांचीं सर्व कर्मे म्हणजे युद्ध, कृषि, गोरक्ष्य, वाणिज्य, सेवा, हीं सर्व अनेक ब्राह्मणांनीं पतकरलीं आहेत. क्षत्रिय मिळून स्वतंत्र ज्ञाति उत्तर हिंदुस्थानांत रजपूत संस्थानें खेरीज करून इतर फार थोड्या ठिकाणीं आढळते. इतर तिन्ही वर्णांचे लोकांनीं व विशेषेंकरून ब्राह्मण व शूद्र यांणीं, आलीकडे क्षात्र कर्माचा पुष्कळ अंशीं अंगीकार केला आहे. तथापि उत्तर हिंदुस्थानांत जीं प्राचीन क्षत्रिय कुळें अद्याप आहेत, त्यांमध्यें क्षत्रियगुण व क्षात्रकर्मे कांहीं अंशीं आढळतात. वैश्यजातीनें फक्त वाणिज्य म्हणजे व्यापार एवढा मात्र आपल्या कर्मीपैकीं भाग चालविला आहे. कृषी म्हणजे शेतकी, आणि गोरक्ष्य म्हणजे गाई, म्हशी इत्यादि पाळणें, हीं कामें प्रस्तुत काळीं शूद्रच करितात. प्राचीन काळीं शूद्रांचें कर्म केवळ वरील तीन वर्णांची सेवा करणें इतकेंच होतें. यावरून त्यांची जमिनीवर मालकी नसून त्यांस स्वतंत्रता फारशी होती असें दिसत नाहीं. परंतु प्रस्तुत काळीं त्यांतून पुष्कळ जमिनीचे मालक असून ती सर्व जात प्रायः स्वतंत्र आहे. आणि कित्येक वैश्यांचा व कित्येक क्षत्रियांचा धंदा करीत आहेत.

याप्रमाणें वर्णविभागाच्या प्राचीन स्थितीशीं हल्लींच्या स्थितीची तुलना केली असतां मोठा फेरफार दृष्टोत्पत्तीस येतो. याप्रमाणें चातुर्वर्ण्याविषयीं विचार झाला.

आतां दुसरा स्फुट विषय गीतेंत आला आहे तो हा. या युगांत सर्व मनुष्यें प्रायः दोन गोष्टी संपादन करण्यांत अत्यंत निमग्न झालीं आहेत. त्या ह्या;—संपत्ति व सुख. परंतु या दोहींचेंही वास्तविक स्वरूप न समजल्यामुळें योग्य संपत्ति आणि खरें सुख फारच थोड्यांस प्राप्त होतें. प्रस्तुत संपत्ति म्हटली म्हणजे धनदौलत, मान, प्रतिष्ठा, सत्ता, अधिकार, यांसच मानितात. परंतु भगवद्गीतेमध्यें यांविषयीं आसक्ति हिला असुरसंपत्ति म्हणजे दुःखकारक संपत्ति असें मानिलें आहे. तींत अत्यंत निमग्न राहिलें असतां मनुष्यास खरें व शाश्वत सुख प्राप्त होत नाहीं. या असुरसंपत्तीचें वर्णन भगवद्गीतेंत १६ वे अध्यायांत श्लोक ७–२० केलें आहे. आणि तिचा परिणाम अधोगति म्हणजे नरकप्राप्ति म्हणून सांगितलें आहे. अधोगतीचे तीन मार्ग या पुढील श्लोकांत सांगितले आहेत.

त्रिविधं नरकस्येदं द्वारं नाशनमात्मनः ।
कामः क्रोधस्तथा लोभस्तस्मादेतत्त्रयं त्यजेत् ॥
अ. १६ श्लो, २१.

म्हणजे सर्व असुरसंपत्तीचें सार काम, क्रोध, लोभ होय. हीं तीन नरकाचीं द्वारें आहेत. हीं टाकून खरी किंवा सात्विक किंवा दैवी संपत्ति मिळाल्यावांचून सद्गति प्राप्त होत नाहीं, असें याच अध्यायांत पुढील श्लोकांत सांगितलें आहे;—

दैवी संपद्विमोक्षाय निबंधायासुरी मता ।
मा शुचः संपदं दैवीमभिजातोऽसि पांडव ॥ ५ ॥

ती दैवी संपत्ति १६ वे अध्यायाचे आरंभीं या पुढील श्लोकांत वर्णन केली आहे:—

अभयं सत्वसंशुद्धिर्ज्ञानयोगव्यवस्थितिः ।
दानं दमश्च यज्ञश्च स्वाध्यायस्तप आर्जवं ॥ १ ॥
अहिंसा सत्यमक्रोधस्त्यागः शांतिरपैशुनं ।
दया भूतेष्वलोलुत्वं मार्दवं ह्रीरचापलं ॥ २ ॥
तेजः क्षमा धृतिः शौचमद्रोहो नातिमानिता ।
भवंति संपदं दैवीमभिजातस्य भारत ॥ ३ ॥

म्हणजे निर्भयता, सत्वशुद्धि, कर्मफलाविषयीं अनासक्ति, यथार्थज्ञान, दान, इंद्रियनिग्रह, ईश्वरोपासना, शास्त्राध्ययन, सरळपणा, अहिंसा, सत्य, क्रोधरहितत्व, वैराग्य, शांति, दुसऱ्याचे दोष न काढणें, भूतदया, निर्लोभता, सौम्यत्व, विनय, स्थिरता, तेज, क्षमा, धारणा, निर्मळपणा व चित्तशुद्धि, अद्वेष, निरभिमानता.—हे दैवी संपर्तीचे प्रकार होत. याच संपत्तीपासून खरें व सात्विक सुख प्राप्त होतें. त्याचें स्वरूप १८ वे अध्यायांत या पुढील श्लोकांत वर्णिलें आहे.

अभ्यासाद्रमते यत्र दुःखांतंच निगच्छति ॥ ३६ ॥
यत्तदग्रे विषमिव परिणामेऽमृतोपमं ।
तत्सुखं सात्विकं प्रोक्तमात्मबुद्धिप्रसादजं ॥ ३७ ॥

म्हणजे ज्या सुखाची गोडी संवयीनें लागते, जें आधीं विषासारखें कडू परंतु परिणामीं अमृतासारखें गोड वाटतें, तें सुख तत्त्वज्ञान आणि चित्तशांति झाल्यावांचून प्राप्त होत नाहीं;

आणि तें एकदां प्राप्त झालें म्हणजे दुःखाचा लेशही राहात नाहीं; तेंच सात्विक सुख.

अतएव निष्काममतीनें व ईश्वरार्पणबुद्धीनें पूर्वोक्त अवश्य कर्तव्यकर्में आचरून, अनन्यभावेंकरून पूर्वोक्त रीतीनें ईश्वराची भक्ति करून, वर सांगितलेली दैवीसंपत्ति मिळवून हें सात्विक सुख आपण अतिआदरेंकरून प्राप्त करून घ्यावें. एतदर्थ फार प्रयत्नेंकरून इंद्रियनिग्रह व मनोनिग्रह करावा. तसा केल्यावांचून आपला घात करून घेऊं नये.

उद्धरेदात्मनात्मानं नात्मानमवसादयेत् ।
आत्मैवह्यात्मनो बंधुरात्मैवरिपुरात्मनः ॥ ५ ॥
बंधूरात्मात्मनस्तस्य येनात्मैवात्मना जितः ।
अनात्मनस्तु शत्रुत्वे वर्तेतात्मैव शत्रुवत् ॥ ६ ॥

अध्याय ६.

याप्रमाणें या गीताशास्त्रांत एकंदर तिन्ही षट्कांत गुरुशिष्यसंवादरूपें जो बोध केला आहे त्याचें तात्पर्य हेंच दिसतें कीं, ज्यास खरोखर अत्यंतशांति, अत्यंत सुख, अत्यंत मोक्ष, यांची प्राप्ति व्हावी अशी इच्छा आहे, त्याणें अनेक वैदिक कर्मफलांस भुलूं नये. अनेक देवतांच्या मागें धावूं नये. त्रिविध कर्तव्यकर्में म्हणजे निष्काम बुद्धीनें ज्ञानेंकरून ईश्वराची आराधना, कायिक, वाचिक, मानसिक तपश्चर्या, आणि परोपकार हीं करावीं. हें सर्व जग अशाश्वत, आत्मा अमर परंतु ईश्वराधीन, ईश्वर अनाद्यनंत, सर्वकर्ता,

सर्वसाक्षी, सर्वांतर्यामी, सर्वव्यापक, सर्वनियंता, सर्वशांतिसुख-निधान, भक्तवत्सल, करुणानिधि, धर्मरक्षक, सर्वज्ञ, सर्वसत्ता-धारी, असें जाणून नामस्मरण, गुणकीर्तन, ध्यान, मनन, निदिध्यास, इंद्रियनिग्रह, मनोनिग्रह, इत्यादि उपायांनीं चि-त्ताची एकाग्रता संपादून. अनन्यभावेंकरून त्याची अहेतुक-भक्ति करावी. अशा प्रकारच्या भक्तांस परमेश्वर कृपा करून सर्व पापांपासून, सर्व दुःखांपासून सोडवून आपल्या परमानंद-रूप निजधामीं नेतो. मग अशी भक्ति करणारीं मनुष्यें पुरुष असोत किंवा स्त्रिया असोत; ब्राह्मण, क्षत्रिय, वैश्य किंवा शूद्र असोत; सर्व परमेश्वरास प्रिय होतात, आणि त्याच्या निज-धामास जातात. इकडे सर्वांचें लक्ष पोंहचेल अशी मी आ-शा करितों. आणि सर्व मित्रांस माझी सविनय व प्रेमपुरःसर अशी प्रार्थना आहे की, हें आर्यधर्मसारभूत गीताशास्त्र आप-ल्या लोकांत जितकें प्रचारांत येईल. तितकें आणण्याचा यत्न करावा. लहान मुलांस समजूं लागल्यापासून व विशेषें-करून उपनयन म्हणजे धर्मदीक्षा झाल्यापासून, आस्तिक्य बुद्धीनें, परम आदरानें, अर्थसहित ती पढवावी. नित्य आपण कुटुंबांतील सर्व मनुष्यांसह तींतील केलेल्या परमकल्याणकारक बोधाचें मनन करावें. आपली क्रिया, आपलें वर्तन, हीं वार-वार या बोधाशीं ताडून पाहावीं. श्रीमंतीचा, विद्येचा, अधिका-राचा; प्रतिष्ठेचा, कुलाचा, ज्ञातीचा, असा सर्व प्रकारचा अभिमान सोडून, निराभिमान होऊन, ईश्वरास सर्व मनुष्यें

समान आहेत इकडे दृष्टि देऊन, नेहमीं भगवत्कृपा प्रार्थून, परमार्थमार्गीं पुढें पाऊल टाकण्याचा यत्न करावा, व इतरांसही त्या मार्गीं यथाशक्ति साह्य करावें. तुमचें आमचें सर्वांचें कल्याण व्हावें, तुमची आमची नेहमी परमार्थदृष्टि असावी, या हेतूनें तुह्मांस हा निबंध सादर निवेदन केला आहे. सर्व लोकेश्वर, परमात्मा, तुम्हांस व मला आणि आपल्या सर्व देशबांधवांस या पवित्रमार्गास अनुसरून कृतकृत्य होण्याची बुद्धि देवो, अशी तुम्हांसह मी त्याची प्रार्थना करून हा निबंध समाप्त करितों.

सर्वोपनिषदो गावो दोग्धा गोपालनंदनः ।
पार्थो वत्सः सुधीर्भोक्ता दुग्धं गीतामृतं महत् ॥

उपनिषदा त्या गाई, गीतामृतदुग्ध, वत्स पार्थ सुधी;
दोग्धा हरि पार्थमिषें सकल मुमुक्षूंसि देत अमृतनिधी. १

श्रीकृष्णबोधवचनें अतिदिव्यरत्नें
गुंफोनि माळ रचिली मुनिनें प्रयत्नें;
ती भारतीं निखिलबोधमयी स्वकोशीं
ठेवोनि किल्लि मग अर्पिलि जाणत्यांसी. २
ती घेउनी सुकविकोशकपाट यत्नें
ज्ञानेश्वरादि उघडोनि जनांसि रत्नें
धुंडोनि, दाविति परी कळती न साच्या
अत्यंत प्राकृत जनांसि खुणा तयांच्या. ३
आणोनियां मनिं असें सकळां जनांला

द्याया सुसाध्य करुनी हरिबोधमाला,
गीतार्थसार मथुनी रचिला निबंध—
योजोनि प्राकृत सुबोध असेचि शब्द. ४
तो निवेदुनि पदीं हरिच्या जना,
अर्पितों मुदित तो करु तन्मना;
तुष्ट ही मम कृती हरितें करो,
आदरें जन सुधी इजला वरो. ५

ओम् नमो भगवते वासुदेवाय ।

बालविवाहाच्या संबंधानें हिताहितविचार.

मित्रहो, आज ज्या विषयावर माझे यथामति केलेले विचार मीं आपल्यास सादर करण्याचें मनांत आणिलें आहे व ज्या-विषयीं मला या मंडळीनें परवानगी दिली आहे, त्यास उप-क्रम करण्यापूर्वी तसें करण्याचा प्रसंग, प्रयोजन, तद्विषयक माझा अधिकार, व त्याचें फल याविषयीं कोणी आक्षेप घेतील,तर त्याचें थोडक्यांत निवारण करणें अवश्य आहे. म्हणून प्रस्ता-वनेचे रूपानें त्याविषयीं चार शब्द बोलतों. प्रथम कोणी असें, म्हणेल कीं, हा विषय आज काढण्याचा प्रसंग काय? ज्या मंडळीनें हेमन्तोत्सवाच्या संबंधानें ही व्याख्यानमाला सुरू केली आहे, त्या मंडळीचा मुख्य हेतु हिंदूलोकांमध्यें ऐक्य वाढवावें हा आहे. असें असतां ज्या विषयाचे संबंधानें मत-विरोध वाढून असलेल्या ऐक्यांत आणखी बिघाड होणारा आहे, असल्या विषयावर भाषण करण्याचा हा प्रसंग आहे काय? यावर माझें इतकेंच उत्तर आहे कीं, सामाजिक स्थितीच्या संबंधीं विषयाचें, शांतपणें, साधकबाधक प्रमाणें पाहून, केवळ लोकीहताच्या दृष्टीनें, नुस्तें विवेचन केलें असतां ऐक्याचा बिघाड होतो असें नाहीं. जर विवेचन करतांना केवळ सत्य-निर्णयाकडे लक्ष न देतां, व तद्विषयक संवाद म्हणजे विवेक-युक्त संभाषण न करतां, परस्परविरुद्ध मतानुसारें भाषण कर-णारांनीं परस्परजयार्थ, केवळ विवाद किंवा वितंडवाद केला,

आणि तितक्यानेंही संतुष्ट न होऊन, परस्परांविषयीं साधेल त्याप्रकारें लोकांमध्यें परिवाद म्हणजे निंदा केली, तर मात्र खरोखरी ऐक्याचा नाश होण्याचा पुष्कळ संभव आहे. केवळ सत्यनिर्णयार्थ सलूख्यानें केलेल्या संवादापासून ऐक्य नष्ट न होतां उलटे परस्परांचे विचार परस्परांस चांगले समजल्यानें व कोणींही दुष्टबुद्धीनें मतविशेषाचें अवलंबन करीत नाहीं, केवळ त्याची तशी खात्री झाली असल्यानें तसें तो करतो असें कळून आल्यानें परस्परांविषयीं तिरस्कार असला तरी नाहींसा होऊन मनाची निर्मलता होते. त्यायोगें ऐक्यास एक मोठी बाधक गोष्ट नाहींशी होते, आणि अशा प्रकारचा शांत संवाद या ऐक्यवर्धक मंडळीच्या आश्रयानेंच शक्य आहे. म्हणून या विषयाचा येथें विचार करण्याचा निश्चय केला आहे.

दुसरें कोणी असें म्हणेल कीं—असो; प्रसंग असला तरी हा विषय आजच काढण्याचें प्रयोजन काय? आजदिनपर्यंत या विषयाची वाटाघाट काय थोडी झाली आहे? व विशेषेंकरून मि० मलबारी यांच्या एतद्विषयक सुप्रसिद्ध लेखांवरून आलीकडे दोन वर्षांत वर्तमानपत्रांत व लोकांमध्यें काय थोडी चर्चा झाली आहे? नुकतीच कांहीं दिवसांमागें माधवबागेमध्यें जी हिंदूलोकांची मोठी सभा झाली होती, त्या सभेमध्यें बहुसमाजानें या विषयाविषयीं विचार करण्याची आपल्यास मुळींच जरूर नाहीं, असा आपला मानस स्पष्ट कळविला नाही काय? व कित्येक भाषण करणारांनीं तर आपल्या देशांतील

चालीरीतींस दूषण देणारे निंदक होत, व त्या चालींचें आपण प्राणपरायणव्रतानें रक्षण करूं, असें बोलून जमलेल्या बहुसमाजाकडून मोठी शाबासकी मिळविली नाहीं काय ? व आपल्या देशांतील विवाहाची प्रस्तुत असलेली चाल देशास फार हानिकारक आहे, यास्तव तींत थोडा बहुत तरी फेरफार अवश्य केला पाहिजे, असें म्हणणाऱ्या सुधारणेच्छु लोकांची फजिती झाली नाहीं काय ? व पुढें कित्येक दिवसपर्यंत त्यांच्याविषयीं वर्तमानपत्रांत खरमरित टीकाही नाहीं बरें आली? हें सर्व विसरून पुनः इतक्या लवकर या विषयावर वादविवाद कशाकरितां उपस्थित करितां ? त्यास माझें हें उत्तर आहे कीं, माधववागेंतील सभेचे दुसरे जे काय परिणाम झाले असतील ते असोत, परंतु माझ्या अल्प समजुतीनें एक परिणाम तरी फार हानिकारक झाला. तो हा कीं, या विषयाकडे मुळींच लक्ष न देणाऱ्या बहुसमाजाची अशी समजूत झाली कीं. आपल्या सर्व चाली चांगल्या आहेत, असें सभेंत जमलेल्या मोठ्या शिष्टांकडून ठरलें. यास्तव आतां सुधारणा करूं इच्छिणाऱ्या लोकांच्या बडबडीकडे लक्ष देण्याचें मुळींच कारण नाहीं. असा समज बहुसमाजाचा होणें व विद्वान् व शिष्ट मानिलेल्या लोकांनीं तो होऊं देणें यासारखें आपल्या राष्ट्राच्या उन्नतीस अपायकारक दुसरें कांहीं नाहीं असें म्हटलें तरी चालेल. म्हणून अशी अपायकारक समजूत दूर करण्याविषयीं प्रयत्न ज्यांना म्हणून स्वदेशाचे हिताविषयीं कळकळ

आहे, त्यांतून प्रत्येकानें निरनिराळ्या प्रकारानें व निरनिराळ्या प्रसंगीं होईल तितका लवकर केला पाहिजे, असें समजून मीं हा विषय आज हातीं घेतला आहे.

तिसरा आक्षेप—कोणी असा आणील कीं, तुम्हांस या विषयावर बोलण्याचा काय अधिकार आहे ? आह्मी असें ऐकतों कीं, बोलण्याप्रमाणें चालावयास नको असें, तुह्मीं ज्या प्रार्थनासमाजांतील आहां, त्यांचें मत आहे. तेव्हां तुमचें बोलणें काय उपयोग ? दुसरें, तुह्मी आपल्या कृतीनें बालविवाहप्रतिबंधाच्या कामीं कोणतें साहाय्य केलें आहे, तर लोकांनीं तुमची बडबड ऐकत बसावें ? या आक्षेपावर माझें असें म्हणणें आहे कीं, जर या आपल्या देशांतील असंख्य लोकसमूहामध्यें केवळ एका लहानशा प्रार्थनासमाजाच्याच अंगीं बोलल्याप्रमाणें न चालण्याचा दोष असून, बाकी सर्व प्रजा बोलल्याप्रमाणें चालणारी आहे ही गोष्ट जर खरी असली, तर ती मोठी अभिनन्दनीय होय. कारण एवढ्याशा लहान समाजाच्या दुर्गुणानें एवढ्या नीतिमान् लोकसमूहाचें काय मोठेंसें नुकसान व्हावयाचें आहे ? असो. परंतु प्रार्थनासमाजांतील लोक नुसतें बोलल्याप्रमाणें करीत नाहींत इतकेंच नाहीं, तर त्यांचें मतही तसेंच आहे, ही गोष्ट मात्र मला सर्वथैव अश्रुतपूर्व आहे. कित्येक लोकांच्या बोलण्यांत व वर्तमानपत्रांत असे उल्लेख मला आढळले आहेत, परंतु ते प्रार्थनासमाजाच्या कोणत्या पुस्तकाच्या आधारानें केले जातात हें मला क-

ळत नाहीं. तेव्हां हा केवळ गैरसमजुतीचा आरोप होय. अशा आरोपानें स्वदेशहिताच्या साधनांचा विचार करण्याचा जो प्रत्येक स्वदेशीय मनुष्याचा स्वाभाविक अधिकार तो माझा नष्ट होतो असें मला मुळींच वाटत नाहीं. दुसऱ्या गोष्टीविषयीं इतकेंच म्हणणें पुरे आहे कीं, माझ्या स्वताच्या मुलांच्या विवाहकालाची मर्यादा सवडीनुसार जितकी माझ्यानें पुढें ढकलवली तेवढी ढकलली. यांत मजकडून कांहीं सांगण्यासारखें झालें आहे, असें नाहीं. मला करतां आलें त्यापेक्षां विवाहकालाची मर्यादा ज्यांच्याकडून विशेष पुढें लांबवून प्रौढ वयांत विवाह करण्याचा प्रचार जितका जवळ जवळ येईल तितका चांगला, म्हणून तसें करणारे धन्य असून, मला सर्वथा शिरसावंद्य आहेत. परंतु माझ्याकडूनही या कामीं जें यत्किंचित् कर्तव्य बजावण्यांत आलें असेल, त्याचे योगानें या विषयावर स्वदेशबांधवांस स्वदेशाच्या खऱ्या हिताविषयीं विचार कळविण्याचा स्वभावता प्राप्त जो माझा इतरांप्रमाणें सामान्य अधिकार, तो कायम आहे असें मला वाटतें. या समजुतीनें मी हा विषय मंडळीच्या विचारार्थ त्यांपुढें आणिला आहे. ह्या स्वतांविषयींच्या गोष्टी सांगण्यास मला फारच संकोच वाटतो. म्हणूनच ही वेळपर्यंत मजवर वृथा आलेल्या आक्षेपांचें निरसन करण्याचेंही मीं मनांत आणिलें नाहीं. परंतु माझें तोंडच बंद करण्याचा कित्येक लोकांचा हेतु दिसतो, म्हणून मला या खासगी गोष्टींचा उल्लेख या प्रसंगीं नेहेमीं

येणाऱ्या आक्षेपांचें निरसन व्हावें या हेतूनें आज एक वेळ करावा लागला आहे. तो मीं अगदीं नाइलाजामुळें केला आहे. एतएव मित्रमंडळीनें त्याबद्दल मला क्षमा केली पाहिजे.

शेवटचा चवथा आक्षेप—या अशा भाषणापासून फल काय ? ह्यास माझें इतकेंच उत्तर असें आहे कीं, स्वतांच्या व राष्ट्रच्या कल्याणाकरितां आपल्यास जे जे उपाय सुचतील ते कायावाचामनेंकरून यथामति करणें हें आपलें कर्तव्य आहे. त्यास योग्य कालीं फल येणें हें ईश्वरेच्छेवर अवलंबून आहे. कोणतीही मोठी गोष्ट एकदम अंमलांत आणतां येत नाहीं. व बहुत दिवसांपासून चालत आलेली रूढि एकदम सर्वप्रकारें बदलून टाकूं म्हटलें तर तसें करणें शक्य नाहीं. म्हणून तद्विषयक मनन, सभाषण, संवाद, इत्यादिक अवश्य उपाय वेळोवेळीं योजणें निष्फल आहे असें कसें म्हणतां येईल ? असो. ही प्रस्तावना फार वाढली म्हणून ती आतां समाप्त करून उद्दिष्ट विषयाचा उपक्रम करितों.

गेल्या वर्षी या सभेमध्यें मीं जें भाषण केलें त्यांत आश्रमव्यवस्थेच्या संबंधानें बोलतांना ब्रह्मचर्यरूप जो पहिला आश्रम त्याचा अर्वाचीनकालीं आपल्या देशांत प्रायः सर्वथा लोप होत चालला आहे असें सांगितलें. ज्या आश्रमाचें महत्त्व आपले प्राचीन ऋषि फारच मानीत होते, तो हळू हळू आपणामध्यें अत्यंत उपेक्षेस पात्र झाला आहे. विद्याप्राप्ति, मेधावृद्धि, तेजस्विता इत्यादिक योग्य आयुर्वर्तनास आवश्यक जे गुण ते मु-

लांचे ठायीं उत्पन्न करणें, हें आपले पूर्वज आपले श्रेष्ठ कर्तव्य असें मानीत असून, तिकडे आपलें अत्यंत दुर्लक्ष्य होत चाललें आहे. निदान पुरुषाविषयीं तरी, तो विद्या, शील, सत्सहवास यांणीं प्रौढ व योग्य असा झाल्यावांचून, व त्याचें त्यास स्वतां आपलें व आपल्या कुटुंबाचें संगोपन करण्याचें सामर्थ्य अंगीं आल्यावांचून, तो विवाहार्ह मानिला जात नव्हता. यद्यपि कन्येचा विवाह करणें हें वडिलांचें कर्तव्य आहे असें सांगून त्यास उचित काल कोणता हें धर्मशास्त्रकर्त्यांनीं सांगितलें आहे, तथापि मुलाचा विवाह करणें हें आईबापांचें कर्तव्य आहे, असें सांगितल्याचें शास्त्रांत कोठेंही आढळत नाहीं. पुरुषानें विद्वान् व शीलसंपन्न होऊन, प्रतिष्ठा मिळवून, आपल्या पराक्रमानें द्रव्यसंपादन करून, गृहस्थाश्रम करण्याची इच्छा असल्यास योग्य कन्या पाहून तिजशीं विवाह करावा, अथवा पाहिजेल तर यथेच्छ आमरण अविवाहित राहून नैष्ठिक ब्रह्मचर्यानें कालक्रमण करावें, असा शास्त्राचा आशय असून प्राचीन संप्रदायही त्याप्रमाणेंच होता. परंतु आतां हें सगळें उलटें झालें आहे. आलीकडे मातापितरें केवल कन्येच्याच विवाहाची काळजी न बाळगतां, पुत्राच्याही विवाहाची उपनयन झाल्यावर लवकरच काळजी वाहूं लागतात. विद्या, शील, वय, व शारीरिक व मानसिकशक्ति, इत्यादि अत्यंत आवश्यक गुण पुत्राच्या अंगीं आहेत कीं नाहींत या गोष्टींचा योग्य विचार करणें हें तादृश महत्त्वाचें वाटेनासें झालें आहे.

या सर्व कारणामुळें केवळ मुलीच्याच विवाहकालाचा नव्हे, तर मुलग्यांच्याही विवाहकालाचा, दिवसानुदिवस संकोच होत चालला आहे; असें मी त्या प्रसंगीं बोललों होतों. आज या प्रसंगीं हा जो विवाहकालाचा संकोच होत चालला आहे, त्यापासून आपलें हिताहित काय होत आहे, या गोष्टीचा विचार कर्तव्य आहे. प्रथम आपण तत्संबंधी हिताविषयींच विचार करूं; व नंतर त्यापासून कांहीं अहित होत आहे कीं काय हें पाहून, एकंदरीनें प्रस्तुत कालीं या गोष्टीच्या संबंधानें देशाचें कल्याण होण्यास कोणत्या मार्गाचें अवलंबन केलें पाहिजे हें पाहूं.

१. आतां लहानपणीं विवाह झाल्यापासून पहिलें हित होतें, तें हें कीं, मनुष्यमात्राचा विवाह करणें हें इष्ट आहे असें आपण घेऊन चाललों, तर तो आपोआप ज्याचा त्यानें प्रयत्न केल्यावांचून दुसऱ्याच्या यत्नांनीं घडून येत आहे. जर मुलगे व मुली मोठ्या वयांचीं होऊं दिलीं तर मग सहजच आवडनिवडीच्या संबंधानें त्यांचें परस्परांविषयीं अनुमत विवाहाचे कामीं घ्यावें लागेल; आणि तसें झालें असतां प्रौढ व परस्परसंमत विवाह ज्या देशांत व लोकांत चालू आहेत त्यांच्याप्रमाणें आपल्या लोकांतही पुष्कळ पुरुष व स्त्रिया अविवाहित राहतील; आणि अशा स्थितींत कदाचित् त्यांना सर्व जन्म काढावा लागेल. तसें बालपणींच विवाह होऊन गेल्यानें आपल्या देशांत होत नाहीं. हें पूर्वोक्त चालीपासून आपल्या

देशाचें व लोकांचें इतर देशांतील लोकांपेक्षां मोठें हित होत आहे असें समजतात.

२. दुसरें हित असें आहे कीं, आपल्या मुलांचीं लग्नें करणें हें जर वडिलांचें अवश्य कर्तव्य आहे, तर त्यांस या गोष्टीची सहजच चिंता उत्पन्न होते. आपल्या मुलीस चांगला नवरा मिळेल कीं नाहीं, आपल्या मुलास योग्य नवरी सांपडेल कीं नाहीं, आपल्या कुलास योग्य अशा कुलाशी आपला संबंध होईल कीं नाहीं, व विवाह लांबणीवर घातला असतां तो होण्याच्या वेळीं आपल्याशी द्रव्यादिक साधनें असतील कीं नाहीं, इत्यादिक गोष्टींची काळजी वडिलांस सहजच उत्पन्न होते. ती सर्व, मुलाचा लहानपणीं विवाह केल्यानें दूर होते, आणि वडिलांचें मन निश्चिंत होतें.

३. तिसरें हित हें आहे कीं, बालपणीं होणारा विवाहसंबंध सहजच प्रौढ, अनुभवी, विचारी, अशी जीं मुलांचीं वडील माणसें त्यांजकडून करण्यांत येतो. तेव्हां अप्रौढ, अपक्व, व तारुण्यमदानें सारासारविचाररहित, अशा वधूवरांनी केवळ थोडक्या परिचयानें बाह्य लक्षणांस भुलून जाऊन केलेल्या विवाहापासून जे वाईट परिणाम होतात, व ज्यांचीं उदाहरणें युरोपियन लोकांमध्यें आपल्या दृष्टीस पडतात, ते सर्व अनिष्ट परिणाम आपल्या देशांतील विवाहाच्या चालीनें टाळतां येतात.

४. चवथें हित हें आहे कीं, मुलीचा विवाह लहानपणीं केल्यापासून ज्या घरीं तिला जन्मभर राहावयाचें, व ज्या मनुष्यां-

मध्यें सतत वागावयाचें, त्या घरची व त्या मनुष्यांची रीतभात बातबेत व कामकाजाची व्यवस्था या सर्व गोष्टींची माहिती तिला लवकरच व आपोआप होते; कामकाजाचें वळण लागतें; सासूसासरा व घरांतील इतर वडील माणसें, तसेंच दीर, नणंदा, जावा इत्यादिकांचे स्वभाव जाणून त्यांशीं कसकसें वागावें हेंही चांगलें समजूं लागतें.

५. पांचवें हित हें होय, कीं लहानपणापासून पतिपत्नी एका घरांत, एका कुटुंबांत, व एका वळणांत राहिल्यानें त्यांस त्यांचा समागम होण्यापूर्वी परस्परांच्या स्वभावांचें चांगलें ज्ञान होतें; आणि परस्परांच्या संबधानें कसें वागलें पाहिजे हेंही कळतें. हळूहळू बहुत संघटणानें एकमेकांच्या स्वभावाचें असें संमेलन होऊन जातें. कीं तीं उभयतां संसार करूं लागलीं म्हणजे एकविचारेंच करतात; व दळणवळणानें त्यांच्या परस्पर स्वभावांतील विरोधांश बहुतेक नाहींसा होऊन, त्यांचें प्रेमबंधन इतर लोकांत आपण पाहतों त्याप्रमाणें लवकर न तुटतां उलटें दिवसानुदिवस अधिकाधिक वाढतच जातें.

६. सहावें हित हें होय की, आपला हा देश उष्ण, यांतील हवा थंड देशांतील हवेसारखी नाहीं, येथें स्त्रीपुरुषांस परम्परांच्या संगतीची अपेक्षा इतर देशांपेक्षां लवकर असते. ती लहानपणीं विवाह होऊन गेल्यानें सहजच सिद्धीस जाते. हेंही एक मोठें हित बालविवाहापासून होतें.

७. सातवें हित हें होय कीं, वरतीं या देशांतील हवेच्या

संबंधानें जो विचार सांगितला, त्याकडे लक्ष न देतां जर आपण मुलें मोठेपणापर्यंत अविवाहित ठेविलीं, तर त्यांची प्रकृति बिघडते; तीं झुरणीस लागतात; त्यांस अनेक व्याधि उत्पन्न होतात; किंबहुना कित्येक प्रसंगीं तीं क्षयी होऊन, त्यांच्या आरोग्याचा सर्वथा नाश होऊन, त्यांस अकालिक मरण प्राप्त होतें. परंतु जर लहानपणींच त्यांचीं लग्नें करून टाकलीं असलीं, तर यथाकालीं स्त्रीपुरुषांचा संबंध झाला म्हणजे हे पूर्वोक्त अनिष्ट परिणाम आपोआप टळतात. हें पण एक लहानपणीं लग्न केल्यापासून मोठें हित होय.

८. आतां आठवें हित नीतीचें रक्षण हें होय. मनुष्यास अनिवार्य अशी जी स्त्रीपुरुषांची परस्परांच्या समागमाविषयीं इच्छा, ती जर नीतीच्या मार्गानें सिद्धांस नेण्याचा उपाय आधींच करून ठेविला नाहीं, तर मनुष्याची प्रवृत्ति अनीतीकडे होण्याचा पुष्कळ संभव असतो. त्यास असें न होऊं देण्याचा सुलभ मार्ग जो बालविवाह, त्याचें अवलंबन करून आपल्या लोकस्थितीचें अनीतीपासून संरक्षण करणें, हें आपलें कर्तव्य आहे, असें कोणास वाटणार नाहीं? यास्तव अनीतीचा परिहार हेंही एक बालविवाहापासून होणारें हित होय.

९. नववें हित शास्त्राज्ञेचें अनुसरण, व तेणेंकरून स्वधर्माचें पालन. जर आपल्या शास्त्राचीच अशी आज्ञा आहे कीं, प्रत्येक मनुष्यानें विवाहधर्मानेंच राहावें, तर तो विवाहधर्म होईल तितका लवकर संपादन करावा. कारण पुत्रसंतति झाली

नाहीं तर मनुष्यास पुण्यलोकाची प्राप्ति होत नाहीं. यास्तव तदर्थ विवाह अवश्य केलाच पाहिजे. तसेंच कन्या अविवाहित राहून पितृगृहीं तिला ऋतु प्राप्त झाला, तर मातापितरांस मोठें पाप लागतें. विवाह करणें याविषयीं मातापितरें मुलांचीं ऋणी आहेत. व तें ऋण त्यांनीं त्यांचा विवाह करून फेडलें पाहिजे, अशी जर शास्त्राज्ञा आहे. तर तो जितका लवकर होईल तितका करून आपण त्यांचें अनृणी व्हावें, व शास्त्राज्ञेचें परिपालन करून स्वधर्माचें रक्षण करावें, हें आपलें अवश्य कर्तव्य होय. तें लहानपणींच मुलांचीं लग्नें केल्यानें आपणास सुकर होतें.

१०. दहावें व शेवटलें हित शिष्टाचारपरिपालन म्हणजे लोकरूढीचें अनुसरण हें होय. लोकांनीं आपल्यास बरें म्हणावें. ज्या लोकांत आपणांस राहायाचें त्यांचें आनुकूल्य संपादन करून त्यांशी विरोध टाळावा, अशी इच्छा मनुष्यमात्रास असणें साहजिक आहे. आपण परस्परांच्या साहाय्यावर इतके अवलंबून आहों. कीं लोकरीतीचा सर्वथा परित्याग करून आपण चालूं म्हटलें तर तसें करणें फार अवघड आहे, व पुष्कळ अंशीं अप्रशस्तही होय. बहुत दिवस जी आपल्या लोकांत चाल चालत आली आहे. तीस अनुसरून चाललें असतां लोकविद्वेषापासून होणाऱ्या अनेक अडचणी आपणांस टाळतां येतात. या गोष्टींचा विचार केला म्हणजे बालविवाहाची रूढि आपल्या लोकांत आज बरेच दिवस आहे. म्हणून तीस अनुसरून वर्त-

ण्यांत आपण लौकिकरक्षण करतों, हें एक बालविवाहापासून होणारें मोठें, किंबहुना सर्वांत श्रेष्ठ हित मानिलें आहे.

याप्रमाणें बालविवाहापासून सामान्यदृष्ट्या कोणकोणत्या प्रकारें हित होतें असें समजतात हें सांगितलें. आतां या प्रत्येक हिताबरोबर कांहीं अनहितही होतें की काय, हें पाहिलें पाहिजे.

पहिलें हित बालविवाहापासून जें होतें म्हणून सांगितलें, तें प्रायः मनुष्यमात्राचा विवाह निश्चितपणें होतो, हें. परंतु मनुष्यमात्राचा विवाह अवश्य झाला पाहिजे, असें म्हटलें म्हणजे अत्यंत दरिद्री किंबहुना भिक्षावृत्तीनें आपला निर्वाह करणारेही विवाहास पात्र होतात; व अगदी भीक मागणारेही लग्न करून भीक मागणाऱ्या संततीची वृद्धि करितात. अशीं उदाहरणें पुष्कळ आढळतात. कित्येक केवळ विवाहाकरतांच कर्ज वगैरे करून आपल्यास व आपल्या कुटुंबास दारिद्र्यदुःखांत निमग्न करितात. मग धड संसार नेटका होत नाहीं; धड लौकिकही रक्षण होत नाहीं; तेव्हां सुखप्राप्तीची गोष्ट बोलावयासच नको!

दुसरें प्रत्येक मुलग्याचा व मुलीचा विवाह बाळपणींच करून टाकायचा असें म्हटलें, म्हणजे प्रायः अमुक मुलाचा किंवा मुलीचा विवाह करावयाचा किंवा न करावयाचा हा विचारच राहात नाहीं. आणि सर्वच मनुष्यें विवाहित झाल्यानें प्रजावृद्धि अतोनात होणें हें स्वाभाविकच आहे; व तसें होत आहे हें आपण आपल्या देशांत प्रत्यक्ष पाहात आहों. प्रजावृद्धि होऊन तिला निर्वाहापुरतें अन्नवस्त्र मिळालें तर मग चिंता नाहीं. परंतु

ज्यांस जाडीभरडी भाकरही पोटभर मिळत नाहीं, व कसेंबसें आंगभर वस्त्रही मिळत नाहीं. अशा लोकांची संख्या ज्या देशांमध्यें फार आहे, त्यांत अतोनात प्रजावृद्धि व्हावी यापेक्षां त्या देशाचें आणखी अनहित तें काय व्हायचें? केवळ अर्थशास्त्राच्या विचारानें ज्यांचें मन अगदीं व्यग्र झालें आहे, त्यांस या अनर्थासारखा दुसरा कोणताही अनर्थ भयंकर वाटत नाहीं. पाश्चिमात्य देशांमध्यें जेथें सर्वांचाच विवाह करण्याकडे कल असतो असें नाहीं, तेथेंही देशाचें दारिद्र्य टाळण्याकरतां विवाहाच्या संबंधानें निरनिराळे कृत्रिम प्रतिबंध करून प्रजावृद्धीचें मान संपत्तीच्या आटोक्यांत ठेवतात. परंतु आपल्या देशांत दारिद्र्य अटरा विसवे असतांही, प्रजावृद्धीचा प्रवाह अप्रतिहत चालला आहे. त्याचें मुख्य कारण सबलदुर्बलेतचा. योग्यायोग्यतेचा सारासारविचार न करतां, लहानपणीच सर्वांची लग्नें करून टाकणें हें नाहीं असें कसें म्हणतां येईल बरें?

तिसरें, विवाहितस्थितीस पुष्कळ कारणांनीं असमर्थ अशा अंध, पंगु, रोगी इत्यादिकांचाही विवाह होणें हल्लीच्या रूढीप्रमाणें फारसें कठीण पडत नाहीं. मग अशांच्या विवाहितस्थितीची काय दशा होत असेल. हें बिचाऱ्या त्याच लोकांस पुरतेपणीं सांगतां येईल. मग विवाह करून, गृहस्थाश्रमानें सुखप्राप्ति करून घेऊन कालक्षेप करावयाचा हा जो विवाहाचा मुख्य हेतु, तो पूर्वोक्त प्रकारच्या स्थितींमध्यें होणाऱ्या अविचारित विवाहापासून कितपत सिद्धीस जातो याचें विवरण करीत बसण्याचें कारण नाहीं.

वरील हितगणनेंत बालपणीं मुलांचा विवाह झाल्यापासून त्यांच्या वडील मनुष्यांची चिंता दूर होते हें एक हित सांगितलें. परंतु हेंही हित निर्बाध होत नाहीं. लहाणपणीं लग्न केल्यापासून वडिलांची चिंता सर्वथैव दूर होते काय? नाहीं. तर त्याच्या पोटींच आणखी अनेक चिंता उत्पन्न होतात. त्यांतही विशेषेंकरून मुलीच्या वडिलांस फारच चिंता वाहावी लागते. एक तर विद्या, गुण, धन संपादण्याची शक्ति इत्यादिक आवश्यक गुणांच्या संबंधानें नवरा कसा निपजेल, ही पहिली व जबरदस्त चिंता. दुसरी मुलगी सासरीं कशी नांदेल, सासूसासऱ्यांस व नवऱ्यास आवडेल कीं नाहीं, सासरीं तिचें संगोपन यथास्थित होईल की नाही, ही चिंता. तिसरी नवऱ्याचे आरोग्याविषयीं चिंता. कारण मुलीच्या सर्व जन्माचें सार्थक्य त्याच्या जीवनावर अवलंबून असल्यामुळें, त्याला कांहीं दुखणेंबाणें लागलें तर, त्याच्या बायकोस काळजी नाहीं इतकी किंबहुना त्याच्या प्रत्यक्ष आईबापांस नाहीं इतकी काळजी, त्याच्या सासूसासऱ्यांच्या मनांत उत्पन्न होते. तसेंच मुलीच्या माहेरचा पक्ष प्रस्तुत काळीं वरपक्षापेक्षां इतका कमी मानला जातो, कीं बिचाऱ्या मुलीच्या आईबापांस सोयऱ्याकडील सर्व मनुष्यांची नानाप्रकारें पायधरणी करून, लग्नाचे वेळीं पुष्कळ खर्च व अवर्णनीय त्रास आणि मानखंडना सोसून मर्जी राखावी लागते. इतकेंच नाहीं, तर विवाहानंतरही पुष्कळ प्रकारें सोयऱ्यांचा संतोष कसा राखावा याची चिंता मुलीच्या

आईबापांस मुलगी प्रौढ होईपर्यंत बाळगावी लागते. कारण तसें न केलें तर ज्या आईबापांनीं तिला जन्म दिला, त्यांस कधीं कधीं तिचें दर्शनही दुर्लभ होतें. व माहेरीं त्यांच्या इच्छेप्रमाणें मुलीचें कांहीं काळ सतत राहणें, याची तर आशा सुद्धां करावयास नको. क्वचित् नवऱ्याकडील वडील मनुष्यांचा थोड्या कारणावरून असंतोष झाला, तरी अविचारी वायकांकडून तरी असे उद्गार निघतात. कीं आमच्या मुलग्यास काय मुलींचा तोटा पडला आहे! आह्मीं हवें तेव्हां त्याचें दुसरें लग्न ही पाहिजे तर करूं. हे उद्गार मुलीच्या आईबापांच्या कानीं गेले असतां किती दुःख व केवढी चिंता त्यांस वाटत असेल बरें?

वर तिसरें हित असें सांगितलें आहे कीं, प्रौढ मनुष्यांकडून मुलाच्या विवाहाची योजना झाल्यामुळें ती पोक्त व सारासारविचारास अनुसरून होते. परंतु हें हित जेवढें मोठें वाटतें तेवढें नाहीं. कांहींशा प्रौढ वयांत आलेल्या वधूवरांच्या विवाहयोजनेंतही तें सर्वथा असाध्य आहे असें नाहीं. मात्र प्रौढ मनुष्यांनीं केवळ आपल्याच इच्छेनें केलेल्या लहान मुलांच्या विवाहापासून कित्येक मोठे दुःखकारक परिणाम होतात, त्यांतील कांहीं सांगतों.

प्रथम तर वडिलांनीं मुलांचा विवाह करावयाचा हें त्यांचें मोठें कर्तव्य, असें मानलें गेल्यामुळें तें आपल्याकडून कसें बजाविलें जाईल याविषयींची काळजी त्यांस सहजच उत्पन्न होते. यामुळें तें कसें तरी सिद्धीस नेण्याचा त्यांचा हेतु असतो.

आणि तें जितकें लवकर होईल तितकी आपली काळजी लवकर दूर होईल असें वाटतें. यामुळें मुलाच्या विवाहकालाचा फारच संकोच होत जातो. तो इतका कीं, मुलाची विद्या, त्याची समजूत, त्याची शारीरिक व मानसिक स्थिति व क्वचित ढळढळीत शास्त्राज्ञा यांच्याकडे अत्यंत दुर्लक्ष होतें. गुजराथ प्रांतांत तर कांहीं जातींत विवाहयोजना कधीं कधीं मुलें पाळण्यांत असतांना किंबहुना त्याच्याही अगोदर होते. तसेंच आपल्या महाराष्ट्रदेशांतही आठ वर्षांचे आंत मुलींचीं, व तेरा चवदा वर्षांचे आंत मुलांचीं. थोडीं लग्नें होतात असें नाहीं. यासंबंधें लिहितांना कै० वे० शा० संपन्न विष्णुशास्त्री पंडित यांणीं ब्राह्मणकन्याविवाहविचार या विषयावरील आपल्या निबंधांत एक अशा अल्पकालीन विवाहाचें चमत्कारिक उदाहरण दिलें आहे तें असें;—" शके १७८४ या सालीं पश्चिम हिंदुस्थानांतील दोन मोठ्या ब्राह्मण संस्थानिकांचा शरीरसंबंध झाला, त्यांत वधूचें वय **वीस बावीस महिन्यांचें** होतें. उभयतां संस्थानिक, दुसऱ्या अनेक गोष्टींवरून पाहतां मोठे सुज्ञ व विचारी आहेत यांत संशय नाहीं. ते केवळ गृहस्थ आहेत, तेव्हां त्यांस उगीच बोलण्यास कांहीं तरी सबब आहे असें कोणी कदाचित् म्हणेल, तर या विवावाहास संमत भरणारे विद्वान्, जशा या दोन नामांकित घराण्यांचा संबंध झाला तशाच प्रतीचे नामांकित होते. (त्यांचीं नांवें येथें लिहिलीं असतीं; परंतु बहुतेक सर्वच जुने संस्कृत विद्वान् अशा गोष्टींत

संमति भरणारे आहेत, त्यापक्षीं ती लिहिण्यांत हांसल आहे असें वाटत नाहीं). या विवाहांत एकानें तरी असा विचार करावयाचा होता कीं, विवाहविधींत ज्या गोष्टी मुलीस समजणें अगर तिच्या हातून घडणें जरूर आहेत त्या साक्षात् समजणें अथवा घडणें तर दूरच राहिलें, परंतु समजण्याच्या अथवा घडण्याच्या योग्यतेचा लेश तरी या मुलीच्या अंगीं आहे किंवा कसें? आणि तो खरोखरच नसल्यामुळें वेदप्रतिपाद्य वैधकर्मास अविचारानें प्राप्त झालेल्या अवैधत्वामुळें खचित दोषी होणारे जे मातापितरादि, त्यांच्याच पंक्तीमध्यें या विद्वानांचा समावेश अवश्य होईल किंवा नाहीं, याचा विचार सुज्ञांनी निष्पक्षपातदृष्ट्या करावा." या पूर्वोक्त उदाहरणांतील वधुवर कोण हें शास्त्रीबुवांनीं मला स्वतः सांगितलें, व त्यांस अगदी लहानणीं विवाहित स्थितींत इतर लहान मुलांप्रमाणें परस्परांशी खेळतांनाही त्या उभयतां कुटुंबांशीं माझा परिचय असल्यामुळें मीं स्वतः पाहिलें आहे. आतां हें खरें कीं, अशी उदाहरणें या महाराष्ट्रदेशांत तरी विरळ घडतात, फार होतात असें नाहीं, तथापि सन १८८१ सालीं जी या देशांत मनुष्यगणना झाली, तिजमध्यें केवळ नऊ वर्षांच्या आंतील विधवा ७८,००० गणल्या आहेत. यावरून मुलींच्या व मुलांच्याही विवाहकालाचा संकोच कोठवर होत आहे, हें सहज लक्षांत येण्यासारखें आहे. त्याच गणनेंत चवदा वर्षांचे आंत पूर्वोक्त नऊ वर्षांचे आंतील विधवांचे संख्येखेरीज २,०७,००० बाल-

विधवा होत्या असें समजतें. व एकोणीस वर्षांचे आंत विधवा झालेल्या मुली ३,८२,००० त्यावर्षी होत्या. एकंदरींत अल्प वयांत झालेल्या विधवांची संख्या (६,००,०००) सहा लक्षांवर त्या गणनेच्या कालीं होती. ही जी एवढी मोठी विधवा मुलींची संख्या तीसही कारण दुसऱ्यांनीं मुलांच्या विवाहाची योजना करणें हें असून एवढी संख्या त्याच योगें वाढली यांत संदेह नाहीं. याच कारणामुळें वडिलांच्या द्रव्यलोभानें कित्येक मुलींचा विक्रय व तसेंच कित्येकांचे वृद्ध व विवाहास सर्वथा अपात्र अशा पुरुषांशींही विवाह होत आहेत. याप्रमाणेंच आलीकडे कित्येक मुलगे आपली स्थिति जाणून किंवा विद्याव्यासंगामुळें किंवा लोकांत चाललेल्या एतद्विषयक चर्चेच्या संस्कारामुळें विवाहरूप बंधनापासून आपण कांहीं काळ तरी अलिप्त राहिलों असतां चांगलें, असें समजूं लागले आहेत: व क्वचित् मर्यादा रक्षण करून आपला अभिप्राय वडील मनुष्यांच्या लक्षांत यावा एतद्विषयींही ते थोडा बहुत यत्न करितात. परंतु लग्नाच्या कामांत त्यांचें अनुमत घेण्याची मुळींच आवश्यकता नसल्यामुळें त्यांस विचारतो कोण ?" या कामांत तुम्हांला काय समजतें आहे ? उगीच रहा, आम्हांला आपलें कर्तव्य केलें पाहिजे;" असें वडील मनुष्यांनीं म्हटलें म्हणजे ते बिचारे उगीच बसतात. मुलीच्याविषयी तर. असल्या गोष्टीविषयीं अनुकूल प्रतिकूल विचाराचा अंकुरही फुटण्याचा संभव नाहीं, अशा वयांतच त्यांचा विवाह करून

टाकल्यामुळें त्यांच्या स्वतांच्या इच्छेस विवाहयोजनेंत शिरण्यास मुळींच अवसर मिळत नाहीं. याप्रमाणें मुलाच्या गोष्टींत लवकर विवाह करूं न इच्छिणाऱ्या पुष्कळ मुलांचा विवाह वडिलांच्याच योजनेनें होत आहे, व मुलींच्या संबंधानें तर तशी इच्छा उत्पन्न होण्याचा कालही येत नाहीं. यामुळें आपल्या या देशांत विवाहरूप जो स्त्रीपुरुषांचा मोठा महत्त्वाचा संबंध, ज्या संबंधानें बद्ध झालें असतां त्यांस आमरण एकमेकांवर अवलंबून राहणें प्राप्त आहे; जो संबंध त्यांच्या भावी सुखदुःखाचा, कल्याण अकल्याणाचा केवळ पाया आहे; जो संबंध कसाही स्वभावविरोध, कितीही दुःखें, कितीही संकटें, व कशीही स्थिति प्राप्त झाली, तथापि तोडतां येत नाहीं; तो प्रायः मनुष्यमात्रांस आपल्या इष्टानिष्टांविषयीं, सुखदुःखाविषयीं, जें स्वातंत्र्य अवश्य असलें पाहिजे त्याकडे सर्वथा दुर्लक्ष करून इतरांच्या इच्छेनें आपल्या देशांत असंख्य लोकांत घडून येत आहे. त्याच्या योगें व्यक्तिमात्रांस आपल्या सुखदुःखांविषयींचा बोजा बहुत अंशीं आपल्यावर आहे या गोष्टीचें भान सुद्धां नाहींसें झालें आहे. आणि हें एक आपल्या लोकांत दैव किंवा नशीब यांचें जें एवढें प्राबल्य मानिलें आहे, त्यास कांही अंशीं तरी कारणीभूत आहे असें म्हणतां येईल. आपलें स्वातंत्र्य कितीही झपाट्यानें नष्ट होत चाललें तथापि निमुटपणें तसें होऊं देण्याची जी आपली दीनवाणी स्थिति, तीस हा लहानपणींच होणारा स्वातंत्र्यनाश

कांहीं अंशीं तरीं कारण होत नाहीं. असें म्हणतां येईल काय? वस्तुतः ऐहिक गोष्टींमध्यें स्वातंत्र्यासारखी दुसरी अमोलिक वस्तुच नाहीं, असें म्हणलें तरी चालेल. जें स्वातंत्र्य उपलब्ध असतां, कशाहीं विपत्ति असली तरी निदान थोडाबहुत सुखलाभ मनुष्यास होतो, व जें नसलें तर मोठ्या ऐश्वर्यानेंही सुख होऊं शकत नाहीं, तें अशा मोठ्या महत्त्वाच्या गोष्टींत सर्वथा नाहींसें व्हावें, हें केवढें अनहित आहे बरें!

आतां मुलींच्या संबंधानें पाहिलें तर, त्यांचा विवाह लवकर झाल्यानें त्यांस लहानपणापासून सासरच्या स्थितीचा परिचय होतो, कामकाजाचें वळण लागतें, हें एक हित होतें असें मागें सांगितलें आहे. परंतु या गोष्टीपासूनहीं कांहीं अनिष्ट परिणाम होतात ते असेः -

एक तर लोकप्रसिद्ध जो लहानपणीं सासरीं गेल्यानें मुलीस पुष्कळ ठिकाणीं अवश्य सोसावा लागतो, तो सासुरवास. याविषयीं लोकांमध्यें आजवर पुष्कळ चर्चा झाली आहे; व कित्येकांनीं या स्थितीचें अतिशयोक्तीनेंही निरूपण केलें आहे, तें अक्षरशः खरें आहे असें माझें म्हणणें नाहीं. व त्यास कांहीं भर घालावी अशी तर माझी मुळींच इच्छा नाहीं. परंतु या सासुरवास शब्दांत, लहान मुलीस अगदीं अपरिचित अशा मनुष्यांमध्यें एकाएकीं जाऊन राहिल्यानें जें म्हणून कांहीं दुःख होतें, त्या सर्वांचा अंतर्भाव होतो. तिचें बसणें, उभें राहणें, चालणें, बोलणें, खाणें, पिणें. निजणें, उठणें, यावर सासरच्या

मनुष्यांची, व विशेषेंकरून सासू व नणंदा यांची, कडक दृष्टि असते. यांतून एकादी गोष्ट जरी त्यांच्या मर्जीविरुद्ध घडली. तरी सामान्य देहताडनापेक्षांही दुःसह जें शब्दताडन, आणि तेंही केवळ तिच्याच संबंधानें नव्हे, तर तिच्या माहेरच्या मनुष्यांच्या संबंधानें, तेंही तिला सोसावें लागतें. तसेंच खेळणें, बागडणें, इत्यादिक गोष्टींत बालपणास सुखाच्या दृष्टीनें, शरीरपुष्टीच्या दृष्टीनें, व एकंदर आरोग्यवृद्धीच्या दृष्टीनें अत्यंत उचित व अवश्य अशी जी स्वच्छंदवृत्ति, तिचा तर सामान्यप्रकारच्याही सासुरवासानें अत्यंत निरोध होतो. तेणेंकरून बलिष्ठसंततीस योग्य असें आरोग्य आपल्या मुलींस प्रायः कधींच प्राप्त होत नाहीं. हा केवळ स्वार्थदृष्टीनें पाहिला तरी केवढा अनिष्ट परिणाम आहे बरें ! परंतु मुलींचीं लहानपणी लग्नें होऊन त्यांस वरचेवर सासरीं जाण्याचें भाग पडलें असतां आणखीही एक अनहित होतें. तें जरी बहुत दिवस अंगवळणी पडल्यामुळें आपल्यास फारसें महत्त्वाचें वाटत नाहीं, तरी व्यक्तीच्या, कुटुंबाच्या, अथवा राष्ट्राच्या, यांपैकीं कोणत्याही दृष्टीनें पोक्त व दूरवर विचार करून पाहिलें तर त्याचें महत्त्व कमी आहे असें खचीत वाटणार नाहीं. तें अनहित विद्याभ्यासाचा विच्छेद हें होय. हें ऐकून कित्येकांस हंसूं येईल, व ते म्हणतील हें मात्र तुमच्या केवळ कल्पनेस भासणारें अनहित होय. कारण मुलींना विद्या देण्याचा क्रम आहे कोठें. तर त्यांत व्यत्यय येईल ! व होता कधीं, जो या चालीनें

नाहींसा झाला आहे ? मुलग्यांची गोष्ट निराळी. त्यांस रोजगार-धंदा केला पाहिजे, म्हणून त्यांच्या विद्याभ्यासाची तजवीज केली पाहिजे; व त्यांस कांहीं विघ्न येत असल्यास अवश्य टाळलें पाहिजे. परंतु मुलींस विद्याभ्यास करून काय करावयाचें आहे ? आतां या विषयाचें सविस्तर विवेचन करण्याचा हा प्रसंगही नव्हे, व तसें करण्याची आवश्यकताही नाहीं. तो एक स्वतंत्र निबंधाचा विषय असून, त्याविषयीं ऊहापोह अनेकप्रसंगीं व अनेकस्थळीं करण्यांत येत आहे. परंतु या गोष्टीकडे दुर्लक्ष करणें अनेकप्रकारें हानिकारक आहे. हें थोडक्यांत सुचविणें अवश्य आहे. प्रथम व्यक्तीच्या दृष्टीनें पाहिलें तर मुलग्यांप्रमाणें मुलींसही देवानें मानसिक शक्ति दिल्या आहेत, त्या स्वाभाविक व कृत्रिम, उभयप्रकारच्या शिक्षणानें वाढवितां येतात. त्या इतक्या कीं, अगदीं मुलांच्या शक्तीच्या जवळजवळ त्या येऊन ठेपतात, हें ह्या देशांत जीं क्वचित् उदाहरणें उपलब्ध आहेत त्यांवरून, व ज्या देशांत मुलींस मानसिक शिक्षण देणें आईबाप आपलें कर्तव्य समजतात त्यांतील पुष्कळ उदाहरणांवरून, प्रतीतीस येतें. व मनुष्यमात्राच्या मानसिक शक्ती शिक्षणानें वाढल्या असतां अनेकप्रकारच्या उपयुक्त विषयांचें ज्ञान वाढून, त्याचे योगानें अनेक प्रकारें सुखसाधनांची वृद्धि होत जाते; बुद्धीस परिपक्वता येते; व तिचे योगानें मानवी जीवनास कृतार्थता येते. ही गोष्ट स्त्रीजातीसही लागू नाहीं काय ? आणि आपण आपल्या

समजुतीप्रमाणें देवानें दिलेल्या मानसिक शक्तिरूप अमोलिक देणगीचा जर योग्य उपयोग करून घेतला नाहीं, तर आपण आपल्या कर्तव्यांत चुकतों नव्हे काय? याप्रमाणें व्यक्तिदृष्टीनें पाहातां, स्त्रियांच्या शिक्षणाकडे दुर्लक्ष केलें असतां त्यांस जें ज्ञान व जें सुख होण्यासारखें आहे. तें न होऊं देण्याचा दोष आपल्या माथीं बसतो कीं नाहीं? बरें कुटुंबाचे दृष्टीनें पाहिलें, तरी स्त्रीशिक्षणाचे उपेक्षेनें कुटुंबाचें कल्याण होतें काय? पुरुषास विशेष व्यवहारोपयोगी, विशेष सुस्वावह, व विशेष उन्नतीकारक संगति कोणती बरें? जिला विशेष माहिती, जिची समजूत विशेष पोक्त, जिचा देशांत चालू असलेल्या व्यवहाविषयीं विशेष शोध, व जिला आपल्या घराचा व कुटुंबाचा बातबेत, टापटीप, रीतव्यवस्था शांतपणें सुरळीत राखतां येते अशा स्त्रीची, किंवा जिला स्वाभाविक नेहमीं घराच्या चार दरवाज्यांच्या आंत राहून, नाहीं बाह्यसृष्टीचें ज्ञान, नाहीं देशव्यवहाराचें ज्ञान, नाहीं अनेक मनुष्यकृतींचें ज्ञान किंवा कोणत्याही ज्ञान वाढविणाऱ्या ग्रंथाचा परिचय, अशा अशिक्षित स्त्रीची? अर्थात् पूर्वोक्त सुशिक्षित स्त्रीची संगति विशेष हितकारक होय यांत संशय नाहीं. मनुष्याच्या अंतःकरणावर त्यास नित्य असलेल्या संगतीचा संस्कार सामान्यदृष्ट्या आपल्या लक्षांत येतो, त्यापेक्षां सूक्ष्म दृष्टीनें पाहिलें असतां फारच मोठा होतो असें प्रत्येकास कबूल करावें लागेल. या दृष्टीनें पाहिलें असतां, पुरुषास सुशिक्षित स्त्रीची संगति किती अवश्य

आहे हें सहज ध्यानांत येईल. कुटुंबरूप रथाचीं स्त्रीपुरुष हीं दोन चक्रें आहेत असें मानिलें असतां चालेल. कारण त्या उभयतांचा असाच परस्परावलंबी संबंध असतो. केवळ पुरुषच आपल्या यत्नानें कुटुंबाची स्थिति विशेष चांगली व विशेष हितकारक करूं म्हणेल, तर तें कधींही होणार नाहीं. त्याची स्त्रीही विद्येनें व समजुतीनें त्यास अनुकूलवती पाहिजे, तेव्हांच त्याचा मनोरथ सिद्धीस जाईल. रथाचें एक चाक उत्तम सफाईदार केलें, व दुसरें ओबडधोबड राहूं दिलें, तर त्या रथास हवी तशी गति देतां येईल काय? नाहीं, हें उघड आहे. तीच गत कोणत्याही कुटुंबाची व त्याच्या संसाराची आहे. नुसता पुरुष जर सुशिक्षित असून स्त्री जर अत्यंत अशिक्षित आहे, तर त्यांचा संसार नीटनेटका व हवा तसा सुखावह कसा होईल? याप्रमाणें कुटुंबदृष्टीनें पाहिलें तरी स्त्रीशिक्षणाकडे दुर्लक्ष करणें हितावह नाहीं. आतां राष्ट्रीयदृष्टीनें पाहिलें तरी असाच निर्णय होतो. कोणत्याही देशांत ज्ञानसंपन्न मनुष्यांची संख्या जशी जशी वाढत जाईल तसतशी त्यास हितावह होते. कारण ज्ञानबलासारखें दुसरें कोणतेंच बल नाहीं, अशी पाश्चिमात्यभाषेंत एक म्हण आहे. त्याहीपेक्षां विशेष बोधकारक वचन आपल्या एका सर्वमान्य ग्रंथांत आहे, तें "ज्ञानासारखी दुसरी पवित्र वस्तू कोणतीही नाहीं" हें होय. तर ही ज्ञानरूप विलक्षण शक्ति व अत्यंत पवित्र वस्तू ज्या राष्ट्रांतील अर्ध्या मनुष्यांस प्राप्त होत नाहीं, व प्राप्त झाली

पाहिजे असें कोणास वाटत देखील नाहीं, त्या राष्ट्राच्यानें, ज्या राष्ट्रांत ही समजूत पूर्णपणें असून तदनुरूप सर्वप्रकारें वर्तन होत आहे, त्या राष्ट्राची बरोबरी कशी करवेल ? कधींही करवणार नाहीं. आणखी असें आहे कीं, निदान आपले मुलगे तरी सुशिक्षित व्हावे असें प्रस्तुत सर्वांस वाटत आहे. परंतु मुलगे सुशिक्षित, गुणसंपन्न, व पराक्रमी होण्यास इतर देशांमध्यें जें एक मुख्य साधन असतें, तें आपल्या देशांत मुळींच नाहीं. प्रसिद्धीस आलेल्या कोणत्याही पाश्चिमात्य पुरुषाचें चरित्र तुम्हीं अवलोकन केलें, तर प्रायः, तुम्हांस असें आढळून येईल कीं, ते पुरुष बुद्धिमान् , उद्योगी, सद्गुणी, विद्याव्यासंगी होण्यास मुख्यत्वेंकरून त्यांची सुशिक्षित माता कारणीभूत झाली आहे. तसें आपल्या देशांत मुळींच नाहीं. लहानपणीं मुलग्यांस मातेचाच समागम विशेष असतो; व त्याचा बरा वाईट परिणाम त्यांच्या मनावर अवश्य झालाच पाहिजे. तो चांगला किंवा वाईट व्हावा, हें त्या समागमाच्या स्वरूपावर अवलंबून आहे. जर माता चांगल्या सुशिक्षित होतील, तर मुलगेही हल्लींपेक्षां विशेष सुशिक्षित, विशेष सद्गुणी, विशेष उद्योगी, विशेष दृढनिश्चयी, विशेष पराक्रमी, असे होतील आणि व्यक्तिमात्राच्या उन्नतीनें राष्ट्राचीही उन्नति वाढत जाईल. याप्रमाणें राष्ट्रीय दृष्टीनें पाहिलें, तरी मुलींस विद्येच्या योगानें सुशिक्षण देणें, हें आपलें महत्त्वाचें कर्तव्य आहे असें सिद्ध होतें. तें कर्तव्य मुलींचीं लग्नें लहानपणीं करून त्यांस

सासरीं वारंवार जाऊन राहावें लागलें असतां, प्रस्तुतच्या स्थितींत तरी, आपल्यास मुळींच बजावितां येत नाहीं; हें एक मोठें अनहित होतें. हें प्रकरण बरेंच लांबलें, हें मी कबूल करतों. परंतु या विषयाचा आणि बालविवाहरूप जो आपला आजचा विषय त्याचा परस्परसंबंध किती निकट आहे, इकडे लक्ष देऊन माझे मित्र या विस्ताराची मला क्षमा करतील, अशी मी आशा करितों.

आतां वर पांचवें हित असें सांगितलें कीं, पतिपत्नी लहानपणापासून एका कुटुंबांत व एका वळणांत राहिल्यानें परस्परांच्या स्वभावांचें संमेलन होऊन त्यांचें प्रेमबंधन दृढ होत जातें. हें हित बऱ्याच अंशीं खरोखरी होत आहे. ही गोष्ट परस्थांच्या चांगली ध्यानांत येत नाहीं, त्यायोगें अल्पकालीं विवाहित स्त्रीपुरुषांचा संबंध प्रायः दुःखकारक होतो, असा त्यांचा समज होतो. मला वाटतें मि० मलबारी यांणीं आपल्या लेखांत जी या संबंधानें अतिशयोक्ति केली आहे तिचें कारण हेंच होय. तथापि या व अशा दुसऱ्या कित्येक गोष्टींत त्यांच्या बालविवाह व असंमत वैधव्य या दोन विषयांवरील प्रसिद्ध लेखांत जो गैरसमजामुळें थोडासा अतिशयोक्तीचा भाग आला आहे, तो त्यांणीं दुष्ट बुद्धीनें, किंवा कुत्सित बुद्धीनें, किंवा हिंदुलोकांची निंदा करण्याच्या उद्देशानें लिहिला आहे, असें म्हणणें हें अत्यंत गैरसमजुतीचें व आक्षाध्य होय. आपले दोष दुसऱ्यानें दाखविले असतां त्याच्यावर न चवताळतां,

आत्मपरीक्षण करून आपली स्थिति सुधारणें हेंच विचारी मनुष्याचें काम आहे. दुसऱ्यानें आपल्यास दिलेल्या दोषांत जी अतिशयोक्ति आली असेल ती शांतपणें आपण त्यास दाखविली असतां, तो आपली चुकी खचीत कबूल करील. परंतु दोष देणारावर अपशब्दांचा भडिमार करून आपले दोष कधींही दूर होतील असें नाहीं. आपला एकादा अवयव जर आपल्या दुर्लक्षामुळें किंवा अनास्थेमुळें बिघडून रोगग्रस्त झाला आहे, हें एकाद्या परक्याच्या दृष्टोत्पत्तीस येऊन त्यानें आपलें लक्ष तिकडे पोंचविलें, तर त्याचे आभार मानून आपले बरेपणाकडे आपण लक्ष देणें हें भलेपणाचें काम आहे. अस्तु.अल्पकाळीं विवाह झाल्यामुळें आपल्या देशांतील पतिपत्नीसंबंध जितका दुःखकारक होतो म्हणून परस्थलोकांचा समज आहे, तितका निःसंशय होत नाहीं. किंबहुना प्रेमसंबंधानें आपल्या देशांतील कुटुंबें इतर देशांतील कुटुंबांपेक्षां कदाचित् अधिक सुखी नसतील, परंतु कमी सुखी तर खचीत नाहींत. पतिपत्नीसंबंध अपारेहार्यरीतीनें आधींपासूनच ठरून गेला असतो; तथापि त्यांत एकंदरीनें फारसा बिघाड होत नाहीं. परंतु स्वभावविरोधामुळें, सर्वत्रच प्रेम वाढतें किंवा मुळीं असतें असेंही नाहीं; हें कबूल केलें पाहिजे.

आतां वर सहावें हित म्हणून जें सांगितलें, तें हें कीं, या आमच्या उष्णदेशांत पतिपत्नीसंबंध लवकर झाला पाहिजे, तो लहानपणीं मुलांचीं लग्नें केल्यानें सहज होतो. यास इत-

केंच उत्तर आहे कीं, ही जी आपल्या देशांतील हवेची उष्णता ती काय प्राचीनकाळीं नव्हती आणि अर्वाचीनकाळींच उत्पन्न झाली? कारण प्राचीनकाळीं मुलींचा विवाह कोणत्याही ज्ञातींत उपवर झाल्यापूर्वी होत नव्हता, हें प्राचीन इतिहास व पुराणांतील शेकडों उदाहरणांवरून आपल्यास कळतें. व पुरुषाचा तर विवाह ब्रह्मचर्य समाप्त होईपर्यंत, म्हणजे अगदीं प्रौढ दशेपर्यंत, होत नव्हता ही तर गोष्ट निर्विवाद आहे. तर त्या वेळीं उष्ण हवा कोठें गेली होती? दुसरें, आपलीं वडील माणसें आपल्यास हल्लीं सांगत आहेत कीं थोडयाच काळापूर्वी या आपल्याच देशांत मुलींस ऋतुप्राप्ति फार करून सोळा वर्षांपूर्वी होत नसे; आणि पुष्कळ मुलींस अठरा एकोणीस वर्षेपर्यंतही जात असत. तेव्हां हल्लींप्रमाणेंच उष्ण हवा नव्हती काय? तसेंच शूद्रांत व नेटिव्ह ख्रिस्ती लोकांत मुलांचा विवाह लवकर होत नाहीं; त्यांस उष्ण हवेची बाधा होते काय? वर जी बालविधवांची मोठी संख्या मीं सांगितली त्यांच्या नीतीविषयीं मि० मलबारी वगैरे कित्येक लोकांची गैरसमजूत कशी झाली असेल ती असो, परंतु एकंदरीनें पाहतां त्यांपैकीं बहुतेक आपलें पातिव्रत्य संभाळून राहातात असें म्हणण्यास मला तिळमात्र हरकत वाटत नाहीं. त्या विचाऱ्यांतून पुष्कळांस पुनर्विवाहाच्या अत्यंत अन्याय्य व अप्रशस्त प्रतिबंधामुळें फार दुःख व विपत्ति सोसावी लागते यांत संशय नाहीं. परंतु आपल्या दुर्धर मनोविकारांपासून, व दुष्ट पुरुषां-

च्या निंद्य यत्नांपासून, त्या मोठ्या निष्ठेनें आपल्या सुशीलतेचें रक्षण करतात, हें खरोखर त्यांस भूषण आहे. परंतु यावरून अनुमान काय निघतें तर बालपणीं लग्नें करण्यास उष्ण हवेचें जें कारण दाखविण्यांत येतें तें केवळ काल्पनिक होय.

सातवें हित आरोग्यरक्षण म्हणून सांगितलें. म्हणजे, लहानपणीं मुलांचीं लग्नें होऊन त्यांचा संबंध लवकर न झाला तर तीं झुरणीस लागून, त्यांस रोग होऊन, कदाचित् क्षयावर जाईल, असा कांहीं अंशीं लोकांत समज आहे; हें लहानपणीं लग्न केल्यानें होण्याचा संभव नाहीं. म्हणून तसें करणें हितावह होय असें मानितात. परंतु स्त्रीचे शरीरावयव निदान अठरा व पुरुषाचे एकवीस वर्षांपूर्वी तरी यथास्थित परिपक्व होत नाहींत असें आपल्याच वैद्यशास्त्राचें मत आहे. तें खरें असेल तर अपरिपक्वदशेंत स्त्रीपुरुषांचा संबंध झाल्यानें त्यांचें आरोग्यरक्षण होईल काय? आणि हल्लीं तरी होत आहे काय? लवकर संबंध झाल्यानें प्रायः आपल्यास असें आढळून येत नाहीं काय कीं मुलांची वाढ खुंटते, त्यांच्या सर्व शरीरास अशक्तता व जरा लवकर येते, आणि पुष्कळांस मरणही अकाळीं गांठतें. यांतलें कांहीं न झालें तरी, शरीराच्या अपूर्ण दशेंत कुटुंबभरणाची चिंता उत्पन्न होते हें एक क्षीणतेस कारण होत नाहीं काय? तेव्हां हेंही हित पूर्वोक्त सहाव्या हिताप्रमाणेंच केवळ काल्पनिक असून, अकालिक संबंधानें अवश्य होणारा जो शक्तिऱ्हास, तो मात्र आपल्या देशांतील प्रायः अनेक स्त्रीपुरुषांस सोसावा

लागतो, यांत संदेह नाहीं. या विशेष विषयावर याच सभेपुढें आपलें मित्र डा० देशमुख यांचें वैद्यशास्त्रादृष्ट्या व्याख्यान व्हावयाचें आहे, तेव्हां या प्रसंगीं आणखी कांहीं सांगण्याची आवश्यकता नाहीं.

वर आठवें हित असें सांगितलें कीं, मुलांचा बालपणीं विवाह केल्यानें त्यांच्या नीतीचें रक्षण होतें; तसें न केलें आणि अपेक्षितकालीं इष्ट संबंध झाला नाहीं, तर तीं अमार्गवर्ती होतील, असें भय आहे; म्हणून बालपणीं विवाह केला पाहिजे. अशी ज्यांची समजूत आहे त्यांस हें विचारलें पाहिजे, कीं लक्षावधि बालविधवांच्या नीतीचें रक्षण कसें होतें? शूद्रांत नीतिरक्षण कसें होतें? नेटिव्ह ख्रिस्ती लोकांच्या नीतीचें रक्षण कसें होतें? व इतर देशांतीलही असंख्य अविवाहित तरुण जनांच्या नीतीचें रक्षण कसें होतें? आपले लोक इतर लोकांपेक्षां इतके अनीतिमान् आहेत काय, कीं त्यांस अकालीं विवाहबंधनानेंच बांधून टाकलें पाहिजे? मला वाटतें, हीही कल्पना अगदीं भ्रांतिमूलक आहे. उलटें लहानपणीं पतिपत्नीसंबंध ठरून तेव्हांपासून विवाहित मुलें एकत्र राहात असल्यामुळें, ऋतुप्राप्तीच्या अवधीचें उल्लंघन करून त्याच्या पूर्वीच जे पुष्कळ ठिकाणीं संबंध, प्रायः प्रौढ पण अदूरदृष्टि स्त्रियांच्या अज्ञानामुळें घडून येतात, त्यांचे योगानें नीतीचें जबरदस्त उल्लंघन होत नाहीं काय? तेव्हां नीतिरक्षणास बालविवाह अवश्य आहे, या म्हणण्यांत कितीसा अर्थ आहे बरें?

नववें हित शास्त्राज्ञेचें परिपालन हें होय म्हणून वर सांगितलें. म्हणजे अल्प वयांतच शास्त्रोक्त विवाहसंबंध घडला म्हणजे मुलीचा विवाहकाल मर्यादेबाहेर गेला असतां जें पापदायक असें शास्त्राज्ञेचें उल्लंघन होतें, त्याचें भय या बालविवाहाच्या चालीच्या योगानें मुळींच राहत नाहीं; हें हित म्हणून सांगितलें आहे. परंतु यावर अशी शंका आहे कीं, मुलग्यांची गोष्ट राहूं द्या. त्यांचा हल्लींज्या वयांत विवाह होतो त्या वयांत त्यांस तर शास्त्राज्ञेप्रमाणें विवाहार्हता मुळीं येतच नाहीं. परंतु मुलींचा तरी विवाह हल्लींप्रमाणें अगदीं बालपणींच झाला पाहिजे अशी शास्त्राज्ञा आहे काय? विवाहसंबंध मुलास किंवा मुलीस तरी सर्वथा अपरिहार्य आहे असें शास्त्र सांगतें काय? सांगतें असें म्हणावें तर—

कामं आमरणात्तिष्ठेद् गृहे कन्यर्तुमत्यपि ।
नचैवैनां प्रयच्छेत्तु गुणहीनाय कर्हिचित् ॥

म्हणजे "मुलीनें ऋतु प्राप्त झाला असतांही पित्याचे घरीं खुशाल राहावें. पण जर तिला योग्य वर न मिळेल, तर वडिलांनीं तिला गुणहीन मनुष्यांस कधींही देऊं नये."

या मनुवचनाचें तात्पर्य काय? यावरून असें अनुमान होत नाहीं काय कीं विवाहसंबंध मुलग्यांस तर अवश्य कर्तव्य असा नाहींच, पण मुलींस देखील अपरिहार्य आहे असें नाहीं. अगदीं अल्प वयांत मुलींचा विवाह व्हावा हें जर शास्त्रास इष्ट आहे असें म्हणावें, तर विवाहसमयीं किंवा पूर्वी

ऋतुप्राप्ती झाली असतां, त्यास थोडेंसें दान, किंवा थोडेंसें ब्राह्मणभोजन, किंवा घटके दोन घटकेंत होणारें होमहवन, व कोहोळ्याच्या आहुति, इत्यादि अत्यंत अल्प प्रायश्चित्त सांगितलें आहे; याचा अभिप्राय काय बरें? हाच, कीं ऋतुप्राप्तीची मर्यादा सामान्यतः शास्त्रास इष्ट आहे खरी, परंतु पुष्कळ प्रसंगीं मुली प्रौढ झाल्यानें ऋतुप्राप्ती विवाहाचे पूर्वी किंवा त्या प्रसंगीं होण्याचा संभव मागें होता. म्हणून तसें झालें असतां जो यत्किंचित् दोष होतो तो या अल्प प्रायश्चित्तानें दूर करून विवाह करावा. आणखी कित्येक शाखांच्या प्रयोगांत विवाह झाल्यापासून चवथ्या रात्रीं चातुर्थिक कर्म म्हणून स्त्रीपुरुषांच्या समागमार्थ सांगितलें आहे. त्यांचें तात्पर्य प्रौढ दशेंतच मुलींचा विवाह शास्त्रास इष्ट होय, असें स्पष्ट दिसत नाहीं काय? यास आणखीही ज्ञापक असें आहे कीं, विवाहसंस्कारांत वधूवरांनीं कर्तव्य अशा कित्येक प्रतिज्ञा व अभ्यर्थना आहेत, त्या वधूवरें चांगलीं सज्ञान अशीं विवाहसमयीं असल्यावांचून त्यांजकडून यथाशास्त्र होऊं शकत नाहींत. अस्तु. या विशेष विषयावर आपले मित्र रा० रा० बापूसाहेब आठल्ये हे एक स्वतंत्र व्याख्यान याच स्थलीं देणार आहेत, म्हणून या प्रसंगीं मी या बाबतींत विशेष विस्तारानें आपलें मत सांगत नाहीं.

शेवटचें दहावें हित शिष्टाचारपरिपालन म्हणून सांगितलें. याविषयीं असा विचार केला पाहिजे कीं, चालू रूढि आणि

खरोखरीचा शिष्टाचार यांचें नेहमीं ऐक्य असतें असें नाहीं. प्राचीन शिष्टाचार, यद्यपि तो खरोखरी, व सर्वकालीं ग्राह्य असा असला, तथापि देशांत पुष्कळ गोष्टींमध्यें कालवशात् पुष्कळ फेरफार होतो, व तो सर्वच आदरणीय नसतो. कित्येक गोष्टींमध्यें दुर्व्यवस्था होऊन त्याचें रूप अत्यंत विकृत होतें. अशीच या विवाहकालसंबंधीं शिष्टाचाराची गति आपल्या देशांत झाली आहे. ज्या चालू रुढीच्या अमलांत पूर्वोक्त बालावृद्धविवाह, कन्याविक्रय, व विवाहविधीस व शास्त्रवचनास विरुद्ध अशा प्रकारच्या अत्यंत बाल्यावस्थेमध्यें मुलांचें लग्न अशा गोष्टी घडतात, त्या रूढीस शिष्टाचार कसें म्हणतां येईल? जी रूढि पुरुषाच्या शास्त्रविहित ब्रह्मचर्याश्रमाचा सर्वथा लोप करूं पाहत आहे, ती रूढि शिष्टाचारत्वेंकरून आदरणीय कशी मानावी? ज्या रूढीनें व्यक्तिस्वातंत्र्यनाश, शारीरिकशक्तिन्हास, संततिन्हास, अकालिक रोग, जरामरणादिकांची प्राप्ति, केवळ मुलींच्याच दृष्टीनें नव्हे, तर मुलग्यांच्याही संबंधानें विद्याभ्यासाविच्छेद, देशदारिद्र्यवृद्धि, व अकालिक विवाहरूपी पाशबंधनानें होणारें दैन्य, व निश्चिंत, निर्भय, स्वेच्छ, सोत्साह अशा उद्योगाविषयीं प्रथम वयांतच उपन्न होणारी पराङ्मुखता, इत्यादि भयंकर अनर्थ आपल्या राष्ट्राची सर्वप्रकारें अवनति करूं पाहात आहेत, तीस शिष्टाचार मानून निमूटपणें तदनुसार चालणें योग्य होईल काय? निःसंशय नाहीं. अशा रूढीचा होईल तितक्या त्वरेनें उच्छेद करून तिच्या जागीं

सर्वप्रकारें एकंदरीनें हितकारक अशी जी प्रौढ कालीं खरी विवाहार्हता आल्यावर स्त्रीपुरुषांचा विवाह करण्याची प्राचीन रूढि, तिची पुनः स्थापना करणें हेंच खरें शिष्टाचाराचें परिपालन होय.

युरोपाच्या इतिहासापासून आपल्या लोकांनीं काय शिकावें ?

ज्या इंग्लंड देशाची राजसत्ता ईश्वरी सूत्रानें व कालचक्रानें आपल्या देशांत स्थापन झाली आहे, त्याच्या इतिहासांतील ठलक ठळक गोष्टी प्रायः सर्वांस माहीतच आहेत; व त्याप्रमाणेंच युरोपाच्या इतिहासांतील मुख्य गोष्टींची माहिती पुष्कळांस असेल यांत संशय नाहीं. तथापि त्या गोष्टींपैकीं अत्यंत महत्त्वाच्या व ज्यांपासून आपणांस उपयुक्त बोध होईल अशा गोष्टींविषयीं चार शब्द बोलावे असें माझ्या मनांत येऊन हा पुढील लेख लिहिला आहे.

आपल्या देशांतील ज्या लोकांस पाश्चात्य विद्या थोडयाबहुत मानानें तरी प्राप्त झाली आहे, त्यांच्या मनांत आपला देश जो प्रस्तुतकाळीं निकृष्टावस्थेस पावला आहे तो पुनः उन्नत स्थितीस येऊन पुढारी देशांत सामील व्हावा, अशी इच्छा उत्पन्न होऊन कांहीं अंशीं तसें होण्याची आशाही उत्पन्न झाली आहे. इंग्रजी विद्येचा प्रसार होण्यापूर्वी एकंदर जगाची स्थिति दिवसानुदिवस अत्यंत निकृष्ट होत जाऊन शेवटीं सर्व प्रकारचा नाश होणार, व तो कोणत्याही प्रकारें टळावयाचा नाहीं, अशी युगपरंपरागत जी ऱ्हासकल्पना अगदीं दृढ झाली होती, ती पाश्चात्य विद्येच्या प्राप्तीनें कित्येक पश्चिमेकडील राष्ट्रें दिवसानुदिवस अवनत न होतां उलट अधिकाधिक उन्नतच होत

चालली आहेत असें पाहून, शिथिल होत चालली आहे; व योग्य उपायांनीं आपला हाही देश पुनरपि उदयास येईल, ही कल्पना दृढावत चालली आहे. परंतु देशाची किंवा राष्ट्राची उन्नति होण्यास लोकांच्या अंगीं कोणकोणते गुण असले पाहिजेत, हें इतिहासावरून जसें समजतें तसें दुसऱ्या साधनांनीं समजत नाहीं. व इतिहासांत राष्ट्रसुधारणेचा क्रम जसा युरोपांतील राष्ट्रांच्या इतिहासाचें अवलोकन केल्यापासून ध्यानांत येतो, तसा इतर इतिहासावलोकनानें येत नाहीं. वास्तविक रीतीनें इतिहास यथाभूत पूर्ववृत्त सांगणारा असल्यावांचून विश्वसनीय होत नाहीं; व तसा न झाला तर त्याच्या वाचनानें वाचकांच्या मनावर जो उपयुक्त संस्कार घडावयाचा तोही घडत नाहीं. उदाहरण, आपल्या देशांतही महाभारतादि ग्रंथांत प्राचीन इतिहास आहे, परंतु त्यांत जें थोडें बहुत यथावृत्त वर्णन आहे तें असंभाव्य वर्णनानें इतकें आच्छादिलेलें आहे. कीं त्यापासून इतिहासाचा जो खरोखरी उपयोग व्हावा तो होऊं शकत नाहीं, आणि घडणाऱ्या गोष्टी घडल्यानंतर बहुत कालानें पूर्ण लेखांच्या अभावीं केवळ लोकांतील दंतकथांच्या आधारें जो इतिहास लिहिला जातो, त्याला बऱ्याच अंशीं अशा प्रकारचें असंभाव्यतेचें रूप आल्यावांचून राहात नाहीं. आलीकडे मराठ्यांच्या व पेशव्यांच्या इतिवृत्ताविषयीं ज्या कित्येक बखरी छापून प्रसिद्ध झाल्या आहेत, त्यांच्यावरून आपल्या लोकांत यथास्थित इतिहास लिहिण्याची बुद्धि किंवा

शक्ति मुळींच नाहीं असें ठरत नाहीं. परंतु युरोपिअन ग्रंथकार अगदीं प्राचीन काळापासून सुद्धां कोणताही इतिहास लिहिण्यापूर्वी जितक्या बारकाईनें खरी माहिती मिळविण्याविषयीं यत्न करीत आले आहेत, व यावदुपलब्ध पूर्ववृत्तसंबंधीं लेखांचें मथन करून त्यांतील इत्यर्थ ते इतक्या पोक्त विचारानें काढीत आले आहेत, कीं ऐतिहासिक ज्ञान व त्यापासून होणारे उपयुक्त संस्कार यांचा लाभ पाश्चात्य इतिहासकर्त्यांच्या ग्रंथांपासून होतो तसा इकडील इतिहासकर्त्यांच्या ग्रंथांपासून होत नाहीं. यास्तव युरोपाचा उपलब्ध इतिहास एकंदरीनें विश्वसनीय आहे असें जाणून, त्यांतील मुख्य मुख्य घडामोडींचीं कारणें, त्यांचे परिणाम, व त्यांमधील क्रम, यांपासून आपल्या देशाच्या उन्नतीच्या कामीं उपयोगी असा कांहीं बोध आपल्यास निःसंशय घेतां येईल अशी माझी समजूत आहे. यास्तव युरोपांत अगदीं प्राचीन कालीं विद्या, कला, लोकव्यवहार व राज्यव्यवस्था यांच्या संबंधानें ज्या देशाचा प्रथम अभ्युदय झाला असा जो ग्रीस देश, त्याच्या इतिहासांत जिजपासून आपण बोध घ्यावा अशी कोणती विशेष घडामोड झाली याविषयीं मी प्रथम सांगतों.

ग्रीसदेश आणि आपला देश यांमध्यें बरेंच साम्य आहे. ग्रीसदेशांत जशीं निरनिराळीं संस्थानें होतीं त्याप्रमाणेंच आपल्या या विस्तीर्ण भरतखंडांत अनेक राज्यें व अनेक देश होते. तेथें जशी मूळ ग्रीकभाषा एक असून तिचे स्थानभेदानें निर-

निराळे भेद झाले होते, त्याप्रमाणें याही देशांत मूळ संस्कृत भाषा एक असून तिचे स्थानभेदानें निरनिराळे भाषाभेद झाले आहेत. ग्रीकलोक जसे काव्यादि कलांमध्यें व अध्यात्मविचारामध्यें आपल्या बुद्धिप्रभावानें महत्त्व पावले होते, त्याप्रमाणेंच आपल्या देशांतील प्राचीन लोकही अनेक विद्या व अनेक कला यांमध्यें स्वबुद्धिप्रभावानेंच मोठ्या योग्यतेस चढले होते यांत संशय नाहीं. ग्रीकलोकांची जशी सर्व प्रकारच्या वैभवानें भरभराट होऊन पुढें त्यास भिन्न भिन्न संस्थानांमधील परस्पर कलहामुळें उतरती कळा लागली, तिचा इतका शेवट झाला कीं सुमारें दोन हजार वर्षें ग्रीस देशाचें स्वातंत्र्य नष्ट होऊन तो होता किंवा नव्हता असें झालें, त्याचप्रमाणें आपल्याही देशांतील निरनिराळीं राज्यें उदयास येऊन परस्परांशीं कलह करून इतकीं दुर्बळ झालीं व लोकही संपत्तीच्या प्राप्तीनें व ऐषआरामामुळें सुखलंपट होऊन इतके हतवीर्य झाले कीं मुसलमान लोक वायव्य दिशेकडून निरनिराळ्या टोळ्यांनीं या देशांत स्वाऱ्या करूं लागले, तेव्हां त्यांच्यापासून आपल्या देशाची संपत्ती किंवा स्वातंत्र्य यांचें रक्षण करण्यास ते समर्थ झाले नाहींत. एथवर या दोन्ही देशांचें साम्य झालें. परंतु ग्रीस देश बहुत काळपर्यंत पराधीनतेंत राहून, मुसलमानांच्या अमलाखालीं कित्येक संवत्सरशतकें हाल भोगून, शेवटीं युरोपांतील ख्रिस्ती राष्ट्रांस स्वधर्माभिमानामुळें त्याचा कळवळा येऊन तो पुनः स्वतंत्रता पावला आहे. ग्रीस देशांतील पूर्वीचा

धर्म, ग्रीक लोकांचे पूर्वीचे विचार, व रीतरीवाज, विद्या, कला, राज्यरीति, वगैरे सर्व प्राचीन गोष्टींच्या ठिकाणीं आतां ख्रिस्ती-धर्म, व इतर गोष्टींत सर्व प्रकारची ख्रिस्ती संस्था स्थापन झालेली आहे. आपला देश मुसलमान लोकांच्या सत्तेंतून सुटून इंग्रज लोकांच्या हस्तगत झाला आहे. या पुढें ग्रीस देशाची उन्नति ग्रीक लोकांच्या स्वतंत्र उद्योगावर अवलंबून आहे; परंतु आपले देशाची उन्नत्ति केवळ आपल्या लोकांच्या स्वतंत्र उद्योगावर अवलंबून नसतां इंग्लिश राष्ट्राच्या कृपेवर अवलंबून आहे. मात्र ग्रीक लोकांप्रमाणें आपल्या देशांत्तील धर्मादि व्यवस्था ख्रिस्ती संस्थेचें रूपांतर न पावल्यामुळें ख्रिस्ती इंग्लिश राष्ट्रास ग्रीक लोकांचा कळवळा आला, तसा आपल्या लोकांचा येण्यास जागा नाहीं. असो. मला जी ग्रीक लोकांच्या इतिहासांतली आपल्यास बोध करून घेण्यासारखी गोष्ट सांगावयाची आहे ती त्यांच्या प्राचीन उन्नतावस्थेच्या काळास अनुलक्षून आहे. एखाद्या देशांतील लोकांमध्यें स्वाभाविक ऐक्य असणें हें त्यास भूषणास्पद होय. तसें नसलें तर निदान संकटकाळीं तरी सर्व आंतील वैभवास एकीकडे राहून ऐक्य होणें हें कांहीं कमी भूषणास्पद आहे असें नाहीं. अशा प्रकारचें ऐक्य नेहमीं परस्परांशीं कलह करणाऱ्या ग्रीक संस्थानांमध्यें पारशी देशाच्या राजानें ज्या वेळेस त्यांजवर हल्ला केला त्या वेळेस झालें होतें; आणि तें जरी संकट दूर झाल्यानंतर तसेंच राहिलें नाहीं, व पुढें आलेल्या मोठमोठ्या संकटांच्या समयीं

पुनः तितक्या जोरानें उद्भूतही झालें नाहीं, तरी प्रथम ज्या वेळेस तें ऐक्य झालें त्या वेळेस तरी त्याच्या योगानें देशावर आलेलें महत्संकट पूर्णपणें दूर झालें. आथेन्स आणि स्पार्टा या दोन धुरंधर संस्थानांतील लोकांमध्यें जरी नेहमीं स्पर्धा चालू असे, तरी आथेन्सांतील राजपुरुषांनीं व सरदारांनीं आपला धुरीणत्वाचा अभिमान बाजूला ठेवून, स्पार्टाचा राजा लियोनिडास याजकडे सेनेचें आधिपत्य, व स्पार्टाचे आरमारावरील मुख्य युरिबाइडिस् याजकडे सर्व एकवटलेल्या आरमाराचें आधिपत्य दिलें; आणि सर्व संस्थानांतील पुढारी लोकांनीं एकविचारानें पर्शियन सैन्याच्या रिघावास अटकाव केल्यामुळें, शेवटीं त्याचा सर्वप्रकारें पराजय होऊन झर्सेस राजास निराश होऊन स्वदेशी परत जावें लागलें. त्या प्रसंगीं स्पार्टाचा राजा लियोनिडास यानें प्राणपणानें आपलें स्थान संभाळून, शेवटीं नाइलाजामुळें स्वदेशरक्षणाच्या कामीं आपल्या लहानशा सैन्यासह आपला प्राणही वेंचिला. इकडे थेमिस्टोक्लीस व अरिस्टाइडीस यांसारख्या उत्तम राजकारणी आथेन्स संस्थानांतील पुरुषांनीं युरिपाइडिज् यास आपल्या पोक्त मसलतीनें साह्य करून सालामिसच्या खाडींत पर्शियाच्या जबरदस्त आरमाराशीं लढाई करून त्याची सर्वथा धूळधाणी करून टाकिकिली. याप्रमाणें त्या काळच्या शूर व दूरदर्शी राजकारणी व पराक्रमी ग्रीक लोकांनीं आपल्या विलक्षण एकोप्यानें स्वदेशावरील महत् संकट टाळलें. अशा प्रकारचा एकोपा आपल्या

देशांतील भिन्न भिन्न संस्थानांतील राजकारणी किंवा पराक्रमी पुरुषांनीं करून स्वदेशावर चालून येणाऱ्या शत्रूस पराजित केलें असें कधीं झालें आहे काय ? उलटी आपसांत फंदफितुरी होऊन निरानिराळ्या संस्थानांनीं एकमेकांचा नाश करण्याच्या कामीं शत्रूंस मात्र साह्य केल्याचीं उदाहरणें पुष्कळ आहेत. तेव्हां या ग्रीस देशांतील घडलेल्या गोष्टीपासून निदान बाहेरून तरी संकट आलें असतां आपसांतील विरोध विसरून एकोप्यानें कसें वर्तावें, याविषयीं बोध घेण्यासारखा नाहीं काय ? तद्वत् कायमॉन, पेरिक्लीज, अरिस्टाइडीज्, डिमास्थनीस इत्यादि स्वदेशाभिमानी गृहस्थ यांनीं आपल्या देशाची चाकरी एकनिष्ठेनें कशी बजाविली याचा विचार करून त्यांच्या स्वदेशाभिमानापासून व स्वदेशहितनिष्ठेपासून आपल्यांतील देशहितेच्छु लोकांनीं उपयुक्त बोध घेण्यासारखा नाहीं काय ? कोणी म्हणेल कीं आपला देश आतां एका प्रबल राष्ट्राच्या सत्तेखालीं असल्यामुळें आपल्यास बाहेरून येणाऱ्या महत्संकटाचा प्रसंग मुळींच संभवत नाहीं. होय. कदाचित् ही गोष्ट खरी आहे असें मानून चाललें, तरी चालू राज्याखालींच लोकहिताच्या अभ्युदयास ज्या जबरदस्त अडचणी आहेत त्या दूर करण्याचें काम कांहीं लहानसहान आहे काय ? अशा कामीं आपल्या देशांतील भिन्न भिन्न प्रांतांत राहणाऱ्या, भिन्न भिन्न भाषा बोलणाऱ्या, व भिन्न भिन्न धर्म, चालो, रीति यांस अनुसरणाऱ्या राष्ट्रांशांनीं पूर्वोक्त ग्रीक लोकांच्या इतिहासापासून

जागृत होऊन आपसामध्यें ऐक्य व स्वदेशाभिमान उत्पन्न करण्याचा यत्न मनःपूर्वक केला तर होण्यासारखा नाहीं काय?

आतां ग्रीक लोकांचा इतिहास एकीकडे ठेवून आपण रोमन लोकांच्या इतिहासाकडे वळूं.

पाहा, रोमन लोक, म्हणजे इटाली देशांतील एक रोमनामक शहरांतील लोक, यांणीं आपल्या धैर्यानें, शौर्यानें, पराक्रमानें, स्वदेशभक्तीनें आपल्या शहरास आपल्या जुलमी राजाच्या सत्तेपासून सोडवून, प्रथम प्रजासत्ताक राज्य स्थापिलें. त्या प्रजासत्ताक राज्यानें हळू हळू रोम शहराच्या भोंवतालचीं इटाली देशांतील सर्व संस्थानें जिंकून त्यांमध्यें ऐक्यभाव उत्पन्न करून प्रायः सर्व युरोपखंड, आफ्रिकेंतील उत्तरभाग व एशियामधील पश्चिम भाग, यांजवर आपल्या सत्तेची स्थापना केली; आणि पुढें उद्भवणाऱ्या सर्व युरोपांतील राष्ट्रांस धर्म, न्याय, व राज्यपद्धति यांचे मार्ग घालून दिले. अशा त्या रोमन लोकांच्या विस्तीर्ण इतिहासापैकीं मला येथें एकदोन ठळक गोष्टींचाच उल्लेख करावयाचा आहे,—ज्या दोन गोष्टी मुख्यत्वेंकरून त्यांच्या प्रजासत्ताक राज्याच्या उन्नतीस कारणीभूत झाल्या. त्यांपैकीं पहिली गोष्ट ही कीं, रोमन लोकांमध्यें वरिष्ठ लोक व कनिष्ठ लोक अशा प्रकारचे दोन भेद परंपरेनें झाले होते. आरंभीं सर्व प्रकारचे अधिकार व सर्व प्रकारचें स्वातंत्र्य केवळ पूर्वोक्त वरिष्ठ लोकांसच प्राप्त झालें होतें. कनिष्ठ वर्गांतील लोक सर्वप्रकारच्या अधिकाराविरहित होते. या दोन वर्गांतील लोकांमध्यें परस्पर विवाहादि

संबंधसुद्धां होत नसत. त्याच्यायोगें असें होऊं लागलें कीं रोमन लोकांवर आसपासच्या संस्थानांनीं हल्ला केला म्हणजे त्यांचा प्रतीकार करण्याच्या वेळीं युद्धास तयार होण्यास पादाक्रांत झालेले कनिष्ठ वर्गांतील लोक तयार होतना. ते म्हणूं लागले कीं वरिष्ठ लोकांनीं आम्हांस सारखे अधिकार द्यावे म्हणजे त्यांजबरोबर आम्ही लढाईस जाऊन परचक्राचा परिहार करूं. वरिष्ठ लोकांतील सुज्ञ गृहस्थांनीं कांहीं दिवस गोडीगुलाबीच्या गोष्टी सांगून कनिष्ठ वर्गांतील लोकांची अनुकूलता रक्षण केली; परंतु अशानें कार्यभाग होईना. तेव्हां हळूहळू सर्व प्रकारचे अधिकार आपल्यासारखेच कनिष्ठ वर्गांतील लोकांसही प्राप्त होण्यास मोकळीक करून दिली. त्याच्या योगानें त्यांच्यातील हे कृत्रिम भेद मोडून, वरिष्ठ व कनिष्ठ दोन्ही वर्ग एकवटून रोमन लोक या एका नांवानें ते सर्व विख्यात होऊन, प्रायः सर्व पृथ्वीला भारी झाले.

या गोष्टीपासून आपल्या लोकांनीं घेतला तर एका प्रकारचा मोठा उपयुक्त असा बोध करून घेतां येणार नाहीं काय ? आपल्यांतही वरिष्ठ व कनिष्ठ अशा प्रकारचे जातिभेद बहुत कालापासून उत्पन्न होऊन अत्यंत दृढ झालेले आहेत. जसे पूर्वोक्त दोन वर्गांत अधिकाराच्या संबंधानें कलह होऊं लागले तसे आपल्याही वरिष्ठ व कनिष्ठ जातींमध्यें जबरदस्त कलह नेहमीं चालले आहेत, व त्यांच्या योगानें देशोन्नतीच्या कामास लहानसहान हरकत होत आहे असें नाहीं. यास्तव

वरिष्ठ मानलेल्या जातींतील पुढारी पुरुषांनीं रोमन वरिष्ठ जातींच्या लोकांप्रमाणें एकंदर देशाच्या हिताकडे लक्ष देऊन कनिष्ठ मानिलेल्या जातीच्या लोकांस उदारभावानें व प्रांजल बुद्धीनें जर हळूहळू समानाधिकारित्व देण्यास राजी होऊन उभयतांचें ऐक्य संपादिलें, तर स्वदेशाचा केवढा लाभ होणार आहे ! प्रस्तुत काळचे प्राचीनविद्याविभूषित, परंतु पाश्चात्यविद्यारहित, ब्राह्मण प्रकृत युगामध्यें मधले दोन वर्ण म्हणजे क्षत्रिय व वैश्य मुळींच नाहींतसे होऊन केवळ ब्राह्मण व शूद्र हे दोनच वर्ण राहिले आहेत, असें म्हणतात. तिकडे लक्ष दिलें म्हणजे रोमन लोकांच्या वर्गभेदांत व आमच्या देशांतील वर्णभेदांत संख्यासाम्यही येतें; तर रोमन लोकांचें अनुकरण करून आपल्या लोकांनींही हळू हळू पूर्वोक्त ऐक्य स्थापन केलें तर त्यापासून देशोन्नतीच्या उद्योगास केवढा जोर येईल ? व हल्लीं मुसलमान, पार्शी व आपल्यावर राज्य करणारे इंग्रज लोक यांस आपसांतील भेदामुळें जे हिंदु केवळ कस्पटाप्रमाणें वाटत आहेत तसे मग वाटतील काय ? निःसंशय वाटणार नाहींत. दुसरी गोष्ट अशी कीं जेव्हां जेव्हां प्रजासत्ताक रोमन राज्यावर परचक्राचें संकट येई, तेव्हां तेव्हां सर्व लोकांत युद्धकौशल्यानें व गुणानें जो कोणी श्रेष्ठ पुरुष असेल तो कोणत्याही वर्गातला किंवा स्थितींतला असला तरी त्याला राज्य चालविणारे मुत्सद्दी लोक बोलावून आणून आपले सर्व अधिकार त्यास देऊन त्याच्याकडे सेनापतित्वाचें काम देत; व

तेही पुरुष स्वदेशरक्षणाच्या कामीं आपलें हातांतलें काम एकीकडे ठेवून, एकदम रोम शहरास जाऊन, आलेलें अरिष्ट आपल्या पराक्रमानें निवारण करून, विजयी होऊन परत आले म्हणजे आपल्यास दिलेले सर्व अधिकार स्वसंतोषानें सोडून, देशाचें धुरीणत्व सोडून, आपापल्या गांवीं आले तसे अस्वार्थबुद्धीनें परत जाऊन, आपापलें स्वतांचें घरचें काम, मग तें शेत नांगरण्याचें कां असेना, तें पुनः निरभिमानानें व निमूटपणें करावयास लागत. आपल्या पराक्रमानें मिळविलेल्या यशाचा, किंवा संपत्तीचा, किंवा प्रांताचा, यत्किंचित्ही अभिलाष करीत नसत. अशा प्रकारचे पुरुष त्या लोकांत होते तेथपर्यंत तें प्रजासत्ताक राज्य उन्नत्तीच्या शिखरावर जाऊन पोंचलें होतें. याही गोष्टीपासून आपणास एक महत्त्वाचा बोध करून घेतां येईल.

आपल्या देशाच्या अर्वाचीन इतिहासांत स्वार्थलोभी राजकारणी पुरुषांनीं व सरदारांनीं मोठ्या आणीबाणीच्या व संकटाच्या प्रसंगीं केवळ आपल्या स्वतांचे लाभाकडेच दृष्टि देऊन एकंदर लोकांचें, व परिणामीं त्याच्या पोटीं आपलें स्वतांचेंही अकल्याण करून घेतलें, अशीं उदाहरणें थोडीं आढळतात असें नाहीं. जर आपल्या लोकांची देशोन्नति करण्याविषयीं खरोखर इच्छा असेल तर आपणांमध्यें कोरिओलेनस, सिन्सिनेटस इत्यादि अस्वार्थबुद्धि रोमन लोकांतील वीर पुरुषांचें उदाहरण पाहून, त्यांच्यासारखी अस्वार्थपरता संपादिली, व

प्रसंगीं तिला अनुसरून स्वदेशहिताचे कामीं यत्न केला, तर देशोन्नतीचें काम पुढें जाईल यांत संशय आहे काय?

यूरोपाच्या इतिहासांतील तिसरी महत्त्वाची गोष्ट मला येथें सांगावयाची आहे ती, ख्रिस्ती धर्माचा उत्कर्ष व प्रसार ही होय. कालांतरेंकरून ख्रिस्ती धर्माचें विपरीत रूपांतर होऊन त्याच्या योगानें बुद्धिस्वातंत्र्य, व्यवहारस्वातंत्र्य, व राजकीय स्वातंत्र्य इत्यादिकांचा संकोच होऊन लोकोन्नतीचा क्रम बहुत काळपर्यंत बंद पडला होता, व ख्रिस्ती धर्माचे नांवानें मोठमोठीं भयंकर युद्धें व स्वातंत्र्यावलंबन करणाऱ्या मनुष्यांचा अनिर्वाच्य छळ व पुष्कळ अनीति व अनाचार यांचीही प्रवृत्ति झाली हें खरें; परंतु आरंभींच्या दोन तीन शतकांत युरोपांतील लोकांस जो मोठा एक दोन गोष्टींचा लाभ झाला त्याच्या योगानें युरोपाच्या इतिहासाचा ओघ कल्याणकारक दिशेकडे वळला यांत संशय नाहीं. त्या गोष्टींतली पहिली ही कीं ख्रिस्तीधर्माचें मत मानवी समूहांत दृढ झालेले जे उच्चनीच व स्वामिसेवक इत्यादि कृत्रिमवर्ग ते अन्यायाचे होत असें असल्यामुळें, युरोपांत जसजसा ख्रिस्तीधर्माचा प्रसार होत चालला तसतशी स्त्रिया व दास यांस नीच, आणि स्वातंत्र्य व ज्ञानप्राप्ति यांस अपात्र असें मानण्याची जी घातक चाल तिजविषयीं हळू हळू तिरस्कार उत्पन्न होऊन स्त्रीजातीचें स्वातंत्र्य वाढून त्यांच्यामध्यें ज्ञानाचाही फैलाव होऊं लागला. आजन्म दास्याची दुष्ट चालही बंद पडत चालली,

व मनुष्यमात्राचे ठायीं ईश्वराची सारखी दृष्टि असल्यामुळें कोणत्याही मानवी व्यक्तीशीं अन्यायानें वर्तन केलें असतां तें ईश्वरी दृष्टीनें पाप असून अन्याय करणारा दंडास पात्र होतो, अशा प्रकारची लोकांची समजूत होत चालली. तेणेंकरून मनुष्यांच्या परस्पराशीं वर्तनांत न्यायपरता व सौजन्य हे गुण विशेष उद्भूत होऊं लागले. त्याचप्रमाणें पूर्वधर्मव्यवस्थेंत तांत्रिक भागाचें प्राबल्य असल्यामुळें चित्ताची व आचरणाची पवित्रता आणि परम पवित्र, परम न्यायी, व परम दयाळू, सर्वव्यापी असा जो परमेश्वर त्याची शुद्ध व सप्रेम भक्ति हें जें धर्माचें मुख्य रहस्य त्याजकडे दुर्लक्ष्य होतें. परंतु ख्रिस्ती धर्माच्या प्रसारानें या धर्मरहस्याकडे लोकांचें विशेष लक्ष लागूं लागलें, आणि भक्ति, नीति व आत्मशुद्धीचीं दुसरीं साधनें या गोष्टींकडे लोकांचें लक्ष धर्माच्या बाबतींत विशेष जाऊं लागलें. हें जें युरोपाच्या इतिहासांत पहिलें धर्मपरिवर्तन झालें त्यापासून आपल्या देशांतील धर्मविषयक अज्ञानाच्या समजुती कमी होऊन धर्माच्या शुद्ध स्वरूपाचें ज्ञान लोकांमध्यें प्रसृत करण्याविषयीं उद्योग झाला असतां त्यापासून लोकांच्या केवळ अध्यात्मिक हिताचीच नव्हे, तर लौकिक, व्यावहारिक व राष्ट्रीय हिताचीही वृद्धि होऊन लोकोन्नतीचा मार्ग विशेष सुलभ होत जाईल, अशा प्रकारचा बोध घेतां येणार नाहीं काय ? शुद्ध ज्ञानाची ज्योती ख्रिस्ती धर्मानेंच प्रथम प्रदीप्त केली असें नाहीं. ग्रीक लोकां-

मध्यें महात्मा साक्रेटीस व महाज्ञानी प्लेटो व अरिस्टाटल, तसेंच रोमनलोकांमध्यें महाज्ञानी व नीतिपक्षपाती सिसेरो, सेनेका इत्यादिकांनीं शुद्ध ज्ञानाचे विचार, नीतीचीं शुद्ध तत्त्वें व धर्मविषयक मार्मिक कल्पना आपल्या भाषणांनीं व आपल्या ग्रंथांचे योगानें आपापल्या काळीं तत्तद्देशीं प्रकाशित करण्याच्या यत्न पूर्वी केलाच होता; परंतु ख्रिस्ताचे प्रेषित शिष्य यांणीं व मुख्यत्वेंकरून उदारबुद्धि महात्मा प्रेषित पाल व त्याचे पुढें झालेले अनुयायी यांणीं, ग्रीक व रोमन लोकांत उत्पन्न झालेलें अध्यात्मविज्ञान आपल्या विशुद्ध धर्मसंस्थेंत ग्रहण करून धर्मज्ञान व धर्माचरण यांचा शुद्ध ओघ युरोप खंडामध्यें सोडून विशेष प्रसृत केला. त्याचप्रमाणें आपल्याही देशांत शुद्ध धर्मज्ञानाचा उदय फार प्राचीन काळींच होऊन गेला असून त्यावर पुढें युरोपावर जसें बहुत कालपर्यंत अज्ञानाचें आवरण पडून ज्ञानाचा लोप झाला त्याचप्रमाणें आपल्या देशांतील महात्मे व महाज्ञानी वरुण, याज्ञवल्क्य, अथर्वा, सनत्कुमार, नारद, व्यास इत्यादि विख्यात पुरुषांनीं आध्यात्मिक विचार व धर्म व नीति यांचीं विशुद्ध तत्त्वें यांविषयीं बोध उपनिषदादि तत्त्वज्ञानाच्या ग्रंथांत वेळोवेळीं करून ठेविला आहे; परंतु त्यावर बहुत दिवस अज्ञानाचें आवरण पडत येत असल्यामुळें धर्म, नीती, व सदाचार यांचें शुद्ध स्वरूप लुप्तप्राय होऊन शाब्दिक विचार, वेदांतज्ञान व तांत्रिक धर्माचार व दूषितज्ञानमूलक अविशुद्ध नीतिविचार यांचें प्राबल्य

आपल्या लोकांमध्यें झालें आहे. त्याच्या योगें अनेक अज्ञानमूलक व अविचारमूलक बंधनांनीं आपण बद्ध झालों आहों. राजकारणस्वातंत्र्याची गोष्ट एकीकडे राहो. तें आपल्या देशांतील लोकांनीं प्रजेच्या नात्यानें कधीं अनुभविलें असेल असें म्हणण्यास विशेष आधार दिसत नाहीं; आणि आतांही प्रबळ परराज्याचे सत्ते खालीं तें कधीं प्राप्त होईल व मुळीं प्राप्त होईल किंवा नाहीं, याची मोठी शंकाच आहे. परंतु आपल्या सामाजिक रीति, आपला लोकव्यवहार, गृहरीति, व व्यक्तिव्यवहार या गोष्टींचें ज्ञानानुरूप, विचारानुरूप कालानुरूप जें रूपांतर झालें पाहिजे तें करून घेण्याचें स्वातंत्र्य आह्मांस नाहींसें झालें आहे आणि सर्व प्रकारें आपण भ्रष्टबुद्धि, हतवीर्य व मृतप्राय झालों आहों. आज सुमारें पाऊणशें वर्षांपासून या आपल्या पूर्वोक्त स्थितीविषयीं पाश्चात्य विद्येच्या प्रकाशानें व त्या प्रकाशाचें प्रतिबिंब आपल्या कित्येक अति प्राचीन व ज्ञानप्रचुर ग्रंथांवर पडून त्यांच्या अवलोकनानें व पाश्चात्य लोकांच्या व्यवहारसरणीच्या अनुभवानें, राजा राममोहनरायप्रभृति कित्येक विचारशील पुरुषांनीं धर्माचें, नीतीचें व लोकव्यवहाराचें विशुद्ध स्वरूप आपल्या लोकांत प्रकट करण्याचा यत्न केला आहे, व तो सफळ झाला असतां व्यक्त्युन्नति, सामाजिक उन्नति व एकंदर राष्ट्रोन्नतीच्या कामीं दिवसानुदिवस उद्योग करण्यास विशेष उमेद अवश्य येईल; व हल्लीं परस्थ लोकांनीं आपल्यास कशींही दूषणें दिलीं व कितीही हेळणा केली तरी तें सर्व निमूटपणें ऐकून

घेऊन स्वस्थ बसावें लागतें, तसें लागणार नाहीं. आणि युरोपांत जसें ख्रिस्तीधर्माच्या प्रसारानें लोकस्थितीचें यथोचित रूपांतर झालें, तसें यथार्थ ज्ञानानें, सद्धर्माचे, सुनीतीचे, व सद्व्यवहाराचे प्रसारानें आपल्याही लोकस्थितीचें योग्य रूपांतर झाल्यावांचून राहाणार नाहीं; परंतु ह्या लोकोन्नतीच्या ओघास मिथ्याभिमानरूप अडथळा झाला तर एक तर हा ओघ माघारा फिरेल, किंवा आलेल्या अडथळ्यास आपल्या तीव्र वेगानें भेटून असें भयंकर लोकस्थितीचें परिवर्तन होईल कीं मागाहून आपण हा ओघ सामोपचारानें पुढें जाऊं दिला असता तर बरें झालें असतें, असें आपल्यास वाटल्यावांचून राहाणार नाहीं.

यूरोपाच्या इतिहासांतील चौथी गोष्ट मला येथें सांगावीशी वाटते ती विद्योज्जीवन ही होय. ह्या गोष्टींतही यूरोप व आपला देश या दोहोंमध्यें अत्यंत आश्चर्यकारक साम्य आहे असें आपल्यास वाटल्यावांचून रहाणार नाहीं. यूरोपांत ख्रिस्ती धर्माचे विशुद्ध तत्त्वांचा प्रसार त्या धर्माचे प्रचारक यावत्कालपर्यंत केवळ परमार्थबुद्धीनें व लोककल्याणाच्या इच्छेनें करीत होते, तावत्कालपर्यंत त्याचा परिणाम युरोपांतील लोकस्थितीवर एकंदरीनें फार कल्याणकारकच होत गेला; परंतु पुढें धर्मोपदेशकांच्या अंतःकरणांत स्वार्थबुद्धीनें प्रवेश केल्यानंतर, व त्यांतील मुख्यमुख्यांच्या ठायीं महत्त्वाकांक्षा उत्पन्न झाल्यानंतर त्यांचें लक्ष. खरा परमार्थ-

बोध करण्यापेक्षां व खरें लोककल्याण वाढविण्यापेक्षां, आपले अधिकार, आपली सत्ता, आपलें ऐश्वर्य प्रथम साधेल त्या उपायांनीं वाढविण्याकडे व वाढल्यानंतर तें रक्षण करण्याकडे, मुख्यत्वेंकरून लागलें. तेव्हांपासून यूरोपीय लोकांमध्यें सत्यज्ञानाच्या प्रसाराचा ओघ बंद पडत जाऊन अज्ञानाचें आवरण पडूं लागलें. धर्माच्या व नीतीच्या परमार्थिक स्वरूपाविषयीं विस्मृति होऊन तांत्रिकधर्म प्रबळ होत चालला; व सद्धर्म व सद्विचार यांच्या योगानें पूर्वकालीन बंधनें शिथिल होऊन, योग्य स्वातंत्र्याची जी वृद्धि होत होती ती बंद पडून नवीं धर्मसंबंधनें उत्पन्न होऊन सर्व यूरोपांतील लोकसमूह त्यांनीं खिळल्यासारखे होऊन गेले; व सुमार दहा संवत्सरशतकेंपर्यंत अज्ञानरूपी घोर तमोमय आवरणानें यूरोपास व्यापून टाकिलें. तद्वतच आपल्याही देशांत फार प्राचीन काळापासून चालू असलेलें अज्ञानमिश्रित देवताविज्ञान, व त्या विज्ञानास उचित अशीं प्राणिहिंसामिश्रित यज्ञयागादि कर्में, यांचें स्वरूप यथार्थ ज्ञानानें विशुद्ध करावें म्हणून उद्भूत झालेलीं वेदांत, बौद्ध, व भागवत हीं तीन मतें पूर्ण विकास पावलीं नाहींत, तोंच धर्मप्रवर्तक आचार्य ब्राह्मणज्ञातीचें महत्त्व रक्षण करण्याकरितां केवळ बाह्य व तांत्रिक धर्माचारांची पुनः स्थापनें करून पूर्वोक्त उद्भूत झालेल्या विशुद्ध ज्ञानप्रतिपादक मतांस मागें टाकूं लागले. त्यायोगें व नानाकल्पनाजालरचित पौराणिक कथांच्या प्रसारानें लोकबुद्धीवर अज्ञानाचें आवरण इतकें

जबरदस्त पडलें, कीं युगांचीं युगें गेलीं आहेत तरी तें अद्याप फारसें दूर होऊं लागलें आहे असें नाहीं. पुढें पूर्व यूरोपांत पंधरावे शतकांत राज्यक्रांति होऊन, जीर्ण झालेल्या रोमन राज्याच्या विनाशकालीं तुर्की लोकांचा अंमल तेथें बसल्यामुळें थोडीबहुत धुमसत राहिलेली ग्रीक व रोमन विद्या व तिचें रक्षण करणारे पंडित, व त्यांचीं रक्षणसाधनें प्राचीन ग्रंथ, या सर्वांनीं निराश्रित झाल्यामुळें मध्य व दक्षिण व पश्चिम यूरोपांत ठिकठिकाणीं ज्ञानाभिमानी गृहस्थांचा व राजपुरुषांचा आश्रय केला. तेव्हां सूक्ष्मविचारी ज्ञान्यांच्या दृष्टीस पडूं लागलें कीं प्राचीनकाळीं विद्याप्राप्ति व तत्संबंधी शोध पुष्कळ प्रकारचे झालेले असून, ते धर्मबंधनरहित होत्साते अप्रतिहत चालले होते. असें त्यांच्या दृष्टीस पडल्यापासून हळू हळू त्यांचा उद्योग चालू असलेल्या धर्मबंधनास शिथिल करून लोकबुद्धीचें स्वातंत्र्य पुनः उद्भूत करण्याकडे, व बहुतकालापासून लोकबुद्धीवर असलेलें आज्ञानावरण दूर करून यथार्थ ज्ञानाच्या प्रसाराकडे लागत चालला. ज्या गोष्टीस यूरोपाच्या इतिहासांत विद्योज्जीवन असें म्हटलें आहे, त्या विद्योज्जीवनानें हळू हळू युरोपिअन लोकांतील विचारी पुरुषांची मनें प्रकाशित होतां होतां पुढें होणाऱ्या मोठ्या धर्मपरिवर्तनाचीं पूर्वचिन्हें ज्ञानी जनांच्या उद्गारांत बाहेर पडूं लागलीं. आपल्याही देशांत पाश्चात्य विद्येच्या प्रसारानें धर्म, नीति, लोकव्यवहार, राज्यपद्धति इत्यादि गोष्टींच्या संबंधानें यूरोपांतील दिवसानु-

दिवस वृद्धि पावणाऱ्या यथार्थ ज्ञानाचा व आपल्या देशांत पूर्वकालीं उद्भूत होऊन बहुतकाळापासून लुप्तप्राय झालेल्या यथार्थ ज्ञानाचा प्रकाश लोकबुद्धीवर प्रस्तुत काळीं पडत असल्यामुळें, बहुत दिवसांचें अज्ञानरूपी आवरण हळू हळू दूर होत चाललें आहे; व त्याच्या योगानें जें बुद्धिपरिवर्तन होत आहे, तें अवश्य होणाऱ्या पुढील धर्मप्रवर्तनाचें पूर्वांग अथवा पूर्वचिन्ह आहे, असें मानण्यास हरकत नाहीं. आतां यूरोपांत धर्माधिकाऱ्यांची जबरदस्त सत्ता असून, व धर्मस्वातंत्र्याचें अवलंबन करणाऱ्यांस देहांतशासनरूपी अत्युग्र दंड देण्याचें सामर्थ्यही त्यांच्या अंगीं असून, हीं पूर्वचिन्हें जिवावर उदार होणाऱ्या मनुष्यांच्या ग्रंथांत व चरित्रांत दिसूं लागलीं; त्यापेक्षां आपल्या देशांत इतकें कठोर धर्मशासन नसल्यामुळें विशेष जास्त व्यक्तीकडून व विशेष स्पष्ट रीतीनें हीं चिन्हें दाखविण्यांत आलीं पाहिजेत. तशीं अद्याप आलीं नाहींत, हा आपल्या एकंदर दुर्बलतेचा परिणाम होय. परंतु अत्यंत आश्चर्यकारक गोष्ट ही कीं, गतानुगतिक धर्मबंधनें—जीं अत्यंत घातक चालींचीं रक्षणसाधनें आहेत, तीं—पुष्कळ पाश्चात्यविद्यायुक्त गृहस्थ देखील केवळ गतानुगतिकत्व पत्करून अज्ञजनसमूहाची मर्जी रक्षण करण्यासाठीं भूषणत्वानें स्वीकारून, त्यांचे शिथिल होत चाललेले पाश पुनः दृढ करण्याच्या उद्योगास पुष्टी देऊन, आपल्या लोकोन्नतीचें पुढें पडत चाललेलें पाऊल मागें ओढून तिचा पाडाव करावयास पाहातात ! प्रस्तुत काळीं आपल्या

उन्नतीचा मार्ग किती खुला आहे पहा ! उन्नतीस अनुकूल अशा पाश्चात्य व प्राच्य उभय विद्यांचा प्रसार अप्रतिहत सुरू झाला आहे. आपल्या धर्माधिकाऱ्यांच्या अंगीं उग्रदंडाचें सामर्थ्य राहिलें नाहीं; व त्यांणीं युरोपासारख्या धर्मस्वातंत्र्यावलंबन करणारांचा बारकाईनें शोध करून, त्यांचा छल करून, प्रज्वलित अग्निकाष्ठांनीं त्यांस देहांत शासन ठरविणाऱ्या दुष्ट न्यायसभा तर कधींच काढिल्या नाहींत. धर्मादिकांच्या बाबतीत राजकर्तृक दंडाची तर मुळींच धास्ती राहिली नाहीं. अशा प्रकारें मार्ग खुला असतां जर देशोन्नतीच्या कामीं आमचें पाऊल जोरानें पुढें पडत नाहीं, तर त्याचें कारण पूर्वोक्त सामान्य दुर्बलता तर आहेच, परंतु त्याशिवाय उत्साह, धैर्य, स्वदेशनिष्ठा, स्वदेशाभिमान इत्यादि सद्गुणांचा अभाव, व स्वार्थपरता, मात्सर्य-असहिष्णुता इत्यादि दुर्गुणांचें अस्तित्व हींही विशेष कारणें आहेत.

वर यूरोपांतील ज्या विद्योज्जीवनाविषयीं उल्लेख केला त्यास अत्यंत साह्यभूत होणारी अशी एक कला यूरोपांत पंधराव्या शतकांत जर्मनी देशांत गटेम्बर्ग नांवाच्या मनुष्यानें काढिली; ती ग्रंथाक्षरें छापून एका ग्रंथाच्या पाहिजे तितक्या प्रती करण्याची किंवा छापण्याची कला ही होय. ही कला परिपूर्ण दशेस येत जाऊन आज साडेचारशें वर्षांत ज्ञानप्रसारास व विद्यावृद्धीस साधनभूत जें ग्रंथप्राचुर्य तें किती वाढलें आहे याचा विचार केला म्हणजे मोठें आश्चर्य वाटतें; व यूरो-

पांतील कुशाग्रबुद्धि शोधक पुरुषांच्या बारीकसारीक किरकोळ यत्नांपासूनही यूरोपास व एकंदर जगास केवढाले अमूल्य लाभ झाले आहेत, याचा विचार केला असतां आपल्या देशांतील बुद्धिमान् व्यक्तींनीं आपल्या बुद्धीचा उपयुक्त शोधांचे कामीं निष्ठापूर्वक विनियोग करणें किती अगत्याचें आहे हें ध्यानांत आल्यावांचून रहात नाहीं. तशाच प्रकारची दुसरी गोष्ट महासाहसी व शोधकबुद्धि जो विख्यात नाविक कोलंबस यानें आपल्या अचाट तर्कानें व साहसानें अटलांटिक् महासागरासारख्या पूर्वी अवितीर्ण अशा अगाध व अफाट समुद्राचें पर्यटन करून नानाप्रकारचीं संकटें सोसून व अनेक अडचणींतून पार पडून शेवटीं पश्चिमेकडील एका महाद्वीपाचा शोध लाविला ही होय. या शोधापासून युरोपांतील नाविक व व्यापारी यांच्या उद्योगांस केवढा आचाट जोर आला, व बुद्धिमान् पुरुषांच्या बुद्धीची धांव नवीन शोधार्थ किती साहसानें वाढूं लागली, याचा विचार केला म्हणजे त्या कोलंबसाच्या शोधाचें महत्त्व ध्यानांत येतें. या कोलंबसाच्या जलपर्यटन कल्पेनस त्या काळीं धर्माधिकाऱ्यांनीं ती कल्पना पवित्रशास्त्रगतज्ञानाविरुद्ध मानून थोडी हरकत केली असें नाहीं; परंतु त्या महापुरुषानें ती जुमानली नाहीं; व अनेक प्रकारची विपत्ति मोठ्या धैर्यानें व उत्साहानें सोसून शेवटीं आपली लोकांस अत्यंत अविश्वसनीय वाटणारी कल्पना खरी करून दाखविली. हल्लीं तर समुद्रयान केवळ पायवाटेसारखें सुलभ झालें आहे. नवीन मार्ग शोधून

काढावयाचा आहे असें नाहीं; नवीन अगाध समुद्र उलंघून जावयाचेंही नाहीं. फक्त आपल्या देशांतून दुसऱ्या प्रख्यात देशीं जाण्याकरितां जलपर्यटन करण्याची जरूर लागते. त्या जलपर्यटनाचासुद्धां द्विजांस म्हणजे ब्राह्मणादि त्रैवर्णिकांस महापातक्यांप्रमाणें मानून सर्वथा निषेध करणारे महापंडित अद्यापीही आपल्या लोकांत आहेत. तेव्हां कोलंबसादि युरोपीय नाविकांचा कित्ता घेऊन पूर्वोक्त निषेध न जुमानून धडाक्यानें उपयुक्त जलपर्यटन करण्याचा क्रम सुरू केला तर त्याच्या योगानें केवढा लाभ होईल बरें !

ह्या दोन पंधराव्या शतकामध्यें घडलेल्या गोष्टी फक्त प्रसंगोपात्त आल्या आहेत, त्यांचा मुख्य घडामोडींत संग्रह करीत नाहीं.

युरोपाच्या इतिहासांत पांचवी मोठी गोष्ट म्हटली म्हणजे सोळावे शतकांत झालेलें मोठें धर्मपरिवर्तन ही होय. आपल्या देशांत ज्याप्रमाणें निरानिराळ्या मतप्रवर्तक आचार्यांचे मठ निरनिराळ्या ठिकाणीं स्थापन होऊन लोकांवर तत्तन्मतानुसारें धर्माधिकार चालविण्यासाठीं गुरुपरंपरेनें प्रथम मठस्थापकाचार्य यांच्या नांवानें जे आचार्य होत आले, ते पूर्वींची धर्मविषयक अत्यंत आस्था व प्रथमाचार्यांची वैराग्यपरता विसरून जाऊन भिन्न भिन्न राजांपासून देणग्या संपादून इतर संस्थानिकांप्रमाणें आपण संस्थानिकच बनले, त्याप्रमाणें युरोपांतही ख्रिस्तीधर्माधिकारी देशोदेशीं ख्रिस्तीधर्म संप्रदायरक्षणार्थ

मठ स्थापून मठाधिपति बनले, व राजांनीं दिलेल्या देणग्यांनी गबर होऊन हळू हळू राजकारणांत ढवळाढवळ करूं लागले, व बहिष्काररूपी अस्त्राच्या जोरानें मोठमोठ्या चक्रवर्ती राजांवर देखील आपला पगडा बसवूं लागले. या सर्व मठाधिपतींमध्यें रोम येथील मठाधिपति साक्षात् प्रेषित पीटर यांच्या शिष्यपरंपरेंतील मानला गेल्यामुळें पोप, म्हणजे पिता, अर्थात् धर्मोपदेशक-पिता, या नांवानें सर्व मठाधिकाऱ्यांमध्यें प्रबळ होऊन आपली सत्ता केवळ इतर धर्माधिकाऱ्यांवर चालवूं लागला असेंच नाहीं, तर मोठमोठ्या राजांवरही आपल्याकडे अधिकार घेऊन अंमल चालवूं लागला. होतां होतां हा अंमल इतका दुःसह झाला कीं कित्येक देशांतील राजे व संस्थानिक आपल्या स्थितीविषयीं जागृत होऊन पोपाचा अधिकार जुमानीतनासे झाले; व कोणी कांहीं धर्ममतांत थोडा फेरफार प्रसिद्ध केला तरी त्याजवर पोपाकडून फार जुलूम होऊं लागल्यामुळें पोपाची अन्यायी व जुलुमी सत्ता दुःसह मानूं लागले. इकडे कांहीं काळापासून पोप व त्याच्या हाताखालचे इतर धर्माधिकारी व ठिकाठिकाणचे धर्मोपदेशक यांचें चित्त ज्या ज्या प्रकारें लोकांकडून पैसा निघेल त्या त्या प्रकारें तो काढण्याकडे लागलें. आपल्या देशांत जशी ब्राह्मणांचें अंगुष्ठतीर्थ घेतल्यानें, त्यास शिधा, भोजन व दक्षिणा दिल्यानें, सुवर्ण, गाई, भूमि इत्यादि दान केल्यानें बहुतेक प्रकारच्या पापांचें क्षालन होतें अशी बहुतेक लोकांची सम-

जूत आहे, व त्याप्रमाणें असंख्य लोक ब्राह्मणांस नानाप्रकारचीं ब्राह्मणांनीं योजिलेल्या नानानिमित्तांनीं दानें करून आपल्या मतें आपल्या पापांचें क्षालन करून घेत आहेत; निरनिराळ्या महातीर्थांचे ठायीं तीर्थोपाध्याय ब्राह्मण यांचा दक्षणाद्वारें संतोष केल्यावांचून स्नानादि तीर्थविधि सफल होत नाहीं, या समजुतीनें भोळे भाविक लोक पुष्कळ वेळां नाइलाजामुळें आपल्या इच्छेबाहेर व शक्तिबाहेरही देणग्या देऊन तीर्थविधि करून घेत आहेत; व बुद्ध गयेस 'तेरे पितर सरग भयो,' हा मंत्र म्हणून यजमानाची पाठ थोपटून सर्व पितरांस मुक्त करणाऱ्या आणि द्रव्यानें मदोन्मत्त झालेल्या, ब्राह्मणांस पुष्कळ द्रव्य देऊन आपले पितर मुक्त करून घेत आहेत. हा जसा भोळ्या भाविक लोकांपासून पापमोचनार्थ द्रव्य घेण्याचा सपाटा चालला आहे, तसाच युरोपांतही धर्माधिकारी व धर्मोपदेशक यांनींही बहुतकाळापासून चालविला होता; परंतु त्यांनीं इकडच्या धर्माधिकाऱ्यांवर कमाल करून द्रव्यद्वारें पोपादि धर्माधिकाऱ्यांचीं पापक्षालनपर धर्मशासनें लोकांस विकत देऊन त्यांस पापमुक्त करण्याचा क्रम सुरू केला. मग धर्मोपदेशकांनीं पोपाच्या खऱ्या किंवा खोटच्या पापमोचक शासनपत्रांचे मोठमोठे रुमाल बरोबर घेऊन लोकांमध्यें फिरून, अमुक पापक्षालनार्थ अमुक द्रव्य दिलें म्हणजे अमुक प्रकारचें शासनपत्र द्यावयाचें, याप्रमाणें द्रव्यप्राप्तीचा धोपट रस्ता काढला. अशा प्रकारें कांहीं काळ लोटल्यावर

विचारी धार्मिक पुरुषांच्या मनांत असें करणें पवित्रशास्त्राविरुद्ध व अन्यायाचें असून अशानें कोणाचें पापक्षालन व्हावयाचें नाहीं, असें येऊं लागलें. अशा विचारी धार्मिक मनुष्यांपैकींच धर्मोपदेशक **मार्टिन् ल्यूथर** हा विख्यात पुरुष होता. त्यानें प्रथम या व दुसऱ्या अशाच प्रकारच्या धर्माच्या नांवानें चालणाऱ्या अनाचारांची अशास्त्रता व अन्याय्यता एका ग्रंथामध्यें प्रतिपादन करून तो ग्रंथ लोकांमध्यें प्रसिद्ध केला. तेव्हां पुष्कळ शिक्षित लोकांचीं व संस्थानिकांचीं मनें जागृत होऊन त्यांस ल्यूथराचें म्हणणें प्रशस्त वाटलें. पुढें पोपानें मोठमोठ्या राजकीय व मुत्सद्दी व धर्माधिकारी अशा पुरुषांची जर्मनीच्या चक्रवर्ती बादशहाकडून एक मोठी धर्मसभा भरविली; व तिजपुढें ल्यूथरास आपले ग्रंथ घेऊन येण्याविषयीं शासनपत्र पाठविलें. त्यास कित्येकांनीं प्राणनाश होईल हें भय घातलें, परंतु तें न जुमानितां तो धर्मसभेपुढें जाऊन उभा राहिला. तेथें त्यास आपलीं मतें नाकबूल करण्याविषयीं मुख्य धर्माधिकाऱ्यांनीं प्रसिद्ध रीतीनें, व कित्येक संस्थानिकांनीं खासगी स्नेहाच्या नात्यानें सांगितलें, पण तें त्याणें मान्य केलें नाहीं, आणि परत गेला. पुढें थोड्या दिवसांनीं पोपानें बादशाहाकडून त्यास बहिष्कृत करून, त्यास कोणीं कोणत्याही तऱ्हेचें साह्य करूं नये याविषयीं राजशासन प्रसिद्ध करविलें. पोपाचें धर्मशासन तर ल्यूथरानें आपल्या युनिव्हर्सिटीमध्यें जाळून टाकलें; व बादशाही शासनही बादशाही अमलाविरुद्ध उठलेल्या कित्येक

संस्थानिकांच्या पाठबळानें जुमानलें नाहीं. तेव्हां जशा एका विस्तवाच्या ठिणगीनें एखादी मोठी गवताची गंजी भस्म होऊन जाते, त्याप्रमाणें सर्व जर्मनीभर लोकांचीं मनें खवळून पोपाच्या अधिकाराची इमारत ढांसळून पडून चकाचूर होऊन गेली. पुढें कांहीं काळानें इंग्लंड, स्काटलंड, वगैरे युरोपांतील इतर उत्तरेकडील देशांत हळू हळू हें धर्मपरिवर्तन विजय पावून, त्या देशांतील बहुतेक प्रजा रोमन क्याथलिक धर्माच्या अज्ञान-वर्धक, पापयुक्त व जुलमी अन्यायाच्या व अत्याचाराच्या हातून सुटली. ल्यूथर व इतर शास्त्रज्ञ पुरुषांनीं धर्मशास्त्राचीं चालू लोकभाषांमध्यें भाषांतरें करून भ्रमाचा भोपळा फोडला; व पोपाद्यधिकाऱ्यांनीं स्वेच्छेनें निर्मिलेल्या धर्मपद्धति बाजूस ठेवून केवळ पवित्र शास्त्राच्या आधारानें जीं मतें व ज्या धर्मपद्धति योग्य वाटल्या त्याच तेवढ्या स्थापन केल्या. हें जें प्रचंड धर्मपरिवर्तन झालें त्यापासून बहुत काळपर्यंत युरोपिअन लोकांच्या बुद्धीवर पडलेलें जें अज्ञानाचें आवरण तें दूर होऊन, बुद्धिस्वातंत्र्य, व्यवहारस्वातंत्र्य, राजकारणस्वातंत्र्य, इत्यादि सर्व प्रकारच्या स्वातंत्र्याची इच्छा लोकांच्या मनांत येऊन तिला मोठी बळकटीही आली. तेव्हांपासून नवीन तत्त्वविचार, नवीन शास्त्रीय शोध, नवीन व्यापारधंद्याचे उद्योग, नवीन कलाकौशल्याच्या तऱ्हा, नवीन रीतरिवाजाच्या पद्धती मोठ्या वेगानें अमलांत येऊं लागल्या; आणि युरोपाचा भाग्यसूर्य जो बहुतकालपर्यंत अस्तंगत झाला होता, तो पुनः उदयास येऊन तेव्हांपासून

एकसारखा वर चढत जात आहे, व आपला चंडप्रकाश सर्व पृथ्वीवर पसरीत आहे. त्याच प्रकाशाचे अंशानें या देशांतील अज्ञानपटलही निशीर्ण होत चाललें आहे. परंतु या देशाचा भाग्यसूर्य बहुत दिवसांपासून मावळलेला जरी पुनः उदयास येतो आहे, तरी तो उन्नतस्थानापन्न होण्यास युरोपांतील धर्मप्रवर्तनाप्रमाणेंच येथेंही धर्मप्रवर्तन झालें पाहिजे, असा बोध आपल्यास युरोपाच्या इतिहासाच्या या भागापासून घेतां येणार नाहीं काय? आपल्या देशांतील धर्मग्रंथही अद्याप लोकांस अज्ञात, व धर्माधिकारी व धर्मोपदेशक यांसही प्रायः अज्ञात, अशा भाषेमध्यें आहेत. सर्व धर्मपद्धति, संस्कारप्राक्रिया, व अनुष्ठानप्रयोग, याजक व यजमान उभयतांसही दुर्गम अशा भाषेंत आहेत. कल्पित कादंबऱ्यांसारखीं लिहिलेलीं पुराणें, व अज्ञानमूलक, स्वार्थलोभमूलक, विचारशून्य, दानादि केवळ बाह्यक्रियावर्धक, नानाव्रताविधायक ग्रंथ, ज्यांच्या ब्राह्मणोक्त ज्ञानावर प्रायः आपल्या देशांतील सर्व लोकांचा धर्मव्यवहार चालत आहे, तीं पुराणें व ते ग्रंथही अद्याप अपरिचित भाषेतच प्रायः आहेत. याप्रकारें ज्ञानसाधनशून्यतेमुळें कित्येक मिथ्याचार, कित्येक अनाचार, व कित्येक अत्याचार लोकांमध्यें अजून यथेच्छ चालले आहेत. देशोन्नतीस अत्यंत अपकारक अशा चालींनीं व विघ्नकारी अशा सत्यमिथ्या मतांनीं शास्त्राचे नांवावर देशोन्नति व्हावी असें इच्छिणारांच्या इच्छेस व उद्योगास आळा घालून टाकिला आहे. तर हें सर्व माज-

लेलें आडरान निर्मूल करून टाकून खऱ्या ज्ञानाच्या प्रकाशानें आपल्या लोकांची दृष्टि निर्मल, तेजस्वी, सूक्ष्म व दूरगामी अशी होण्याला युरोपांतील सत्यैकनिष्ठ व निर्भय व निर्भिड अशा ल्यूथरादि थोर पुरुषांप्रमाणें देशी भाषांत धर्मविषयक व नीतिविषयक व सदाचारविषयक विवेकयुक्त ज्ञानाचा प्रसार करण्याचें काम जारीनें सुरू केल्यांवाचून हा देश पुनः युरोपाप्रमाणें उन्नत झाला पाहिजे आहे तो कसा होईल ? शास्त्रीबोवांनी किंवा भटजीबोवांनीं वाहवा करून मान डोलवावी अशी आशा धरून गतानुगतिक न्यायानें सर्व अज्ञानोत्थित व अविवेकवर्धित चालीरीतींस अल्प प्रतिष्ठेसाठीं मान देऊन राहिल्यानें कधीं तरी या देशाचा खरा भाग्योदय होईल काय ? कधींही व्हावयाचा नाहीं. ज्ञान जर अज्ञानाला वश राहून मी आपला काल कादून नेईन असें म्हणेल तर त्याचें समाधान किंवा कल्याण यांतून एक तरी होईल काय ? एकही व्हायचें नाहीं. यूरोपांतील पूर्वोक्त धर्मपरिवर्तनाचा पुरा अनुभव घेऊन पूर्ण जागृती पावलेल्या, व प्रायः केवळ सद्विवेकास अनुसरून लोकव्यवहारांचें उचित व अवश्य असें रूपांतर करणाऱ्या, सत्यैकशोधपरायण, ज्ञानसंपन्न, राजकारणचातुर्यसंपन्न, नानाकलाकौशल्यसंपन्न, सर्वत्र विजयी, पराक्रमशील, तेजस्वी, बलिष्ठ व उन्नतिशील अशा राष्ट्राशीं ईश्वरी सूत्रानें आपला संबंध झाला आहे. त्याच्या राजसत्तेखालीं आपणांस त्यांचे बरोबरीनें राजनिष्ठायुक्त तर खरेंच परंतु सर्व प्रकारें उन्नत स्वातंत्र्य प्राप्त व्हावें अशी

इच्छा आपल्या लोकांत कित्येकांच्या मनांत उद्भवत आहे. ही महत्त्वाकांक्षा सिद्धीस नेण्याच्या उपायांचाही विचार चालला आहे. परंतु असें दिसतें कीं कित्येकांस राष्ट्रीय सभेचा उद्योग हाच एक मोठा व अपेक्षितहेतुसाधक उपाय होय असें वाटत आहे. परंतु माझ्या अल्प समजुतीनें वर सांगितलेल्या धर्मपरिवर्तनाप्रमाणें बऱ्याच अंशी तरी प्रबल धर्मपरिवर्तनावांचून लोकव्यवहारप्रवर्तन व्हावयाचें नाहीं. लोकव्यवहारप्रवर्तन यथायोग्य झाल्यावांचून राष्ट्रप्रवर्तन आपोआप होईल ही कल्पनासुद्धां संभवत नाहीं.

सहावी गोष्ट यूरोपाचे इतिहासासंबंधें जी सांगणें मला इष्ट वाटतें तो सत्रावे शतकांत इंग्लंडामध्यें जी राजक्रांति झाली ती होय. पूर्वोक्त धर्मपरिवर्तनाच्या योगानें इंग्लिश लोकांमध्यें जो स्वातंत्र्यप्रियता उद्भूत झाली होती, ती हळूहळू वाढत चालली असतां, तिच्या योगानें इंग्लंडांतील राज्यकारभारावर दक्षतेनें दृष्टि ठेवणारें असें जें इंग्लिश पार्लमेंट, म्हणजे प्रजाप्रतिनिधिमंडल, तेंही हळूहळू बळावत चाललें होतें. पुढें जेव्हां पहिल्या चार्लस राजाच्या कारकिर्दींत अनेक प्रकारचा अत्याचार राजकारणी पुरुषांनीं करून, लोकांमध्यें वसुलाच्या नवनव्या बाबी सुरू केल्या, व अयोग्य प्रकारें राज्याचा खर्च वाढवून तो वसूल करण्याकरितां प्रतिनिधिमंडलापाशीं कायदा करण्याचे कामीं साह्य मागितलें, तेव्हां त्या मंडलानें असें सांगितलें कीं हल्लीं लोक अन्यायाच्या राज्यपद्धतीनें पोडा पावत

आहेत, त्यामुळें त्यांचीं गाऱ्हाणीं ऐकून त्यांजवरील होणाऱ्या जुलुमांचा निरास झाल्यावांचून आमच्यानें खर्चाचा पैसा वसूल करण्याचा कायदा कबूल करवत नाहीं. तेव्हां राजानें अपेक्षित द्रव्य संपादन करण्यास नवनव्या गांजणुकीच्या तऱ्हा काढल्या. त्यांच्या योगानें लोकांचें मन फार खवळलें, व पार्लमेंटांतील कित्येक सभासदांनीं प्रथम सामोपचारानें, व ज्यास्ती जुलूम होऊं लागल्यावर स्पष्ट रितीनें राजशासनाची अयोग्यता दरबारास कळविली. तें राजास सहन न होऊन त्यानें आपल्या इच्छेविरुद्ध वर्तणाऱ्या प्रतिनिधींस अन्यायानें अटकेंत टाकिलें. त्याच्या योगानें तर पुष्कळ प्रजाप्रतिनिधी व मुत्सद्दी व सामान्य लोक यांचीं मनें जास्तीच खवळत चाललीं; आणि देशामध्यें राजपक्ष व प्रतिनिधिमंडलपक्ष, अथवा प्रजापक्ष, असे दोनपक्ष होऊन, दोहोंकडेही सैन्याची तयारी चालून, मोठमोठ्या भयंकर लढाया होऊन शेवटीं राजपक्षाचा सर्वांशीं पराभव होऊन राजा प्रजापक्षाचे हस्तगत झाला. मग राजावर अन्यायानें प्रजापीडन केल्याचा आरोप ठेवून त्यास देहान्त शासन ठरवून त्याचा शिरच्छेद केला. तेव्हांपासून पुढें मोठमोठे व्यत्यय आले तरी पार्लमेंटाचें स्वातंत्र्य व राजकारकीर्दीवर चोकस दृष्टि दिवसानुदिवस अधिकाधिक वाढतच गेली. त्यांतील कित्येक व्यक्तींचा वारंवार मोठा छळही झाला. परंतु कांहीं काळ मेघमालेनें सूर्य आच्छादित केला तरी तो शेवटीं विशेष प्रखर तेजानें सर्व मेघमंडल विखरून टाकून पूर्ण प्रभेनें पुनः जसा प्रकाशमान

होतो, त्याप्रमाणें प्रतिनिधिमंडल आपल्यावरील सर्व विघ्नें हळूहळू दूर करून शेवटीं असें प्रबळ झालें कीं त्याच शतकाच्या शेवटल्या भागांत जी लहानशी राजक्रांति झाली ती आपोआप राजानें स्वपदत्याग करून कांहीं दंगाधोपा झाल्याशिवाय झाली; व तेव्हांपासून प्रतिनिधिमंडळ आपल्या स्वतेजानें इतकें प्रबळ होत चाललें कीं अठराव्या शतकापासून प्रायः सर्व राज्यसूत्रें साक्षात् किंवा परंपरेनें त्याच्याच हातीं येतां येतां आजकाल पार्लमेंटाच्या सल्ल्याशिवाय राज्यसंबंधानें अंतर्गत किंवा बाह्य कोणतीही महत्त्वाची गोष्ट करण्याचें राजकारणी पुरुषांचे हातीं राहिलें नाहीं. यामुळें इंग्लिश राष्ट्र प्रजासत्ताक नसतांही एकंदरीनें प्रतिनिधिमंडलाच्या म्हणजे प्रजेच्या विचारानें चाललें आहे. ही जी राष्ट्रस्वातंत्र्याची व राज्यपद्धतीची उन्नतावस्था, जी पाहून सर्व पृथ्वीवरील लोक इंग्लिश लोकांची वाहवा करीत आहेत, जिच्या योगानें इंग्लिश राष्ट्र एक लहानसेंच राष्ट्र असूनही त्यास सर्व राष्ट्रमालेमध्यें एवढी मोठी मान्यता मिळत आहे, व जिच्या योगानें इंग्लिश राष्ट्राचा प्रभाव जगविश्रुत झाला आहे, ती अवस्था कधीं कालांतरीं इंग्रजी राज्याच्या छायेखालीं आपणास प्राप्त व्हावी, अशा इच्छेचा अंकूर ज्या लोकांचे मनांत उत्पन्न झाला असेल त्यांणीं ही एवढी घडामोड घडवून आणणाऱ्या सत्वधीर, दूरदर्शी, स्वदेशाभिमानी, पराक्रमी पुरुषांच्या गुणांचें होईल तितक्या अंशीं संपादन करण्याचा दृढनिश्चयपूर्वक प्रयत्न केला

पाहिजे. नाहींतर " उत्पद्यंते विलीयंते दरिद्राणां मनोरथाः " या रितीनें त्यांच्या सर्व मनोरथांची गति होईल हें उघड आहे. माझें असें म्हणणें नाहीं, व मला वाटतें कोणाही विचारी मनुष्याचें असें म्हणणें नसेल, कीं जितकीं संवत्सरशतकें इंग्लिश राष्ट्रास हल्लींची योग्यता प्राप्त होण्यास लागलीं, तितकीं त्याच्या तुलनेस येण्यास आपल्या लोकांस लागलीं पाहिजेत. थोडयाच काळांत जपान देशाची स्थिति यूरोपांतील राष्ट्रांशीं संबंध झाल्यानें व यूरोपांतील देशांबरोबर फार दळणवळण वाढल्यानें राष्ट्रीय व व्यावहारिक इत्यादि बहुतेक गोष्टींत किती पुढें गेली आहे हें ज्यांस माहीत आहे, त्यांस या आपल्या देशाची स्थिति उन्नतीच्या मार्गानें बदलण्यास फारच कालांतर लागलें पाहिजे असें म्हणतां येणार नाहीं. आतां त्या देशीं स्वदेशीय सरकाराचा अंमल असल्यामुळें त्यास आपल्या राष्ट्रीय संपत्तीचा सुधारणेच्या कामीं पाहिजे तसा झपाटयानें विनियोग करितां येत आहे; व त्या देशांतील लोकांचे डोळे सुधारणेच्या आवश्यकतेविषयीं यूरोपीय राष्ट्रांचें अवलोकन करून लवकर उघडले आहेत; व त्यांची लोकसंख्या बेताबाताची असून त्यांच्यामध्यें परस्परांच्या कल्याणाविषयीं, अतएव एकंदर लोकांच्या कल्याणाविषयीं, बेपरवा करणारे असे भिन्न भिन्न धर्मानुयायी लोकसमूह किंवा वर्णभेद नाहींत; व युरोपियन लोकांशीं त्यांचें पूर्णपणें दळणवळण होण्यास, नौकागमननिषेध, अन्नपानाचा स्पर्शास्पर्श, इत्यादिकांच्या संबंधानें लोकांच्या समजुतीचे किरकोळ

प्रतिबंध नाहींत. हीं व अशीं जपानी लोकांच्या देशोन्नतीचीं कांहीं कारणें आपल्या देशाच्या उन्नतीस अनुकूल नाहींत; म्हणून त्यांच्यापेक्षां आपल्याला जास्त काळ लागल यांत संशय नाहीं. परंतु तो काळ अगदीं आपल्या अटकळीपलीकडे पराकाष्ठेचा दूर आहे. अतएव त्याची मनांत कल्पना सुद्धां आणणें वेडेपणा आहे, असें जें कित्येकांचें म्हणणें आहे, तें माझ्या दृष्टीस सप्रमाण वाटत नाहीं. असो. हें थोडे विषयांतर झालें.

आतां यूरोपाच्या इतिहासांतील सातवी गोष्ट मला सांगावयाची आहे, ती फ्रान्स देशांत अठराव्या शतकाच्या शेवटीं जें मोठें प्रबळ राष्ट्रपरिवर्तन झालें त्याची होय. सोळाव्या व सत्राव्या शतकांत झालेल्या प्रचंड धर्मपरिवर्तनाच्या योगानें पोपादि धर्माधिकऱ्यांची स्वतंत्र सत्ता प्रायः सर्व उत्तरेकडील व पश्चिमेकडील देशांमध्यें कमी झाली; व त्या सर्व देशांत राष्ट्रीय संबंधानें धर्माधिकाऱ्यांस सर्व प्रकारें राजतंत्रानें राहाणें जरूर पडलें. फ्रान्स देशामध्यें तर पराक्रमी व विशालबुद्धि चौदावा लुई राजा याच्या कारकीर्दीत राजसत्ता इतकी प्रबल झाली, कीं देशांतील धर्माधिकारी व सर्व मुत्सद्दी अगदीं पूर्णपणें राजसत्तेखालीं आले व त्या राजाच्या इतर देशांशीं फ्रान्सचें वैभव वाढविण्याकरितां ज्या लढाया झाल्या,त्या सर्व व राष्ट्रांतील दरबारांवर आपली छाप बसविण्याकरितां लुई राजानें जीं अनेक कारस्थानें केलीं, त्यांच्या योगानें राज्याचा खर्च अतिशय

वाढला. त्यामुळें लोकांवर खर्चाचें ओझें जबरदस्त पडूं लागलें. चौदाव्या लुईच्या मागून जे राजे झाले त्यांच्या कारकीर्दींत धर्माधिकारी, मुत्सद्दी, इत्यादि बडे लोकांनीं राज्यकारभारांत मोठ-मोठ्या अधिकाराच्याजागा संपादून,अतिशय वाढलेल्या राज्य-खर्चाचा बोजा आपल्या दर्जाच्या लोकांवर, म्हणजे वरच्या प्रतीच्या लोकांवर, फारसा पडूं न देतां, गरीब प्रजेवर लादला. त्यासाठीं त्यांच्यावर नानाप्रकारचे कर व बाबी बसविल्या. तेणें-करून फ्रान्स देशांतील प्रजा विपत्तीनें फार गांजली गेली. तशांत बडेलोक आपल्या अधिकारानें, सत्तेनें, व वैभवानें मदो-न्मत्त होऊन गरीब लोकांस नानाप्रकारची पीडा करूं लागले. पण पुढें गांजलेल्या प्रजेची हालअपेष्टा पाहून कित्येक सदय व सुशिक्षित मनुष्यांच्या मनांत त्यांच्याविषयीं कळवळा येऊं लागला. ते हळू हळू असे उद्गार काढूं लागले कीं चालू असलेली लोकस्थिति एकंदर मानवी स्वभावास व धर्म,नीति इत्यादिकांच्या तत्त्वांस सर्वप्रकारें अनुचित आहे. मनुष्यें तेथून सर्व सारखीं; त्यांचा स्वातंत्र्याविषयीं, सुखोपभोगाविषयीं, वित्तरक्षणाविषयीं, अधिकार सारखा, कोणाच्याही इच्छेविरुद्ध कोणास कोणावर सत्ता चालविण्याचा हक्क नाहीं. राजाधिकार लोकांच्या इच्छेवर अवलंबून आहे; राजसैन्य लोकरक्षणार्थ आहे, राजा व त्याचे दरबारी व मुत्सद्दी इत्यादिकांचे खाजगी मतलब साधण्यासाठीं नाहीं. ही व या प्रकारचीं दुसरीं खरींखोटीं, किंवा आपाततः खरींखोटीं, कालमानानें बरींवाईट, भिन्नभिन्न लोकास्थितिसापेक्ष,

व चालत आलेल्या संस्थांस विध्वंसकारक, अशा प्रकारचीं मतें आपल्या ग्रंथांतून कित्येक ग्रंथकार प्रसिद्ध करूं लागले; व तीं पुष्कळ साधारण विचार करण्याऱ्या लोकांच्या चित्तांत उतरून, लोकवृत्तीचा कल चालू स्थितीस प्रतिकूल होऊं लागून, त्याचीं चिन्हें निरनिराळ्या स्वरूपानें दिसूं लागलीं. अशा स्थितींत पंधराव्या लुईची कारकीर्द गेली. पुढें सोळावा लुई गादीवर बसला तो स्वभावानें चांगला असून त्याचे विचारही चांगले होते. परंतु पूर्वोक्त आणीबाणीच्या प्रसंगीं जें राजकारणसामर्थ्य व चातुर्य पाहिजे, तें त्यांच्या अंगीं मुळींच नव्हतें. यामुळें पुढें ओढवणारा अनर्थ टाळण्याचा उपाय त्यांजकडून कांहींच झाला नाहीं. उत्पन्नापेक्षां खर्च तर फार वाढला; तो वसूल करण्याचे उपाय सुचतनासे झाले; राजकारणी पुरुषांच्या मसलती खुंटल्या. तेव्हां राजानें कांहीं प्रधानांच्या विचारें, धर्माधिकारी, मुत्सद्दी वगैरे बडे लोकांच्या ज्या राजकारणी सभा होत्या त्या मसलत घेण्याकरितां जमविल्या. परंतु ते आपल्या गांठचें द्रव्य खर्चून किंवा आपल्यास घस सोसून अशा संकटसमयीं सुद्धां राजास साह्य करण्यास कबूल होतना; आणि प्रजेवर तर आणखी जुलुमाच्या रितीनें खर्चाचा बोजा भीतीमुळें घालवेना. तेव्हां दुसरा कांहीं उपाय उरला नाहीं, असें पाहून प्रजाप्रतिनिधींची सभा, जी पुष्कळ दिवसांपासून जमविण्यांत आली नव्हती, तीही प्रधानांच्या मसलतीनें राजानें या वेळीं बोलाविली. याप्रमाणें या तिन्ही राजकारणी सभांचे

लोक पारिसमध्यें आले. तेव्हां दरबाराच्या मनांत या तिन्ही सभा निरनिराळ्या ठिकाणीं भरवून त्यांची सल्ला घ्यावी असें होतें; परंतु प्रजाप्रतिनिधिसभेचें असें सक्त म्हणणें पडलें कीं, या प्रसंगीं तिन्ही सभांची एक मोठी सभा जमवून तिच्यापुढें आणलेल्या गोष्टींचा विचार झाला पाहिजे. निरुपायामुळें राजा व दरबार यांस तसें करणें भाग पडलें, आणि तिन्ही सभांची मिळून एक मोठी सभा भरिली. त्या सभेंत प्रजाप्रतिनिधींचें वर्चस्व लौकरच पडून त्यांणीं सर्व सभेला राष्ट्रीय सभा असें नांव ठेविलें. या सभेनें असा निश्चय केला कीं राज्यसंबंधी सर्व व्यवस्था यथान्याय होण्याकरितां पूर्वीची सर्व पद्धति मोडून टाकून नवीन मनुष्यमात्रांच्या हक्कांस मान देऊन त्यांचें रक्षण करण्यास समर्थ अशी राज्य पद्धति स्थापन केल्यावांचून आह्मी ही सभा बरखास्त करणार नाहीं. असें म्हणून केवळ तात्विक दृष्टीनें, व पूर्वोक्त मतांच्या अनुरोधानें, एक नवीन राज्यपद्धति बहुमत तयार करून ती अमलांत आणण्याचा ठराव केला. इकडे पारिस शहरांतील विपत्ति भोगणारी, व साधेल तशी अविचारानें धुमाळी करणारी, व दैवयोगानें त्याच काळीं चालू असलेल्या दुष्काळामुळें अन्नान्नगतीस पावलेली प्रजा, एकाएकीं चवताळून त्या लोकांनीं प्रथम बास्टिल नांवाच्या बळकट किल्ल्यासारख्या तुरुंगावर हल्ला केला. त्या किल्ल्यांत कित्येक दिवसांपासून न्यायानें, अन्यायानें, व पाहिजे त्या रीतीनें गुन्हेगार

ठरविलेल्या लोकांस बंदींत ठेवण्याचा क्रम चालला होता. त्या गुन्हेगारांचे तेथें हवे तसे हाल करण्यांत येत असत. कित्येक त्या हालांत मरून जात, त्यांचा मागमूस सुद्धां बाहेर कोणास लागत नसे. कारण त्यांत शिक्षा भोगून जिवंत बाहेर येणारे लोक फारच थोडे निघत. अशा तुरुंगावर चवताळलेल्या नागरिक लोकांचा हल्ला झाल्यावर मग काय पुसायचें आहे ? त्यांनीं सांपडलीं तीं हत्यारें हातीं घेऊन, प्रथम त्या तुरुंगाचे दरवाजे फोडले; आंत जाऊन सर्व अंधारकोठडयांचीं कुलुपें तोडून जे कोणी जिवंत कैदी सांपडले त्यांस सोडून दिलें; व किल्लेदार व त्याच्या हाताखालचे अधिकारी व बंदोबस्ताचे शिपाई यांची भयंकर कत्तल केली. पुढें त्यांस कांहीं फौजेचे लोक सहाय होऊन शेवटीं राजवाडयावर हल्ला करून त्यांनीं राजास कैद केलें; व शेवटीं पूर्वोक्त राष्ट्रीय सभेंतील कित्येक पुढारी मंडळीच्या विचारानें राजावर लोकांचा छळ केल्याचा आरोप ठेवून, इनसाफाचें मिष करून, देहांत शासन ठरवून-शेवटीं जिवें मारिलें. या भयंकर प्रसंगीं लोकांस पीडा करणाऱ्या कित्येक बेडे लोकांचीही कत्तल झाली. हें पारिस येथील वर्तमान ऐकून देशांतील सर्व भागांत सर्व प्रकारची धुमाळी सुरू झाली. ही बेबंदबादशाही कांहीं दिवस चालून, शेवटीं नेपोलिअन नामक एका फौजेंतील विख्यात कामगारानें हळू हळू सर्व फौजेचा मुख्य अधिकार बळकावून, प्रथम नांवाची प्रजासत्ताक राज्याची स्थापना करून, शेवटीं सर्व प्रांतावर आपला

अंमल स्थापन करून, आपल्या नांवाची बादशाही स्थापिली. हा पूर्वोक्त भयंकर अनर्थ व शेवटीं प्रांतात स्थापित झालेली लष्करी बादशाही पाहून यूरोपांतील इतर देशांत पुष्कळ लोकांचीं मनें चंचल होऊं लागलीं; व फ्रान्सांत चालू असलेल्या प्रकाराचा पुष्कळांस मोठा तिटकारा वाटून, व सर्व राजमंडळास पुढें आपली काय स्थिति होते कोण जाणे असें भय पडून, फ्रान्साच्या लष्कराचा पराजय करण्याचा त्यांनीं कट केला. नेपोलिअनानें आपल्या नवीन तयार केलेल्या फौजेच्या साह्यानें, व आपल्या अचाट युद्धकौशल्यानें एकामागून एक स्पेन, इटाली, आस्ट्रिया इत्यादिक देश जिंकून शेवटीं रशियावर स्वारी केली. त्यांत त्याचे सैन्याची धुळधाणी होऊन पुढें त्याचा पराजय होत चालला. शेवटीं तो विरुद्ध झालेल्या राजमंडळाच्या सैन्याचे स्वाधीन झाला. परंतु त्यास जेथें कैदेंत ठेविलें होतें तेथून तो पुनः निसटून गुप्तरूपें फ्रान्सदेशास परत येऊन, आपल्या दाणादाण झालेल्या पूर्वीच्या सैन्यांतील बराच भाग एकत्र करून, शेवटीं वाटर्लू येथें १८१५ मध्यें अखेरचा पराभव पावून पुनः तेथें जमलेल्या राजमंडळाच्या हातीं लागला. त्यांनीं त्यास फार दूर सेंट हेलिना नामक बेटामध्यें मरेपर्यंत तुरुंगांत ठेविलें; व फ्रान्सांतील पूर्वीच्या राजवंशाची गादीवर पुनः स्थापना केली; आणि फ्रान्स देशास पुनः शांतीचा काळ आला. असो. हें जें यूरोपांत अचाट परिवर्तन झालें त्यापासून आपल्यास कांहीं बोध करून घेतां येईल कीं

नाहीं ? माझ्या समजुतीनें अवश्य येईल. तो हा, कीं आपल्या देशांतील जे विशेष वैभव अनुभविणारे प्रजावर्ग आहेत, त्यांनीं एकंदर प्रजेच्या स्थितीचा मुळींच कधीं विचार केला नाहीं, व फक्त आपापल्या पोळीवर तूप ओढून एकंदर प्रजा विपद्ग्रस्त होत आहे कीं सुखांत आहे इकडे मुळींच लक्ष दिलें नाहीं, तर त्यांचें तें वैभव तसेंच राहूं शकेल असें त्यांनीं मानतां कामा नये. मग तें वैभव राजकुलोत्पन्नत्वामुळें प्राप्त झालें असो, किंवा व्यापारानें प्राप्त झालें असो; धर्माधिकारित्वानें मिळालें असो, किंवा राजकारणपरत्वें मिळालें असो. ही गोष्ट राजकर्त्या पुरुषांनीं तशीच सर्व इतर समंजस लोकांनीं सतत जागृतीनें लक्षांत बाळगिली पाहिजे.

शेवटीं यूरोपाच्या इतिहासांतील चालू शतकांत घडलेली एक मोठ्या महत्वाची गोष्ट सांगून हा लेख संपवितों. ती गोष्ट इटाली व जर्मनी या दोन देशांत राष्ट्रैक्याची स्थापना ही होय. हीं दोन्ही राष्ट्रें बहुत कालापासून निरनिराळ्या कारणांनीं, म्हणजे अंतर्गत कलहांनीं, व बाह्य शत्रूंच्या अत्याचारांनीं दुर्बळ झालेलीं होतीं. या दोन्ही देशांत लहानमोठीं निरनिराळीं पुष्कळ संस्थानें असून त्यांच्यामध्यें नेहमीं कलह होऊन लढाया सुरू असत. आस्त्रिया देशाचे राजे इटाली हस्तगत करण्याच्या इच्छेनें तींतील संस्थानांवर वारंवार हल्ला करून त्यांस व प्रजेस जर्जर करीत; व त्यांमध्यें एकोपा होण्यास जबरदस्त प्रतिबंध करीत. जर्मनींतील संस्थानांच्या

कारभारांत फ्रान्सचें दरबार वारंवार हात घालून कोणाचेंही वर्चस्व होऊं देईना. इटाली व जर्मनी या दोहींतील पीडा पावलेली प्रजा व देशाभिमानी पुरुष राष्ट्रैक्याची फार दिवसांपासून इच्छा करीत होते; परंतु या परस्थ राजांच्या ढवळाढवळीमुळें त्यांचा हेतु सिद्धीस जाईना. परंतु आंतून जें हें मोठें कार्य करावयाचें त्याचे उपाय चालू झाले होते. पुढें इटाली देशांत ग्यारिबाल्डी नामें पराक्रमी योद्धा पुढें होऊन त्यानें फ्रान्सांतील बादशहाच्या मदतीनें, व इंग्लिशांच्या द्रव्यादि सहाय्यानें आस्त्रियाशीं लढाया करून जय मिळवून, इटाली देशांत राष्ट्रैक्य स्थापिलें. याप्रमाणें इटली हें स्वतंत्र राष्ट्र जाहल्यानंतर, फ्रान्सच्या ज्या नेपोलिअन बादशहाच्या साह्यानें ही महत्वाची गोष्ट घडून आली, त्याच नेपोलिअनाच्या अत्याचारानें जर्मनींतही अशीच महत्वाची गोष्ट घडून आली. हा इतिहासाचा भाग अगदीं अर्वाचीन असल्यामुळें याविषयीं विशेष विस्तारानें हकीकत सांगण्याचें कारण नाहीं. परंतु बहुत दिवस अंतर्गत भेदानें त्रस्त असलेल्या इटाली व जर्मनी ह्या दोन देशांत राष्ट्रैक्य कसें स्थापन झालें इकडे आपण लक्ष दिलें, तर भिन्न भिन्न धर्ममतानुयायी लोकसमूहांनीं, व परस्परांचा मत्सर करणाऱ्या वर्णांनीं, होणाऱ्या अंतर्गत भेदानें परराष्ट्रांच्या तिरस्कारास पात्र झालेला जो आपला देश, तो खऱ्या स्वदेशाभिमानादि राष्ट्रीय गुणांच्या वृद्धीनें राष्ट्रैक्याचें अनुपमेय सुख अनुभविण्यास योग्य होणार नाहीं, असें निश्चयेंकरून म्हणवेल काय?

यावर कोणी म्हणेल कीं आजकाल व्यक्तिस्वातंत्र्य, जीवितरक्षण, वित्तरक्षण, विद्यावृद्धि, इत्यादि सुखसाधनें या देशास व यांतील लोकांस प्राप्त असल्यामुळें जें सुख होत आहे त्यापेक्षां याच राजसत्तेखालीं राष्ट्रैक्य सिद्ध झालें अशी कल्पना केली तरी त्यापासून प्रजेस ज्यास्त लाभ काय होणार आहे? यास माझें असें उत्तर आहे कीं, हिंदुस्थानांत लोकमत मिळून कांहीं नाहीं, यास्तव राज्यप्रकरणांत लोकांचा विचार घेण्याची गोष्ट मुळींच शक्य नाहीं, म्हणून फक्त आपल्यास योग्य वाटेल तशी राज्यकारभाराची व्यवस्था केली पाहिजे, असें जें कित्येक इंग्लिश लोकांचें म्हणणें आहे, त्यास राष्ट्रास ऐक्य प्राप्त झाल्यानें जागा राहाणार नाहीं. कारण ऐक्य झाल्यानें राष्ट्राचें मत प्रायः एकरूपानें राजकर्त्यांस कळेल; व तें प्रायः राष्ट्रांतील माहितगार व विचारी पुरुषांच्या विचारानुसार असल्यामुळें राज्यसंबंधीं कर्तव्यनिर्णयास त्यापासून उपयुक्त साहाय्य झाल्यावांचून रहाणार नाहीं; आणि राज्यकारभाराचा पाया, प्रजेच्या खऱ्या स्थितीकडे लक्ष, प्रजेच्या खऱ्या मतांचें ज्ञान, व प्रजेच्या कल्याणाची अंतःकरणपूर्वक इच्छा, या तीन गोष्टींवर उभारला, म्हणजे तो बळकट झाल्यावांचून राहाणार नाहीं. कित्येक म्हणतील कीं हे विचार थोडक्याशा इंग्लिश शिकलेल्या लोकांचे आहेत. एकंदर प्रजा चालू अमलाखाली संतुष्ट असून तीस हल्लींची स्थिति पालटण्याची मुळींच इच्छा नाहीं. राष्ट्रैक्याची गोष्ट तर एकंदर प्रजेच्या ध्यानीं, मनीं, स्वप्नां देखील

नाहीं. त्यास एवढेंच उत्तर आहे कीं हे विचार जरी फक्त इंग्रजी विद्या शिकलेल्या लोकांच्याच मनांत प्रथम येत आहेत, तरी त्यांचा लय तेथेंच होत आहे असें कोणास वाटेल तर तें खरें नाहीं. दिवसानुदिवस निरनिराळ्या कारणांनीं ते विचार इतर पुष्कळ लोकांच्या मनांतूनही उतरताहेत; व त्यांचा फैलाव अधिकाधिक होत जाईल यांत संशय नाहीं. अतएव ते लोक विचार करण्यास पात्र नाहींत हें म्हणणें साहसाचें आहे. कित्येक इंग्लिश लोक हें विचार प्रकट करणाऱ्या विद्वान् लोकांस कृतघ्न असें मानून पाण्यांत पाहात आहेत. त्यांस आपण बिया रुजत घालून पाणी वगैरे घालून त्यांचे अंकूर फुटून लहान रोपे झाले, म्हणजे त्यांचा कंटाळा करून त्यांना निर्मूल करून टाकूं इच्छिणाऱ्यांचीच उपमा देणें योग्य आहे. त्यांच्या असें मनांत येत नाहीं कीं ह्या विचारांचा द्वेष करणें म्हणजे आपल्या देशांतून आपण आणलेल्या आपल्या विद्येचाच द्वेष करणें असें होतें; तेव्हा असें करणें हें प्रशस्त नाहीं. हे विचार फलद्रूप झाले असतां त्यापासून इंग्लिश राज्यास पूर्वीपेक्षां जास्ती बळकटी आल्यावांचून खचीत राहाणार नाहीं. तसें नसतें तर सुशिक्षित लोक हे विचार मुळींच प्रकट करतेना. कारण इंग्लिश लोकांच्या समागमाची आवड जशी सुशिक्षित लोकांस आहे, तशी इतर जनसमूहास मुळींच नाहीं. इंग्लिश भाषा, इंग्लिश रीतरिवाज, इंग्लिश विचार, इंग्लिश मनोवृत्ति, इत्यादिक गोष्टी सुशिक्षितांस आदरणीय वाटत असून, अशिक्षितांस अनादरणीय वाटत

आहेत. इंग्रजांच्या अंगीं असलेले गुण संपादन करण्याचें जर कोणाच्या मनांत वागत असेल, तर ते लोक सुशिक्षित लोकांतच सांपडतील, ती गोष्ट अशिक्षितांच्या ध्यानीं, मनीं, स्वप्नींही नाहीं. इंग्लिश इतिहास, इंग्लिश राज्यपद्धति, इत्यादि गोष्टींविषयीं सुशिक्षितांच्या मनांतच आदर आहे; अशिक्षितांस त्यांच्या ज्ञानाचा गंधही नाहीं. इंग्लंडाच्या शत्रूंचा द्वेष करणारे सुशिक्षितच लोक आहेत, अशिक्षितांस त्या गोष्टींचें भानही नाहीं. इंग्लंडदेशीं जाण्याची,तेथें राहाण्याची, त्या लोकांचें सौमनस्य संपादण्याची इच्छाही सुशिक्षितांसच आहे. अशिक्षितांस त्याची मुळींच गरज वाटत नाहीं. इंग्लिश राज्यपद्धतीचीं आधारतत्वें सुशिक्षितांसच कळत आहेत. म्हणून इंग्लिश राज्याविषयीं भक्ति व खरी राजनिष्ठा केवळ सुशिक्षितांच्याच अंतःकरणांत उत्पन्न झाली आहे. अतएव त्यांचा द्वेष न करितां, त्यांची आपल्या विषयींची पूज्य बुद्धि आपल्या उदार विचारांनीं व उदार वर्तनानें वाढवून, त्यांचे सद्विचार सिद्धीस नेण्याच्या कामीं अनुकूल होऊन साह्य करणें हेंच इंग्रज लोकांचें खरें कर्तव्य होय. ईश्वरेच्छेनें, त्यांच्या बुद्धि वैशिष्ट्यानें, गुणवैशिष्ट्यानें, व पराक्रमानें इंग्रजांस जी या देशावर सत्ता प्राप्त जाहाली आहे, ती त्यांचे हातून या देशाची सर्व प्रकारची उन्नति व्हावी ह्यासाठीं आहे. ती त्यांचे हातून होण्याला त्यांणीं आपल्या स्वतांच्या इतिहासाकडे लक्ष पुरवून, ह्या देशाच्या खऱ्या कल्याणाकडे लक्ष देऊन, ह्या देशांत उत्पन्न झालेला पैसा आपल्या देशांतील पैशाप्रमाणें

येथील राज्यव्यव थेकरितां काटकसरीनें खर्च करून, येथील लोकांचे अंगीं योग्यता येत जाईल तसतसें त्यांस समदृष्टीनें आपल्या राज्यकारभारांत व सल्लामसलतींत प्रांजळपणें सामील करून, या देशास मोठमोठ्या राष्ट्रांच्या पंक्तीस बसवून सोडणें अत्यंत आवश्यक आहे. तसेंच आपल्या लोकांनींही आपल्या देशास मुख्य राष्ट्रांमध्यें योग्यता प्राप्त होण्यास सर वुइलियम जोन्स यांच्या उक्तीकडे दृष्टि देऊन, नेहमीं आपले खरे हक्क काय आहेत हें जाणून, ते रक्षण करण्याकडे, व त्याहीपेक्षां विशेष निष्ठेनें आपलें कर्तव्य काय आहे हें जाणून तें बजाविण्याविषयीं नेहमीं तत्पर असलें पाहिजे. एवढी गोष्ट जर मीं जें येथवर यूरोपाच्या इतिहासांतील मुख्य प्रसंगांचें स्थूलदृष्टीनें व अति संक्षेपेंकरून निरूपण केलें आहे त्यापासून अंशतः तरी कोणाच्या मनांत उतरेल, तर हा माझा अल्प लेख मी सफल मानीन.



हिंदूलोकांत ऐक्याची वृद्धिहोण्यास हरकती व त्या दूर होण्याचे उपाय.

आपल्या या व्याख्यानमाला चालू करणाऱ्या मंडळीचा मुख्य उद्देश आपणां हिंदु लोकांमध्यें ऐक्य वाढवावें हा आहे; व तो सिद्धीस नेण्याकरितां आजपर्यंत जेजे उपाय योजण्यांत आले आहेत, त्यांस कांहीं अंशीं तरी यश आलें आहे असें मानण्यास हरकत नाहीं;व तेणेंकरून मंडळीचें कार्य अल्पस्वल्प तरी सिद्धीस जात आहे ही गोष्ट समाधान मानण्यासारखी आहे. तथापि या विषयाच्या संबंधानें कित्येक गोष्टींचा विशेष विचार करून मंडळीच्या हेतूच्या पुष्टयर्थ आपल्याकडून जो यत्न होईल तो करणें आपणांतून प्रत्येकाचें कर्तव्य आहे. असें मनांत आणून आज त्या संबंधानें यथामति मला जे विचार सुचत आहेत, ते आपल्यास सादर करितों. त्यापासून मंडळीच्या उद्योगास साक्षात् किंवा परंपरेनें यत्किंचित् साह्य झालें तरी माझा हेतु सफल जाहला असें मी समजेन. असो.

आजचा विषय ' हिंदू लोकांत ऐक्याची वृद्धि होण्यास हरकती, व त्या दूर होण्याचे उपाय, ' हा आहे. त्यापैकीं प्रथमतः हरकतींविषयीं विचार करूं लागलें असतां, पहिली हरकत दिसते ती ही कीं आपल्या लोकांस प्रस्तुत काळीं ऐक्याची वृद्धीची आवश्यकता वाटावी तशी वाटत नाहीं.

सामान्यदृष्ट्या ऐक्यापासून जो लाभ दिसतो त्याविषयीं आपण सर्वथा अनभिज्ञ आहों असें नाहीं; व ऐक्याविषयीं स्थूल दृष्टीचा विचार आपणांतून पुष्कळांच्या मनांत वागत नाहीं असें नाहीं. परंतु कालवर्तमानानुरूप आपणांमध्यें विशेष ऐक्याची अवश्यकता आहे, या गोष्टीकडे आपलें लक्ष्य पोंचावें तितकें पोंचत नाहीं असें मला वाटतें. ती आवश्यकता अशी कीं आपली सामाजिक स्थिति असावी त्यापेक्षां फार हीनावस्थेची आहे. म्हणजे, कित्येक चाली आपल्या समाजास स्पष्टपणें हानिकारक आहेत; व त्यांच्या संबंधानें फेरफार झाल्यावांचून आपली सामाजिक स्थिति आपल्यास व्हावयास पाहिजे तितकी समाधानकारक किंवा एकंदर लोकदृष्टीनें श्लाघ्य अशी होणार नाहीं. उदाहरण, अत्यंत अल्प वयांत मुलांचीं लग्नें करणें ही चाल प्रायः आपल्या सर्वलोकांत चालू असून, तिजपासून आपली संतति दुर्बल होत असून आपली आयुष्यमर्यादा अधिकाधिक क्षीण होत असून, तिच्या योगानें इतर लोकांच्या दृष्टीनें आपल्यास अत्यंत तुच्छता व उपहास्यता येत असून, आपल्यामध्यें त्या चालींत फेरफार करण्याचें पाहिजे तसें सामर्थ्य नाहीं, असें आपल्याला प्रांजलपणें कबूल करावें लागतें; व या गोष्टीच्या संबंधानें इतर लोकांनीं आपल्यास प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्ष रीतीनें कसेंही दूषण दिलें, तथापि तें निमुटपणें ऐकून घेऊन सहन करावें लागतें.

आतां कोणी म्हणेल कीं व्यक्तिविशेषाच्या यत्नानें ही चाल पालटूं शकेल. तर त्याविषयीं माझें असें म्हणणें आहे, कीं हें कांहीं अंशीं खरें आहे; आणि व्यक्तिविशेषांनीं पुढें होऊन कोणतीही अवश्य कर्तव्य गोष्ट केली नाहीं, तर सर्व समाज एकदम एका मतानें एकाद्या चालीच्या संबंधानें आवश्यक फेरफार करील, हीही गोष्ट बिलकूल संभवत नाहीं. तथापि मनुष्यमात्रामध्यें लोकैषणेचा अंमल स्वभावतःफार प्रबळ आहे. आपले इष्टमित्र, आप्तसुहृत्, शेजारीपाजारी, ज्ञातिबांधव, यांचा विद्वेष संपादून लोकापवादास पात्र होणें हें कोणासही आवडत नाहीं; आणि मानवी प्राणी समागमशील असल्यामुळें तसें असणें स्वाभाविक आहे.

' लोकापवादाद्भयं '

हें वचन सर्वांस माहीतच आहे. या वचनानुसारें लोकापवादभय हा एक व्यवहारज्ञ पुरुषांनीं गुणच मानिला आहे; आणि सामान्यतः त्यांचें मत कांहीं अयोग्य आहे असें नाहीं. म्हणून त्यासंबंधानें व्यक्तिविशेषास भित्रेपणाविषयीं दूषण देण्याचें काम मोठें नाजुक आहे, व तें फार विचारानें केलें पाहिजे. यास्तव व्यक्तिविशेषांकडूनच जरी चालू रीतींत फेरफार होण्यास आरंभ झाला पाहिजे, तरी त्यांच्याशीं ऐक्यानें वागण्यास जितकी जास्त मंडळी तयार असेल तितक्या मानानें जास्ती व्यक्ति पुढें येत जाऊन आवश्यक फेरफार जलद

होत जाईल यांत संशय नाहीं. या गोष्टीकडे लक्ष्य दिलें म्हणजे बालविवाहाच्या चालींत पाहिजे तसा फेरफार होण्यास ऐक्यवृद्धीची आवश्यकता आहे. त्याप्रमाणेंच विधवाविवाहाची गोष्ट आहे. आपल्या लोकांतील वरिष्ठ मानिलेल्या व म्हणविणाऱ्या ज्ञातींत पति निवर्तला असतां स्त्रियांस आमरण वैधव्यांत ठेवण्याची चाल आहे; मग स्त्रियेच्या कोणत्याही वयांत तें वैधव्य तिला प्राप्त होवो; अत्यंत अज्ञात दशेंत, बाल्यावस्थेंत, किंवा तारुण्यांत तिला पतिवियोग होवो किंवा वृद्धापकालीं होवो, चालू वहिवाटीप्रमाणें आमरण वैधव्य तिला भोगलें पाहिजे. ह्याही चालीच्या संबंधानें आपल्या लोकांत कोठें स्पष्टपणें, कोठें गुप्तपणें, व क्वचित् स्मशानवैराग्याच्या आवेशांत, दुःखोद्गार ऐकण्यांत येतात; व युक्तितः ही चाल अन्यायाची व दुःखावह आहे असें आपणांतील पुष्कळ लोक निरनिराळें कबूल करितात. ती बंद होऊं शकेल तर बरें, असें साधारण समजुतीच्या मनुष्यांसही वाटतें, व तीं तसें क्वचित् बोलूनही दाखवितात. ह्याप्रमाणें ही चाल आपणा स्वतांस असमाधानकारक, किंबहुना दुःसह वाटत असून, तिच्या योगानें वर्णबाह्य लोकांच्या दृष्टीनें तर आपण अत्यंत उपहास्यतेस पात्र झालों आहों. इतकी जरी ही चाल आपल्यास बाधक होत आहे, तथापि तींत फेरफार करण्याचें काम प्रायः व्यक्तिविशेषाच्या धैर्यावर, अस्वार्थपरतेवर, व दयेवरच सोंपवून आपण बसलों आहों. त्याविषयीं ऐक्यवृद्धिनें होणाऱ्या

सामाजिक साह्यवृद्धीकडे आपलें लक्ष्य पोचावें तसें पोंचत नाहीं.

तिसरी गोष्ट विधवाकेशवपनाची होय. हीही चाल पूर्वोक्त चालीप्रमाणें वरिष्ठ मानिलेल्या जातींमध्यें चालू आहे. ह्या चालीच्या संबंधानें अजून व्हावा तितका बोभाट जरी झाला नाहीं, तथापि पुष्कळ लोक, व पुष्कळ समंजस स्त्रियाही, आपणांस लांछनकारक अशा प्रकारचें दूषण देत आहेत यांत संशय नाहीं. आतां ही चाल जरी इतकी क्रूर आहे, तथापि पूर्वोक्त दोन चालीप्रमाणें व्यापक नसल्यामुळें तिकडे लोकांचें लक्ष्य कमी आहे. परंतु विचारी मनुष्याच्या दृष्टीनें तिच्या संबंधानें आपण उपहास्यतेस कमी पात्र आहों असें नाहीं. परंतु,

" उत्पद्यंते विलीयंते दरिद्राणां मनोरथाः "

या न्यायानें ऐक्यवृद्धीचे अभावीं त्यासंबंधीं विचार व मनोवृत्ति व्यक्तिविशेषांच्या अंतःकरणांत जेथल्या तेथें, ज्यावेळच्या त्यावेळींच उत्पन्न होऊन लय पावतात.

चवथी गोष्ट लग्न व मरण या दोन प्रसंगांच्या संबंधानें शक्तीच्या बाहेर, व पुष्कळ प्रसंगीं ऋण काढून खर्च करण्याची चाल आपणांपैकीं कित्येक जातींमध्यें चालू आहे. तिच्यायोगानें दारिद्र्य पावलेलीं अशीं कुटुंबेंही आपल्या दृष्टीस क्वचित् पडतात. परंतु ऐक्यवृद्धीच्या अभावीं ह्याही चालीपासून होणारें दुःख व्यक्तिमात्रास निमूटपणें सोसावें लागतें. कोणी तिचा अतिक्रम केलाच तर त्यास सर्वांच्या उपहास्य-

तेस पात्र व्हावें लागतें. या वर सांगितलेल्या सर्व चालींमध्यें फेरफार व्हावा ही गोष्ट नवीन विद्येचा संस्कार ज्यांच्या मनावर थोडाबहुत झालेला आहे, अशांपैकीं पुष्कळांस वाटत आहे. परंतु त्यांच्यांत ऐक्य विशेष दृढतेनें होऊन यत्न न झाल्यामुळें तो फेरफार होणें दिवसगतीवर पडत चाललें आहे.

यास्खेरीज कित्येक दुसऱ्या सामाजिक गोष्टींमध्यें फेरफार होण्यासही विशेषतः ऐक्यवृद्धीची आवश्यकता आहे. त्यांपैकीं कांहींचा उल्लेख येथें करितों. आपल्या लोकांत दानाची वासना पुष्कळ आहे व ठिकठिकाणीं श्रीमान् लोक दानधर्मही बराच करीत असतात; परंतु या दानधर्मांत सारसार विचारानें जी व्यवस्था अवश्य आहे ती घडत नाहीं. यामुळें अंध, पंगु, गलितकुष्ठ, किंवा इतरप्रकारें व्यंग होऊन आपली उपजीविका करण्यास खरोखरी असमर्थ झालेल्या मनुष्यांस कशीबशी निवाऱ्याची जागा, ओलेंकोरडें पोटापुरतें अन्न, व जाडेंभरडें चिरगुटपांघरूण आयास केल्यावांचून मिळून दैवदुर्विपाकानें परतंत्र झालेल्या त्या मनुष्यांचें प्राणरक्षण होईल, याविषयींची व्हावी तशी तजवीज होत नाहीं. यामुळें ठिकठिकाणीं असे पुष्कळ लोक अत्यंत दुःसह यातना सोशीत असतांही अन्नवस्त्रासाठीं दारोदार फिरतांना आढळतात. व्यक्तिविशेषास त्यांची ती दशा पाहून फार कींव येते, परंतु या व्यक्तिमात्रांच्या अल्पस्वल्प प्रयत्नांनीं त्यांचें दुःख फारसें कमी होत नाहीं. पुष्कल धट्टेकट्टे आळशी भिकारी मात्र नुसते आपण ब्राह्मणबंधु

म्हणून, किंवा अंगास राख लावलेले बैरागी म्हणून, किंवा बहुरूपी म्हणून, किंवा कानफाटे म्हणून, किंवा जंगम म्हणून, किंवा वतन गेलेले वतनदार म्हणून, अशा हरएक रूपानें दारोदार फिरून कधीं शिव्याशाप देऊन, भेवडावून किंवा फक्त हट्टानें धरणेकऱ्यासारखे बसून, लोकांस त्रास देऊन, त्यांपासून सिधा, पैसा, वस्त्रप्रावर्ण मिळवून, पुष्कळ प्रसंगीं आपलें यथा-स्थित पोट भरून गलेलठ्ठ बनतात. याप्रमाणें आपल्या लोकां-तील या दानवासनेचा पात्रापात्रतेनुरूप जसा सदुपयोग व्हावा तसा होत नाहीं. दानाकडे पैशाचा व्यय पुष्कळ होतो, परंतु एकोप्यानें त्याची जी योग्य व्यवस्था व्हावी, ती होत नाहीं; यामुळें भिकाऱ्यांच्या समृद्धीविषयीं आपला हिंदुसमाज सर्व लोकसमूहांत अगदीं अग्रगण्य झाला आहे.

दुसरी एक गोष्ट, जिच्या संबधांनें एकोप्यानें कांहीं यत्न झाला तरच तिजविषयीं योग्य बंदोबस्त होण्याचा संभव आहे. ती ही. आपल्या हिंदुलोकांच्या वस्तींत रस्त्यांतून, गल्ल्यांतून, नाक्यावरच्या जाग्यांतून जाणारे येणारे अशिक्षित लोक अगदीं साधारण गोष्टी बोलत असतांही सर्वथा अवाच्य व अश्राव्य अशा शब्दांचा व वाक्यांचा उपयोग करितात, व तसले शब्द बोलतांना स्त्रिया व मुलेंबाळें यांच्यासमक्ष तरी जी मर्यादा रक्षण झाली पाहिजे, तिचें बेधडक उल्लंघन करितात. कधीं-कधीं आपल्यास हे शब्द ऐकून मनुष्यवाणीचा इतका नीच उपयोग होतो, व त्यापासून क्वचित् कोंवळीं मनें बिघडून

जातात, याविषयीं वाईट वाटतें; व त्याचा कांहीं बंदोबस्त होईल तर फार बरें असें मनांत येतें. कदाचित् व्यक्तिमात्रांनीं खटपट केली असतां प्रसंगविशेषीं पोलिसाकडून एकाद्या मनुष्याच्या दुर्भाषणाविषयीं त्यास शिक्षा देवविण्याचें घडेल; परंतु विशेष एकोप्यानें पुष्कळांनीं एकविचार करून योग्य उपाय योजिल्यावांचून हा दुष्ट प्रचार कमी होण्याचा संभव नाहीं. या कित्येक सामाजिक चाली व गोष्टी झाल्या. यांच्या संबंधानें योग्य फेरफार होणें तो आपल्या लोकांत त्यासंबंधानें ऐक्य झाल्यावांचून व्हावा तसा होणें दुरापास्त आहे.

आतां आपण कांहीं व्यवहारिक गोष्टींचा विचार करूं. प्रस्तुतकाळीं आपल्या देशांत आपल्या निर्वाहाकरितां किंवा सोईकरितां अथवा चैनीकरितां जे पदार्थ लागतात, त्यांपैकीं करामतीनें होणारे पुष्कळ पदार्थ आपल्यास इतर देशांत तयार झालेले आणून वापरावे लागतात. याचें कारण कारागिरीच्या कामाचें कर्तृत्व इतर देशांत जसें वाढलें आहे तसें आपले देशांत वाढत नाहीं. आपल्या देशांतील परंपरागत चालत आलेले कारागिरीचे धंदे करणारे लोक अज्ञानानें म्हणा, किंवा दारिद्र्यामुळें म्हणा, किंवा एकोप्याच्या अभावामुळें म्हणा, बाहेर देशांतील कारागिरांची बरोबरी करूं शकत नाहींत. यामुळें, परदेशीं उत्पन्न होणाऱ्या जिनसांची गोष्ट राहूं द्या, मूळ आपल्या देशांतच उत्पन्न झालेल्या जिनसा, व्यापारी यूरोपांत किंवा अमेरिकेंत नेऊन, तेथें त्यांपासून करामतीचे पदार्थ

तयार करून, उलट आपल्याच देशांत आणून विलक्षण फायद्यानें विकतात. यामुळें व्यापारापासून वृद्धि पावणाऱ्या संपत्तीचा लाभ परकीयांस मिळतो; व आपल्यास मूळ उत्पन्न झालेल्या जिनसाची अल्प किंमत मात्र मिळते. हें एक आपल्या लोकांची दारिद्र्यरूप विपत्ति कमी न होण्याचें मुख्य कारण आहे. या देशांतील कारागिरांकरितां जर कांहीं उद्योगशाळा स्थापन झाल्या, व त्यांस योग्य यांत्रिक शिक्षण, व यंत्रें तयार करण्याची विद्या देण्यांत आली, तर परदेशांत तयार होऊन येणारे जिन्नस, आपल्याच देशांत तयार होऊन आपल्यास स्वल्प किंमतीनें मिळूं लागतील व असें झालें असतां आपली संपत्ति तेव्हांच वाढेल. परंतु अशा प्रकारच्या शिक्षणाचा प्रसार होण्यास पुष्कळ विद्वान् व खटपटी मनुष्यांचा उद्योग, व विपुल द्रव्याचें साह्य, या दोन गोष्टी पाहिजेत. त्या आपल्या लोकांत परस्परांविषयीं विश्वास व एकोपा वाढून ठिकठिकाणीं या कामीं सरकतीनें धनराशी तयार केल्यावांचून कशा होतील? याच प्रसंगानें वरील सामाजिक गोष्टींपैकीं एक विशेष गोष्ट सांगावयाची राहिली आहे, ती सांगतों. ती ही. इतर देशांत यांत्रिक विद्येची, कलाकौशल्याची, व अनेक उपयुक्त पदार्थ उत्पन्न करण्याकरितां योजिलेल्या रसायनादि व्यापारांचा काय स्थिति आहे हे सर्व समजून घेऊन, व तिकडील कसबें यथास्थित शिकून, बरेच आपले लोक तयार झाले पाहिजेत. परंतु या कामासाठीं तिकडे जाणाऱ्या लोकांस

द्रव्याचें साह्य पाहिजे. तिकडून जाऊन आल्यावर धर्मनिर्णायक लोकांनीं त्यांस "शोधितस्यप्यसंग्रह;" या एकदेशी व विशेषकालोचित कृतयुगीय वचनाच्या बळावर अत्यंत पतित समजून आपल्यांतून बाहेर काढून लावतां नये, किंवा त्यांजपासून प्रायश्चित्तरूप किंवा द्रव्यरूप दंड घेतां कामा नये; व ते परत आल्यानंतर त्यांचे निरनिराळे धंदे येथें सुरू होण्यास जे कारखाने तयार झाले पाहिजेत, ते होण्यास विपुल द्रव्यसाहाय्य पाहिजे. पण या सर्व गोष्टी आपल्या लोकांत ऐक्य वाढल्यावांचून कशा घडतील? तिसरी गोष्ट विद्याप्रसाराची होय. आपल्या लोकांमध्यें शारीरबळ, किंवा संपत्ति, अधिकारबळ फार कमी आहे; यामुळें आपली निकृष्टावस्था आहे, ही गोष्ट खरी. परंतु या सर्व बळांचा अभाव मुख्यत्वें ज्ञानबळाच्या अभावावर अवलंबून आहे. "ज्ञान हेंच बळ आहे," या अर्थाची जी इंग्रजी म्हण आहे ती सर्वांस ठाऊकच आहे. तिच्या सत्यतेचें उपपादन करण्याची आवश्यकता नाहीं. कृषी करणाऱ्या लोकांस म्हणा, किंवा कारागीर लोकांस म्हणा, किंवा व्यापारी लोकांस म्हणा, आपापल्या धंद्याच्या संबंधानें यूरोपीय व अमेरिकन लोकांत जे शोध, ज्या कल्पना, ज्या तजविजी, जी यंत्रसामुग्री वगैरे साधनें आजमित्तीस लोकव्यवहाराच्या कामीं उपयोगीं पडत आहेत, तीं सर्व साधनें एका अंशीं उपयुक्त ज्ञानाच्या प्रसारावर अवलंबून आहेत. तशा प्रकारच्या शिक्षणक्रमाचें ओझें बऱ्याच अंशीं आपल्या लोकांस

उचलावें लागेल. पण तें आपसांत ऐक्य वाढल्यावांचून कसें होईल ?

दुसरें, लहान मुलांस बाळपणांत फार श्रम किंवा आयास झाल्यावांचून ज्या या कित्येक गोष्टी डोळ्यांनीं दिसत आहेत, त्यांच्या संबंधानें शोधकबुद्धि वाढविणारें, कोंवळ्या मनांत विद्येची अधिकाधिक अभिरुचि उत्पन्न करणारें, व त्यांच्या कोमल चित्तास आवश्यक अशा प्रकारची कर्मणूकही करणारें उपयुक्त ज्ञान त्यांच्या शक्तीप्रमाणें मिळालें पाहिजे. ज्याच्या-योगानें हंसून खेळून, उडद्या मारून, बागडून, डोळे, कान वगैरे यांचा उपयोग होईल तितका करून, त्यांचे शरीरावयव सुदृढ व्हावे, त्यांच्या चित्तवृत्ति उल्लसित व्हाव्या, व त्यांच्या बुद्धीच्या निरनिराळ्या शक्तींचा सहज विकास व्हावा, अशा प्रकारच्या शिक्षणासाठीं त्यांच्याकरितां ठिकठिकाणीं यूरोपांतील बालशाळांच्या धर्तीवर शाळा निघाल्या पाहिजेत. त्याही सामाजिक उद्योगावांचून होणें दुर्घट आहे. परंतु लहानपणापासून अशाप्रकारचें शिक्षण मिळाल्यावांचून, पुढें जें वरिष्ठ शिक्षण मिळावयाचें तें यथायोग्य रीतीनें ग्रहण करण्याची शक्ति येऊं शकत नाहीं; व ज्ञानाला जें बळाचें रूप आलें पाहिजे, तें येण्याचा संभव कमी असतो. परंतु एकोप्यानें यत्न केल्यावांचून हा लहान मुलांच्या शिक्षणाचा आवश्यक मार्ग कसा खुला होईल ?

तिसरें, स्त्रियांस उपयोगी व उन्नतिकारक असें शिक्षण

मिळालें पाहिजे. त्यावांचून आपल्या व्यवहारामध्यें त्यांच्या बुद्धीचा जितका उपयोग व साह्य आपल्यास झालें पाहिजे, व त्यांच्या सुसमागमापासून आपल्या ठिकाणींही जे वरिष्ठ गुण उत्पन्न झाले पाहिजेत, ते व्हावे तितक्या अंशानें होऊं शकत नाहींत. परंतु अशा प्रकारचा शिक्षणक्रम चालू करण्यास ज्या गोष्टींची आवश्यकता आहे, त्या विशेष ऐक्यानें यत्न केल्यावांचून कशा जुळून येणार आहेत ? त्यांतही पूर्ववयांतच वैधव्य प्राप्त होऊन विपद्ग्रस्त व परतंत्र अशा असंख्य स्त्रिया आपल्या देशांत फार दुःखानें आपली उपजीविका करीत आहेत. त्या बिचाऱ्यांस शिक्षणविद्या, किंवा शिक्षणकला, किंवा चित्रकला, किंवा अल्पस्वल्प करामतीचे जिन्नस तयार करण्याच्या कला, त्यांच्या स्थितीस योग्य अशा मर्यादेचा अतिक्रम झाल्यावांचून, शिकविण्याचा कांहीं उपाय जर होईल तर, त्या हल्लीं केवळ आपल्या दैवास दूषण देऊन अंतकालाची वाट पाहात असतात, तसें न होतां किती चांगल्या प्रकारें आपला काल घालवितील बरें ! परंतु हाही उपाय बहुयत्नसाध्य असल्यामुळें ऐक्यावरच अवलंबून आहे. हीच गोष्ट अनाथ मुलांच्या संगोपनाच्या संबंधानेंही आहे.

याप्रकारें सामाजिक, व्यावहारिक व शिक्षणक्रमसंबंधी किती म्हणून मोठमोठीं कामें करावयाचीं आहेत ? जीं केल्यावांचून फार मागें पडलेल्या आपल्या या देशाचें पाऊल फारसें पुढें पडावयाचें नाहीं.

राजकीय गोष्टींसही हाच विचार लागू पडतो. हल्लीचें राज्यसूत्र परस्थ लोकांच्या हातीं आहे. सर्व वरिष्ठ कामदार परस्थ लोक आहेत. भाषा, धर्म, चालीरिती समजुती, व संपत्ति, विद्या, सामाजिक व्यवस्था वगैरे सर्व प्रकारच्या गोष्टीत त्या लोकांची स्थिति आपल्या लोकांच्या स्थितीहून अगदीं भिन्न असल्यामुळें व त्यांचें या देशांत राहाणें थोडा काळ असून तेंही आपल्यापासून एकीकडे अगदीं अलग अशा रितीचें असल्यामुळें, जशी त्यांची स्थिति आपल्या लोकांस चांगलीशी कळत नाहीं, त्याप्रमाणें आपल्या लोकांची स्थितीही त्यांस नीटपणें कळत नाहीं. त्यांनीं केलेले कायदे, राज्यपद्धती, व सर्व प्रकारच्या राज्यकारणसंबंधी तजविजी, यांपासून आपल्या लोकांच्या स्थितीवर काय परिणाम होत आहे ? त्यांची सोय वाढते आहे किंवा गैरसोय वाढते आहे ? त्यांचे हक्क रक्षण होत आहेत, किंवा ऱ्हास पावत आहेत ? ते विपत्तिग्रस्त होत आहेत किंवा संपन्न होत चालले आहेत ? ते चालू राज्यव्यवस्थेसंबंधानें कोणचे उद्गार काढतात ? संतोषाचे समाधानाचे, किंवा चिंतेचे, उद्विग्नतेचे, दुःखाचे किंवा नाखुषीचे ? निराशेचे किंवा आशेचे ? हें परस्थ कामगरांस यथास्थित कळण्यास मुळींच मार्ग नाहीं. असलाच तर फार थोडया अंशीं आहे.दुसरें,या देशांतील राज्यरूपशकट चालविणारे मुख्य सारथी इंग्लंडांतील सरकारच्या हुकुमाप्रमाणें चालत असल्यामुळें, व त्या सरकारचें लक्ष्य आपल्या खुद्द खासगत देशी

रयतेच्या हिताकडे साहजिक विशेष असल्यामुळें, व त्याच संबंधें त्यांस बरोबर माहिती असल्यामुळें, त्यांचें हितरक्षण करणें हा येथील राज्यव्यवस्थेचा मुख्य उद्देश असतो. यामुळें येथें होणारे कायदेकानू, लोकांवर बसणाऱ्या करबाबी, राज्यसंबंधानें होणारा खर्च, इत्यादिक गोष्टींनीं एतद्देशीय लोकांची स्थिति काय होत आहे, व त्यांचे हक्क त्यांस कोणत्या प्रकारानें मिळत आहेत, या गोष्टींकडे राज्यकर्त्यांचें लक्ष्य जितकें गेलें पाहिजे तितके जाऊं शकत नाहीं. तर लोकांची स्थिति व हक्क राज्यकर्त्या पुरुषांस बरोबर समजण्याला, व ती स्थिति यथासंभव सुखावह होण्यास व ते हक्क सुरक्षित होण्याला, कित्येक तजविजी झाल्या पाहिजेत. त्या तजविजींपैकीं राष्ट्रीय सभा ही एक चांगली चालली तर, मोठी तजवीज होय. या सभेच्या व्यवस्थेंत व तिणें हातीं घेतलेल्या कामांत पुष्कळ फेरफार झाला पाहिजे, हें खरें आहे; आणि हळूहळू तसा फेरफार होत जाणें सर्वथा असंभवनीय आहे. असें नाहीं परंतु ही राष्ट्रीय सभा यावी त्या स्थितीत येण्यास हिंदूलोकांनीं विशेष झटून यत्न केला पाहिजे. या सभेपासून जी कित्येक मोठ्या मोठ्या सरकारी कामगारांस व कित्येक मुसलमान गृहस्थांस व सरकारी कामगारांस व कित्येक इतर लोकांस भीति वाटत आहे तो माझ्या अल्प समजुतीनें निराधार आहे. राज्यव्यवस्थेसंबंधी आंतल्याआंत जी कुरकूर व मुसमूस लोकांमध्यें हमेश सर्व देशभर चालू राहाते, व जिच्या योगानें लोकांमध्यें सरकाराविषयीं

नाखुषी निष्कारण विशेष पसरते, ती माझ्या समजुतीनें राष्ट्रीय सभेच्या उद्योगापेक्षां सरकारचें व लोकांचेंही विशेष नुकसान करणारी आहे. त्यापेक्षां राज्यव्यवस्थेच्या संबंधानें ज्यांस विशेष माहिती आहे त्यांणीं त्यासंबंधीं पोक्त विचार करून, व लोकांची जी अनेकप्रकारची कुरकूर आहे तिच्या कारणांचा व योग्यायोग्यतेचा शोधक दृष्टीनें इत्यर्थ ठरवून राष्ट्रीय सभेसारख्या एखाद्या प्रसिद्ध सभेच्या द्वारें आपल्यास काय वाटतें हें जर वर्षांतून एक वेळ कारणांसह उघडपणें कळविलें, तर त्यापासून सरकारास आपल्या व्यवस्थेविषयीं राज्यांतील मुख्य मुख्य समंजस लोकांचें काय म्हणणें आहे हें कळेल. व राज्यव्यवस्थेंत कोणत्या दिशेनें फेरफार झाला पाहिजे असें पुढारी लोकांस वाटतें, हें स्पष्टपणें समजेल. अशा लोकांचें म्हणणें किंवा मागणें सरकारास सर्वप्रकारें कबूल झालें पाहिजे असें नाहीं. जे जे फेरफार होणें अवश्य आहे, ते पोक्त विचारानें, यथाप्रसंगें, चालू व्यवस्था एकाएकीं न बिघडतां, हळूहळूच झाले पाहिजेत. सुशिक्षित लोकांचें राज्यव्यवस्थेंत साह्य व सल्लामसलत सरकारानें घेणें हें राज्याच्या सुरक्षितपणास अत्यंत हितावह आहे. परंतु तें हळूहळू खरोखरी सुशिक्षण वाढत जाऊन लोकस्थिति जसजशी विशेष उन्नत होत जाईल, तसतसें झालें पाहिजे, हें जें कित्येक पोक्त सरकारी कामगारांचें म्हणणें आहे, तेंच राष्ट्रीय समंजस लोकांचें असलें पाहिजे; व एकंदरीनें माझ्या समजुतीनें बऱ्याच अंशीं

तसें आहे. अशा रीतीनें दूरदृष्टी सरकारी कामगाराचें मत पोक्त समंजस व दूरदृष्टी लोकांतील पुढारी यांचा अभिप्राय या दोहोंमध्यें जितकें ऐक्य वाढत जाईल, तितकें तें राज्याच्या सुरक्षिततेस व लोकांच्या खऱ्या उन्नतीस व सुखवृद्धीस कारणीभूत होईल, याविषयीं मला तिळमात्र संशय वाटत नाहीं. परंतु असें होण्यास लोकांचें म्हणणें सरकारास, व सरकारचा हेतु लोकांस कळण्यास एखादें मोठें राष्ट्रीय साधन असणें अत्यंत आवश्य आहे. आणि राष्ट्रीयसभेचे अग्रणी यांनीं हळूहळू लोकांचें आपल्या हक्कांविषयीं व राज्यव्यवस्थेनें होणाऱ्या स्थितीविषयीं काय म्हणणें आहे, याचा बारकाईनें शोध करून, त्यासंबंधानें इत्यर्थ ठरवून, प्रतिवर्षी सरकारास कळविलें पाहिजे; व या राष्ट्रीय सभेच्या द्वारेंच लोकांच्या ज्या गैरसमजुती किंवा लोकांचें जें अविचाराचें म्हणणें व मागणें, त्याची अयोग्यता स्पष्टपणें लोकांमध्यें प्रसिद्ध केली पाहिजे. या सभेस पुरा राष्ट्रीयपणा जो पाहिजे, तो येण्यास काल लागेल यांत संशय नाहीं. परंतु तो जरी आला नाहीं तरी ही राष्ट्रीय सभा जर कायम राहिली, इजमधील सभासदांची निवडणूक जर विशेष विचारपूर्वक झाली, राज्यव्यवस्थेसारख्या मोठ्या गहन विषयांचा विचार करण्यास ज्यांस योग्य माहिती, शिक्षण व शोधक बुद्धि आहे, किंवा अशा प्रकारची सामुग्री परिश्रम करून मिळविण्यास जे झटत आहेत, अशा लोकांचीच जर निवडणूक केली गेली, व सभासदांच्या संख्येकडे लक्ष्य न देतां त्यांच्या योग्यतेकडे अ-

वश्य लक्ष्य पुरविण्यांत आलें, तर ही राष्ट्रीय सभा हळूहळू सरकारास अत्यंत साह्यकारी व लोकांस कल्याणकारक होईल. याकरितां ती लयास जावी असें ज्यांस वाटत आहे, व जे तदर्थ यत्न करीत आहेत, ते माझ्या समजुतीनें ब्रिटिश राज्याचा पाया समंजस लोकांचे साह्यानें जो आपोआप दिवसानुदिवस सुदृढ होत चाललेला आहे, तो जशाच्या तसा शिथिल राहूं देण्याचा यत्न करीत आहेत. ते बुद्धिपुरःसर असें करतात असें माझें मुळींच म्हणणें नाहीं, परंतु त्यांचीं ती समजूत खरोखरी मोठी अपायकारक आहे. यास्तव दिवसानुदिवस त्या समजुतीचा निरास होऊन, ही राष्ट्रीय सभा सरकार व प्रजा या दोहोंसही विशेष उपयोगीं पडत जाऊन. दोघांचें ऐक्य अधिकाधिक वाढविण्यास कारणीभूत होईल, अशी निदान प्रस्तुत तरी माझी समजूत आहे. परंतु ही सभा खऱ्या योग्यतेस येण्यास आपल्या लोकांनीं फार झटून ऐक्यानें परिश्रम केले पाहिजेत; व खरोखरी हिच्यापासून उपयोग होण्यासारखा आहे असें आपल्या उद्योगानें सिद्ध केलें पाहिजे. म्हणजे तूर्त जरी हिंदू लोकांसच विशेषेंकरून हें काम करावें लागलें, तरी विरुद्ध असणारे, हिंदू म्हणा, किंवा मुसलमान म्हणा, किंवा सरकारी कामगार म्हणा, हळूहळू या सभेशीं जो त्यांचा विरोध आहे तो आपोआप सोडतील, यांत संशय नाहीं. परंतु हाही राष्ट्रीय प्रयत्न पुष्कळ अंशीं आपल्यामध्यें ऐक्य वाढण्यावर अवलंबून आहे.

याप्रमाणें सामाजिक, व्यावहारिक, शिक्षणसंबंधी, व राजकीय अशा मोठमोठ्या गोष्टी आपणा हिंदूलोकांस (हिंदूलोकांस असें म्हणण्याचें कारण एतद्देशीय लोकसमुदायामध्यें जवळजवळ पांचषष्ठांश लोक हिंदू असल्यामुळें या अनेक कामांचा मुख्य बोजा त्यांच्याच शिरावर आहे) अद्याप कर्तव्य आहे त्या कांहीं अंशीं तरी झाल्यावांचून आपल्या राष्ट्राची इतर पुढारी राष्ट्रांशीं बरोबरी नुस्ती ' बडेबापके बेटे ' या न्यायानें करणें निवळ अज्ञान होय. हें अज्ञान जसजसें दूर होत जाईल, तसतसा आपल्या राष्ट्राचा भाग्यसूर्य हळूहळू उदयास येऊन सर्वत्र प्रकाशमान होईल. असो; या मोठमोठ्या कर्तव्यगोष्टी आहेत असें जर आपणा हिंदूलोकांमधील समंजस व सुशिक्षित लोकांस तरी वाटूं लागेल, व ह्या गोष्टी केवळ बहुयत्नसाध्यच आहेत, हें जर त्यांच्या मनांत पूर्णपणें बिंबेल, तर ऐक्यवृद्धीविषयीं त्यांच्या ठायीं खरी आस्था उत्पन्न होईल. लोकांच्या दृष्टीपुढें हे मोठमोठे हेतू अजून ढळढळीत उभे राहात नाहींत ही ऐक्यवृद्धीस सर्वांत पहिली व सर्वांत मोठी हरकत होय.

दुसरी हरकत जातीभेदापासून उत्पन्न होणारी आहे. हा भेद कोणी बुद्धिपुरःसर करून ही हरकत आणिली अशी कल्पना करून एकाद्या विशेष जातीस किंवा विशेष व्यक्तीस दोष देणें हा निवळ वेडेपणा आहे. आपल्यास ज्या काळाचें यथार्थ ज्ञान होण्यास मुळींच साधन नाहीं अशा काळापासून

हा भेद दृष्ट आहे. त्यांतील पोटभेद मात्र हळूहळू मागून उत्पन्न झालेले आहेत. परंतु मूळचा चार प्रकारचा भेद, हा मनुष्य, जात रानटी स्थितींतून पार पडून, भटकत फिरण्याची रीत सोडून एकाद्या प्रदेशांत स्थिर होऊन राहिली म्हणजे जो साहजिक श्रमविभाग होतो, व जो केवळ याच देशांत झाला असें नाहीं, तर इतर देशांतही प्राचीन कालीं झालेला इतिहासावरून दृष्टीस येतो, त्यापासून उत्पन्न झाला असावा असें दिसतें. ज्यांच्या ज्ञानशक्तीचा विशेष प्रभाव दिसून आला, ते ज्ञानवृद्धीच्या, ज्ञानप्रसाराच्या, व तत्संबंधीं इतर कार्यांच्या तजविजीस लागले; व चिराभ्यासानें जी निष्णातता व कुशलता उत्पन्न होते, व जिच्या योगानें इतर व्यवसायांविषयीं दुर्बलताही तिच्याबरोबरच उत्पन्न होते, ती दुर्बलता उत्पन्न होऊन ते त्याच कर्मामध्यें निमग्न झाले. जे शौर्यादि गुणांनीं इतरांपेक्षां श्रेष्ठ असल्यामुळें प्रजाजनांचें व देशाचें रक्षण करण्याच्या कामास उपयोगीं पडूं लागले, ते तत्संबंधीं सर्व कार्यांत निष्णात होऊन, वीर्यशौर्यानें पुढारी होऊन, रक्षणकर्ते बनले. ज्यांचा मनुष्यें एके ठिकाणीं स्थिरावलीं म्हणजे त्यांच्या उपजीविकेकरितां, सोयीकरितां व सुखाकरितां धनधान्यादि सामुग्री संपादन करण्याच्या कामांत विशेष बुद्धिप्रभाव दिसला, ते व्यापारधंदे, कृषी, या कामांत दृढाभ्यासानें विशेष निष्णात होऊन त्यांतच निमग्न झाले. जे बाकी राहिले त्यांच्या अंगीं यापैकीं कोणताही धंदा करण्याचें सामर्थ्य नसल्यामुळें ते पूर्वोक्त तीन

वर्गांची सेवा करून त्यांस आपापले धंदे करण्यास फुरसत देण्याच्या कामीं लागले, व अभ्यासानें त्याच वर्गांत राहून गेले. याप्रमाणें कोणत्या तरी चार नांवांनीं हे चार वर्ग, ज्यांस आपल्या देशांत ब्राह्मण, क्षत्रिय, वैश्य, शूद्र म्हणण्याचा प्रघात पडला आहे, ते प्रथमतः झाले असावे.

इतर देशांत हा वर्णभेद कायम राहिला नाहीं; परंतु या देशांत कोणत्यातरी कारणांनीं तो कायम राहून, प्रत्येक वर्णांत स्थलभेदामुळें, उद्योगभेदामुळें, किंवा आचारभेदामुळें, निरनिराळे अनेक पोटभेद होत गेले. होतां होतां या झालेल्या भिन्न भिन्न वर्गांमध्यें व पोटवर्गांमध्यें असणाऱ्या लोकांस भिन्न भिन्न कारणांमुळें आपापल्या वर्गाचें कोणत्यातरी गोष्टींत वर्चस्व वाटून, त्याविषयीं अभिमान उत्पन्न होऊन, त्या भेदांस चिरपरिचयामुळें दृढता येत गेली, व हळूहळू परस्पर पंक्तिव्यवहार व विवाहव्यवहार बंद होत गेले. याप्रमाणें कालचक्रांतर्गत अनेक कारणांनीं दृढ झालेलीं हीं वर्णभेदरूप बंधनें साक्षात् ईश्वरनिर्मित व अनादि अशीं वाटूं लागलीं. त्या अभिप्रायाप्रमाणें ग्रंथही झाले; व तेही हळूहळू मान्य झाल्यामुळें कालांतरानें अनुल्लंघनीय धर्ममर्यादा होऊन बसले. त्याचा परिणाम आज जी आपण स्थिति पाहतों ती होय. कित्येकांस हीं सर्व बंधनें ब्राह्मणांनीं आह्मांस घातलीं, व सर्व अधिकार व मोठेपणा आपल्याकडे घेतला, अतएव या गोष्टीचा दोष सर्वोपरी त्यांच्या शिरावर आहे, असें वाटतें. परंतु ज्या बंधनांच्या

सपाट्यांत ब्राह्मणही बांधून गेले आहेत, तीं सर्व बंधनें त्यांणीं केवळ दुष्ट बुद्धीनें इतरांकरितां योजिलीं हें म्हणणें केवळ अविचाराचें दिसतें. राज्यसंपत्ति व राज्याधिकार हा जो क्षत्रियांचा भाग, ज्यापेक्षां ऐहिक गोष्टीमध्यें जास्त लोभनीय असें दुसरें कांही नाहीं, त्याचा ब्राह्मणांनीं प्रायः अभिलाष केलेला दिसत नाहीं. तसेंच धनधान्यसमृद्धि हा जो वैश्यांचा भाग त्याचाही त्यांनीं त्या काली अभिलाष केल्याचें प्रायः आढळत नाहीं. परंतु यजमानपणा दुसऱ्या वर्णास देऊन आपण त्यांचे पुरोहित, म्हणजे आश्रित बनले; नानाप्रकारचीं व्रतें, उपवास, इत्यादि शरीरास क्लेशकारक अशा प्रकारचीं कृत्यें आपल्यास लावून घेऊन, तपोधन किंवा तपस्वी बनले; आणि भिक्षारूप जी दीनवृत्ति ती त्यांणी पत्करिली. ज्ञानदातृत्वसंबंधी गुरुत्व त्यांणी आपल्याकडे ठेविलें, हें खरें. परंतु तें ऐहिक ऐश्वर्याच्या लोभानें ठेविलें असें म्हणतां येत नाहीं. चालत आलेलें त्यांचें काम त्यांना चालवावें लागलें, व त्यांत त्यांस महत्त्व वाटून त्यांच्या योग्यतेनुरूप इतरांनीं त्यांचें महत्त्व बऱ्याच अंशीं त्यांजकडे राहूं दिलें. क्वचित् प्रसंगीं क्षत्रियांनी या महत्त्वाचा अंश आपल्याकडे घेण्याचा यत्न करून सिद्धीसही नेला; व अंशतः तो त्यांचा भाग ब्राह्मणांनीही त्या त्या काळीं कबूल केला, असें प्राचीन ग्रंथांवरून दिसतें. इतकेंच नव्हे, क्वचित् परमार्थपरायण व ज्ञानसंपन्न अशा अधम मानिलेल्या जातींतीलही कित्येक व्यक्तींच्या संबंधानें हा अधिकार ब्राह्मणांनीं

त्यांचे ठायीं आहे म्हणून आपण होऊन कबूल केलें. उपनिषदादि वैदिक ग्रंथ, व महाभारतादि ऐतिहासिक ग्रंथ, ब्राह्मण ऋषीनीं व कवींनीं केले असें जर म्हटलें, तर त्यांणीं ज्ञानदातृत्वरूप अधिकार जनक, भीष्म, धर्म, वासुदेव इत्यादि क्षत्रियांकडे, व विदुरादि शूद्रांकडे, व धर्मव्याधादि अधम योनीच्या व्यक्तींकडेही आहे असें आपण होऊनच आपण केलेल्या ग्रंथांत लिहून ठेविलें आहे असें म्हटलें पाहिजे. असो; हेंप्रकरण फार लांबलें. परंतु यावरून इतकें साधारण अनुमान करितां येतें, कीं हें जातिभेदाचें बंड कोणी केवळ दुसऱ्यांस फसविण्याकरितां उत्पन्न केलें, किंवा हें बंधन दुसऱ्यांस बद्ध करण्याकरितां शोधून काढलें, असें नाहीं. या बंधनांत आपण सर्व ज्ञेयअज्ञेय अनेक कारणपरंपरांनीं बांधले गेलों आहों याविषयीं संशय नाहीं. या भेदापासून मुळींच कांहीं उपयोग किंवा लाभ कोणासही कधींही झाला नाहीं, किंवा हल्लींही होत नाहीं, हें म्हणणें मोठें साहसाचें होईल; व असा साहसोक्तीचा उद्गार काढणें मला प्रशस्त दिसत नाहीं. परंतु राज्यसूत्र लोकव्यवहाराचें नियंतृत्व, व विद्यादातृत्व इत्यादिक सर्व वरिष्ठ वर्णांचे अधिकार परस्थ लोकांच्या हातीं गेले असतांही आजकाल आपल्या लोकांना परंपरागत वर्णबंधनांच्या संबंधानें अभिमान किंवा अन्योन्यमत्सर वागवून, एकमेकांस शिव्याशाप देऊन, आपसांत यादवी माजवावी, हें अत्यंत उपहासास्पद होय. खरें ब्राह्मणत्व गेलें, खरें क्षत्रियत्व गेलें, खरें वैश्यत्वही

बऱ्याच अंशी गेलें; तत्संबंधीं कार्यांमध्यें पुढारीपणा दुसरीकडे गेला, सर्व प्राचीन वर्णांतील व्यक्तींस सेवारूप शूद्रधर्म स्वीकारावा लागला, तरी आमच्यांतला अभिमान जर क्षीण होईना, आमच्यांतला मत्सर लयास जाईना, व द्वेष निर्मूल होईना, तर आमच्यासारखे अविवेकी लोक या पृथ्वीतलावर कोठेंही नसतील असें म्हणण्याचा प्रसंग येईल. वर्णधर्म, व वर्णकर्मे, व वर्णगुण हीं सर्व कधींच संकीर्ण होऊन गेलीं आहेत; व प्रस्तुतकालीं वर्णभेदांचें महत्त्व प्रायः स्पर्शास्पर्श, सोवळेंओवळें क्वचित् भक्ष्याभक्ष्य या गौण व बाह्य गोष्टींवर येऊन राहिलें आहे. अशा काळीं या गोष्टींचा अभिमान, व त्यापासून उत्पन्न होणारा मत्सर, व तन्मूल द्वेषभाव, हा आपल्यांतील सर्व समंजस लोकांनीं, व त्यांतही पश्चिमेकडील अत्यंत भिन्न प्रकारची जी अर्वाचीन विद्या तिच्या लाभानें ज्यांचीं मनें विशेष विकास पावलीं आहेत अशा लोकांनीं तरी निश्चयपूर्वक सोडला पाहिजे. तो न सुटणें ही एक आपल्या ऐक्यवृद्धीस दुसरी जबरदस्त हरकत होय.

ऐक्यवृद्धीस तिसरी हरकत भाषाभेद व लिपीभेद ही होय. हे भेद एकाच प्रांतांत व एकाच शहरांत राहाणाऱ्या आपल्या हिंदूलोकांत दळणवळणाच्या व त्यापासून होणाऱ्या ऐक्याच्या पुष्कळ अंशीं आड येऊन त्यांची व्यावहारिक स्थिति समान असली तरी व त्यांच्या मनांत येणाऱ्या विचारांची दिशा एकच असली तरी, व राष्ट्रोन्नतीचे त्यांचे उद्योग एकाच प्रकारचे किंवा

अन्योन्यसदृश असे असले तरी, त्यांचें ऐक्य होऊं शकत नाहीं. हीही हरकत विचार करण्यासारखी आहे. कारण एका या मुंबई इलाख्यांतीलच हिंदू लोकांची स्थिति मनांत आणिली तर कानडी, मराठी व गुजराथी या निरनिराळ्या भाषा बोलणाऱ्या लोकसमूहामध्यें पुष्कळ गोष्टींत सारखेपणा असला तरी इंग्रजी भाषेच्या द्वारें जितकें ऐकमत्य होईल त्यापेक्षां जास्ती होऊं शकत नाहीं. कानडी लोकांची गोष्ट तर एकवेळ एकीकडे राहूं द्या. महाराष्ट्रीय व गुजराथीय यांच्या भाषांत तर अत्यंत निकट संबंध व सादृश्य असूनही त्यांच्यामध्यें दळणवळण जितकें इतर गोष्टींनीं शक्य आहे तितकें थोडचाशा भाषाभेदामुळें व तदंगभूत लिपीभेदामुळें होऊं शकत नाहीं. हाच विचार जरा दूरवर लांबविला म्हणजे महाराष्ट्रीय, गुजराथी, कच्छी, सिंधी, पंजाबी, हिंदुस्थानीं, हिंदी, बंगाली या भाषा बोलणाऱ्या हिंदुसमूहामध्यें ऐकमत्य वाढून ऐक्याची वृद्धि होण्यास या पूर्वोक्त भाषांतील अत्यंत अल्पभेद व थोडथोडा लिपीभेद आड येतो. अशी हिंदूलोकांच्या ऐक्यास भाषाभेद व लिपीभेद ही तिसरी हरकत होय.

चवथी हरकत सुधारणेच्या संबंधानें मतविरोध ही होय. आपल्या या देशाचा व इंग्लंडाचा, आपल्या देशांतील प्राचीन संस्थेचा, व इंग्लंडांतील अर्वाचीन संस्थेचा आपल्या प्राचीन विद्यांचा व यूरोपिअन अर्वाचीन विद्यांचा, आपल्या लोकांनीं मानिलेल्या युगऱ्हासरूपी अधोगतीचा व पश्चिमेकडील सृष्टि-

ज्ञानाद्यैश्वर्य—वृद्धिरूप उन्नतीचा इकडील पुरातन अनुल्लंघनीय धर्मसेतूंचा व धर्मस्वातंत्र्य, बुद्धिस्वातंत्र्य, विचारस्वातंत्र्य, भाषणस्वातंत्र्य, व्यवहारस्वातंत्र्य, राजकीयस्वातंत्र्य, इत्यादि स्वातंत्र्यरूपी प्रबल प्रवाहाचा, व अनेक विषयक अज्ञान व अनेक अत्यंत शोधक विद्याव्यासंगी, दीर्घव्यवसायी सत्यकैनिर्णय परायण ऊहापोहाविषयीं समर्थ व स्वतंत्र अशा पंडितांनीं प्रणीत अर्वाचीन विषदज्ञानाचा. अनेक आघातांनीं विदीर्ण म्लान झालेल्या लोक स्थितीचा, व अधिकाधिक उन्नत स्थानास पोंचणाऱ्या लोकस्थितीचा जो हा अति अपूर्व व विलक्षण संयोग दैवगतीनें घडून आला आहे. त्यापासून आपल्या लोकांच्या मानसिक वृत्तीवर व तत्प्रयुक्त बाह्य व्यवहारांवर कांहींच परिणाम घडूं नये, व आपले लोक इंग्लीशलोकांचा या देशांत होण्याच्यापूर्वी जसे होते तशाचे तसेच हा पूर्वोक्त अचाट संगम घडून आल्यानंतरही रहावे, व त्यांच्या मतींत किंवा वृत्तीत कांहीं फेरबदल होऊं नये, ही गोष्ट अगदीं असंभवनीय होय. आपल्यापेक्षां शरीरबलानें, मानसिकबलानें, उत्साहवृत्तीनें, शोधकबुद्धीनें, उद्योगप्रियतेनें, स्वातंत्र्यप्रियतेनें, सत्यप्रियतेनें, न्यायपरतेनें जे श्रेष्ठ आहेत, तसेंच जे आपल्यापेक्षां गुणाढ्य, धनाढ्य व ज्ञानानें व अधिकारानें वरिष्ठ त्यांच्या समागमानें कांहीं अंशीं त्यांचें अनुकरण करून अंशतः तरी त्यांची योग्यता आपल्या अंगीं आणण्याची इच्छा उत्पन्न होणें व तदनुरूप यत्न होणें हेंही अगदीं स्वाभाविक आहे. असें

होऊं लागलें म्हणजे ज्यांच्या मनावर या अशा संयुक्त स्थितीचा मुळींच संस्कार झाला नाहीं, जे आपल्या लोकांची दीनावस्था युगऱ्हास मूलक, अतएव दुर्वार्य आहे या कल्पनेस दृढ धरून राहतात, त्यांच्यामध्यें व ज्यांच्या मनावर पूर्वोक्त संस्कार झाला आहे, व ज्यांस ही युगऱ्हासाची कल्पना अगदीं निर्मूल अशी वाटूं लागली आहे, त्यांच्यामध्यें आतां आपल्या लोकांनीं समजावें काय, करावें काय, व वागावें कसें, याविषयीं मतभेद उत्पन्न व्हावा हेंही आश्चर्यकारक नाहीं. व पूर्वोक्त मानसिक संस्कार पावलेल्या लोकांमध्येंही समजुतीविषयीं, कर्तव्याकर्तव्याविषयीं, तत्संबंधीं साधनांविषयीं, अल्पस्वल्प मतभेद उत्पन्न व्हावा हेंही अस्वाभाविक आहे असें नाहीं. परंतु असा मतिभेद किंवा मतभेद असला तरी एकमेकांनीं एकमेकांवर बुद्धिपुरःसर राष्ट्राचें अकल्याण करण्याचा आरोप घालून विरोध वाढवावा, व वैरभाव उत्पन्न करावा, हें मात्र सखेदाश्चर्यकारक असून, आपल्या लोकांच्या ऐक्यास अत्यंत अपायकारक होय. म्हणून ही विरोधाची स्थिति ऐक्यबुद्धीस एक मोठी हरकत होय.

परंतु याहीपेक्षां ऐक्यवृद्धीस मोठी हरकत आपल्या देशांत खऱ्या स्वदेशाभिमानाचा फुटावा तसा अंकुर अद्याप फुटला नाहीं ही होय. खऱ्या स्वदेशाभिमानाचा असें म्हणण्याचें कारण हें कीं एकप्रकारचा स्वदेशाभिमान पूर्वीपासून आहे, व आलीकडे त्यास कांहीं अंशीं दृढताही आली आहे, तो हा कीं

जें कांहीं आपलें पूर्वीपासून चालत आसेलें आहे, तें सर्व चांगलें. आपल्या चाली चांगल्या, आपल्या रिती चांगल्या, आपले रिवाज चांगले, आपलें ज्ञान पूर्ण, आपल्या समजुती खऱ्या; याविषयीं आपण अभिमान बाळगावा, व यांचें झटून रक्षण करावें, यांत कांहीं फेरबदल होऊं देऊं नये; परकीय देशांतील लोकांपासून आपल्यास कांहीं शिकावयाचें नाहीं; कदाचित् कांहीं असलेंच तर देशाच्या संपत्तीची वृद्धि करण्याचीं जीं साधनें त्यासंबंधाचें ज्ञान करून घेतलें म्हणजे बस आहे बाकी आपल्यास आपली उन्नति होण्यासाठीं शारीरबल, बुद्धिबल, राजकार्यकर्तृत्व, धैर्य, शौर्य, जें जें पाहिजे तें तें आपल्या अंगीं आहेच. त्याविषयीं आपल्यास दुसऱ्यापासून कांहीं शिकावयाचें नाहीं, कांहीं करावयाचें नाहीं; कांहीं मिळवावयाचेंही नाहीं, अशा प्रकारचा अभिमान आहे. परंतु माझ्या अल्प समजुतीनें हा केवळ वृथाभिमान किंवा मिथ्याभिमान होय. याविषयीं खात्री करण्यास फार दूर जावयास नको. इंग्लिश लोकांचें या देशांतील राज्य, त्यांणीं या देशांत आणलेले अनेक कारखाने, व सुखवृद्धीचीं साधनें, त्यांणीं येथें कधींही नव्हती अशा प्रकारची स्थापिलेली शांति, व तिच्या योगानें अत्यंत निर्विघ्नपणें होणारें व्यक्तिमात्राचें जीवितरक्षण व वित्तरक्षण, त्यांणीं या देशांत ठिकठिकाणीं स्थापिलेलीं व चालविलेलीं विशाळ, व्यापक विद्यापीठें, त्यांचे शीघ्र गतीनें जलप्रवास व स्थलप्रवास करण्याचे अचाट उपाय, ज्याच्या सारखें थोडें बहुत आपल्या लोकांच्या पूर्वी-

च्या कृत्यांत कोठें आढळलें असतां त्यास पांडवकृत्य किंवा दैविककृत्य असें म्हणण्याचा परिपाठ आहे, अशीं बोरघाटांतील लोहमार्ग, गंगा, यमुना, सिंधु, नर्मदा, तापी, गोदावरी, कृष्णा, तुंगभद्रा या महानद्यांवर बांधलेले अत्यंत आश्चर्यजनक प्रचंड पूल, एका निमेषांत सहस्रावधि कोश निरोप पाठविण्याची पिशाचकृत्यासारखी वाटणारी तजवीज, व हजारों रुपये खर्चून जासूद पाठवून पुष्कळ कालांतरानें जें काम व्हावयाचें, तें एखाद्या आसपासच्या गांवीं जाऊन यावें इतक्या काळांत एक पैसा दोन पैशाच्या खर्चानें करणारी व्यवस्था, व तीही केवळ निरोप पाठविण्याच्या संबंधानें किंवा पत्र पाठविण्याच्या संबंधानें नव्हे, तर सुवर्णादि बहुमोलाचे जिन्नस निर्भयपणें दूर दूर ठिकाणीं पाठविण्याच्या संबंधानें देखील. तसेंच आपल्या देशांतीलच भूमिगत विविध खनिज संपत्ति काढून दाखविण्याची तजवीज; व प्राकृत जनांस सर्वथा दुर्लभ किंवा अतिपरिश्रमानें लभ्य व श्रीमंतांस देखील पुष्कळ धनव्ययानें अप्राप्य असे जे अनेक विद्याग्रंथ ते अगदीं अत्यंत सुलभ करून देण्याची कला, या गोष्टी मनांत आणिल्या म्हणजे पुरे आहे. यास्तव पूर्वोक्त मिथ्या देशाभिमान तुच्छ वाटून जो हा आपला देश प्राचीनकाळीं विद्या, कला, धर्म, नीति, वीर्य, शौर्य इत्यादि गुणांनीं अग्रगण्य देशांत गणला जात होता, त्या देशांतील ऋषींचे व वीर पुरुषांचे आह्मी वंशज आहों; यद्यपि प्रस्तुत काळीं आमचा देश पुष्कळ महत्त्वाच्या गोष्टींत

मागें पडला आहे; यद्यपि आमच्या पूर्वजांच्या आंगचे सत्यनिष्ठता, उद्योगशीलता, ज्ञानैकपरता, धैर्य, गांभीर्य, शौर्य, इत्यादिक गुण आह्मांमध्यें नष्टप्राय मात्र झाले आहेत; तरी पुनः आह्मी झटून उद्योग करून, ज्या ज्या साधनांनीं व उपायांनीं पश्चिमेकडील लोक पुढें सरसावले आहेत ते त्यांच्या साहाय्यानें, व उदाहरणानें संपादन करून, आपसांतील क्षुल्लक विरोध एकीकडे ठेवून, या महत् कार्याविषयीं एक विचारानें उद्योग करूं; निश्चयानें सदुद्योग करणाराचा साह्यकारी परमेश्वर आहे, म्हणून त्याजवर भरंवसा ठेवून पुढें पाऊल टाकण्याचा यत्न करूं; ज्या विख्यात, स्वातंत्र्यप्रिय, व उन्नतदशेस पावलेल्या पराक्रमी लोकांचा ईश्वरी सूत्रानें आपल्यास समागम झाला आहे, त्यांच्या सहवासानें त्यांची विद्या व गुण संपादून, त्यांच्या बरोबरीच्या पायरीस येऊं; व आपला हीनपणाप्रत पावलेला देश पुनः अग्रगण्य देशांच्या बरोबरीस आणूं; प्रस्तुत आमची जरी परकीय लोक हेळणा करीत आहेत, तरी तीस आह्मी तूर्त पात्र आहों, यामुळें विनयानें व शांततेनें ती सहन करून, दृढनिश्चयानें कर्तव्य गोष्टींवर लक्ष देऊन, दिवसानुदिवस पाऊल पुढें टाकूं; त्यांत किती संकटें आलीं, कितीही आशाभंग झाला, तरी धीर न सोडतां हातीं धरलेलें कार्य शेवटास जाईपर्यंत कधींही सोडणार नाहीं, हा जो स्वदेशास पुनः उत्तम स्थितीप्रत नेण्याविषयीं अभिमान, हा खरा स्वदेशाभिमान होय. हा जेथपर्यंत आपल्या हृदयांत उत्पन्न झाला नाहीं,

तेथपर्यंत आपल्यांतील बारीकसारीक द्वेष, मत्सर, अल्पदृष्टी, केवळ स्वार्थपरता, एकमेकांचीं बारीकसारीक क्षुल्लकें ऐकण्याविषयीं, शोधून काढण्याविषयीं, व घांशीत बसण्याविषयींची क्षुद्रबुद्धि व अनुदारवृत्ति, हे दुर्गुण आह्मांमध्यें राहून आमच्या ऐक्यवृद्धीच्या आड अवश्य येतील यांत संशय नाहीं. यास्तव खऱ्या स्वदेशाभिमानाचा अभाव हाही आपल्यांतील ऐक्यास एक मोठी हरकत होय.

या पूर्वोक्त हरकतींशिवाय आणखीही एक लहानशी हरकत मला वाटते ती उचितादराचा त्याग ही होय. जेथपर्यंत आपल्या लोकांत वयोवृद्धत्वानें, विद्यावृद्धत्वानें, सत्ववृद्धत्वानें, गुणाढ्यतेनें, अधिकारित्वानें जे मान्य व वंद्य व विश्वसनीय व अनुकरणीय व सेव्य त्यांचा योग्य सत्कार होत नाहीं, त्यांजविषयीं यथायोग्य पूज्यबुद्धि, व विनय मतींत उत्पन्न झाला नाहीं, व वर्तनांत स्पष्ट दिसला नाहीं, तेथपर्यंत ऐक्यवृद्धीची मुळींच आशा नाहीं. जर अज्ञजनांनीं ज्ञात्यांचा मान न ठेविला, तर त्यांस त्यामध्यें मिसळून त्यांशीं ऐक्यानें वागावें असें कसें वाटेल? जर अल्प वयस्कांनीं वृद्धांचा बोज ठेविला नाहीं, तर ते परस्परांचे साह्यकारी कसे होतील? जर वडिलांची आज्ञा व मर्यादा लहानांनीं शिरसा वंद्य केली नाहीं, तर त्यांमध्यें एकमेकांविषयीं आवश्यक जो अभिमान तो कसा उत्पन्न होईल? जर स्त्रियांशीं जसें सभ्य वर्तन झालें पाहिजे तसें झालें नाहीं, तर त्या आपल्या कामांत आपल्यास साह्य-

कारी कशा होतील ? जर कोणी एखादा उच्च पदास पोंचला, तर त्याचा योग्य मान व आदर न राखितां तो खाली केव्हां पडेल याची वाट पहात आपण बसलों तर आपल्यांत पुढारी तरी कसे निपजतील ? आपल्याकडून व्यतिक्रम शिष्टादराचा झाला असतां ऐक्यरूपी जो आपला कल्याणाचा मार्ग तो आपल्यास कसा प्राप्त होईल ? उलटें आपल्या विनाशास कारण होणार नाहीं काय ? अवश्य त्याचा परिणाम तसा झालाच पाहिजे. यास्तव परस्परांशीं उचितादरानें न वर्तणें ही माझ्या समजुतीनें आपल्या ऐक्यवृद्धीस लहानसान नव्हे, तर मोठी जबरदस्त हरकत होय.

याप्रमाणें आपणा हिंदुलोकांत ऐक्यवृद्धीस ज्या कित्येक हरकती आहेत त्यांतील ठळक ठळक आपल्यापुढें ठेवून त्यांचें यथामति विवरण येथवर मीं केलें. आतां ह्या हरकती दूर करण्याचे उपाय हा निर्दिष्ट विषयाचा दुसरा भाग राहिला, त्याविषयीं थोडासा विचार करूं. त्याविषयीं फार विचार करण्याचें प्रयोजन नाहीं. कारण पूर्वोक्त हरकतींचें विवरण करतांना तेथल्यातेथें त्यांच्या निवारणाचे उपायही सूचित झाले आहेत. तथापि संग्रहरूपानें त्यांचा पुनः येथें थोडक्यांत उल्लेख करितों. वर पहिली हरकत प्रस्तुत काळीं ऐक्यबुद्धीनें आपल्यास विशेष काय काय गोष्टी करावयाच्या आहेत याविषयी अज्ञान म्हणून सांगितलें. तेव्हां ही हरकत दूर करण्याचा मुख्य उपाय ज्या मुख्य मुख्य कर्तव्य गोष्टी पूर्वी सांगितल्या आहेत

यांच्या कर्तव्यतेविषयी लोकांचीं मनें ग्रंथद्वारा, व्याख्यानद्वारा किंवा संभाषणद्वारा, वारंवार जागृत करणें हा होय. आलीकडे कित्येक आपणास 'खरे सुधारक' व 'खरे स्वदेशाभिमानी' आणि आपल्या देशाचे व लोकांचे 'खरे हितचिंतक' म्हणविणारे लोक पूर्वोक्त उपायांची वेळोवेळीं निर्भर्त्सना करितांना आपण पुष्कळांनी ऐकिलें आहे. व 'लहान तोंडीं मोठा घास' या न्यायानें अल्पवयी मुलें सुद्धां अशा प्रकारचे निर्भर्त्सनारूप केवळ ऐकीव शब्द बोलूं लागले आहेत. परंतु हीं भलीं मनुष्यें थोडासा विचार करतील तर आपण जी या उपायांची हेळणा करितों ती अविवेकमूलक आहे, असें त्यांच्या दृष्टीस आल्यावांचून रहाणार नाहीं. जे 'बोलता ती कृती करून दाखवा; व्याख्यानें निबंध पुष्कळ झाले; आतां करणी होऊं द्या;' असें म्हणतात, तेही अगदीं गुपचूप बसणारे आहेत काय? नाही. तेही आपापल्या परी बोलतातच आहेत; आणि हें जें कल्पनेमध्यें, बोलण्यामध्यें, व कृतीमध्यें महदंतर दृष्टीस पडतें, त्यांत कांहीं नवल नाहीं. मनुष्याच्या मनोवृत्तीची व वाणीची धांव जितकी जलद आहे, तेवढी त्याच्या कृतीची स्वभावतःच नाहीं. 'पी हळद हो गोरी' या म्हणीप्रमाणें कोणतेंही सामाजिक किंवा राजकीय सर्वव्यापक महत्कार्य मनांत आल्याबरोबर किंवा म्हटल्याबरोबर होत नाहीं. ज्यांच्या मनांत कांही उपयुक्त कल्पना प्रथम येतात, त्यांच्या मनांत त्या ऊहापोहरूपानें पुष्कळ वेळ घोळल्या-

वांचून वाणीच्या द्वारें बाहेर पडत नाहींत. व वाणीच्या योगानें निघालेले मनोरथ जनसमूहाच्या मनांत उतरून कार्यकर्तृत्वाविषयीं साह्य करण्यास त्यांची थोडीबहुत तरी तयारी होण्यास पुनःपुन्हा व पुष्कळ वेळां, पुष्कळ ठिकाणीं, पुष्कळ प्रसंगीं त्यांचें उद्घाटन करावें लागतें, तेव्हांच त्यांस कार्यपात्रता येते. व्यक्तिविशेष पुढें सरसावून एकादी कर्तव्यगोष्ट कोणाची वाट न पाहतां एकदम अमलांत आणूं लागला, तर त्यास मात्र कोणी बुद्धिपुरःसर विघ्न करूं नये; होईल तितकें साह्यच करावें. परंतु ज्यांस कर्तव्यविषय पुष्कळ लोकांच्या मनांत यथास्थित बिंबल्यावांचून करण्यास शक्य नाहींत असें वाटत असेल, त्यांनीं तशा प्रकारें खटपट करून ग्रंथांनीं किंवा व्याख्यानांनीं किंवा संभाषणानें अनुकूल मतांचा प्रसार करण्याचा यत्न केला, तर तो कर्तव्यविषयाच्या पुष्ट्यर्थच होय. त्याच्या योगानें हळूहळू जास्ती जास्ती मनुष्यांच्या मनांत कर्तृत्वाची इच्छा अधिकाधिक उत्पन्न होत जाऊन, शेवटीं कर्तव्य गोष्टींस सिद्धता अवश्य आली पाहिजे. म्हणून असल्या ह्या अविवेकमूलक कल्पनांकडे आपण जास्ती लक्ष न पुरवितां अवश्य कर्तव्य गोष्टीविषयींच्या ज्ञानाचा प्रसार हरएक प्रकारें जेणेंकरून लोकांमध्यें होईल, तेणेंकरून यत्न करण्यास झटलें पाहिजे. सारांश अज्ञानरूपी हरकत, ज्ञानाच्याच योगानें मुख्यत्वेंकरून दूर होणारी आहे.

दुसरी जातिभेदमूलक जी हरकत ती दूर होण्यास जाति-

भेदासारखें प्रचंड, व युगानुयुगें जशाचें तसेंच राहिल्यानें फार दृढ झालेलें बंधन जरी एकाएकीं तडातड तोडून टाकितां आलें नाहीं, तरी तें बंधन आहे, भूषण नव्हे, अशी आपल्या मनांत सुशिक्षित लोकांनीं तरी जर घट्ट गांठ बांधिली, तर हळूहळू त्यापासून उत्पन्न होणारे क्षुल्लक अभिमान व मत्सर आपोआप विरघळून जाऊन नाहींसे होतील. प्रस्तुत सर्व जाती ज्या एकचक्री राज्याच्या अमलांत आल्या आहेत त्याच्या समदृष्टित्वानें या बंधनावरील भूषणरूपत्वाचा आभास दिवसानुदिवस बराच शिथिल होत चालला आहे; व शिक्षणही सर्व जातींत निष्पक्षपातानें देण्याचा जो क्रम सुरू झाला आहे, त्याच्या योगानें भेदास कारणभूत जें ज्ञानतारतम्य तेंही हळूहळू कमी होत चाललें आहे. ब्राह्मण, क्षत्रीय व वैश्य या तिन्ही वर्णांचे विशिष्ट गुण ज्या आपल्या राज्यकर्त्या पुरुषांच्या अंगीं आहेत, त्यांच्यापुढें आपल्या लोकांतील फक्त एकेक गुण ज्यामध्यें आहे असे ब्राह्मणादिवर्ण कितीवेळ टिकले तरी भिन्नत्वानें किती वेळ टिकणार आहेत? आतां आचारविचार स्पर्शास्पर्श, सोवळेंओवळें, हे बाह्यभेद आगगाडचा, आगबोटी यांच्या योगानें जें दिवसानुदिवस वृद्धि पावणारें दळणवळण चारी वर्णांतील लोकांमध्यें सुरू झालें आहे त्यापुढें किती काळपर्यंत टिकणार आहेत? याचीं चिन्हें आज मितीस सुद्धां पाहणाऱ्यांस दिसतात आहेत. तेव्हां साहजीक जें भेदरूपी बंधनास शिथिलत्व येत आहे तें जर समंजस लो-

कांनीं उदारवृत्ति धारण करून, दूरवर दृष्टि योजून, मनाचा धडा करून, आपसांतील मत्सर वगैरे शत्रु जिंकिले, तर आपण या बंधनांतून थोडयाबहुत कालानें पाहिजे तितके मुक्त होऊन ऐक्यवृद्धीची ही हरकत दूर होत जाईल, हें उघड आहे.

परंतु या बाबतीत जो फेरबदल व्हावयाचा त्याची दिशा अन्न, पाणी, शरीर, वस्त्र, इत्यादि गोष्टीसंबंधीं स्वच्छता वाढविण्याकडे व मलिनपणा सोडण्याकडे असली पाहिजे. या गोष्टींत ब्राह्मणादिकांनीं शूद्रत्व न पत्करितां शूद्रादिकांनीं ब्राह्मणत्व पत्करावें. आचारविचार व स्वच्छता यांमध्यें सर्वच ब्राह्मण बनले म्हणजे अज्ञानमूलक भेदबुद्धि आपोआप नाहींशी होत जाईल. प्रत्येक मानवी शरीरांत एकच आत्मरूपी अमोलिक तत्व आहे; व तें सर्व ठिकाणी आदरास योग्य आहे; म्हणून कोणासही दुसऱ्यास नीच मानून त्याचा तिरस्कार करण्याचा अधिकार नाहीं, व ही तिरस्कारवृत्ति सर्वांविषयी समदृष्टि जो लोकपिता परमेश्वर, त्यासही प्रिय होणार नाहीं, असें वाटतें. म्हणून इचा परित्याग दृढनिश्चयानें केला पाहिजे. परंतु परमेश्वराचें वसतिस्थान होण्यास योग्य जें हें आत्मतत्त्व तें ज्ञानानें व विवेकानें सर्वांनीं पवित्र केलें पाहिजे; व त्या आत्मतत्त्वाचें वसतिस्थान जें हें मानवी शरीर, तेंही स्वच्छ शुचिर्भूतपणानें निर्मळ राखलें पाहिजे.

तिसरें ऐक्यास हरकत आणणारें कारण भाषाभेद व लि-

पीभेद होय. इंग्रजी भाषा व लिपी यांचा जितका प्रसार होत आहे, व जितका होणें संभवनीय आहे, तितका झाला असतां ठिकठिकाणच्या हिंदू समूहांतील सर्व पुढारी व्यक्तींच्या ऐक्य-वृद्धीसही हरकत उरणार नाहीं. परंतु बहुसमूहास हें साधन कधींही प्राप्त होण्याचा संभव नाहीं. त्यांचे सर्व व्यवहार आपापल्या स्वतांच्या भाषांतच होणार, म्हणून त्या तर चांगल्या स्थितीस आणल्याच पाहिजेत. तथापि इंग्रजी भाषेपेक्षां पुष्कळ सुलभ रीतीनें सुसाध्य अशी एकादी देशी भाषा सर्व ठिकाणच्या लोकांनीं लेखनवाचनादि साधारण व्यवहारापुरती शिकण्याचा यत्न केला असतां तसें होणें असंभव नाहीं. हल्लीं जसा इंग्रजी भाषेचा प्रसार थोडाबहुत सर्व हिंदुस्थानभर झाला आहे, तसाच मुसलमानांच्या अमलांत व पुढें मराठ्यांच्याही अमलांत हिंदुस्थानी भाषेचा झालेला दिसतो; यास्तव ज्यांत फारशी शब्द कमी वापरले जातात अशी हिंदी भाषेची शाखा जी हिंदुस्थानी भाषा, जी मुसलमानांच्या व उत्तरहिंदुस्थानांतील हिंदूंच्या एकत्र व्यवहारापासून उत्पन्न झाली, तिची व्याप्ति थोडीबहुत आपल्या सर्व देशांत आहेच. तीच भाषा जर सर्व ठिकाणीं ऐक्यवृद्धीसारख्या मोठ्या महत्त्वाच्या कार्यासाठीं बुद्धिपुरःसर संपादन करण्याचा लोकांनीं यत्न केला, तर होणें अशक्य आहे असें नाहीं. तद्वत् सर्व प्रकारच्या हिंदू लिपींची आद्यप्रकृति जी नागरी लिपी, त्या एकाच लिपीचा सर्व भाषा लिहिण्याच्या कामीं उपयोग केला, तर

भाषेच्या ऐक्यानें दळवळण वाढून जितकी ऐक्यवृद्धि होण्यासारखी आहे तितकी होण्यास हरकत राहाणार नाहीं. दुसरा एक उपाय संस्कृत भाषेपासून निघालेल्या जितक्या विशेष देशीभाषा आपल्या देशांत ठिकठिकाणीं चालू आहेत, त्यांच्या शब्दसमूहांत, वाक्यरचनेच्या प्रकारांत व व्याकरणाच्या प्रत्ययांत थोडथोडेंच अंतर आहे. यास्तव पूर्वोक्त महत्कार्यासाठीं ज्यांमधलें अंतरही अगदीं अल्प आहे अशा आपापल्या भिन्न भिन्न लिपींचा अभिमान सोडून जर या सर्व भाषा लिहिण्याच्या कामीं एक नागरी लिपीचाच उपयोग केला, तर या भिन्न भिन्न भाषांतले साधारण सुलभ लेख परस्परांस समजण्यास फारसें कठीण पडणार नाहीं. यामुळें विचारांचें ऐक्य वाढून एकंदर ऐक्यबुद्धीस या अगदीं थोड्याशा साधनानें मोठें साह्य होईल असें मला वाटतें.

वर सांगितलेली चवथी हरकत देशसुधारणेच्या संबंधानें मतविरोध ही होय. यासंबंधानें मतभेद होणें हें साहजिक आहे. ज्ञानभेदानें, सहवासभेदानें, स्थलभेदानें, प्रसंगभेदानें अशा प्रकारचा भेद होतो, तो सर्वप्रकारें परिहार्य नाहीं, व तो सर्वांशीं अनिष्टही नाहीं. कोणत्याही देशोन्नतीच्या कार्यांत कित्येकांची मति विशेष पुढें धांवावी, व कित्येकांची प्राचीन व्यवस्था सोडण्यास मंदगति असावी हें जसें साहजिक आहे, तसें सुधारणेचा ओघ हळूहळू पण सुरक्षितपणें पुढें जाण्यास

उपयोगीही आहे. या गोष्टीकडे उभयपक्षांनीं लक्ष पुरविलें पाहिजे. व आपणा सर्वांस देशोन्नतीसारखें अत्यंत महत्त्वाचें कार्य कर्तव्य आहे, तें होईल तितकें करून आपसांत ऐक्य वाढल्यावांचून व्हावयाचें नाहीं. म्हणून सुधारणेचें पाऊल सुरक्षित पडण्यास जो वादप्रतिवाद अवश्य आहे, तो करावा; परंतु मतभेदामुळें एकमेकांचीं व्यक्तिगत छिद्रें काढून, एकमेकांवर दुष्ट हेतूंचा आरोप करून, शत्रुत्वानें पाहाण्याचा जो प्रकार माजला आहे, तो कार्यावर दृष्टि देऊन मोडून टाकण्याचा सर्वांनी प्रयत्न केला पाहिजे. तरच आपलें पाऊल पुढें पडण्यास आवश्यक जें आपल्यामध्यें ऐक्य, तें वाढून आपल्या देशाचा पुन्हा अभ्युदय होण्याचा संभव आहे. म्हणून मतभेदापासून परस्पर वैर उत्पन्न न होऊं देण्याविषयीं फार आस्थेनें जपणें हाच ही हरकत दूर करण्याचा उपाय आहे.

आतां पांचवी हरकत खऱ्या स्वदेशाभिमानाचा अभाव म्हणून सांगितली, व तेथेंच खोटा स्वदेशाभिमान कोणता व खरा कोणता यांचा भेदही सांगितला. तेव्हां ही हरकत दूर करण्याचा उपाय म्हटला म्हणजे खोटा स्वदेशाभिमान सोडून खऱ्याचा अंगीकार करणें हा होय. परंतु हा उत्पन्न होण्यास आपल्या देशाच्या सुस्थितीवर आपलें, आपल्या कुळाचें, आपल्या मुलाबाळांचें, आपल्या इष्टमित्रांचें, आप्तसुहृदांचें सुख

व कल्याण किती अवलंबून आहे, याचें ज्ञान मनांत ठसलें पाहिजे. ज्या देशांत व राष्ट्रांत आपले पूर्वज होऊन गेले, ज्यांत आपण उत्पन्न होऊन व आपलें पोषण होऊन आपण लहानाचे थोर झालों, ज्यानें आपल्यास सदैव आश्रय दिला, अशा आपल्या देशाविषयीं आपल्या ठिकाणीं जर प्रीति उत्पन्न झाली नाहीं, तर आपण विचारशून्य किंवा कृतघ्न ठरूं. स्वार्थपरता प्राणिमात्रामध्यें आहेच. परंतु मानवी प्राण्याचें जीवन परार्थपरतेनेंच भूषण पावतें. ह्मटलें आहे:—

'परेषामुपकारार्थं यज्जीवति स जीवति;'

परोपकारार्थ जें जीवन तेंच मनुष्याचें जीवन होय. ही परार्थपरता निदान आपल्या देशबांधवांच्या संबंधानें तरी आपल्या ठिकाणीं विशेष जागृत असली पाहिजे. ही जागृत होऊन खरा स्वदेशाभिमान आपल्या अंगीं बाणण्यास आपल्यास प्राचीन व अर्वाचीन काळच्या इतिहासांत थोडीं उदाहरणें सांपडतात असें नाहीं. आपल्या लोकांमध्यें तर या सद्गुणांचा उत्कर्ष झाल्यावांचून आपला हा अवनत झालेला देश उन्नतदशेस आणण्याचें महत्कृत्य आपल्या लोकांच्या हातून कधींच होण्याचा संभव नाहीं. बहुत दिवसांपासून आपल्या या देशांत जी धामधूम चालत आलेली आहे, तिच्या योगानें आपलें जीवित व वित्त याच्या रक्षणाचीच काळजी मनुष्यमात्रांस अ-

सल्यामुळें ज्याणें त्याणें आपापलें रक्षण करण्यासच जपावें, अशा प्रकारची फक्त आपल्या सुखाविषयींच विचार करण्याची वृत्ति आह्मांमध्यें उत्पन्न झाली आहे. ती आतां सोडून खरा स्वदेशाभिमान धारण करून या देशास उर्जित दशेस आणण्याचें कामीं निष्ठापूर्वक लागलें पाहिजे. व तसें केलें असतां आपसांत ऐक्यवृद्धि होण्यास जी प्रबल स्वार्थपरतारूप हरकत ती दूर होईल.

शेवटची हरकत सांगितली ती परस्परांविषयीं उचितादराचा अभाव ही होय. आपण जर एकमेकांशीं प्रेमभावानें वागलों तर आपसांमध्यें परस्परांविषयीं आस्था उत्पन्न होईल, व ऐक्यानें वर्तण्याविषयीं आपली प्रवृत्ति होईल आणि ज्यापेक्षां ऐक्याकरितां सानथोर, श्रीमंत, गरीब, दुर्बल, यांच्यामध्यें दळणवळण वाढलं पाहिजे, त्यापेक्षां विद्या, वय, स्थिति, अधिकार इत्यादिक गोष्टींच्या संबंधानें ज्यांस जो आदर उचित तो त्यांस दाखविला पाहिजे. तरच ते मनापासून इतरांचा समागम करतील. जेथें कोणाचा पायपोस कोणाच्या पायांत नाहीं, जेथें लहान थोर हा कांहीं विचार नाहीं, जेथें लहान तोंडीं मोठा घांस घेण्याविषयीं प्रवृत्ति आहे, जेथें प्रौढ, पोक्त, अनुभवी, वयस्क यांच्या संबंधानें इतरांची विनयाची वर्तणूक नाहीं, तेथें लोकांचें ऐक्य होण्याची आशा मुळींच नाहीं. येतें

देशाची उन्नति होण्याची आशा मृगजलप्राप्तीच्या आशेप्रमाणें आहे. अतएव आपल्या लोकांत ऐक्यवृद्धि जर खरोखरी झाली पाहिजे आहे, तर ज्यांस जो आदर उचित तो देणें हें आपलें अगदीं पहिलें कर्तव्य होय. व तें करण्यानें कोणासही लहानपणा येत नाहीं. उलटा भलेपणा येऊन ऐक्यवृद्धीस हा उचितादर फारच उपयोगीं पडेल.

याप्रमाणें ऐक्यास ज्या हरकती वर सांगितल्या त्यांविषयीं विचार होऊन त्या दूर करण्याचे जे उपाय सहज सुचण्यासारखे आहेत, ते योजण्याविषयीं आपलें सर्वोपरी कल्याण करणारा परमेश्वर आपल्यास सद्बुद्धि देवो !

समाप्त.